(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे संलग्न)

*प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे*

मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,शिवाजीनगर,पुणे, ५
पदव्युत्तर मराठी संशोधन केंद्र,

**पोस्ट डॉक्टरल पदवीसाठी युजीसीला सादर केलेला शोधप्रबंध**

# १९६० नंतरचे स्त्रीलिखित साहित्य , समीक्षा आणि संशोधन

**अभ्यासक**

डॉ.वैजयंतीमाला जाधव

**मार्गदर्शक**

डॉ.स्नेहल तावरे

**एप्रिल २०१८**

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की,डॉ.वैजयंतीमाला अप्पासाहेब जाधव यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पोस्ट डॉक्टरल पदवीसाठी सादर केलेला ***१९६० नंतरचे स्त्रीलिखित मराठी साहित्य समीक्षा आणि संशोधन*** हा प्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेला असून ,यापूर्वी तो कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही. तसेच या विषयावर कोणत्याही विद्यापीठात संशोधन कार्य झाले नाही .या प्रबंधासाठी त्यांनी योग्य त्या संदर्भ साधनांचा उपयोग केलेला असून त्याचा निर्देश संशोधन परिप्रेक्षामध्ये केलेला आहे.

सदर प्रबंध सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पोस्ट डॉक्टरल पदवीसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

पुणे

**मार्गदर्शक**

प्रा.डॉ.स्नेहल तावरे

डॉ.निशा भंडारे
**मराठी विभागप्रमुख**

डॉ.राजेंद्र झुंजारराव
**प्राचार्य**

# प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञा करते की, ***१९६० नंतरचे स्त्रीलिखित मराठी साहित्य, समीक्षा आणि संशोधन*** हा प्रबंध मी स्वतः लिहिलेला असून ,यापूर्वी तो कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही. प्रस्तुत प्रबंध मी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पोस्ट डॉक्टरल पदवीसाठी सादर करीत आहे.

पुणे

**अभ्यासक**

डॉ.वैजयंतीमाला आप्पासाहेब जाधव

# ऋणनिर्देश

माझ्या मार्गदर्शक डॉ.स्नेहल तावरे यांनी हे काम करण्यासाठी मार्गदर्शन केले. या कामासाठी साहित्यप्रेमी भगिनी मंडळाच्या संशोधन विभागप्रमुख डॉ.  मंदा  खांडगे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. हे काम चालू असताना अनेक व्यक्तींनी या कामामध्ये सहकार्य केले.त्या सर्वांचे मनापासून आभार. मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्र झुंजारराव ,मराठी विभागप्रमुख डॉ.निशा भंडारे यांनी या कामासाठी नेहमी प्रोत्साहन  मिळत गेले. प्रोग्रेसिव एज्युकेशन सोसायटीचे सचिव प्रा. शामकांत देशमुख यांचे सहकार्य या संशोधन प्रकल्पासाठी सतत लाभले.त्याबद्दल त्यांचे आभार!

# १९६० नंतरचे स्त्रीलिखित

# साहित्य ,समीक्षा आणि संशोधन

# अनुक्रमणिका

**प्रकरण पहिले - स्त्रीलिखित आत्मचरित्र-चरित्रांचा अभ्यास .................................... ८**

घटक: अ - स्त्रीलिखित आत्मचरित्रांचा अभ्यास ................................................ ८

घटक: ब - स्त्रीलिखित चरित्रांचा अभ्यास ...................................................... ४६

**प्रकरण दुसरे - मराठी स्त्रीलिखितकथा आणि कादंबरीलेखन .................................. ६५**

घटक: अ - मराठी स्त्रीलिखितकथांचा अभ्यास................................................ ६५

घटक: ब - मराठी स्त्रीलिखित कादंबरीलेखन.................................................. ९३

**प्रकरण तिसरे - मराठी स्त्रीलिखित कविता .................................................... १२७**

**प्रकरण चौथे - मराठी स्त्रीलिखित नाटक........................................................ १६९**

**प्रकरण पाचवे - मराठी स्त्रीलिखित नियतकालिके.............................................. १९६**

**प्रकरण सहावे - मराठी स्त्रीलिखित प्रवासवर्णन................................................ २१०**

**प्रकरण सातवे - मराठी स्त्रीलिखित समीक्षा .................................................... २२०**

**प्रकरण आठवे - स्त्रीलिखित इतर साहित्य........................................................ २५१**

घटक: अ - ललित गद्याचे स्वरूप................................................................२५१

घटक: ब - स्त्रीलिखित वैचारिक गद्याचे स्वरूप...............................................२६८

घटक: क - स्त्रीलिखित बालसाहित्य ...........................................................२९३

घटक: ड - स्त्रीलिखित अनुवादित साहित्य ....................................................३२२

घटक: इ - स्त्रीलिखित संपादित साहित्य........................................................३३५

घटक: ई – स्त्रीलिखित संकीर्ण साहित्य........................................................३५०

**प्रकरण नववे – उपसंहार ............................................................................ ३५३**

**पोस्ट डॉक्टरल च्या दरम्यान प्रकाशित झालेले शोधनिबंध ...................................... ३६९**

# १९६० नंतरचे स्त्रीलिखित साहित्य , समीक्षा आणि संशोधनः एक अभ्यास

प्रस्तुत संशोधन प्रबंधात १९६० नंतरचे स्त्रीलिखित साहित्य,समीक्षा आणि संशोधनाचा अभ्यास केला आहे. १९६० नंतरच्या कालखंडात स्त्रियांनी एकूणच या सर्व लेखनात कशाप्रकारे भर घातली याचा याठिकाणी अभ्यास केला आहे.

कथा, कविता, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र, प्रवासवर्णन, नाटक, वैचारिक गद्यलेखन यात लेखिकांचे योगदान अभ्यासण्याचा येथे प्रयत्न केला आहे. १९६० नंतरच्या साहित्याचा विचार करत असताना १९६० पूर्वीच्या स्त्रीलिखित साहित्याचा आढावा सुद्धा येथे घेतला आहे. प्रत्येक साहित्यप्रकारात स्त्रियांनी केलेले लेखन अभ्यासताना त्या त्या साहित्य प्रकारानुसार प्रकरणांची रचना केली आहे.

पहिल्या प्रकरणात स्त्रियांनी आत्मचरित्र या वाङ्मय प्रकारात दिलेल्या योगदानाचा अभ्यास केला आहे. यामध्ये स्त्रियांनी आत्मचरित्र या वाङ्मय प्रकारात घातलेली भर कशा स्वरूपाची आहे? याचा अभ्यास केला आहे. त्यातील ब विभागात चरित्र लेखनात स्त्रियांनी घातलेली भर कशा प्रकारची आहे हे अभ्यासले आहे .कथा कादंबरी ,नाटक ,ललित गद्य ,बालसाहित्य ,समीक्षा असे विविध प्रांत स्त्रीलेखिकांनी हाताळलेले दिसतात.

# प्रकरण पहिले : स्त्रीलिखित आत्मचरित्र आणि चरित्रांचा अभ्यास

## घटक अ : स्त्रीलिखित आत्मचरित्रांचा अभ्यास

### अ) १९१० ते १९५०या कालखंडातील आत्मचरित्रांचा अभ्यास-

स्त्री वाङ्मयाचा उगम कित्येक वर्षापूर्वीच झाला असला तरी त्याला लिखित स्वरूप यायला फारच काळ लोटला गेला. ओवी, म्हणी, उखाणे, गीते यातून स्त्री स्वतःला भावलेली किंवा स्फुरलेली कलाकृतीच इतरांसमोर मांडत असे. त्यालाही अनेक बंधने होती. सण – उत्सव किंवा व्रत वैकल्याच्या वेळीच ती या गोष्टी सादर करताना दिसे. ती पडेल ते काम करीत असे. प्रसंगी ती स्वतःच्या आजारपणाकडेही दुर्लक्ष करताना दिसे. यातूनच तिचे भावविश्व केवळ स्वतःपुरतेच मर्यादित होत गेले. लग्नापूर्वी ती वडिलांच्या धाकात, मोठे झाल्यावर भावाच्या धाकात, लग्नानंतर नवऱ्याच्या धाकात, म्हातारपणी मुलाच्या धाकात आणि या प्रत्येक अवस्थेत स्त्री वडिलधाऱ्या लोकांच्या चांगल्या – वाईट मतांचा मान राखत, स्वतःचा स्वाभिमान विसरून इतकी सर्वांच्या सेवेत तत्पर राहिली की स्त्रीला पुरुषांपेक्षा वेगळे स्वतंत्र स्थान आहे, हे तिच्या ध्यानीही राहिले नाही. किडा – मुंगी – कीटक तरी आपापल्या अस्तित्वखुणा जपतात. तर स्त्रीचा जन्म फक्त पुरुषसेवेकरिता झाल्याचे संस्कार तिच्यावर नकळतच जन्मापासून झालेले असतात. आपले मन दुसऱ्यांजवळ व्यक्त करण्याची मुभा स्त्रियांना मिळत नव्हती. त्याळे स्त्रिया एकट्या पडत गेल्या आणि केवळ स्वतःपुरत्या दुःख हलकं करण्याचा प्रयत्न म्हणून काम करत गेल्या. कालांतराने इंग्रजी राजवटीचे वारे भारतात घुमू लागले आणि भारतीय समाजसुधारकांच्या मदतीने स्त्रीने शैक्षणिक पाऊल उचलले. त्यातूनच त्या स्वतःविषयी लिहू लागल्या, बोलू लागल्या, नोकरी, कुटुंब सांभाळू लागल्या आणि स्वतः विषयीची सतत बोचणारी सल त्यांनी आत्मचरित्राच्या रूपाने व्यक्त केली. "आत्मकथन करणाऱ्या स्त्रियांमध्ये विविध वयोगटातील स्त्रियांचा समावेश आहे. त्यामुळे यातून समोर येणारा काळ अनेक पदरी आहे. गेल्या शतकाचा काळ यातून धूसरपणे जाणवत राहतो. समाजाच्या प्रसिद्धीच्या झोतात आलेल्या कलाकार, लेखिका,कार्यकर्त्या व मान्यवरांच्या पत्नी/ प्रेयसी अशा स्त्रिया लेखनात आघाडीवर आहेत. तसेच स्वत:ची फारशी सामाजिक प्रतिमा तयार नसलेल्या स्त्रियाही मोठया प्रमाणावर लिहू लागलेल्या आहेत, हे विशेष.विविध सामाजिक स्तरांतील स्त्रिया लिहू लागल्या आहेत. शहरी मध्यमवर्गीयांबरोबरच दलित, वंचित, भटक्याविमुक्त जमातीतील स्त्रिया तसेच मुस्लिम,

ख्रिश्चन, ज्यू, जैन अशा अल्पसंख्य समाजगटातील स्त्रियाही लिहित आहेत. आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह केलेल्या स्त्रियांची आत्मकथने सामाजिक अभिसरणाचे भलेबुरे अनुभव सांगत आहेत." १

आत्मचरित्राचा प्रवास श्रीमती रमाबाई रानडे यांनी १९१० मध्ये न्यायमूर्ती गोविंद रानडे यांच्या बरोबर आयुष्य व्यतीत करताना आलेले अनुभव, घटना यांचे केलेले आत्मकथन *आमच्या आयुष्यातील काही आठवणी* च्या स्वरुपात मांडल्या आहेत. मराठी साहित्यातील आधुनिक काळातले पहिले स्त्री लिखित आत्मचरित्र म्हणून 'आठवणी' चा उल्लेख करता येतो. १९०१ मध्ये न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे निधन झाले. त्यानंतर नऊ वर्षांनी म्हणजे १९१० मध्ये श्रीमती रमाबाई रानडे यांनी का. र. मित्र यांच्या मदतीने मनोरंजक ग्रंथप्रसारक मांडली तर्फे त्यांच्या आठवणी पुस्तकरूपाने प्रसिद्ध केल्या.

रमाबाई रानडे यांच्या आत्मचरित्राचा पूर्ण गाभा हा पतीच्या संपूर्ण आयुष्याचा घेतलेला वेध आहे. माधवरावांची घरगुती प्रतिमा, समाजातील स्थान, ध्येयनिष्ठता, चातुर्य आणि एकूणच संपूर्ण जीवनातील आढावा त्यांनी 'आठवणी' तून मांडला आहे.

रमाबाई रानडे यांनी 'आठवणी' मधून तत्कालीन घडामोडी, स्त्रीजीवन, सामाजिक आणि राजकीय परिस्थितीचा आढावा घेतलेला आहे. स्त्री शिक्षणाला सुरूवात झाल्यानंतर समाजात उमटणारे पडसाद रमाबाईंनी टिपले आहे. या आत्मचरित्राच्या अर्पणपत्रिके पासून ते आपलेसे वाटू लागते. मानलेल्या मुलीचा आणि पती महादेवरावांचा सर्व जीवनपट त्यांनी शब्दबद्ध केला. महादेवरावांच्या आठवणीत खिन्न – उदास झालेल्या रमाबाईंना मानलेल्या मुलीने आठवणी लिहिण्यास सुचविले त्यातूनच या आत्मचरित्राचा जन्म झाला.

गोपाळ कृष्ण गोखले हे महादेवरावांचे शिष्य होते. राजकीय वारसदार, कुटुंब स्नेही तर होतेच त्यामुळेच या 'आठवणी' ना गोखले यांनी प्रस्तावना लिहिली आहे.

स्त्रियांसाठी पती हाच परमेश्वर असे मानण्याच्या काळात थोर समाजसुधारकांच्या घरातील चित्र कोणत्या स्वरूपाचे होते हे 'आठवणीं' तून समोर येते. माधवरावांच्या सेवाभावी वृत्तीत, समंजसपणात, ध्येयवादी आकांक्षात, नेतृत्व गुणात, प्रेमात, रागात आणि एकूणच जीवनप्रवासात रमाबाईंना नेहमीच त्यांचा अभिमानच वाटला आहे. रमाबाईंनी त्यांना ज्या घटना सांगाव्या वाटल्या त्या शब्दबद्ध केल्या. काही प्रमाणात त्या तटस्थपणा दाखवतात. 'स्त्री' मासिकातून यशोदाबाई आगरकर यांनी त्यांच्या आठवणी सांगितल्या आहेत. १९३८ साली मासिकातून प्रसिद्धी मिळवल्यानंतर १९९६ मध्ये पुस्तकरूपाने त्यांचे

आत्मचरित्र वाचकांसमोर आले.

आगरकरांच्या मृत्यूनंतर ४३ वर्षानंतर यशोदाबाईंनी वयाच्या बहात्तराव्या वर्षी या आठवणी सांगितल्या आणि अकोला काँग्रेस कमिटीचे कार्येकर्ते श्री. मुनी यांनी त्या शब्दबद्ध केल्या. आठवणी प्रसिद्ध झाल्यानंतर केवळ एका वर्षातच यशोदाबाईंचे निधन झाले. वयानुसार आणि इतक्या वर्षांच्या कालावधीनंतर घडलेल्या घटनांचे पडसाद कमी होतात; अथवा त्या बद्दलच्या विचारांत मतपरिवर्तन होते त्यानुसार काही घटनांचे अपवाद वगळता त्यांच्या लिखाणात स्वच्छता आणि तटस्थ वृत्ती आहे. आगरकर थोर समाजसुधारक असल्याने समाज सुधारण्याचे कार्य आपल्या घरापासून आपल्या पत्नीला सुशिक्षित करून करण्याचा त्यांचा मानस होता. मात्र यशोदाबाईंनी शिकण्यास नकार दिला. ते नेहमी विनवणी करत गेले आणि त्यांची विनवणी यशोदाबाईंनी सक्ती न समजता सहजच फेटाळली. हे जरी खरे असले तरी आगरकरांच्या नंतर त्यांनीही समाजकार्यात स्वतःला झोकून दिले.

तत्कालीन परिस्थितीला साजेसे वातावरण त्यांनीही उपभोगले.लहान वयातील लग्न, हातून होणाऱ्या चुका, त्यामुळे मिळणारा ओरडा, कामांची अखंड साखळी. मात्र या सगळ्यात त्यांना नवऱ्याचा शांत समजूतदारपणा  अधिक भावला.

यशोदाबाईंच्या मनावर अगदी जुन्या वळणांचे खोल संस्कार झाले होते. त्यामुळे सतत व्रत – वैकल्ये, सण – समारंभ त्या यथासांग पद्धतीने करत. आगरकरांनी त्यांना अडविले नाही; मात्र हे केल्यामुळे खरच जीवनात काय बदल होतात का ? हे मात्र ते विचारत असत. अर्थातच उत्तर न मिळाल्याने ते कर्मकांडातील दोषस्थळे यशोदाबाईंना समजावून सांगत असत.

यशोदाबाईंचा मानसिक विकास होण्यास उशिरा सुरुवात झाली आणि पूर्ण होण्याआधीच आगरकरांचा मृत्यू झाला. यशोदाबाईंनी सामाजिक परिस्थितीचा सर्वांगीण बाजूने विचार केला असला तरी त्यांचे आत्मचरित्र वाचकांच्या मनावर राज्य करत नसल्याचे दिसून येते.

१९२१ ते १९४७ असा लेखनकाळ असणारे आत्मचरित्र हे काशीबाई कानिटकरांचे आहे. आणि त्यानंतरही तब्बल ३३ वर्षानंतर म्हणजेच १९८० साली त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले. मराठी साहित्यातील प्रमुख लेखिकांपैकी त्याही एक होत. मात्र त्यांच्या आत्मचरित्राविषयी अधिक माहिती  समोर आली नव्हती. काशीबाईंनी अनेक मासिकांमधून सामाजिक विषयांवर भाष्य केले. अनेक कादंबऱ्या, कथासंग्रह त्यांच्या नावे मोठ्या प्रमाणात

आहेत आणि त्यांनीच डॉ. आनंदीबाई जोशी यांचे चरित्रलेखन केले तसेच थोर साहित्यकार हरिभाऊ आपटे यांची पत्रे संपादित केली आहेत.

समकालीन परिस्थितीचे चढ – उतार त्यांच्याही वाट्याला आले. नकळत ते आत्मचरित्रात ठसठशीतपणे उतरले. अनेक प्रसंग, व्यक्ती, स्वच्छ स्मृती आणि वैभव संपन्न लेखनशैलीमुळे त्यांचे आत्मचरित्र प्रभावी ठरले आहे. सामाजिक अंगाने प्रगल्भ लेखन आणि विशिष्ट वर्तुळाचा परिघ ओलांडून तत्कालीन जीवनातील संपूर्ण जीवनपट त्यांनी रेखाटला आहे. त्यात स्वातंत्र्यपूर्व ते स्वातंत्र्योत्तर असा कालखंड रेखाटताना त्यांची तटस्थ वृत्तीही लक्षात येते.

१९२८ साली पार्वतीबाई आठवले यांचे *माझी कहाणी* हे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले. त्यांनी त्यांचा संपूर्ण जीवनपट *माझी कहाणी* या आत्मचरित्रात मांडला आहे. त्या बालविधवा होत्या. पदरात एक लहान मूल आणि जीवनाचा संघर्ष या सर्वांचे त्यांच्यावर झालेले परिणाम आणि त्यातून त्यांना कर्वे स्त्री – शिक्षण संस्थेशी जोडण्याची एक नवी दिशा मिळाली हि संपूर्ण परिस्थिती *माझी कहाणीत* त्यांनी मांडली आहे.

कोकणातल्या बाळकृष्ण जोशींच्या अकरा मुलांपैकी पार्वतीबाई एक. त्यांचीच बहीण गोदू या थोर समाजसेवक धोंडो केशव कर्वे यांच्या पुनर्विवाहित पत्नी होत्या. पार्वतीबाईंच्या आयुष्याला एक नवे वळण मिळण्याचे कारण म्हणजे त्या कर्वे स्त्री शिक्षण संस्थेला जोडल्या गेल्या. त्यातूनच त्यांच्या जीवनाला खरा अर्थ प्राप्त झाला.

तत्कालीन परिस्थितीचा आढावा त्यांनी सोप्या भाषेत मांडला आहे. आमच्या गावी त्या वेळी मुलांचीच शाळा नव्हती, मग मुलींची कोठून असणार? त्यावेळी बायकांनी शिकावे की नाही, या विषयाची चर्चादेखील कधी होत नसे. आम्हा लहान मुलींना पुजेची तयारी करता आली, तांदूळ कांडता येऊ लागले, उष्टे – खरकटे काढता येऊ लागले, लहान मुलांना आंघोळ घालून त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करता येऊ लागली म्हणजे आम्हाला मिळायचे ते सर्व शिक्षण मिळाले असे त्या वेळी समज असे. आमची त्यावेळची मॅट्रिक परीक्षा म्हणजे भात – पिठले करता येऊन दोन पानांचा स्वयंपाक करता येणे ही असे. मी माझ्या अकराव्या वर्षी ही परीक्षा पास झाले होते. या त्यांच्या सरळ आणि वास्तवदर्शीपणामुळे स्त्रियांची तेव्हाची एकूण परिस्थिती काय होती हे लक्षात येते.

दहाव्या वर्षी लग्न, पंधराव्या वर्षी पहिले मूल, त्यानंतर अजून दोन मुले, बाळंतपणाला त्रास, पहिल्या आणि शेवटच्या मुलाचे देवाघरी जाणे, विसाव्या वर्षी आलेले विधवापण,

प्रवाहाच्या ओघात विधवेची अवहेलना, केशवपण, सामाजिक बंधने या सर्व गोष्टींतून त्यांचे जीवन होरपळून गेलेले दिसून येते.

पंचविशीत आल्यावर शिक्षणाचे पाऊल, हिंगण्याचे वातावरण, मेव्हणे (कर्वे) यांनी केलेली एकूणच मदत या सगळ्या गोष्टींचा विचार करुनच पार्वतीबाई जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहू लागल्या. त्या इंग्रजी शिकल्या, पैसा कमावला, समाजाला मदत केली, विधवांसाठी अनेक प्रकारची कार्ये हाती घेतले. असे अतिशय जिद्दी आणि चिकाटीने समरस असलेले हे आत्मचरित्र प्रभावी भाषाशैली संपन्न आहे. म्हणूनच वाचकप्रियताही या आत्मचरित्राला लाभली आहे.

केशव भिकाजी ढवळे यांनी १९४४ साली बाया कर्वे (आनंदीबाई उर्फ बाया) यांचे आत्मचरित्र *माझे पुराण* या नावाने प्रकाशित केले. दुर्दैवाने बाया कर्वे तेव्हा हयात नव्हत्या.

आठव्या वर्षी आलेले विधवापण, अतिगरिबीचे संकट, अकरा भावंडासोबत आईने एकटीने ओढत आणलेला संसार, नवरा हयात नसताना सासरी जाऊन त्रास सहन करताना बालमनाची होणारी हेलपाट, या सगळ्यात त्यांच्या सासूबाईंनी केलेली मदत, दिलेला धीर आणि समजूतदारपणामुळे त्यांच्या वागण्यात धीटपणा येत गेला. विधवा म्हणजे बेवारस वस्तू असा समज असल्याच्या काळात त्यांना सासूचा पाठिंबा मिळणे त्यांच्यासाठी सकारात्मक गोष्ट ठरली. २१ वर्षाच्या गोदूच्या जीवनाला नवे वळण आले. कामानिमित्त मुंबईला जाणे आले आणि त्यातूनच भावाच्या पाठिंब्यामुळे त्यांनी १९८९ मध्ये सुरु झालेल्या शारदासदन मध्ये पहिली विद्यार्थिनी म्हणून प्रवेश घेण्याचा निर्णय घेतला.

१९९३ साली धोंडो केशव कर्वे यांच्याशी केलेला पुनर्विवाह, कोकणात गेल्यावर झालेला त्रास, अमाप कष्ट, गरीब माहेरघरचा विचार, कर्वे यांचा अल्पित विचार, अनपेक्षित बाळंतपण, तुझे तू कर किंवा पहा असे सांगणाऱ्या कर्व्यांच्या मनात बायासाठी प्रेम दिसले नसले तरी बाया सांगतात त्यांची वृत्ती परखड होती. स्वतःच्या बाळंतपणात झालेल्या त्रासामुळे शिवणकाम शिकून त्या अनेकींना मदत करत राहिल्या. इतरांच्या सहज लक्षात येणाऱ्या गोष्टी कर्व्यांच्या गावी ही नसल्याचे त्यांनी प्रांजळपणे सांगितले आहे. कर्व्यांचा राग, विमा बायाला कळू न देता संस्थेच्या नावी केला, कोणत्याही गोष्टीत बायाला सहभागी होऊ न देता परस्पर निर्णय घेऊन कर्व्यांनी नेहमीच बायाला गौण मानले. मात्र त्यांनी समाजसुधारकांचे काम कसे चोख पार पडले हे बाया आवर्जून सांगतात. एकूणच या आत्मचरित्रात बायाने संपूर्ण जीवनातील चढ – उतार मांडले आहेत. कर्वे हेकट असले तरी त्यातून ते कसे खरे होते हे सांगताना बायाचे सोज्वळ पत्नीचे रूप नकळत स्पष्ट होते.

साहित्यसम्राट न. चिं. उर्फ तात्यासाहेब केळकर यांच्या कन्या कमलाबाई देशपांडे यांचे १९४३ साली *स्मरण – साखळी* हे आत्मकथन प्रसिद्ध झाले. कर्वे शिक्षण संस्थेशी निगडीत असलेले हे तिसरे आत्मकथन आहे. कमलाबाई देशपांडे या शिक्षिका, वाचक, वक्त्या आणि उत्तम कवयित्री होत्या. विविधांगी कलांमध्ये निपुण होत्या. नेहमीच त्या स्वतंत्र मते मांडत असत. त्याकाळची परिस्थिती पाहता त्यांना प्रत्येक गोष्टीत अधिक मुभा मिळाली होती. डेक्कन कॉलेजमध्ये शिकणारे आणि देखणे असणारे यजमान बाबुरावही रसिक आणि हुशार होते. २ ते ३ वर्षांच्या संसारात बाबूरावांच्या निधनामुळे अनेक वादळे आली. सुदैवाने कमलाबाईंना समाजाने सकेशा म्हणून स्वीकारले होते. मुलगा तीन महिन्यांचा असतानाच झालेला आघात त्यांनी अतिकष्टाने सोसला. हिंगण्याच्या आश्रमात पदवीधर झाल्या. परदेश प्रवास केला. स्वतंत्र्य व्यक्तिमत्त्व असल्यामुळे त्यांनी परतल्यावर साताऱ्याला कन्या शाळा चालवली. तात्यासाहेब केळकरांचे स्वभावगुण, तत्कालीन समाजसुधारकांचे रेखाचित्र, शैक्षणिक विचार मंथन, साताऱ्याची कन्या शाळा, हिंगण्याचे आश्रम याविषयी अनेक खोल माहिती यात असली तरी त्यांनी एकूणच त्यांच्या आत्मचरित्रात त्यांच्या चरित्राला मानसिकतेच्या विळख्यात बसलेल्या चटक्यांना दुर्लक्षित ठेवले आहे. एकूणच सामाजिक आणि मानसिक दडपण त्यांनी आठवणीतून व्यक्त केले. तसेच त्यांच्या मते, “आत्मवृत्त म्हणजे कैफियत नव्हे किंवा सार्वजनिक शिक्षण संस्थेचा अहवाल नव्हे ! ‘तपोवनात’ या प्रकरणात त्या म्हणतात, “आयुष्य भारभूत नव्हे तर सारयुक्त आहे. व पुन्हा ते आनंदाने घालविणे हे आपले कर्तव्य आहे. ही दोन तत्त्वे पटून तपोवनात माझ्या आयुष्याची पुर्नघटना झाली.” [२]

रेव्हरंड नारायण वामन टिळक यांच्या पत्नी लक्ष्मीबाई टिळक यांना स्वतंत्र ओळख मिळाली ती त्यांच्या *स्मृतिचित्रे* या आत्मलेखनामुळे. १९३० साली त्यांनी लिखाणास सुरुवात केली. पहिला भाग १९३४ साली तर चौथा भाग १९३६ साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर अनेक आवृत्या प्रसिद्धीस आल्या. सर्वसामान्य आयुष्याच्या वाटेवर हिंदुत्व सोडून ख्रिस्ती धर्मात होणारे पदार्पण एक नवे वळण आणि त्यातून निर्माण झालेले प्रश्नांचे खोल – खोल भोवरे या आत्मचरित्रात वाचायला मिळते.

फुलत गेलेल्या प्रेमाचे क्षण, आणि सुख – दुःखाचे सारे क्षण त्यांनी प्रांजळपणे मांडले आहेत. टिळक हे खरे पहाता विक्षिप्त होते. त्यामुळे लक्ष्मीबाईंना अनेकदा मनस्ताप होत असे. लक्ष्मीबाईंना ते अनेक प्रसंगी गृहित धरत असत. व्यवहारज्ञान कमी असल्याने

प्रपंचाकडे नेहमीच त्यांचे दुर्लक्ष होत असे. त्यातून होणारी लक्ष्मीबाईंची घुसमट, मनस्ताप, प्रसंगी टिळक त्यांना शत्रू समान वाटत असत. टिळकांनी वेळप्रसंगी करून ठेवलेले गोंधळ त्या निस्तरत मात्र संसार आणि आर्थिक बाजूने त्यांची सतत होरपळ होत असे. टिळक विक्षिप्त असले तरी लक्ष्मीबाईंच्या प्रेमाखातर कविता लेखन ते करत, लक्ष्मीबाईंच्या आजारपणात आणि अशा अनेक प्रसंगी घरी कळू न देता ते बायकोला कशी साथ देत हे अनेक प्रसंग लक्ष्मीबाईंनी रेखाटले आहेत. त्याचबरोबर लक्ष्मीबाईं लिहितात, " शरीराचे त्याग करण्याचे प्रसंग मजवर कितीतरी वेळेस आले असतील. पण तो मी कधीच केला नाही. मला वाटते तो कधी होणे ही शक्य नव्हते. माझ्या मनाची ठेवणच अशी आहे की, सर्व निराशामय अंधारातून चाचपडत, धडपडत का होईना पण आपला मार्ग आक्रमायचा. मध्येच पडून प्राण सोडायचा नाही. खरे म्हणजे रबरी चेंडूप्रमाणे आहे माझे." [३] दुःख सोसण्याची, संकटाला सामोरे जाण्याची त्यांची वृत्ती या लेखनामागे आहे.

एकूणच समकालीन परिस्थिती या आत्मचरित्रातही दिसते. लहान वयातील लग्न, संसार, न झेपणारी कामे, प्रपंचातील ओढ – ताण आणि विचित्र नवऱ्याच्या प्रेमळ आणि दुःखद गोष्टी या आत्मचरित्रात उमटलेल्या आहेत.

१९३९ मध्ये पंडिता रमाबाईंच्या शिष्या कृष्णाबाई गद्रे यांचे *स्मृतीसुमने* या नावाने आत्मचरित्र प्रसिद्ध झाले. १९४७ मध्ये अन्नपुर्णाबाई रानडे यांचे आत्मचरित्र *स्मृतीरंग* या नावाने प्रसिद्धीस आले. १९४८ मध्ये लगेचच इंदिराबाई भागवत यांनी त्यांचे आत्मकथन *या सदाशिव* या नावाने प्रसिद्ध केले. एकूणच उपरोक्त आत्मकथनामध्ये पतीचरित्र येते, तर कधी समकालीन वैवाहिक स्थिती, सामाजिक, राजकीय आणि जातीय विकोपाला जाणारे भेदही स्पष्ट होतात तर समाजसुधारकांचे मोठे कार्य नव्याने नजरेस पडते.

*आमची अकरा वर्षे* नावाने एक लक्षणीय आत्मकथन प्रसिद्ध झाले. १९४५ साली कवी माधव त्र्यंबक पटवर्धन (माधव ज्युलियन) यांच्या पत्नी लीलाबाई पटवर्धन यांनी ते रेखाटले आहे. या आत्मचरित्रातही वरील आत्मचरित्रांसारखाच एकसुरीपणा असला तरी निवेदनशैली आणि माधवरावांच्या गत आयुष्यातील घडलेल्या घटनांचे वर्तमान आणि भविष्यात होणारे सारे परिणाम लीलाबाईंनी अतिशय समंजसपणे मांडले आहेत. दुःखात दिलेली साथ आणि मनोधैर्य यांमुळेच त्यांच्या आयुष्यातील ही संसाराची अकरा वर्षे कशी वादळातही तग धरून होती हे वाचताना वाचकांच्या मनातही अनेक तरंग निर्माण होतात. इतर मुलींपेक्षा लीलाबाई बी. ए. झाल्यावर १९२८ मध्ये माधवरावांच्या अर्धांगिनी झाल्या.

ते ३४ वर्षांचे होते. दोघेही सामंजस आणि मनाने स्थिर, त्यामुळे गतकालीन आयुष्याला अधिक कवटाळून न बसलेले बरे या मताने ते संसाररथ ओढत गेले. माधवरावांचे पहिले प्रेमसंबंध, त्यातली निराशा, खचलेले माधवरावांचे मन, अतिसंवेदनशीलता, अस्थिरता, समाजातील टोचण, फर्ग्युसन कॉलेजमधील बदनामी या संपूर्ण परिस्थितीचा आलेख त्यांनी लीलाबाईंना सांगितला असल्याने अकरा वर्षांच्या संसारात चढ – उतार मंद स्वरुपात होते.

एकूणच या आत्मकथनात उत्कट प्रेम असणारे हे पती – पत्नी आपला विवाह कशा रीतीने यशस्वीतेकडे घेऊन जातात याचे अतिशय बोलके उदाहरण आहे. " समाजमनाची संवेदनशून्यत, कुटुंब व स्त्रीजीवन या बाबतीतील स्थितिशील मनोवृत्ती कोत्या जीवनावकाशामुळे जगण्यात आलेला किरटेपणा, ब्रिटिशांच्या सांस्कृतिक आक्रमणच्या भयातून अधिकाधिक कर्मठ होण्याचा कल... अशी त्या मनोवृत्तीची कारणमीमांसा शोधता येते." [४]

प्रारंभीचे १९१० ते १९५० या कालखंडातील आत्मचरित्रांचा आराखडा हा प्रारंभी पतीचरित्र, विधवा जीवन, शिक्षणाची ओढ, हातून घडलेले समाजकार्य असा हळूहळू होणारा प्रवास आत्मचरित्रातून समोर येतो. १९५० नंतरच्या आत्मचरित्रांनी मात्र वैचारिक, बौद्धिक अंगाने अधिक वेध घेतल्याचे निदर्शनास येते. १९५० नंतरच्या आत्मचरित्रांचा अभ्यास पुढीलप्रमाणे करताना स्पष्ट होईलच.

## ब) १९५० ते १९७५ या कालखंडातील आत्मचरित्रांचा अभ्यास

१९५० पर्यंतच्या आत्मचरित्रांमध्ये स्त्रीशिक्षण, सुधारणा आणि पतीप्रेम दिसून येते. मात्र त्यानंतरच्या आत्मचरित्रांमध्ये स्त्रियांनी प्रगतीकडे झेप घेतलेली दिसून येते. कलाक्षेत्रामध्ये १९५० साली रोहिणी भाटे यांनी *माझी नृत्यसाधना* या नावाने आत्मचरित्र लिहिले आहे. ज्या काळात स्त्रियांची नृत्ये म्हणजे वाईट असे मत असणाऱ्या काळात त्यांनी नृत्यकला कशी जोपासली आणि त्यातून कला कशी विस्तारली याचे उदाहरण म्हणजे *माझी नृत्यसाधना* हे आत्मचरित्र होय.

१९५२ मध्ये लक्ष्मीबाई पटवर्धन यांनी *माझा नंदादीप* नावाने आत्मचरित्र लिहिले. या आत्मचरित्रात प्रामुख्याने पतीचरित्र, पतीप्रेम, संसारचित्र यांचा संगम असून डॉ. पटवर्धन यांच्या लहान – मोठ्या गुणांचे त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर झालेले परिणाम स्पष्ट होतात. त्याचबरोबर स्वातंत्र्य चळवळीत त्यांनी कसा भाग घेतला यांचे बोलके चित्ररंग त्यांनी

आपल्या लेखनात मांडले आहेत.

लक्ष्मीबाई पटवर्धन यांच्या समकालीन रमाबाई केदार यांनीही १९५२ मध्ये 'वेचलेले मणी' मधून आत्मवृत्त रेखाटले आहे. पतीनिधनानंतर त्यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांनी हे आत्मचरित्र लिहिले. यातही पतीचरित्र अधिक डोकावताना दिसते. नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू, कायदेपंडित, वाङ्मयप्रेम, राजकारण या सगळ्या प्राविण्यता मिळवलेल्या पतीचा त्यांना अभिमान होता. तो इतरांनाही कळावा आणि माणूस म्हणून असलेले त्यांचे प्रेम, आदर्श गुण आणि दोषही त्या मांडतात. मात्र यातून त्यांनी आत्मवृत्ताचे लेखन अतिशय समर्पक रीतीने केलेले दिसते.

राधाबाई आपटे यांनी १९५८ साली *ढळला रे ढळला दिन सखया* आणि *उमटलेली पावले* १९६१ साली लिहिलेली दोन्ही आत्मचरित्र प्रामुख्याने पतीचरित्रच अधिक आहेत. पां. श्री. आपटे यांच्या त्या पत्नी. आपटे गुरुजींनी केलेली राष्ट्रभक्ती, राष्ट्राबद्दलचा अभिमान, कर्तव्यनिष्ठा, साहस, त्याग आणि प्रेम यातून त्यांचे जीवन कसे व्यतीत झाले यांचा आलेख या आत्मवृत्तात स्पष्ट होतो.

१९५९ साली *द्रौपदीची थाळी* या नावाने विसाव्या शतकातील एक लेखिका, पहिली नाट्यकर्ती, १९२७ साली मुंबईला मराठी नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद भूषवलेली पहिली स्त्री असा मान असलेल्या गिरिजाबाई केळकर यांनी लिहिले. ५३ वर्षे संसार केल्यानंतर पतिनिधनानंतर निर्माण झालेल्या पोकळीमुळे त्या अधिक खचत गेल्या. आत्मकथनात अनेक ठिकाणी पतीचरित्र तर संसारचित्र रंगवलेली दिसतात. त्या काळातील बायकांना एकत्र आणून त्यांना बोलते करणे, वृत्तपत्रातील माहिती, विनोद, समाजातील स्थिती सांगत त्यांचे प्रबोधन करण्याचे कार्य गिरिजाबाई केळकर स्वेच्छेने करत असत. स्वतःबरोबरच इतर स्त्रियांची सर्वांगीण प्रगती कशी होईल याच प्रयत्नात त्यांनी आपले आयुष्य व्यतीत केले असे म्हणण्यास हरकत नाही. एकूणच गिरिजाबाईंनी समाजकार्याचे व्रत, संसार, पतिप्रेम आणि आयुष्यातील विविध वळणे आत्मवृत्तामध्ये रेखाटली आहेत.

*आमच्या संसारची पन्नास वर्षे* हे आत्मचरित्र १९६३ मध्ये रमाबाई लक्ष्मण साठे यांनी लिहिले आहे. या आत्मचरित्रात संसारचित्र, नातलगांची ओळख, विवाहपद्धत, आंदण म्हणून आंब्याचे झाड देण्याची लग्नातील रूढी परंपरा दाखवल्या आहेत. धार्मिक, सांस्कृतिक आशयासहित त्यांनी सांगितल्या आहेत. भारताला स्वातंत्र्य मिळाल्याचा आनंद भारतवासियांनी कसा साजरा केला यांचे चित्र त्यांनी आत्मचरित्रात रंगविले आहे. उतार आयुष्यात त्यांनी समाजसेवा मोठ्या प्रमाणात केल्याचेही नमूद आहे.

इंदुमती सुखात्मे यांनी त्यांच्या सासूबाई सत्यभामाबाई सुखात्मे यांचे आत्मचरित्र लिहिले. सासूबाईंनी सांगितले आणि सूनबाईंनी लिहून काढले असे याचे स्वरुप आहे. हे आत्मचरित्र १९६४ साली *गेले ते दिवस* या नावाने प्रसिद्ध झाले.

या आत्मचरित्रात एकूण जीवनाचा आढावा त्यांनी तटस्थ भूमिकेतून घेतलेला दिसतो. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस आणि विसाव्या शतकाच्या प्रारंभी स्त्रीचे जीवन कसे होते, एकूणच समाजमनाची स्वातंत्र्यानंतर कशी प्रतिक्रिया होती आणि जुन्या पिढीकडून नव्या पिढीच्या नव्या वाटचाली त्यांनी नमूद केल्या आहेत. समकालीन लेखिकांनी, समाजकार्य करणाऱ्या स्त्रियांनी कसे विवाह, संसार, बालविवाह, विधवाजीवन, समाजातील क्रूरता रेखाटली तसाच सूर या आत्मवृत्तातही वाचावयास मिळतो. आत्मचरित्राच्या संदर्भात पु.ल.देशपांडे यांना जे जाणवते ते असे, " आत्मचरित्रात स्वत:च्या जीवनाचे अलिप्तपणाने घडवलेले दर्शन असावे अशीही काही लोकांची अपेक्षा असते.इतक्या परकेपणाने स्वत:च्या जीवनाकडे पाहता येते, की नाही कोण जाणे ? आपल्या चुका जाहीरपणाने जगापुढे मांडताना आत्मचरित्र लिहायला सारा अहंभाव नष्ट व्हावा लागतो. ही म्हणजे महान योग्यांनाही असाध्य अशी योगसाधना आहे."[५] जीवनातील अनेक लहान – लहान गोष्टींकडे सत्यभामाबाईंनी सकारात्मक दृष्टीने पाहिल्याचे लक्षात येते. समाधानी, कर्तव्यदक्ष, प्रेमळ असे वासुदेव सुखात्मे आणि सत्यभामाबाई सुखात्मे यांचे जीवनतरंग या आत्मवृत्तात समजतात. समाजकारण आणि राजकारण असे धडे गिरवत बालपण गेलेल्या मृणालिनी देसाई यांनी *निशिगंध* हे आत्मचरित्र १९६८ मध्ये लिहिले. या आत्मचरित्रात स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी स्वतःला कसे झोकून दिले याची संपूर्ण माहिती आहे. लहानपणापासून स्वातंत्र्यासाठी झटणाऱ्या एका ध्येयनिष्ठ, कर्तृत्त्वान स्त्रीचे हे आत्मवृत्त अतिशय बोलके आहे. गांधी, नेहरू, पटेल यांच्या विचारांचा मोठा प्रभाव पडून त्यांच्या हातून देशसेवा घडत गेली. 'अबला' असलेली स्त्री 'सबला' कशी होऊ शकते याचे मूर्तिमंत उदाहरण *निशिगंध* मध्ये आहे.

१९६८ मध्ये रुथबाई हिवाळे यांनी *संसारचित्र* आमचे कृतार्थ सहजीवन असणारे आत्मचरित्र लिहिले. पतिनिधनानंतर त्यांच्या आठवणीतले हे आत्मचरित्र डॉ. हिवाळे यांचे विद्याप्रेम, व्यासंग, कष्टाळूवृत्ती यांचे दर्शन घडवून देते. पतीचरित्र जरी अधिकांश असले तरी या दाम्पत्याचा स्वदेशाभिमान व लोक कल्याणाची तळमळ अधिक महत्त्वाची वाटते. डॉ. हिवाळे यांची जिद्द, ध्येयवृत्ती यातून घडत गेलेले समाजकार्य यामुळे हे आत्मचरित्र वाचनीय ठरते.

श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या पत्नी शीलावती केतकर यांनी १९६९ मध्ये *मीच हे सांगितले पाहिजे* हे आत्मचरित्र लिहिले. या आत्मचरित्रातही पतीचरित्र अधिक आहे. स्वाभाविकपणे डॉ. केतकरांच्या बद्दल समाजात निर्माण झालेल्या असंतोषाचे मूळ या आत्मचरीत्रात असल्याचे जाणवते.

शीलावती बाई धर्माने ज्यू होत्या. त्यामुळे जातीय संघर्ष आणि पतिविषयी लोकांमधील गैरसमज तसेच त्या कशा भारतीय नसूनही खऱ्या पतिव्रता होत्या याचे दाखले या आत्मवृत्तात समजतात. पतीच्या दोषांचा बाऊ न करता त्या नेहमीच समजूतदार भूमिका वठविताना दिसतात. पतीबद्दलचे लहान – मोठे गैसमज जरी त्यांनी दूर करण्यासाठी आत्मचरित्र लिहिले असले तरी त्यांना पतीच्या न आवडणाऱ्या गोष्टीही तटस्थपणे त्यांनी मांडल्या आहेत. एकूणच त्यांच्या आत्मचरित्रातून वैचारिक प्रगल्भतेचे आपसूक दर्शन घडते. डॉ. केतकरांच्या विषयीचे गैरसमज दूर करायला त्या यशस्वी ठरल्या आहेत.

शिक्षणक्षेत्रात कर्तृत्त्व उमटविलेल्या सुधा अत्रे यांनी १९६९ साली *गोदातरंग* हे आत्मचरित्र लिहिले. यात प्रामुख्याने त्यांच्या दुबळया, सोशिक स्त्रीचे दर्शन घडते. दुर्दैवाने लहानपणापासूनच त्यांना जबाबदारीने वागावे लागले. बालपण अतिशय दुःखात गेले आणि वैवाहिक जीवनाची सुरुवातही अतिशय फसवणूकीची ठरली. मात्र यातून त्या न खचता 'क्षमा करणे हाच खरा स्त्री धर्म आहे' या तत्त्वानुसार जगत आल्या. आचार्य अत्रे यांच्या अर्धांगिनी बनूनही त्या प्रत्येक गोष्टीसाठी वंचित राहिल्या. मात्र त्यातूनही त्यांनी शिक्षणक्षेत्रात स्वतःचा वेगळा ठसा निर्माण केला. या आत्मचरित्रात संसारचित्र, पतीगुण – दोष, शैक्षणिक वाटचाल, सामाजिक, राजकीय आणि एकूणच आयुष्याकडे सकारात्मक दृष्टीने बघण्याचा त्यांचा मानस समोर येतो. म्हणूनच हे आत्मचरित्र वाचनीय ठरलेले आहे.

शिक्षणक्षेत्राबरोबरच सिनेसृष्टीत आपला ठसा उमटविणाऱ्या हंसा वाडकर यांनी १९७० मध्ये *सांगत्ये ऐका* हे आत्मचरित्र लिहिले. अरुण साधू यांनी त्याचे शब्दांकन केले आहे. गरिबीमुळे त्यांनी लहानपणी चित्रपटसृष्टीची वाट धरली. कलाकार म्हणून त्या मेहनती, शिस्तप्रिय होत्या. परंतु संसारातील चढ – उतारामुळे त्यांनी स्वतःवरचा ताबा सोडला होता. मद्यपान करून त्या आपल्या दु:खांवर मात मिळवत होत्या पण त्यातच त्या अधिक दुःखी, कष्टी होत होत्या. त्या काळात सिनेसृष्टीत काम करणाऱ्या बाईकडे केवळ वासनेच्या दृष्टीने समाज पहात असे. हंसाबाईंवरही असे अनेक प्रसंग आले. त्यांनी समाजाच्या या नजरेत स्वतःला वाचवण्याचे कसे निष्फळ प्रयत्न केले, हे वाचताना समाजातील विकृत

नजरांची किळस येते. पहिला संसार, दुसरा संसार, समाजाची विकृत नजर या सगळया चक्रव्युहात हंसाबाई वाडकरांचे जीवन कसे कटू होत जाते हे प्रकर्षाने जाणवते. सिनेसृष्टीतील काही मातब्बर लोकांविषयी मात्र त्या भरभरून बोलतात. उदाहरण व्ही. शांताराम, राजाभाऊ नेने, बाबुराव पेंढारकर.

सिनेसृष्टीत जर काम करायचे असेल तर संसार विषय काढून टाका असा सूर त्यांच्या अनुभवामुळे त्या इतर मुलींना देतात. त्यांच्या या कटू अनुभव भरलेल्या जीवनात संपूर्ण मनाच्या कशा चिंधड्या उडाल्या याचे चित्रण त्यांच्या आत्मचरित्रात आहे. हे आत्मचरित्र समाजाला विचार करायला भाग पडणारे आहे.

डॉ. शामराव परुळेकर यांच्या पत्नी गोदावरी परुळेकर यांनी १९७० मध्ये *जेव्हा माणूस जागा होतो* हे आत्मचरित्र लिहिले.

शहरी जीवन जगलेल्या एका व्यक्तीने आदिवासी भागात जाऊन घेतलेला एक हृदयस्पर्शी अनुभव म्हणजे आदिवासी लोकांमध्ये अधिकाधिक काळ राहणे. उच्च जीवनशैली असणाऱ्या व्यक्तीला हे फारसे जमत नाही परंतु आदिवासी लोकांसाठी समाजकार्य करण्याची जिद्द असणाऱ्या गोदावरीबाईंनी हे करून दाखवले. आदिवासी जीवनाचा वेध घेऊन त्यात हळूहळू बदल घडवून आणले. अर्थातच या सगळया गोष्टी करण्यासाठी अनेक संघर्ष त्यांनी केले. शेतकऱ्यांसाठी केलेले लढे, आदिवासी लोकांसाठी केलेले समाजकार्य आणि एकूणच डॉ. शामराव परुळेकरांच्या बरोबरीने गोदावरीबाईंचे संपूर्ण आयुष्य हे समाज उन्नतीसाठीच वाहिलेले दिसून येते.

१९७० मध्ये अजून एक आत्मचरित्र प्रसिद्ध झाले. उषा डांगे यांनी *पण ऐकतं कोण?* हे आत्मचरित्र लिहिले. पुढे सुधारित आवृत्तीत *उषाकाल* या नावाने त्यांच्या कन्या रोझा देशपांडे यांनी हे आत्मचरित्र प्रसिद्ध केले.

डॉ. डांगे यांच्याशी पुनर्विवाह केल्यानंतर त्यांच्या एकूणच जीवनाच्या दिशा बदलतात. नशिबी असलेले विधवापण त्या विसरून पतीसमवेत समाजकल्याणाचा नवा अध्याय सुरु करतात. कामगारांसाठी लढे देतात, तुरुंगवास भोगतात, बाळंतपणानंतर बाराव्या दिवशी त्या लढ्यात उतरतात. पतीची जन्मठेप, स्वतःवर आलेले मारेकरी, स्वतःबद्दल होणारा अपप्रचार या साऱ्या गोष्टी त्यांचे मन कापून जाणाऱ्या होत्या. मात्र त्या प्रत्येकवेळी खंबीर राहिल्या. संपूर्ण आयुष्य हे त्यांनी कामगार लढ्यात व्यतीत केले.

या आत्मचरित्रात कामगार लढा, संघर्ष अधिक असला तरी काही अंशी हे पती चरित्रही आहे. एकूणच पतीच्या ध्येयाशी समरस होऊन कामगारांसाठी आयुष्यभर केलेला झगडा या

आत्मचरित्रातून समोर येतो.

जानकीबाई फडणीस यांनी लिहिलेले आत्मचरित्र *स्मरणमाला* हे १९७० साली प्रसिद्ध झाले. तेव्हा जानकीबाई फडणीस हयात नव्हत्या. पुण्यातील ब्राम्हण समाजातील पद्धती, रहाणीमान, रूढी – परंपरा यांचे सखोल वर्णन त्यांनी आत्मचरित्रात रेखाटले आहे. काही खानदानी पद्धतीही त्यांनी मांडल्या आहेत. त्या काळचे प्रसिद्ध डॉक्टर गणेश कृष्ण गर्दे यांच्या कन्या असलेल्या जानकीबाई माहेरी अति लाडात वाढलेल्या होत्या. डॉ. गर्दे यांचे लोकमान्य टिळक यांच्याशी असलेले मित्रत्वाचे नाते आणि अण्णासाहेब यांच्याशी असलेले नाते जानकीबाईंनी आवर्जून मांडले आहे.

त्या काळात पुण्यात पसरलेले प्लेगचे थैमानही त्यांनी शब्दबद्ध केले आहे. दैनंदिन जीवनातील चढ – उतार त्यांनी त्यातून प्रांजळपणे मांडले आहेत. पतिनिधानंतर स्वमग्न अवस्थेत त्यांनी हे लेखन केलेले आहे.

१९७२ साली प्रमिला भालेराव यांनी *अश्वत्थाची फुले* हे आत्मचरित्र लिहिले. पती डॉक्टर असल्याने आणि मुलीच्या आजारपणात योग्य ती शुश्रुषा न केल्याची बोचणी त्यांना परिचारिकेचे शिक्षण घेण्यास प्रवृत्त करते. तत्कालीन सामाजिक परिस्थितीची मराठवाड्यातील माहिती यातून मिळते. लुगडे न नेसता नऊवारी पातळे नेसणारी ही फॅशनेबल स्त्री, हातात कमी बांगड्या, पायात चपला आणि हवे तेव्हा हवे ते करण्याचा निर्धार असणारी स्त्री म्हणजे शापित, कलंकित असे वर्णन समाजाकडून झालेले त्यांनी नोंदविलेले आहे. १९२८ च्या सुमारास डॉक्टरांना मान तर सोडा पण “माणूसमाऱ्या” असा अपशब्द वापरला जात असे. अतिशय सनातनी विचारांची कोटी त्यांनी केली आहे. आमची रीत, आमची परंपरा, आमचे घराणे यासारख्या स्वकौतुकाने फुगीशी वृत्तीचा त्यांनी उल्लेख केला आहे. भाषेतील बदलही त्यांनी टिपले आहेत. संसार आणि व्यवसाय असा दुहेरी घाट घातलेल्या प्रमिलाताई स्वआयुष्याबरोबरच तत्कालीन कौटुंबिक, सामाजिक, राजकीय आणि एकूणच मराठवाड्याचे दर्शन घडविताना यशस्वी होताना दिसत आहेत.

आनंदीबाई विजापुरे यांनीही १९७२ साली आत्मचरित्र प्रसिद्ध केले. *अजुनी चालतोची वाट* हे त्यांचे आत्मचरित्र अनेक दुःखद प्रसंगानी व्यापलेले आहे. जीवनातील नैतिक – अनैतिक विचारांचा आणि प्रसंगी तटस्थ भूमिका स्वीकारत या आत्मचरित्रात त्यांनी स्वकहाणी निर्भीडपणे मांडल्याचा प्रत्येय वाचताना येतो.

१९७२ साली आनंदीबाई शिर्के यांनीही *सांजवात* नावाने आत्मचरित्र प्रसिद्ध केले. प्रत्येक स्त्रियांच्या नशिबी येणारे निरनिराळे अनुभव त्या जसे मांडतात त्यावरून तत्कालीन

परिस्थितीची पाळेमुळे समोर येतात. आनंदीबाई यांनी मराठा समाजातील स्त्रियांची एकूण परिस्थिती आत्मचरित्रातून रेखाटली आहे. कोकणस्थ आणि देशस्थ मराठा समाजातील वैचारिक दरी, सांस्कृतिक जीवन, मान – अपमान, व्रत – वैकल्य, स्त्रियांना दिली जाणारी वागणूक, हुंडा, एकत्र कुटुंब पद्धती, बालविवाह आणि एकूणच शैक्षणिक वाद या सर्व तत्कालीन परिस्थितीत त्यांच्यात होणारे बदल त्यांनी त्यांच्या आत्मचरित्रातून मांडले आहेत. आनंदीबाई शिर्के या *सांजवात*' आत्मचरित्रात असे सांगतात, की " आपल्या जीवनात घडलेल्या घटना मुलांना उलगडून सांगाव्या म्हणून माझ्या आयुष्यात जे जे घडले ते ते मी लिहून काढले." [६]

१९७३ साली स्नेहप्रभा प्रधान यांनी *स्नेहांकिता* हे आत्मचरित्र लिहून त्यांचे जीवनातील दुःख समाजासमोर मांडले आहे. प्रेम, अपेक्षाभंग, वैफल्य, नैराश्य सतत पदरात असल्याने जीवनात त्यांनी काही निर्णय भावने पोटी घेतलेले त्या प्रांजळपणे सांगतात. सरतेशेवटी आपण केलेली एक न् एक चूक त्या मांडताना भावनिक, शारीरिक, मानसिक मर्यादांना ओलांडून सांगतात. मात्र तरीही स्वतःच्या अंगी अनेक कलागुण असणाऱ्या व्यक्तींची विवेकबुद्धी कशा प्रकारे गंजून जाते याचे हे एक जिवंत उदाहरण वाटते.

इंदिरा मायदेव यांनी १९७४ साली *स्मृतीतरंग* हे आत्मचरित्र लिहिले. त्यात त्यांनी त्यांच्या कर्तुत्वाच्या पाऊलखुणा रेखाटल्या आहेत. एकूणच हे आत्मचरित्र मर्यादित कालखंडातील असून राजकीय वृत्तांताचे प्रमाण यात अधिक आहे. तसेच " विविध सामाजिक चळवळीत भाग घेणारी, राजकारणात सक्रिय असणारी ही स्त्री आहे. उपेक्षितांच्या व स्त्रियांच्या प्रश्नांत (स्त्रीमुक्तीवादी म्हणून न मिरवत) रस घेणाऱ्या मूलत: समाजसेविकेचा पिंड असणाऱ्या इंदिराबाईंना एक स्त्री म्हणून स्वीकृत कार्यात पडणाऱ्या मर्यादांची खंत वाटते. आठवतात तस तसे प्रसंगांचे निवेदन करत जाणारे हे 'स्मृतीतरंग' सुरुवातीस आत्मकेंद्रिततेकडे झुकताहेत असे वाटते पण नंतर दर्शनाकडे वळलेले हे लेखन वाचनीय वाटते." [७] असे जयंत वष्ट यांना जाणवते.

१९७४ साली सुशीलाबाई आठवले यांचे *आंब्याचा टाळा* हे ही आत्मचरित्र प्रसिद्ध झाले. यात त्यांनी त्यांचे बालपण, वैवाहिक जीवनातील चढ – उतार, सासू – सुनेचे नाते आणि एकूणच ब्राम्हण समाजातील विविधता मांडलेली आहे.

सुशीलाबाई या महर्षी कर्वे यांच्या शिक्षण संस्थेशी निगडीत होत्या. मात्र त्याबद्दल विशेष वाचावयास मिळत नाही. बाया कर्वे यांची बहिण पार्वतीबाई आठवले आणि त्यांची

सून म्हणजे सुशीलाबाई होत. यामध्ये एकूणच एक जीवनभाष्य त्यांनी साकारलेले दिसून येते.

१९७५ साली सरोजिनी शारंगपाणी यांनी *दुर्दैवाशी दोन हात* हे आत्मवृत्त लिहिले, तर आशालता सावे यांनी *पानाआडचे फूल* हे आत्मवृत्त लिहिले.

शारंगपाणी यांनी जीवनातील कटू सत्य लेखनबद्ध केले आहे. अत्यंत दुर्दैवी जीवनातील त्यांची सल त्यांनी मांडली आहे. दुःख, अडचणी, वैवाहिक जीवन, तडजोड, हेकट वृत्तीचा जोडीदार, फसवणूक, पिळवणूक, त्याग, शैक्षणिक सरमिसळ यांनी त्यांच्या जीवनात झालेले बदल टिपलेले आहेत. तर आशालता सावे यांनी *पानाआडचे फूल* यातून अतिशय सकारात्मक भूमिका घेऊन आत्मचरित्र लिहिलेले दिसते. काही दुःख वाट्याला असूनही त्यांनी शोधलेले मार्ग अनाकलनीय आहेत. काही गोष्टी अगदीच ईर्ष्या निर्माण करणाऱ्या असल्या तरी परिस्थिती समजण्याचे हे केवळ एक माध्यम ठरले आहे. एकूणच हे आत्मचरित्र वाचनीय आहे.

१९५१ ते १९७५ या टप्प्यातील आत्मचरित्र ही एकूणच तत्कालीन परिस्थितीचा आरसा आहेत. स्त्री प्रतिमा, समाजरचना, पती गुण, पती द्वेष, संसार, छळ, गरिबी, श्रीमंती, शैक्षणिक वाटचाल आणि कलागुण या सर्वांनी भरलेली आत्मचरित्र आहेत.

काही अंशी अतिव दुःख, प्रेम भावना, पुरुषपण, अपेक्षाभंग हेही प्रसंग जेव्हा वाचावयास मिळतात तेव्हा हेही लक्षात घेणे गरजेचे वाटते की, प्रारंभ ते १९५० च्या टप्प्यात स्त्रिया केवळ उंबरठा ओलांडण्यासाठी लढल्या आणि आता शारीरिक, मानसिक या विचारात काही अंशी चुकीच्या ठरल्या तर काही अंशी अगदीच राजकीय स्तरावरही मजल मारणाऱ्या ठरल्या. उदाहरण सौ. इंदिरा मायदेव.

१९७६ नंतरच्या आत्मचरित्रातील प्रवास मात्र कलागुणांना आणि लेखनीला अधिकाधिक वाव देणारा ठरत आहे. स्त्री प्रतिमेचे अधिक उत्कट आणि वैचारिक पाऊल १९७६ नंतरच्या आत्मचरित्रांतून अभ्यासास मिळेल.

### क) १९७५ ते २००० या कालखंडातील आत्मचरित्रांचा अभ्यास

प्रारंभ ते १९७५ च्या आत्मचरित्रांचा विचार करता या आत्मचरित्रातून स्त्रियांनी ओलांडलेला उंबरठा ते शिक्षण, संसार आणि पतीविषयीचे प्रेम या आलेखाने उंच झेप घेतलेली दिसते. मात्र १९७६ नंतरच्या आत्मचरित्रातून स्त्रियांमधील कलागुण अधिक

ठळकपणे  दिसत आहे. १९७६ पासून स्त्रियांची स्थिती अधिकाधिक सुधारत असल्याने, शिक्षणाची जोड असल्याने त्यांनी करिअरला आणि स्वतःला सिद्ध करायला प्रारंभ केलेला दिसत आहे. अनेक आत्मचरित्रकार स्त्रिया या कलेत निपुण असलेल्या दिसत आहेत. अभिनेत्री, समाजकार्यकर्त्या, लेखिका, गृहिणी, दलित स्त्रिया, प्रसिद्ध व्यक्तींच्या लेकी, सुना, पत्नी अशा वेगवेगळ्या स्तरातून स्त्रियांनी आत्मचरित्राचा आलेख उंच ठेवला आहे.

१९७५ नंतर स्त्रियांना एक विशिष्ट व्यक्ती वलय प्राप्त झाले. कारण १९७५ हे आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून जाहीर केले. स्त्रीला स्वतःकडे आणि समाजाकडे पाहण्याची एक विशिष्ट दृष्टी प्राप्त झाली. आपसूकच स्त्रिया या जीवनाकडे सर्वांगीण बाजूने पाहू लागल्या. त्या निर्भीड होत गेल्या.

१९७७ साली कला विश्वात रमणाऱ्या इंदिरा लाटकर यांनी *रंगले मी झुंजले मी* हे आत्मचरित्र लिहिले. इतर तत्कालीन स्त्रियांना येणारे कटू अनुभव इंदिराबाईंच्याही वाट्याला होतेच. हे अनुभवत असतानाच त्या गायन विश्वात रमून गेल्या. व्ही. शांताराम यांच्याशी भेट होऊन जीवनातील दिशा चढ – उतारांमध्ये कशा गवसल्या याचे हे मार्मिक लेखन या आत्मचरित्रामध्ये उमगते.

१९७७ मध्ये आणखी एक आत्मचरित्र मालती दांडेकर यांनी *सहवास* नावाने प्रसिद्ध केले. मध्यमवर्गीय सनातनी कुटुंबाची जडणघडण, शालेय शिक्षण, विवाह आणि त्यानंतर येणाऱ्या कौटुंबिक चढ – उतार त्यांनी स्पष्ट केले आहेत. दैनंदिन जीवनात त्यांनी अनेक छंद जोपासले तरी एकटेपण त्यांच्या वाट्याला होतेच. मुलाचा मृत्यू, नवऱ्याचे आणि स्वतःचे आजारपण या सगळ्यातून वाट काढत त्या थकल्या होत्या, तरी एक  समाधानी लेखिकेची भूमिका बजावत त्या जगलेल्या आहेत हे त्यांच्या या आत्मचरित्रातून स्पष्ट होते.

१९८१ साली लीला चिटणीस यांनी *चंदेरी दुनियेत* हे आत्मचरित्र लिहून कलावंत स्त्रियांची व्यथा मांडलेली आहे.

प्रेम, विवाह, संसार, तडजोड, अपेक्षाभंग असा प्रवास करत त्या चित्रपट सृष्टीत पोहोचल्या, तिथे निसरड्या वाटेवर त्या घसरल्याही आणि सावरल्याही. मात्र आयुष्यभर त्यांची होणारी ससेहोलपट थांबलेली दिसत नाही. सतत पदरात पडलेले नैराश्य त्यांना त्रास देणारे होते. प्रेयसी, पत्नी, आई, अभिनेत्री आणि एकूणच स्त्री म्हणून होणारा मानसिक, शारीरिक छळ त्यांनी आत्मचरित्रातून मांडलेला दिसत आहे.

१९८० साली अनुताई वाघ यांनी *कोसबाडच्या टेकडीवरून* हे आत्मचरित्र लिहून जीवनाकडे नव्याने सकारात्मक पद्धतीने पाहण्यास शिकवले आहे. नशिबी आलेल्या

बालविधवापणाचा टेंभा न मिरवता, खचून न बसता, त्यांनी आयुष्यभर आदिवासी जीवनासाठी स्वतःला खपवून घेतले. 'बालवाडी' हा शब्दही त्यांनी कसा रूढ केला आणि एका तडफदार समाजकार्यकर्तीची व्यथा आणि अपेक्षाही त्यांनी मांडली आहे.

चित्रपटसृष्टीतील दुर्गा खोटे यांचे १९८२ साली मी *दुर्गा खोटे* हे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले. माहेरी गर्भश्रीमंत असलेल्या बानू लाड यांचे जीवनही वैवाहिक पायरीवर ढासळले. शेअर बाजारात आलेले दारिद्र्य आणि त्यानंतरचा प्रवास त्यांना चित्रपट सृष्टीकडे नकळत घेऊन गेला. झगमगत्या दुनियेत व्ही. शांताराम यांच्या प्रयत्नाने त्या यशाच्या अनेक पायऱ्या चढल्या, पारितोषिके मिळाली, पैसा – व्यक्ती वलय मिळाले आणि जोडीला मान – अपमानही पदरी पडले. रशीद बरोबरच विवाह, घटस्फोट, नैराश्य, परदेशी दौरे या सगळ्यात त्यांचे मन कसे दुहेरी टप्पे खात होते हे त्यांनी मांडले आहे.

१९८२ साली बालकवी यांच्या पत्नी पार्वतीबाई ठोमरे यांनी *मी आणि बालकवी* हे आत्मचरित्र लिहिले. प्रसिद्ध कवी असलेल्या व्यक्तीची पत्नी म्हणून त्या कधीच मिरवायच्या नाहीत. अंगात सच्चेपण आणि चारचौघींच्या आयुष्यासारखेच यांचेही आयुष्य काही अंशी संसारातील आगीत होरपळत राहिले. सुखकारक बालपण आणि वैवाहिक तडजोड यातून त्या मार्ग काढण्यात यशस्वी झालेल्या दिसतात.

बालकवींच्या मृत्यूनंतर अफवांनी तर त्या पुरत्या कोलमडून गेलेल्या दिसतात. तसे त्यांनी आत्मचरित्रात स्पष्टही केले आहे. नवऱ्याचा क्रोध, जिव्हाळा, प्रेम त्यांनी लेखनबद्धही केले आहे. बालकवींच्या मृत्यूनंतर सुमारे ६० वर्षे त्या हयात होत्या. पार्वतीबाईंनी त्यांच्या आयुष्यातील अनेक प्रसंग तटस्थपणे ठेवल्याचेही लक्षात येते.

सुलोचना सोमण यांनी *अनुभव* नावाने १९८३ साली आत्मचरित्र लिहून आयुष्यातील अनेक चुकांची कबुली उघडपणे दिली आहे. सुलोचनाबाई या उच्चशिक्षित होत्या. डॉक्टरकी पेशाचे एक वलय त्यांना लाभले होते. त्यामुळे त्याकाळच्या आजारांची माहिती त्यातून डॉक्टरांना मिळणारे मान आणि अपमानही त्यांनी नोंदविले आहे. वैद्यकीय पेशातील एक विवाहित डॉक्टरच्या प्रेमात त्या पडल्या आणि येथूनच त्यांच्या आयुष्याने एक वेगळे वळण घेतल्याचे दिसून येते. डॉ. सोमणांचा स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टीकोन, सुलोचनाबाईंशी केलेला विवाह, सावत्र मुलांची आणि एकूणच संपूर्ण घराची जबाबदारी त्यांना पेलताना होणारा त्रास त्यांनी यातून स्पष्ट केलेला दिसत आहे.

१९८३ मध्ये दलित आत्मचरित्रांमध्ये मुक्त सर्वगोड यांनी *मिटलेली कवाडे* या नावाने आत्मचरित्र प्रसिद्ध केले. यात त्यांनी ग्रामीण आणि शहरी भागातील चित्रण स्पष्ट केले आहे.

इतर स्त्रियांना होणारे सर्व त्रास दलित समाजातील स्त्रियांना तर होतच होते. मात्र केवळ तुम्ही दलित आहात म्हणून त्यांच्यावर लहानपणापासून होणारे संस्कार, सामाजिक मर्यादा आणि जातीभेदाची उदासिनता त्यांनी पोखरून काढले होते. मनात लहानपणीच पेरले गेलेले न्युनगंड आणि त्या न्युनगंडावर केलेली मात *मुक्ताबाईंची मात* या आत्मचरित्रातून समोर येते. जातीयवाद आणि दलित समाजातील भेदक प्रसंगांनी मुक्ताबाईंनी या आत्मचरित्रातून अनेक सवाल केलेले दिसून येतात.

मलिका अमर शेख यांनी *मला उद्ध्वस्त व्हायचंय* हे आत्मचरित्र १९८४ साली लिहून अनेक वेदना मांडलेल्या आहेत. महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कलावंत शाहीर अमर शेख यांच्या त्या कन्या. सभा, नाटक, वाङ्मय असे वलय असलेल्या मलिका यांची ओळख नामदेव ढसाळांबरोबर होते. ओघात प्रेम, लग्न आणि तडजोड हे समीकरण पुढे येते. दलित पँथरचे कार्यकर्ते असलेल्या ढसाळांच्या घरी ती रहायला येते. तेथील परिसराची आणि तिची ओळख होऊ लागते तसे समीकरण अधिक गुंतत जाते. कपबशी न धुता येणाऱ्या मलिकाला जबाबदाऱ्यांनी घेरले. नव्या नवलाईचे दिवस संपल्यावर गरजेनुसार त्यांचे दागिने, पैसा सारेच संपत गेले. नवऱ्याचे सतत कामात व्यग्र असणे आणि यामुळे आलेले नैराश्य त्यांनी यात मांडले आहे. १९८५ साली मेघा किराणे यांनी *मी नरसाबाई* हे आत्मचरित्र लिहून 'परिचारिका' विश्वातील अनेक कंगोरे स्पष्ट केले आहेत. उत्कट ध्येय बागळणाऱ्या एका मुलीची ही कथा आहे. परिचारिका होण्यापासून ते परिचारिकेचे काम सोडून देण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास त्यांनी मांडला आहे. शरीराच्या वेदना, सुखद अनुभव, मृत्यूची चाहूल अशा वेगवेगळया रुग्णांच्या मनातील भावना त्यांनी लिहून ठेवल्या आहेत. शून्यातून जग उभारण्याचे त्यांचे प्रयत्न त्यांनी अतिशय समजूतदारपणे मांडलेले दिसतात.

सुप्रसिद्ध कवयित्री इंदिरा संत यांनी *मृदगंध* नावाचे आत्मचरित्र १९८६ साली लिहिले आहे. वडिलांचा मृत्यू, काकांचे कुटुंबप्रमुखपद , पुण्यातील शिक्षण, संताबरोबर झालेली ओळख, बहरलेले प्रेम, प्रेमाची परीक्षा आणि त्यातून झालेला विवाह, अकरा वर्षांचा संसार आणि त्यानंतर आलेले विधवापण या सर्व घटनाक्रमात इंदिराबाईंची मनातील सल त्यांनी त्या आत्मवृत्तात मांडली आहे. आत्मचरित्रातून त्यांनी अनुभवाने पुढच्या पिढीलाही नकळत उपदेश केल्याचेही समोर येते. स्वतःचे दुःख दूर लोटण्यासाठी त्यांनी कोणत्याही कलेचा सहारा घ्या हे ही सुचविलेले आहे. एकूणच या आत्मचरित्रामध्ये वैवाहिक जीवन ते वैधव्यापर्यंतचा त्यांचा प्रवास त्यांनी मांडला आहे.

१९८६ मध्येच आणखी दोन दलित आत्मचरित्रे प्रसिद्ध झाली. शांताबाई कांबळे यांनी

*माझ्या जल्माची चित्तरकथा* या नावाने आत्मचरित्र लिहिले तर बेबी कांबळे यांनी *जिणं आमुचं* हे आत्मचरित्र लिहिले.

शांताबाईंच्या आत्मचरित्रात दलित शिक्षकेची होणारी तगमग, समाजाचा त्यांच्याकडे पहाण्याचा दृष्टीकोन, त्यांचा विभक्त संसार असा पट त्यांनी मांडला आहे. यात जातीयवाद फार दिसत नसला तरी हे आत्मचरित्र शांताबाईंनी स्वतः पुरते मर्यादित ठेवत वाचनीय केले आहे. याउलट *जिणं आमुचं* मधून बेबी कांबळे यांनी समाजातील जातीयवादाचे रौद्र रूप मांडलेले आहे. दलित समाजातील रूढी परंपरांचे वर्णन त्यांनी सखोलपणे केलेले दिसते. पुढे आंबेडकरी चळवळींमुळे जीवनात संथ गतीने होत गेलेले बदल, काहींचा विरोध, विस्कळीत जीवनही त्यांनी सहजसोप्या भाषेत मांडले आहे. दलित वर्गातील स्त्रियांना स्त्री आहे म्हणून होणारा त्रास आणि दलित स्त्री आहे म्हणून समाजाने दिलेला त्रास त्यांनी मांडून स्त्रियांची कमकुवत बाजू मांडलेली आहे. एकूणच या आत्मचरित्रातून दलितांच्या संघर्षमय जीवनाचे टप्प्या टप्प्यातून उलगडत जाणारे दर्शन विचार करायला प्रवृत्त करते.

१९८७ साली शिरीष पै यांनी *वडिलांच्या सेवेसी* हे आत्मवृत्त लिहिले आहे. लेखिका म्हणून झालेली जडणघडण, कौटुंबिक जिव्हाळा, कलह, विभक्त जीवन, बंडखोर विचार असे अनेक पैलू या आत्मचरित्रातून समोर येतात. सुप्रसिद्ध नाटककार, पत्रकार आचार्य अत्रे यांची कन्या असलेल्या शिरीष पै या लेखनविश्वात अधिक बहरत गेलेल्या दिसून येतात. व्यंकटेश पै यांच्याशी झालेली ओळख, प्रेम आणि विरह, कलह यावर मात करत त्यांनी लेखनकौशल्यातही प्राविण्यता मिळविलेली दिसून येते. आयुष्यातील गुंता त्यांनी फार कवटाळून न ठेवता स्वतःला लेखानाधीन करून त्यावर मात केलेली दिसून येते.

१९८८ साली माधवी देसाई यांनी *नाच ग घुमा* हे आत्मचरित्र प्रसिद्ध केले. त्यांची आई जुन्या काळची अभिनेत्री मिस लीला या होत्या. पुढे भालजी पेंढारकरांनी माधवीचे पितृत्व स्विकारले. कौटुंबिक वाद, विस्कळीत जीवन, जगण्यात आलेले कटू अनुभव, नोकरी, एकट्या स्त्रीचा संघर्षमय प्रवास त्यातून रणजीत देसाईंबरोबरचा विवाह, विरोध, त्यांच्या पहिल्या पत्नीचा शोध, पदरात पसलेल्या नैराश्यातून अश्रूंची संगत या सगळयात माधवीबाईंचे मन पिळवटून गेले. म्हणूनच *नाच ग घुमा* हे नाव त्यांच्या आत्मचरित्राला सार्थ वाटते. आयुष्य हे अगणित दुःखाने भरलेले होते मात्र तरीही माधवीबाईंनी समाजकार्य सोडले नाही हे एक विशेषच.

१९८८ मध्ये मथुताई आठल्ये यांनीही *मागे वळून* हे आत्मचरित्र लिहिले. दहाव्या वर्षी त्यांचा विवाह १५ वर्षांनी मोठ्या असलेल्या व्यक्तीशी झाला. सोळाव्या वर्षी विधवा

मथुताई माहेरी परतल्या. अनंत अडचणींना सामोरे गेल्यानंतर त्या डॉक्टर झाल्या. या नंतरच्या काळात त्यांनी अनेक ठिकाणी डॉक्टरी केली. तारुण्य, शिक्षण, रूप, पैसा असणाऱ्या व्यक्तीला समाज निश्चित जगू देणं म्हणजे पापच असे. पण त्या सगळयातून त्यांनी संयमाने मार्ग काढला. एकूणच आयुष्य बेचिराख झालेल्या विधवेची उंच भरारी असलेले हे आत्मचरित्र होय.

१९८९ मध्ये मालती पांडे यांनी *माझ्या संगीत जीवनाची वाटचाल* हे आत्मचरित्र लिहून त्यांच्या संगीत साधनेचा तप मांडलेला आहे. संगीत विश्वात हरवू पहाणाऱ्या स्त्रियांना किती आणि कसा त्रास सहन करावे लागत असे याचे हे मूर्तिमंत उदाहरण या आत्मचरित्रात मालती पांडे यांनी मांडले आहे.

१९९० साली *कशाला उद्याची बात* नावाने शांता हुबळीकर यांनी आत्मचरित्र लिहिले. दारिद्र्य दुष्काळात पिचलेल्या परिस्थितीने त्यांच्यावर अनेक दुःखद प्रसंग आणले ते स्विकारून प्रसंगी बंडखोरी करून शांताबाई जगत होत्या. भालजी पेंढारकरांबरोबर ओळख होऊन त्यांनी चित्रपटामध्ये कामे केली, स्थैर्य आले पण आणि गेले पण, पुन्हा विस्कळीत जीवनाची घडी, पोरकेपण, कर्ज, वृद्धाश्रमातील जीवन, तारुण्यातील गुलाबी क्षण याचे अतिशय हृदयद्रावक वर्णन शांताबाईंनी केलेले आहे. एकूणच या आत्मचरित्रात केवळ माणसाला माणसासारखी वागणूक द्या, ही कमालीची आर्तता अधिक जाणवत रहाते.

१९९० साली सुप्रसिद्ध लेखक पु. ल. देशपांडे यांच्या पत्नी सुनिता देशपांडे यांनी *आहे मनोहर तरी* हे आत्मचरित्र लिहिले. मूळतः हे आत्मचरित्र त्यांनी स्वतःचा शोध घेण्याकरिता लिहिले आहे. सर्व सुखे असताना एकाकी का वाटत आहे? हा शोध घेण्याकरिता आणि स्वतः केलेल्या चुकांचा हिशोब देण्याकरिता या आत्मचरित्राची त्यांनी मदत घेतलेली लक्षात येते. लहानपणापासून स्वतंत्र विचाराची, बंडखोर प्रवृत्तीची सुनिता कशी बदलत जाते हे लेखिकेने अतिशय व्यवस्थितपणे मांडले आहे. शिक्षण, प्रेम, विवाह, संसार, ठाम प्रवृत्ती, यशाची शिखरे पार केलेल्या, संपूर्ण सुखवस्तू मिळालेल्या पण तरीही संसारात न रमलेल्या सुनिताबाई या अनोख्या पण खऱ्या प्रवृत्तीमुळे अधिक मनाला भिडतात. एकूणच या आत्मचरित्रा मध्ये त्यांनी पु. लं ची पत्नी याही पेक्षा स्वतंत्र अशी ओळख निर्माण केली आहे. म्हणूनच हे आत्मचरित्र विशेष अर्थपूर्ण आहे.

१९९२ साली लालन सारंग यांनी *जगले जशी* हे आत्मचरित्र लिहिले आहे. त्यांचे अनुभवविश्व त्यांनी उलगडावे असे त्यांना वाटले तेव्हा त्यांनी आत्मचरित्र लिहिले आहे. लालन सारंग या गृहिणी, कलाकार, नाटक निर्मात्या या भूमिका पार पडत असताना आलेले

अनुभव व्यक्त करतात. ठाम स्वभाव, प्रेम विवाह, संसार, जबाबदाऱ्या, तडजोडी, सासर – माहेरची नाती यातूनही स्वसिद्धीसाठी कलाकार ते व्यवसायनिर्माती, चित्रपट, नाटक हा प्रवास त्यांचा वाचनीय आहे. एकूणच या आत्मचरित्रात त्यांनी सरळ साधेपणाचा बाज ठेवला तरीही सत्यता असल्याने ते लोकप्रिय ठरले.

लोकप्रियतेच्या या झगमगाटी जीवनातील १९९७ साली लीला पेंढारकरांनी लिहिलेले *माझी जीवनयात्रा* हेही एक आत्मचरित्र होय. लीलाबाईंना पेंढारकर गुरुस्थानी होते. कालांतराने त्यांच्याशीच लीलाबाईंचा विवाह झाला. त्या त्यांच्या तिसऱ्या पत्नी होत. नशिबाने दिलेली हुलकावणी आणि साथ अशा दुहेरी वागण्यात त्या स्वतःला सिद्ध करत राहिल्या. अनेक चित्रपटांमधून त्यांनी कामे केली. गाजली, अशा स्वतःला सिद्ध करू पहाणाऱ्या कलावंतीनीचे हे आत्मचरित्र होय.

कार्यकर्त्या स्त्रियांमध्ये अनेक स्त्रियांनी आत्मचरित्रे लिहून जीवनातील अनुभवविश्व वाचकांपुढे मांडले आहे. १९९२ मध्ये अनसूया लिमये यांनी *आम्ही बि घडलो* हे आत्मचरित्र लिहून स्वातंत्र्याची चळवळ, समाजवादी विचारप्रणाली, समाजकार्य, राजकारण, प्राध्यापक पेशा, स्त्री – पुरुष विषमता, सवर्ण – दलित विषमता यातील सूक्ष्म बदल त्यांनी टिपलेले दिसतात. एकूणच समाज आणि मन यातील दरी मिटविण्याचा त्यांनी प्रखरतेने प्रयत्न केलेला दिसतो.

अनसूया लिमये यांच्याप्रमाणेच १९९३ साली मंगला भागवत यांनी *कुणा एकीचे अंतरंग'* हे आत्मचरित्र लिहून बालपणातील कटुता, अलिप्तता आणि संसारिक जीवनातील समाजकार्य वृत्ती याचा मिलाफ केला आहे. मंगलाबाईंच्या पतीला माधव भागवतांना राजकारण, समाजकारण पसंत नव्हते. पण तरीही त्या मागे न हटता जमेल तसे समाजकार्य अखंडपणे करत राहिल्या. यामुळे त्यांच्या वैवाहिक जीवनात अनेक खटके उडाले पण त्या नव्या उमेदीने पुढचे काम करतच राहिल्या. त्यांच्या कर्तुत्वामुळे आणि ध्येयामुळे त्यांचे आत्मचरित्र अधिक वाचनीय ठरते.

१९९६ साली कमल भागवत यांनी *न संपलेली वाट* हे आत्मचरित्र प्रसिद्ध करून स्वतःमधील नवचेतना समोर ठेवली आहे. वडील काँग्रेसच्या राजकारणात सहभागी असल्याने त्यांच्यावरही नकळत हे संस्कार होत गेले. बी. ए. होऊन कम्युनिस्ट पक्ष त्यांनी स्वीकारला. त्यातून अनेक भूमिका त्यांनी मांडल्या. भागवतांच्या प्रेमात पडून कोणताही दागिना अंगावर न घालता आणि खादीचेच कपडे अंगावर घालून या दोघांनी प्रीती विवाह करणे म्हणजे बंडखोरीचा कळसच होता. परंतु या धाडसी जोडप्याला वेध लागले होते ते

केवळ स्वातंत्र्याचे. मूल न होऊ देणे आणि केवळ देशासाठी कार्य करणे अशा विचारानेच हे झपाटून गेले होते. एकूणच कमलाबाईंनी अनेक चढ – उतार पार करत जीवन व्यतीत केले. झगमगते यश नसले तरी त्यांनी त्यांच्या तत्वाच्या चौकटी कधीच ओलांडलेल्या दिसत नाही.

वरील प्रमाणेच १९९८ साली सुशीला महाजन यांनी *डाव मांडियेला* हे आत्मचरित्र लिहून राष्ट्रसेविका समितीच्या कार्यकर्त्या म्हणून केलेले कार्य नमूद केले आहे. महाजन पती – पत्नी यांनी संसाराला आणि संसारातील प्रश्नांना सतत दुय्यम स्थान दिले असल्याने त्यांच्या कार्याचा आलेख उंच असलेला दिसून येतो. एकूणच काश्मीर पूर्णपणे भारतात विलीन व्हावे या इच्छेने पेटून उठलेल्या पती – पत्नीची ही गाथा आहे.

१९९९ साली कमलाबाई अष्टपुत्रे यांनी *जीवनसंघर्ष* नावाचे आत्मचरित्र लिहिले. शीर्षकाप्रमाणेच त्यांचे जीवन संघर्षाने भरलेलेच होते. संसारिक ताण – तणाव, लग्न, घटस्फोट, तुरुंग, आंदोलने, स्वातंत्र्य चळवळीतील योगदान या सर्वांमध्ये कमलाबाई होरपळून गेलेल्या होत्या. गांधीवादी कार्यकर्त्या म्हणूनच त्या जगल्या. अनेक अशक्य गोष्टी त्यांनी शक्य करून दाखविल्या. म्हणूनच एका सच्च्या कार्यकर्तीचे आत्मचरित्र म्हणून हे वाचनीय ठरते.

लेखिकांच्या आत्मचरित्रांमध्ये १९९४ साली सरोजिनी बाबर यांनी *माझ्या खुणा माझ्या मला* हे आत्मचरित्र लिहिले. या आत्मचरित्रातून त्यांनी स्वातंत्र्य चळवळीचे वर्णन केले आहे. कारागृहातही त्या जाऊन आल्या आहेत. मात्र वडिलांचा शिक्षकी पेशा असल्याने त्यांचे मनही शिक्षणात अधिकाधिक रमत गेले. बापूसाहेब माटे, साने गुरुजी यांनी त्यांचे कौतुक केल्याचेही नमूद केले आहे. पुढे अविवाहित राहून त्यांनी अनेक शैक्षणिक कार्यात स्वतःला झोकून दिले. एकूणच ग्रामीण पार्श्वभूमी असलेल्या सरोजिनीबाई राजकारण, समाजकारण, लेखनविश्वात स्वतःचा वेगळा ठसा उमटविण्यात यशस्वी ठरल्या.

*नाथ हा माझा* हे आत्मचरित्र कांचन घाणेकर यांनी १९८९ साली लिहिले. सुलोचना यांच्या कन्या म्हणजे कांचन घाणेकर. सुलोचनाबाई अभिनेत्री असल्यामुळे आणि त्यांचा नावलौकिक असल्यामुळे कांचनबाईंवर अधिक बंधने होती. तत्कालीन परिस्थितीत काही अंशी मुली अधिक स्वतंत्र जीवन जगत होत्या मात्र कांचनबाई दबवात राहिल्या. तारुण्यात पुढे विवाहित असलेल्या अभिनेते डॉ. काशीनाथ घाणेकरांच्या प्रेमात पडून विवाह केला. आयुष्यात काही कटू प्रसंग आले काही गोडही आले. मात्र लोकप्रियतेच्या शिखरावरही काही काटे बोचत राहिले आणि तेच त्यांनी आत्मचरित्रात मांडले आहेत.

सुप्रसिद्ध लेखक आणि विचारवंत असलेल्या प्रभाकर पाध्ये यांच्या पत्नी कमल पाध्ये यांनी *बंध – अनुबंध* हे आत्मचरित्र १९९३ साली लिहिले. या आत्मचरित्रातून त्यांनी त्यांची बंडखोर वृत्ती मांडली आहे. लग्नापूर्वीचा प्रभाकर आणि लग्नानंतरचा प्रभाकर हा बदलही प्रांजळपणे मांडला आहे. सहजीवनात येणारे ताण – तणाव आणि कालांतराने मनावर झालेले परिणाम आणि प्रसंगी तटस्थवृत्ती त्यांनी मांडली आहे. एकूणच सहजीवनातले ताण – तणाव जपणाऱ्या एका गृहिणीचे हे आत्मवृत्त आहे.

सुप्रसिद्ध लेखक विद्याधर पुंडलिक यांच्या पत्नी रागिनी पुंडलिक यांनी *साथ सांगत* नावाने १९९४ साली आत्मचरित्र लिहिले. या आत्मचरित्राची संपूर्ण मांडणी ही विद्याधर पुंडलिक यांच्या भोवतालची आहे. अनेक लेखक आणि कलाकारांबद्दल असलेली आत्मीयता त्यांनी आवर्जून उल्लेखलेली आहे. पुंडलिकांवर अपार प्रेम करणाऱ्या, संसार सुफळ करणाऱ्या, आलेल्या प्रसंगांना धीराने सामोरे जाणाऱ्या एका शांत वृत्तीच्या आदर्श पत्नीचे हे आत्मचरित्र वाचनीय आहे.

१९९४ साली इंदुमती जोंधळे यांनी *बिनपटाची चौकट* नावाने आत्मचरित्र लिहिले आहे. हे आत्मचरित्र एका विखुरलेल्या कुटुंबाचे विदारक उदाहरण आहे. वडिलांचे आणि आईचे वाद, त्यातून चुकून झालेला आईचा खून, वडीलांचा तुरुंगवास, इतर तीन लहान भावंडांचे इंदूमतीवर येऊन पडलेले संगोपन, वस्तिगृह, तुरुंग, भटकंती या सगळयात काही विशेष लोकांनी केलेली मदत या सर्वांची दखल घेत लेखिकेने खडतर प्रवास मांडला आहे

सुप्रसिद्ध लेखक असणाऱ्या आचार्य अत्रे यांच्या धाकट्या कन्या मीना देशपांडे यांनी १९९५ साली *अश्रुंचे नाते* हे आत्मचरित्र लिहिले. श्रीमंतीत वाढलेल्या या मुलीला घरातील ताण – तणाव अधिकाधिक एकटे पाडू लागले. भेदरलेल्या या मुलीला बाहेरचे आणि घरातले वडील नेहमीच वेगळे भासू लागले. घरातले कलह वाढतच गेले. वडिलांच्या मनाचा तळ गाठण्याचा प्रयत्न केलेल्या या कन्येचे लग्न झाल्यानंतरचा वडिलांविषयीचा जिव्हाळा, आईचा मृत्यू या प्रसंगातून काही अंशी लिखाण नाट्यमय वाटत असले तरी वडील आणि मुलीचे आयुष्यभराचेचे अश्रुगीत त्यांनी आत्मचरित्रात मांडले आहे.

१९९५ सालीच सुप्रसिद्ध समाज कार्यकर्ते हमीद दलवाई यांच्या पत्नी मेहरुन्निसा दलवाई यांनी *मी भरून पावले आहे* हे आत्मचरित्र लिहिले. (जून२०१७ मध्ये त्यांचे निधन झाले) हे आत्मकथन मुस्लीम महाराष्ट्रीय स्त्रीचे मराठीतले पहिले आत्मकथन होय. सरिता पदकी यांनी ते शब्दबद्ध केले आहे. आर्थिक चणचण असणाऱ्या तत्कालीन परिस्थितीचे चटके सहन

करत सहजीवन जगलेल्या पती – पत्नीचे हे आत्मचरित्र होय. काही नातलग पाकिस्तानी असल्याने तिकडचाही संबंध त्यांनी लेखनात मांडला आहे. एकूणच मुस्लिमांनी सुधारावे, बदल घडवावे असे अर्थपूर्ण समाज कार्य करणाऱ्या हमीद दलवाई यांचे जीवन आणि पतीच्या मृत्युनंतर स्वतः पूर्ण कार्यभार सांभाळणाऱ्या एका तरूण मुस्लीम स्त्रीचे हे तडफदार आत्मकथन आहे.

१९९६ साली विद्या माडगुळकर यांनी *आकाशाशी जडले नाते* हे आत्मचरित्र लिहिले. विद्याताई या सुप्रसिद्ध गीतकार, गीतरामायणकर्ते, कथा – पटकथाकार ग. दि. माडगूळकर यांच्या पत्नी होय. एका अतिशय संयमशील स्त्रीचे हे आत्मचरित्र आहे. विद्याताई गायनात प्रवीण होत्या तर ग. दि. मा लेखनात. देशस्थ – कोकणस्थ विवाह झालेला होता. काही कलह झाले. सात मुलांचे संगोपन आणि नवऱ्याचे घवघवीत यश या सगळ्यात विद्याताईंनी संगीताला दूर लोटलेले दिसते. जावई – सुना आल्या तरी त्यांना काही अंशी नवऱ्याचा हेकट स्वभाव सहन करावा लागला हे दुर्दैव आहे. एकूणच घर, जबाबदारी, संसार यामुळे स्वतःमधली एक कला गमावलेल्या उमद्या स्त्रीचे हे आत्मकथन होय.

मंगला केवळे यांनीही १९९६ साली *जगायचंय .... प्रत्येक सेकंद* हे आत्मचरित्र लिहिले. हे आत्मचरित्र दलित असले तरी यात सततचा एकसुरीपणा नसून दैनंदिन जीवनातील घडामोडींवर अधिक भाष्य केलेले दिसते. या कालखंडात झालेली आर्थिक चणचण अधिक स्पष्टपणे मांडलेली दिसत आहे. मंगलाची बी. कॉम. नंतरची बँकेतील नोकरी ते पतीचा बुट पॉलिश ते डॉक्टर असा प्रवास वाचावयास मिळतो. आहे त्या परिस्थितीला स्वीकारत त्यांनी पुढे जात असताना नातेवाईकांनाही पुढे घेऊन जाण्याचा अनेकदा प्रयत्न केला. त्यातून मनस्तापही पुष्कळ भोगला. अनेक संघर्षातून जात असताना समाजासाठीही काही काम या दोघांनी केले. एकूणच परिपूर्ण मात्र अपूर्ण वैवाहिक जीवन जगलेल्या आणि नशिबाला दोष न देणाऱ्या तडफदार व्यक्तिमत्त्वाचे हे आत्मचरित्र होय.

१९९६ साली *वंचीता* नावाने विद्यादेवी परचुरे यांनी आत्मचरित्र लिहिले. लहानपणापासून परित्यक्त विस्कळीत जीवनाचे चित्रण त्यांनी केले आहे. अत्यंत समर्थपणे जगणाऱ्या एका स्त्रीचे हे आत्मचरित्र आहे. लग्नापूर्वीचे जीवन आणि लग्नानंतरचे जीवन हे सदैव दुःखानेच बहरलेले असल्याने त्या कोलमडलेल्या दिसून येतात. नोकरीसाठी वणवण भटकलेल्या विद्यादेवींना त्यावरूनच समाज टोचून बोलताना दिसतो. मात्र अनेक अपमान सहन करणाऱ्या आणि जिद्दीने जीवन जगणाऱ्या एका स्त्रीचे हे आत्मचरित्र होय.

२००० साली विमल मोरे यांनी *तीन दगडांची चूल* हे आत्मचरित्र लिहिले आहे. ग्रामीणतेचा बाज असणाऱ्या या आत्मचरित्रात गोंधळी समाजाच्या सखोल जीवनाचा परिचय होतो. गावोगाव भटकणारा समाज असल्याने वेगवेगळया ठिकाणी अनुभवाला आलेल्या अनेक प्रसंगांचे वर्णन आत्मचरित्रात आले आहे. दादासाहेब मोरे यांच्याशी विवाह झाल्यानंतरचे जीवनही त्यांनी अधिक सखोलपणे मांडले आहे. त्यांच्या समाजकार्याला विमल मोरे यांनी स्वतःचा कार्यभागाच समजले आहे. एकूणच या आत्मचरित्रात स्वतःकडे, समाजाकडे सखोलतेने पहाणाऱ्या स्त्रीचे आत्मकथन म्हणून पाहता येते.

वरील सर्व आत्मचरित्रांचा विचार करता १९७५ ते २००० या कालखंडातील आत्मचरित्रांमधील स्त्रिया या अधिक स्वतंत्रपणे जगणाऱ्या आढळतात तर कधी शेवटपर्यंत झुरत कुढत आयुष्य जगणाऱ्या आढळतात. चंदेरी दुनियेतील स्त्रियांच्या आत्मकथनात अनेकांशी त्यांचा पाय घसरलेलाच अधिक आढळत आहे. आर्थिक परिस्थिती सावरण्यासाठी त्यांनी त्या झगमगाटी दुनियेत प्रवेश जरी केला असला तरी अनेक ठिकाणी विवाहित पुरुषाच्या स्वाधीन होऊन विवाह केलेला दिसत आहे. मात्र आयुष्याचं शेवटी अगदी प्रांजळपणे हे हिशोब वाचकांपुढे ठेऊन त्यांनी स्वतःला अंतरबाह्य शुद्ध केल्याचेही वाटत आहेत. म्हणूनच पुढच्या आत्मकथनात मान – अपमान, आशा – निराशा, तृप्ती – अतृप्ती, भावना, वासना, राग, प्रेम, वात्सल्य अशा अनेक भूमिकांमधून जाणाऱ्या स्त्रिया स्वानुभव आत्मचरित्रातून उलगडत गेल्या. झगमगती दुनियेतील जयश्री गडकरी *अशी मी जयश्री* १९८६, मुग्धा चिटणीस *मी आणि माझे कथाकथन* १९८८, माणिक वर्मा *किती रंगला खेळ* १९९२, ललिता जोगळेकर *बाई मी भाग्याची* १९९३, *सीमा देव सुवासिनी* १९९८, ज्योत्स्ना भोळे *तुमची ज्योत्स्ना भोळे* १९९८ यांसारखी अनेक आत्मकथने प्रसिद्ध झाली.

सुप्रसिद्ध व्यक्तींचे वलय असणाऱ्या स्त्रियांचीही आत्मकथने प्रसिद्ध होत गेली. सुप्रसिद्ध व्यक्ती समाजात आणि घरात अशा दोन्ही भूमिकेतून समोर येत गेला. समाजात वाहवा मिळणाऱ्या या व्यक्तीचे दुर्दैवी स्वभाव मात्र घरातील स्त्रियांना भोगावे लागलेले दिसून येतात. तर काही ठिकाणी त्या स्त्रियांना व्यक्ती वलयांनी अधिक प्रोत्साहन दिलेले दिसून येते. " कोणत्याही कारणामुळे का होईन, परंतु आत्मलेखनासाठी प्रवृत्त झालेल्या व्यक्तीला ते करता येणे शक्य असल्यामुळे, जीवनाच्या विविध क्षेत्रांतील व्यक्तींनी आत्मचरित्रपर लेखनाच्या दालनात प्रवेश केलेला आहे. उदा. राजकीय क्षेत्रातील लहान-थोर व्यक्ती, समाजसेवक, समाजसुधारक, सैनिक,डॉक्टर, शिक्षक, चित्रकार, चित्रपटच्या व रंगभूमीच्या

क्षेत्रातील कलावंत व वकील, न्यायाधीश इतर व्यक्ती, ग्रुहिणी इ. समाजाच्या इतक्या विविध क्षेत्रातील व्यक्तींनी लिहिलेल्या आत्मचरित्रपर लेखनकृतींमुळे स्वाभाविकपणेच, जीवनाची बहुरंगी, बहुढंगी व पुनरावृत्त न होणारी रुपेच वाचकांसमोर प्रकट झालेली आहेत." ८

स्वातंत्र्योत्तर कालखंडाचा प्रारंभ असल्याने आणि बेरोजगारीचा प्रश्न अधिक गंभीर झाल्याने अनेक आत्मचरित्रांमधून आर्थिक, सामाजिक प्रश्न येताना दिसत आहेत. सुप्रसिद्ध व्यक्तींचा सहवास लाभलेल्या अनेक लेखिका आत्मचरित्रात आपल्या जीवनाविषयी अनेक पदर उलगडत असताना दिसतात. उदाहरण यशोदा पाडगावकर *कुणास्तव कुणीतरी* (२०००), प्रभावती भावे *स्मृतीपूजा* (१९८६), सुमा करंदीकर *रास* (१९९८), चंपा लिमये *स्मृतीसुगंध* (१९९८) यासारख्या अनेक आत्मचरित्रांमधून विविध पध्द्तीने आपले आयुष्य व्यतीत करणाऱ्या स्त्रियांचे दर्शन होते.

दलित आत्मचरित्रांमध्ये कुमुद पावडे यांचे *अंतःस्फोट*, जनाबाई गिऱ्हे यांचे *मरणकळा* अशा आत्मचरित्रांची नावे महत्वाची आहेत.

एकूणच शिक्षणाची कास धरलेल्या, कौटुंबिक अडचणी असलेल्या, प्रेम मिळालेल्या, प्रेमासाठी अभागी ठरलेल्या, कधी फसलेल्या, तर काही फसूनही सावरलेल्या वेगवेगळया स्तरातील अनेक स्त्रियांनी आत्मचरित्रांच्या माध्यमातून आपल्या भावनांना वाट करून दिली आहे.

२००० नंतरच्या आत्मचरित्रांचा टप्पा अधिक वेगळया अंगाने विस्तारलेला आहे. हे पुढीलप्रमाणे स्पष्ट होईलच. यामधील आशयसूत्रे ही बदलत गेलेली दिसतात. कालपरत्वे यातील अनुभवांचे स्वरूप बदलत गेलेले आहे.

### ड) २००० ते २०१० या कालखंडातील आत्मचरित्रांचा अभ्यास

मागील अभ्यासाचा आढावा घेता आत्मचरित्र या मराठी वाङ्मयप्रकारात नव्या अनुभवांनी, वैचारिक दृष्टीने, प्रगल्भ भाषाशैलीने अधिक समृद्ध झालेला हा प्रकार आजही लोकप्रियतेच्या शिखरावर आहे. सन २००० पूर्वीच्या काही आत्मचरित्रांमध्ये म्हणी, वाक्प्रचार, काव्य, अलंकारिक भाषा यांचे प्रमाण अधिक प्रमाणात असल्याचे जाणवते. मात्र बदलत्या शैलीनुसार २००० नंतरच्या आत्मचरित्रांमध्ये ओघवती शैली , स्पष्टवक्तेपणा आणि तटस्थवृत्ती आहे हे लक्षात येते.

२००० साली सुप्रसिद्ध कवी मंगेश पाडगावकर यांच्या पत्नी यशोदा पाडगावकर यांनी

*कुणास्तव कुणीतरी* हे आत्मचरित्र लिहिले. मुळच्या ख्रिस्ती असणाऱ्या यशोदाबाई मंगेश पाडगावकरांशी आंतरधर्मीय विवाह करतात. परिस्थितीशी जुळवून घेतात. आर्थिक अडचणीतही संसारबाग फुलवतात. मात्र त्या कधीच स्वतःला सिद्ध करू शकल्या नाहीत. ही त्यांची दुर्दैवी कहाणी या आत्मचरित्रात त्यांनी मांडली आहे. प्रेमाचे दिवस फुलपाखराप्रमाणे उडून गेल्यानंतर रखरखीत उन्हात त्यांचे मन अगदी होरपळून गेले होते. पतीच्या प्रसिद्धी वलयामागे त्यांच्या पत्नी आहेत हे सगळेच किती सोईस्करपणे विसरतात ही कहाणी यात अवतरली आहे. मना – मनातली दरी आपसुकच स्पष्ट होताना दिसते.

मंदा चित्र यांनी *पार्किन्सनचे दिवस* हे आत्मचरित्र २००० साली लिहिले. पार्किन्सन या भयानक आजाराने त्यांच्या पतीला घेरले होते. आजारपणात भोगलेले अतीव दुःख त्यांनी मांडले आहे. आयुष्यभर दुसऱ्यांसाठी जगलेल्या या पती – पत्नीला उतारवयात चांगले दिवस येताच हा दुर्धर आजार कसा त्रासदायक ठरतो हे या आत्मचरित्रात त्यांनी सांगितले आहे.

२००१ साली नसीमा हुरजूक यांनी *चाकाची खुर्ची* हे आत्मचरित्र लिहून चौतीस वर्ष चाकाच्या खुर्ची बरोबर व्यतीत केलेले आयुष्य, संघर्षमय जीवन, त्यातून केलेली समाजसेवा याचे दर्शन या आत्मचरित्रातून होते. १६व्या वर्षी पॅराप्लेजिकने त्रासलेल्या, अपंगत्व आलेल्या या तरूण मनाची तडफड, जिद्द आणि यशस्वी वाटचाल नसीमांनी अगदी मनमोकळेपणाने सांगितले आहे. अपंगासाठी वस्तिगृह, शाळा काढल्या आणि कोल्हापूरला *हेल्पर्स ऑफ दि हॅन्डिकॅप्ड,* या संस्थेची स्थापना करून समाजसेवेचे व्रत अखंडपणे चालू ठेवले.

अमरावतीच्या सातेगावात कोल्हाटी समाजात जन्मलेल्या नलिनी लढके आणि पती समाज कार्यकर्ते आनंदराव लढके यांना विदर्भाचे ज्योतिबा आणि सावित्रीबाई असे गौरवाने बोलले जाते, ते त्यांच्या दारिद्र्य आणि अज्ञानातही समाज उन्नतीसाठी स्वतःला अखंड झोकून दिल्यामुळे. त्यांच्या या कार्याचा आढावा आणि एकूण जीवन कहाणी *सत्यशोधकाची वारस* या २००१ साली लिहिलेल्या आत्मचरित्रातून वाचावयास मिळते.

२००१ साली प्रियकला मेश्राम यांनी त्यांचे संघर्षमय जीवन *हरवलेला डाव* या आत्मचरित्रातून मांडले आहे. भंडाऱ्यातील समाजकार्य, नोकरी, पतीची मनमानी, सवत, मुलाचे शिक्षण, गुंड प्रवृत्ती, त्याचा झालेला खून, दुसरे अयशस्वी लग्न या साऱ्यातून त्यांच्या मनावर झालेले असंख्य आघात त्यांनी या आत्मकथनात मांडले आहेत. म्हणूनच *हरवलेला डाव* हे शीर्षक त्यांनी दिले आहे.

वरील आत्मचरित्र हे विभक्त पती – पत्नीचे आहे, तर वसुमती धारप यांनी २००२ साली *गोष्ट सत्यवान सावित्रीची* हे आत्मकथन लिहून नियतीने घातलेल्या फेऱ्याला धुडकावून लावून कष्टमय पण परिपूर्ण जीवन जगलेल्या, सतत आनंदी राहून पतीची सेवा केलेल्या एका प्रेमळ सहधर्मचारिणीचे रूप समोर आणले आहे.

२००३ साली शशिकला उपाध्ये यांनी *माझं पुस्तक* हे आत्मचरित्र लिहून अत्यंत गरिबीतून वर येणाऱ्या एका बीजाचे अंकुर, फुल, फळ आणि अवीट गोडीने आयुष्य पुरून उरलेल्या एका वृक्षाची आणि त्याच्या रूंदावणाऱ्या कक्षांची माहिती अत्यंत लोभसपणे मांडली आहे. अत्यंत हलाखीत शिक्षण घेऊन प्रकाशन व्यवसाय सांभाळत, कडू – गोड क्षणांना आपलेसे करत त्यांनी आयुष्य काढले त्याची ही कहाणी या आत्मचरित्रात आहे.

२००३ साली आनंदवन निर्माण करणारे समाजसेवक बाबा आमटे यांच्या पत्नी साधनाताई आमटे यांनी *समिधा* हे आत्मचरित्र लिहिले आहे. समाजसेवेचे व्रत अंगिकारलेल्या बाबांना साधनाताईंनी हर प्रकारे साथ दिली. युद्ध पातळीवर अनेक संकटे आली, त्यांचा सामना करत गोर गरिबांसाठी जगत, कुष्ठरोगी, आदिवासी, ज्यांना माणूस म्हणून जगणेच माहित नाही अशा अनेक व्यक्तींसाठी स्वतःचे संपूर्ण आयुष्य वेचणाऱ्या या दाम्पत्याची ही यशोगाथा या आत्मचरित्रात आहे.

बाबांची पत्नी, सहचारिणी, मुलांची आई, गृहस्वामिनी आणि समाजातील प्रत्येक जीवाची माई बनलेल्या या ध्येयवादी कार्यकर्तीचे व्यक्तिमत्व या आत्मचरित्रातून आपल्यासमोर उभे रहाते.

२००४ साली कुरुंदवाड संस्थानच्या राणीसाहेब विजयादेवी पटवर्धन यांनी *नीरा ते कृष्णा'* हे आत्मचरित्र लिहिले आहे. बालपण, तरूणपण, विवाह आणि सासर – माहेर मध्ये असलेले प्रेमदुवे यात गुंफले आहेत. सामाजिक, राजकीय घडामोडीं बरोबर सासू – सासरे, पती यांची देशभक्ती चित्रित केली आहे. सासऱ्यांचा लोकमान्य टिळक आणि शाहू महाराजांबरोबर असलेला स्नेह त्यांनी टिपलेला आहे. ऐतिहासिक उल्लेख आणि दस्तावेज म्हणून हे आत्मचरित्र उल्लेखनीय आहे.

उषा दर्डा यांनी २००४ साली *योगायोग* हे आत्मचरित्र लिहिले आहे. गांधीवादी विचारवंत, मंत्रीपद प्राप्त झालेले, काँग्रेस पक्षात स्वतःची मोहर उमटविणारे जवाहरलाल दर्डा यांच्या त्या द्वितीय पत्नी. हा प्रवास कसा सुरु होतो, कसे प्रसंग येतात, अथ पासून इथ पर्यंतची संपूर्ण गाथा या आत्मचरित्रात त्यांनी मांडली आहे.

सुशीला पटेकर यांनीही २००४ साली *फरफट* हे आत्मचरित्र लिहिले. या आत्मचरित्राचे वेगळेपण म्हणजे त्यांना त्यांच्या सावत्र वडिलांनी दिलेले प्रेमळ छत, माया. त्यांच्या पाठींब्यामुळे त्या साधारण गृहिणी ते आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्या झाल्या. सासरचा अनेक प्रकारचा हिंस्रपणा त्यांना पिळवटून टाकणारा होता मात्र जिद्दीने त्यांनी समाजकार्यात स्वतःला झोकून दिले त्याचा संपूर्ण आढावा या आत्मचरित्रात वाचावयास मिळतो.

२००४ साली *भाळी गोंदणं चांदणं* हे आत्मचरित्र निर्मला देशपांडे यांनी लिहिले. बालपण, नोकराचे विकृत वागणे, शिक्षण, तारुण्य, लग्न, संसार, मुलांचे संगोपन, नातेवाईक आणि एकूण संपूर्ण आयुष्यातील घडत गेलेल्या चांगल्या गोष्टी अन् वाईट गोष्टी अत्यंत निर्भीडपणे मांडणाऱ्या या लेखिकेचे हे आत्मचरित्र तत्कालीन समाजामनाचा आरसा आहे.

*ओंजळ* नावाने इंदूमती अरकडी यांनी २००४ साली आत्मचरित्र लिहिले आहे. या आत्मकथनात अत्यंत रसिक आणि अभ्यासू शिक्षिकेचे दर्शन घडते आणि त्याच बरोबर पायावर पडलेल्या एका स्वच्छ पांढऱ्या डागाने आयुष्य कसे काळेकुट्ट केले ही नाण्याची दुसरी बाजूही या आत्मचरित्रात आली आहे. हसणं विसरून गेलेल्या या तरुणीची व्यथा यामध्ये मांडली आहे. मात्र त्यांची शैक्षणिक वाटचाल, रसिकता आणि मिळालेला नावलौकिक अनन्यसाधारण आहे.

२००५ साली सिंधुताई जोशी यांनी *मागे वळून पाहताना* हे आत्मचरित्र लिहिले आहे. लग्नानंतर कष्टमय जीवन झेलत संसार फुलवणाऱ्या सिंधूताईंवर पती निधनाची कुऱ्हाड कोसळली आणि नातेवाईकांची मन समजली, स्वतःला कणखरपणे सावरून मुलांना शिकवले आणि पुण्यातील कामायनी या बंगल्यात मतीमंद मुलांसाठी त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी महाराष्ट्रातील पहिली शाळा काढली. वयाच्या नव्वदीपर्यंत ह्या कामाचा अखंड वसा त्यांनी एकहाती चालवून नवा आदर्श सगळयांपुढे मांडला.

विमल लेले यांनी *गोफ दुहेरी* हे आत्मचरित्र २००५ साली लिहिले. शिक्षकी पेशासाठी अनेक खस्ता खाल्लेल्या या एक निष्ठावंत शिक्षिका होय. कष्टमय जीवनातून मार्ग शोधत अध्यापनाच्या क्षेत्रात आपल्या ज्ञानाचा कार्यकर्तृत्त्वाचा ठसा उमटविणाऱ्या या धडाडीच्या शिक्षेकेने ज्ञानगंगेची केलेली आराधना या आत्मचरित्रातून समोर येतो.

२००५ सालीच *गुड बाय कॅन्सर* नावाने विद्या मुडगेदीकर यांनी आत्मचरित्र लिहिले. या आत्मचरित्रात अगदीच आकस्मिकपणे जीवनात राख रांगोळी करणारा कॅन्सर पदार्पण करतो आणि जीवनघडी विस्कटून टाकतो. त्याची ही दुर्दैवी कहाणी समोर येते. शारीरिक

त्रास, मानसिक विफलता, चिडचिड, शारीरिक बदल, हॉस्पिटल, मेडिसिन, इतरांच्या नजरा, डॉक्टर, नर्स, पारिवारिक बदल, मृत्यूकडे ओढत नेणारा हा कॅन्सर नावाचा दोर आणि त्याची त्रासदायक परिस्थिती या आत्मचरित्रात मांडली आहे.

२००६ साली *आनंदयात्रिक* नावाने शशिकला देसाई यांनी आत्मचरित्र लिहिले. चारचौघींप्रमाणे आयुष्याची वीण घट्ट करत आणि संपूर्ण गोतावळा सांभाळत आयुष्याच्या सायंकाळी म्हणजेच सत्तरीत एम. ए. (इंग्रजी), एम. ए. (मराठी) करणारी ही आजी एक अवलियाच आहे. अतिशय प्रांजळ आणि आधुनिक विचारांचे हे देसाई दांपत्य तारुण्यात हरवून बसलेले, जबाबदारीने मुरड घातलेले आयुष्य जगताना कसे विचारी ठरले आहेत याची ही एक शिस्तबध्द मांडणी या आत्मचरित्रातून समोर येते.

प्रसिद्ध साहित्यिक वसंत कानेटकर यांच्या पत्नी सिंधू कानेटकर यांनी २००६ साली *साथसोबत* हे आत्मचरित्र लिहून आयुष्यातील अनेक बऱ्या – वाईट आठवणींना उजाळा दिला आहे. स्वतःचे गुण दोष, घरातील वडीलधारी व्यक्ती, इतर नातेसंबंध, साहित्यिकांशी असलेले जिव्हाळयाचे संबंध, पतीचे मन आणि गुणदोष त्यांनी अत्यंत प्रांजळपणे टिपलेले दिसतात.

२००६ मध्ये विजया लवाटे यांनी *स्पर्श मानव्याचा* हे आत्मचरित्र लिहिले. वेश्या व्यवसाय, त्यांची परिस्थिती, गुप्तरोग, एड्सग्रस्त बालके, त्यांचे राहणीमान या सगळयासाठी विजयाबाईंनी अनेक दिव्य पार केली. त्याची ही कहाणी आणि झालेला कायापालट या आत्मचरित्रातून समोर येतो.

निर्मला किराणे यांनी २००७ मध्ये *निर्मल गोपाळ* नावाने आत्मचरित्र प्रसिद्ध केले. एका गुणवंत, तल्लख बुद्धी असणाऱ्या हाडाच्या शिक्षिकेचे हे आत्मकथन उल्लेखनीय आहे.

अभिनयात स्वतःचा वेगळा ठसा उमटविणाऱ्या अभिनेत्री वनमाला यांचे आत्मचरित्र *परतीचा प्रवास* या नावाने २००७ साली प्रकाशित झाले. तत्कालीन परिस्थितीचे सावट या अभिनेत्रीवरही होते. परिस्थिती अनुकूल आणि चित्रपटसृष्टीची साद या वळणावर असलेल्या अनेक अभिनेत्रीपैकी या ही एक होत्या. वयाच्या ९३ व्या वर्षी घडून गेलेल्या प्रत्येक पापाचे उल्लेख त्या अत्यंत धिटाईने करतात हे नवलच वाटते.

*वॉटर आणि मी* हे आत्मचरित्र २००७ साली डॉ. विदुला जवळगेकर या अत्यंत प्रामाणिक, उत्साही, कर्तबगार, शिकण्याची आवड असलेल्या आणि अभिनयात छाप पाडलेल्या अभिनेत्रीचे आहे. अनेक अनुभव आणि दैनंदिन जीवनातील विधवेची भूमिका त्यांनी दीपा मेहता यांच्या वॉटर या चित्रपटात साकारली. या चित्रपटाने तेव्हा एक

विक्रमच घडवलेला आहे.

सरिता वाकलकर यांनी २००७ साली *जॅक पॉट* हे आत्मचरित्र लिहून 'हॉर्स रेसिंग' या बेभरवश्याच्या व्यवसायाचे अभ्यासपूर्वक आणि अनुभवपूर्वक असे कथन केले आहे. बालपण, कुटुंब, प्रेम, विवाह, पतीची हॉर्स रेसिंगची हौस या टप्प्यातून आत्मचरित्र पुढे सरकते.

२००७ ला *ज्योतिर्मयी* हे आत्मचरित्र डॉ. ज्योती ढमढेरे यांनी लिहिले. गायनावर अपार प्रेम करणाऱ्या आणि त्यातून प्रसिद्धी मिळविलेल्या, घर, कुटुंब, डॉक्टरकी संसार सांभाळून स्वतःची छाप परदेशात पडणाऱ्या या एका सर्वगुणी व्यक्तित्वाचे पैलू या आत्मचरित्रात आहेत.

यशोधरा गायकवाड यांनी *माझी मी* हे आत्मचरित्र २००७ साली लिहिले. आंबेडकरवादी महत्त्वाकांक्षा, कुटुंबाची झालेली आबाळ, स्वातंत्र्याचे वारे, शिक्षकी पेशा, विवाह, सुख, पतीचे परस्त्रीशी असलेले संबंध, जाच, मारझोड आणि एकूणच आयुष्याच्या कधीच न मिळणाऱ्या समांतर रेषा. या अतिशय त्रासदायक आठवणी त्यांनी या आत्मचरित्रातून मांडल्या आहेत.

२००८ साली वैशाली हळदणकर यांनी *बारबाला* हे आत्मचरित्र लिहिले. सतरा वर्षात दीडशे बार मध्ये  काम केलेली ही स्त्री स्वतःची कहाणी या आत्मचरित्रात सांगते. अनपेक्षितपणे आलेल्या परिस्थितीमध्ये ही दहा वर्षाची पोर होरपळून जाते ती शेवटच्या क्षणापर्यंत, तिच्यावर दहाव्या वर्षी आलेले संकट वृद्धावस्थेपर्यंत झेलावे लागणार आहे हे या कोवळया जीवाला काय ठाऊक पण नियतीने जे – जे वाढून ठेवले ते – ते घडत गेले आणि त्यातच ही वैशाली कुठेतरी विरूनही गेली.

प्रसिद्ध कलाकार आत्माराम भेंडे यांच्या पत्नी आशा भेंडे यांनी २००८ साली *माझ्यागत मी* हे आत्मचरित्र लिहिले आहे. नृत्य, गायन, अभिनयातील रस, शिक्षकी पेशा आणि पती समवेत रंगभूमीवर काम ही करत राहिल्या. अशा या बहुआयामी व्यक्तिमत्वाची  कहाणी या आत्मचरित्रातून समजते.

समाजशास्त्रज्ञ म्हणून नावलौकिक मिळालेल्या सुधा काळदाते यांनी २००८ ला *जीवनसुधा* हे आत्मचरित्र लिहिले. बालपण, शिक्षण, संघर्षमय नोकरी, संसार, पतीचे गुण, दोष यातून सोडवलेले कोडे या आत्मचरित्रात अवतरले आहे. संघर्षमय आयुष्यात जिद्दीने धैर्य गाठणाऱ्या या अत्यंत तडफदार स्त्रीचे हे आत्मचरित्र उल्लेखनीय ठरते.

२००८ सालीच सुधा वर्दे यांनी *गोष्ट झऱ्याची* हे आत्मचरित्र लिहून आयुष्यातील अनेक अनुभव, त्यांची जिद्द वाचकांसमोर मांडली आहे. यशस्वी संसार आणि उत्साही कार्य यामुळे

त्यांनी जीवन अतिशय आनंदाने घालवले असल्याचे जाणवते.

२००९ साली चंदा आठले यांनी *आनंदवनी* हे आत्मचरित्र लिहिले. रुईया महाविद्यालयातील शिक्षण, प्रेमविवाह, अमेरिकेतील रहिवासी, पुन्हा भारतात तब्बल ३० वर्षानंतर येऊनही आनंदवनात राहून आदिवासींसाठी केलेले कार्य, आनंदवनाशी जोडली गेलेली नाळ आणि कर्तव्याची पराकाष्टा करण्याची जिद्द या आत्मचरित्रात आहे.

मारवाडी कुटुंबातील सुशील पगारिया यांनी २००९ साली *मी नाही कुणाची* हे अंतर्मुख करणारे आत्मचरित्र लिहिले आहे. मनाविरुद्ध झालेला विवाह, मुलींवरची बंधने, संसारातील तडजोड, शिवीगाळ, विरोध, आरोप – प्रत्यारोप, या सर्व आठवणी आणि आयुष्यातील संपूर्ण गोळा – बेरीज त्यांनी या आत्मचरित्रात मांडली आहे.

प्रसिद्ध अभिनेत्री वनमाला यांची थोरली बहीण आणि कर्नल रावबहादूर बापूराव पवार यांची जेष्ठ कन्या सुमतीदेवी धनवटे यांनी २००९ साली *दवावरील पाऊलखुणा* हे आत्मचरित्र लिहिले. आयुष्यात आलेल्या चांगल्या – वाईट गोष्टींचा इतिहास सांगणारे हे आत्मचरित्र उंची गाठताना दिसते. सुमतीबाईंची साहित्यातली उंची, अनेक संतांचा आशीर्वाद त्यांना लाभला, अनेक राजकीय कर्तुत्ववान व्यक्तींशी त्यांचा असलेला स्नेह आणि एकूणच आयुष्यातील सुफळ, संपन्न वाट त्यांनी या आत्मचरित्रात रेखाटली आहे.

न्युयॉर्क महाराष्ट्र मंडळाने कथासम्राज्ञी असे गौरविलेल्या गिरीजा कीर यांनी २००९ साली *माझ्या आयुष्याची गोष्ट* हे आत्मकथन मांडून बालपणात आईला पोरकी झालेली लहानगी ते प्रेमविवाह करून, अनेक अन्याय सहन करून, ‘अनुराधा’ मासिकासाठी जीव ओतून काम करणाऱ्या आणि अनेक घटनांकडे सकारात्मक दृष्टीने पहाणाऱ्या, स्वतःची समजूत काढून आवडेल त्या क्षेत्रात ठसा उमटविणाऱ्या अविरत कष्ट उपसणाऱ्या एका कर्तृत्ववान स्त्रीची कहाणी रेखाटली आहे.

२००९ मध्ये लीलावती भागवत यांनी *वाट वळणावळणाची* हे आत्मकथन प्रसिद्ध करून एक जिद्दीचा प्रवास वाचकांसाठी खुला केला आहे. अनेक खडतर प्रसंगांनी व्यापलेला हा प्रवास वयाच्या त्र्याऐंशीव्या वर्षी त्यांनी रेखाटला आहे. आकाशवाणीवरील ‘वनिता मंडळ’ या कार्यक्रमातून प्रसिद्धी मिळालेल्या आणि बालसाहित्यक्षेत्रात स्वतःला झोकून दिलेल्या या लीलावतीबाईंचे आयुष्यही त्रासदायक, तरीही समाधानाने जगलेल्या या त्यांच्या अनुभवांचे सार म्हणजे हे आत्मचरित्र होय.

लावणी सम्राज्ञी अशी स्वतंत्र ओळख असलेल्या सुलोचना चव्हाण यांनी २००९ साली

*माझं गाणं, माझं जगणं* हे आत्मचरित्र लिहिले. गाण्याची ओढ, छंद, गायिका म्हणून झालेली निवड, गाण्यांची वाढती संख्या, बालपण, तरुणपण, प्रेमविवाह, उपासमार, प्रसिद्धी, कुचंबना, आर्थिक ताण, अपत्ये, कलाकार, गौरवक्षण अशा अनेक टप्प्यांचा प्रवास त्यांनी आत्मचरित्रात मांडला आहे.

वेगळया व्यावसायिक वाटेवर जाणाऱ्या महिलांमध्ये पहिली भारतीय महिला जादूगार म्हणून मंदाकिनी जाधव – मेहता यांनी २००९ मध्ये *मेरीगोल्ड* हे आत्मचरित्र लिहून जीवन संघर्षाची एक विलक्षण कहाणी सांगितली आहे. पोटाची खळगी भरण्याकरिता खाद्यपदार्थ बनविणारी एक कंपनीही त्यांनी टाकली. यश – अपयश पचवत त्या अत्यंत हुशारीने जीवनसूत्रे सांभाळत जगत आल्या. त्यांच्या या कार्याची माहिती आणि अनुभव सगळयांना समजावे म्हणून आत्मचरित्र लिहून मन मोकळे केले आहे.

दलित आत्मचरित्रांमध्ये वाचप्रिय ठरलेले *आयदान* हे आत्मचरित्र उर्मिला पवार यांनी २००९ मध्ये लिहिले. पश्चिम महाराष्ट्रातील दलित समाज, दलित स्त्रियांचे जीवन, स्त्रीमुक्तीवादी चळवळ आणि जन्माला आल्यानंतर मरेपर्यंत दलितांना करावा लागणारा संघर्ष या आत्मचरित्राचे प्रमुख आकर्षण आहे. बालपणापासून सुरुवात होणारे हे आत्मचरित्र कधी वैचारिक पातळीचे एक एक पापुद्रे उडवत जाते आणि कधी वाचक त्यांत गुंतत जातो हे कळत नाही.

डॉ. अलका मांडके यांनी पतीनिधनानंतर आठवणींच्या हिंदोळयावर *हृदयस्थ* हे आत्मचरित्र २००९ मध्ये लिहिले. तर पतीच्या विवाहबाह्य संबंधामुळे उद्ध्वस्त झालेले जीवन विभा राही यांनी २००९ मध्ये *विषकन्या* या आत्मचरित्रातून वाचकांसमोर ठेवले आहे.

कामगार चळवळीचे कार्यकर्ते कॉम्रेड नारायण सुर्वे यांच्या पत्नी कृष्णाबाई सुर्वे यांनी आयुष्यातील एकूणच जमाखर्च, अधिक – वजाबाकी करत संसारयात्रा संपन्न केल्यानंतर त्याच्या संघर्षमय आठवणींना उजाळा देण्याकरिता २००९ मध्ये हे आत्मचरित्र लिहिले आहे. अत्यंत प्रांजळपणे हे आत्मकथन असल्याने वाचकप्रियता अधिक आहे.

सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. केशव मेश्राम यांच्या द्वितीय पत्नी नंदा मेश्राम यांनी २००९ मध्ये *मी नंदा* हे आत्मचरित्र लिहिले. २७ वर्षांचे अंतर असलेल्या या दाम्पत्याने जीवनातील तेरा वर्षांच्या संसाराचे चित्र रेखाटले आहे. मराठा – दलित या दरीत कुठेतरी विस्कटलेली स्वप्ने पुन्हा पाहणाऱ्या या धडाडीच्या लेखिकेचे हे आत्मचरित्र आहे.

मराठी साहित्यातील  लेखिका पद्मजा फाटक यांनी २००९ मध्ये *हसरी किडनी*  हे आत्मचरित्र लिहिले. १९९१ मध्ये त्यांना शारीरिक आजारांची चाहूल लागली अन् पुढील आयुष्य अंधारमय होत गेले. मूत्रपिंड विकाराने त्यांचे आयुष्य कसे उद्ध्वस्त झाले आणि इतर भावनिक, मानसिक भीती, निश्चय या सगळयाचे दर्शन या आत्मकथनात येत आहे.

वयाच्या १७व्या वर्षी मधुमेह झालेल्या विशाखा पाठक यांनी *मधुमेहासह नाबाद ३६* हे आत्मचरित्र २००९ मध्ये लिहिले. आहार, पथ्ये, मेडिसिन, सकारात्मक दृष्टीकोन आणि आयुष्यातील अनेक कडू – गोड प्रसंग आलेल्या एका सामान्य स्त्रीने वाचकप्रिय असे हे आत्मचरित्र लिहिले आहे.

ऐन उमेदीच्या काळात, तरुण वयात, व्यावसायिक पातळीवर यशाची द्वारे खुली झाली असताना प्रेरणा वर्मा यांना कॅन्सर होतो आणि तो संपूर्ण शरीरात पसरतो . याची ही अतिशय हृदयद्रावक कहाणी २००९ मध्ये *प्रेरणा* या आत्मचरित्रातून प्रेरणा वर्मा यांनी मांडली आहे. इतरांसाठी काही अनुभवांचा उपयोग या सकारात्मक गोष्टीसाठी हे आत्मलेखन झाले आहे.

२०१० मध्ये कल्पना जावडेकर यांनी *रुपेरी किनार* हे आत्मचरित्र लिहिले. पती विलास जावडेकरांना झालेल्या लिव्हरच्या आजाराला ट्रान्सप्लांट शिवाय पर्याय नव्हता आणि डोनर होण्याची कल्पनाबाईंची इच्छा आणि मग एकूणच चाचण्या, परीक्षणे हॉस्पिटलमध्ये केलेली संघर्षमय अग्निदिव्ये या आत्मचरित्रातून समोर येतात.

श्री. ग. माजगावकरांची सगळयात धाकटी बहीण अलका गोडे यांनी २०१० मध्ये *धाकट्या नजरेतून* हे आत्मचरित्र लिहिले. संसार आणि मन यांना कधीच एकत्र न आणता योग्य त्या ठिकाणी सर्व गोष्टी सांभाळण्याचे कसब असणारी ही अलका 'राजहंस' ची जबाबदारी न थकता पेलत होती. आयुष्यातील अनेक चढ – उतार पार पाडत त्या जगावेगळं कसं जगल्या हे त्यांच्या आत्मचरित्रातून जाणवते.

*सुवर्णकिरणे* हे आत्मचरित्र २०१० साली विजया चितळे यांनी लिहिले. पतिप्रेम, पतीगाथा आणि सुफळ दाम्पत्य जीवन याविषयची माहिती या आत्मचरित्रातून समोर येते.

सुखी आणि प्रेमळ दाम्पत्य जीवनातील *सर आणि मी*  हे ज्योत्स्ना संभाजी कदम यांनी २०१० मध्ये लिहिलेले आत्मचरित्र होय. कलावंतांची रंगलेली मैफल या आत्मचरित्रातून प्रकट होते. जीवनातील आनंदाचे पदर उलगडणारे हे आत्मचरित्र  आहे.

चर्मकार समाजातील युवतीने ब्राम्हण समाजातील युवकाबरोबर विवाह करून दिलेला लढा,  समाजातील आणि सासरच्या मंडळीचा ओढवून घेतलेला रोष, राजकारण, सामाजिक

परिवर्तन, स्त्रिया आणि झोपडपट्टीवासीयांच्या शोषणाविरुद्धची आंदोलने अशा दाहक प्रसंगातून पार पडताना झालेली दमछाक सुनिता अरळीकर यांनी २०१० मध्ये *हिरकणीचे बिऱ्हाड* या आत्मचरित्रातून मांडली आहे.

भारत छोडो आंदोलन, भूमिगत चळवळीत नेहमी सक्रीय असलेल्या कमला काकोडकर यांनी *एक धागा सुताचा* हे आत्मचरित्र २०१० मध्ये लिहून तत्कालीन परिस्थितीची आणि स्वातंत्र्यसंग्राम लढ्याची माहिती वाचकांसमोर मांडली आहे. गोवा मुक्ती संग्राम, शिक्षा, आंदोलने, मुले, संसार, कारागृह, सुटका अशा अनेक फेऱ्यातून जे दिव्य अनेकांनी केले त्यांचीही आठवण या आत्मचरित्रातून नव्याने होते.

आशा आपराद यांनी २०१० ला *भोगले जे दुःख त्याला* हे आत्मचरित्र मुस्लीम बोलीभाषेचा वापर करून लिहिले आहे. एका अत्यंत कठीण परिस्थितीतून आशा प्राध्यापिका झाल्या. अनेक ठेचा लागल्या, रक्त वाहिले पण ध्येय त्यांनी गाठले. हिंदू – मुस्लीम अशा अनेक वादांमध्ये त्या सापडल्या. स्वावलंबी आणि कर्तृत्ववान महिलेची ही यशोगाथा या आत्मचरित्रात आहे.

सुहासिनी मालदे यांनी *एक इझम निरागस* हे आत्मचरित्र २०१० साली लिहिले. ऑटीझम या आजाराने त्रस्त असणाऱ्या रुग्णांसाठी केलेले कार्य, संघर्ष, पतीची साथ, कौटुंबिक जाच, आंतरजातीय विवाह, शिक्षण आणि यामुळे घडत गेलेले परिवर्तन समाजातील आणि मनातील हे टप्पे या आत्मचरित्रातून समोर येतात. 'ऑटीझम' रुग्णांसाठी महाराष्ट्रातील पहिली शाळा सुहासिनी मालदे यांनी काढली हे उल्लेखनीय आहे.

राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक लेखिकांनी त्यांचे अनुभव आत्मचरित्रांमध्ये लिहिले आहेत. कमल देसाई यांनी २०१० ला *जय हो* हे आत्मचरित्र प्रसिद्ध करून राजकीय क्षेत्रातील त्यांची कामगिरी अधोरेखित केली आहे. त्यांच्या आठवणी १९३० च्या सत्याग्रहापासून जोडल्या गेल्या आहेत. तर २०१० सालीच *प्रत्यंचा* हे आत्मचरित्र शोभा फडणवीस यांनी लिहून त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आलेख मांडला आहे. दोनही स्त्रियांच्या आत्मकथनात संघर्षमय जीवनाचे रेखाटन झाले आहे.

२०१० मध्ये सुनिता शिंदे यांनी *पुस्तक उघडलं* हे आत्मचरित्र लिहिले आहे. अठरा विश्वे दारिद्र्य असणाऱ्या परिस्थितीत त्यांनी रस्त्यावर संसार थाटला, झोपडी बांधली, मोलकरणीची कामे केली, बालवाडी सहायिका, शिकाऊ शिक्षिका, सुपरवायझर, सुसंगती संस्थेची स्थापना, महिला उद्योग केंद्रे असा आघाडीचा प्रवास करताना संसार मात्र बिकट अवस्थेत श्वास घेत होता. परंतु खचून न जाता सुनीताबाईंनी जिद्दीने आणि ध्येयाने हे काम

केले होते. संसार आणि काम यात त्यांची होणारी ससेहोलपट अखेरीस सार्थ झाली.

एकूणच २००१ ते २०१० च्या टप्प्यातील आत्मचरित्र लिहिणाऱ्या लेखिकांना स्वतःच्या वाट्याला आलेल्या क्षणांना इतरांसमोर मांडायचे आहे. त्यातून त्यांना नवे काही शिकवायचेही आहे. 'जो देतो तो देव आणि जो जगतो तो माणूस' या माफक विचारात त्यांनी कितीतरी अनंत यातना भोगल्या, मान – अपमान, जाच, मारझोड, शिवीगाळ, मनावरचे शरीरावरचे न मिटणारे आघातही झेलले. जातीयवाद, राजकारण, समाजकारण, या विळख्यातून स्वतःला सावरले आणि भावी आयुष्यात इतर कोणाला असे अनुभव आले तर बावरून न जाण्याचा एक सल्लाही नकळत त्यांच्या लिखाणांमध्ये डोकावताना दिसतो. अनेक लेखिकांनी तर रस्त्यावर संसार थाटले आणि समाजासाठी स्वतःला झोकून दिले. सिनेसृष्टीत काय आणि कसे वातावरण आहे हे सिनेसृष्टीतील आत्मचरित्रकार स्त्रियांच्या लेखनीतून समजते. बारबाला, वेश्या स्त्रियांची व्यथा हि आत्मचरित्रातून मांडली गेलेली दिसून येते. एकूणच स्त्री कशी असुरक्षित आहे हे दाखवणारी बोलकी उदाहरणेही या आत्मचरित्रातून समजतात.

आजाराने जगणे असह्य झालेल्या रुग्ण स्त्रियांनीही अत्यंत धैर्याने लिहिलेली आत्मचरित्रे उल्लेखनीय आहेत. तर सहजीवन चित्रणाबरोबर गुण – दोषाचे मापन करणारी आत्मचरित्रेही वाचनीय आहेत. तसेच 'स्वातंत्र्योत्तर आत्मचरित्र' या वाङ्मयप्रकारात जयंत वष्ट यांना असे जाणवते, की "स्वातंत्र्योत्तर काळात मराठीत लिहिल्या गेलेल्या आत्मचरित्रांची संख्या व गुणवत्ता यांचा विचार करताना संबंधित आत्मचरित्रकारांचा लेखनविषयक दृष्टिकोण आणि समाजाची व वाचकांची त्याकडे पाहण्याची वृत्ती लक्षात घ्यावी लागते. स्वत:चा त्या कालखंडाच्या संदर्भात त्रयस्थपणे शोध घेणे या वाङ्मय प्रकारात अभिप्रेत आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. चरित्र वाङ्मयात सामान्यत: बाहेरुन अंतर्मनात डोकावण्याची वृत्ती असते. तर आत्मचरित्रात स्वत्वाकडून आत्मचरित्रकार समाजान्मुख होण्याच्या प्रयत्नात असतो." [९]

"या आत्मकथनांच्या लेखनामागे विविध प्रकारच्या प्रेरणा आढळतात. अनेकजणी दु:ख हातावेगळे करण्यासाठी लिहिताना दिसतात. ही 'विरेचनाची' प्रेरणा जशी त्यामागे आहे, तशीच स्वत:ला अभिव्यक्त करण्याची 'आत्मविष्कारा' ची प्रेरणाही आहे. आपल्या अनुभवांतून इतरांना जागे करण्याची प्रेरणाही आहेच. हंसा वाडकर, मलिका अमसोख या

प्रेरणेतून लिहितात. प्रतिकूल वास्तवाचा कणखरपणे मुकाबला करणाऱ्या वैयक्तिकतेच्या पलीकडे गेलेल्या स्त्रियांची आत्मचरित्रे इतरांसाठी मार्गदर्शक ठरलेली दिसतात. स्वत:चे अपंगत्वाचे दु:खाशी नाते जोडणाऱ्या कार्यतत्पर नसीमा हुरजूक (चाकाची खुर्ची) येथे आठवतात. तसेच वारली समाजात आत्मसन्मान रुजवणाऱ्या गोदावरी परुळेकर आठवतात."[१०] एकूणच शिक्षणामुळे स्त्रियांमध्ये आत्मविश्वास आला. आलेल्या परिस्थितीला तोंड देण्याचे बळ आले, ती अधिक वैचारिक प्रगल्भतेची शिखरे चढू लागली, चिंतनशील झाली आणि स्वानुभावावरून ती इतरांना मदतही करू लागली. ही तिची उत्तुंग भरारी खरच अत्यंत संवेदनात्मक आणि उल्लेखनीय आहे.

**संदर्भ सूची :**


१. गुंडी निलिमा –" स्त्रीलिखित आत्मचरित्र: चिकित्सक परामर्श", स्त्रीलिखित साहित्य : संदर्भ आणि चिकित्सा,शब्दालय प्रकाशन, २०१५, पृ. क्र. ११२

२. फडके भालचंद्र - "स्त्रियांचे आत्मचरित्रपर लेखन", मराठी लेखिका : चिंता आणि चिंतन, श्रीविद्या प्रकाशन पहिली आवृत्ती मार्च १९८०, पृ. क्र. १४९

३. फडके भालचंद्र, "स्त्रियांचे आत्मचरित्रपर लेखन", मराठी लेखिका : चिंता आणि चिंतन, श्रीविद्या प्रकाशन पहिली आवृत्ती मार्च १९८०, पृ. क्र. १४३

४. गुंडी निलिमा ," स्त्रीलिखित आत्मचरित्र: चिकित्सक परामर्श", स्त्रीलिखित साहित्य : संदर्भ आणि चिकित्सा,शब्दालय प्रकाशन, ११ जून २०१५, पृ. क्र. ११६

५ हस्तक उषा, मराठीतील आत्मचरित्रपर लेखन:, स्नेहवर्धन प्रकाशन, ३० मार्च २००६,प्रथमावृत्ती, पृ. क्र. १९

६. वष्ट जयंत, "स्वातंत्र्योत्तर आत्मचरित्र", स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याचा मागोवा इ. स. १९४७ ते २००० : प्रदक्षिणा खंड दुसरा, संपादन- अनिरुद्ध अनंत कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, प्रथमावृत्ती : १९९१, पृ. ३०५

.७. वष्ट जयंत, "स्वातंत्र्योत्तर आत्मचरित्र", स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याचा मागोवा इ. स. १९४७ ते २००० : प्रदक्षिणा खंड दुसरा, संपादन- अनिरुद्ध अनंत कुलकर्णी,

कॉन्टिनेन्टल प्रकाशन, प्रथमावृत्ती : १९९१, पृ. ३११

८. हस्तक उषा, " विसाव्या शतकातील मराठीतील आत्मचरित्रपर लेखन", मराठीतील आत्मचरित्रपर लेखन, स्नेहवर्धन प्रकाशन, ३० मार्च २००६,प्रथमावृत्ती, पृ. क्र. १२९

९. जयंत वष्ट, "स्वातंत्र्योत्तर आत्मचरित्र", स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याचा मागोवा इ. स. १९४७ ते २००० : प्रदक्षिणा खंड दुसरा, संपादन- अनिरुद्ध अनंत कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, प्रथमावृत्ती : १९९१, पृ. ३०४

१०. निलिमा गुंडी –" स्त्रीलिखित आत्मचरित्र: चिकित्सक परामर्श", स्त्रीलिखित साहित्य : संदर्भ आणि चिकित्सा,शब्दालय प्रकाशन, ११ जून २०१५, पृ. क्र. ११३.

## घटक ब: मराठी स्त्रीलिखित चरित्रांचा अभ्यास

अ)१९१० ते १९२०या कालखंडातील चरित्रांचा अभ्यास

ब) १९२० ते १९५० या कालखंडातील चरित्रांचा अभ्यास

क)१९५० ते २००० या कालखंडातील चरित्रांचा अभ्यास

ड)२००० ते २०१० या कालखंडातील चरित्रांचा अभ्यास

### अ) १९१० ते १९२० या कालखंडातील स्त्रीलिखित चरित्रांचा अभ्यास

स्त्रीलिखित चरित्रांचा प्रारंभ बाराव्या शतकात काही अंशी झाल्याचे साहित्यात नमूद आहे. महानुभाव पंथाचे आद्य गुरु गोविंदप्रभू व चक्रधर स्वामी यांच्या *लीळा चरित्र* निर्मितीत आद्य कवयित्री महदाईसेचा फार मोठा वाटा आहे. लीळा चरित्रातील अनेक लीळांची निर्मिती महदाईसेने केलेली आहे. महदाईसे प्रमाणेच जनाबाईंच्या ओळयांमधून गुरु संत नामदेवांचे चरित्र काही प्रमाणात समोर येते. संत नामदेवांच्या जीवनावर ओवी रचताना त्यांच्या जीवनातील लहान – मोठे प्रसंग ओवीबद्ध करतानाच संत जनाबाईंनी संत सेना न्हावी यांचे चरित्र लिहिले आहे. संत चोखामेळा यांच्या पत्नी आणि बहिण यांच्यातील जिव्हाळा त्यांच्या एकमेकींविषयी लिहिलेल्या अभंगातून स्पष्ट होतो. तर संत बयाबाई यांच्या कवितेतून संत रामदासांचे चरित्र प्रतीत होते. बाराव्या शतकापासून सुमारे सतराव्या शतकापर्यंत संथ गतीने का होईना पण स्त्रीलिखित चरित्रांचा संथ झरा चालू होता. परंतू अठराव्या शतकात संथ असणारा झरा थांबल्याचा दिसतो. कारण अठराव्या शतकातील राजकीय परिस्थिती आणि इंग्रजांच्या वर्चस्वामुळे झालेल्या विस्कळीत जीवनामुळे एकूणच स्त्रीनिर्मित साहित्यावर परिणाम झालेला दिसतो. मात्र १९व्या शतकाच्या उत्तरार्धात पुन्हा अंकुर फुटलेला दिसतो. तरीही स्त्रियांना लेखणी घेऊन पुन्हा लिहित्या होण्यासाठी खूप मोठा काळ लागला. तत्कालीन परिस्थितीत स्त्रियांवर असलेल्या बंधनांमुळे, स्त्रियांवर लादल्या गेलेल्या रूढी, परंपरा आणि अनेक क्रूर प्रथांमुळे त्यांना मनाने, विचाराने समृद्ध होण्यास फार वेळ लागला. त्यामुळे हळूहळू ललित, कथा, कादंबरी, कविता अशा वेगवेगळया टप्प्यांना पार करत त्या चरित्रलेखनाकडे वळाल्या. चरित्रलेखनातील भाषा ही विविधांगी स्वरुपाची असते. चरित्रलेखनात भाषाशैली, वर्णनशैली यांना अधिक महत्त्व असते. चरित्रलेखनात त्या व्यक्तिच्या दैनंदिनीला महत्त्व असते. या संदर्भात न. चि. केळकर

म्हणतात, "रोजनिशीला मी रोजमेळाच्या कीर्दी इतकी किंमत सहज देईन. अशा कीर्दींत चुका किंवा खोटें लिहिणें कोठे होतच नसेल असें म्हणतां येणार नाही हें खरें : परंतु ती गोष्ट क्वचित घडते. निदान व्यक्तीच्या विशेष गुणदोषांच्या हकीकती वगळल्या तरी निरपेक्ष, नि:स्वार्थी अशा हकीकती पुष्कळच असणार. तारीखवार लिहिलेल्या नोंदी व टिपणे यांचे इतिहासदृष्टया महत्त्व मुळीच नाकबूल करता येणार नाही. जो मनुष्य रोजनिशी दुसऱ्याला फसविण्याच्या दृष्टीने लिहिला तो आत्मचरित्र ग्रंथांत तसे काय कमी लिहील? आणि ज्या संकलित इतिहासाला आपण डोळे मिटून विश्वसनीयतेचे प्रदान करतों तो तर तिसऱ्याने चवथ्याकडून हकीकती मिळवून जुळवून लिहिलेला; म्हणून आत्मचरित्रापेक्षा कमी महत्त्वाचा ठरतो. तात्पर्य, संकलित इतिहासापेक्षा आत्मचरित्रांचे ग्रंथ आणि त्याहीपेक्षा नियमित वेळी लिहिलेल्या रोज निशा यांना सर्वोत्तम पहिल्या प्रतीचे इतिहाससाधन हे पद सहजच प्राप्त होतें असें मला वाटतें." [१] १८९१ साली *आनंदीबाई जोशी* यांचे दीर्घ चरित्र लेखन केले गेले. 'चरित्रमाला' या मासिकातून ते पहिल्या अंकाचा मान मिळवून प्रसिद्ध होत होते. आणि या दीर्घ चरित्र लेखनाची सुरुवात काशीबाई कानिटकरांनी अतिशय कळकळीने केलेली आहे. या चरित्र लेखनासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले; याचे कारण ज्या आनंदीबाईचे चरित्र त्यांनी लिहायला घेतले त्यांनीही डॉक्टर होण्यासाठी श्वासागणिक कष्ट झेलले आणि यशाच्या उंच शिखरावर पोहचूनही त्याचा आनंद न घेऊ शकलेल्या, दुर्दैवी ठरलेल्या आनंदीबाईंना आदरांजली या चरित्रामार्फत देण्याचा आणि इतिहासाच्या पानावर याची नोंद होण्याचा निखळ प्रयत्न काशीबाईंनी केलेला आहे. स्त्रीलिखित असणारे हे पहिले आत्मचरित्र जरी असले तरी त्याचे वाचन करताना ते सर्वांगीण बाजूने कसे नीटनेटके आणि सरस आहे याची प्रचिती येते.

१८९१ नंतर तब्बल २६ वर्षांच्या कालावधी नंतर अवंतिकाबाई गोखले यांनी १९१५ मध्ये *महात्मा गांधी* यांचे चरित्र प्रसिद्ध केले. गांधीजींच्या चळवळीतील एक धडधडीच्या कार्यकर्त्या अवंतिकाबाई आपल्या शेवटच्या श्वासा पर्यंत देशसेवा करत राहिल्या. गांधींच्या जीवनचा परामर्श, ध्येय, कार्याची दिशा, विचारसरणी आणि एकूणच देशसेवेचा ध्यास या चरित्रातून समोर येतो. काही गोष्टी तपशिलासह आहेत तर काही प्रसंग तपशीलरहित असल्याचे जरी समजत असले तरी एकूणच हे चरित्र भक्तीभाव आणि आदरपूर्वक लिहिल्याने ते वाचनीय ठरले आहे.

आनंदीबाईच्या चरित्रा नंतर पंडिता *रमाबाईंचेही चरित्र* लिहिले गेले. कृष्णाबाई गद्रे या पंडिता रमाबाईंच्या सहकारी आणि शिष्या होत्या. त्यांनीच एकोणिसाव्या शतकाच्या आणि विसाव्या शतकाच्या जुळणीवर हे चरित्र प्रसिद्ध केले. पंडिताबाईंच्या विचारसरणीचा प्रामुख्याने चरित्रात उल्लेख केलेला आहे.

एकूणच १९२० पर्यंतचा आलेख पहाता स्त्रीलिखित चरित्रे फारच तुरळक प्रमाण असल्याचे समजते. स्त्रियांवर असलेल्या बंधनांमुळे स्त्रीचा व्हावा तेवढा विकास न झाल्याने साहित्यात त्याचे पडसाद पडल्याचे समजते. मात्र पुढील १९२१ नंतर मात्र स्त्री कासवगतीने प्रगती करुन कशी यशस्वी ठरली हे पुढीलप्रमाणे स्पष्ट होत आहे.

## ब) १९२० ते १९५० या कालखंडातील स्त्रीलिखित चरित्रांचा अभ्यास

पौराणिक आणि ऐतिहासिक युगातील भावलेल्या व्यक्तींच्या आयुष्यातील कार्याचा आढावा घेण्यासाठी स्त्रियांनी चरित्र लिहिली.

स्त्रियांनी स्त्रियांचीच सर्वाधिक चरित्र लिहिल्याचेही स्पष्ट होते.*आर्य स्त्री रत्ने'* कार यशोदाबाई भट यांनी या चरित्रग्रंथातून पतिव्रत्याच्या कसोटीत उतरलेल्या अनेक स्त्रियांची जीवनकहाणी नमूद केली आहे. त्यागमूर्ती आणि परोपकारी भावना असलेल्या या मंदोदरी, गांधारी, चूडाला, चांगुणा, सुमती, च्यवनभार्गवांची सुकन्या.... स्त्रियांनी यशोदाबाईंना *आर्य स्त्री रत्ने* हा चरित्रग्रंथ लिहिण्यास प्रवृत्त केल्याचे त्या मानतात. त्यांच्या कार्याचा भाग यशोदाबाईंना लेखनीपर्यंत खेचत होता. आणि त्याप्रमाणे यशोदाबाईंनी संपूर्ण न्यायाने बालवयापासून ते वृद्धावस्थेतील स्त्रीपर्यंत या स्त्रियांचे वेगळेपण ग्रंथात उतरविले आहे.

सरस्वतीबाई गाडगीळ यांनीही *आर्य स्त्री प्रबोधन माला* लिहून कर्तुत्ववान स्त्रियांच्या कार्याचा आढावा घेतला आहे. तर *विदर्भकन्या* हा चरित्रग्रंथकार दुर्गाबाई जोशी यांनी दमयंती, रुक्मिणी, सगरपत्नी केशिनी, जिजारुंची माता गिरिजाबाई, रायबागान मैनलदेवी अशा विविध गुण संपन्नतेने कार्य करणाऱ्या विदर्भकन्या यांच्यावर हा चरित्रग्रंथ लिहिला आहे. त्याच बरोबर सारजाबाई बापट यांनी प्रसिद्ध कीर्तनकार शांताबाई ओंकार यांची जीवनमाला स्पष्ट करताना *जीवनस्मृती* हा चरित्रग्रंथ लिहिला आहे.

वरील सर्व लेखिका ब्राम्हण असल्याचे नमूद करावेसे वाटते ते यासाठी की तत्कालीन परिस्थितीमध्ये इंग्रजी राजवट असल्याने आणि सामाजिक बंधनांचा पाठपुरावा असूनही या लेखिकांनी खडतर प्रवास करून, शिक्षण घेऊन त्यांनी साहित्यात मोलाची कामगिरी पार पाडली आहे. ब्राम्हण समाजाचे हे हाल तर इतर समाजाचे हाल विचारात घेणे कठीण

होऊन जाते.

१८८५ मध्ये हुजूरपागा या मुलींच्या हायस्कूलला खऱ्या अर्थाने विसाव्या शतकात प्रारंभ झाला. आणि स्त्री शिक्षणाचा आरंभ होत कुमारिका आणि प्रौढ स्त्रिया शिक्षण घेऊ लागल्या. त्यामुळे या काळातील स्त्री साहित्याचा आलेख उंची गाठू शकला नाही.

१९३१ साली वेणूताई पानसे यांनी हरि नारायण आपटे यांच्या कार्याचा आढावा घेताना *चरित्र व वाङ्मय विवेचन* हा चरित्रग्रंथ लिहिला आहे. या चरित्रग्रंथासाठी वेणूताईंनी अनेक कष्ट उपसल्याचे ग्रंथाचे वाचन करताना समजते.

याच काळात गार्गी भाटवडेकर यांनी आपल्या आजोबांच्या जीवनकार्याचा वेध घेत चरित्रलेखन केले. यशाच्या अनेक पायऱ्या चढलेले आणि शिखरावर पोहचलेले डॉक्टर सर *भालचंद्र कृष्ण भाटवडेकर* यांच्या एकूण दैनंदिन जीवनापासून त्यांच्या डॉक्टरीपेशात आलेल्या अनेक समस्यांचे चित्रण या चरित्रात आले आहे.

अहिल्याबाई किर्लोस्करांनी आपल्या भावाची वैमानिक होण्याची इच्छा अपूर्ण राहिली आणि अपघातात मृत झालेल्या सर्व इच्छा भावाच्या स्मृतीतून *माझा भाई* या चरित्रात मांडल्या आहेत. श्रीकृष्ण पंतवैध या तरुणाची हृदय पिळवटून टाकणारी कथा अहिल्याबाईंनी या चरित्रात अत्यंत सुव्यवस्थित मांडलेली आहे.

शांता रघुनाथ बनकर यांनी स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या *सावित्रीबाई फुले* यांच्यावर चरित्र लिहिले आहे. तर रमाबाई देशपांडे यांनी *आमच्या प्राचीन मैत्रिनी* ह्या चरित्रग्रंथात गार्गी, मैत्रेयी, पिंगला, मदालसा यांच्या चरित्रांचे संकलन केले आहे.

सुमती देव आणि पांडुरंग देव यांनी त्यांच्या एकुलत्या एक तरुण मुलाची आकस्मिक मृत्यू आणि त्याची कारणे *मनोहरच्या मृत्यूचा इतिहास* या चरित्रात मांडले आहे.

*सीतारामपंत जव्हेर* यांचे चरित्र कु. कृष्णाबाई जव्हेर या त्यांच्या कन्येने लिहून वडिलांचे जीवनभाष्य समाजापुढे मांडले आहे. प्रार्थना समाजाची माहितीही या चरित्रात आहे.

छत्रपतींची सून असलेल्या मर्दानी *ताराबाईंचे चरित्र* रंगूबाई जाधव यांनी लिहिले. या चरित्रामध्ये इतिहासातील अनेक लहान गोष्टीही नव्याने समोर येतात. लेखिकेनं संपूर्ण अभ्यासांती चरित्र लिहिल्याचे समजते.

लीला बावीकर यांनी *महाराणी लक्ष्मीबाई* यांचे चरित्र लिहिले आहे. तर सरोजिनी बाबर यांनी *स्त्री रत्ने* या नावाने चार चरित्रग्रंथ लिहिले. पहिला पौराणिक स्त्रियांवर, दुसरा ग्रंथ देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून ज्यांनी आयुष्य वेचले त्या स्त्रियांचा तर तिसऱ्या ग्रंथात ऐतिहासिक स्त्रियांची धैर्यवान कामगिरी आणि चौथ्या ग्रंथात स्वातंत्र्योत्तर काळातील

स्त्रियांची चरित्रे त्यांनी लिहून लौकिक कामगिरी केली आहे.

१९४६ साली *आमची कमल* हे चरित्र कार्यकर्ती आणि शूर सैनिक असलेल्या कमलचा अंत तिच्या नातेवाईक मैत्रिणी, सहकारी यांनी मिळून लिहिले आहे.

दुर्गाबाई भागवतांनी चुलते राजारामशास्त्री यांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकण्यासाठी चरित्र लिहिले आहे. तर अहिल्याबाई किर्लोस्करांप्रमाणेच १९४८ मध्ये वेणूबाई भाटे – आजरेकर यांनी आपल्या अवघ्या तेविसाव्या वर्षी मृत्यूने गिळंकृत केलेल्या वैमानिक मुलाचे *माझा नाना* या नावाने चरित्र लिहिले आहे.

याच काळात इंदिराबाई भागवत यांनी १९४८ साली कलावंत पतीचे चरित्र *या सदाशिव'* या नावाने लिहिले. तर अन्नापूर्णाबाई रानडे यांनी पतीच्या आठवणी *स्मृतीतरंग* हे चरित्र १९४७ साली प्रकाशित केले आहे. १९२०च्या कालखंडातही अनेक स्त्रियांनी आत्मचरित्र लिहिली आहेत पण ती आत्मचरित्र त्यांच्याही नकळत पतीचे चरित्र होऊन गेली आहे. उदाहरण रमाबाई रानडे यांचे आमच्या *आयुष्यातील आठवणी*, लक्ष्मीबाई टिळकांचे – *स्मृतीचित्रे....*

मंगलाबाई गोखले यांनी काकासाहेब गाडगीळांच्या पत्नी *सौ. आनंदीबाई गाडगीळ* यांचेही आत्मचरित्र लिहिले आहे. तर इंदुमती शंकर भुरे यांनी *मधुस्मृती* या नावाने सेवादलातील एका युवकाचे आठवणीवजा चरित्र लिहिले आहे.

१९५० पर्यंतच्या प्रवासातील प्रसिद्धीच्या झोतात असलेल्या गायिका लता मंगेशकर यांनी वडील *दिनानाथ मंगेशकर* यांचे चरित्र लिहिले आहे. या चरित्रामध्ये वडिलांवर असलेले प्रेम, आदर, आत्मीयता अधिक अधोरेखित होते.

१९२१ ते १९५० च्या या टप्प्यात स्त्रियांनी ऐतिहासिक, पौराणिक, स्वातंत्र्यलढ्यातील प्राण गमावलेल्या व्यक्ती, आप्तेष्ट, वडील, चुलता, गुरु, मित्र, पुत्र, मैत्रीण, आई अशा वेगवेगळया भावलेल्या व्यक्तींची जगाला अधिक ओळख होण्यासाठी चरित्र लिहिलेली आढळतात. मात्र तुलनात्मक विचार केला तर चरित्रांचा १९२१ ते १९५० चा टप्पा ही तुरळक चरित्रांचाच वाटतो. समाजातील गायक, चित्रकार, शास्त्रज्ञ, तत्वज्ञ, खेळाडू, उद्योजक अथवा समाजकार्याचा किंवा राजकारणाचा भार पेलणाऱ्या कोणत्याच शेतकरी वर्गाचे चरित्र कुठेच आढळत नाही. १९२० पर्यंतच्या चरित्रांचा तुलनात्मक विचार केला तर १९२१ ते १९५० च्या कालावधीत चरित्रांची संख्या वाढलेली दिसते. १९५१ च्या टप्प्याचा अभ्यास पुढीलप्रमाणे.

## क) १९५० ते २००० या कालखंडातील स्त्रीलिखित चरित्रांचा अभ्यास

इतर वाङ्मयीन साहित्यापेक्षा चरित्रलेखनाचा आलेख अत्यंत संथ गतीने वाहणारा, पण जिवंत झऱ्याप्रमाणे वाटत आहे. एकोणिसाव्या शतकात *डॉ. आनंदीबाई जोशींचे* चरित्र काशीबाई कानिटकरांनी लिहिले. तर *गांधीजींचे* चरित्र अवंतिकाबाईंनी लिहिले. परंतु चरित्राविषयी अत्यंत कमी लेखन झाले आहे. चरित्र लेखनाकडे सदृष्टीने न पाहिल्याचे लक्षात येते आणि हे प्रमाण स्त्री लेखनात आहे तसेच पुरुष लेखनातही जाणवते. मूळतः चरित्रलेखनाची प्रेरणा ही ज्या व्यक्तीचे चरित्र लेखन करावयाचे आहे त्या व्यक्तीच्या जीवनकार्याचा एकूण घेतलेला आढावा होय. चरित्र लिहिणारी व्यक्ती ह्यात असो व नसो चरित्रात आलेल्या गोष्टी कितपत खऱ्या आणि खोट्या हे त्या व्यक्तीला माहित असो व नसो.. मात्र लेखिकांनी अत्यंत अभ्यासपूर्वक आणि आव्हानात्मक केलेला हा प्रवास म्हणावा तितका फुलला नाही ही वस्तूस्थिती आहे. तरीही १९५१ ते १९७५ च्या कालखंडात सुमारे १०० चरित्र प्रसिद्ध झाली आहेत. त्यातील अनेक चरित्र ही अत्यंत लहान आकाराची वाटतात. चरित्र म्हणजे विशिष्ट एका व्यक्तीचा इतिहास.... आणि त्या इतिहासाची उपलब्धता किती आहे यावरही त्या चरित्राची आकारदृष्टी लयास येते.

*टॉलस्टॉय: एक माणूस* हे सुमती देवस्थळे यांचे अत्यंत गाजलेले चरित्र होय. यातून त्यांनी किती व्यापक दृष्टीने अभ्यास करून चरित्रलेखन केले आहे हे समोर येते. टॉलस्टॉय यांचे एकूण वाङ्मय लेखन आणि व्यक्तीवेध या दोन्ही गोष्टी लेखिकेने अत्यंत जिज्ञासूवृत्तीतून मांडल्या आहेत.

केवळ स्वतःच्या गरजेपोटी कार्व्हरचा शोध घेणाऱ्या वीणा गवाणकर कार्व्हर सारख्या महामानवाच्या कार्याच्या ओठीने हतबल झाल्या. अनेक पुरावे, पत्र, लेख यातून त्यांनी जगाला 'कार्व्हर' या महामानवाची ओळख *एक होता कार्व्हर* या चरित्रातून करून दिली आहे. या चरित्राच्या अनेक आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या. अनेक भाषांमध्येही भाषांतर होऊन एक विक्रम या चरित्राने केला.

*ताराबाई मोडक* हे पद्मजा फाटक यांनी लिहिलेले चरित्र होय. ताराबाईंचे नेतृत्व गुण, प्रांजळपणा, करारीपणा आणि भावनिकता, ताणतणाव अत्यंत व्यापक दृष्टीने मांडल्याने हे चरित्र वाचकप्रिय झाले आहे. या संदर्भात द. न. गोखले म्हणतात, "ताराबाईंचे जीवन हे या चरित्राचे लक्ष्यकेंद्र (टार्गेट) आहे. लक्ष्यकेंद्राचाही केंद्रबिंदू ( बुल्स आय) म्हणजे ताराबाईंचे व्यक्तित्व होय. या व्यक्तित्त्वाचा विकास प्रस्तुत चरित्रात क्रमश: होत गेलेला बघता येतो." [२]

काही चरित्रे आठवणींमधून आकाराला आलेली दिसतात. अनेक स्त्रियांनी आपल्या

पतीविषयक प्रेमभावना, कर्तुत्व, समाजकार्य, गुण – दोष सांगण्याकरिता आत्मचरित्रे लिहिली. स्त्रियांना नवऱ्या शिवाय दुसरे कोणतेच प्रथम स्थान देणारे व्यक्तित्व माहित नसल्याने किंवा शिक्षणाचा अभाव असल्याने आत्मचरित्रही नवऱ्याभोवतीच पिंगा घालताना दिसते हे मागील प्रकरणात आपण पाहिलेले आहेच. या ही कालखंडात लक्ष्मीबाई पटवर्धन यांनी *माझा नंदादीप* हे जीवनचरित्र पती डॉ. भालचंद्र चिंतामण पटवर्धन यांच्या जीवनकार्याचा आढावा घेणारे प्रकाशती केले आहे. तर रमाबाई केदार यांनी पती नानासाहेब केदार यांच्या जीवनकार्याची ओळख करून देणारे *वेचलेले मणी* हे जीवनचरित्र लिहिले. ४० वर्षांच्या सहवासानंतर आलेल्या एकाकीपणाला दूर करण्याकरता आणि पतीच्या आठवणी सांगण्याकरिता सुमती पोंक्षे यांनी *उलटलेली पाने* हे चरित्रलेखन पती शंकर यादव पोंक्षे यांच्या कार्याचा आढावा घेण्याकरिता आणि त्यांची उदारमतवाडी वृत्ती जगाला सांगण्याकरिता चरित्र लेखन केले आहे. स्वातंत्र्य सेनानी असलेले आपटे गुरुजी यांच्या पत्नी राधाबाई आपटे यांनी *उमटलेली पावले* या ग्रंथातून स्त्रीला दिल्या गेलेल्या स्थानाचा तिरस्कार करताना दिसतात. नेहमीच स्त्री–पुरुष या दरीसाठी त्या झगडताना दिसतात. लग्नानंतर सतत स्त्री–पुरुष तुलना त्यांच्या मनात धगधगत होती ती त्यांनी या ग्रंथात मांडली आहे आणि आपटे गुरुजींचे मूर्तिमंत स्वरूपही त्यांनी स्पष्ट केले आहे. मात्र त्या अतिशय निर्भीडपणे लेखन करताना दिसतात. प्रमिलाताई भालेराव यांनी ही *अश्वत्थाची फुले* या चरित्रातून डॉक्टर असलेल्या ना. ग. भालेराव यांच्या कार्याचा आढावा घेताना त्या काळातील स्त्रियांवरील बंधने, जाच, सामाजिक चौकट अधोरेखित केली आहे. *पण ऐकतं कोण?* हे उषाताई डोंगे यांनी आत्मचरित्र लिहिले. मात्र ते पती कॉम्रेड दंगे यांचे चरित्रजीवनही वाटू लागते. राजकीय, सामाजिक परिस्थितीत, प्रतिकूल अनुकूल अनुभव अनुभवत व्यतीत केलेल्या या दाम्पत्याच्या जीवन कार्याचा आढावा या आत्मचरित्र + चरित्र ग्रंथात वाचावयास मिळतो. अत्यंत व्यापक दृष्टीने समाजासाठी लढा दिलेले हे दाम्पत्य गोर – गरिबांना देवाचे स्थान बनून गेले आहे.

१९७२ साली वीणा हरदास यांनी पती बाळशास्त्री हरदास यांच्या विषयक असलेला आदरभाव, भक्तीभाव, प्रेमभाव या चरित्रातून व्यतीत केला आहे. नेहरू युगातील अनेक घटनांवर प्रकाश टाकण्याकरिता अत्यंत तडफदार व्यक्तिमत्व असणाऱ्या इंदिरा मायदेव यांनी *स्मृतीतरंग* या ग्रंथातून राजकीय, सामाजिक मुल्ये समोर आणली आहेत. शांता बुद्धिसागर यांनी *पंतप्रधान इंदिरा गांधी* हे चरित्र लिहून इंदिरा गांधींच्या जीवनकार्याचा

आढावा घेतला आहे. सुमती पोंक्षे यांनी *प्रियदर्शिनी अर्थात पंतप्रधान इंदिरा गांधी* हे चरित्र अत्यंत व्यापक दृष्टीने लिहिलेले आहे.

पौराणिक व्यक्ती, ऐतिहासिक व्यक्ती आणि समाजसुधारक व्यक्तींवर चरित्र लेखन करताना या टप्प्यात स्त्रियांनी तत्वज्ञ, शास्त्रज्ञ यांच्या कार्याचा आढावा घेण्याकरिता एक मोलाची कामगिरी केल्याची दिसते. मृण्मयी बारपांडे यांनी *एडिसन आणि मादाम क्युरी* ही शास्त्रज्ञांची चरित्रे लिहून त्यांच्या कार्याची माहिती जगासमोर मांडली आहे. पुष्पा जोशी यांनी *आईनस्टाईन* हे चरित्रलेखन केले आणि सुधा कुलकर्णी यांनी *शरदचंद्र* हे चरित्रलेखन करून एक वेगळीच कामगिरी पार पडली आहे. वरील चरित्रलेखनाचा आवाका आकाराने लहान असला तरी वैचारिक दृष्ट्या व्यापक वाटत आहे. लीला आवटे यांनी शास्त्रज्ञ *डॉ. सी. व्ही. रामन* यांचे चरित्र लेखन केले आहे. अष्टपैलू रामनांचा परिचय, कार्यभाग त्यांनी त्यातून मांडला आहे. शांता पेंडसे यांनी मुलांसाठी *एक शास्त्रज्ञांच्या सत्वकथा* नावाचा चरित्रकथा संग्रह लिहून मुलांमधील चौकस बुद्धीला चालणा देण्याचा प्रयत्न केला आहे. यांत अनेक थोर शास्त्रज्ञांचा परिचय, कार्य त्यांनी मांडले आहे.

*अण्णासाहेब कर्वे* यांच्या जीवनकार्याचा लीला आवटे यांनी चरित्रातून वेध घेतला आहे तर लता रामराव विजयकर यांनी *शतायुषी महर्षी* हा चरित्रग्रंथ लिहून महर्षी कर्व्यांची जीवनशैली रेखाटली आहे.

स्त्रियांच्या कर्तुत्ववान कार्याला लक्षात घेऊन इंदूतनया या लेखिकेने सुमारे ७० विरांगनांच्या कार्याचा वेध घेत एक पुस्तक प्रकाशित केले आहे. यात पौराणिक, ऐतिहासिक, स्वातंत्र्यलढ्यातील आणि आधुनिक युगातील अनेक कन्यांचे धावते परिचय आणि त्यांचे जीवनकार्य चित्रित झाले आहे. इंदूतनया प्रमाणेच मालतीबाई दांडेकर, लीला गणेश पांडे यांनी पौराणिक, ऐतिहासिक कर्तुत्ववान विरांगणांची आवडीनुसार चरित्रे लेखनबद्ध केली आहेत. रामायण, महाभारतापासून आधुनिक स्त्रियांमध्ये होणारे मानसिक, भावनिक, कर्तुत्ववान वलयाची वृत्ती वरील चरीत्रग्रंथातून चित्रित झाल्या आहेत.

भाटवडेकरांच्या चरित्राप्रमाणेच विद्या गोडसे यांनी त्यांच्या *आजोबांचे चरित्र* लिहिले आहे. त्यांच्या जीवनकार्याचा आलेख त्यातून त्यांनी मांडला आहे.

अलीकडच्या काळातही ऐतिहासिक युगप्रवर्तक व्यक्तींच्या कार्याचा आढावा लेखिकांना खुणावत आहे. डॉ. कमल गोखले यांनी संभाजी महाराजांचे विवेचनात्मक चरित्रलेखन *शिवपुत्र संभाजी* या नावाने केले आहे. राजमाता जिजाबाई, येसूबाई, ताराबाई, राधाबाई पेशवे, गोपिकाबाई पेशवे, रमाबाई पेशवे, आनंदीबाई, मस्तानी पेशवे, तुळसाबाई होळकर,

अनुबाई घोरपडे, उमाबाई दाभाडे, अहिल्याबाई, शिवछत्रपती, श्रीमंत बाजीराव पेशवे, संभाजी महाराज, अनेक मराठी सरदार.... या आणि अनेक ऐतिहासिक व्यक्तींची चरित्र अलीकडे लेखिकांना खुणावत आहेत. त्याचप्रमाणे वैज्ञानिक, शास्त्रज्ञांच्या जीवनविषयक कर्तव्याचा आणि कार्याचा आढावाही चरित्रांमध्ये वैचारिक दृष्टीने स्त्रिया अधिकाधिक मांडत आहेत. सरला कारखानीस यांनी *कार्ल मार्क्स* यांचे रहस्यमय चरित्र त्यांनी अतिशय व्यापक अंगाने रेखाटले आहे. त्याचप्रमाणे फ्रेडरिक एंगल्स आणि लेनिन या थोर विचारवंतांची चरित्रेही सरला कारखानीस यांनीच लिहिली आहेत. कुठेही पाल्हाळपणा न लावता प्रसंगी उत्सुकता ताणणारी रचना वैशिष्ट्यपूर्ण विचारशैलीमुळे ही चरित्रे अत्यंत रेखीव बनली आहेत.

सामाजिक आणि राजकीय अंगाने विचार करता इंदुमती केळकर यांनी *राममनोहर लोहिया* यांचे चरित्र लिहिले आहे. तर अवघे जीवन दलितांच्या रक्षणासाठी व्यतीत करणाऱ्या *पद्मश्री दादासाहेब गायकवाड* यांच्या जीवनकार्याचा वेध घेण्याकरिता भावना भार्गवे यांनी चरित्रलेखन केले आहे.

१९५१ ते १९७५ च्या कालखंडात एकच विनोदी चरित्रलेखन झाले ते अनुराधा पुनर्वसू यांनी केले आहे. *अस्सा नवरा'* या नावाने ते प्रसिद्ध झाले. या चरित्रात अनेक विनोद त्यांनी मांडले असले तरी त्या विनोदाची धार दुःखाचीही असल्याचे जाणवते.

१९५१ ते १९७५ च्या कालखंडात अनेक चरित्रे प्रकाशित झाली. वेगवेगळया स्तरातून, वेगवेगळया व्यक्तींची गुणदोष यादी या चरित्रातून वाचावयास मिळते. १९७५ ते २००० च्या टप्प्यात त्यात कसा बदल होत गेला हे पुढीलप्रमाणे निदर्शनास येईलच.

१९७५ ते २००० च्या टप्प्यात विचार करतानाही हेच लक्षात येते की, कथा, कादंबऱ्या, ललित या गोष्टींना जसे वाचकांनी उचलून घेतले आहे तसे चरित्रविषयाकडे काही अंशी दुर्लक्षित वाटत आहे. याउलट आत्मचरित्र मात्र आवडीने वाचणारे वाचकही आहेत.

सुमती देवस्थळे यांनी *टॉलस्टॉय* हे चरित्र लेखन केल्यानंतर डॉ. अल्बर्ट श्वाइटझर, *मॅक्झिम गॉर्की* आणि *कार्ल मार्क्स* यांच्या जीवनाचा वेध घेणारी चरित्रही व्यापक दृष्टीने लिहिली आहेत. *टॉलस्टॉय* या चरित्रलेखनाप्रमाणेच इतर शास्त्रज्ञांची चरित्र त्यांनी अभ्यासांती, अनेक पुरावे आणि अनेक लिखित माहितीच्या आधारे लिहिली आहेत. वरील लोकांच्या कार्याचा आढावा घेताना सुमती देवस्थळेंनी अधिक खोलवर जाऊन लेखन केलेले आहे. प्रत्येक व्यक्तीची आयुष्याची झगडण्याची पद्धत आणि त्यातून पार पडण्याची शैली या चरित्रातून त्यांनी वाचकांपुढे मांडल्या आहेत. हे सर्व चरित्रग्रंथ म्हणजे मराठी वाङ्मयातील

अनमोल कामगिरी सुमतीबाईंनी केलेली आहे.

वीणा गवाणकर यांनी *एक होता कार्व्हर* हे चरित्र लिहून एक विक्रमच केलेला आहे. ज्या व्यक्ती वाचनात आल्या, ज्यांच्या बद्दल आत्मीयता वाटली, त्या व्यक्तीचा जीवन परिचय मराठी माणसाला व्हावा हा प्रांजळ हेतू मनात ठेऊन वीणा गवाणकर यांनी लेखन केले. *डॉ. आयडास्कडर, डॉ. खानखोजे* यांचे चरित्रलेखनही वीणा यांनी केले आहे. मुलांना महाभारत, रामायणातील व्यक्तींच्या साहसकथा जितक्या प्रांजळपणे सांगाव्यात तितक्यात प्रांजळपणे वरील व्यक्तींच्या अद्‌भुत कथा सांगितल्या जाव्यात ही मनस्वी इच्छा असलेल्या वीणा यांनी चरित्रलेखनाला एक नवी दिशा दिली आहे. वीस वर्षात अठरा आवृत्त्या निघालेले *एक होता कार्व्हर* हे विक्रमी चरित्र वाचकांना भुरळ पाडत आहे.

मोहिनी वर्दे यांनी *डॉ. रखमाबाई एक आर्त* हे चरित्र आईच्या सावत्र आत्या रखमाबाई यांच्या जीवनातील कडू – गोड प्रसंगांची स्मरळसाखळी चित्रित केली आहे. ज्या काळात स्त्री उंबरठा ओलांडू शकत नव्हती त्या काळात या स्त्रीने सर्वांगीन विकास करून आयुष्यातील किती मोठी मजल मारली आहे, तिच्या लढ्याची ही करुण कहाणी मोहिनी वर्दे यांनी चरित्रातून मांडली आहे.

१९९८ साली मोहिनी वर्दे यांनी नाटक परंपरेचे अनमोल हिरा असलेले *बालगंधर्व* यांच्या जीवनाचा वेध घेणारे चरित्र लिहिले. बालगंधर्वांचे अनेक गुण त्यांनी मांडले आहेत. बालपण ते तारुण्य आणि नाटकातील एकूण कामगिरी त्यांनी चित्रित केली आहे. संपूर्ण इतिवृत्तांत देणारे व्यापक अंगाने भावणारे बालगंधर्व यातून साकार झाले आहेत. मोहिनीबाईंची ही दोन्ही चरित्रे व्यापक आहेत.

शैलजा पंडित यांनी गुरुस्थानी असलेल्या *हिराबाई बडोदेकरांचे* चरित्रलेखन केले आहे. हिराबाईंचे गुणवैशिष्ट्ये अधिक अधोरेखित झाले आहे. लेखिकेला वाटणारा आदर, स्वच्छ भूमिका या चरित्रातून स्पष्ट होते.

प्रभा पानवलकर यांनी *अब्राहम लिंकन* यांचे चरित्र लिहून साहित्याला एक अद्‌भुत देणगी दिली आहे. सतत अपयशी ठरणाऱ्या सळसळत्या तरुण रक्ताची ही गाथा जेव्हा यशाची शिखरे चढू लागते ती धैर्यगाथा, उत्कृष्ट कार्यकर्ता, यशस्वी उत्तम वक्ता, प्रेमळ पती, वात्सल्यमूर्ति पिता आणि कर्तव्यदक्ष पुत्र – भूमिपुत्र या भरजरीने नटलेल्या या व्यक्तीची जीवनगाथा प्रभा यांनी चरित्रात अत्यंत सुव्यवस्थित मांडली आहे.

पद्मजा फाटक यांनी *शिक्षणतज्ञ ताराबाई मोडक* हे चरित्र लिहून त्यांच्या कर्तुत्वाची अनेकांगी धार अधोरेखित केली आहे. कार्याचा आढावा घेताना आलेल्या अडचणी दूर

करण्याची कला सहज अवगत करणाऱ्या अत्यंत तडफदार व्यक्तीचे हे चरित्र आहे.

चित्रकलेचा व्यासंग असलेल्या माधुरी पुरंदरे यांनी *पिकासो* नावाने चरित्रग्रंथ लिहिलं आहे. रक्तातच चित्रकला असलेला पिकासो त्यांची असंख्य प्रेम प्रकरणे, विवाह, मित्र, मैत्रीण, रागलोभ, हवेदावे, शिल्पकला, चित्र प्रदर्शने, विक्री, कौटुंबिक जीवन यांचे संपूर्ण रेखाटन या चरित्रात आले आहे. वयाच्या ७० व्या वर्षी सुद्धा कामात स्वतःला झोकून देणाऱ्या, कलेशी प्रामाणिक नाते जोडणाऱ्या, व्यक्तीमत्त्व म्हणून समजून घ्यायला अवघड वाटणाऱ्या या कला व्यासंगाची ओळख आणि आत्मीयता यातून वाचावयास मिळते.

डॉ. कुमुद गोसावी यांनी *हरीकाका जोशी – गोसावी* यांचे चरित्र लेखन केले आहे. सत्पुरुषाचे प्रांजळ दर्शन यातून होते. लौकिक, अलौकिक, पारमार्थिक जीवनाचा वेध आणि समाजाला त्यांच्याविषयी वाटणारी मतेही या चरित्रात आहेत.

व्यवसायाने पत्रकार असलेल्या रेखा देशपांडे यांनी चित्रपट दुनियेत स्वतःचे अढळ स्थान बनविणाऱ्या स्मिता पाटील यांचे चरित्रलेखन केले आहे. अनेक प्रसंग या चरित्रातून नव्याने समजून जातात.

रेखा देशपांडे यांच्या प्रमाणेच व्यवसायाने पत्रकार असलेल्या नीला उपाध्ये यांनी ही सत्यजीत रे यांचे *सत्यजीत: रुपेरे पडद्याचा कवी* हे चरित्रलेखन केले. एका तडफदार व्यक्तीच्या अनेक पैलूंचा प्रवास यातून त्यांनी उलगडला आहे. सत्यजीत यांच्या कार्याचा संपूर्ण भाग त्यांनी लेखनीबद्ध केला आहे. भारतीय सिनेमाला जागतिक चित्रपटसृष्टीच्या नकाशावर पोहचविण्याची प्रचंड मोलाची कामगिरी सत्यजीत रे यांची आहे.

जयश्री देसाई या ही व्यवसायाने पत्रकार आणि त्यांनी पंतप्रधान *अटल बिहारी वाजपेयी* यांचे चरित्रलेखन केले आहे. राजकारणातील अनेक लहान – मोठे तपशील देत, वाजपेयींच्या शैलीचा अभ्यास करत आणि इतर राजकीय वार्तांचा परिणाम सांगत हे चरित्रलेखन झालेले आहे. वाजपेयींचे नेतृत्व गुण आणि कला आसक्तपणा लेखिकेने अधोरेखित केला आहे.

डॉ. पुष्पा लिमये यांनी *विष्णू मोरेश्वर महाजनी* यांचे चरित्र रेखाटले आहे. महाजनींची विस्तृत माहिती या चरित्रात वाचकाला खिळवून ठेवते.

शैला दातार यांनी त्यांच्या आजेसासऱ्यांचे *देवगंधर्व* भास्करबुवा बखले यांचे संगीताशी असलेले नाते आणि जीवनाविषयक असलेली परिभाषा अधोरेखित करण्यासाठी चरित्रलेखन केले आहे.

डॉ. कमल केतकरांनीही *परिमल* हे पंडित डी. व्ही. पलुस्करांचे चरित्रलेखन करून संगीत व्यासंग आणि कला क्षेत्राशी असलेले नाते स्पष्ट केले आहे.

डॉ. अनुराधा पोतदार यांनी *दत्तकवींचे* चरित्र लिहिले आहे. म्हणजे त्यांच्या आजोबांचेच हे चरित्रलेखन होय. नातीला भावलेले आजोबा आणि त्यांच्या जीवनकार्याचा एकूण भाग यात मांडला आहे.

प्रभा गणोरकरांनी *बा. भ. बोरकरांचे* चरित्रलेखन करून बोरकरांच्या कविता लेखनाचा इतिहास सांगण्याचा प्रयत्न केला आहे. बा. भ. बोरकरांच्या कवितेची वाट कशी वळणा वळणाचा रस्ता पार पाडते हे या चरित्रलेखनात आहे. परंतु तरीही काही अंशी हे लेखन अपुरे वाटू लागते.

वीणा देव यांनी वडील गो. नी. दांडेकरांचे *आशक मस्त फकीर* हे चरित्र रेखाटले आहे. गो. नींच्या आठवणी, वाचन, लेखन, भ्रमंती, भावनात्मक विचार, छंद, मित्रमंडळी आणि तडफदार भूमिकांनी हे चरित्र अतिशय लक्षणीय ठरले आहे. विविधांगी छाप पाडलेले गो. नी. यातून वाचकास पुन्हा भेटण्यास येतात.

सरोजिनी वैद्य यांनी साहित्याला मोठे योगदान वाहिले आहे. दिवाकर, गोपाळराव हरि देशमुख (लोकहितवादी), काशीबाई कानिटकर आणि लंडनला वास्तव्य असणाऱ्या बनारसे या आज्जींचे चरित्रलेखन केले तर आईचे आत्मचरित्राचे सहलेखनही केले आहे. दिवाकर, गोपाळराव यांच्या अनेक छटा त्यांनी अत्यंत प्रांजळपणे मांडल्या आहेत. त्यांचा जीवनपट मांडताना बटबटीतपणा न आणता अतिशय व्यापक अर्थाने लेखन केले आहे. काशीबाईंचे लेखन करतानाही त्यांनी भावनात्मक आणि वैचारिक भान जपलेले आहे. एकूणच त्यांचे वाङ्मय क्षेत्रातील काम अतुलनीय आहे.

पहिल्या महिला डॉक्टर. असलेल्या *आनंदीबाईंवर* डॉ. अंजली कीर्तने यांनी चरित्रलेखन केले आहे. त्यांची व्यक्ती रेखा, सोशिक वृत्ती, कष्टमय जीवन आणि प्रकृतीने दिलेला दगा चरित्रात गुंफून कवितेने सजविलेले दिसते. मात्र यातून आनंदीबाईंचा आदर अधिक वाढत जातो, तो त्यांच्या प्रचंड मेहनतीमुळे डॉक्टरकी मिळाल्याच्या आनंदाने. पारंपारिक स्त्रीचे हे महत्त्वाचे चरित्रलेखन आहे.

आशा कर्दळे यांनी *मदर टेरेसा, हेमिंग्वे, पर्ल बक* या तीन मैलाचे दगड बनलेल्या व्यक्तींचे चरित्रलेखन करून संपूर्ण साहित्याला त्यांच्या कार्याची नव्याने माहिती देण्याचे मोलाचे कार्य केले आहे. अत्यंत खडतर प्रवास असणाऱ्या या तीनही चरित्रनायक नायिकांनी जगावर आपल्या विचारांचे साम्राज्य कसे पेरले हे या चरित्रलेखनातून समोर येते.

१९५१ ते २००० च्या टप्प्याचा विचार करता अनेक वेगवेगळया व्यक्तींची चरित्र लेखनबद्ध झाली आहेत तर काही ठिकाणी एकाच व्यक्तीची अनेक लेखिकांनी चरित्रे

साकारली आहेत. वडील, आई, गुरु, संगीत व्यासंगी, साहित्यकार, सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्ती, चित्रकार, लेखक, डॉक्टर, चंदेरी दुनियेत काम करणाऱ्या व्यक्ती, प्रगतशैलीचे राजकारणी व्यक्ती या आणि अशा अनेक तडफदार व्यक्तींचे जीवनकार्य, लढा, एकूण समग्र जीवनशैली लेखिकांनी वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने मांडलेली आहेत.

वरील चरित्रलेखनात अजूनही काही चरित्रांचे लेखन झालेले आहे. उदाहरण सरोज काकडे – भारतपुत्र संजय गांधी, मंगला गोखले – कुसुमाग्रज, निर्मला कुलकर्णी – जॉन केनेडी या सारखी काही चरित्रेही वाचनीय ठरली आहेत.

चरित्रनायकाचा जीवनपट, महत्त्वाचे टप्पे, संदर्भ, कामांची यादी, समाजातील लौकिकता अशा पैलूंमध्ये अनेक चरित्रांची रचना झालेली आढळते. चरित्रनायकाची निवड ही त्या – त्या लेखिकेने केली असल्याने संवेदनशीलता, आत्मीयता, आदर या चरित्रलेखनातून आढळतात.

### ड) २००० ते २०१० या कालखंडातील स्त्रीलिखित चरित्रे

पद्यात्मक स्वरूप असलेल्या चरित्र या वाङ्मय प्रकाराने २००० साला पर्यंत एक वेगळीच उंची गाठलेली आहे. अभंग, आरत्या, स्तुती कवने, पोवाडे, ओव्या या मधून चरित्र वाङ्मयाने जोर धरलेला होता आणि ब्रिटीश आगमनानंतर त्यांचे स्वरूप विस्तारित होत गेले. वरील २००० साला पर्यंतच्या टप्प्यात आपण हे अभ्यासले आहे.

प्रस्तुत कालखंडातही लेखिकांनी भावलेल्या अनेक निरनिराळया क्षेत्रात ठसा उमटविणाऱ्या व्यक्तींची चरित्रे रेखाटली आहेत. सामाजिक क्षेत्र, वैज्ञानिक क्षेत्र, शैक्षणिक क्षेत्र, कलावंत, ललित या वेगवेगळया वर्गीकृत टप्प्यांचा अभ्यास अनेक लेखिकांनी त्यांच्या चरित्रलेखन कौशल्यातून दर्शविला आहे.

आशा कर्दळे – *महाराणी व्हिक्टोरिया* (२००१), स्वाती कर्वे – *गंधर्व छाया* (२००२), चित्रलेखा पुरंदरे – *राजमान्य राजश्री* (२००४), प्राची गोंधळेकर – *प्रतिभा पाटील* (२००७), पद्मजा नातू – *संन्यस्त स्वामिनी देवी अहिल्याबाई* (२००८), उशा कोटबागी – *तेजस्वी तारा : गोदूताई परुळेकर* (२०१०), नीला जोशी – *देखणी ती पाऊले* (२००२), मृणालिनी चितळे – *ज्ञानार्ती: डॉ. आनंदी* (२००४), प्रतिभा गोपुजकर – *कर्तुत्वशालिनी भाग १ व २* (२००७), शांता बुद्धिसागर – *स्मरण असावे त्या तेजाचे* (२००७), माधवी

देसाई – *गोमंत सौदामिनी* (२००७), संजिवनी खेर – *नोबेल साहित्यिक* (२००७), नीलिमा साने - *कर्तुत्वशालिनी* (२००८), मीरा सिरसमकर – *नोबेल ललना* (२००८), नीला पांढरे – *महाराष्ट्रातील स्त्री सुधारक* (२००९), चित्रा नित्सुरे – *नोबेल विज्ञानवती* (२००९), रोहिणी गवाणकर – *पाणीवाली बाई* (२००३), वीणा गवाणकर – *पाणी पंचायती* (२००५), तारा धर्माधिकारी – *बाबा आमटे* (२००२), मंदाकिनी भारद्वाज – *दयेची देवता फ्लॉरेन्स नाइटिंगेल* (२००२), नीला पांढरे – *युगश्री: सावित्रीबाई फुले* (२००६), शुभदा साकुरीकर व कल्याणी हर्डीकर - *फ्लॉरेन्स नाइटिंगेल* (२००७), प्रतिभा गुंडी – *सेवाव्रती* (२००७), नीला पांढरे – *महर्षी धोंडो केशव कर्वे* (२००७), पुष्पा किन्हीकर – *समाजप्रवर्तक डॉ. पंजाबराव देशमुख* (२००८), वसुधा मेहेंदळे – *आपल्या ताई* (२००९), नीला पांढरे – *गोपाल गणेश आगरकर* (२०१०), रजनी लुंगसे – *स्वयंप्रकाशी* – कर्मवीर अण्णासाहेब व्यंकटराव रणधीर यांचे जीवनचरित्र (२०१०), वीणा गवाणकर – भगीरथाचे वारस (२००५), चित्रलेखा पुरंदरे – खगोल अभ्यासक जयंत नारळीकर (२००२), माधुरी काळे – अल्बर्ट आइन्स्टाईन (२००२), मंदाकिनी भारद्वाज – जागतिक किर्तीची किमया गार – मेरी क्यूरी (२००२), वीणा गवाणकर – लीझ माइट्नर (२००३), माधुरी शानबाग – नोबेल पारितोषिक विजेते चंद्रशेखर (२००५), वर्षा जोशी – डॉ. अब्दुल कलाम (२००६), माधुरी काळे – मादाम क्यूरी (२००८), माणिक कोतवाल – दूरदर्शी (२००८), चित्रा नित्सुरे – नोबेल विज्ञानवती (२००९), वीणा गवाणकर – *रोझलिंड फ्रँकलिन* (२००९), माधुरी मुळे – *वनस्पती शास्त्रज्ञ कार्व्हर* (२०१०), माधुरी काळे - अल्बर्ट आइन्स्टाईन अवकाश काळाचा तपस्वी (२०१०), लीलावती भागवत – मामा क्षीरसागर जीवनयात्रा (२००१), हर्षदा भुरे – दृष्टीदाता (२००४), अपर्णा राईरीकर – निर्मोही कर्मयोगी (२००५), चारुता कापडे – तिमिरातून प्रकाशाकडे (२०१०), उशा टाकळकर – एका वाङ्मयसेवकाची शोधयात्रा (२००३), मीना देशपांडे – *आचार्य अत्रे ... पपा : एक महाकाव्य (२००६),* नलिनी कुलकर्णी – गाथा एका विठ्ठलाची (२००१), सुहासिनी पटवर्धन – *नृत्यसौदामिनी दमयंती जोशी*

(२००५), चारुशीला दिवेकर – सांस्कृतिक महाराष्ट्राचे शिल्पकार गोविंदराव टेंबे (२००६), रेखा चवरे – हे रत्न भारताचे (२००६), ज्ञानदा आसोलकर – वॉल्ट डिस्ने: स्वप्नांचा किमयागार (२००९), अनुराधा औरंगाबादकर – नाट्यप्रेमी कमलाकर सारंग (२००९), मंगला आपटे – *गुनी गुरु पं. जगन्नाथबुवा पुरोहित* आणि पं. द. वि. काणे यांचे संयुक्त चरित्र (२०१०), संतोष शिंत्रे व अमृता रावण - लेनी रिफेन्स्टाल – सर्जनशील शतकी प्रवास (२२०१), उर्मिला देशपांडे – राष्ट्रसंत समर्थ रामदास (२००१), शुभांगी भूतकर – *संत निळोबा जीवन व कार्य* (२००२), वर्षा माचवे – *चिरायू* (२००३), वसुधा मेहेंदळे – *वात्सल्यमूर्ति* (२००३), सुमती पुसेगावकर – *जगातील सर्वश्रेष्ठ माता श्री सारदादेवी* (२००४), लीला पाटील – *संत तुकडोजी महाराज* (२००६); *संत जनाबाई* (२००६), विमल वाणी – *संत बहिणाबाई* (२००७), इंदुमती जोंधळे – *कर्मयोगी अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे* (२००८), कुमुद गोसावी – *किल्लेदार संत जनार्दन स्वामी* (२००९), मृणालिनी जोगळेकर – *फ्रेंच स्नेहयात्री* (२००१), पद्मिनी बिनीवाले – *एकला चलो रे* (२००१), नेत्रा बांदेकर – *दत्तू बांदेकर* (२००१), अरुणा ढेरे – *डॉ. विश्राम रामजी घोले आणि त्यांचा परिवार* (२००२), लीला पाटील – *किरण बेदी* (२००२), तारा धर्माधिकारी – *महाराष्ट्राचे शिल्पकार* (२००२), वसुधा परांजपे – *एक झुंझार स्त्री सौ. शांताबाई गोखले* (२००३), साधना बहुलकर – *चित्रायन* (२००५), माधुरी शानबाग – *जे. आर. डी. एक चतुरस्त्र माणूस* (२००६), मंगला गोडबोले – *सुवर्णमुद्रा* (२००७), सरोज देशपांडे – *महात्मा गांधी* (२००७), छाया महाजन –*राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील* (२००८), स्वाती म्हाळंक – *प्रतिभापर्व* (२००९), वृषाली कान्हेरी – *तिची गोष्ट* (२००९), शुभा चिटणीस *अष्टपैलू वाइन - लेडी* (२००९), शरयू घाडी – *पंखाविना भरारी* (२०१०), स्नेहसुधा कुलकर्णी – *डॉ. आनंदीबाई जोशी* (२००९), अपर्णा थत्ते – *कर्मयोगिनी अहिल्या* (२००२), विजया जहागीरदार – *तेजस्विनी अहिल्याबाई होळकर* (२००३), प्रतिभा रानडे – *झाशीची राणी लक्ष्मीबाई* (२००३), श्यामला पानसे – *महाराणी येसूबाई* (२००४), सुमती लेले –

*अहिल्यारणी होळकर* (२००४), सविता ओगीराल – *राणी रासमणी* (२००४), शालिनी मोहोड – *शिवपुत्र संभाजी राजे* (२००५), लीला पाटील – *सेनापती तात्या टोपे* (२००५), शालिनी मोहोड – *राजमातोश्री जिजाऊसाहेब* (२००६).

.... वरील प्रमाणे चरित्रांची यादी वाढतच गेली आहे. अनेक लेखिकांनी आपापले लेखन कौशल्य त्या त्या चरित्रग्रंथातून नमूद केले आहे. नव्याने अनेक दाखले देत ऐतिहासिक चरित्र अधिक प्रगल्भ झालेली आहेत. मूळतः चरित्र वाङ्मयप्रकारात त्या विशिष्ट व्यक्तीचा संपूर्ण इतिहासच सांगितला जातो. ऐतिहासिक चरित्रग्रंथात अनेक पुरावे दिले जातात. इतिहासातून ज्या प्रमाणे तत्कालीन राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक परीस्थिती समोर येते. त्याचप्रमाणे चरित्र नायक किंवा नायिकांच्या एकूण कार्याचा आढावा, दूरदृष्टीचा विचार एकूणच संपूर्ण गुण – दोषांचे वर्णन म्हणजेच चरित्रग्रंथ होय. अर्थातच या सगळ्यामध्ये चरित्रलेखन करणारी लेखिका स्वतःचे वैचारिक प्रबोधन, घडलेल्या एकूण परिस्थितीचे आकलन, प्रसंगांची आणि नायक – नायिकांची जीवनशैलीची सुस्पष्टता अत्यंत काटेकोरपणे चरित्रांमधून मांडताना दिसत आहे.

वैज्ञानिक चरित्रग्रंथात माधुरी शानबाग, वीणा गवाणकर, माधुरी काळे, चित्रा नित्सुरे, चित्रलेखा पुरंदरे, मंदाकिनी भारद्वाज या आदी लेखिकांची चरित्रलेखन पद्धत, आकलन क्षमता अत्यंत उल्लेखनीय आहे. विज्ञान आणि वैज्ञानिक यांची नाळ अनेक वैज्ञानिक चरित्रग्रंथातून पहावयास मिळते. आणि प्रत्येक वैज्ञानिकाच्या बुद्धीची, विचारांची अमर्याद अशी माहिती समोर येते.

सामाजिक क्षेत्रातील चरित्रलेखनात रोहिणी गवाणकर, प्रतिभा गुंडी, नीला पांढरे, तारा धर्माधिकारी, उशा कोटबागी, वीणा गवाणकर, रजनी लुंगसे, नीलिमा साने, प्रतिभा गोपुजकर या लेखिकांनी अत्यंत सुबक आणि वैशिष्ट्येपूर्ण लेखनाने अनेक सामाजिक क्षेत्रातील पैलू चरित्रग्रंथाद्वारे प्रकाशात आणलेले आहेत.

शैक्षणिक क्षेत्रात नीला जोशी, अपर्णा राईरीकर, चारुता कापडे, लीलावती भागवत, हर्षदा भुरे या लेखिकांनी निराळीच छाप पाडलेली दिसते. संबंधित नायक – नायिकेचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान या चरित्रांतून अधिक सुस्पष्ट होत जाते.

कलावंत क्षेत्रातील अनेक आघाडीच्या कलावंताचे जीवनकार्य अनेक लेखिकांनी चरित्रग्रंथातून समोर आणले आहे. नलिनी कुलकर्णी, स्वाती कर्वे, सुहासिनी पटवर्धन, ज्ञानदा आसोलकर, चारुशीला दिवेकर, अनुराधा औरंगाबादकर, मंगला आपटे, अमृता रावण

इत्यादी लेखिकांनी अनेक कलावंतांची जीवन परिभाषा चरित्रातून चितारली आहे.

ललित चरित्र ग्रंथात आशा कर्दळे, मंदाकिनी भारद्वाज, मंगला गोडबोले, शुभा चिटणीस, वर्षा माचवे, शरयू घाडी, वसुधा परांजपे, नलिनी कुलकर्णी, तृषाली कान्हेरे इत्यादी लेखिकांनी आपल्या चरित्रग्रंथातून छाप पाडलेली आहे.

ऐतिहासिक चरित्रग्रंथाचे लेखन मोठ्या प्रमाणात झालेले आहे. अनेक लेखिकांनी त्याच त्याच चरित्र नायक – नायिकांच्या प्रेमापोटी वा आदरापोटी चरित्रलेखन केलेले आहे. मात्र पुनःपुन्हा हे वाचताना नवखे असे अधिक जाणवत नाही कारण ऐतिहासिक पुराव्यानिशी असलेल्या लेखनात अधिक बदल करणे अयोग्य आहे. मात्र अपर्णा थत्ते, विजया जहागीरदार, विनया खडपेकर, प्रतिभा रानडे, सविता ओगीराल, शालिनी मोहोड, श्यामला पानसे, लीला पाटील, सुमती लेले, अंजली जोशी या लेखिकांची चरित्रगंगा उल्लेखनीय आहे.

या चरित्रलेखनाच्या गंगेत अनेक लहानमोठे प्रवाह निर्माण झालेले आहेत. वैज्ञानिक, सामाजिक, शैक्षणिक, कलावंत, ललित, ऐतिहासिक प्रवाहांबरोबर संक्षिप्त चरित्रे, साहित्यिकांची चरित्रे, थोर विभूतींची चरित्रे, कर्तुत्ववान व्यक्तींची चरित्रे हे नवखे प्रवाहही लेखिकांनी अतिशय चौकस विचारशैलीने मांडलेले आहेत.

अलीकडे सामाजिक संघटनेच्या कार्याचा आढावा घेण्याकरिता चरित्रलेखन झालेले आहे. उदाहरण इंदुमती भालेराव – *कॉ. स. ना. भालेराव* (२००९), आशा मोकाशी – *कॉ. सरला कारखानीस* (२०१०), कमल भागवत व शांता रानडे – *कॉ. भाई चितळे – कॉ. भाई टिळेकर* (२०१०), लीला आवटे – *एका समर्पिताची जीवनयात्रा* (२०१०), प्रतिभा जोशी – *कॉ. जी. एल. नि कॉ.* , तारा रेड्डी – *धगधगती आग नि रसरसता निखारा* (२०१०) ही चरित्रे संबंधिक व्यक्तीचा समाजाकडे आणि एकूणच जीवनाकडे बघण्याची दृष्टी अधोरेखित करत आहेत.

महाराष्ट्र राज्यनिर्मितीच्या सुवर्ण महोत्सवी सोहळ्यामध्ये ‘चरित्र ग्रंथमाला’ हा संच महत्त्वपूर्ण ठरला कारण या ग्रंथासाठी १९ लेखिकांनी योगदान दिले आहे.

१. अमला नेवाळकर – *समाजसुधारक जगन्नाथ शंकरशेठ.*

२. अरुणा दुभाषी – *समाजसुधारक दादोबा पांडुरंग तर्खडकर.*

३. पुष्पा लिमये – *सार्वजनिक काका जोशी.*

४. पुष्पा लिमये – *बहुभाषाकोविद महादेव मोरेश्वर कुंटे.*

५. अर्चना ढेकणे – *नाटककार अण्णासाहेब किर्लोस्कर.*

६. छाया बकाणे – '*निबंधमाला' कार विष्णूशास्त्री चिपळूणकर.*

७. मीरा कोसंबी – *पंडिता रमाबाई.*

८. तारा भवाळकर – *नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर.*

९. वासंती फडके – *सेनापती पांडुरंग महादेव बापट.*

१०. मीना वैशंपायन – *'ज्ञानकोशकार' श्रीधर व्यंकटेश केतकर.*

११. विमल भालेराव – *श्री. म. माटे.*

१२. राजेश्वरी देशपांडे – *आचार्य शंकर दत्तात्रय जावडेकर.*

१३. वासंती दामले – *कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे.*

१४. चैत्रा रेडकर – *साने गुरुजी.*

१५. अरुंधती खंडकर – *तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी*

१६. सुलभा ब्रह्मे – *अर्थतज्ज्ञ धनंजयराव गाडगीळ.*

१७. प्रतिभा रानडे – *विदुषी दुर्गाबाई भागवत.*

१८. सुचित्रा घोगरे – काटकर – *समाजभूषण बाबा आमटे.*

१९. कामत माधवी ग. रा. – *सेवाव्रती रमाबाई महादेव रानडे.*

....वरील चरित्रग्रंथांच्या मालिकेच्या अभ्यासातून अनेक लहान मोठे गुण जसे अधोरेखित होताना दिसतात त्याच प्रमाणे जेथे गुण आहेत तेथे अल्प प्रमाणात दोषही असतातच. लेखिकांच्या काही अंशी तटस्थवृत्तीचीही जाणीव होते. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, ऐतिहासिक मर्यादाही काही अंशी लेखनातून अधोरेखित होताना दिसते. मात्र तरीही या लेखिकांनी चरित्र वाङ्मय प्रकाराला त्यांच्या प्रगल्भ लेखनीद्वारे अत्यंत सरस अशी प्रतिष्ठा संपादन करून दिली आहे. २००१ ते २०१० च्या या दशकात चरित्रलेखनाची गती अत्यंत जोमदार आहे. वैचारिक दृष्टी, प्रगल्भता, आणि सुस्पष्टता चरित्रलेखनात अत्यंत प्रभावीपणे लेखिकांनी मांडल्याने चरित्रलेखनात त्यांची एक वेगळीच छाप पडली आहे.

## संदर्भ ग्रंथसूची

१. प्रा. अ. म. जोशी, 'चरित्र', चरित्र आत्मचरित्र तंत्र आणि इतिहास, प्रथमावृती : १९४२, द्वितीयावृत्ती : १९५६, प्रकाशन : नवभारत ग्रंथमाला, पृ. क्र. ६३

२. द. न. गोखले म्हणतात, 'शिक्षणतज्ज्ञ ताराबाई मोडक', चरित्र – चिंतन, प्रथमावृत्ती २६ जानेवारी २०००, प्रकाशन- मौज, पृ.क्र. ७६

# प्रकरण दुसरे: मराठी स्त्रीलिखितकथा आणि कादंबरीलेखन

**घटक अ: मराठी स्त्रीलिखितकथांचा अभ्यास**

अ)१८८० ते १९२० या कालखंडातील स्त्रियांचे कथालेखन

ब)१९२० ते १९५० या कालखंडातील स्त्रियांचे कथालेखन

क)१९५० ते २००० या कालखंडातील स्त्रीलिखित कथा

ड)२००० ते २०१० या कालखंडातील स्त्रीलिखित कथा

## अ)१८८० ते १९२० या कालखंडातील स्त्रियांचे कथालेखन

इ. स. १८८० पासून मराठी लघुकथेची सुरुवात हरिभाऊ आपटे यांच्यापासून झाल्याचा उल्लेख इतिहासात सापडतो. मात्र काही ठिकाणी इ. स. १८२७ साली कथात्म साहित्याची निर्मिती ख्रिस्ती मिशनऱ्यांनी केली असल्याचेही उल्लेख सापडतात.

स्त्रीलिखित कथा लेखन मात्र काहिशा उशीराने सुरु झाले. जीवनदर्शन, वास्तवादी, कलात्मकता अशा विविधांगी विषयातून स्त्रियांनी कथा लेखनाला सुरुवात केल्याचे दिसून येते. काही लेखिकांच्या कथा मात्र अगदीच सरसकट निवेदन धाटणीच्या आहेत. काही कथा केवळ बोधीवादी आहेत. प्रारंभीच्या काळात स्त्रियांवर अनेक बंधने असत. त्यामुळे त्यांच्या कल्पनाशक्तीला अधिक पैलू पडलेले दिसत नाहीत. मात्र जसजसे त्यांच्यासाठी अवकाश खुले झाले, तसतसे त्यांच्या लेखनीत विविधता आल्याचे लक्षात येते.

१८५० ते १८८० च्या काळात स्त्रियांनी लिहिलेले कथा साहित्य आज फारसे उपलब्ध नसले तरी कथा लेखनाला केलेला प्रारंभ हा एकूण स्त्री वर्गाच्या विचारशक्तीला चालना देणारा होता.

इ. स. १८८० ते १९२० या कथा लेखनाच्या टप्प्यात लक्ष्मीबाई अभ्यंकर (लक्ष्मी तनया – टोपण नाव) यांनी *सद्य:स्थिती* नावाचा कथासंग्रह लिहिला. " या कथासंग्रहाचे दुसरे नाव *'आजकालची संसारातील काही चित्रे'* असे होते. नावावरुन त्यात काय असेल याची पुसटशी कल्पना येते. "[१] मात्र तो पहिला कथासंग्रह प्रसिद्ध व्हायला १९१५ हे साल उजाडले. शतपत्रांचे कर्ते लोकहितवादी यांची नात असलेल्या या लक्ष्मीतनया यांच्या साहित्याची ही स्थिती तर मग इतर लेखिकांच्या लेखनीतून शब्दबध्द झालेली कथा अगदीच अल्प प्रमाणात समाजापुढे येत असल्याचे लक्षात येते.

स्त्रियांचे कथा लेखन निरनिराळ्या नियतकालिकांतून प्रकाशित होत होते. शांताबाई या

लेखिकेने लिहिलेली *बिचारी आनंदीबाई* ही उपलब्ध झालेल्या स्त्रियांच्या कथांपैकी पहिली कथा आहे. कथेच्या शीर्षकावरूनच त्याकाळची स्थितीगती लक्षात येते. 'मासिक मनोरंजना' च्या १८९६ च्या नोव्हेंबर – डिसेंबर जोड अंकात ही कथा प्रसिद्ध झाली होती.

जसजशी स्त्री साक्षरता आणि समाज परिवर्तनाची लाट आली तसतसे नियतकालिकांतून स्त्रियांच्या कथा मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध होऊ लागल्या. गिरिजाबाई केळकर, आनंदीबाई शिर्के, काशीबाई कानिटकर या समकालीन प्रसिद्ध लेखिका होत.

मनोरंजन मधून १९ कथा तर भगिनी समाचार मधून १८ कथा प्रसिद्ध झाल्या आहेत. त्याच प्रमाणे उद्यान – १६, मधुकर – ६, प्राचीप्रभा – ५, चित्रमयजगत – ५, लोकमित्र – ५, विविधज्ञान विस्तार – ४, नवयुग – ४, प्रभात – ४, चित्तविनोदमाला – २, मराठा – १ अशा स्वरुपात या कथांना प्रसिद्धी मिळाल्याचे लक्षात येते.

सामाजिक बंधने, राजकीय बंधने अथवा अन्य दडपणामुळे या काळात लेखिकांनी किंवा एकूणच अनेक साहित्यिकांनी आपले नाव गुपित ठेऊन टोपण नावे आपले साहित्य प्रसिद्ध केल्याची माहिती इतिहासात नमूद आहे.**** त्यानंतर तर काही लेखक – लेखिका केवळ हौस म्हणून टोपण नावाने लेखन करू लागले.

'यशोदाबाई भट' यांनी 'वामनसुता' नावाने कथा लिहिल्या आहेत. त्यांनी नियतकालिकांमधून सर्वाधिक कथा प्रसिद्ध केल्या आहेत. लक्ष्मीबाई कामत, राधाबाई गोखले, ताराबाई तर्खड, सुवासिनी अनुसया प्रधान यांनीही आपापल्या कथा नियतकालिकांमधून प्रसिद्ध केल्या आहेत. काशीबाई कानिटकर, आनंदीबाई शिर्के, गिरिजाबाई केळकर या आरंभीच्या अतिशय महत्त्वाच्या लेखिका होत्या. त्यांच्या बरोबरच लीला, उषा, लक्ष्मी, राधाबाई मोगरे, आनंदीबाई देशमुख, कमलाबाई बेहरे या कथा लेखिकाही आपापले विचार कथांमधून लिहित असत. या सर्व लेखिकांचे कथा लेखन नियतकालिकांमधून प्रसिद्ध झालेले आहे.

१९ वे शतक हे महाराष्ट्रात प्रबोधनाचे शतक जरी असले, सुधारणावादी विचारांचे वारे जरी महाराष्ट्रात वाहत असले तरी पारंपारिक रूढी परंपरांतून स्त्री मुक्त होत नव्हती. बंधनाची कायमस्वरूपी बेडी फक्त हलकीशी सैल झाली होती. मात्र कौटुंबिक मानहानी, अत्याचार लैंगिक शोषण, बालविवाह, विधवा केशवपण, जरठ – बालविवाह, सतीची चाल, अनैतिक नाते संबंध, कठोर व्रतवैकल्य यामुळे स्त्री वर्गाचे जीवन पूर्णपणे बरबटलेले होते. सामाजिक परिवर्तनाच्या झुळुकेप्रमाणे क्वचित प्रमाणात शैक्षणिक वारे वाहत असले तरी

अत्याचार थांबलेले नव्हते. परिणामी या संपूर्ण विश्वाचे चित्रण स्त्रियांनी आपापल्या कथा विश्वातून रेखाटलेले आहे.

याच काळात लोकहितवादी, आगरकर यांचे स्त्रीसुधारणावादी विचार समाजात पसरत होते. महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांचे विचार कृतीतून आकार घेत होते. हरी नारायण आपटे, गोविंद बल्लाळ देवल, बाबा पदमनजी या समाज प्रबोधनवादी लेखकांची लेखनी परिवर्तनास साद घालत असल्याचे स्पष्ट होते.

परिणामतः या काळातील स्त्री साहित्यिकांना त्यांच्या साहित्य निर्मितीसाठी दुजोरा मिळत होता. विवाह म्हणजे काय हे न कळलेल्या मुलीचा सासरी होणारा मानसिक, शारीरिक छळ, कुचंबणा, तसेच विधवांचे दुःख या विषयांखेरीज वेगळे विषय या कालखंडातील कथांमधून नजरेस येत नाही. कारण तत्कालीन परिस्थितीचा विचार पाहता या काळात मुळातच स्त्री स्वातंत्र्यापासून तिच्यावर लादलेल्या बंधनांना झुगारण्यासाठीचा लढा सुरु झाला होता.

*लग्नकहाणी* (लक्ष्मीबाई कार्लेकर, उद्यान, जुलै १९१५), *बालविवाहाचा अनुभव* (कमलाबाई किबे, विविधज्ञानविस्तार, जुलै १९१७), *लग्न की कौमार्य* (वामनसुता, मनोरंजन, जुलै १९०९), *बालावृद्ध विवाह* (कमलाबाई किबे, विविधज्ञानविस्तार, मार्च १९१५) या सर्व कथांमधून स्त्री जन्माच्या व्यथा मांडलेल्या आहेत. मनोरंजन, प्राचीप्रभा, भगिनी समाचार, उद्यान, मराठा, विविधज्ञानविस्तार या नियतकालिकांमार्फत अनेक स्त्रियांच्या कथांना प्रसिद्धी मिळाली आहे.

समाजातील क्रूरता जशी स्त्री लिखित कथांमधून व्यक्त होताना दिसते त्याचप्रमाणे वारंवार येणारे साथीचे रोग, त्याचा होणारा परिणामही कथेचा विषय बनल्याचे लक्षात येते. प्लेगचे विध्वंसक स्वरूप अनेक कथांमधून समोर येते.

पारतंत्र्यात असलेल्या भारतात समाज मत परिवर्तनाचे विचार मोठ्या प्रमाणात प्रसारित होत होते. *स्वराज्याची भाऊबीज* ('मधुकर' डिसेंबर १९१७) आणि *स्वैपाकिणींचे बंड* ('उद्यान' ऑक्टोबर १९१५) या कथांमधून यशोदाबाई भट यांनी विदेशी मालाचा धिक्कार करण्याचे सुचविले आहे. एकूणच तत्कालीन परिस्थितीचा आरसा म्हणजे साहित्य असे एक सूत्रच बनले आहे.

१९ व्या शतकातील स्त्रियांची त्या काळी शिक्षणाची फार ओळख झालेली नव्हती म्हणूनच आपल्या लेखनात दर्जेदारपणा असावा, कलात्मकता असावी एकूणच जुजबी असलेल्या त्यांच्या कथा विश्वात काही कथा लेखिकांचे अपवाद वगळता अनेक कथा

लेखिकांनी जे दिसत आहेत ते चित्रित केले आहे. त्यात वैचारिकता जास्त स्पष्ट होताना दिसत नाही. तर बंधनाच्या बेड्यांमध्ये ते भान त्यांना कमी प्रमाणात होते. मात्र या परिस्थितीतही स्त्रिया लिहायला लागल्या हे मात्र क्रांतिकारी पाऊल त्यांनी उचलले हे मोठ्या धिटाईचे काम वाटते.

तत्कालीन परिस्थितीचा आढावा घेताना लक्षात येते की, स्त्रियांना मूळतः आपला जन्म हा सासरच्या लोकांच्या सेवेसाठीच असतो असा पायंडा घातल्यामुळे क्षुल्लक गोष्टीतही त्या स्वतःला गौण समजत असत. त्यांना छोट्या छोट्या गोष्टींतूनही हे समजविण्याचे कार्य 'यमुनाबाई कुलकर्णी' यांनी नियतकालिकांच्या मार्फत प्रसिद्ध केलेल्या कथांमधून केल्याचे स्पष्ट होते. मिरवण्याची हौस, स्त्रियांनी घर स्वच्छ ठेवावे, मुलांना साखर जास्त देऊ नये.... या लहान लहान गोष्टींमधून स्त्री परिवर्तनाची ज्योत तेवत ठेवली गेली.

सावित्रीबाई कोरान्ने यांनीही १९११ मध्ये *लहानपणाची आठवण उर्फ अद्दल* या कथेतून आपले अनुभव मांडले आहेत. पत्रात्मक संवाद कथेची काही उदाहरणे दिसून येतात. *गमतीची अदलाबदल* (राधाबाई गोखले, प्रभात, जुलै १९१४), *बालावृद्ध विवाह* (कमलाबाई किबे, पूर्वोक्त) *एका मुलीचा दृढनिश्चय'* (चंद्रप्रभा भगिनी समाचार १९१७) इत्यादी कथा आढळतात. *अभागी यमुना* ही जानकीबाई मराठे यांचीही पत्रात्मक कथा आहे.

स्मृतिचित्रे लिखित नावनौलिक असलेल्या लक्ष्मीबाई टिळक यांनीही *दिव्य वल्लीचा प्रभाव* (उद्यान, फेब्रुवारी १९१०) ही कथा लिहिली. उद्यान मासिकामधून हिराबाई पेडणेकर यांनी *माझे आत्मचरित्र* ही कथा प्रसिद्ध केली. गणिका असलेल्या हिराबाईंनी अनेक प्रकारे लेखन केले आहे. या काळात अद्भुतरम्य, पौराणिक आणि ऐतिहासिक कथांचे लेखन कमी प्रमणात होत असे . काही कथा त्या काळात वास्तव भासतात. धर्मग्रंथाचे वर्चस्व असल्याने काही कथांचे वळण धर्मग्रंथांच्या बोधकथांप्रमाणेच आहे. *साळूबाईंच्या प्रवासातील गोष्ट* (ले. विनयवती, प्राचीप्रभा, १९१२) *ओठाबाहेर तेच पोटाबाहेर'* (ले. शांताबाई कामत, प्राचीप्रभा, १९१२).

एकूणच १९२० पर्यंतच्या कथांमध्ये उपेक्षित ठेवलेल्या स्त्रियांनी अक्षर ओळख होऊन आपापली व्यथा मांडण्याची एक धाडसी कृती केली आहे. समकालीन समाजाची वास्तववादी चित्रे त्यांनी कथांमधून रेखाटली आहेत. सुरुवातीला कथा अगदीच जे घडले ते किंवा सरसकट स्वरूपाची होती मात्र हळूहळू स्त्रियांनी त्यांच्या कथेला वैचारिकतेने, कल्पकतेने पैलू पाडून अधिकाधिक प्रगतीचे वलय संपादन केल्याचे लक्षात येते. मात्र १९२०

नंतरच्या कथेचा चेहरामोहरा खऱ्या अर्थाने बदलण्यास सुरुवात झाली.

## ब)१९२० ते १९५० या कालखंडातील स्त्रियांचे कथालेखन

१९२१ साली काशीबाई कानिटकरांचा *चांदण्यातील गप्पा* हा कथा संग्रह प्रसिद्ध झाला. याच निमित्ताने स्त्रीलिखित कथा संग्रह रूपाने प्रसिद्ध होण्याचे नवे पर्व सुरु झाले. काशीबाई कानिटकर बहुचर्चित लेखिका होत्या.

१९२० नंतर अनेक स्थित्यंतरे घडत गेली. परिणामी मराठी साहित्यावरही त्याचे बदलते परिणाम दिसून येऊ लागले. पहिल्या महायुद्धाचे परिणाम जगभर जाणवत होते. गांधींच्या विचारांनी संपूर्ण देश ढवळून निघाला होता. अनेकांच्या प्रभावी विचारांनी स्वतंत्रपणे जीवन व्यतीत करणाऱ्या अनेक कुमारिकांची संख्या वाढलेली . *डॉ. आनंदीबाई जोशी* यांचे चरित्र लेखन काशीबाईंनी केले,ते प्रसिद्ध केले. *रंगराव* या कादंबरीचे लेखनही त्यांनी केले. काशीबाईंची पहिली कथा १८७७ च्या विविधज्ञानविस्तार मध्ये प्रसिद्ध झाली होती. जुलै १८६७ साली विविधज्ञानविस्ताराची सुरुवात झाली. या अंकांचा विशेष म्हणजे हा अंक 'कुलस्त्रिया व गृहस्थ' यांकरिता प्रसिद्ध होत असे. मात्र या नियतकालिकांत स्त्रियांनी लिहिलेले लेखन प्रसिद्धीस येईपर्यंत बत्तीस वर्षे म्हणजे १८९९ पर्यंतची वाट पहावी लागली. यावरूनच स्त्रियांच्या शिक्षणास किती विरोध होता हे स्पष्ट होतो.

काशीबाईंच्या समकालीन आणि विपुल लेखन करणाऱ्या गिरिजाबाई केळकरही महत्त्वाच्या लेखिका होत्या. *समाजचित्रे भाग – १* (१९२३), *केवळ विश्रांतीसाठी* (१९२५), *समाजचित्रे भाग – २* (१९३८) असे त्यांचे तीन कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांनी त्यांच्या पहिल्या कथासंग्रहा लेखनामागची भूमिका जोडली आहे त्यावरून त्यांचे लेखन प्रभावी असल्याचे समजते.

गिरिजाबाईंच्या कथा ही त्याकाळातील एकूण परिस्थितीचा आढावा घेणारी होती. त्यांच्या कथेतून समकालीन स्त्रियांचे प्रश्न, त्यांच्या मनाची तालमेलच अधिक प्रमाणात आहे. बालविधवा, पुनर्विवाहाचा विचार आणि त्या पुढे जाऊनही 'पुस्तकी शीक नि व्यावहारिक शीक' असे सर्वांगी लेखनही त्यांनी केले आहे. मात्र त्यांच्या लेखनात परंपरा जपून ठेवल्या पाहिजे असा सूरही गवसतो. *पुरी हौस फिटली, प्रेमाची सोय की सोईचे प्रेम* यातून त्यांनी शिकलेल्या मुलींचे पुढचे आयुष्य रंगवले आहे. एकूणच या काळात स्त्रीचे अनुभवविश्व गिरिजाबाईंनी त्यांच्या मर्यादासकट रेखाटले आहे.

१९१० साली मनोरंजन मासिकातून आनंदीबाई शिर्के यांची पहिली कथा प्रसिद्ध झाली. १९६७ सालापर्यंत त्यांची लेखन परंपरा चालू राहिली. त्यांचा पहिला कथासंग्रह १९२८ ला प्रसिद्ध झाला. *कथाकुंज* १९२८, *कुंजविकास* १९३४, *जुईच्या कळया* १९३९, *भावनांचे खेळ* १९४३ इत्यादी कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. हरिभाऊ आपट्यांच्या प्रभावाचा कालखंड असल्याने आपसुकच हरिभाऊंच्या लेखनातील सामाजिक समस्यांचे जाळे आनंदीबाईंच्या लेखनातही जाणवते. *टी पार्टी* या कथेत जुन्या रुढींच्या बायकांनी पुनर्विचार करून एकूणच जीवनाचा खरा आनंद घेण्याचेही सुचवितात. उच्चभ्रू स्त्रिया अस्पृशांचा धिक्कार करतात, हे अयोग्य आहे असेही त्यांनी सुचविले आहे. अस्वच्छ ब्राह्मणाने केलेल्या चहापेक्षा स्वच्छ कपड्यांतील इतर जातीच्या माणसाने केलेला चहा अधिक चांगला, त्यामुळे सोवळे मोडत नाही, असे जाती न पाळण्याचे सल्ले ही त्या देतात. त्यांच्या कथेत पुराणकथेचा प्रभाव अधिक दिसतो. *मराठा मित्र* या नियतकालिकात १९१२ सालीत आनंदीबाईंची *बेगम दिलारा* ही कथा प्रसिद्ध झाली. त्यांच्या *कुंजविकास* या कथासंग्रहाला वा. म. जोशी यांनी साक्षेपी प्रस्तावना जोडली आहे. पुरुष व्यक्तिरेखांना समजून घेण्याची मोठी ताकद त्यांच्यामध्ये असल्याचे दिसून येते.

कमलाबाई टिळक यांनीही मराठी कथेमध्ये विपुल लेखन केले आहे. त्या मुख्याध्यापिका होत्या. स्त्रीजीवनाकडे नव्या जाणिवेने पाहत राहून गेलेल्या अनेक प्रश्नांना समाजात मांडण्याचे काम आपल्या रोखठोक लेखनातून, कथेतून त्यांनी चितारले आहे. आर्थिकदृष्ट्या त्या स्वावलंबी असल्याने स्वावलंबी असणे किती हितकारक असते ते स्त्री वर्गाला पटवून देण्याचा त्या प्रयत्न करतात. त्यांचे लेखन दडपून टाकणारे नव्हते तर अतिशय निर्भीडपणे केलेले होते. त्यांच्या कथालेखनात आधुनिकतेचे वळण आहे. *हृदयशारदा* (१९३२), *आकाशगंगा* (१९४४) हे कथासंग्रह १९५० पर्यंत प्रसिद्ध झाले आहेत. कमलाबाईंच्या कथेतील स्त्री – पुरुष पात्रांचा विचार करता अतिशय हळुवार आणि सूक्ष्म जाणीवांनी पात्रांची भूमिका त्यांनी सजविलेली आहे. पुरुषप्रधान व्यवस्थेचे पुरेसे चित्रण त्यांनी केले नसले तरी पुरुषप्रधान व्यवस्थेला अपेक्षित असलेली स्त्रीच्या आत्मसमर्पणाची गरज व त्या विरुद्ध बंद करणारे स्त्रीमन यांचे निर्भीड दर्शन आणि स्व ला विसरून पतीच्या प्रेमात पूर्ण आत्मसमर्पण करणे शक्य नसते, याची जाणीव त्यांच्या लेखनात दिसते. *अपघात, आकाशगंगा, नजर, हृदयशारदा, कोकणी वहाणा* या सारख्या नवकथेचे वळण असलेल्या कथा त्यांनी लिहिल्या. पुरुषीविळखा त्रासदायक आहे असे वर्णन जरी त्यांच्या कथेत नसले तरी नवयुगातील परिवर्तन कथेतून डोकावत आहे.

विभावरी शिरुरकर या काळातील अतिशय महत्त्वाच्या लेखिका आहेत. स्त्री कथाकारांमध्ये त्या त्यांची मते अतिशय निर्भीडपणे मांडताना दिसतात. त्यांच्या कथेतील नायिका शिक्षित असल्याने वैचारिक पातळीवर त्या बंडखोरपणा करतात . त्यांच्या *कळयांचे निश्वास* (१९३३) या कथासंग्रहातून समाजातील त्याकाळचे चित्र त्यांनी रेखाटले आहे. त्यांच्या नावे मोजकेच लेखन असून ते अतिशय महत्त्वाचे आहे. " भालचंद्र नेमाडे यांचे शब्द वापरुन लिहायचे तर ' चिंचोळया भाषिक अवकाशात ' व्यामिश्र अनुभव साठवण्याचा प्रयोग विभावरीबाईंनी '*कळयांचे नि:श्वास*' (१९३३) मधून केला. नव्याने शिक्षित झालेल्या स्त्रीच्या मनाची जडण-घडण आणि तिच्या मनाच्या तळघरात कोंडलेल्या दु:खाचा वेध विभावरीबाईंनी आपल्या कथांमधून घेतला आहे."[२] कथा, कादंबरी, दीर्घकथा, समाजशास्त्रीय लेखन या वाङ्मयप्रकारांमध्ये त्यांनी लेखन केलेले आहे. याकाळात मुली शिकून नोकरी करू लागल्या होत्या. क्वचित प्रेमविवाह होत होते. नोकरी करून मुली कुटुंब सांभाळत होत्या. त्यांच्या मनाची द्विधा अवस्था त्यांनी अतिशय समर्पकपणे आणि ठाम शब्दात मांडली आहे. म्हणूनच त्यांना मराठी कथा वैभवात महत्त्वाचे स्थान आहे.

समाजव्यवस्थेच्या ओझ्याखाली दबल्या गेलेल्या मुलींच्या मनातील क्रांतिकारी विचार, त्यांची स्वप्ने, व्यथा त्या काळात आपल्या लेखनातून एखाद्या स्त्रीने समाजापुढे मांडणे हे रुचकर नव्हते. म्हणूनच त्यांनी विभावरी शिरुरकर या नावाने लेखन केले (बाळूताई खरे). एका स्त्रीने एकूण स्त्रियांच्या मनातील आणि शारीरिक गरजांविषयी लिहिणे म्हणजे त्याकाळात निषिध्द समजले जात होते. त्याच काळात विभावरीबाईंचा *हिंदोळयावर* (१९३४) हा कथासंग्रह प्रसिध्द झाला आणि समाजात खळबळ उडली. परिणामी सर्वत्र त्यांच्यावर टिका झाली. टीकेचे प्रमाण मोठे असल्याने पुढे विभावरीबाईंचे *टीकाकार* हे पुस्तकच प्रसिद्ध झाले. मात्र कथा लेखन प्रवासात जो आमुलाग्र बदल झाला त्याला वगळून मराठी कथेला पुढे जाताच येत नाही. तसेच " विभावरी शिरुरकरांचा

*' दोघांचे विश्व '* हा कथासंग्रह १९५७ मध्ये प्रसिद्ध झाला. त्यातील आशय विश्व देखील असेच समृद्ध असल्याचे जाणवते. एकूणच विभावरीबाईंच्या कथालेखनाने साचेबंद आशयाच्या आवर्ततून मराठी कथेला सोडवण्याचा प्रयत्न केला." [३]

कुसुमावती देशपांडे यांनीही त्यांच्या लेखनात नाविण्य आणत वेगवेगळे प्रयोग करत वाङ्मयीन प्रवासात नवे मार्ग खुले केले आहेत. *दीपकळी* (१९३५), *दीपदान* (१९४६), *मोळी* (१९४६) हे कथासंग्रह त्यांचे अतिशय समर्पक भाष्य करणारे आहेत. त्या स्वतः प्राध्यापिका असल्याने नोकरी आणि कुटुंब सांभाळताना होणारी ससेहोलपट त्यांनी अनुभवली होती.

त्यांच्या कथेतून ते सहजपणे डोकावत आहे. जीवनमूल्यांची राखण करणे, त्याविषयी मानवी मनाला सदैव जागृत ठेवणे, मानवी सहृदयतेची जपणूक करणे, मानवी मनाला आकुंचित क्षुद्रवृत्ती बनू न देणे, अश्मप्राय होऊ न देणे, हे कलेचे मुख्य कार्य आहे ही जीवनाची परिभाषा त्यांच्या मनात होती. कुसुमावातींच्या लेखनात सहजता होती मात्र त्या सहज सोप्या भाषेतही ठाम आणि निर्भिडतेची एक धार त्यांनी कायम जपलेली दिसते. त्यांच्या कथेला पाल्हाळीकपणा नाही. जिथे उद्देश्य सफल होतो तिथे त्यांच्या कथेचा पूर्णविराम दिसतो. नाट्यात्म, कलात्म रूप त्यांच्या कथेला नसून केवळ वास्तववादी कथेची वाट त्यांनी धरलेली आहे. त्यांच्या या लेखनवृत्तीमुळे त्यांच्या कथेत क्रांतिकारक रूप सहज लाभलेले आहे म्हणून त्यांना 'बीजवृत्ती' लेखिका असेही म्हणतात.

१९३५ साली 'कथामालती' हा कथासंग्रह प्रसिद्ध करत मालतीबाई दांडेकर यांनी साहित्यात पर्दापण केले. या काळात त्यांचे सर्वाधिक कथासंग्रह (८) प्रसिद्ध झाले. तत्कालीन आयुष्यातील चढउतार हा त्यांच्या कथेचा मूळ गाभा दिसतो. इतर लेखिकांप्रमाणेच त्यांचे लेखन स्त्री मनाच्या तळाला स्पर्श करणारेच असले तरी कुठेतरी त्यांच्या कथेत अतृप्तता जाणवते. मालतीबाईंच्या लेखनावर खांडेकरांचा प्रभाव असल्याचे त्यांच्या कथा वाचताना लक्षात येते. खांडेकरी शैलीची छाप असल्याने किंवा कथेतील पात्रांचा वेध घेत त्या स्वान्त सुखाय असा शेवट करताना दिसतात. मात्र तरीही त्यांच्या कथेला विविध पैलू असल्याने आपसुकच लोकप्रियता मिळत गेली.

*मकरंद* (१९४२) हा कथासंग्रह प्रसिद्ध करत कमला फडके यांनी मराठी कथा वैभवाला अधिक रेखीव करण्याचा प्रयत्न केला आहे. १९५० पर्यंत त्यांचे आणखी सहा कथासंग्रह प्रसिद्धीस आले. ना. सी. फडक्यांच्या प्रभावाने त्यांच्या कथा रंजक असल्याचे स्पष्ट होते. फडक्यांप्रमाणेच निरगाठ, गुंतागुंत आणि उकल या रचना तंत्राचा त्यांनी उपयोग केलेला आहे.

'कृष्णाबाई' या टोपण नावाने लिहिणाऱ्या मुक्ताबाई दीक्षित यांचे दोन कथासंग्रह म्हणजे *मानसलहरी* (१९३३) व *अनिरुद्ध प्रवाह* (१९३७) या दोन्ही संग्रहातील कथातून स्त्रीच्या मनातील आंदोलने टिपण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. *मानसलहरी* तील कथांविषयी कृ. ना. फडके लिहितात, " प्रणयाशिवाय लघुकथा नाही अशा समजुतीने वाङ्मयात बाहुल-बाहुलीची लग्न लावीत सुटणारी लेखक मंडळी फार. त्यांच्या या एकांगीपणाचे कारण प्रणयाचे क्षणोक्षणी नवता पावणारे रमणीयत्व नसून मनाच्या क्षीणपणाबरोबर येणारी कमुकवृत्ती हेच असावे." [४] हे फडके यांचे निदान खरे होते. कृष्णाबाईंच्या कथांत प्रणयाचा

त्रिकोण नाही तर त्यात स्त्रीला जाणवणाऱ्या दु:खाचे, कोंडमाऱ्याचे चित्रण आहे. यांच्या कथेतही स्त्रीमनाचा उलगडा आणि इतर लोकांना मान देत त्यांना प्राधान्य देत आपल्या मनाला मुरड घालणाऱ्या स्त्रीमनाचा वेध घेतला आहे.

१९२० ते १९५० या कालखंडातील कथा लेखिकांचा विचार करता १९२० च्या कथांमध्ये केवळ स्त्रियांना होणारा जाच, कौटुंबिक वातावरणात तिची होणारी कुचंबणा अधिक प्रमाणात जाणवते. अनेक लेखिकांनी टोपणनावे स्वीकारून समाजमनाच्या तळावर आघात करण्याचे प्रयत्न केले आहेत. परिणामी स्त्री उंबरठ्या बाहेर पडून शिकू लागली. त्यातही अनेक नवे प्रश्न उद्भवत गेले, लेखिकांच्या लेखनीचे ते विषय बनत गेले. मात्र कालपरत्वे स्त्रिया शिकून नोकरी करू लागल्या. पुन्हा एकदा शिक्षित स्त्रीमनाचे नवे प्रश्न आकाराला येत गेले. सुशिक्षित मुलींच्या अपेक्षा वाढत गेल्या. नोकरी आणि कुटुंबाच्या जबाबदारीने त्या नव्याने समाजाच्या कात्रीत सापडत गेल्या. या सर्व लहान मोठ्या बदलांचे प्रतिबिंब कथा लेखिकांच्या कथांमधून सहज उमटू लागले.

१९३५ नंतर मात्र कथेचे स्वरूप स्त्रीमनाचे प्रश्न न उरता त्यावर केले जाणारे भाष्य ठरू लागले. अनेक बंडखोर लेखिकांनी क्रांतिकारी विचार मांडून समाजात परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न त्यांच्या कथांमधून केला.

बालविधवा, जरठ – कुमारी विवाह, विधवा पुनर्विवाह, कौटुंबिक जाच, समाजातील स्वरूप, बंधने, रूढी, परंपरा, त्रासदायक नातेसंबंध, पती – पत्नी संबंध, बंधनाची कात्रीत सापडलेले स्त्री मन, सामाजिक – राजकीय समस्यांचे भान एकूणच स्त्रीची हरघडी होणारी मनाची घालमेल, ससेहोलपट असे विषय हळूवारपणे बदलत गेले आणि कलात्मकता, रंजकता, अलंकारीकता कथांमाधून डोकावू लागली. म्हणजेच उंबरठ्याच्या आत होणारी स्त्री मनाची कुचंबणा, जेव्हा त्या उंबरठ्या बाहेर आल्या, शिकल्या, स्वतंत्र विचार करू लागल्या तेव्हाच कमी झाली. काही प्रमाणात नवे प्रश्न जरी निर्माण झाले तरी त्यांना स्व जाणीव झाल्याचे त्यांच्या कथेतून स्पष्ट होते. याच काळात अनेक लेखिका उदयाला आल्या. उदाहरणार्थ आनंदीबाई जयवंत, पिरोज आनंदकर, शान्ता शेळके, शशिकला आळंदकर, सुशीला शिंदे, इंदिराबाई पेंडसे (समाजातील दृश्ये १९३२), कमलाबाई बंबवाले (कमळाच्या पाकळया १९३७), यमुना केळकर, कुमुदिनी प्रभावळकर, राधाबाई मुळीक, रजनी गुहागर, लीला देशमुख, वरुबाई शेवडे, वसुमती धारकर, शांता नाशिककर, स्नेहलता वैद्य या सर्व समकालीन लेखिकांनी मनाला रुचेल तो विषय, ती परिस्थिती लक्षात घेऊन

कधी स्त्री प्रश्नांचा विचार केला आहे तर कधी रंजकता, कलात्मकतेचा हात धरून कथा वैभवात आपापला खारीचा वाटा उचलला आहे. या पुढील काळात मात्र अधिक प्रगल्भ विचार आणि सामाजिकतेचे भान असलेले लेखन काळाच्या ओघात स्त्रीकडून चित्रित झाले आहे.

## क)१९५० ते २००० या कालखंडातील स्त्रीलिखित कथा

१९५० नंतरच्या कथा लेखनाचा विचार करताना स्वातंत्र्यपूर्वी कथा वैभवाचा आढावा अधिक महत्त्वाचा वाटतो. कारण त्याकाळात समाज आणि कौटुंबिक कात्रीत सापडलेली स्त्री नव्याने आकार घेत स्वतःला पडताळून पहात होती. तिच्या या अलौकिक क्रांतिकारी पाऊलांमुळे १९५० नंतरच्या कथा लेखिकांचे लेखन अतिशय सुबक आणि रेखीव झाले आहे यात शंका नाही.

एकंदरीत कौटुंबिक प्रश्नांभोवती फिरत राहिलेली कथा कालांतराने बोध प्रवृत्तीकडे गेली, समाज प्रश्न आणि एकूणच पुरुषप्रधानतेला उन्मळून टाकणारी परिस्थिती कथांमधून पहावयास मिळते. मात्र या काळात विनोदी कथा लेखिकांची संख्या अतिशय नगण्य आहे. अद्‌भुतरम्यतावाद किंवा रहस्य कथा या काळात फारशा जन्माला आल्या नाहीत.

१९५० सालानंतर मात्र स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कथेत कमालीचे बदल होत गेले. १९४५ नंतर मार्क्सवाद, फ्रॉईडचे मनोविश्लेषण, गांधीवाद, विभक्त कुटुंबपद्धत यामुळे कथांचे विश्व अधिक रुंदावत गेले. १९५० नंतर वाढती लोकसंख्या, बेकारी, शहरीकरण, यंत्रयुग या समस्यांनी रौद्ररूप धारण केले. या काळात मनोरंजनासाठी आकाशवाणी उदयाला आली होती. विविधांगी परिस्थितीमुळे वाचकांचा आणि लेखकांचा एक नवा वर्ग उदयाला आला. कुटुंबव्यवस्था, माजघर आणि पारंपरिक बेड्यात अडकलेली स्त्री नवनव्या मार्गाने लेखन करू लागली. मात्र तिच्या अनुभवकेन्द्री कथांमध्ये रडका सूर सातत्याने आल्याने टिकाही झाली. त्यानंतर नवकथेत पर्दापण करून स्त्री लेखिकांनी महत्त्वाची भूमिका बजावलेली दिसते. अनेक चिंतनाचे विषय, अनुभव कथेचा विषय ठरू लागले. याच काळात कुसुमावती देशपांडे यांनीही सुटसुटीत लेखन केले. १९६० साली नीरा करंडे यांनी *मला असं वाटतं* हे पुस्तक प्रकाशित केले. कथा आणि ललित गद्य यांचा परस्पर संबंध त्यांनी यातून दर्शविला आहे. वसुधा आपटे *(चारूचित्र)*, सुमा करंदीकर *(सावली १९७०)*, शशिकला जाधव *(अनर्थाची फुले १९८१)* , *(सुकलेले अश्रु १९८३, आनंदी १९८५)*, अरुणा ढेरे *(भगव्या वाटा)*, पद्मजा फाटक, दीपा गोवारीकर, प्रिया तेंडुलकर या सर्व लेखिकांनी आपापल्या कथालेखनातून,

ठराविक अनुभव विश्वापलीकडे झेप घेत मनमोकळया शैलीत लेखन केले आहे. १९५० पूर्वीच्या कथांमधील सासुरवास, छळ, प्रेमप्रकरण, त्याग, सूड यांसारखे विषय जरी १९५० नंतरच्या कथांमध्ये पुन्हा आले तरी ती वास्तवता आहे हे नाकारता येत नाही. पुन्हा तोच रडका सूर जरी वाटला तरी समाजमनात बदल न झाल्याचेही कथांमधून स्पष्ट होते. या काळात अनेक लेखिकांनी लेखन केले. हे लेखनवेगवेगळया पद्धतीचे जरी असले तरी त्यांचा एकूण मूळ गाभा हा स्त्री प्रश्नाचा आहे यात शंका नाही. गिरीजा कीर, शैलजा राजे, सुमन भडभडे, योगिनी जोगळेकर, शकुंतला गोगटे, मालतीबाई दांडेकर, मालती निमखेडकर या लेखिकांचे लेखन वळण एकूणच नसले तरी खांडेकरी प्रभावाने भारले असल्याचे लक्षात येते. तर कमला फडके, नयना आचार्य, कुमुदिनी रांगणेकर या सारख्या लेखिकांचे लेखन वळण फडक्यांच्या शैलीचे भासते. ही विधाने काही अंशी खरी असली तरी तत्कालीन परिस्थितीची प्रतिबिंबे त्यांच्या कथांमधून अवतरलेली आहेत.

कमला फडके यांनी रंजनवादाच्या अनुषंगाने कथालेखन केले. मनोरंजनासाठी अनेक कथा त्यांनी लिहिल्या आहेत. *मकरंद* (१९४२), *एक होता राजा* (१९४४), *तेरी चूप मेरी चूप* (१९४६), *गुलमोहोर* (१९४८), तीन उणे दोन = शून्य (१९५८) *मातीचा हत्ती* (१९६१), *दरवळ* (१९६२) असे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत.

१९५० नंतरच्या काळात कथाकार आणि कादंबरीकार म्हणून योगिनी जोगळेकर यांचे नाव घ्यावे लागेल. मराठी साहित्य प्रांतात त्यांनी विपुल लेखन (३५ कथासंग्रह, ५० कादंबऱ्या) केले आहे. *झुंजूमुंजू* (१९५४), *प्राची* (१९५९), *उर्मी* (१९६४), *उपहार* (१९९४), *जळण* (१९९५) हे त्यांचे प्रसिद्ध कथासंग्रह आहेत. त्यांच्या कथेतील पात्रे आधुनिक मात्र भडकपणा नसलेली आहेत. स्वावलंबी असून त्यांच्या मर्यादाही वास्तवाशी सामना करणाऱ्या आहेत. कुटुंबव्यवस्था आणि एकूण सामाजिक भान कथेत त्यांनी जपलेले आहे.

१९५२ पासून लेखनाकडे वळलेल्या सुमती क्षेत्रमाडे व्यवसायाने डॉक्टर होत्या. काळाच्या ओघात कुटुंबसंस्था धोक्यात असल्याचे त्यांच्या कथांमधून जाणवते. त्यांच्या कथा स्वप्नाळूही आहेत आणि वास्तवाला स्पर्श करणारीही आहे. स्त्री स्वातंत्र्य, हक्क, मैत्री पलीकडे जाऊन, समाजमनाला धक्का देत तत्कालीन परिस्थितीत कुमारीमातांचे प्रश्न त्यांनी मांडले आहेत. *प्रतिपदा (१९५२), प्रीतीस्वप्न (१९५४), तू माझाच आहेस (१९५९), विजेची कोर (१९५८), सेल (१९७४), व्याधाची चांदणी (१९७४)* हे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत.

सर्वाधिक संग्रह असणाऱ्या वाचकप्रिय कथा लेखिका अशी कथाक्षेत्रातील ओळख

असणाऱ्या स्नेहलता दसनूरकर या कालखंडातील महत्त्वाच्या लेखिका आहेत. *स्वर्ग तुच्छ भासतो* (१९५९), *अंधाराची व्यथा* (१९६०), *स्वप्न, शपथ, परतफेड* (१९९८), *धडा (२०००)* असा त्यांच्या कथासंग्रहांचा प्रवास आहे. त्यांच्या कथांची रचनाही काही अंशी स्वान्त सुखाय वाटते. त्यामुळे लेखनाचा बाज ना. सी. फडक्यांकडे झुकणारा आहे. *प्रिय सखे, रात्रीच्या बाहुपाशात, अर्धीच रंगली प्रीत प्रिया, चाळीशीतल्या मधुचंद्र, अजून यौवनात मी* यासारख्या कथांमधून त्यांची सूक्ष्म अवलोकन शक्ती प्रत्ययाला येते. आकर्षक निवेदनपद्धतीमुळे त्यांच्या कथा लोकप्रिय झाल्या आहेत. मध्यमवर्गीय स्तरातील जास्तीत जास्त कथा गुंतागुंत आणि मग आनंद अशा स्वरूपाच्या आहेत.

घटनाप्रधान रंजनवादी कथेचा बाज असणाऱ्या सुशीला चिकटे यांनी अनेक कथा संग्रह प्रसिद्ध केले. त्यांच्या कथा काही प्रमाणात पौराणिक प्रसंगावरही आधारित आहेत. सदाचरण, त्याग, पावित्र्य, तेजस्विता हे गुण त्यांच्या कथा नायिकांच्या अंगी असत. *पर्दापण (१९५५), परिचिता (१९५७), प्रवाहिनी (१९५९), प्रफुल्ल (१९६०), प्रमोदिनी (१९६२)* असे त्यांचे कथासंग्रह आहेत.

१९७० च्या कालखंडात गिरीजा कीर यांनी कथालेखनाचा प्रवास सुरु केला. *गिरिजाघर (१९७४), गिरकी (१९७७), गिरीबन (१९७८), चांदण्यांचं झाड (१९७८), कथाकथन (१९८५), थोडी मौज थोडी मजा (१९९०), गिरीजा कथा (१९९१)* हे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. मध्यमवर्गीय स्त्रियांचे चित्रण त्यांनी कथांमधून केले आहे. त्यांच्या कथेची भाषा साने गुरुजींच्या भाषेसारखी साधी ,सरळ आहे. त्यांच्या कथेत भडकपणा नसला तरी वेगवेगळया वयातील स्त्रियांच्या विश्वाचा त्यांनी वेध घेतला आहे. वेश्या, कुमारी माता, विवाहबाह्य प्रेमिका त्यांनी कथेत रेखाटल्या आहेत. मात्र त्यांचे लेखन कुठेही अश्लिलतेकडे झुकत नाही.

१९७० च्या दशकातील लोकप्रिय ठरलेल्या शैलजा राजे यांनी विपुल स्वरूपात कथालेखन केले. इतर लेखिकांप्रमाणे छळ, घटस्फोट, प्रेमप्रकरण हे विषय ओघाने त्यांच्या कथेमध्येही येतात. *स्वरांची लय (१९७३), रातगंधिनी (१९७७), सुवर्णटाक* हे त्यांचे कथा संग्रह प्रसिद्ध आहेत.

या कालखंडात शकुंतला गोगटे यांनी अनेका कथा लिहिल्या. ना. सी. फडक्यांच्या कथेचा प्रभाव त्यांच्या कथांवर दिसून येतो. सुमारे २५ कादंबऱ्या आणि सुमारे २५ कथासंग्रहांच्या त्यांनी लिहिल्या. *झपूर्झा (१९७५), सावलीचा चटका (१९७६), नजरबंदी, मर्यादा (१९७६), गोल्डफ्लेक (१९७६), बुमरँग (२०००), माता न तू वैरिणी (२०००)* हे त्यांचे

संग्रह आहेत. प्रेमकथा, स्त्री पुरुष प्रेम संबंध, शारीरिक आकर्षण, झपाटलेपण, विरह कलह अशा पद्धतीचा त्यांच्या कथेचा बाज आहे. याच काळात प्रेमविवाह अधिकाधिक प्रमाणात वाढत असल्याने अनेक कथालेखिकांच्या कथेचा विषय प्रेमविवाह, प्रेमविरह अशा प्रकारचा अधिक प्रमाणात आढळतो. प्रेमाच्या विविध छटा आणि त्यासोबत निर्माण होणारे तरंग कथांमध्ये मोठ्या प्रमाणात आले तरी कुटुंब हा त्या कथांचा गाभा असल्याचे लक्षात येते.

घटनाप्रधान, मनोविश्लेषणात्मक कथालेखिका म्हणून वसुंधरा पटवर्धन यांचे नाव प्रामुख्याने पुढे येते. १९५१ पासून त्यांनी *संसारशोध (१९५४), चेहरा (१९५८), अक्षता, भोवरा (१९९१)* असे अनेक संग्रह लिहिले. इतर कथांप्रमाणे यांच्या लेखनातही स्त्रीभूमिका महत्त्वाची आहे. त्याच्या अनेक कथांचा मथितार्थ भावी काळातील स्त्रियांनी स्वबळावर जगावे.

वसुंधरा पटवर्धन यांच्यानंतर अनेक महत्त्वपूर्ण लेखिका लिहित्या झाल्या. परंतु यांच्या आधी काही कवयित्रीही कथा लेखन करीत होत्या. १९४० नंतर इंदिरा संत आणि शांता शेळके यांनी कथालेखन केले. साधे व सरळ  सोपे विषय हा त्यांच्या कथालेखनाचा विशेष होय.  इंदिरा संतानी *श्यामली (१९५२), कदली (१९५५), चैतू (१९५७)* अशा कथासंग्रहातून लेखन केले. तर घटनाप्रधान बाज असलेले कथा लेखन शांता शेळके यांनी केले. *मुक्त आणि इतर कथा (१९४४), गुलमोहोर (१९४९), प्रेमिक (१९५६), काचकमळ (१९६९), स्पर्श आणि स्पर्श (२०००), वेडे वारे (२०००)* असे शांता शेळके यांनी सुमारे २० कथासंग्रह लिहिले.

१९५५ नंतर शिरीष पै यांचे लेखन अधिक लोकप्रिय होत गेले. त्यांची कथाही स्त्रीकेंद्री आहे. परंतु स्त्रीकेंद्री असली तरी नातेसंबंधातील अनेक खाचखळगे त्यांनी सहजपणे चित्रित केले आहेत. प्रत्येक नात्यांचे हळूवार प्रेमबंध उलगडण्यात त्यांनी यशस्वी मांडणी केली आहे. "शिरीष पै यांना लेखनाचा वारसा मिळाला तो आचार्य अत्र्यांच्या विराट व्यक्तित्वाचा आणि त्यांच्या अफाट वाङ्मयाचा. त्या म्हणतात की, आपण कथा लिहायला सुरुवात केली ती फार लहानपणी. चैत्रपालवी, सुखस्वप्न, मयूरपंख, हापूसचे आंबे, मंगळसूत्र, खडकचाफा, कांचनबहार, हृदयरंग इ. त्यांच्या कथासंग्रहांतील कथा म्हणजे स्त्रीच्या दु:खाचा शोध ! त्या म्हणतात त्याप्रमाणे त्या कथांच्या माध्यमातून स्वत:च्या भावनिक प्रश्नांना सामोरे जात होत्या. त्या लिहितात, आपले समग्र जीवन ही एक आत्मसंशोधनाची दीर्घ साधना आहे.  हा अतिशय महान विचार आहे. कोणताही लेखक लिहितो ते स्वत: च्या अनुभवाचे आकार

शोधण्यासाठी! पण हे आकार त्याला गवसतात क? स्वत: च्या अनेक वेदनांना लिखाणातून मुक्ती मिळाली असे शिरीष पै म्हणतात. पण त्यांची कथा बहुतांशी विशिष्टतेच्या कोशातच राहते. कधीकधी एखादी कथा त्या लिहितात की, ती विशिष्टतेचा कोश फोडून सर्वस्पर्शी होते. कथा कृतार्थ होते ती अशी सर्वस्पर्शी होते तेव्हं! "[५] त्या अशी लिहितात की, *सुखस्वप्न (१९५७), मयुरपंख (१९५९), हापूसचे आंबे (१९५९), कांचनबहार (१९६४), कमलपत्र (१९९८), रानपाखरे* असे त्यांचे अनेक कथा संग्रह प्रसिद्ध आहेत.

१९६५ पासून मराठी कथा व कादंबऱ्यांचे लेखन करणाऱ्या लीला श्रीवास्तव याही महत्त्वाच्या लेखिका आहेत. त्यांचे वेगळेपण म्हणजे मध्यप्रदेशामध्ये राहून १९६५ साली त्यांनी लेखन सुरु केले. हिंदी बोलणाऱ्या प्रदेशात त्यांनी मराठीचे रोपटे अगदी सहजपणे मोठे केले आहे. *जखमा (१९६६), फाशी गेलेली उन्हं (१९७१), माझ्या अंगणातल्या कॅक्टस (१९७३), एक लेखणी सुळावर (१९७५), वैशाखात वाळूवर (१९७८), एक थडगं इम्पालात (१९८०)* असे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत.

सुधा नरवणे यांचे *दोलाचाल (१९७३), सरणं गच्छामि (१९७८), इंद्रधनू (१९८५), कातरवेळी (१९९६), मनस्विनी (१९९७), लामणदिवा (१९९८)* असे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. " सुधा नरवणे यांच्या काही कथा बोलक्या रेखाचित्रासारख्या आहेत. तसे त्या अनेक मासिकांत मागणी तसा पुरवठा या न्यायाने लिहित नाहीत. एखादा अनुभव उत्कट वाटला, त्यातली अर्थपूर्णता जाणवली की त्याला कथेचे रुप देतात. *मरालिका* (*१९६४*)*,दोलाचल (१९७३) यांमधील त्यांच्या कथा पंधरावीस* वर्षातल्या. *'ख्रिस्तजन्म'* ही कथा म्हणजे सुंदर शिल्प आहे. अतिशय संयमाने या कथेचे लेखन केले आहे." [६] कथा लेखनातून नात्यांचे अनेक कंगोरे आणि नात्यांचे बदलते स्वरूप चित्रित केले आहे.

१९६६ मध्ये कथा लेखनाचा प्रवास सुरु केलेल्या सरिता पदकी यांचा *बारा रामाचा देऊळ* हा कथासंग्रह वाचनीय असा आहे. *घुसमट* (१९८०) हा त्यांचाच अजून एक कथासंग्रह आहे. स्त्रियांच्या दुःखाच्या छटा आणि कालांतराने त्यांच्याही नकळत स्त्रियांचा जन्म दुःख भोगण्यासाठीच असल्याचा समज करून घेणारी कथालेखन पद्धत त्यांनी रुजवलेली दिसते. मोजकेच पण महत्त्वपूर्ण लेखन करणाऱ्या तारा वनारसेही भावनाप्रधान कथा लिहित असत. १९६३ मध्ये *पश्चिमकडा* हा त्यांचा कथासंग्रह प्रसिध्द झाला. मासिकांतून त्यांच्या अनेक कथा प्रसिद्ध आहेत.

जोत्स्ना देवधर यांच्या कथेचा बाज मात्र शहरी, ग्रामीण, आदिवासी, शेतकरी, देवदासी,

वेश्या अशा अनेक स्तरातील स्त्रियांना केंद्र ठेवून येतो. घरंदाज, सोज्वळ, स्त्री प्रतिमा अनेक कथांमध्ये आहेत. उमलत्या कळी पासून वृद्ध स्त्री पर्यंत त्यांच्या कथांचा विस्तार फुलला आहे. *गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या (१९६९), गजगे (१९७०), काळजी (१९९६), पांघरूण (२००१)* असे १९६५ पासून सुमारे २१ कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. आकाशवाणीत त्यांचे काम असल्याने त्याचा प्रभाव त्यांच्या कथांमध्ये दिसून येतो. समाजकारण, सामाजिक समस्या हे विषय नंतर त्यांच्या लेखनात मोठ्या प्रमाणात येऊ लागले. त्यांच्या कथेतील वाक्ये लहान असली तरी मात्र त्यांचा बोध होताना खोल मनावर परिणाम करणारी लेखनशैली त्यांच्याकडे दिसते.

लैंगिकता, स्त्रीशरीर, स्त्रियांमधील होणारे बदल आणि एकूणच स्त्री पुरुष नात्यांचा बारकावा अगदी निर्भीडपणे मांडणाऱ्या लेखिका म्हणजे विजया राजाध्यक्ष होय. *अधांतर (१९६५), टिंबे (१९६५), विदेही (१९७२), अनोळखी (१९७३), अकल्पित (१९७६), पारंब्या (१९७६), उघडमीट (१९७८), कमान (१९७८), लँडिंग (१९७८), हुंकार (१९८४), अखेरचे पर्व (१९८८), अनामिका (१९९०), समांतर (२०००)* असे अत्यंत महत्त्वपूर्ण कथासंग्रह त्यांनी लिहिले आहेत.

पद्मिनी बिनिवाले यांनी १९८० साली *रानातला दिवा* हा कथासंग्रह प्रसिद्ध केला. त्यांची भाषाशैली सोपी असल्यामुळे असल्यामुळे अनेकदा कथेतील पात्रे जवळची वाटू लागतात. त्यांचे लेखनही स्त्री आत्मकेंद्री आणि एकूणच स्त्री मनाची उकल करणारे आहे.

पद्मजा फाटक यांचे *राही (१९७८), दिवे लागणी (१९८८),* रोहिणी कुलकर्णी यांचे *गर्भफूल* (१९८१), *बहार* (१९८६)सुनिता आफळे यांचे *कुंपणापलिकडच्या बकुळी, बाभळी (१९७२), अनाथ (१९८१), बाहुल्या (१९८५)* असे अनेक संग्रह या काळात प्रसिध्द झाले. पद्मजा फाटक आणि रोहिणी कुलकर्णी यांच्या कथांमध्येही स्त्री केंद्रीभागी आहेच. काही कथांमध्ये फाटक विनोदी शैलीचा वापर करताना दिसतात तर काही ठिकाणी नव्याने शब्द योजना केलेली दिसते. रोहिणी कुलकर्णी यांनी स्त्रीशरीरनिष्ठेचा मंत्र कथांमधून दिसल्याचे समजते. सुनिता आफळे यांच्या अनेक कथांचा गुजराती, कानडी, तेलगु, हिंदी, इंग्रजी भाषेत अनुवाद झाला आहे. आफळयांच्या कथेला वैज्ञानिक दुजोरा मिळाल्याचेही *नर* कथेत स्पष्ट होते.

मारवा (१९८४), अत्तर (१९८६), पूजा (१९८९), ऋतूवेगळे (१९९९), निसटलेले (१९९९) हे कथासंग्रह आशा बगे यांनी लिहिले आहेत. “आशा बगे या सत्तरच्या दशकात कथालेखिका म्हणून उदयाला आल्या. *‘ सत्यकथा ’* मासिकतून प्रकाशित झालेल्या त्यांच्या

कथांनी त्याकाळी रसिकांचे लक्ष वेधून घेतले व वेगळया बाजाची कथा लिहिणाऱ्या लेखिका या नात्याने त्या प्रतिष्ठित झाल्या."७ पुराणकाळातील कर्मकांड, व्रतवैकल्ये, सण, उत्सव, कीर्तन यासारख्या विषयांना नव्याने स्पर्श करून कथेचा बाज निर्माण करणाऱ्या महत्त्वपूर्ण लेखिका म्हणून बगे यांना ओळखले जाते. त्यांच्या कथेमधील नायिका त्रास सहन करणाऱ्या आहेत. नीतिनियमांचे पालन करणाऱ्या आहेत. मात्र आपले अस्तित्व जपण्यासाठी कुठेही त्या बंडखोरीपणा करताना दिसत नाही. स्त्री मुक्तीचा स्वर त्यांनी कथेतून वगळल्याचे लक्षात येते.

वसुधा पाटील यांचे *पुरुष (१९९४), वेगळी (१९७७), वड (१९७९), बासरी (१९८१), बसंती (१९८२), परांगदा (१९७८), वंशाचा दिवा (१९८६), अश्रद्ध (१९८८), नामर्द (२०००), जमुना के तीर (१९८६)* हे कथासंग्रह प्रसिध्द आहेत.

अजिता काळे यांच्या *दूरदेशीच्या गोष्टी (१९८६*) या कथासंग्रहात अमेरिकेतील मुलींच्या एकूण जीवनावर भाष्य करणाऱ्या कथा समाविष्ट आहेत. तर वसुधा पाटील यांच्या कथांमध्ये नवरा मराठी अशी अपेक्षा धरणारी नायिका आहे. तर स्त्रीच्या अंतरंगातील हालचाली टप्प्या टप्प्याने मांडणारी कथा अनेकार्थी रूढ झालेली दिसते.

दीपा गोवारीकर यांचे *तडा (१९७७), दिवस सोनियाचे (१९८३), प्रसादाचा दिवस (१९८७)* हे कथासंग्रह या काळात प्रसिध्द झाले. दीपा गोवारीकर यांच्या कथेत दुरावा, परकेपणा आणि प्रेम, सोबत अशी विविधांगी रूपे दिसतात. सुधा सोमण यांच्या *समांतर* या संग्रहात नोकरी करणाऱ्या नायिका आहेत. आशा कर्दळे, उषा दातार, निर्मला देशपांडे, नीलम गोऱ्हे, स्नेहसुधा कुलकर्णी, प्रतिभा रानडे, मालती आगटे, जयश्री थत्तेभट, विद्या सप्रे – चौधरी, विणादेव, उज्वला पिंपळखरे, रेखा बैजल, मधू सावंत, छाया महाजन, भावना गोखले – बेडेकर, अंजली ठकार, श्रद्धा पराते, अश्विनी धोंगडे, निलांबरी कुलकर्णी, माधवी देसाई, विनया खडपेकर, मंदाकिनी भारद्वाज, कुसुम बेदरकर, सिसिलिया कार्व्हालो, माधुरी शानभाग, अनुराधा वैद्य इत्यादी कथा लेखिकांच्या लेखनाच्या मुळाशी स्त्रिया आणि त्यांचे जगणे आहे. स्त्री आणि स्त्रियांच्या आसपासच्या एकूण वर्तुळातील किंवा परिघाबाहेरील प्रश्न विविध पद्धतीने आणि प्रांजळपणे कधी बंडखोरपणे मांडलेले दिसतात. एकूण स्त्रियांचा जाच, तडफड, दडपण ते स्त्रियांनीच स्त्रियांचा केलेला छळ ते स्त्रियांनीच इतर पुरुषवर्गाचा केलेला छळ अतिशय सहजपणे मांडलेले आहे.

विवाहिता, अविवाहित, बलात्कारिता, विधवा, वेश्या, उच्चवर्गीय महिलांचे प्रश्न, शहरी, ग्रामीण, दलित या सर्व विषयांवर लेखन करताना सामाजिक, राजकीय, दहशतवादी आणि

नक्षलवादी स्त्री चित्रण टप्प्या टप्प्याने अनेक लेखिकांनी रेखाटली आहेत. १९व्या शतकातील स्त्री काळाबरोबर कशी नवी रूपे घेत गेली हा अस्तित्वावादी आणि पर्यायाने वास्तववादी प्रश्न अनेक लेखिकांनी आपल्या लेखनीचा विषय बनविला आहे. स्त्री बदलत आहे आणि ते समाजाच्या किती पचनी पडते हे लेखिकांनी कथेतून मांडलेले आहे.

मध्यमवर्गीयांचे प्रश्न, दारुड्या नवऱ्याचा त्रास, नोकरी करणाऱ्या महिलांच्या समस्या, कुटुंबातील नवनवे ताणतणाव या सगळया गोष्टींतून स्त्रीला होणारा जाच आणि एकूण तिची संपूर्ण जबाबदारी पूर्ण करताना होणारी ससेहोलपट समाजापुढे लेखिकांनी मांडली आहे.

पौराणिक स्त्रियांच्या, संत कवयित्रीच्या जीवन संघर्षाचे चित्रण अरुणा ढेरे यांनी केले आहे. त्यांच्या लेखनीने अध्यात्माची चौकट मोडण्याचे काम केलेले दिसते. सर्व बंधने झुगारून प्रेम करण्याची स्त्रीची अमर्याद ताकद, त्यातून प्रत्ययास येणारा स्त्रीशक्तीचा जागर त्यांनी कथेत टिपला आहे. *अज्ञात झऱ्यावर रात्री (१९९५), कृष्णकिनारा (१९९२), भगव्या वाटा (१९९४), उंच वाढलेल्या गवताखाली (२०००), मन केले ग्वाही (२००१)* हे कथासंग्रह त्यांचे आहेत.

स्त्री व्यक्तीरेखा रेखीव करून त्यांचे आत्मसमर्पण त्यांनी सहज सोप्या भाषेत केले आहे. संत कवयित्रींची घालमेल अत्यंत प्रांजळपणे त्यांनी टिपलेली आहे.

साठोत्तरी काळात मनोविश्लेषणवादी किंवा कुटुंबव्यवस्था कथेचा मूळ प्रवाह वाटतो. मात्र कालांतराने विनोदी कथा, ग्रामीण कथा, अस्तित्ववादी कथा, दलित कथा यांचे वर्गीकरण काळानुरूप होत गेले.

ग्रामीण कथेचा विचार करता सरोजिनी बाबर यांच्या कथा समोर येतात. ग्रामीण स्त्रीचे अनेक कंगोरे त्यांनी शब्दबद्ध केले आहेत. उदाहरणार्थ *नव्याची पुनव (१९५४), काचेची पेन्सिल (१९५६), चिंचेची पत्रावळ (१९५६), डोंगरची मैना, काळी मखमल (१९६९), मुक्तांगण* . ग्रामीण परिसर, सणवार, श्रद्धा, कुळाचार आणि त्यांचे दैनंदिन जीवनातील लहान – मोठे प्रश्न त्यांच्या कथेचा बाज आहे.

अस्तित्ववादी कथांचा विचार करताना कमल देसाई यांच्या *रंग (१९६२), काळा सूर्य, हॅट घालणारी बाई, रंग – २* या कथासंग्रहांचा विचार करता येतो. त्यांच्या नायिका प्रौढ, अविवाहित, नोकरी करणाऱ्या आहेत आणि एकूणच बेचव वाटणाऱ्या आयुष्यात होणारे बदल त्यांनी शब्दबद्ध केले आहेत. त्यांच्या प्रमाणेच मेघना फटांगरे, सुकन्या आगाशे यांच्या कथाही अस्तित्ववादी आहेत. मेघना फटांगरे यांचा खोल *सूक्ष्म आवेश (१९९५)* हा कथासंग्रह अनेक गोष्टींची साक्ष ठरत आहे. नायिकांची एकूण द्विधामनस्थिती त्यांनी

रेखाटली आहे.

स्त्रीवादी कथालेखिकांनी तर मराठी साहित्याला एक नवी दिशा दिली आहे. त्यांच्या या स्त्रीवादी प्रश्नाचे अनेकवेळा समाजात किंवा मनामनात स्वागत झाले आहे.

*सानिया यांचे दिशा घराच्या (१९९१), ओळख (१९९२), वलय (१९९५), परिमाण (१९८१), शोध (१९८०), प्रतीती (१९८९), खिडक्या (१९८९), प्रयाण (१९९७).* गौरी देशपांडे यांचे *आहे हे असे आहे (१९८६), एकेक पान गळावया (१९८०).*प्रिया तेंडूलकर यांचे *ज्याचा त्याचा प्रश्न (१९८७), असही (१९९६), जन्मलेल्या प्रत्येकाला (१९९१), जावे तिच्या वंशा (२०००).* छाया दातार यांचे *गोष्ट साधी, सरळ, सोपी* (१९७३), स्वतःला शोधताना (१९७३), वर्तुळाचा अंत (१९७६).मेघना पेठे यांचे *हंस अकेला (१९९७), आंधळयांच्या गायी (२०००).*उर्मिला शिरूर यांचे *कवडसा* (१९८०).अंबिका सरकार यांचे *चाहूल* (१९८०), *प्रतिज्ञा* (१९८१) हे कालखंडातील काही महत्त्वाचे महत्त्वाचे कथासंग्रह आहेत.

सानिया यांनी त्यांच्या कथा विश्वातून लग्नसंस्थेचा जळजळीत प्रश्न समोर आणला. काही अंशी मध्यमवर्गाचा स्त्रीकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टीकोन बदललेला दिसतो. स्त्रियांना घरगुती कामात पुरुष मदत करताना दिसतात. गौरी देशपांडे यांच्या कथेत स्त्री पुरुषांचे लहान – मोठे गुण – दोष अतिशय निखळपणे मांडलेले दिसतात. स्त्री – पुरुष यांच्या नात्यातील मानसिक भावनिक गुंतवणूक दिसते. प्रिया तेंडूलकर यांच्या कथेत लग्नसंस्थेसंबंधित अनेक प्रश्न ऐरणीवर येताना दिसतात. लग्न, हुंडा, घटस्फोट, आत्महत्या या ओघाने येणाऱ्या गोष्टी टाळण्याचे भाष्य त्यांच्या कथेत मिळते तर काही प्रमाणात घटस्फोट, पुनर्विवाह, मुलांच्या प्रश्नांनाही त्या स्पर्श करतात. छाया दातार, मेघना पेठे या स्त्रीवादी लेखिकांनीही स्त्रीला केंद्र मानून तिच्यावर होणाऱ्या अत्याचाराला समाजा समोर मांडले आहे. लग्नसंस्थेतून येणारे सुरक्षित जीवन, सुखी कुटुंब या चौकटीचे स्वप्न उराशी बाळगलेल्या नायिका समोर येतात. तर त्याच नायिका आपल्या आयुष्याच्या जोडीदारा बरोबर असूनही एकट्या पडलेल्या दिसतात. स्त्री – पुरुष शारीरिक, भावनिक संबंधांवर या लेखिकांनी सरळ आणि रोखठोक भाष्य केले आहे. स्त्रीवादी लेखिकांची यादी मोठी असली तरी प्रमुख स्त्रीवादी लेखिका म्हणून ओळख असणाऱ्या छाया दातार, मेघना पेठे, कविता महाजन, प्रज्ञा दया पवार यांची नावे प्रामुख्याने समोर येतात.

स्त्रीवादी कथा लेखिकांप्रमाणेच दलित कथा लेखिकांचे लेखनही संघर्षात्मक लेखनाने आणि प्रसंगाने भारलेले आहे. उर्मिला पवार यांचे दलित कथासंग्रह म्हणजे *चौथी भिंत*

*(१९९०) आणि सहावे बोट (१९८८)* हे आहेत. दलित स्त्रियांचे दुहेरी दुःखाने भरलेले जीवन त्यांनी रेखाटले आहे. एक तर दलित स्त्रियांना वर्ण व जातीव्यवस्थेमुळे होणारा त्रास आणि दुसरा तर त्या स्त्रिया आहेत म्हणून होणारा जाच अशा दोन्ही बाजूंनी संकटात सापडलेल्या स्त्रिया यांच्याविषयीचे अनुभव लेखिकांनी त्यांच्या कथांमध्ये मांडले आहेत. कष्टकरी दलित स्त्रीचे चित्रण, दलित मुलींचे प्रश्न, त्यांना ठिकठिकाणी मिळणारी त्रासदायक वागणूक, प्रत्येक क्षणी न्युनगंडाने आत्मविश्वास कमी झालेल्या स्त्रियांचे चित्रण यात करण्यात आले आहे.

ग्रामीण कथेत सरोजिनी बाबर, अनुराधा गुरव (*म्हातारीनं झाकला कोंबडा – १९८२), प्रतिमा इंगोले (लेक भूईची, हिरवे स्वप्न – १९९४, हजारी बेलपान – १९८४, सुगरनीचा खोपा – १९८९, अकसिदीचे दाने – १९८६, जावयाचं पोर – १९८९*) यांची नावे अग्रक्रमाने घेतली जातात. ग्रामीण कथा लेखिकांनी गावातील अनेक लहान – मोठ्या संकेतांसकट संपूर्ण गावाचे चित्र शब्दबद्ध केले आहे. गावातील एकूण विचारशक्ती, रूढी, संकल्पना, सण – उत्सवाचे चित्रण त्यांनी केले आहे.

विज्ञान कथावैभवाचा विचार करता वैज्ञानिक जयंत नारळीकर हे विज्ञान कथांचे मराठी जनक आहेत. विज्ञानाचा अतिवापर करून आपणच तोट्यात येतो असा बोध होणाऱ्या कथा तसेच अन्य माहिती वाचकांना मिळेल अशा कथा लिहिल्या गेल्या. लेखिकांनीही विज्ञानकथा आपापल्या कल्पनाशक्तीच्या जोरावर रेखाटल्या आहेत. रेखा बैजल – *विज्ञानकथा* (१९९१), *किडनॅपिंग* हे दोन कथासंग्रह यांचे आहेत तर *पुनर्जन्म* (१९९९) हा माधुरी शानभाग यांचा कथासंग्रह प्रसिद्ध आहे.

कथा लेखिकांनी आपल्या लेखनात सातत्याने नाविन्यपूर्ण बदल केले असल्यामुळे कथा अनेक वेगवेगळ्या गटांमध्ये वर्गीकृत होत गेल्या. त्यातूनच पौराणिक कथा, ऐतिहासिक कथा, विनोदी कथा, वास्तववादी कथा, अस्तित्ववादी कथा, स्त्रीवादी कथा, दलित कथा, ग्रामीण कथा, वैज्ञानिक कथांचे जन्म होत गेले. वेगवेगळ्या टप्प्यांवर कथांमध्ये बदल होताना दिसतात.

स्वातंत्र्यापूर्वीच्या कथा लेखिका आणि स्वातंत्र्यानंतरच्या कथा लेखिका यांच्या मनस्थितीचा विचार करता लक्षात येते की मूळतः स्त्रिया जेव्हा शिकल्या, जेव्हा त्यांच्यात आत्मविश्वास जागा झाला, घरचा उंबरठा ओलांडून नोकरी करू लागल्या तेव्हा त्यांच्या पंखांना प्रगतीचे यश गवसले. आणि निश्चितच कथालेखन प्रवासाला वेग आल्याचे लेखिकांच्या अनुभव विश्वातून समोर येते.

एकूणच टप्प्या टप्प्याने पुढे सरकत जाणारा हा प्रवास लेखिकांसाठी सोपा नव्हता हेही लक्षात येते. काळानुसार कथांचा बाज बदलत गेला, भाषाशैली बदलत गेली, बदलत्या राहणीमानाचा आणि जागतिकीकरणाचा परिणाम कथांमधून शब्दबद्ध झालेला आहे. कुटुंब या वर्तुळात फिरणारी कथा परिघा बाहेर जाऊन अनेक वाङ्मय प्रकारात विस्तारली गेली. सगळ्या लेखिकांनी सगळेच वर्गीकृत प्रकार हाताळले नसले तरी प्रत्येकीची कामगिरी ही अतुलनीय आहे. स्त्रीकेंद्रित कथा आता वेगवेगळ्या प्रकारात विभागून नवी झेप घेताना दिसत आहे. २००० पर्यंतच्या काळात कथेचं अवकाश अधिक रुंदावलेले स्पष्ट होत आहे.

## ड) २००० ते २०१० या कालखंडातील स्त्रीलिखित कथा

*बिचारी आनंदीबाई* ही पहिली स्त्री लिखित कथा १८९६ मध्ये शांताबाईंनी लिहून मराठी साहित्यात कथाविश्वाचे पाऊल उचलले आहे. त्यानंतर चढत्या क्रमाने आलेख जाऊ लागला. लक्ष्मीबाई अभ्यंकर, वामनसुता, काशीबाई कानिटकर, लक्ष्मीबाई किर्लोस्कर, गिरिजाबाई केळकर, यशोदाबाई भट, जानकीबाई मराठे या आदि लेखिकांनी कथेच्या रोपट्याला जिवंत ठेवले आणि हळूहळू त्याला पालवी फुटू लागली. तत्कालीन सामाजिक आणि कौटुंबिक प्रश्न आणि परिस्थितीचे मापदंड कथेमध्ये उतारले आहे. १९२० पर्यंतच्या कालावधीत कथालेखन संथ गतीने जाताना दिसते. १९५० च्या कालखंडाचा विचार करता स्त्रियांनी मनातील अनेक बंडखोरी विचार कथांमधून प्रसिद्ध केले मात्र या काळात बहुतांश लेखिकांनी टोपणनावे वापरली आहेत. आनंदीबाई शिर्के, विभावरी शिरुरकर, मालतीबाई दांडेकर, कृष्णाबाई दीक्षित, कमलाबाई टिळक, क्षमा राव, कुसुमावती देशपांडे या आदी लेखिकांनी स्त्रीआविष्कार कथांमधून मांडले आहेत.

२००० च्या कालखंडापर्यंतचे लेखन हे स्त्रियांचे प्रगत विचारशैलीचे उदाहरण आहे. चौकटीबाहेर न पडणाऱ्या स्त्रीने लेखन कौशल्य विकसित करून, विविधांगी विषय मांडून, समाजप्रबोधनाचे धडे देत साहित्यात स्त्रीलेखनाची अत्यंत महत्त्वाची स्थित्यंतरे पार पडली आहेत. योगिनी जोगळेकर, वसुधा पाटील, ज्योत्स्ना देवधर, सरिता पदकी, गिरीजा कीर, कमल देसाई, वसुंधरा पटवर्धन, विजया राजाध्यक्ष, सुधा नरवणे, स्नेहलता दसनूरकर या आदि लेखिकांनी २००० पर्यंतचे स्त्री कथा लेखन लक्षवेधी केले आहे.

विजया राजाध्यक्ष, आशा बगे, अनुराधा वैध, माधवी देसाई, विजया वाड, सानिया, उर्मिला पवार, मंदाकिनी भारद्वाज, माधुरी शानभाग, रेखा बैजल, गिरीजा कीर, मंगला गोडबोले या लेखिकांनी २००० ते २०१० चा कालखंडही कथा वैभवाने संपन्न केला आहे.

अनेक अधोरेखित केलेल्या वा न केलेल्या स्त्री कथा लेखिकांनी कथाविश्वाला समृद्ध केले तर आहेच पण सामाजिक जाणीवही यातून मांडून नाविन्य गाठले आहे.

पूर्वी दिलेल्या अनेक चौकटीतून नव्याने कथाबीज लिहिणाऱ्या प्रेरणाऱ्या या लेखिका कथांमधून अनेक प्रश्न समोर आणतात. या कालखंडातील कथालेखनाची धाटणी व्यापक प्रकारची आहे. कौटुंबिक जीवनात, नातेसंबंधांमध्ये काळानुसार होणारे बदल, बदलानुसार भेडसावणारे प्रश्न आणि त्यातून मिळालेला आनंद किंवा निराशा अनेक कथांमधून स्पष्ट होते. सुनंदा गोरे – *शिक्षा (२००३), उन्हातलं चांदणं,* अंजली दिवेकर – *एका चारकाची संहिता (फिरून पुन्हा २००४),* अंजली दिवेकर – *देवाची मुलगी (फिरून पुन्हा २००४),* वंदना केळकर – *वेगळी वाट (२००२),* पद्मावती जावळे *(मायेची सावळे – २००१),* विनिता ऐनापुरे – *पडदा (भिरभिर २००४*), अंजली दिवेकर – *खुण (सल २००४*), लीना दामले – *लाडकी लेक (पुरुषस्य चरित्रम् २००४),* उषा तांबे – *अभिमान (परिघाबाहेर २००६,;* आशा साठे – *प्रिय मित्रा (२००९),* मोनिका गजेंद्रगडकर – *आर्त (२००८),* अंजली अमोनकर – *आभाळ आपलं आपलं (२००९),* यशोधरा काटकर – *परत (२००७),* सावित्री जगदाळे – *प्रदूषण टक्केवारीचे (२००७),* मंदाकिनी भारद्वाज – *दिशांतर (२००७),* अनुराधा गोरे – *कळी उमलताना (२०१०)....* या सारख्या अनेक कथांमाधून नातेसंबंधातील अनेक बारकावे लेखिकांनी कथालेखनात टिपले आहेत.

लग्न हा विषय घेऊनही अनेक कथांचे लेखन झालेले दिसते. नलिनी देशपांडे – *मंगळी* (२००९), आशा दामले – *घन गर्जत आले* (२००६), मीनाक्षी सरदेसाई – *गोंदण* (२००८), संध्या रानडे – *इंद्रधनुचा पूल* (२०१०), अरुणा ढेरे – *नवीन* (२००६), मोनिका गजेंद्रगडकर – *श्रद्धा* (२००८), वासंती जोशी – *स्पर्शकोंबाच्या वाटा* (२००१), मोनाली शिंदे – *प्रेमाचा धागा* (२००५), माणिक श्रोत्री – *कथा कुणाची व्यथा कुणाची* (२००५), नीरजा – *तिच्या मुलीचा बाप* (२००६), वृंदा भार्गवे – *हेन्रीची गोष्ट* (२००८), स्वाती चांदोरकर – *काळाकभिन्न* (२००८), भारती पांडे – *एक दिवस* (२०१०), माधुरी शानभाग – *घर* (२००३), आशा कर्दळे – *मुलगा* (२०१०), पद्मावती जावळे – *अनुराधा* (२००४), प्रभा

बैकर – *घायाळ मी हरिणी* (२००४), प्रतिभा रानडे – *मरूगान* (२००७), सुवर्णा दिवेकर – *सर्व हक्क स्वाधीन* (२००६), शशी बापट – *फिनिक्स* (२०११), सीमा मराठे – *दोघी* (२००७), माधुरी शानभाग – *समुद्र* (२००८), सिसिलिया कार्व्हालो – *खाटिक* (२००४), प्रतिभा कणेकर – *परीघावर* (२००४).... यासारख्या अनेक कथांमधून लग्न, हुंडा, जाच या गोष्टीबरोबर स्त्री – पुरुष शारीरिक संबंध, ओढ, ताण, राग, हवेदावे, लोभ, घृणा, कर्तव्य, लैंगिक शोषण, लैंगिक गरज, पाशवी वृत्ती, प्रेमाचे नाटक, नवऱ्याची प्रेयसी किंवा बायकोचा प्रियकर, घटस्फोट, पुनर्विवाह, घुसमट या विविध विषयांवर लेखिका अतिशय खुलेपणाने कथांमधून चर्चा करताना दिसतात. अतिशय सूक्ष्म वाटणाऱ्या गोष्टी किती त्रासदायक बनतात याची उदाहरणे या कथांमधून वाचावयास मिळतात.

समाजातील अस्तित्व, भान त्यातून उद्भवणारे प्रश्नही कथांमधून आढळतात. उदाहरण, यामिनी रानडे – *आत्मभान* (२००८), आश्लेषा महाजन – *मध्यस्थ* (२००४), उषा भागवत – *गौरव* (२००७), इंदूमती जोंधळे – *बेदखल* (२००१), विजया मारोतकर – *अनंताचा प्रवास* (२००८).... या आदी कथांमधून समाजमनातील स्त्री प्रतिमा आणि त्यावर स्त्रीने केला संघर्ष समोर येतो.

जग – बदलत आहे, गरजा बदलत आहे, स्त्रिया नोकरी आणि घर सांभाळत आहेत त्यातून दुहेरी ताण, पर्यायाने होणारे वादा आणि वादामुळे घरातील वृद्धांचे होणारे हाल, मुलांच्या संगोपनातील दुर्लक्ष हे जिव्हाळ्याचे प्रश्नही कथांमध्ये अवतरले आहेत. उदाहरण मीनाक्षी सरदेसाई – *आधार* (२००८), सुनंदा गोरे – *पर्याय* (२००३), तेजस्विनी जाधव – *वतन* (२००५), मंगला गोडबोले – *वाळू* (२००२), विजया वाड – *दुकाकी* (२००७), नीता गद्रे – *आपलं माणूस* (२००५).... या कथांमधून अबाल वृद्धांच्या मनातील सल, त्यांना दिली जाणारी अपमानकारक वागणूक आणि मरणाची वाट पाहत झुरणाऱ्या मनाच्या व्यथा चित्रित झाल्या आहेत.

विविध रोगांचा आधार घेऊनही कथावैभव पुढे जात आहे. एड्स, कॅन्सर, कोमात गेलेल्या व्यक्तीचे हाल, ॲक्सीडेंट यासारखे विषय .... आशा दामले – *डायरी अनु दातेचू* (२००६), योगिनी वेंगुर्लेकर – *पानगळ* (२००२), मालिनी देशपांडे – *काळरात्र* (२००९),

वृंदा भार्गवे – *अजून एक जन्म* (२००८), मल्लिका अमर शेख *वॉर्ड नं. २०* (२००६) या कथांमधून आढळतात. काही कथा सत्यघटनेचा आधार घेऊनही लिहिल्या गेल्या आहेत. तर काही कथा कल्पनेच्या परीघावर सांगड घालत रचलेल्या आहेत. उदाहरण वैशाली परांजपे –*हा खेळ सावल्यांचा*, कमल गाडगीळ – *कोष* (२००८).

जगातल्या कोणत्याही शिक्षणाने प्रगत विचार झालेल्या किंवा अति अडाणी माणूस असलेल्या, इथ पासून तिथ पर्यंतच्या कोणत्याही स्तरावरचा विचार केला तरी प्रत्येक मनातील फालतू अहंकार बाळगलेली जात कधीच बाहेर पडत नाही. या जातीय वादावरही अनेक कथालेखन झालेले आहे. उर्मिला पवार, प्रज्ञा दया पवार, प्रतिमा जोशी या स्त्रियांनी कथांमधून अतिशय परिणामकारक विचार मांडलेले आहेत. तर गाव, पंचायत, नगरपालिका, जिल्हापरिषद किंवा अन्य राजकीय स्तरावर स्वतःला अजमावू पहाणाऱ्या स्त्रियांचा संघर्ष, त्यांची होणारी बदनामी, पुरुषाच्या हातातली बनलेली बाहुली हे विषयही कथांमधून डोकावताना दिसतात. त्याचबरोबर दलित जीवनाचे भयाण वास्तवही कथांमधून समोर येते. उदाहरण – शकुंतला रोकडे – *एलिझाबेथ* (२००१), राजेश्वरी कांबळे – *मृदगंध* (२००७), अनिता वाघमारे – *वस्तीवरची पोर* (२००४), प्रज्ञा दया पवार – *अफवा खरी ठरावी म्हणून* (२०१०), नलिनी पुरके – *एकटी* (२००७), *परकी* (२००७) या लेखिकांनी दलित जीवनाच्या व्यथा लिखित स्वरुपात मांडल्या आहे. भाषा शैली, बेरोजगार, अठराविश्व दारिद्र्य, भांडणे आणि जातीयतेच्या फालतू अभिमानाखाली खचून गेलेली संपूर्ण दलित मने या कथांमधून बोलकी झाली आहेत.

ग्रामीण कथा वैभवातही स्त्रियांनी लेखनी द्वारे अनेक विषय मांडले आहेत. ग्रामजीवन, प्रश्न, सोयी, पाणीटंचाई, वीज, जत्रा, बळी, पुढाऱ्यांचे वर्चस्व, सण, लग्ने, प्रेम प्रकरणे.... या विविध विषयांमधून लेखिकांनी ग्रामीण कथा विश्व अधिक समृद्ध केले आहे. याच बरोबर ग्रामीण स्त्रियांची होणारी कुचंबना, शेतीतील कष्टांना न मिळणारा मोबदला या कथांमधून समोर येतो. उदाहरण.... अनुराधा गुरव, मथु सावंत, ललिता गादगे, कुमुद मंडलेकर या स्त्रियांनी विविधांगी लेखन केलेले दिसते. अनेक कथा विविध प्रांतातून आलेल्या दिसतात. अनेक बोली भाषांचा वापर, म्हणी, वाक्प्रचार कथानकामध्ये आढळतात.

दलित, ग्रामीण कथेबरोबरच अधोरेखित होणारा कथा भाग म्हणजे वेश्या व्यवसायाची खंत व्यक्त करणारा आहे. १९९० च्या काळात अनेक ठिकाणी वेश्यांच्या संघटना सुरु झाल्या, आंदोलने झाली, मागण्या झाल्या, प्रतिकार झाले. या सगळयात वेश्या व्यवसाय

मात्र तेजीत सुरूच राहिले. याचा पाठपुरावा केला गेला. या भेदक वास्तवाचे चित्रण प्रतिमा जोशी यांनी त्यांच्या *नग्नसत्य, दरी, सत्यकाम – जबाली, तेरावी गल्ली, जहन्नम* या कथांमधून मांडले. अतिशय सुन्न करणारे हे चित्रण क्वचित झाले होते. या कथांमधून प्रतिमा जोशींनी अनेक सूक्ष्म बदलही टिपलेले आहे. कोठेवली, दलाल, शरीर संबंध म्हणजे काय हे ही माहित नसलेल्या कोवळया कळ्या, त्यांचा होणारा चुराडा, नशा, दारू, पान खाऊन दिलेल्या पिचकाऱ्या, कुबट वासात अचानक आलेला सेंटचा वास.... एकूणच या भयाण जीवनाचे हृदय पिळवटून टाकणारे चित्रण कथांमधून पुढे येताना दिसत आहे.

विज्ञानाच्या आधारे कथालेखन आकार घेताना दिसते. वैज्ञानिक संकल्पना विचारात घेऊन अस्तित्ववादी कथा लेखिकांनी लिहिलेल्या आहेत. माधुरी शानभाग – इंद्रधनुष्य (२००३), *सॅप* (२००५), सुधा रिसबूड – *कल्पित – अकल्पित* (२००८), शुभदा गोगटे – *अस्मानी* (२००९) या कथांची जुळणी विज्ञानावर आधारलेली दिसते. काल आज उद्या या मध्ये वैज्ञानिक बदल कसा परिणाम करतो हे या कथांमधून अधोरेखित होते.

विनोदी कथा प्रकारात प्रामुख्याने मंगला गोडबोले यांचे लेखन विशेष ठरते. *गुंडाबळी* (२००५) या कथासंग्रहातील अनेक कथा अधिक विनोदी आणि विचार करायला भाग पाडणाऱ्याही आहेत. त्याप्रमाणे स्नेहसुधा कुलकर्णी – *प्रियाचे पप्पा* (२०००), शीला घाटपांडे – *चप्पल आणि अक्कल* (२००१), मंदाकिनी गोगटे – *चिमाजी अप्पाची मिशी* (२००४), शकुंतला फडणीस – *बोलू की नको* (२००७), वृंदा दिवाण – *पडावे तर परी* (२००४), प्रतिमा इंगोले – *उल्टे झाले पाय* (२००६), शुभदा साने अशा आदी विनोदी कथा लेखिकांनी वैशिष्ट्येपूर्ण लेखन आणि भाषाशैली मांडून विनोदी कथा अधिक परिणामकारक लिहिली आहे.

कथा लेखनाच्या या वळणावर मराठी साहित्यिकमंडळात केवळ हिंदू स्त्रियांचाच सहभाग नाहीतर मुस्लीम लेखिका, ख्रिस्ती लेखिका, जैन लेखिका यांचे योगदानही महत्त्वपूर्ण ठरते.

ज्येष्ठ कथा लेखिकांमध्ये .... विजया राजाध्यक्ष – *आधी – नंतर* (२००१), *किती वाटा किती वळणं* (२००४), *अन्वयार्थ* (२००१) हे कथा संग्रह वाचकांसाठी खुले केले आहेत. त्याबरोबर अनेक कथांमधून त्यांनी अनेक विचार मांडले आहेत. रोहिणी कुलकर्णी – *स्टारीनाईट* (२००२), आशा बगे – *पाणी* (२००३), *प्रतिद्वंदी* (२००५), *पाऊलवाटेवरले*

*गाव* (२००५), तारा वनारसे - *पश्चिमकड* (१९६६), *केवलकांचन* (२००७), गिरीजा कीर – *कथाजागर* (२००५), *आकाशवेध* (२००९), सानिया – *आपण आपले, ओनियागे* (२००४), *अशी वेळ* (२०१०), प्रतिभा रानडे – *मरूगान* (२००७), नीलिमा भावे – *दोन रेषांचा त्रिकोण* (२००२), मृणालिनी जोगळेकर – *मृगतृष्णा* (२००८), आशा कर्दळे – *असे काहीसे व्हावे* (२००६), राजमुद्रा (२००७), *कालही अन् आजही* (२०१०), माधवी देसाई – शुक्रचांदणं (२००२), *देवराई* (२००६), *जगावेगळी* (२००६), रेखा बैजल – *शिवार* (२००६), विजया वाड – *तुमच्या आमच्या गोष्टी* (२००४), *कथासुगंध* (२००५), *कुटुंबकथा* (२००७) .... या आदी कथासंग्रहातून लेखिकांनी अनेक विषय हाताळले आहेत.

आजच्या युगातील काही प्रश्न अतिवेगाने भेडसावत आहे. सुबत्ता आली, गरिबी हटली, लोकसंख्या वाढली, बेरोजगारी वाढली त्यात तरुण मुले भरडली गेली, संगणक युग अतिवेगवान झाले आणि नातेसंबंध मात्र दृष्टीआड गेले.... या परिस्थितीचे वेगवेगळया स्वरुपात लेखन झाले. अनेक लेखिकांनी जगाबरोबर कथेची मांडणी विषय, गाभा, मथितार्थ, निष्कर्ष, जाणिवा, मर्यादांचा विचार कथेमध्ये प्रकर्षाने केलेला दिसतो. बुरख्याखाली, पदराआड, चौकटीत डांबलेली स्त्री आणि आजची स्त्री यात कमालीचा बदल होत गेला. अनेक लेखिका अत्यंत निर्भीडपणे विचार मांडताना दिसतात. या आघाडीच्या आणि विशेष उल्लेखनीय लेखिका आणि त्यांचे कथासंग्रह पुढीलप्रमाणे.

निरजा – *जे दर्पणी बिंबले* (२०००), *ओल हरवलेली माती* (२००६).

अरुणा ढेरे – *उंच वाढलेल्या गवताखाली* (२०००), *मन केले ग्वाही (*२००१), *पावसानंतरचं ऊन* (२००६).

माधुरी शानभाग – *चकवा* (२००३), *चेहरे* (२००३), *इंद्रधनुष्य* (२००३), *मुंगी उडाली आकाशी* (२००७), *समुद्र* (२००८).

देवकी वळवडे – *अनाहत* (२००३).

वासंती इनामदार – जोशी – *स्पर्शकोंबाच्या वाटा* (२००१), *हर अर्धांगी वससी* (२००२).

भारती पांडे – *बिनमहत्त्वाच्या माणसांच्या महत्त्वाच्या गोष्टी* (२०१०).

कल्पना शुद्धवैशाख – *एक नातं असंही* (२००१), *रेवामंडल* (२००५), *मन पतंग पतंग* (२००९).

प्रतिभा कणेकर – *परीघावर जगताना* (२००४).

शीला पाटणकर – *निर्धार, विश्वस्त, पत्र लिहिण्यास कारणकी, त्या तिथे पलीकडे तिकडे* (२००५ – सर्वकथासंग्रह).

मुग्धा देशपांडे – *सनातन सापेक्ष सत्य* (२००५).

अंजली अमोणकर – *दुसरी बाजू* (२००१), *आभाळ आपलं आपलं* (२००९).

मंजुषा सावरकर – *डांगोरा* (२००४), भोवंडा (२०१०).

विजया दीक्षित – *सत्याचा स्पर्श* (१९९९).

अनुराधा फाटक – वैदेही (२००८), *शिळेतील अहल्या* (२००९), *क्षितीज* (२०१०), *ब्रम्हकमळ* (२०१२).

सुजाता महाजन – *इथेच! याच क्षणात* (२००८).

माधुरी तळवळकर – *कळत जाते तसे* (२००७).

मोनिका गजेंद्रगडकर – भूप (२००४), आर्त (२००८), *शिल्प* (२०११).

योगिनी वेंगुर्लेकर – *वास्तव* (२००२), *कवडसे* (२००५), *डालांग* (२०१२).

छाया महाजन – *एकादश कथा* (२००१), *यशोदा* (२००१), *मुलखा वेगळा* (२००१).

निलिमा बोरवणकर – रंगभान (२००७).

मृणालिनी चितळे – *मनाचिये डोही* (२००३), *सिनार* (२००७), *नातं रक्ता पलीकडचं* (२०१०).

प्रमोदिनी वडके – *कवळे – सुमिरन* (२००५), *काही श्वासांसाठी फक्त* (२००६), *सोनचाफा* (२००७), *कल्पांत* (२००९).

अर्चना अकलूजकर – *केव्हातरी पहाटे.*

लीला दीक्षित – *खुंटणमिरची* (२००९).

मीनाक्षी सरदेसाई – *गोंदण* (२००८).

अनघा केसकर – *नामा निराळा* (२००५), *अकर्म* (२००६).

विनिता ऐनापुरे – *भिरभिरं* (२००४), *कथा मनातल्या* (२००६).

शुभदा साने – *तरंग (२००५), ओढ (२००५), परीस (२००५), वादळ (२००५), आणि म्हणूनच (२००५), आव्हान (२००६), तरीही मी येईन (२००७), उन्हातला पाऊस (२००८).*

अंजली दिवेकर – *फिरून पुन्हा (२००४), सल (२००४), विना उत्तराची कहाणी (२०१०).*

शुभांगी भडभडे – *कोवळया उन्हाचे दिवस (२००२), जास्वंदी (२००४), अस्तित्व (२००४), थांब जरासा (२००७), राजहंसे चोच पुरविता (२००८).*

संध्या रानडे – *सुखाची सरळ रेषा (२००६), इंद्रधनुचा पूल (२०१०).*

विजया काळे – *फुलोरा* (२००२), *पालवी* (२००६), *बहर* (२००८).

वृंदा दिवाण – *मी आहे* (२००४), *त्या रात्री* (२०११).

या प्रदीर्घ कथा लेखनाचा आलेख प्रस्तुत कालखंडात स्त्री कथाकारांनी निश्चितच उंचावलेला आहे. समाजातील अनेक सूक्ष्म बदलांसह, स्त्री मनाच्या कोपऱ्यातील संवेदनांचा बदल, आघात, पर्याय त्यांनी कथा लेखनात मांडलेला आहे.

अनेक कथांमधील अनुभवविश्व हे स्त्री मनाशी परीघ करणारे आहे. नैतिक – अनैतिकतेच्या कात्रीत सापडणारे जीवही कथांमधून दिसतात. ग्रामीण जीवन, दलित जीवन, वैज्ञानिक युग, मानसिक आजार, वृद्धांच्या समस्या, निरनिराळे राजकारण, घर , संसार, मुले, जबाबदारी यात घुसमटणारी आधुनिक स्त्री, वेश्या व्यवसाय, स्वतंत्र स्त्री, परित्यक्ता, विधवा स्त्री, कष्टकरी स्त्री अशा निरनिराळया विषयांना हात घालत स्त्री कथाकारांनी कथावैभवाला निराळी ओळख निर्माण करून दिलेली आहे.

१९२० ते १९७५ पर्यंतच्या कालखंडात द्विधा मनस्थितीत स्वतःला दोष देणारी स्त्री १९७५ नंतर मात्र निर्णयी विचारांची झाली आहे. १९७५ नंतर प्रेमकथा, रंजकता हे विषय कथांमधून वगळून ज्वलंत प्रश्न पुढे आलेले दिसते.

एकूणच १८९६ साली कथालेखनाला प्रारंभ झाला आणि तो अधिक उंचावत गेला यात शंकाच नाही.

**संदर्भ ग्रंथसूची**

१. केशव तुपे, "स्त्रियांचे कथालेखन : विस्तारलेली आशयाकांक्षांची क्षितिजे", 'स्त्री-लिखित साहित्य : संदर्भ व चिकित्सा, संपादन- आशुतोष पाटील, शब्दालय प्रकाशन, पहिली आवृत्ती, ११ जून २०१५, पृ. क्र. . १४९

२. केशव तुपे, "स्त्रियांचे कथालेखन : विस्तारलेली आशयाकांक्षांची क्षितिजे", 'स्त्री-लिखित साहित्य : संदर्भ व चिकित्सा, संपादन- आशुतोष पाटील, शब्दालय प्रकाशन, पहिली आवृत्ती, ११ जून २०१५, पृ. क्र. १५०

३. केशव तुपे, "स्त्रियांचे कथालेखन : विस्तारलेली आशयाकांक्षांची क्षितिजे", 'स्त्री-लिखित साहित्य : संदर्भ व चिकित्सा, संपादन- आशुतोष पाटील, शब्दालय प्रकाशन, पहिली आवृत्ती, ११ जून २०१५, पृ. क्र. १५१

४. भालचंद्र फडके, "स्त्रियांचे कथालेखन", मराठी लेखिका : चिंता व चिंतन, श्रीविद्या प्रकाशन, पहिली आवृत्ती, मार्च १९८०, पृ. क्र. ४४

५. भालचंद्र फडके, "स्त्रियांचे कथालेखन", मराठी लेखिका : चिंता व चिंतन, श्रीविद्या प्रकाशन, पहिली आवृत्ती, मार्च १९८०, पृ. क्र. ६१

६. भालचंद्र फडके, "स्त्रियांचे कथालेखन", मराठी लेखिका : चिंता व चिंतन, श्रीविद्या प्रकाशन, पहिली आवृत्ती, मार्च १९८०, पृ. क्र. ६४

७. प्रभा गणोरकर, 'आशा बगे', "स्त्री- लिखित मराठी कादंबरी (१९५० ते २०१०), संपादन- अरुणा ढेरे, पद्मगंधा प्रकाशन, प्रथमावृत्ती ८ मार्च २०१३, पृ. क्र. ८९

## घटक – ब : मराठी स्त्रीलिखित कादंबरीलेखन

अ) १८७०ते १९२० या कालखंडातील कादंबरीलेखन

ब )१९२० ते १९५० या कालखंडातील कादंबरीलेखन

क) १९५० ते २००० या कालखंडातील कादंबरीलेखन

ड) २००१ ते २०१० या कालखंडातील कादंबरीलेखन

### अ) १८७० ते १९२० या कालखंडातील कादंबरीलेखन

स्त्रीजातीच्या मुक्तीसाठी अनेक थोर तत्वज्ञांनी तपस्या केली आणि स्त्रियाही स्वतःमधील बुजरेपणा विसरून लिहू वाचू लागल्या. या त्यांच्या क्रांतिकारी कृतीतून अनेक पदर विस्तृत होत गेले. त्यांचे शिक्षण, मनाची घालमेल, काव्यातून गुणगुणत कागदावर उतरवली, मग कथेतून, कादंबरीतून आणि आपसूकच अनेक वेगवेगळया अंगानी त्या विचारांना वर्गीकृत करत गेल्या. त्यातील 'कादंबरी' या टप्प्याचा विचार पहाता स्त्रियांनी मोलाची कामगिरी केल्याचे लक्षात येते.

ह. ना. आपटे, श्री. व्यं. केतकर, वा. म. जोशी, ना. सी. फडके, वि. स. खांडेकर यांच्याकडून प्रेरणा घेत स्त्रियांनी कादंबरी लेखनाला प्रारंभ केलेला दिसून येत आहे.

राजे – महाराजांच्या साहसीकथा, अद्भुतरम्य, ऐतिहासिक, सामाजिक, प्रेमकथा, शृंगारकथा या वेगवेगळया वाटा एकत्र गुंफत प्रारंभीचे कादंबरी लेखन झालेले लक्षात येते. त्यानंतरच्या टप्प्यात त्यांनी कुटुंबाला अग्रस्थानी ठेऊन कादंबरी लेखन केलेले लक्षात येते.

तत्कालीन परिस्थितीमध्ये स्त्रियांना नेहमीच प्रत्येक गोष्टीत डावलले गेले होते आणि अशा परिस्थितीमध्ये लिहिता वाचता येणे म्हणजे मोठी गोष्ट होती; आणि म्हणूनच प्रारंभीच्या काळातील स्त्रियांच्या कादंबरी लेखनात बंडखोर स्त्रियांचे चित्रण अधिक प्रमाणात दिसून येते. लेखिकांच्या मनाच्या कोपऱ्यातील ती गोष्ट त्यांनी आपसूकच कादंबरीच्या नायिकांमध्ये गुंफलेली दिसते.

" *'चंद्रप्रभाविरहवर्णन'* ( ले. साळूबाई तांबवेकर इ. स. १८७३) ही स्त्रीने लिहिलेली पहिली कादंबरी मानली तर तेथपासून १९२० सालापर्यंत लेखिकांच्या सामान्यत: दहा ते बारा कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. याच काळात हरिभाऊ आपट्यांच्या प्रोत्साहनाने धीर येऊन काशीबाई कानिटकरांनी *'रंगराव'* (१९०३) ही कादंबरी कागदावर आणली. आणि

त्यातून स्त्रीशिक्षणाची आवश्यकता प्रतिपादन केली."[१] १८७३-७६ मध्ये प्रथमतः साळूबाई तांबवेकर यांनी *चंद्रप्रभा विरहवर्णन* ही स्त्रीलिखित कादंबरी लिहून मुहूर्तमेढ रोवली. कादंबरीतील नायिका साळूबाई तांबवेकरनी अगदीच स्वतंत्र विचारांची दाखवलेली आहे. पौराणिक बाज असलेली ही कादंबरी नायिका चंद्रप्रभा आणि नायक यांच्यातील विरहाची जीवनकहाणी स्पष्ट करत आहे. १८९४ मध्ये साळूबाईंनी कल्पनारम्य साहसकथा असे वळण असलेली *हिंदुस्थानातील तारा* ही दुसरी कादंबरी लिहिली आहे. लोकशिक्षणाचे व्रत हाती घेतलेल्या आणि आयुष्यात नव्याने उभ्या राहणाऱ्या स्त्रीची ही लढाई त्यांनी कादंबरीतून दाखवलेली आहे.

इ. स. १८९० साली गोदावरीबाई पंडित यांनी *प्रीतीचा मोबदला अथवा पुष्पगुच्छ आणि वनमाला* ही प्रीतीकथा आणि शौर्यकथा सांगणारी कादंबरी प्रसिद्ध केली. कादंबरीतील नायिका वयाने जरी लहान असली तरी शिक्षणामुळे माणसातील परिवर्तन तिने जाणलेले दिसून येते. १८९० च्या काळात शिक्षणाचा आधार घेतलेल्या स्त्रिया आपापल्या नायिकांमधून अनेक स्वप्न पाहताना दिसत आहेत.

श्री. गोविंदराव कानिटकरांच्या पत्नी काशीबाई कानिटकर यांनी *रंगराव* १९०३ मध्ये तर *पालखीचा गोंडा* १९२८ मध्ये अशा दोन कादंबऱ्या प्रसिद्ध केल्या. दोन्ही कादंबऱ्यांमधून शिक्षणाबद्दलचे पुरोगामी विचार त्यांनी मांडलेले आहे. *रंगराव* मध्ये परदेशाहून परतलेल्या नायकाचे चित्रण आहे. नायक हा अतिशय कर्तव्यनिष्ठ दाखविलेला आहे. तर *पालखीचा गोंडा* मध्ये संस्थानच्या गादीवर स्वतःच्या सुनेला बसविणारी अत्यंत पुरोगामी विचारांची सासू काशीबाई दाखवलेली आहे. एकूणच शिक्षण हा दुवा त्यांनी केंद्रस्थानी ठेवला आहे.

आत्मचरित्रात्मक पहिली कादंबरी १८८५ साली इंदिराबाई हरिपूरकर यांनी *दैवलीला* या नावाने प्रकाशित केली. कादंबरीतील नायिका अतिशय हुशार आणि भविष्याचा विचार करणारी आहे. हातातील पैसा योग्य दान धर्माकरिता वापरला जावा हा अतिशय समर्पक विचार मांडणारी आहे. तिच्या शिक्षणामुळे अनेक गोष्टींना तिला सामोरे जावे लागले आहे. तिच्या शिक्षणाची हरप्रकारे चेष्टा झालेली असली तरी मुलीच्या जन्माचे स्वागत करायला सांगणाऱ्या गुणवंत नायिकेचे त्याकाळातील हे अतिशय खडतर पाऊल होते हे लक्षात येते.

जानकीबाई देसाई यांनीही अनेक कादंबऱ्या सातत्याने प्रकाशित केल्या. *गृहलक्ष्मी* (१९१५), *प्रेमळ सवत* (१९१७), *सौभाग्यतिलक* (१९१८), *पातिव्रत्याची कसोटी* (१९१९), *पत्नीव्रताची कसोटी* (१९२१), *अघोर पातक* (१९२४), *मूकनायिका* (१९२५), *चारूगात्री* (१९२०) अशा वेगवेगळ्या कादंबऱ्यातून त्यांनी स्त्री जीवनाशी निगडीत गोष्टी मांडलेल्या

आहेत. तत्कालीन दैनंदिन जीवनाची रूपरेषा, व्रतवैकल्य, पतीचे सुख, हेकटपणा, सासरची माणसे, त्यांचे स्वभाव, अनेकांनी केलेले अन्याय, विवाहसंबंधीच्या रूढी, परंपरा, वेशभूषा, कर्तव्ये, पायंडे, मर्यादा, बालविवाह, सवतीचे जीवन.... एकूणच त्यांच्या लेखनात अनुभवाची जोड असल्याने सर्व कादंबऱ्यातून त्याची प्रचीती येते.

एकूणच प्रारंभ ते १९२० या कालखंडातील कादंबऱ्यातून साहसकथा, प्रेमकथा, विरहकथा, ऐतिहासिक कथा, कौटुंबिक कथा, सामाजिक कथा अशा टप्प्यातून होत गेलेला प्रवास समजतो. स्वानुभवातून मांडलेल्या कादंबऱ्याही समोर येतात. स्त्रीलिखित कादंबरीतून तिच्या मनातील गगनाला भिडण्याची अपेक्षा किंवा ते स्वप्न या लेखिकांनी कळत – नकळत आपापल्या कादंबरीच्या नायिकांमध्ये पाहिलेले दिसत आहे. परिस्थितीवर मात करण्याची उर्मी असणाऱ्या या लेखिकांच्या नायिका मग बंडखोर, स्वतंत्र विचारांच्या असतील यात नवल ते काय? कादंबऱ्यांमधून त्यांनी सामाजिक एकात्मतेचा विचार मांडलेला आहे. शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्याचा क्रांतिकारी विचार मांडला आहे. यावरूनच त्या काळातील कौटुंबिक हिंसाचारात पिचलेल्या स्त्रियांची दाहकता विचार करायला भाग पाडत आहे.

१९२१ नंतरच्या कादंबऱ्यांतून अधिकाधिक सुसज्ज विचार स्त्रियांचे कादंबरीतून स्पष्ट झालेले आहेत. पुढील टप्प्यांचा अभ्यास करताना हे लक्षत येईलच. अनेक ज्वलंत प्रश्नांबरोबरच तत्कालीन परिस्थितीचा अभ्यास पुढीलप्रमाणे

## ब) १९२० ते १९५० या कालखंडातील कादंबरीलेखन

१९२१ मध्ये यशोदाबाई भटयांची *मुलांचे बंड* ही कादंबरी प्रकाशित झाली आणि ती वाचकप्रिय ठरली. सर्वांगाने बाजू मांडणाऱ्या यशोदाबाई *मुलांचे बंड* मध्ये देशसेवेसाठी झटण्याचा संदेशही देतात. कथानकामध्ये वाचकास खिळवून ठेवण्याची ताकद या कादंबरीत आहे. नायिका यमू ही देशसेवेचे व्रत कसे पार पाडते ही विलक्षण कहाणी या कादंबरीत आहे. यशोदाबाई सांगतात – "वाचकास शृंगाररसात डुंबावयास सोडण्यापेक्षा कर्तव्याच्या मार्गावर आणून सोडणे, हेच या काळात खऱ्या लेखक – लेखिकांचे आद्य कर्तव्य आहे." १९२४ मध्ये *राजमाता जिजाऊ* ही एक ऐतिहासिक कादंबरी यशोदाबाईंनी लिहिली आहे.

कमलाबाई सोहनी यांनी शिक्षणासाठी धडपडणाऱ्या नायिकेची कहाणी *कुठे?* या कादंबरीतून मांडलेली आहे. यातून त्यांनी शिक्षणाच्या नावाने मुली दुराचार करतात असेही चित्रण केले आहे. मात्र कादंबरी काही अंशी लोकप्रियतेपासून वंचित राहिल्याचेही समजते.

मांडणी आणि नाविन्यतेचा अभाव भासत आहे. कमलाबाईंनी १९३७ साली *वादळापूर्वी* ही कादंबरी समाजकार्यात वाहत गेलेल्या तीन मैत्रिणींची जीवनकहाणी आणि त्यांच्या कार्याचा आढावा घेणारी वाचकप्रिय ठरली आहे.

१९२७ साली पिरोज आनंदकर यांनी *माझं बाळ ते* ही खळबळ माजवणारी कादंबरी लिहिली. आपल्या बाळाची आई बनण्यापेक्षा समाजकार्य करणे, समाजातील गोर गरिबांना आपली मदद होणे हे नायिकेसाठी महत्त्वाचे आहे. मातृत्व ही प्रत्येक स्त्रीच्या मनातली इच्छा असतानाही नायिका मात्र १९२७ सालच्या वातावरणात अधिक प्रगल्भ विचारांची वाटते. अनाथ मुलांची आई बनून त्यांचे संगोपण करून देशासाठी आहूती द्यावी. असे प्रगल्भ विचार लेखिकेने मांडल्याने खरंतर पिरोजबाईंचे विशेष कौतुकच म्हणावे लागेल.

शांताबाई नाशिककर यांनीही अनेक कादंबऱ्या सामाजिक, धार्मिक कार्यासाठी वहिल्या आहेत. *कौमुदी* (१९२६), *लग्नाचा बाजार* (१९२९), *हाच का धर्म* (१९३०), *साम्राज्यासाठी* (१९३१), *चिखलातले कमळ* (१९३९), *माझी कोरीव लेणी* (१९४०), *कीर्ती* (१९४२).... लग्नाचा बाजार मधून त्यांनी विवाह, प्रीतिविवाह, हुंडा, मानपान, नांदणे, विधवापण, परित्यक्ता जीवन, पालकांची काळजी आणि दुसरे लग्न बेकायदेशीर ठरवण्याचा आग्रह त्यांनी केला आहे. *हाच का धर्म* मधून धर्मविषयीच्या रूढी, परंपरा, घातक कल्पना, श्रद्धा, अंधश्रद्धा, धर्मांतर या अनेक अंगांनी विचार करून लेखिका वाचकांची कौतुकास्पद थाप मिळविण्यास पत्र ठरते. तेच तेच विषय किंवा कुटुंबसंस्थेला केंद्रस्थानी न ठेवता अधिक समर्पक असे हे कादंबरी लेखन शांताबाईंनी केलेले आहे.

घटस्फोटाचा प्रश्न ऐरणीवर असताना कमलाबाई बंबेवाले यांनी *बंधमुक्ता* (१९३०) साली लिहिली. या कादंबरीतून त्यांनी विवाहसंस्थेमध्ये स्त्रियांचा होणारा कोंडमारा अधोरेखित केलेला आहे. आणि घटस्फोटाची कारणे, कायद्याचे निर्णय धुडकविणारा एकूणच समाजमनापुढे नतमस्तक होणारे नायक – नायिका यात रंगवलेले आहेत.

१९३१ साली *बाळूताई धडा घे* ही कादंबरी इंदिराबाई सहस्त्रबुद्धे यांनी लिहिली आहे. गरीब मुलावर प्रेम करणाऱ्या श्रीमंत बापाच्या मुलीची ही अभागी कथा यातून स्पष्ट होत आहे. एका श्रीमंत मुलाबरोबर मनाविरुद्ध लग्न केलेल्या सोनूची ही व्यथा अतिशय स्पष्ट आणि वैचारिक अंगाने त्याकाळी लिहून लेखिकेने एक विक्रमच केला आहे. इंदिराबाईंनी *केवळ ध्येयासाठी* ही कादंबरी इंग्रजीतून मराठीत अनुवादित केली आहे, तर *गोदावरी* ही तमिळीतून मराठीत अनुवादित केलेली आहे.

१९३१ साली *उजळलेला हिरा* ही कादंबरी इंदिराबाई आंबेगावकर यांनी प्रगल्भ

विचारांचे भांडारच त्याकाळी खुले केलेले दिसते. सासऱ्याने आग्रहाने दिलेला हुंडा कोणत्या तरी चांगल्या कामासाठी उपयोगात आणणारा हा जावई किंवा असा विचार अगदी कमीच असणाऱ्या काळात आंबेगावकरांनी हा विचार खुला केला.

बाळूताई खरे यांनी विभावरी शिरुरकर या नावाने लेखन केले पुढे त्या मालतीबाई बेडेकर झाल्या. *हिंदोळ्यावर* (१९३४), *विरलेले स्वप्न* (१९३४), *बळी* (१९५०) अशा कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. तत्कालीन परिस्थितीमध्ये स्वतःचे विचार समाजात मांडण्याची मुभा फार क्वचित लोकांना मिळत होती तर स्त्रियांना यापासून फार वेगळे रहावे लागत असणार. अशा वेळी टोपणनावाने लिहिलेल्या कादंबरीतून होणारी खळबळ समाजात बाळूताईंना दिसत होती. अतिशय प्रगल्भ विचार, पाल्हाळाची जोड नसलेल्या, स्पष्टता असणाऱ्या या लेखिकेलाच *विरलेले स्वप्न* या कादंबरीसाठी आणि *हिंदोळ्यावर* या कादंबरीसाठी समाजद्रोही ठरवले गेले. आरोप – प्रत्यारोप होत राहिले. मात्र तरीही डगमगून न जाता त्यांनी लेखन चालूच ठेवले हे त्यांचे एक विशेष होय.

*हिंदोळ्यावर*' मधून टाकलेल्या नवऱ्याची अभागी नायिका परपुरुषाला जवळ करते, स्वावलंबी बनते हे विचार त्याकाळी रुचणे अशक्यच होते. *विरलेले स्वप्न* मधील नायक, नायिकाही वेगवेगळा मार्ग स्वीकारतात. समाजाची पर्वा न करता स्वतःच्या बुद्धीला व भावनेला पटेल तोच विचार करणाऱ्या व्यक्तिरेखा विभावरी बाईंच्या कादंबऱ्यातून भेटतात.

*बळी* या कादंबरीतून प्रथमच दलित नसलेल्या मात्र दलितांचे इत्यंभूत प्रश्न मांडणारे, दलित जीवनाचे अधिकाधिक भेदक चित्रण मांडणारे, कथानक विभावरीबाईंनी गुंफलेले आहे. दलित आणि शिक्षण ही जोडी कधीच का जमत नाही असा विचार मनात येणारा नायक त्यांनी यातून दाखविला आहे. पोट भरण्यासाठी आईची झालेली दुर्दशा पाहून नायक कसा कोसळून जातो याचे अतिशय ज्वलंत प्रश्न असणारे चित्रण मांडण्यात विभावरीबाई यशस्वी झाल्या आहेत.

१९३५ नंतरच्या कालखंडात स्त्रियांच्या मानसिकतेमध्ये कमालीचे फरक पडत गेले. संसार की समाजसेवा, देशसेवा, चळवळ या पेचात स्त्रिया अडकू लागल्या. विज्ञानाची जोड आणि एकूणच सर्वांगीण विकासाबरोबर स्त्री – पुरुष समानतेचे विचार समाजात रुजण्यास प्रारंभ झाला.

स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतलेल्या गांधीजींबरोबर देशसेवेचे कार्य केलेल्या प्रेमा कंटक यांनी १९३७ ला *काम आणि कामिनी* आणि १९४२ साली *अग्नीयान* या दोन कादंबऱ्या लिहून विचारांचा ठसा समाजापुढे मांडला. राजकीय क्षेत्रातील निष्ठावान असलेल्या प्रेमा

कंटक यांच्या कादंबऱ्या वादातही अडकलेल्या होत्या.

*भावनेच्या भोवऱ्यात* ही कादंबरी शीला सरदार यांनी लिहून समाजातील श्रद्धा, अंधश्रद्धा, भविष्यवाणी, साधू संत, देवता, नवस आणि त्यासाठी केली जाणारी बळीप्रथा समाजात उघडी करण्याचा प्रयत्न केला आहे.

स्वतःमधील निर्भीड विचार मांडायला एव्हाना स्त्री लेखिका सज्ज झालेल्या दिसतात स्वतःचे मूल वाढवण्यासाठी परपुरुषाशी संबंध जोडणारी नायिका अधिक प्रगतशील विचारांची असलेली उषा मंत्री यांनी १९४४ साली *निष्पाप व्यभिचार* या कादंबरीतून रेखाटली आहे.

*कर्तव्याची जाणीव (१९३२), अनियमित जग (१९३४), निर्माल्यातील कळी (१९३५), कुस्करलेले हृदय (१९३८), विरलेले वस्त्र (१९४०), बेसूर संगीत (१९३८), रस्सीखेच (१९३९), प्रीचीचा गोल घुमट (१९३९)* अशी अनेक शीर्षके कादंबरी वाचनाकडे वळविण्यास भाग पाडणाऱ्या कुमुदिनी रांगणेकर यांनी लिहिल्या आहेत. त्यांच्या अनेक कादंबरीमधून समाजप्रबोधनाचे धडे घेण्यास त्या भाग पाडत आहेत.

१९३६ साली *चितोडचा चंद्र* ही कादंबरी लिहिणाऱ्या लेखिका आनंदीबाई जयवंत यांनी *डेव्हिड कॉपरफील्ड* वाचून प्रभावित होऊन १९३२ साली *कुलकथा* तर १९३५ साली *जगाशी बंडखोरी* या कादंबऱ्या लिहिल्या. फूलपाखरांप्रमाणे पुरुषांना प्रत्येक फुलावर बसण्याची मक्तेदारी मिळाली आहे असे वागत असताना स्त्रियांना मात्र प्रत्येक गोष्टीत बंधने टाकणाऱ्या समाजाचे दर्शन त्यांनी अतिशय व्यापक दृष्टीने मांडलेले आहे.

याच काळात स्त्रिया स्वतःकडे व्यापक दृष्टीने पाहत असल्याने हरप्रकारे बंधनमुक्त होण्यासाठी लेखिकांच्या लेखण्या सरसावल्या होत्या. काही अंशी स्वतःचे बंडखोर विचार मांडायलाही त्या चाचपलेल्या दिसतात म्हणून लेखिका अज्ञात या प्रकारे त्यांनी लेखन प्रकाशित केलेले आहे.

उदाहरण *हृदयाचे कढ* ही १९३९ साली *लेखिका कल्पित* या नावाने प्रकाशित झाली.

१९४१ साली शालिनी तुळपुळे यांनीही स्त्रीसमस्येला अधोरेखित करणारी *लपलेले गुन्हेगार* ही कादंबरी प्रकाशित केली.

राजकीय वलय असलेल्या दुर्गाबाई जोशी यांनीही राजकारणातील सत्ता लोभीपणा त्यांच्या १९४१ साली प्रकाशित झालेल्या *पागलखाना* आणि १९४३ साली प्रकाशित झालेल्या *सातपुड्यातील वनलक्ष्मी* या कादंबऱ्यातून मांडलेला आहे. या कादंबऱ्यातून त्यांनी राजकारणातील अनेक घडामोडी विस्तृत रुपात मांडून विक्रमच साधलेला आहे. पुढे १९४८

साली त्यांनी *दिव्यज्योती* ही कादंबरी १९४२ सालानंतरच्या क्रांतीनंतरचा भीषण काळाचा आरसा बनवलेली आहे. क्रांतीचे वारे वाहत असलेल्या या वलयात अनेक नव्या लेखिका जन्माला आल्या होत्या. त्यात रजनी गुहागर यांनीही १९४१ साली *जीवन'* ही कादंबरी लिहून अहिंसेचे धडे दिले आहेत.

१९४६ साली *विज्ञती ज्योत* लिहिणाऱ्या बहुजन समाजातील शांता शेळके यांनीही लौकिक दृष्ट्या मानाचे स्थान पटकावलेले आहे. त्यांनी *ओढ* (१९५०), *स्वप्नतरंग* (१९४५), *कोजागिरी* (१९४७), *भूवरील स्वर्ग* (१९४८), *सुखाची सीमा* (१९५०) इत्यादी कादंबऱ्या लिहून अनेक वेगवेगळया विषयांना हात घातलेला असल्याचे लक्षात येते. अत्यंत ओघवती शैली लेखनात असल्याने कादंबऱ्यांचा कस अधिक जोर धरताना दिसतो.

स्त्रियांनी आपले विचार, मते ही स्वतःपुरतीच मर्यादित ठेवावीत अशी शिकवण देणाऱ्या समाजात काही पुरुषांनी स्त्रियांची बाजू घेत उद्गार काढले आणि काही स्त्री लेखिकांनी तीच रीत पुढे घेऊन जाण्यासाठी स्वतंत्र्यपणे लेखन केले. मग ते देशसेवेचे असो की प्रीतीचे असो....

स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे हे सांगणारी *तृष्णा* नावाची कादंबरी १९४२ साली नलिनी मुळगावकर यांनी लिहिली तर उषादेवी यांनी *गोड स्वप्न* १९३६ साली लिहिली. इंदिरा पेंडसे यांनी *ललिता* १९३७ साली प्रकाशित केली तर १९४८ साली *सप्रेमभेट* ही कादंबरी तेजस्विनी तुळजापूरकर यांनी प्रसिद्ध केली. लीला देशमुख यांनी *मधुबोल* १९४९ साली प्रेमकथानक असलेली कादंबरी प्रकाशित केली. त्याचप्रमाणे कृष्णाबाई मोटे यांनी *मीनाक्षीचे जीवन* (१९४३) साली प्रकाशित केली. सुधा साठे यांनी *पुसलेली चित्रे* १९४७ मध्ये लिहिली. वरील सर्व कादंबऱ्यांमधून स्त्री नायिकांची पात्रे ही द्विधा मनस्थितीमध्ये अडकलेली दिसत आहेत. प्रेम की देशसेवा, शिक्षण की कुटुंब या इकडे आड आणि तिकडे विहीर असणाऱ्या परिस्थितीतही नायिका स्वविचारांवर कशा ठाम उभ्या राहतात, स्वतःमधील बंडखोर वृत्ती तितक्याच सहजपणे कशी अंमलात आणतात याचे चित्रण अतिशय रुचकर पद्धतीत वरील लेखिकांनी रेखाटले आहे. काही अंशी हे चित्रण वारंवार येत असले तरी प्रत्येक लेखिकेने वेगळेपण जपलेलेही लक्षात येते.

वरील लेखिकांप्रमाणेच मालतीबाई दांडेकर यांनीही स्त्रीप्रश्नांना अधोरेखित करत अनेक कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्या कादंबऱ्यातील नायिका अत्यंत कठीण परिस्थितीतही हार न मानणाऱ्याच आहेत. मात्र *वज्रलेख* घटस्फोटसारखा प्रश्न विचारात आणायला भाग पाडते. " सौ. मालतीबाई दांडेकर यांना वाटते, की कुटुंबाचे स्थैर्य व सुख स्त्रीच्या कर्तुत्वावर अवलंबून

आहे. स्त्रीला जर दु:ख भोगावे लागले तर तिने दु:खाशी झुंज द्यावी आणि समाजाचे दु:ख दूर करण्याचा सेवाभाव स्वीकरावा असे त्यांना म्हणावयाचे असते. लेखक हा समाजाचा मार्गदर्शक दिवा आहे या भूमिकेतून त्यांनी कादंबरीलेखन केलेले आहे. त्यामुळे प्रत्येक कादंबरीमध्ये त्यांनी वाचकांच्या मनावर काहीतरी ठसविण्याचे योजिलेले दिसते. *मातृमंदिर, तेजस्विनी, वज्रलेख, काटेरी मार्ग, कृष्णरजनी, अमरप्रीती,दुभंगलेले जग, संसारात पदार्पण, हिरा व गारगोटी, सुलिमानचा खजिना, वास्तू, तपश्चर्या भिंगरी,जिद्द.* इत्यादींपैकी कोणतीही कादंबरी सांगण्यासाठीच अवतरलेली आहे. त्यामुळे जीवनदर्शनाऐवजी बोधप्रदान हेच त्यांच्या लेखनाचे उद्दिष्ट आहे." [२]

विज्ञानाची जोड घेत सिंधू गाडगीळ यांनी १९४९ साली *क्षितिजापार* ही कादंबरी लिहून एक नवे आणि महत्त्वाचे वळण लेखनीदृष्ट्या घेतलेले असल्याचे लक्षात येते. कादंबरीतील नायक वैमानिक आहे तर इतर सर्व बारकाव्यांसह सिंधुबाईंनी कादंबरीचे वैशिष्ट्ये जपले आहे.

१९४८ साली शकुंतला परांजपे यांनी स्त्रियांच्या बालमनातील धागे हळुवारपणे जपणारी *घराचा मालक* ही कादंबरी लिहिली.

*माळरानात* (१९४१), *आविष्कार* (१९३४), *हिरवळीखाली* (१९३६), *फेरीवाला* (१९३८) इत्यादी स्त्री कादंबरीकार असलेल्या गीता साने यांची वैचारिकदृष्टी अतिप्रगतीशील असलेली जाणवते. राजकारण, गांधीवादी जीवन, चळवळ, स्त्री – पुरुष नाते संबंध, पीडित शेतकऱ्यांचे प्रश्न, सुशिक्षित बेकारांचे प्रश्न, वेश्या व्यवसाय, कुटुंबनियोजन यासारख्या असंख्य प्रश्नांचा पाठपुरावा गीता साने यांनी कादंबऱ्यातून केला आहे. तर *वठलेला वृक्ष, निखळलेली हिरकणी, लतिका* या कादंबऱ्यातून अतिशय पुरोगामी विचार मांडून स्वतःची निराळी छाप साहित्यिक विश्वात पाडलेली दिसते.

एकूणच १९२१ ते १९५० या कालखंडातील स्त्री कादंबरीकारांनी वास्तवाचे भान ठेवत आणि कल्पकतेची जोड घेत असंख्य प्रश्नांना अधिक अधोरेखित केले आहे. कादंबरीतील नायक नायिकांची सांगड वास्तविक जीवनाशी घालून अनेक व्यथा त्यांनी मांडलेल्या आहेत. त्याचबरोबर अज्ञात, कल्पित टोपणनावे असणाऱ्या अनेक कादंबऱ्यातून स्त्रीमनात घुसपुसणारी आणि दडपणाच्या ओझ्याने वाकणारी अनेक व्यक्तीरेखा प्रखर विचार समोर घेऊन येताना दिसते.

प्रारंभीच्या कादंबऱ्यातील मनोरंजनाची जागा कधी ज्वलंत प्रश्नांनी मिळवली याचा हा प्रवास अतिशय सुसज्ज वाटत आहे. स्त्री मनातील होणारे बदल, समाजातील बदल, पोटाची

खळगी भरण्यासाठी स्वीकारले जाणारे चुकीचे मार्ग, शेतकऱ्यांचे प्रश्न, सामाजिक भान, चळवळ, देशसेवा, विवाह, हुंडा, स्त्री – पुरुष नाते संबंध ते स्त्री – पुरुष समानता, कौटुंबिक कलह, धर्म, रूढी, परंपरा.... अशा असंख्य प्रश्नांची चर्चा या कादंबऱ्यातून वाचावयास मिळते. यावरूनच त्याकाळातील प्रश्न कसे आणि कोणत्या स्वरूपाचे होते हे लक्षात येते.

स्त्री कादंबरीकारांचा हा उतरतीला झेपावणारा आलेख त्यांच्या सर्वांगीण विकासाची आणि प्रगत विचारांची साक्ष देत आहे.

१९५० नंतरच्या काळात होणारे स्त्री कादंबरीकारांचे बहुआयामी प्रश्न आणि बदलत जाणारी जीवनशैली त्या काळातील स्त्रियांनी आपापल्या कादंबरीतून चित्रित केलीच आहे. त्याचा अभ्यास पुढील प्रकरणात केला आहे.

## क) १९५० ते २००० या कालखंडातील कादंबरीलेखन

भूतकाळातील वस्तूस्थिती आणि बदलत्या काळाशी समरस होऊन मांडलेले विचार १९५१ नंतरच्या कादंबरी लेखनात स्पष्ट होताना दिसत आहेत. " वस्तुत: बहुविध पात्रे व प्रसंग, विस्तृत अवकाश व आवाका असलेला, व्यक्तिजीवनातील व समाजजीवनातील स्थित्यंतरे मांडणारा, लेखकाला संपूर्ण स्वातंत्र्य देणारा 'कादंबरी' हा समग्रलक्ष्यी म्हणून महत्त्वाचा मानला जाणारा साहित्यप्रकार आहे. असे असतानाही स्त्रियांचे कादंबरीलेखन मात्र दुर्लक्षित राहिले आहे. त्यातही कधी तात्कालिक परिस्थितीजन्य कारणांमुळे (उदा. रोहिणी कुलकर्णी यांच्या *'भेट'* या लघुकादंबरीवर तसेच शांता गोखलेलिखित *'रीटा वेलिणकर'* या कादंबरीवर चित्रपट प्रदर्शित झाल्याने) मूळ कादंबऱ्यांकडे वाचकांचे लक्ष वेधले गेले. आशा बगे यांच्या *'भूमी'* या कादंबरीला प्रादेशिक स्तरावर सर्वोच्च मानला जाणारा 'साहित्य अकादमी' चा पुरस्कार लाभला. लेखिकांच्या कादंबऱ्या चर्चाविषय ठरल्या. त्यावर वृत्तपत्रांत, नियतकालिकांत परीक्षणे प्रसिध्द झाली."[३] मात्र पौराणिक, ऐतिहासिक कादंबऱ्यांमध्येही काही स्त्री कादंबरीकारांनीही स्वतःला झोकून दिले आहे. वाचकांची रसिकता ओळखूनच एकच विषयावर अनेक लेखिकांनी कादंबरी लिहून वेगळेपण कायम टिकवूनही ठेवले आहे.

१९५१ नंतरच्या कादंबऱ्यांचा अभ्यास करताना विशिष्ट टप्प्यांचा विचार करणे योग्य वाटते.... पौराणिक कादंबरी, ऐतिहासिक कादंबरी, संत चरित्रात्मक कादंबरी, ग्रामीण

कादंबरी, राजकीय कादंबरी, सामाजिक कादंबरी, कौटुंबिक जीवनातील कादंबरी, प्रेमविषयक कादंबरी.... या विविध वर्गीकृत टप्प्यांतून कादंबरीची वाटचाल अतिशय विस्तृत आणि कायापालट करणारी ठरत आहे.

पौराणिक कादंबरी लेखनात सरोजिनी शारंगपाणी, सुमती क्षेत्रमाडे, अरुणा ढेरे, आशा बगे, सुमती इनामदार, शैला बेल्हे, रेखा बैजल, शुभांगी भडभडे, लीला दीक्षित इत्यादी स्त्री लेखिकांनी ठसा उमटविला आहे. विविध अंगांनी, विविध पद्धतीने पौराणिक साहित्यात त्यांनी भर घातली आहे. योगेश्वर, श्रीकृष्ण, नलदमयंती, मैत्रेयी, उर्वशी, द्रौपदी, गांधारी, परशुराम, दुष्यंत – शकुंतला अशी निरनिराळी पौराणिक पात्रे यांच्या कादंबरीचा विषय ठरली आहेत. महाभारत, रामायण आणि पौराणिक कथा त्याच फक्त त्यातील विविध व्यक्तींच्या भोवती फिरणारे कथानक गुंफण्यात लेखिका यशस्वी झाल्या आहेत.

कर्ण, गांधारी, अश्वत्थामा, कृष्ण हे विषय वारंवार निवडले गेल्याचेही तत्कालीन परिस्थितीचा विचार करताना लक्षात येतात. तर काही प्रमाणात लेखिकांना महान आदर्श समाजापुढे ठेवण्याची उत्सुकता अधिक असल्याचेही लक्षात येते. ललित वाङ्मयात किंवा कल्पितरम्यता असलेल्या साहित्यात आदर्श आणि जीवनमूल्य नसल्यांचेही त्या मानतात. म्हणूनच महापुरुषांच्या त्यांच्या उद्देश्याने प्रेरित झालेल्या समाजाचे दर्शनही काही कादंबऱ्यातून पहावयास मिळते.

शुभांगी भडभडे यांनी *पद्मगंधा* ही पौराणिक कादंबरी लिहून वास्तविक जीवनाशी त्याची नाळ कशी जोडली आहते?, तेच प्रश्न आताही कसे भेडसावत आहेत? हे या कादंबरीतून मांडले आहे. त्यांनी *पूर्णविराम* ही कादंबरी लिहून श्रीकृष्णाचे वेगळे रूप, वेगळी प्रतिमा वाचकांपुढे मांडली आहे.

सुमती क्षेत्रमाडे यांनीही श्रीकृष्णावर *योगेश्वर श्रीकृष्ण* ही कादंबरी तपशीलवारपणे लिहिली आहे तर नळराजाच्या जीवनावर *नलदमयंती* ही आटोपशीर कादंबरी लिहिली आहे. १९८७ साली त्यांनी गांधारीवर *सत्यप्रिय गांधारी* ही कादंबरी प्रकाशित केली आहे. या कादंबरीत महाभारतातील नायक, खलनायक, जेष्ठ, कनिष्ठ, श्रेष्ठ अशा विविध प्रकारे गाठ, निरगाठ, उकल या पद्धतीने मांडणी केली आहे. आणि गांधारीच्या निवेदनातील ही कादंबरी वाचकप्रिय ठरली आहे.

१९९६ साली सरोजिनी शारंगपाणी यांनी पुन्हा गांधारी हाच विषय घेऊन *गन्धारी* ही कादंबरी लिहिली. या कादंबरीमध्ये अंध नवऱ्याबरोबर जीवन व्यतीत केलेल्या एका सोशिक पत्नीचे एकंदरीत चरित्रच वाचावयास मिळते. १९९६ मध्येच *ब्रम्हास्त्र* ही कादंबरी त्यांनी

लिहिली. ब्रम्हास्त्र प्राप्त असलेल्या व्यक्तींबद्दल त्यांनी वेगवेगळया प्रकारची मते मांडली आहेत. क्रोध, अहंकार, सूड आणि नैराश्य अशी सांगड घालत त्यांनी कादंबरी कर्ण, द्रोणाचार्य, अश्वत्थामा, अर्जुन, कृष्ण आणि एकूणच मानवजातीची शोकांतिकाच यातून मांडली आहे.

२००० साली सुमती इनामदार यांनी *अश्वत्थामा* हे महाभारतातील पात्र अधोरेखित करून उच्चकुलीन, सुसंस्कारित, पितृभक्त, मैत्रीची भाषा ओळखणाऱ्या अश्वत्थामाच्या मनातील प्रत्येक भावनेच्या अंगाने सुमती इनामदारांनी तो कसा हिंसक होत गेला हे विस्तृतपणे सांगितले आहे.

१९९६ मध्ये आशा बगे यांनी *कुरुक्षेत्रे* ही कादंबरी लिहून द्रोणाचार्य, त्यांचे गुरुकुल, विद्यार्थी ही कथानकाची सांगड घालत कादंबरीची लेखनशैली उंचावत कादंबरी वाचकप्रिय ठरवली आहे. "१९७८ साली त्यांची पहिली कादंबरी *'मनस्विनी'* प्रकाशित झाली. त्यानंतरच्या सुमारे तीन दशकांच्या काळात त्यांच्या काही कादंबऱ्या प्रामुख्याने दिवाळी अंकातून व नंतर पुस्तरुपाने वाचकांपुढे आल्या. आजतागायत त्यांनी लिहिलेल्या कादंबऱ्या पुढीलप्रमाणे आहेत. *मनस्विनी* (१९७८), *झुंबर* (१९८४), *त्रिदल* (१९९४), *धर्मक्षेत्रे* (१९९६), *सेतू* (२०००), *भूमी* (२००४), *भुमिका आणि उत्सव* (२०११)." [४]

अरुणा ढेरे यांनी १९८९ साली *उर्वशी* ही कादंबरी लिहून एकाप्रकारे तिच्या आयुष्यातील प्रेमकथाच आणि तिचे रूप हे प्रणयिनी म्हणूनच अधिक विलोभनीय दृष्ट्या मांडले आहे. १९८७ साली अरुणा ढेरे यांनीच *मैत्रेयी* ही कादंबरी लिहिली.

मैत्रेयीच्या आयुष्याचीही विविध टप्प्यातील विचारशैली लेखिकेने मांडली आहे. मैत्रेयी ही एक प्रसिद्ध विदुषी आणि म्हणूनच लेखिकेला ती अधिक भावल्याचेही स्पष्ट होते.

१९७० साली *भगवान परशुराम* ही मृणालिनी देसाई यांनी लिहिलेली कादंबरी भगवान परशुराम या महानमानवाच्या अन्यायाला प्रतिकार करण्याची प्रेरणा देणाऱ्या प्रतिभेची आहे.

१९९३ मध्ये लीला दीक्षित यांनीही *स्वामी अपरांताचा* ही कादंबरी भगवान परशुराम यांच्यावर प्रकाश टाकणारीच लिहिलेली आहे.

१९९३ साली विजया जहागीरदार यांनी *ययाती कण्या माधवी* ही कादंबरी लिहिली. माधवीचे संपूर्ण आयुष्य कसे बेचिराख होते याची अंतर्मुख करणारी कथा अत्यंत प्रांजळपणे सांगितली आहे.

१९९४ साली शैला बेल्हे यांनी *दक्षिणायन* ही कादंबरी लिहून त्यातील रामायणातील

अत्यंत दुर्लक्षित पात्रांचाही वेध घेतला आहे. आणि ओघाने सतत घोकत असणाऱ्या घटनेच्या मागे नेमके काय प्रयोजन असेल असेही लेखिका विचार करायला भाग पाडते.

*युगावर्त* ही रेखा बैजल यांची कादंबरी १९९४ साली त्यांनी प्रकाशित केली. उपनिषदांचा वैचारिक आशय मांडणारी ही कादंबरी ठरत आहे.

तारा वनारसे यांनीही २००० साली शुर्पणकेच्या आयुष्यातील उदासीनता अधोरेखित करत *शामिनी* ही कादंबरी लिहिली आहे. तर *सुर* (१९८५) ही कादंबरी वसुमती आणि राजीव व रमण हे दोन जुळे भाऊ यांच्या परस्पर प्रेमाची कथा आहे. “ ‘*सूर*’ आणि ‘*श्यामिनी*’ या दोन्ही कादंबऱ्यांची मध्यवर्ती पात्रे स्त्रियाच आहेत परंतु या कादंबऱ्यांना स्त्रीकेंद्री कादंबऱ्या म्हणता येणार नाही. या दोन्ही कादंबऱ्यांचा अनुभव त्यापलीकडे जाणारा आहे. सूर ही कादंबरी स्वातंत्र्योत्तर काळाशी नाते जोडणारी व त्या पार्श्वभूमीवर मानवी मनाची भावनांची अतर्क्यता साकार करणारी आहे तर ‘*श्यामिनी*’’ ही प्राचीन भारतीय इतिहासातील एका पैलूचे दर्शन घडवणारी अशी आहे. ‘*सूर*’ या कादंबरीचे स्वरुप, सावित्री, देव चालले, काळोखाचे अंग यासारख्या मिताक्षरी शैलीतून व्यापक अनुभवाचे सूचन करणाऱ्या मराठीतील वैशिष्टपूर्ण कादंबऱ्यांशी नाते सांगणारे असे आहे. श्यामिनी मात्र मराठी कादंबरीच्या परंपरेत वेगळी ठरणारी, नवा प्रवाह निर्माण करण्याची क्षमता असलेली कादंबरी आहे असेच म्हणावे लागते. व्यापक अनुभवसूत्रे, त्यांच्याशी पूर्णपणे एकजीव होणारी निवेदनशैली आणि मानवी जीवनविषयक शाश्वत अनुभवाचे प्रकटीकरण करण्याची क्षमता या दोन्ही कादंबऱ्यांमध्ये आढळते. त्यामुळे दोनच कादंबऱ्या लिहूनही तारा वनारसे हे नाव मराठी कादंबरी विश्वात महत्वाचे ठरते यात शंका नाही.”[५]

रेणू देशपांडे यांची *सम्राज्ञी* १९७७ साली, मधुवंती सप्रे यांनी *द्रौपदी* १९९१ साली तर सुमती क्षेत्रमाडे यांनी *याज्ञसेनी* १९८८ साली लिहून द्रौपदीचे आयुष्य अधिक निरनिराळ्या दृष्टीने पाहून लेखनीबद्ध केले आहे.

एकूणच पौराणिक साहित्याकडे व्यापक दृष्टीने पहाण्याचा स्त्री लेखिकांचा हा प्रयत्न अतिशय वाखाणण्याजोगा आहे.

ऐतिहासिक कादंबरी लेखनाचा विचार करताना प्रसिद्ध युगपुरुषांच्या शौर्यगाथा यातून अधोरेखित झाल्या आहेत. महानमानवांच्या आचार विचार पद्धतीतून पुढील पिढीस आदर्श अशा गाथा यातून समोर येतात. ऐतिहासिक कादंबरी लेखनात पुरुष लेखक वर्गाच्या

कादंबऱ्या अधिक लोकप्रिय झाल्याचा आलेख आहे. मात्र त्यानंतर स्त्री वर्गानेही यात विशेष कामगिरी बजावल्याचेही लक्षात येते. १९७० नंतर नयनतारा देसाई, मृणालिनी देसाई, संजीवनी खेर, विलासिनी आरेकर, भारती सुदामे, नंदा खरे, शांता योगी, सुशीला खेडकर.... इत्यादी लेखिकांनी ऐतिहासिक कादंबरीत योगदान दिलेले आहे.

पौराणिक कादंबऱ्यांप्रमाणेच ऐतिहासिक कादंबऱ्यांमधून एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या कार्याचा आढावा घेताना वेगवेगळया अंगांनी वेगवेगळया लेखिकांनी कादंबरीची रचना केलेली दिसते.

सम्राट अशोक यांच्या जीवनावर अनेक कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. संजीवनी खेर यांनी *देवनाम् प्रिय* ही कादंबरी अशोकाच्या जीवनाचा वेध घेणारी लिहिली तर मालतीबाई दांडेकर यांनी *चक्रवर्ती* ही कादंबरी लिहिली. मालतीबाईंच्या कादंबरीचा आवाका मोठा असून त्यात विस्तृतपणा आहे. संपूर्ण आयुष्याची वेगवेगळया पद्धतीने मांडणी केली असली तरी कादंबरी अतिशय उत्कृष्ट ठरली आहे. सुशीला खेडकर यांनी *शापिता* ही कादंबरी लिहिली. नयनतारा देसाई यांनी *समिधा* तर शांता योगी यांनी *स्वामिनी* या कादंबऱ्या लिहून ऐतिहासिक पात्रांशी अधिक ओळख करून दिली आहे.

१९७५ मध्ये *बिल्वदल* ही कादंबरी मृणालिनी देसाई यांनी अहिल्याबाई होळकरांच्या संपूर्ण जीवनाचा परामर्श देणारी ठरवली आहे. बालपण, तरुणपण, कर्तेपण आणि वारसा अशा टप्प्यात कादंबरीचा बाज असून अहिल्याबाईच्या तडफदार व्यक्तित्वाचे येथे दर्शन होते.

*मलिका – ए – हिंदोस्तान – नूरजहान* ही संजीवनी खेर यांनी १९९९ मध्ये लिहिलेली कादंबरी नूरजहान या एका कर्तव्यनिष्ठ स्त्रीचे राजकारभार आणि वैयक्तिक जीवनावर भाष्य करणारी आहे.

२००० मध्ये *शापिता* नावाची कादंबरी सुशीला खेडकर यांनी लिहून ऐतिहासिक युगातील उपेक्षितांना न्याय देण्याच्या विचाराने लिहिल्याचे वाटते. *शापिता* मध्ये पेशवेकालीन खलनायिकेच्या भूमिकेत आनंदीबाईच्यावरील कलंक त्यांनी पुसण्याचा प्रयत्न केला आहे. तर '*शिवस्नुषा*' ही महाराणी येसूबाईच्या जीवनावरील कादंबरी उल्लेखनीय ठरली आहे.

इंदुमती केळकर यांनी *सुलताना रझिया* ही कादंबरी लिहून रझियाच्या जीवनातील अनेक घटना अधोरेखित केल्या आहेत. श्रीमंत बाजीरावांच्या जीवनातील राणी मस्तानीच्या जीवनातील कडू – गोड प्रसंगाची गुंफण *फुलंगी* या कादंबरीत नलिनी सहस्त्रबुद्धे यांनी केली

आहे. राणा कुँवरसिंहावर आधारलेली *रत्नकमल* ही कादंबरी मृणालिनी जोशी यांनी लिहिली तर महादजी शिंदे यांच्यावर प्रेम करणाऱ्या एका खेड्यातील तरुणीची व्यथा असलेली कादंबरी शिरीष पी यांनी *लालन बैरागीण* या नावाने लिहिली. राणी चन्नमाच्या जीवनावर *समिधा* ही कादंबरी नयनतारा देसाई यांनी लिहिली. *समर्पिता* या नावाने नानासाहेबांची पत्नी यांच्या जीवनाचा आढावा घेणारी कादंबरी लिहिली. विलासिनी आरेकरांनीही *वादळवारा* या नावाने काशीबाईंच्या जीवनाची व्यथा मांडलेली आहे. तर महाराणा प्रतापांच्या जीवनाची कहाणी सांगणारी कादंबरी *प्रणवीर* या नावाने भारती सुदामे यांनी लिहिली.

काळ सरकत गेला तसा कादंबरी लेखनाचे विषयही बदलत गेले. स्वातंत्र्य लढ्यातील कर्तुत्ववान पुरुषांवर, व्यक्तींवर कादंबरी लेखन होऊ लागले. भगत सिंगाच्या जीवनावर आधारित *इन्कलाब'* ही कादंबरी १९७६ साली मृणालिनी जोशी यांनी लिहिली. तर शैलजा राजे यांनी १९६९ साली स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जीवनावर आणि कार्यावर प्रकाश टाकणारी *यज्ञ* ही कादंबरी लहिली. १९६९ साली *पुत्र मानवाचा* ही चरित्रात्मक कादंबरी गांधीजींच्या लढ्याची साक्ष देणारी ठरली. तिची रचना मृणालिनी देसाई यांनी केली आहे. नयनतारा देसाई यांनी संताजी घोरपड्यांच्या जीवनावर *पराक्रमाची शर्थ जाहली* ही कादंबरी १९९३ साली लिहिली. शांताबाई गोखले यांनी *वृंदावन* १९६९ साली लिहून सावरकरांच्या धर्मपत्नी माई यांचे चित्रण रेखाटले आहे. १९९८ साली आचार्य विनोबा भावे यांच्या जीवनावर आधारित *भौमर्षी* ही कादंबरी शुभांगी भडभडे यांनी लिहिली आहे.

ऐतिहासिक कर्तुत्ववान व्यक्तींप्रमाणेच संतसाहित्याला योगदान दिलेल्या अनेक संतांवर कादंबरी लेखन झाले. १९७६ साली *मुक्ताई* ही कादंबरी मृणालिनी जोशी यांनी लिहिली. तर वेणाबाईंवर आधारित *वेण्णास्वामी* १९८९ मध्ये त्यांनी प्रकाशित केली. मुक्त केणेकर यांनी बहिणाबाईंवर *पताका* ही कादंबरी १९७५ मध्ये लिहिली. संत चोखामेळांचे जीवनदर्शन उलगडणारी *महाद्वार* ही कादंबरी १९९० मध्ये अरुणा ढेरे यांनी लिहिली. १९८५ साली कान्हेपात्रेच्या जीवनातील व्यथा सांगणारी *चंदनवेल* नावाची कादंबरी लीला दीक्षित यांनी लिहून वाचकांसमोर ठेवली. विद्या सप्रे – चौधरी यांनी *कृष्णमयी* ही १९९० ला मीराबाईंच्या जीवनाचा परामर्श घेणारी कादंबरी प्रकाशित केली. तर मीराबाईंच्या जीवनावर मृणालिनी देसाई यांनीही *योगिनी* नावाने कादंबरी लिहिली. मुक्त केणेकर यांनी १९९६ साली *दिग्विजय* ही स्वामी विवेकानंदांवर लिहिलेली कादंबरी अतिशय उत्कृष्ट

ठरली आहे.

संतसाहित्यामध्ये सर्वाधिक कादंबऱ्या लिहिण्याचा मान लीला गोळे यांना जातो. ओघवती विचारशैली आणि चिकित्सक प्रवृत्तीमधून त्यांची प्रत्येक कादंबरी वाचनीय ठरली आहे. *संत एकनाथ, बहिणाबाई, एकनाथांची पत्नी गिरिजाबाई, संत नामदेव, नरसी मेहता, संत ज्ञानदेव, संत तुकाराम, गजानन महाराज, अक्कलकोट स्वामी* अशा विविध कादंबऱ्यातून स्वतःची छाप पाडत लीलाबाईंचे लिखाण यशस्वी ठरले आहे.

१९०० ते १९५० या कालखंडातील कर्तुत्ववान स्त्रियांनी आपले जीवन कसे व्यतीत केले, समाजासाठी कोणते आणि कोणत्या खडतर प्रसंगातून योगदान दिले. हे विषय घेऊन १९७० नंतरच्या लेखिकांनी कादंबरी लेखन केले. "ज्योत्स्नाबाईंची १९६७ मध्ये *'घर गंगेच्या* काठी' ही पहिली कादंबरी प्रसिद्ध झाली. तेव्हापासून २००६ साली प्रसिद्ध झालेल्या '*आंधळी कोशिंबीर'* पर्यंत जवळ जवळ चाळीस वर्षे ज्योत्स्नाबाई सातत्याने कादंबरी लेखन करीत होत्या. या काळात त्यांच्या २४ कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत. साहित्यप्रेमी भगिनी मंडळातील लेखिकांनी प्रत्येकी एक प्रकरण लिहून तयार केलेल्या *'वाळवंटातील वाट'* (१९७०) या कादंबरीच्या लेखनातही ज्योत्स्नाबाईंचा सहभाग होता." [६] ज्योत्स्ना देवधर यांनी *उत्तरयोगी* १९७३ साली तर *पंडिता रमाबाई* १९८९ साली लिहून त्यांच्या जीवनकार्याचा विस्तृत आलेख मांडलेला आहे. "स्त्री, स्त्रीचे जीवन, स्त्रीचे भावविश्व हा ज्योत्स्नाबाईंच्या चिंतनाच व लेखनाचा प्रामुख्याने विषय आहे. स्त्रीकेंद्री सामाजिक कादंबरी आणि चरित्रात्मक कादंबरी असे ज्योत्स्नाबाईंच्या कादंबरी लेखनाचे दोन प्रकार आहेत." [७] तर १९९८ मध्ये आशा कर्दळे यांनी इंग्रजांच्या स्त्रीवर्गाचे भेदक चित्रण मांडणारी *विदेश* ही कादंबरी लिहिलेली आहे. भारतावर राज्य करणाऱ्या शत्रूंच्या स्त्रिया म्हणून नाही तर त्या केवळ एक माणूस म्हणूनही कशा उपेक्षित राहिल्या याची ही कहाणी आशाजींनी मांडली आहे.

शुभदा गोगटे यांनी *खंडाळ्याच्या घाटासाठी* १९९२ साली लिहून आशिया खंडातील सर्वात पहिली आगगाडी १६ एप्रिल १८५३ साली बोरीबंदर ते ठाणे अशी धावली त्याचा इतिहास यातून मांडलेला आहे. तर *वज्रलेख* ही १९९० मधील कोणार्क येथील सूर्यमंदिराचा इतिहास उलगडणारी कादंबरी विद्या सप्रे यांनी लिहिली. अनेक दाखले देत या कादंबरीचे कथानक पुढे सरकते. एकूणच ऐतिहासिक कादंबऱ्यांमधून विक्रमीपणा आणि कर्तुत्ववान व्यक्तींच्या गुणांबरोबर नव्याने ओळख होते हे नवलच आहे.

कादंबरीचा विस्तृत आवाका पहाता अनेक प्रकारात वर्गीकृत झालेली कादंबरी वेगवेगळया स्वरुपात वाचकास वाचावयास मिळते. त्यातीलच ग्रामीण बाज असलेल्या कादंबऱ्यांचे लेखनही स्त्रियांनी केलेले दिसते.

शांताबाई शेळके यांनी कोष्टीजीवनावर लिहिलेली १९५० सालची *ओढ* ही कादंबरी ग्रामीण बाजावरच आधारलेली आहे. १९९९ साली ग्रामीण जीवनाचे भाष्य करणारी *बढाई* ही कादंबरी प्रतिमा इंगोले यांनी लिहिलेली आहे. कऱ्हाडी पार्श्वभूमीवर ही कादंबरी विस्तृत आकार घेताना दिसते. तसेच ग्रामीण जीवन जगणाऱ्या स्त्रियांच्या मनातील प्रश्न, त्यांना झेलावी लागणारी परिस्थितीचा आढावा घेणाऱ्या *राहुकेतु* आणि *जिनगानी* या कादंबऱ्या माथु सावंत यांनी लिहिल्या आहे. अतिशय अंतर्मुख करणारी भाषाशैली आणि विचारशैली यात वाचावयास मिळते.

पौराणिक आणि ऐतिहासिक व्यक्तींवर अनेक स्त्रियांनी वेगवेगळया पद्धतीने, वेगवेगळया अंगी विचार करून कादंबऱ्याचे लेखन केले, त्या तुलनेने ग्रामीण पार्श्वभूमीवर अत्यंत अल्प लेखन स्त्रियांचे असलेले प्रकर्षाने जाणवते.

“*रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग* (१९६४), *काळा सूर्य* (१९६८), *हॅट घालणारी बाई* (१९७०) या तीन लघुकादंबरी ! कमल देसाई यांचे कादंबरीलेखन सर्व लेखिकांपेक्षा वेगळया जातीचे व वेगळया जाणिवेचे. त्या सगळया प्रतिकात्मक कादंबऱ्या आहेत. त्यामागे कमलाताईंची एक जीवनविषयक तात्त्विक भूमिका आहे. माणसाच्या वाट्याला दु:ख भोग येतात ते भोगण्यावाचून गत्यंतर नाही. अजस्त्र आंधळया नियतीशी झुंज घेणारा माणूस पार मोडून जातो. हा विचार जसा त्यांच्या लेखनातून आविष्कृत होतो, तसा त्यांना सतत सलत राहणारा प्रश्न म्हणजे ‘स्त्री कशी स्वतंत्र होईल?’ एक भग्न विश्व व्यक्त करताना त्यांना ‘फॅंटसी’ अधिक युक्त वाटते.”[८] राजकीय स्वरूपाच्या कादंबऱ्यांमध्ये कमल देसाई यांची १९६४ सालची *रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग* ही उल्लेखनीय कादंबरी ठरते. राजकारणातील भडक रंग नसलेली परंतु मथितार्थ मांडलेले ही कादंबरी लक्षणीय ठरते. तर १९९७ साली इंद्रायणी सावरकर यांनी *वारस* ही राजकीय गुण – दोषाचे वर्णन करणारी कादंबरी लिहिली. राजकीय कादंबऱ्यांमध्ये कल्पित पात्राचा आधार घेत तत्कालीन परिस्थितीचा आढावा या लेखिकांनी घेतलेला आहे.

ग्रामीण कादंबऱ्यांप्रमाणेच १९५० नंतरच्या राजकीय कादंबऱ्यांमध्ये स्त्रीयोगदान अल्पप्रमाणातच आहे.

तंत्र युगातील कादंबऱ्यांमध्ये काही अंशी स्त्रियांनीही बाजी मारलेली दिसते. रेखा बैजल यांनी विज्ञानाची साथसंगत करत १९८९ साली *अग्निपुष्प* ही कादंबरी लिहिली आहे. वैज्ञानिक युगात ही कादंबरी लिहिताना त्यांनी अनेक गोष्टी अत्यंत सूक्ष्मपणे मांडलेल्या स्पष्ट होतात. अणुस्फोट आणि त्यानंतरची परिस्थिती त्यांनी कादंबरीत चित्रित केली आहे. त्यांच्याप्रमाणेच शुभदा गोगटे यांनी *यंत्रायणी* ही १९८१ साली लिहिलेली कादंबरी ही वाचकप्रिय ठरली आहे. कादंबरीतील मृत नायिका यंत्रमानवाच्या सहाय्याने जीवन व्यतीत करते पण कसे आणि कुठे पर्यंत याची उकल करणारी ही लक्षणीय कादंबरी ठरते.

कौटुंबिक आणि सामाजिक चित्रण असलेल्या कादंबऱ्यातून अनेक प्रश्न स्त्री लेखिकांनी त्यांच्या लेखनीतून पुढे आणलेले आहेत. १९६५ साली मालतीबाई दांडेकर यांनी *वास्तु* या कादंबरीतून स्वातंत्र्याचा लढा, फाळणी, गांधीहत्येनंतर माजलेला सामाजिक डोम आणि यात विखुरलेल्या कुटुंबियांची व्यथा मांडलेली आहे. ज्योत्स्ना देवधर यांच्या १९६७ सालच्या *घरगंगेच्या काठी* या कादंबरीतून एकत्र कुटुंबपद्धती समोर येतात. स्त्री जीवनाची ही सोशिक व्यथा त्यांनी मांडली आहे. या कादंबरीला महाराष्ट्र सरकारने गौरविले आहे. त्यानंतर १९६८ ला ज्योत्स्नाबाईंनी *कल्याणी* नावाची कादंबरी लिहून शापित वास्तूचे वर्णन अत्यंत प्रभावीपणे केले आहे. एकत्र कुटुंबातील हेवेदावे, स्त्री मनाची कुचंबणा आणि रीतीरिवाज, व्रतवैकल्य यांचे दर्शन घडवले आहे. कौटुंबिक कलह असलेल्या त्यांच्या अनेक कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. घरातील आणि घराला जोडल्या गेलेल्या अनेक व्यक्तींचे दर्शन आणि एकूणच प्रत्येक नात्यातून पुढे जात असणाऱ्या स्त्री मनाची त्यांची मांडणी अत्यंत प्रांजळपणे मांडली आहे. *वाळूचे फूल* (१९७३), *पडझड* (१९७९), *चिमणीच घर मेणाचं* (१९७५), *एक अध्याय* (१९८०), *ऐलतीर – पैलतीर* (१९७६), *एक श्वास आणखी* (१९८६), *बुटक्या सावल्या* (१९८५), *पुतळा* (१९७६) इत्यादी निरनिराळया कादंबऱ्यातून त्यांनी अतिशय आव्हानात्मक लेखन केले आहे.

१९८२ मध्ये अनुराधा वैद्य यांच्या *राणीवसा* या कादंबरीतूनही सामाजिक, आर्थिक, भावनिक, मानसिक प्रश्नांनी पोखरलेल्या कुटुंबाची कथा समजते.

याच पार्श्वभूमीवर *कथा एका बुकळची* (१९९२), *टिकली एवढं तळं* (१९८०), *बन्सी काहे कॉ बजायी* (१९८४), *सलत सूर सनईचा* (१९९६) या कादंबऱ्या लिहिणाऱ्या निर्मला देशपांडे यांनी अत्यंत मोजक्या आणि ओघवती शैलीचा आधार घेत कादंबरीचे लेखन केले आहे. माळव्यातील संस्थानाची माहिती देताना घर हा प्रत्येक जीवाचा जिव्हाळयाचा प्रश्न कसा बनत जातो याचे एक सुंदर उदाहरण लेखिका कादंबरीत देते. त्याचबरोबर प्रेमकथाही

लेखिका अत्यंत हळूवारपणे जपताना दिसते.

घर, आंगण, बाग, घरातील माणसे, त्यांच्या वृत्ती, प्रवृत्ती, वडीलधाऱ्यांचे मान – अपमान, वाद – विवाद, मर्यादा, सामाजिक प्रश्न, राजकीय प्रश्न आणि एकूणच प्रत्येक नात्यातून होत जाणारा प्रवास कधी अत्यंत हेकट होतो तर कधी वासरांप्रमाणे निपचित पडतो.... या पार्श्वभूमीवर अनेक स्त्री लेखिकांनी कादंबरीचे लेखन केले. अनेक लेखिकांनी एकत्र कुटुंबपद्धतच योग्य आणि ती टिकवलीच पाहिजे या सुराचे लेखन केले असले तरी परिस्थितीनुसार आणि बदलत्या जीवनशैलीचा आधार घेत एकत्र कुटुंब पद्धतीतील मजाच आपण हरवून बसलेलो आहोत. अनेक घराणांच्या इतिहास स्त्री कादंबरीकारांच्या कादंबरीतून वाचावयास मिळतो तेव्हा ती एक कल्पना वाटू लागते.

मृणालिनी देसाई यांच्या १९९४ सालच्या कादंबरीतून *इनामदार* वाड्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि गुंफलेले कथानक सापडते. लीला दीक्षित यांच्या *गोत* या कादंबरीतूनही नातेसंबंधाची एक सुबक वीण समोर येते. आणि त्यातील मनावर कोरली जाणारी एका वृद्ध स्त्रीची करुण कहाणीही पहावयास मिळते. स्त्री मनाचे अनेक कोपरे त्यांनी लेखनीद्वारे प्रकाशमय केल्याचे समजते. त्याच पार्श्वभूमीवर १९७८ साली शैलजा राजे यांनी *संचित* ही कादंबरी लिहिली. इंद्रायणी सावरकर यांनी *सती* आणि शकुंतला गोगटे यांनी *जगावेगळं नातं* १९८६ साली लिहिली. वरील सर्व कादंबऱ्यातून एकत्र कुटुंब पद्धत, रीतीरिवाज, दैनंदिन जीवनाची ओळख, सामाजिक स्थान, पुरुषप्रधानता आणि माणूस म्हणूनही किंमत नसलेल्या सतत दुय्यम मानलेल्या, जीवनाचे ओझे सांभाळत दडपून गेलेल्या स्त्रियांच्या मनातील उसळती धग मांडलेली आहे.

कुटुंबानंतर प्रकर्षाने प्रीतीविषयक कादंबरीचा आलेख उंचावलेला आहे. बंडखोर लेखिकांनी अनेकप्रकारे प्रीतीविषयक कादंबरीतून अनेक प्रश्न समाजापुढे मांडले आहेत. लेखिकांमधील बंडखोरपणा त्यांना सहजपणे रेखाटता आला असला तरी त्यांनी तो त्यांच्या नायिकांमध्ये नक्कीच उतरवलेला नाही. प्रेम, प्रेमविवाह आणि दुर्दैवाने आले एकाकीपण या वळणावळणाच्या रस्त्याने जाताना नायिकांची घुसमट लेखिकांनी अधोरेखित केली आहे. प्रेमातील दरी, बलिदान, संघर्ष अन फसवे चेहेरे लेखिकांनी अत्यंत वैचारिकदृष्ट्या मांडलेले आहेत.

शकुंतला गोगटे यांनी त्यांच्या अनेक कादंबऱ्यामधून कुटुंबव्यवस्था आणि प्रेमविषयक भाष्य करणारे आणि पर्यायाने अनेक संदेश देणारे कथानक मांडलेले आहे. *चाहूल* (१९७८), *कशाला उद्याची बात* (१९७९), *स्मृतीभ्रंश* (१९७७), *शून्याची व्यथा* (१९९१), *चांदणे*

*शिंपित जा, अनुभव, सावली, सर्वसाक्षी, जगावेगळं नातं* या कादंबऱ्यांतून त्यांनी अनेक भावनिक गोष्टींची उकल केली आहे.

अपयशी ठरलेले विवाह, विषम विवाह, विधवापण, पुनर्विवाह, ताणतणाव, नवऱ्याची प्रेमिका, पत्नीचा प्रियकर, मतभेद या आणि याहून अधिक नाजूक विषयांमध्ये कथानकाला वेग देत अनेक कादंबऱ्या पूर्ण झाल्या आहेत. कल्पना जाधव यांची *उपेक्षिता* आणि *यमुना शेवडे* यांची *पूर्णाहुती* याच बाजावर आधारलेले आहेत. योगिनी जोगळेकर, कुसुम अभ्यंकर, नायना आचार्य मंदाकिनी भडभडे, शैलजा राजे.... अनुराधा वैद्य यांची १९९९ सालची *क्षणकाल* ही कादंबरी आणि वरील स्त्री कादंबरीकारांनी वेगवेगळे कथानक घेऊन अतिशय सकस केलेले लिखाण आपसूकच वाचकांना तृप्त करत आहे.

अनेक कादंबरीतील नायिकांच्या जीवनात सततची ससेहोलपट परिस्थिती मन सुन्न करून जाते. सतत कोणत्या न् कोणत्या परिस्थितीला तोंड देताना त्यांनी अचानक केलेले बंडही रूढ वाटू लागते. सुडाने पेटलेल्या आणि नैसर्गिक भूक भागविण्यात फसलेल्या, मोह क्षणात अडकलेल्या नायिका अधिक अभागी वाटू लागतात.

मालतीबाई दांडेकरांच्या १९७० च्या *भिंगरी* या कादंबरीतून अनाथ मुलीचे अखेरपर्यंतचे जीवन कसे कष्टमय आहे ह्याचे वर्णन आहे. तर १९९० साली रिटा वेलिणकर या नावाने शांता गोखले यांनी कादंबरी लिहून पती – पत्नीमधील तिसऱ्या व्यक्तीने केलेले पर्दापण किती त्रासदायक ठरते याचे वर्णन केले आहे. *रसतृष्णा* ही याच वळणाची कादंबरी आहे. लीला श्रीवास्तव यांनी *गटार आणि गंगाजळ* (१९६९), *गंगा वाहते आहे* (१९७२), *गढूळ पाण्यातील मासोळ्या* (१९७१), *नग्न प्रश्न* (१९७३), *दोन पायाची जनावरं* (१९७१), *पाया पोखरलेली घरं* (१९७०) इत्यादी कादंबऱ्यातून स्त्री – पुरुष नाते संबंध, भावबंध, प्रेम, लोभ, मत्सर, सूड, भावनिक कलह अशा पार्श्वभूमीवर राज्य करणाऱ्या आहेत.

मधुराणी भागवत यांच्या १९८५ सालच्या *हा दैवाचा खेळ निराळा* मध्ये ताटातूट झालेल्या पती – पत्नीचे चित्रण केले आहे. संजीवनी देशमुख यांच्या *ही तर मीरा गाते* (१९७३) या कादंबरीतून एका विधवा नायिकेची व्यथा मांडली आहे. तर अपघातात अपंग झालेल्या पतीची सेवा आणि एकनिष्ठता असलेली नायिका *डाव मांडू नको* मधून मीरा निमकरांनी मांडली आहे. पतीच्या आजारपणात सेवा करणाऱ्या नायिकांप्रमाणेच नायक नक्कीच प्रेमळ आणि उदारमतवादी नसल्याचे, उलटप्रसंगी संशय घेऊन पत्नीला छळणारे नायक तत्कालीन परिस्थितीला अनुरूप असेच कादंबऱ्यातून उतरलेले आहेत. मीराबाईंच्या *फलश्रुती* (१९८४) कादंबरीतून ते प्रत्ययाला येते.

वसुंधरा पटवर्धन यांच्या *प्रीतीची हाक* आणि सुलभा द्रविड यांच्या *स्मरणात तुझ्या मी* या कादंबऱ्यातून लग्नापूर्वीचा मित्र भेटल्याने घडलेल्या गोष्टींचे कथानक आहे. आणि याही पलीकडे जात लेखिकांनी लग्नापूर्वीचे मातृत्त्व स्विकारलेल्या अथवा नाकारलेल्या नायिकाही लेखनीतून चित्रित केल्या आहेत. तर नपुंसक नवऱ्याला धुडकावून देत त्यांनी वेगळा मार्ग स्विकारलेला आहे. या भावनिक गोंधळांमध्ये काही अंशी पुरुष पात्रे, नायक काही लेखिकांनी सकारात्मक विचारांचेही रंगविलेले आहेत.

विविध प्रकारचे नातेसंबंध आणि त्यातील सामाजिक एकोपाही कादंबऱ्यातून भेटीस येतो. लहान भावंडांच्या संगोपणात नायिका प्रौढ होताना दिसतात. योगिनी जोगळेकरांची १९७७ ची *द्विदल* आणि विजया वाड यांची १९९७ ची *त्या तिघी* या कादंबऱ्यातून बहिणींचे प्रेम अधोरेखित होते, आई – वडिलांच्या पश्चात किंवा परिस्थितीमुळे अशा नायिका अधिक प्रगल्भ विचार करताना दिसतात. काही कादंबऱ्यांतून आई – मुलगा, आई – मुलगी असेही नातेसंबंध पहावयास मिळतात. तर काही ठिकाणी खाष्ट सासू ते प्रेमळ सासू असा प्रवासही पहावयास मिळतो.

एकूणच अनाथ, आश्रमात वाढलेल्या, सामाजिक बंधने असलेल्या, मोहक्षणात फसलेल्या, सावरलेल्या, हारलेल्या, कटूतेने पिचलेल्या, अन्याय सहन करणाऱ्या अशा असंख्य नायिका लेखिकांनी यशस्वी रित्या रेखाटल्या आहेत.

मानवी नात्यातील गुढार्थ शोधण्याचा आणि मांडण्याचा प्रयत्न मीरा निमकर, अनुराधा वैद्य, गिरीजा कीर, उषा दातार, लीला गोळे, कल्पना जाधव, सुनीती आफळे, आशा बगे, सानिया, गौरी देशपांडे या लेखिकांनी अतिशय विश्लेशणात्मकपणे मांडला आहे.

काही अंशी कादंबऱ्यांचे वळण जात, धर्म, श्रद्धा, अंधश्रद्धा या विविध प्रकारे जाताना दिसते. विनया खडपेकर यांची १९८५ सालची *भिंती* याच अर्थाची कादंबरी आहे. आंतरजातीय विवाहावर भाष्य करणारी ही कादंबरी आहे. आफ्रिकेतील डिंका या जमातीचा वेध घेणारी *आम्ही डिंका* १९८९ साली कल्पना गोसावी यांनी प्रकाशित केली आहे. या कादंबरीत अनेक देशांचा उल्लेख आहे आणि डिंका या जमातीच्या एकूण आयुष्यातील चढ – उतारांचा आलेख लेखिकेने स्पष्ट केला आहे. आदिवासी जीवनही यातून स्पष्ट होत गेले आहे. नायना आचार्य यांनी *रानझरी* १९७९ साली लिहून आदिवासी जमातींचे दर्शन आणि प्रश्न उघडे केले आहेत.

जयश्री खिरे यांच्या *वादळ डोळा* (१९८७) मधून हिंदू – ख्रिश्चन या धर्मात गुंफलेले आहे.

१९८२ साली शैला बेल्ले यांनी *झाड* कादंबरीतून कन्नड संस्कृतीचे दर्शन घडवलेले आहे. तर भ्रष्टाचाराचे मूळ हे पैसा कसे आहे हे कमला फडके यांनी १९५५ च्या *भूल* कादंबरीतून वर्णिले आहे. तर त्वचारोग असलेला *कोड* हा प्रकार खूप भयानक नसल्याचेही *महाश्वेता* १९६० च्या या कादंबरीतून समाजाला समजविण्याचा प्रयत्न डॉ. सुमती क्षेत्रमाडे यांनी केला आहे.

एकत्र कुटुंबपद्धतीला लागलेली ग्रहणे अधोरेखित करत लेखिकांनी कुटुंबाने किंवा समाजाने नाकारलेल्या व्यक्तींचेही कादंबरी लेखन केले आहे. बदलत्या जीवनशैलीबरोबर पळताना काही गोष्टी कालबाह्य होत गेल्या. दुर्दैवाने नाती सुद्धा.... नोकरी करू लागलेल्या स्त्रियांची तारेवरची कसरत होऊ लागल्याने आणि कुटुंबातले ताणतणाव वाढल्याने आपसूकच घरातील वृद्ध लोकांना सांभाळण्याची जबाबदारी सैल झाली आणि मोठ्या प्रमाणात वृद्धाश्रमांची संख्या वाढत गेली. पैसा आणि नावलौकिक या फालतू गोष्टीला अधिक महत्त्व दिल्याने नैतिक मूल्यांचा ऱ्हास झाला आणि नवे युग तसे नवे प्रश्न आणि नको असणारी उत्तरेच आपलीशी वाटू लागल्याने समाजात कुटुंब पद्धत लयास गेल्याचे दिसते.

वेशांचा विचार करणाऱ्या वसुंधरा पटवर्धनांनी *नेत्रा* (१९८८) आणि नायना आचार्य यांनी *कुठे जशी भोगा* (१९७७) या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. तर रत्नप्रभा जोशी यांनी १९९२ साली *शिखंडी* ही तृतीयपंथावर कादंबरी लिहिली आहे.

अनेक वेगवेगळ्या विषयांवर कादंबरीचे लेखन होत असताना काही लेखिकांनी वेगवेगळ्या ठिकाणी होत गेलेले भीषण अपघात अतिशय व्यापक दृष्टीने कादंबऱ्यांतून साकारलेले आढळतात. नैसर्गिक आपत्ती विषयक काही खरे तर काही कल्पित प्रसंग गुंफत कादंबऱ्यांचे लेखन पुढे सरकलेले आहे. कल्याणी हर्डीकर यांनी *पुत्र अमृताचे* ही १९९४ साली *भूकंप* या भीषण अवस्थेचे रेखाटन केलेली कादंबरी होय. तर शुभांगी भडभडे यांनी २००० मध्ये *झंझावत* ही बिब्बा विषयावर लिहिलेली कादंबरी आहे. कोलकाता मधील सत्य घटनेत काही नवी वळणे घेत ही कादंबरी त्यांनी लिहिली आहे.

बदलत्या काळाशी नाते जोडत आणि वास्तवातील जळजळीत सत्याला आव्हान देत काही अंशी कादंबरीचे लेखन झालेले आहे. या काळातील कमल देसाई, गौरी देशपांडे, शांता गोखले, सानिया, आशा बगे यांनी बदलत्या काळातील स्त्रीमनाची व्यथा, पती – पत्नी संबंध, मित्र – मैत्रिणी संबंध, मुलांचे वर्तन, वडीलधाऱ्यांची जबाबदारी, आधुनिक गोष्टीकडे आकर्षिली जाणारी पिढी, त्यातून आलेले नैराश्य, आत्महत्या, घसरलेले युवतींचे पाय अशा निरनिराळ्या विषयांवर मीमांसक चर्चा कादंबरीतून केली आहे.

*गोफ* या १९९९ च्या कादंबरीतून गौरी देशपांडे यांनी सासू – सूनेची व्यथा मांडलेली आहे. तर १९८७ च्या *निरगाठ* मधून आई – मुलीचे वाद अधोरेखित केले आहेत. *कारावासातील पत्रे* १९८० मधील कादंबरीत नात्यांच्या चक्रव्यूहात अडकलेल्या नायिकेची कथा त्यांनी सांगितली आहे. *मध्य लटपटीट या* १९८० च्या कादंबरीत *लिव्ह इन रिलेशनशिप* सारखा मार्ग स्वीकारलेली प्रगत विचारांची नायिका समोर येते. १९८० च्याच *एकेक पान गळावया* या कादंबरीतील नायिका जे आयुष्य आपल्या वाटेला आले ते मुलीला प्रांजळपणे सांगणारी आहे. *दुस्तर हा घाट* १९८९ मधील या कादंबरीत त्यांनी परस्त्रीशी असलेले संबंध अधोरेखित केले आहेत.

एकूणच गौरी देशपांडे या बंडखोर स्त्री लेखिका होय. आणि त्यांच्या नायिकाही अधिक विचारी आणि प्रगतशैलीबरोबर बंडखोरही असल्याचे स्पष्ट होते.

कौटुंबिक जीवन आणि आधुनिक काळातही स्त्रियांची होणारी दुहेरी घुसमट आशा बगे यांनी *झुंबर, सेतू, आकाश* या कादंबऱ्यातून अधोरेखित केली आहे. बदलणाऱ्या नात्यांची गुंफन त्यांनी १९९४ साली लिहिलेल्या *त्रिदल* या कादंबरीतून स्पष्ट होत.

१९९६ सालची सानिया यांची *आवर्तन* आणि १९९४ सालची *स्थलांतर* या दोन्ही कादंबऱ्यातून समाजातील विविध नातेसंबंधांवर प्रकाश टाकलेला आहे. त्यांची भाषाशैली कमालीची आणि मानसिक आंदोलने योग्य पद्धतीने मांडली असल्याने कादंबऱ्या अतिशय वाचनीय झाल्या आहे.

रेखा बैजल यांच्या १९९७ च्या *तृप्ता* मधूनही नातेसंबंध अधोरेखित झाला आहे. स्त्री प्रश्नांची बाजूही त्यांनी अधिक विस्तृत मांडली आहे.

स्त्री मनाच्या व्यथा मांडण्यासाठी जाई निंबकर, अंबिका सरकार, शांता योगी, प्रतिभा रानडे, शांता निसळ इत्यादी अनेक लेखिकांनी कादंबऱ्यातून वैशिष्ट्येपूर्णशैलीत लेखन केले आहे.

प्रतिभा रानडे यांच्या *मानुषी* मधून समाजाने आखून दिलेल्या चौकटीचा त्रास होणाऱ्या स्त्रियांची व्यथा मांडली आहे.

*मंजिरी, नियती, हरवलेल्या वाटा* या कादंबऱ्यांतून माधवी देसाई यांनी खानदानी मराठी स्त्रीची दैनंदिन पद्धत आणि मानसिकता अधोरेखित केली आहे.

अनेक लेखिकांनी कादंबरी लेखनासाठी रोजनिशी, डायरी, पत्र.... अशा निरनिराळया तंत्रांचा वापर करून कादंबरी लेखन आकर्षक आणि नेटके करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. अनेक लेखिकांनी चरित्रात्मक कादंबरी लेखन केले. त्यात बाळूताई खरे यांनी स्वतःच्या

वडिलांवर *खरे मास्तर* ही चरित्रात्मक कादंबरी १९९३ साली प्रकाशित केली. त्यातून त्यांनी वडिलांच्या उच्च विचारांचे अनेक पैलू स्पष्ट केले आहेत.

काही लेखिकांनी अत्यंत नाजूक विषय कादंबऱ्यातून स्पष्ट केले आहेत. शारीरिक सुखासाठी झालेली भावनिक पाशवी वृत्तीही काही कादंबऱ्यातून पहावयास मिळते. या अत्यंत नाजूक विषयातही लेखिकांनी केलेले भाष्य हे समाजातील विकृतीचे दर्शन घडवते. कधी ते वडिलांचे, आईचे, पत्नीचे किंवा इतर कोणा नातेवाईकांचे असले तरी यातून होणारा भावनिक कोंडमारा अतिशय वैशिष्ट्यपूर्ण लेखनबद्ध झालेला आहे.

१९७० साली एन् ग्रुप ने लिहिलेली कादंबरी *काचापाणी* , रेखा बैजल यांची १९८४ सालची *देवव्रत* मधून शरीरसुखाच्या शोधात असणाऱ्या वडिलाची कथा सांगून जाते. अनुराधा वैद्य यांच्या १९९४ सालच्या *माध्यम* मधून ही त्या मानलेल्या मुलाशी प्रेमसंबंध ठेवणाऱ्या स्त्रीची व्यक्तिरेखा स्पष्ट करतात. १९९९ सालच्या *रेघोट्या* या कादंबरीतून प्रतिमा रानडे  या अशा प्रकारचा विषय घेऊन हळव्या मनाचे प्रतिबिंब साकार करतात. आशा परुळेकर यांच्या *वेड* या कादंबरीतून विक्षिप्त बुद्धीच्या मुलीचे चित्रण पुढे येते.

अनेकदा मानसिक दुःखाचे कारण हे शारीरिक सुखाचे ही आहे अशा आशयाच्या कादंबऱ्या समाजाला अनेक गोष्टी सांगू इच्छितात. शारीरिक कोंडमारा न कोणाला सांगता येतो न त्याबद्दल कुठे फिर्याद करता येते. यातूनच संबंधित व्यक्ती पाशवी वृत्तीची बनत जाते. हातून असंख्य चुका होत असताना त्या सद्सद् विवेकबुद्धी गमावू लागतात आणि मग त्यांच्या मनावर, डोक्यात केवळ विकृती राज्य करू लागते.... अशा या अतिसंवेदनशील विषयाची चौकसपणे मांडणी करून स्त्री लेखिकांनी कादंबऱ्या वाचकप्रिय केल्या आहेत.

वास्तव आणि अवास्तव, कल्पना आणि रम्यता यांचा सुरेख संगम करणाऱ्या कादंबऱ्याही लेखिकांनी लिहिलेल्या आहेत. आशा परुळेकर यांची *पुनर्जन्म* आणि *वेड* या कादंबऱ्यातून अनेक प्रसंग वास्तव आणि अवास्तवताशी झगडणारे आहेत. तर यावर किती विश्वास ठेवावा आणि किती अलिप्त रहावे अशी संज्ञाही त्यांनी मांडली आहे. तर कमल देसाई यांनी १९६८ मध्ये लिहिलेली *काळा सूर्य* आणि १९७० ची *हॅट घालणारी बाई* याही कल्पनेच्या भराऱ्या घेणाऱ्या कादंबऱ्या उत्कंठ वाढवणाऱ्या आहेत. अनेक गुढार्थाचा उपयोग करून कादंबऱ्या वाचकप्रिय ठरल्या आहेत.

एकूणच १९५१ ते २००० या कालखंडातील कादंबरी लेखनाचा आलेख उंचावलेला आहे. अनेक सुप्रसिद्ध लेखिकांनी अनेक वेगवेगळ्या विषयांचे बीज घेऊन उत्कृष्ट अशी कादंबरी रचना केलेली दिसते तर काही पौराणिक कादंबऱ्यांमधून एकाच व्यक्तीवर

अनेकींनी वेगवेगळ्या अंगणी विचार करत कादंबरी लिहिली. मात्र कथानक तेच ते झाल्यामुळे काही अंशी पौराणिक कादंबरी रटाळवाणी वाटू लागते. ऐतिहासिक कादंबरीमध्ये महापुरुषांच्या जीवनाचा वेध आणि महान स्त्री पात्रांच्या जीवनाची व्यथा, कर्तव्यनिष्ठता अधोरेखित झाल्याने इतिहासाबरोबर वीण घट्ट होत जाते. राजकीय क्षेत्रातील आणि सामाजिक क्षेत्रातील कादंबऱ्यांवर स्त्री लेखिकांचे लिखाण अल्प आहे. मात्र ज्या लेखिकांनी या प्रकारचे कादंबरी लेखन केले ते अतिशय समर्पक आहे.

कौटुंबिक जिव्हाळा, कलह, एकत्र कुटुंब पद्धत, नातेसंबंध, स्त्री – पुरुष संबंध, विवाह, विधवापण, विवाहबाह्य संबंध, स्त्रीत्व, पुरुषत्व, मान – अपमान, व्यथा, विकृती, पाशवी वृत्ती, सोशिकता प्रगत विचार, देशसेवा, गुलामी.... या आणि यासारख्या अनेक टप्प्यांना एकत्रित करून अनेक कादंबऱ्यांचे लिखाण झालेले आहे.

काही कादंबऱ्या अतिशय स्वान्त सुखाय आहेत तर काही कादंबऱ्या मनातील विचारांच्या कक्षा रूंदावणाऱ्या आहेत. भावना, प्रेम, माया, जिव्हाळा, राग, मत्सर, विवेक या गोष्टींनी कादंबरीतील पात्रे आपापली भूमिका चोखपणे बजावताना दिसतात.

इतर कादंबरीच्या तुलनेने चरित्रात्मक कादंबऱ्यांची संख्या अधिक आहे. ऐतिहासिक महान व्यक्ती आणि संत मंडळी बरोबर देशासाठी प्राण वेचलेले युग प्रवर्तक व्यक्ती या कादंबरीचे विशेष बनलेले आहेत.

ग्रामीण कथा – कादंबरीकडे स्त्रिया अधिक वळल्या नसल्याचेही स्पष्ट होते. मात्र प्रेमविषयक गुंता, निरगाठ, उकल करणाऱ्या कादंबऱ्यांमध्ये त्या अधिक रमलेल्या दिसतात. त्याचबरोबर वास्तविक जीवनात स्त्रियांची होणारी घुसमट, त्यांचे प्रत्येक गोष्टीत असलेले गौण स्थान आणि कोणताच मोबदला न मिळता ती कुटुंबासाठी उपसणारे कष्ट, सामाजिक चौकटीत जगण्याची वृत्तीमुळे तिचे होणारे भावनिक आंदोलन आणि या सगळयाचा शेवट म्हणजे 'ती'ने अन्याया विरुद्ध उचललेले पाऊल आणि स्विकारलेली बंडखोर प्रवृत्ती अधिक प्रमाणात कादंबऱ्यांतून पहावयास मिळते.

या प्रकारे १९५१ ते २००० सालच्या कादंबरीतून अनेक निरनिराळे विषय लेखिकांनी हाताळल्याचे लक्षात येते. चांगले विषय, आकर्षक भाषाशैली, वैविध्यपूर्ण लेखन आणि वास्तविकता कादंबऱ्यातून उतरवत स्वतःचा निराळा ठसा उमटविण्यात लेखिका यशस्वी होताना दिसतात.

## ड) २००१ ते २०१० या कालखंडातील कादंबरीलेखन

मराठी कादंबरी विश्वाचा अभ्यास करताना लक्षात येते की, सुमारे दीडशे वर्षांची परंपरा लाभलेल्या या वाङ्मयात अनेक बदल, स्थित्यंतरे झाली आहेत.

२००१ ते २०१० या दशकातील कादंबऱ्यांचे विषय, आशय, मांडणी, स्वरूप, भाषाशैली, वैचारिक लेखन, निष्कर्ष अधिक प्रमाणात बदलताना दिसत आहे. काळाबरोबर हे लेखन अधिक वेगवान होत आहे. नव्हे तर ती काळाची गरजच बनली आहे. या दशकातील स्त्री कादंबरीकारांनी अनेक विषय नव्याने हाताळले आहेत तर जुनेच विषय वेगवेगळ्या प्रकाराने लिखाणात मांडले आहेत.

स्त्री लिखित कादंबऱ्यामध्ये ऐतिहासिक, पौराणिक, चरित्रात्मक, वैचारिक, सामाजिक, स्त्रीवादी, राजकीय, रंजकता, वैज्ञानिकता, रहस्यमयता, अद्‌भुतता, हे घटक प्रामुख्याने येत असताना स्त्रीकेन्द्री कादंबऱ्यांतील स्त्रीप्रतिमा अधिक प्रगल्भतेने मांडलेली आहे. स्त्री मनातील अतिसूक्ष्म बदलही आणि या आधुनिक जगाच्या भव्य सुधारणांमध्येही स्त्री सुधारली तरी तिच्यावरचे संकट मात्र न टळलेली बाब अधोरेखित झाली आहे.

ऐतिहासिक कादंबरी प्रकारात डॉ. प्रमिला जरग यांनी २०१० साली *आदि पर्व* ही मालोजीराजे भोसले यांच्या जीवनावर आधारित कादंबरी प्रकाशित केली. सुमारे २० वर्षे या कादंबरीचे लेखन त्या करीत होत्या. या प्रदीर्घ लेखनात त्यांनी अभ्यासाची पराकाष्टा केलेली दिसते. अनेक ऐतिहासिक पुरावे या कादंबरीतून समजतात आणि मालोजीराजांचे चरित्रही; म्हणून ही कादंबरी ऐतिहासिक चरित्रात्मक कादंबरी म्हणून प्रसिद्ध आहे.

ज्योत्स्ना देवधर यांनी चरित्रात्मक कादंबरी लेखन केले आहे. अरविंद बाबू म्हणजेच सेजदा यांचे पाँडिचेरी येथील आश्रमाचे समाजकार्य प्रसारित करण्यासाठी त्यांनी *सेजदा* ही कादंबरी लिहिली. अरविंदबाबूंचे चरित्र उलगडण्यासाठी *उत्तरयोगी* ही कादंबरी लिहिली तर त्यांच्या आश्रमातील एक मुलाला नायक भूमिकेत गुंफून *उषानगरी* ही कादंबरी ऐतिहासिक अंगाने लिहिली.

शुभांगी भडभडे यांनीही या दशकात अनेक चरित्रात्मक कादंबऱ्यांचे लेखन केले आहे. त्यांचे लेखन खोल अभ्यासांती झाल्याने अनेक कादंबऱ्यांची भाषांतरे, नाट्यरुपांतरे झालेली आहेत. संत ज्ञानेश्वरांचे चरित्र दर्शन २०१० मध्ये *कैवल्याचं लेणं* या कादंबरीतून समोर येते. दानशूर श्री बाळकृष्ण देवपुजारी यांचे चरित्र २००७ च्या *सार्थक* कादंबरीतून उलगडते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक आणि आद्य सरसंघसंचालक डॉ. हेडगेवार

यांचे कार्य *कृतार्थ* मध्ये रेखिले आहे. बिब्ब्याच्या शेतीचा, फॅक्टरीचा आणि त्यासाठी झटणाऱ्या तरुण इंजिनियरचा एक वेगळा प्रयोगही त्यांनी *झंझावत* या कादंबरीतून मांडला आहे. अत्यंत लोकप्रिय कादंबरी म्हणजे *झंझावत* होय. कर्तुत्ववान स्त्रीने राष्ट्रविकास कसा केला हे त्यांनी *नागनिका* (२००५) या कादंबरीतून मांडले. झाशीची राणी लक्ष्मीबाईंचा जीवनपट *रणरागिणी* (२००९) या कादंबरीतून समोर येतो. तर राज्यमंत्री असलेल्या याशोधरादेवी यांची कहाणी *आकाशवेध* (२००६) या कादंबरीतून त्यांनी चित्रित केली आहे.

२००६ मध्ये लीला दीक्षित यांनी *विवेक – आयना* ही तेराव्या शतकातील वारकरी संत सेना महाराज यांच्या जीवनपटावर आधारलेली कादंबरी लिहिली. सेना महाराजांचे एकूण कार्य आणि अभंग या कादंबरीतून भेटीस येतात.

हॉलीवुडची सुप्रसिद्ध अभिनेत्री मॅरिलीन मन्रो हिच्या जीवनातील चढ – उतारांवर आधारलेली *मॅरिलीन मन्रो* ही कादंबरी मीना देशपांडे यांनी २००५ साली लिहिली. नायिका आणि तिच्या जीवनातील अनेक टप्पे लेखिकेने सुव्यवस्थितपणे मांडले आहेत. सामाजिक प्रतिमा आणि वैयक्तिक मन यांच्या युद्धाचे परिणाम कादंबरीतून स्पष्ट झाले आहेत.

अमेरिकेतील मानसोपचारतज्ज्ञ डॉ. अल्बर्ट एलिस यांच्या जीवनावर प्रकाश टाकण्यासाठी, सामाजिक पातळीवर त्यांचे महत्त्वाचे स्थान असल्याचे पटवून देण्यासाठी २००९ मध्ये मानसशास्त्रज्ञ डॉ. अंजली जोशी यांनी *मी अल्बर्ट एलिस* ही आत्मचरित्रात्मक कादंबरी प्रसिद्ध केली. कादंबरीसाठी लेखिकेने प्रचंड अभ्यास केल्याचेही समजते. एलिसचे कार्य, मानवी मन, गुण – दोष, हे सर्व कादंबरीतून पुढे येते आणि एका वादळाशी नव्याने ओळख होते.

२००६ मध्ये *मोहिनी* कादंबरीतून लेखिका पारू मदन नाईक यांनी मनोरुग्ण स्त्रीची व्यथा मांडली आहे. चरित्रात्मक कादंबरीच्या आधारे उत्कृष्ट अनुवादकार उमा कुलकर्णी यांनी मैत्रिणीच्या आईचे जीवनरहस्य, जीवनसंघर्ष *केतकर वहिनी* या कादंबरीतून चित्रित केला आहे. जगण्यासाठीच्या लढ्याची रणरागिणी अत्यंत साधी पण सरळमार्गी जीवनप्रवासाची माहिती, तपशील, प्रसंग आदि पात्रे लेखिकेने सफाईदारपणे मांडली आहेत.

राजकीय कादंबऱ्यांचा अभ्यास करताना अनेक कादंबऱ्या हाताशी येतात. माधु सावंत यांनी जिल्हा परिषदेतील महिलांचा समावेश आणि राजकारण, पुरुषांची मनमानी, नावापुरते महिलांना राजकारणातील स्थान.... अशा अनेक ज्वलंत प्रश्नांना वाचा फोडणारी *राहूकेतू* ही कादंबरी लिहिली.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे, त्यातील महत्त्वाच्या घडामोडींचे, निर्णयांचे तपशील आणि एकूणच तत्कालीन परिस्थितीचे चित्रण असलेली *हुतात्मा* ही राजकीय कादंबरी मीना देशपांडे यांनी लिहिली आहे.

२००१ ते २०१० या दशकात अनेक वेगवेगळया लेखिकांनी अनेक विषयांवर कादंबरी लेखन केले. प्रत्येक लेखिकेने स्वतःचे वेगळेपण जपलेले आहे. स्त्रीप्रतिमांना केंद्र करून अनेक विषयांची विचारसरणी सुमारे ६०० कादंबऱ्यातून या दशकात झाली आहे.

तृतीयपंथीय म्हणून जन्माला आलेल्या व्यक्तीची व्यथा अरुणा लोणंदकर यांनी *वल्लरी* (२००३) या कादंबरीतून मांडली आहे. भावनिक, सामाजिक स्तोम माजवणारी आणि हा नाविन्यपूर्ण विषय असणारी ही कादंबरी उल्लेखनीय आहे.

नीलम माणगावे यांनी वेश्या व्यवसायच्या अनेक समस्या, प्रश्न त्यांच्या *शोध* नावाच्या कादंबरीतून मांडले आहेत. नायिका साधी गृहिणी पण बदलीनंतर झालेले परिवर्तन आणि एकूणच वेशांचा शोध या कादंबरीतून उलगडतो.

छाया महाजन यांच्या २००६ च्या *कॉलेज* या कादंबरीतून मोठ्या बलाढय शिक्षणसंस्था, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी या भोवती कथानक फिरते. नवे बदल न स्विकारता रांगडा आणि गलिच्छ व्यवहार स्तोम माजावताना दिसत आहे. खऱ्या मनाच्या लोकांना येथे कसे वेगळे केले जाते हे उदाहरण या कादंबरीतून समोर येते.

२००९ मध्ये छाया महाजन यांनी लिहिलेली *तन अंधारे* ही कादंबरीही बहुचर्चित ठरली. कादंबरीची नायिका किरण निम्फोमॅनिअॅकया आजाराने कशी विकृत बनत जाते याची कहाणी या कादंबरीतून समोर येते. अनेक बारकाव्यांसह ही कादंबरी लेखिकेने कुठेही अश्लीलतेकडे न झुकवता लिहिली आहे, हे विशेष या कादंबरीचे आहे.

या काळात स्त्रीवादी कादंबऱ्याचेही लेखनही झालेले आहे. २००५ साली मेघना पेठे यांनी *नातिचरामि* ही कादंबरी लिहून स्त्री – पुरुष नातेसंबंध, स्त्रीत्व, पुरुषत्व, मीपणा, अस्तित्व, आत्मविश्वास, विवाहबंधने यांची अधिक खोलवर चर्चा लेखिकेने मांडली आहे.

"कविता महाजन यांची *'ब्र'* (२००५), *'भिन्न'* (२००७) आणि *'कुहू'* (२०१०) या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यांच्या सुरुवातीच्या दोन कादंबऱ्या सामाजिक विषयावरील असून तिसरी कादंबरी ही अद्‌भुतरम्य कादंबरी आहे. त्यांच्या सामाजिक कादंबऱ्यांमध्ये स्त्रीप्रश्नाला स्थान असले तरी त्यांचा आवाका स्त्रीप्रश्नापुरताच मर्यादित नाही. वास्तवाच्या पातळीप्रमाणेच अद्‌भुतरम्यतेची पातळीही त्यांना अनुभवचित्रासाठी स्वीकारावीशी वाटते. यातून जगण्याचा समग्रतेने स्वीकार करणारी त्यांची जीवनदृष्टी उटून दिसते."[९] २००५

साली कविता महाजन यांची *ब्र* ही कादंबरी प्रसिद्ध झाली. रीतीरिवाज, परंपरा आणि अन्यायाने शतकानूशतके जखडून ठेवलेल्या नायिकेला स्व चा शोध आणि स्वतःबरोबरच अन्याय सहन करणाऱ्या स्त्रियांचे अस्तित्वही या कादंबरीतून शोधताना उलगडते. पुरुषत्त्वाची स्त्रीमनावर होणारी नाजूक इजा आणि एकूणच समाजमनाचे प्रतिबिंब या कादंबरीतून लेखिकेने चित्रित केले आहे.

शरीराची प्रतिकार शक्ती नष्ट करणाऱ्या एड्स या भयानक आजाराला मध्यवर्ती ठेऊन कविता महाजन यांनी *भिन्न* ही कादंबरी लिहिली. अतिशय व्यापक आणि वैशिष्ट्यपूर्ण अशी ही कादंबरी आहे.

२००८ साली शांता गोखले यांनी *त्या वर्षी* ही कादंबरी लिहिली. हिंदू – मुस्लीम दरी, कला, कलावंत, त्यांचे जगणे, समाजमन या आधाराने ही कादंबरी अधिक वैशिष्ट्यपूर्ण आणि व्यापक अंगाने लिहून लेखिकेने विक्रमच केला आहे.

गौरी देशपांडे यांनी *गोफ* ही कादंबरी स्त्रियांमधील भावविश्वाचे दर्शन घडविणारी लिहिली तर *उत्खनन* ही कादंबरी विवाहपूर्वीचे मातृत्व आणि समाज या परिमाणावर लिहिली. दोनही कादंबऱ्या या स्त्री प्रतिमांना स्त्रीकेंद्री ठरविणाऱ्या आहेत. अनेक संघर्ष, नैतिक – अनैतिकतेचा फास, समाजाची चौकात, होरपळलेले मन यासह अनेक पदर या कादंबऱ्यातून लेखिका रुढार्थाने मांडते.

सानिया यांनी *स्थलांतर* ही कादंबरी २००२ साली प्रसिद्ध केली आणि एक वेगळेच भावविश्व असलेले मैत्रीपुर्वक नातेसंबंध या कादंबरीतून समोर आणले. अनेक प्रश्न या कादंबरीतून उपस्थित होताना ही दिसतात. तरी ही कादंबरी समाजाच्या चौकटीबाहेर झेप घेणारी असे चित्रण लेखिकेने कादंबरीतून केले आहे.

छाया महाजन यांच्या *मानसी* या कादंबरीतून स्त्रीची विवाहबाह्य प्रेमसंबंधातून फसवणूक होते, अपघाताने ती सावरते आणि पुन्हा नव्याने स्वतःला अजमावू पहाते, असे कथानक कादंबरीतून अनेक गोष्टी आणि निष्काळजीपणा, मर्यादा सांगून जाते.

आर्य आणि द्रविड यांच्यातील दरीचा विचार आणि द्रविड स्त्रीचा अपमान या कथानकावर रावणाची बहिण शूर्पणखा हिच्यावर भावनांची कदर न करता तिला कुरूप बनविणारे रामायणातील कथानक *श्यामिनी* या कादंबरीतून तारा वनारसे यांनी मांडले आहे. अतिशय सुंदर अशा श्यामिनीची व्यथा आणि आर्य – द्रविड संस्कृती यांचे चित्रण या कादंबरीतून समोर येते.

आशा बगे यांच्या *भूमी* या २००४ साली प्रसिद्ध झालेल्या कादंबरीला २००६ च्या

साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त झाला आहे. भूमीमधील नायिका आणि गुंफलेली अनेक स्त्रीपात्रे परावलंबी अवस्थेतही स्वाभिमान जपणारी आहेत. राखेतूनही नवा जन्म घेणारी आहे, म्हणूनच ही कादंबरी एक वेगळेच प्रतिक ठरली आहे.

अतिशय वेगळा विषय असलेली ज्योती पुजारी यांची *फाशीचा साक्षीदार* ही कादंबरी उल्लेखनीय आहे. फाशीची शिक्षा झालेल्या कैद्याला फास लावणाऱ्या जल्लादाचे भावविश्व, तुरुंगातील जीवन, कैदी, त्यांची व्यवस्था, अवस्था आणि एकूणच फाशीची संपूर्ण प्रक्रिया या कादंबरीतून उलगडत जाते. म्हणूनच ही कादंबरी विशेष उल्लेखनीय आहे.

प्रतिमा इंगोले यांनी *पार्ट टाईम* २००२ साली, *बोइखी* २००६ साली प्रसिद्ध केलेल्या कादंबऱ्या होय. त्यांच्या *आत्मघाताचे दशक* या कादंबरीतून शेतकऱ्यांच्या आत्महत्या, प्रश्न, जाणिवा, गरजा, शेतीव्यवसायाची डबबाईला आलेली व्यवस्था लेखिकेने चित्रित केली आहे. अनेक व्यथांची मिळून ही एक वाचनीय कादंबरी त्यांनी साकारली आहे.

सुमन भडभडे यांच्या *हसले मनी चांदणे* या कादंबरीचा विषय स्त्रीच्या बाह्य सौंदर्याला केंद्रित करतो आणि सौंदर्य कुरूपता या नाण्याच्या दोन बाजू सुख – दुःखाचे आणि एकूणच देहाला दिलेले महत्त्व अधोरेखित करते.

शीला घाटपांडे यांनी *झुंज* कादंबरीतील नायिका अतिशय समर्थपणे नियतीने केलेला प्रत्येक वार झेलणारी चित्रित केली आहे.

सुशीला सकपाळ यांची *कसरत* ही कादंबरीही याच स्वरुपाची आहे. चर्मकार जातीतील हलाखीचे जीवन जगताना आलेल्या अनेक वाईट प्रसंगांची वीण लेखिकेने गुंफली आहे.

या दशकातील कादंबऱ्यातील विषय अतिशय ज्वलंत आणि गंभीर असल्याने लेखिकांनी अनेक सूक्ष्म बदल कादंबऱ्यातून मांडले आहेत. वैचारिक कादंबऱ्यामध्ये अंबिका सरकार यांची *अंत ना आरंभ ही* ही २००८ साली प्रकाशित झालेली कादंबरी तारुण्यातील शारीरिक आकर्षणामुळे भविष्यात झालेली मानहाणी, सोसावे लागणारे कष्ट समोर आणते. नायिका प्रेमात फसते, प्रेमविवाह, वाद, अपंगत्व असलेले अपत्य, असे कमी – अधिक त्रास सोसत नवी दिशा शोधणारी कथा यातून समोर येते.

रोहिणी कुलकर्णी यांनी स्वातीचा *उःशाप* २००२ साली, *पिंपळफेरे* २००६ साली तर *गर्भनाळ* ह्या २००६ साली प्रकाशित केलेल्या कादंबऱ्या होय. सामाजिक आणि कौटुंबिक मनातील धागेदोरे लेखिकेने या कादंबऱ्यांमधून बारकाईने टिपले आहेत.

वेगळ्या विचाराच्या रेखा बैजल यांच्या *मृत्यू जगलेला माणूस* (२००९) या कादंबरीत एका वयस्कर व्यक्तीची व्यथा मांडली आहे. परिस्थितीने तापट आणि विक्षिप्त झालेल्या या

व्यक्तीला मरण प्रिय वाटू लागले आहे. त्याचे अनेक दृष्टीकोन (सकारात्मक अथवा नकारात्मक) लेखिकेने अत्यंत सुस्पष्ट मांडले आहेत. *प्रस्थान* या २०१० साली लिहिलेल्या कादंबरीत भावनिक चक्रव्युहात सापडलेल्या वैवाहिक जीवनाची साथ न मिळालेल्या एका तरुणाची कहाणी आहे. प्रेम, माया, मोह, घात, दुःख या चक्रात नायकाला लेखिकेने अधिक प्रभावशील केले आहे. त्यांच्याच *जलपर्व* या कादंबरीतून पाणी टंचाईचा प्रश्न नव्याने आणि वेगळ्या स्वरुपात लेखिकेने मांडला आहे. नद्यांचे जाळे तयार करण्यावर त्या अधिक भर देतात. अधिक निर्णयात्मक असे विचार असणाऱ्या कादंबऱ्या रेखा बैजल यांच्या एक अप्रतिम कलाकृती ठरल्या आहेत.

सामाजिकतेचे भान ठेवणारी *हँडल विथ केअर* ही कादंबरी मलिका अमर शेख यांनी २००७ मध्ये प्रकाशित केली. एका सर्वसामान्य व्यक्तीचा समाजाशी येणारा संबंध, बेचव आयुष्य, आर्थिक प्रश्न, स्त्रीमोह आणि सतत त्याच्या बरोबर असणारी सदसदविवेकबुद्धी याची सांगड घालत लेखिकेने अत्यंत अस्तित्ववादी विचारसरणीची ही कादंबरी साकारली आहे.

२००१ मध्ये प्रकाशित झालेल्या सानिया यांच्या *अवकाश* या कादंबरीतून नायिका जान्हवीचे आयुष्य कुठून कुठे जाऊ पहाते, त्यात किती आणि कशी वादळे येतात याचे गणितच मांडले आहे. प्रवाहाबरोबर वाहून जाताना नायिका नेमके काय सोसते हे या कादंबरीतून समोर येते. ही कादंबरी काही अंशी कल्पनाविलासात रमताना देखील भासते.

अंजली सोमन यांची *खोल खोल डोहाच्या तळाशी* या २००५ च्या कादंबरीतून मानवी मनाच्या अनंत भावनांचे युद्ध चित्रित केले आहे. मुलगी, आई, आजी या पात्रां भोवती कथानक संशय, प्रेम, घृणा यांचा पिंगा घालताना दिसते. त्यातून अनेक पदर उलगडत जातात, म्हणूनच ही कादंबरी वाचकाला गुंतवून ठेवताना दिसते.

अवयव तस्करी करणाऱ्या एका डॉक्टरला त्याचीच पारंपारिक वळणाची पण हुशार असलेली पत्नी कसे पोलिसांच्या ताब्यात देते हे सांगणारी आणि सामाजिक भान जपणारी शुभांगी भडभडे यांची २००२ साली प्रकाशित झालेली *कृष्णसेवा* ही कादंबरी होय. त्यांच्याच २००४ सालच्या *पिंपळ* या कादंबरीचे कथानक बदलत्या विवाहसंबंधाचे अतिप्रगतशील चित्रण त्यांनी रेखाटले आहे.

सूडाच्या भावनेने उचललेले तीन पिढ्यांचे दहशतवादी पाऊल २००३ साली *दहशतवादाची कथा'* ललिता गंडभीर यांनी या कादंबरीतून चित्रित केले आहे.

२०१० साली सामाजिक कार्यकर्त्या अरुणा साबणे यांनी *मुन्नी* ही कादंबरी वेश्या

व्यवसाय आणि आयुष्याची राख रांगोळी झालेल्या, स्त्री देहाची विटंबना झालेल्या, नातेसंबंधानेच घात केलेल्या आणि अशा या आयुष्यात खचून गेलेल्या नायिकेची कहाणी यातून समोर आणली आहे.

अत्यंत वेगळं आणि अत्यंत महत्त्वाचा विषय प्रभा गोखले यांनी *रणभूमीच्या छायेत* या कादंबरीतून प्रकाशात आणला आहे. लष्करी अधिकारी, कँप, पराक्रम, शौर्यगाथा, संघर्ष, भारत – पाक सीमा, भारत – चीन सीमा, बांगलादेश – भारत सीमा, विरोध, मृत्यू, यश – अपयश, बंडखोरपणा, जिद्द या अंगाने कथानक वेग घेते ते शेवटच्या पानापर्यंत खिळवूनच ठेवते. लेखिकेने अत्यंत सूक्ष्म गोष्टी यात गुंफल्यामुळे आणि भारताविषयी आस्था पुन्हा जिवंत होण्यामुळे अपराधीपणाची भावना ही कादंबरी वाचताना आल्याशिवाय राहत नाही.

विज्ञानाची कास धरलेल्या माधुरी शानबाग यांनी २००३ साली *ब्रेनवेव्हज्* ही कादंबरी लिहिली. मानवी मेंदूतील लहरींचा गाभा या कादंबरीत आहे. त्यातून डॉ. विश्वास वेदपाठक यांची हुशारी आणि त्याचबरोबर स्वार्थीपणाही हळूहळू समोर येतो. स्वतःच्या फायद्यासाठी केलेला विज्ञानाचा अतिवापर शेवटी घात करणारच ठरतो हे सांगणारी कादंबरी आहे.

२००९ साली मालती जोशी यांनी *शल्य* ही रहस्यमय कादंबरी लिहिली आहे. एका स्वप्नापासून कादंबरी सुरुवात करते आणि अनेक रहस्यांबरोबर उत्सुकता ताणून ठेवते हे कादंबरीचे यश आहे.

अनेक रंजनवादी कादंबऱ्याही अनेक लेखिकांनी या दशकात लिहिल्या आहेत. शोभा राऊत यांनी २००९ मध्ये *अश्विनी* ही कादंबरी लिहिली आहे. अश्विनी नावाची नायिका, तिच्यावरचा जबरदस्तीचा प्रसंग, तिच्या ड्रायव्हरच्या मुलाने तिला वाचवणे, गाठ, निरगाठ, उकल या सुत्रात बांधलेले हे प्रेम या कादंबरीतून समोर येते.

आशा कर्दळे यांनी २००९ साली एकाच पुस्तकात दोन लघुकादंबऱ्या प्रसिद्ध केल्या आहेत. *पेटण्याचा सोहळा* ही कादंबरी अनेक पात्रांनी समृद्ध आहे. आई होणे न होणे, मूल दत्तक घेणे, त्याची भेट होणे, तीन वेळा कुस उजवूनही हात रिकामेच रहाणे, मुलाचा मृत्यू अशा अवस्थेतील पात्रांच्या मनातील भावविश्व लेखिकेने अत्यंत रंजक्कादी मांडलेले आहे. तर *वळचणीचं पाणी* या कादंबरीतून दारिद्र्याने गांजलेल्या परिस्थितीचे वर्णन समोर येते. श्रीमंतीला जवळ करण्यासाठी वेड्याबरोबर ठरवलेले बहिणीचे लग्न, स्वतःचा व्यवसाय, व्रते अशा खूप खूप रंजक घटनांना एकत्रित करून पण नेमकेपणा टिकवून ठेवलेली कादंबरी लेखिकेने साकारलेली आहे.

नलिनी भोसेकर यांच्या *शो पीस* (२००८), *अशीही एक देवयानी* (२००८) या कादंबऱ्यातून पती – पत्नी मधील दुरावणारे नातेसंबंध, विवाहबाह्य संबंध, विनाशकारी शेवट, घुसमट, उद्रेक लेखिकेने दोन्ही कादंबऱ्यांतून फुलवलेले आहेत. मात्र लेखनाचा दृष्टीकोन अतिशय रंजनात्मक स्वरूपाचा ठरत गेलेला आहे.

माधवी देसाई यांच्या *भूमिहीन* आणि *रसिया आवोना* या दोन्ही कादंबऱ्या रंजनवादी आहेत. माणसाच्या भावुक वृत्तीचे चित्रण त्यांनी केले आहे. प्रेमकथा, विवाह आणि त्याला वैफल्याची किनार असलेल्या या कादंबऱ्या २००५ मध्ये त्यांनी प्रकाशित केल्या आहेत.

२००३ मध्ये नायना आचार्य यांनी *होते म्हणू स्वप्न एक* या कादंबरीतून दोन मैत्रिणी मधील जिव्हाळा, एकाच शिक्षकावर असणारे दोघींचे प्रेम, प्रेमाचे त्रिकूट, वर्चस्व, जिच्याशी लग्न झाले तिलाच कर्करोग आणि शेवट मात्र गोड. या तत्वावर आधारलेली ही कादंबरी रंजकवाडी आहे.

सुशीला जोशी यांनी २०१० मध्ये *कोंडी* ही कादंबरी प्रकाशित केली. ही कादंबरी श्रीधर आणि माधव या दोन नायकांना एकत्र गुंफून, योगायोग कथा बनली आहे. दोघांमधील साम्य, सवई, बाह्यरूप सगळेच सारखे असल्याने ही एक विलक्षण योगायोग असलेली कादंबरी होय.

वैजयंती काळे यांनी २०१० मध्ये *आपलं घर* या कादंबरीतून गरिबी, शहरातील रहाण्याची सोय, एकाच कार्यालयातील नोकरी, प्रेम, भावना यातून *आपलं घर* ही कादंबरी साकारली आहे. २०१० मधील *अनोखी* या कादंबरीतून श्रीमंत बापाच्या मुलीचे भावविश्व उलगडताना दिसते. मात्र या कादंबरीत प्रेमकथेचा बाज नाही हे विशेष आहे. २०१० मधील तिसऱ्या *चकवा* या कादंबरीतून कौटुंबिक दृढता व्यापक अंगाने मांडून पुढच्या पिढीला न आवडणारी दारिद्र्यता अधोरेखित केल्याचे समजते. आईवडिलांचे जीवन मुलींना पटत नाही आणि येथेच प्रश्न उभे राहू लागतात.

एकूणच २००१ ते २०१० च्या दशकात अनेक स्त्री लेखिकांनी अनेक विषय लेखनातून आपलेसे केलेले दिसतात. त्याच त्या विषयांवरही अनेक लेखिकांनी लिखाण केलेले दिसते. परंतु विचारांची पातळी आणि बदलत्या रहाणी मानापासून घडत गेलेले बदलही त्यांनी लेखनीद्वारे मांडलेले आहेत. आशयसूत्रांच्या गरजेनुसार कादंबऱ्यांच्या संरचनांमध्ये अधिक प्रमाणात नाविन्य आणि वेगळेपण स्त्रियांनी लिखाणात उतरविले आहे. काल्पनिकता, रंजकता, अद्‌भुतता, वैज्ञानिक जोड, सत्य घटना, सामाजिक, वैचारिक, राजकीय.... अशा अनेक स्तरांवर विचार करून अनेक कादंबऱ्याचे लेखन उल्लेखनीय झाले आहे.

स्त्रीवादी विचार असणाऱ्या अनेक लेखिकांनी स्त्रियांना केंद्रस्थान देऊन कादंबरी रचलेली दिसते. अनेक ज्वलंत प्रश्न आणि भविष्यातील समस्याही यामुळे प्रकाशात आलेल्या आहेत.

या दशकातील कादंबरी लेखन करणाऱ्या काही लेखिका नवोदित आहेत तर काहींची ही तपश्चर्या २००० पूर्वीचीही आहे. परंतु अत्यंत गंभीर विषयही सहजतेने कादंबऱ्यातून अनेक गोष्टींचा विचार करायला भाग पाडत असल्याचे समजते.

कमल देसाई, गौरी देशपांडे, मेघना पेठे, विजया राजाध्यक्ष, आशा बगे, सानिया, कविता महाजन, नयनतारा देसाई, वैजयंती काळे, शुभांगी भडभडे, हर्षदा भुरे, शैलजा राजे, मंदाकिनी भारद्वाज, शकुंतला गोगटे, सुमन भडभडे, शीला घाटपांडे, वासंती इनामदार, माथु सावंत, सीमा मराठे, अरुणा लोणंदकर, सुशीला सकपाळ, नीलम माणगावे, छाया महाजन, मीना देशपांडे, प्रतिमा इंगोले, ज्योती पुजारी, तारा वनारसे, शांता गोखले, उमा कुलकर्णी, रोहिणी कुलकर्णी, अंबिका सरकार, रेखा बैजल, मलिका अमर शेख, अंजली सोमन, अरुणा साबणे, ललिता गंडभीर, प्रभा गोखले, नायना आचार्य, शोभा राऊत, माधवी देसाई, आशा कर्दळे, ज्योत्स्ना देवधर, लीला दीक्षित, अंजली जोशी, पारू मदन नाईक, मालती जोशी आणि माधुरी शानभाग या आदि लेखिकांनी कादंबरी अधिक प्रगल्भतेच्या अंगाने आणि वैचारिक पातळीवर अधिक सकस, अधिक विकसित केली आहे. मराठी साहित्यात कादंबरीचा आलेख हा निश्चितच उंचावणारा ठरत आहे.

एकूणच या दशकातील कादंबरीलेखन करणाऱ्या विविध लेखिका, विविध विषय, विविध विचारसरणी, विविध भाषाशैली, विविध सामाजिक स्तर या सूत्रामध्ये एकवटले आहे. "इतर सर्व वाङ्मयप्रकारांचे सत्व पचवून मानवी मन, जीवन आणि त्याभोवतीचा समाज यांच्या शोधासाठी कटिबद्ध असलेला कादंबरी हा एक वैशिष्टयपूर्ण वाङ्मयप्रकार होय. इतर वाङ्मयप्रकार आपल्या परीने जीवनशोधात सहभागी झालेले असतातच. तथापि कादंबरी या साहित्यप्रकाराकडून आपण नेहमीच गांभीर्यपूर्वक जीवनदर्शनाची अपेक्षा बाळगत आलो आहोत. कादंबरी या साहित्यप्रकारानेही आपली ही अपेक्षा पूर्ण केली आहे. कारण कादंबरीची प्रकृती मुळात जीवनवास्तवसन्मुख अशी असते या दृष्टीने कादंबरी हा मानवी मनाचा व जीवनाचा एक वास्तवपूर्ण कलारुप वेध असतो." [१०]

**संदर्भ ग्रंथसूची**

१. अरुणा ढेरे, " आत्मशोधाच्या स्वयंप्रकाशी वाटा", 'स्त्री-लिखित मराठी कादंबरी(१९५० ते २०१०), पद्मगंधा प्रकाशन, प्रथमावृत्ती ८ मार्च२०१३, पृ.क्र. २१

२. भालचंद्र फडके, "स्त्रियांचे कादंबरी- लेखन", मराठी लेखिका : चिंता व चिंतन, श्रीविद्या प्रकाशन, पहिली आवृत्ती, मार्च १९८०, पृ. क्र. १८४

३. अरुणा ढेरे, " आत्मशोधाच्या स्वयंप्रकाशी वाटा", 'स्त्री-लिखित मराठी कादंबरी(१९५० ते २०१०), पद्मगंधा प्रकाशन, प्रथमावृत्ती ८ मार्च२०१३, पृ.क्र. १३,१४

४. प्रभा गणोरकर, 'आशा बगे', "स्त्री- लिखित मराठी कादंबरी" (१९५० ते २०१०), संपादन- अरुणा ढेरे, पद्मगंधा प्रकाशन, प्रथमावृत्ती ८ मार्च २०१३, पृ. क्र. ८९

५. तारा वनारसे, 'अरुणा दुभाशी', "स्त्री- लिखित मराठी कादंबरी" (१९५० ते २०१०), संपादन- अरुणा ढेरे, पद्मगंधा प्रकाशन, प्रथमावृत्ती ८ मार्च २०१३, पृ. क्र. १७०

६. ज्योत्स्ना देवधर,डॉ. स्वाती कर्वे, "स्त्री- लिखित मराठी कादंबरी" (१९५० ते २०१०), संपादन- अरुणा ढेरे, पद्मगंधा प्रकाशन, प्रथमावृत्ती ८ मार्च २०१३, पृ. क्र. ७०

७. ज्योत्स्ना देवधर,डॉ. स्वाती कर्वे, "स्त्री- लिखित मराठी कादंबरी" (१९५० ते २०१०), संपादन- अरुणा ढेरे, पद्मगंधा प्रकाशन, प्रथमावृत्ती ८ मार्च २०१३, पृ. क्र. ७०

८. विद्युत भागवत, कमल देसाई, "स्त्री- लिखित मराठी कादंबरी" (१९५० ते २०१०), संपादन- अरुणा ढेरे, पद्मगंधा प्रकाशन, प्रथमावृत्ती ८ मार्च २०१३, पृ. क्र.४४,४५

९. नीलिमा गुंडी, 'कविता महाजन', "स्त्री- लिखित मराठी कादंबरी" (१९५० ते २०१०), संपादन- अरुणा ढेरे, पद्मगंधा प्रकाशन, प्रथमावृत्ती ८ मार्च २०१३, पृ. क्र. २८०

१०. डॉ. रवींद्र ठाकूर, "कादंबरी : एक वाङ्मयप्रकार काही मुद्दे", साहित्य : समीक्षा व संवाद, प्रथमावृत्ती १५ ऑगस्ट १९९९, प्रकाशन- दिलीपराज पृ. १४

# प्रकरण तिसरे: मराठी स्त्रीलिखित कवितेचा अभ्यास

अ) मध्युगीन कालखंडातील स्त्रीलिखित  कविता

ब) स्त्रीलिखित  नवकवितेचा प्रारंभ काळ

क) १९७५ते २००० या कालखंडातील स्त्रीलिखित  कविता

ड) २००० ते २०१० या कालखंडातील स्त्रीलिखित कविता

मराठीची आद्य कवयित्री म्हणून महादाइसेला अर्थात महदंबेला ओळखले जाते." तिचे मूळचे नाव 'रुपाई' किंवा 'रुपाबाई' होय. 'महदाइसा' व 'महदंबा' हि तिची नंतरची नावे होत. रुपाईचे महदाइसा हे नाव तिच्या पणजीवरुन चक्रधरांनी ठेवले."[१] बाराव्या शतकातील चक्रधर यांची शिष्या महदंबा. महादंबेपासून मराठी स्त्री काव्याची सुरुवात झाली, असे म्हणता येईल. त्यानंतर असलेल्या मुक्ताबाई-जनाबाई यांनी स्त्री काव्यरचनेचा पाया घातला. काही कारणाने निर्माण झालेले आशय या संत स्त्रियांनी अध्यात्मिक वातावरणात सहज विलीन केले. संत कवयित्री यांचे काव्य हे अत्यंत व्यापक व स्वाधीन असे आहे. संत कवयित्री यांनी त्यांच्या काव्यातून जे दू:ख, वेदना, व्यथा व अनुभव मांडले, त्यातील काही प्रश्न एकही असलेले जाणवते.

*शरीराचे भोग / वाटतात वैरी //*
*मी कोण करी / चिंता आता ?*

असे तुकाराम शिष्या बहिणाबाई यांनी सोळाव्या शतकात कळकळीने लिहिलेले दिसून येते. तसेच, त्यांना परमार्थाची ओढ लागलेली दिसते.

एकविसाव्या शतकात आज स्त्री सर्व प्रकारचे विद्याध्ययन, विद्याभ्यास करत आहे. हे पाहून बहिणा समाधानी झाली असावी. संत मुक्ताबाईने नेमके आणि चिंतनात्मक लिहिले. तसेच, पंढरीला जाताना वारकरी आज देखील जनाबाईंचे अभंग गातात. त्याचबरोबर स्वातंत्र्यपूर्व काळात सावित्रीबाई फुले यांनी ही काव्यलेखन केले. तसेच, लक्ष्मीबाई टिळकांचे काव्यलेखन देखील सहज, उत्स्फूर्त, स्त्रीमनाच्या अवस्था साकार करणारे असे आहे. तसेच, बहिणाबाई चौधरी हा एक मैलाचा दगड! स्वतंत्र विशुद्ध अनुभव व काळजाला भिडणारी रचना.

१९२० ते १९५० या काळात अनेक स्त्रियांनी काव्यनिर्मिती केली. या कालखंडातील काव्यनिर्मिती हि  राधाबाई दांडेकर यांच्या *संसारचित्र* या संग्रहापासून प्रारंभ होऊन लीला

वाचासुंदर यांच्या *काव्हर* पर्यंत थांबते. यातील दोन लक्षणीय कवयित्री म्हणजे लक्ष्मीबाई टिळक आणि बहिणाबाई चौधरी. तसेच, *भरली घागर* या कवितासंग्रहातली लक्ष्मीबाईंची कविता हृदयस्पर्शी आहे.

पद्मा गोळे, संजीवनी मराठे, अंजली ठाकूर, सुशीला पगारीया, अनुराधा पोतदार, योगिनी जोगळेकर यांनीही संवेदनशीलता व्यक्त करणारी कविता लिहिली. या सगळया कवयित्रींमध्ये सर्वात श्रेष्ठ काव्य इंदिरा संत यांचे होय. निसर्ग, प्रेम, विरह, दुःख आणि एकाकीपण ही इंदिरा संतांच्या कवितेची वैशिष्टये आहेत, असे म्हटले जाते. तसेच, संत जनाबाईंच्या अभंगाप्रमाणे लोकप्रिय होण्याचे भाग्य शांताबाईंच्या *भावविभोर* काव्याने मिळवले आहे. रजनी परुळेकर यांनी आशयसंपन्न मुक्तछंदातली कविता लिहिली. १९९० नंतर बऱ्याच कवयित्री मोकळेपणाने, वैविध्यपूर्ण असे लेखन करू लागल्या. तसेच, आसावरी काकडे ही कवयित्री सद्यस्थितीतील व्यापक अनुभवाला धरून गांभीर्याने लिहिणारी कवयित्री दिसून येते.

अशाप्रकारे संत कवयित्री व अनेक स्त्रिया त्यांच्या काव्यातून कशा व्यक्त होत गेल्या, त्यांच्या व्यक्त होण्याच्या पद्धती, मर्यादा आणि शतकानुशतके व्यक्त होण्याचे विविध प्रकार कसे बदलत गेले, हे समग्र त्यांच्या काव्यरचनेतून दिसते. यावरून अलौकिक आणि पारमार्थिक आनंदाचा आविष्कार साकार होत जातो.

**स्त्री कवयित्रींची प्रेरणा**

मध्ययुगीन कविता, स्वातंत्र्योत्तर कविता, १९६० नंतरची कविता (औद्योगिकीकरण झाल्यानंतरची) २० व्या शतकाच्या शेवटच्या दोन दशकातील आणि २१ व्या शतकाच्या प्रारंभाची कविता असे कवितेचे प्रकार निर्माण झालेले आहेत. तसेच संतकवींच्या काळापासून ते आजच्या काव्याच्या इतिहास म्हणजे समकालीन, आध्यात्मिक, भौतिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक इत्यादींचे परिणाम संवेदनशील कवी मनावर उमटतात. वास्तवात काळानुसार बदल होत आहेत, त्याप्रमाणे आध्यात्मिक, भौतिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीमध्ये स्थित्यंतरे होत गेलेली दिसतात. तसेच मर्ढेकर, कुसुमाग्रज, पु. शि. रेगे अशा अनेक कवींनी नवकवितेला आकार दिला. त्यामुळे कोणताही बदल अचानक न होता, सर्वांच्या समन्वयातून साकारत असतो.

नवकविता ही नवी दृष्टी, नवा विचार, भाषिक लकबी, वैविध्यता या अशा अनेकापासून उदयास येऊन नवकविता ही बहुआयामी होत गेली. तसेच, नव्या जगाचे परीसंस्थांचे अमूर्त विरूपण करण्याएवढे प्रबळ बनली. त्याचप्रमाणे संतकाव्य परंपरेपासून रूढ असलेली ओवी,

अभंग, भारुड, सौरी या काव्यप्रकारांना लोकप्रियता मिळत गेली. त्याचबरोबर आजच्या काळात स्त्रिया सुशिक्षित होत असल्याचे प्रमाण अधिकाधिक दिसत आहे. त्यामुळे विविध क्षेत्रात ती पदार्पण करत आहे. तसेच, चूल-मूल व चार भिंतींबाहेर पडलेल्या स्त्रीच्या अस्तित्वाचे कंगोरे अधिक बहुआयामी होत आहे. स्त्रीचं व्यक्त होणं, अभिव्यक्त होणं ही सुद्धा एका दबलेल्या आवाजाची बंडखोरी, उत्क्रांत होत गेलेल्या रुपात बघायला मिळते. स्फुट साहित्य हे दबलेल्या स्त्रीचा आवाज यातून व्यक्त होणारे एक माध्यम म्हणजेच लोकवाङ्मय होय. तसेच, जात्यावरची गाणी हा तर भारतीय मराठी साहित्यातला प्राचीन घरंदाज ऐवज होय. स्त्री काव्याचा लिखित इतिहास म्हणून सर्वप्रथम नोंद केली गेली ते संत कवयित्रींच्या साहित्याची! तसेच, संतवाङ्मय हे शांतीचे माहेरघर असते. ही शांती गोंधळ-कोलाहल यांच्या पलीकडची तर आहेच; पण नि:स्तब्धतेच्याही पलीकडची आहे.

## अ) मध्ययुगीन कालखंडातील स्त्रीलिखित कविता

### महदंबा

मराठीची आद्य स्त्री कवयित्री म्हणून प्रथम मान दिला जातो. ती महदाइसा अर्थात महदंबा होय. महाराष्ट्रात तेराव्या शतकात चक्रधरांच्या रूपाने महानुभाव पंथाने जे धार्मिक व सामाजिक सुधारणेसाठी जे परिवर्तन घडवून आणले त्यात महदंबेचे देखील योगदान असल्याचे दिसते. यादव राजांच्या शेवटच्या कालखंडात महाराष्ट्रात चक्रधरांचा उदय झाला. ते पहिले समतावादी मराठी संत होते. त्यांचे व्यक्तिमत्व समाज सुधारकाचे होते. ते समान तत्वाला महत्व देत असल्यामुळे चक्रधरांभोवती अधिकाधिक शिष्य जमा झाले. तसेच, या पंथात शुद्रांनाही एकत्रित घेऊन त्यांचा अस्पृश्योद्धार केला. या पंथात स्त्रियांचा देखील समावेश केला. तसेच, हा धर्म सामान्य लोकांना समजावा म्हणून सामान्यांच्या भाषेत, त्यांना अर्थबोध होईल अशा लोकभाषेचा उपयोग केला.

“महदंबा हे महदाइसा नावाचे संस्कृत भाषेतले रुपांतर होय. केसोबाच्या ‘रत्नमालास्तोत्रम’ या संस्कृत काव्यात हे नाव आढळते. स्वत: सुद्धा कैक पंथीयांच्या प्राकृत नावाची संस्कृत रुपे त्यांने या काव्यात केलेली निदर्शनास येतात ! तेव्हा महदाइसेचे महदंबा नाव करणारा तोच पहिला ग्रंथकार असावा. महानुभाव पंथाला शास्त्राधिष्ठान प्राप्त करुन देणारा केसोबासच असल्यामुळे विदग्धता आणणाराही तोच असू शकतो.”[२] महदाइसाच्या रचना म्हणजे धवळे, मातृकी रुक्मिणी स्वयंवर, गर्भकांड ओव्या, आरत्या इत्यादी आहेत. या

सर्व रचना श्रीकृष्णावर किंवा चक्रधरांवर आधारित आहेत. तसेच, रुक्मिणी ही श्रीकृष्णाची भक्त म्हणून महानुभवांना 'भक्तांचा आदर्श' म्हणून रुक्मिणी वंदनीय आहे. श्रीकृष्ण-रुक्मिणीच्या नात्यातले हे कोमल बंध महदाइसाने सर्वात प्रथम टिपले आणि त्या आधारावर पुराणातली कथा तिने निवडली व त्यावर काव्य लिहिले.

*गोमतीए तीरी : निळेया गुढरा*
*राजेया गुजरा : श्रीकृष्णराया ||१||*
*निळा गुढरु : राजा गुजरू*
*माणिकी मंडपी : श्री चक्रधरू ||२||*
*गोमटे मांजिटे : आरव कुंडीचे*
*राजेया दंडीचे : श्री चक्रधरा ||३||*
*गोरे अंग बहिया : डावरिया चंदने*
*श्री चक्रधरा दिठी होय ||४||*
*बापू म्हणे की भाईया:*
*माझे साजणी गोत चारिया वो ||५||*

मराठी वाङ्मयातील आद्य कवयित्री महदंबेने भक्तीच्या परमोच्च पातळीवर पोहचून चक्रधरांच्या सहवासात आपले आध्यात्मिक आयुष्य उन्नतीच्या मार्गावर नेले. परंतु त्याकाळी बालविधवांची समस्या, स्त्रीवर्गाचे प्रश्न अशा अनेक टप्प्यांवर तिचे योगदान दिसून येते. मराठीतलं आद्य स्त्री काव्य महदंबेच्या नावावर आहे.

**जनाबाई**

मराठवाड्यात परभणी जिल्ह्यात गोदावरी नदीच्या काठी परभणी-परळी वैजनाथ रेल्वे मार्गावर गंगाखेड नावाचे एक छोटेसे गाव आहे. आज ते तहसिलेचे ठिकाण आहे. या गावी शूद्र कुळातील 'दमा' नावाचा एक भगवद् भक्त राहत असे. तो पंढरपूरचा वारकरी होता. तो तर आषाढी – कार्तिकी एकादशीला पंढरीची वारी करीत असे. त्याच्या पत्नीचेनाव 'करुंड'. ती भगवत भक्त पतिव्रता स्त्री होती. दमा व करुंड हे एक सुखी जोडपे होते. पण बरेच दिवस पोटी मुल नसल्यामुळे मात्र ते खिन्न असत. एकदा ते दोघे वारीकरिता पंढरपूरास गेले असता त्यांनी विठ्ठलास नवस केला व संतान प्राप्तीची इच्छा प्रकट केली. त्याच रात्री विठ्ठलाने दमास स्वप्नात येऊन दृष्टांत दिला व सांगितले की, 'तुला पुत्र नाही;

पण एक कन्या होईल. ती तुझ्या कुळाचा उद्धार करील. तिचे नाव 'जनाबाई' ठेव. नामदेव-चरित्राशी तिचा संबंध येणार असल्यामुळे तिला दामाशेटीकडे- नामदेवाच्या वडिलांकडे सांभाळण्यासाठी दे."[३] आद्य संतकवयित्रीमध्ये भक्तीची माधुरी व योगाची खोली या दोन प्रमुख वैशिष्ट्यांसह ज्यांचे नाव घेतले जाते त्या जनाबाई होय. जनाबाईंना मुळातच उपेक्षेचे, दुर्लक्षिताचे दास्यजीवन वाट्याला आले. तसेच, इतर कोणत्याही संतकवयित्रींपेक्षा जनाबाईंची काव्यरचना अतिशय साधी, सरळ, आर्त व अधीर, प्रामाणिक व निर्मळ यांनी भारलेली वाटते. त्याचबरोबर जनाबाईंचे अभंग आजही गायले जातात. जनाबाईंना संतवाटिकेतील 'जाईची वेल' असे संबोधतात.

बालपणातच मातृ-पितृ छत्राला मुकलेली जनी, दामाशेटीच्या घरी दासी म्हणून संपूर्ण आयुष्य घालवते. झाड-लोट, धुणी-भांडी, दळणकांडण असे अनेक काबाडकष्ट उपसते. असहायतेच्या या अंतिम अवस्थेत देखील, केवळ भक्तीच्या जोरावर संतांच्या घरची दासी प्रत्यक्ष विठ्ठलाची प्रेमकळा मिळविण्यास पात्र झाली आहे.

*स्त्रीजन्मा म्हणवूनी न व्हावे उदास / साधुसंता ऐसे केले जनी //*
*संतांचे घरची दासी मी अंकिली / विठोबाने दिली प्रेमाकळी //*

जनाबाईंचे पोरकेपण संपून जाते इतपत आत्मविश्वासाचे उद्गार काढण्याइतकी आध्यात्मिक प्रगती (उन्नती) होते. शेकडो अभंग लिहूनही अंत:करणातील उत्कंठा आणि आर्तता, ज्ञानेश्वरांविषयी असणारा अपार जिव्हाळा तिने या अभंगातून व्यक्त केलेला दिसतो.

*ज्ञानाचा सागर / सखा माझा ज्ञानेश्वर //*
*मरोनिया जावे / बा माझ्या पोटा यावे //*
*ऐसे करी माझ्या भावा / सख्या माझ्या ज्ञानदेवा //*
*जावे ओवाळूनी / जन्मोजन्मी दासी जनी //*

तसेच विठ्ठलाला ती 'विठाबाई, पंढरीचे आई' तर ज्ञानदेवाला 'ज्ञानाबाई, आई' म्हणून संबोधते. यात करुण असा वत्सल, प्रेमळ रस दिसून येतो. तसेच "नामदेव महाराज जनाबाई विषयी म्हणतात, जनाबाईंने चक्रपाणी वश केला होता. काम करता करता जनाबाईचे परमेश्वराचे ध्यान व चिंतन सतत चालू असे तसेच जनाबाईचा भाव पाहून पांडुरंग तिला तिच्या कामात मदत करीत असे."[४]।

*नामयाचे घरी असे दासी जनी / तिने चक्रपाणी वश केला //*

*करिता कामधंदा ध्यानी नारायण | करीत चिंतन अहोरात्र ||*
*देखोनिया भाव तिचा पांडुरंग | काम करु लागे जनीलागी ||*
*रात्री येवोनिया जनीचीया घरी | दळू लागे हरी तिजलागी ||*

*हरिश्चंद्राख्यान व थालीपाक* या रचनांमुळे तिला कथा, काव्य लेखनाचेही श्रेय मिळाले. " जनाबाईने हे हरिश्चंद्राख्यान तेवीस अभंगात गायले आहे. त्याचे तीनशे वीस चौक आहेत. काही अभंग चार चौकाचे, तर काही एकत्तीस चौकांचे आहेत. तिने एकेक प्रसंग, एकेक अभंगात गोविला आहे. व म्हणून त्यात विविधता, मोहकता व रचनाकौशल्य हे गुणविशेष दृष्टीस पडतात. एक-दोन अभंगात तर तिने शेवटच्या चौकात पुढील प्रसंगाची पूर्वसूचनाही दिली आहे. आख्यानाचा आरंभ एखाद्या कहाणीप्रमाणे करुन टप्प्याटप्प्याने एकेक भाग वर्णन केला आहे. आख्यानाचा शेवटही परिणामकारक केला आहे."[५] साधे, सरळ निवेदन, जिवंतपणा, विनोदबुद्धीची या गुणवैशिष्ट्यांमुळे तिची थालीपाक ही उत्कृष्टमय रचना असल्याचे मानले जाते. अशी ही जनाबाई स्वतःला 'नामयाची दासी' म्हणून वारंवार उल्लेख करते. अशा प्रकारे अपेक्षा, बहिष्कार, तिरस्कार, आरोप, एकाकीपणा, पोरकेपणा हे सारे तिच्या नशिबात असले तरी ती तिच्या कवितेतून कधीच जाणवू दिले नाही. तसेच, करूणा, वात्सल्य, ओलावा, माधुर्य यांच्यासोबत तपस्व्याच्या साधनेनंतर प्राप्त होणारी देहातील योगिक अनुभूती हे जनाबाईंच्या कवितेचं अद्वितीय वैशिष्ट्य होय.

**मुक्ताबाई**

मुक्ताबाई संत मंडळात लहान असल्या तरी त्यांची आध्यात्मिक योग्यता फार मोठी होती. त्यांना निवृत्तीनाथांकडून ज्ञानाधिकार प्राप्त झालेला होता व योगानुभावात ती निपुण होती. तसेच, चांगदेवसारख्या योग्याची ती गुरु झाली. नामदेवाचा अहंकार देखील मुक्ताईने दूर केला. तसेच, ज्ञानेश्वरांना कार्यप्रवृत्त केले. मुक्ताबाई नामदेवाला म्हणते, *अखंड जयाला देवाचा शेजार/ का रे अहंकार नाही गेला.* यावरून मुक्ताईचा स्पष्टपणा जाणवतो. तसेच, ज्ञानेश्वर व इतर संताबरोबर तिनेसुद्धा अभंग रचना केली आहे. पंढरीमहात्म्य, नाममहात्म्य व संतसमागम या विषयावर तिची अभंगरचना आहे. तिचे ताटीचे अभंग प्रसिद्ध व गोड आहे. सामाजिक जाचाने ज्ञानेश्वर खिन्न झाल्यामुळे त्यांनी आपल्या झोपडीचे दार बंद करून बसले तेव्हा मुक्ताईनेच त्यांना कार्यप्रवृत्त केले.

*योगी पावन मनाचा/ साही अपराध जनाचा//*
*विश्व झाले रागे वन्ही/ संत सुखे व्हावे पाणी//*

*शब्दशस्त्रे झाले क्लेश। संती मानावा उपदेश॥*
*विश्वपट ब्रह्म दोरा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा॥*

यात मुक्ताईचा लडिवाळपणा, धिटाई दिसून येते. तसेच, *तुम्ही तरुनी विश्वतारा* असे ती ज्ञानेश्वरांना म्हणते. मुक्ताबाईंच्या व्यक्तिमत्त्वात व कवितेत तेजस्विता दिसते. मुक्ताबाईंना केवळ १७ ते १८ वर्षे इतके अल्पायुष्य लाभले. मुक्ताबाईच्या नावे केवळ ४२ अभंग आहेत. उपलब्ध कविता या साधनेच्या स्वरुपात लिहिलेल्या आहेत. परमार्थ हा त्याचा गाभा आहे. नाममहिमा सांगणारे हरिपाठाचे अभंग, परमार्थ जीवन काय आहे याबाबत उपदेशपर अभंग, ताटीचे अभंग अशी तिची रचना आहे. मुक्ताबाई-चांगदेव संवाद यातील बरेचसे अभंग मुक्ताबाईचेच आहेत, असे तज्ञांचे मत आहे. ज्ञानेश्वरांची कविता व निवृत्तीचे काव्य यांचा संस्कार मुक्ताईंच्या कवितेवर दिसतो. ज्ञानेश्वरांच्या सान्निध्यात राहून मुक्ताबाईचे त्यांच्यापासूनचे वेगळेपण अभंगात जाणवते. तसेच, वयाने ज्येष्ठ असलेल्या चांगदेवालाही 'अजून कोराच राहिला' म्हणून उपहासाने उपदेश केला.

*चौदाशे वरुषे शरीर केले जतन। बोधावीन क्षीण वाढविला॥*
*नाही गुरुमंत्र नाही उपदेश। परमार्थाशी दोष लावियेला॥*

मुक्ताबाईच्या रचनेबद्धल महाराष्ट्र सारस्वतकार म्हणतात, " मुक्ताबाईची सर्वच रचना गोड आहे. स्त्रियांच्या कोमलपणाची छटातीत पसरली आहे. सुर्योदयापूर्वी पक्षी किलबिल करु लागले म्हणजे तो आनंद होतो. तोच हिचे अभंग वाचताना होतो."[६] अशा रीतीने मुक्ताईने बोध केला. *मुक्ताई-चांगदेव संवाद* प्रकरणात असलेली, 'आध्यात्मिक अंगाई गीते' ही वैशिष्ट्येपूर्ण अभंग रचना आहे. मुक्ताईने चांगदेवाला उपदेश केला त्यातले सहा अभंग चांगदेवास बाळ कल्पून रचलेले आहे.

*गुण ना निर्गुण शब्दातीत। तेथे तू निश्चित बाळा नीज॥*
*पाळणा लाविला हृदयकमळी। मुक्ताई जवळी सादविते॥*
*गुणातीत डहाळी पाळणा लाविला। तेथे सुत पहुडला मुक्ताईचा॥*
*निजी नीज बाळा न करी पै आळी। अनुहात टाळी वाजविते॥*

*मुक्ताई-चांगदेव* संवादातील अभंग क्रमांक ७ ते १२ अशी सारी स्वतंत्र अंगाई गीते आहेत. तसेच, ज्ञानेश्वरांच्या पाळण्याच्या अभंगाचे काहीसे संस्कार तिच्या अंगाई गीतांवर झाले आहेत. यानंतरचे अभंग म्हणजे 'कुट-अभंग' होय. त्यात योगानुभवाच्या गूढ भाषेचे सौंदर्य दिसते. चिंतन व मनन करायला लावणारे प्रश्न ती चांगदेवालाही विचारते.

*टेकावरी टेक त्यावर टेकुली। तिचे एक बाळी विस्मो करी।।*
*तिचे नाव काय, याचे नाव काय। विचारोनी पाहे मनामाजी।।*
*डोळयातील बाहुली जालीसे गुरुवारू। तिशी सुईन मेळावा अरुवारू।।*
*सुईचे आणीवार वसचले पठार। मुक्ताई म्हणे चांगया सांग याचा विचार।।*

अशा कुट अभंगात मुक्ताई आध्यात्म व काव्य या दोन्हीत विशेष उंची गाठते.

*मुंगी उडाली आकाशी। तिने गिळिले सूर्यासी।।*
*थोर नवलाव जाला। वांझे पुत्र प्रसवला।।*
*विंचू पाताळासी जाय। शेष वंदी त्याचे पाय।।*
*माशी व्याली धार जाल। देखोनी मुक्ताई हासली।।*

विरक्ती, भक्ती, योगानुभूती, निःसंदेह अद्वैत प्रीती, व्यक्ती व समाजानिरपेक्षता या सर्वच बाबी तिच्या कवितेची वैशिष्ट्ये आहेत. ऐहिक जीवनापलीकडची तटस्थ व विरक्त वृत्ती तिला देहमनावर विजय मिळवून देते. ती म्हणते, *मुक्ताई मुक्त हरिनाम सेवेत तसेच, मुक्तपणे मुक्त मुक्ताई पै रत.* “नामदेवानी तिच्या समाधीच्या प्रसंगाचे वर्णन केले आहे, ते म्हणतात एखाद्या विजेसारखी तळपळून ती लगेच लुप्त झाली.” ७

अशा प्रकारे समाजाने बहिष्कृत केलेली आणि बालपणीची पोरकी झालेली मुक्ताई आपल्या भावंडांसोबत वाढली, मोठी झाली.

**कान्होपात्रा**

“कान्होपात्रा ही ज्ञानेश्वर समकालीन असावी, असे एक मत आहे. काही तज्ञाच्या मते तिचा काळ इसवी सन १४६८ हा असावा, ती मंगळवेढयाच्या शामा गणिकेची मुलगी वेश्येच्या कुळात जन्म घेऊनही तिने आपले नाव वारकरी संप्रदायात अजरामर केले आहे. त्यात तिच्या भक्तीची व चारित्र्याची थोरवी आहे. तिचे अवघे तेवीस अभंग उपलब्ध आहेत. या सर्व अभंगातून तिने देवाचा धावा केला आहे. तिचे अभंग म्हणजे भक्ताच्या ह्दयाचे आर्त कंदनच होय. तिने आपले तनमन कोणा पुरुषाला विकण्याऐवजी विठ्ठलाला वाहिले होते. विठ्ठलाचा धावा करताना ती आपल्या हीन जातीचीही आठवण त्याला करुन देते ती म्हणते- ‘मज अधिकार नाही, भेटी देई विठाबाई” ८ कान्होपात्रा ही संतकवयित्री होय. गणिकेच्या पोटी जन्माला आल्यामुळे समाजाने तिला बहिष्कृत केले. तसेच, तिची वृत्ती वैराग्याची राहिली. परंपरागत व्यवसाय नाकारून ती वारकऱ्यांच्या मेळयासह विठ्ठलभक्तीत रममाण

होते. आपण हीन कुळात जन्मलो त्यामुळे परमेश्वर आपला उद्धार कसा करील, ही चंचलावस्था तिच्या मनी निर्माण झाली.

*नको देवराया अंत पाहू आता। प्राण हा सर्वथा कुटो पाहे।।*
*हरिणीचे पाडस व्यध्रि धरियेली। मजलागी जाहले तैसे देवा।।*
*तुजवीण ठाव न दिसे त्रिभुवनी। धावे हो जननी विठाबाई।।*
*मोकलोनी आस जाहले मी उदास। घेई कान्होपात्रेस हृदयात।।*

अशा प्रकारे भगवंताला शरण जाऊन कळकळीने विनंती करणाऱ्या कान्होपात्राने विठ्ठलचरणी प्राणत्याग केला. यावरून तिच्या मूळ स्वभावात पूर्णपणे विरक्ती दिसून येते. व्यवसायाने गणिका कुळातली असून देखील स्त्री म्हणून पावित्र्य व निष्ठा, श्रद्धा तिच्या हृदयी असलेली दिसते. आर्तता व भक्तीतलं समर्पण हे तिच्या कवितेच्या हृदयस्पर्शी होण्यातले विशेष आहेत.

*देहाचिये आशा विठ्ठलाचे पाय।*
*आणिक न गमे माय दुजा हेत।।*
*येई वो विठ्ठले येई वो विठ्ठले।*
*कृपेने वाहिले अलिंगावे।।*
*निर्दय पामर बोलतात फार।*
*न कळे विचार देवा तुझा।।*
*म्हणे कान्होपात्रा पंढरीच्या राया।*
*धावण्या सखया पाव वेगी।।*

हा अभंग म्हणताच वारकऱ्यांच्याही डोळ्यातून अश्रू वाहत असे. यातूनच कान्होपात्रेच्या विठ्ठलभक्तीची साक्ष त्यांना पटली. व त्यानंतर तिला सन्मानाने विठ्ठलाच्या देवळापाशी आणले. तसेच, भिमातीरीचे पंढरपूर हेच आमच्या सर्व संतांचे माहेर असे कान्होपात्रा म्हणते –

*माझे माहेर पंढरी। सुखे नांदू भीमातीरी।।*
*येथे आहे मायबाप। हरे ताप दरुशने।।*
*निवारिली तळमळ चिंता। गेली व्यथा अंतरीची।।*
*कैशी विठेवरी शोभली। पाहुणी कान्होपात्रा धाली।।*

कान्होपात्रेची विठुरायावर नितांत श्रद्धा असलेली दिसते. त्यामुळे कान्होपात्रेला मनी

असे वाटते की, भगवंत हा भावाचा भुकेला असून तो आपल्या भक्तांना कधीच काही कमी (उणे) पडू देत नाही.

*विठ्ठू दीनांचा दयाळ| वागवी दासाची कळकळ||*
*देव कृपावंत मोठा| उणे पडो नेदी तोटा||*
*देवा भक्तांचा अभिमनी| वाहे चिंता सकळ मनी||*
*देव भावाचा भुकेला| कान्होपात्रे आनंद झाला||*

"तिच्या लावण्याची कीर्ती बेदरच्या बादशाहाच्या कानी गेल्यानंतर तिला बादशाहाचे बोलावणे आले. त्यावेळी तिने केलेला धावा भक्तीरसाबरोबरच करुणरसानेही ओथंबलेला आहे. साध्या आणि सोप्या भाषेत कान्होपात्राने आपले अंत:करण देवाजवळ उघडे केले आहे.

*सिंहाचे भातुके जंबुक पै नेता | थोराचिया माथी लाज वाटे||*
*हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियेले| मजलागी जहाले तैसे देवा||*
*म्हणे कान्होपात्रा देह समर्पणे | करावा जतन ब्रीदासाठी ||*

हा तिचा धावा तिची असहायता शरणागती दाखवतो. तसेच तिच्या व्रतस्थ व्यक्तिमत्वाचे दर्शनही घडवितो. या प्रसंगानंतर तिने आपला देह विठ्ठलचरणी अर्पण केला." [९]

अशा प्रकारे कान्होपात्रा देखील संत कवयित्रींमधील श्रेष्ठ कवयित्री असलेली दिसून येते.

**सोयराबाई**

संत चोखामेळा यांची पत्नी सोयराबाई स्वतःचा उल्लेख चोख्याची महारी असा तिच्या अभंगात करते. शूद्र जातीत जन्मल्यामुळे त्यांच्या पदरी दुःख, निराशा, तिरस्कार व उपेक्षा आली. चोखोबा एकदा आपल्या कुटुंबासह पंढरीला जात असताना काही ब्राम्हणांकडून छळ झाला. तसेच, दर्शनाला गेले त्यावेळेस चोखाबांना पत्नी व मुलांसह चोखाबांना देखील हाकलून दिले, ही उपेक्षा सोयराबाई अभंगातून व्यक्त करतात.

*पंढरीचे ब्राह्मण चोख्याशी छळले| तयालागी केले नवले देवे||*
*सकळ समुदाव चोखियाचे घरी| रिद्धीसिद्धी द्वारी तिष्ठताती||*
*रंगमाला सडे गुढिया तोरणे| आनंद किर्तन वैष्णवाचे||*
*असंख्य ब्राह्मण बैसल्या पंगती| विमानी पाहता सुरवर||*
*तो सुखसोहळा दिवाळी दसरा| वोवाळी सोयरा चोखयासी||*

चोखामेळ्याची धाकटी बहिण निर्मळा व सोयराबाई या दोघी नणंद-भावजयात फारच मैत्री, आपुलकी दिसते.

*चोखा निर्मळा एकरूप| दरुशनेहरे ताप||*
*वाचे विठ्ठल नाम छंद| नाही भेड उभयता||*
*तीर्थ उत्तम निर्मळा| वाहे भगीरथी जळा||*
ऐसा तारक मेहुणपुरी| म्हणे चोख्याची महारी||

संत सोयराबाईंच्या अभंगाची भाषा खूपच साधी, सोपी वाटते. तिच्या रचनेत स्पष्टता व रसाळपणा आहे. प्रपंचाची विरक्ती वृत्तीत असून देखील तिला आपल्या विठ्ठलभक्त नवऱ्याबद्दल कमालीचा असलेला अभिमान तिच्यातून दिसून येतो. त्याचप्रमाणे चोखोबांच्या ईश्वरभक्तीचा व आध्यात्मिक वृत्तीचा संस्कार तिच्या कवितेवर व कुटुंबावर (कर्ममेळा) आढळून येतो किंवा दिसते. ती समाजप्रबोधनाची भाषा बोलते तसेच, ती भेदभावावर परखडपणे भाष्य करते. सोयराबाई यांची शैली साधी, सरळ, सोपी वाटल्यामुळे समजण्यास त्यांची शैली अवघड वाटत नाही. त्यामुळे ती रसाळ वाटते. अशा प्रकारे सोपी भाषाशैली, समकालीन आशयसूत्र, भक्ती व विरक्ती हे सोयराबाईंच्या कवितेचे विशेष आहेत.

**संत बहिणाबाई**

संत कवयित्री बहिणाबाई ह्या तुकारामांच्या शिष्या होत्या. त्यांना भागवत धर्म मंदिराची ध्वजा म्हणून ओळखले जाते. स्वप्नात तिला तुकोबांनी अनुग्रह दिल्याची आख्यायिका प्रसिद्ध आहे. बहिणाचा जन्म इ. सन १६२९ मध्ये झाला. वेरूळजवळचे देवगाव हे तिचे माहेर. वयाच्या तिसऱ्या वर्षी तिचा एका बिजवराशी विवाह झाला. त्यांच्या वयात तीस/एकवीस वर्षांचे अंतर होते. प्रवरासंगम, शिंगणापूर, नीरानरसिंगपूर, पंढरपूर, रहिमतपूर अशी भ्रमंती करीत ती कोल्हापूरला आली. भ्रमंतीत तीर्थांच्या ठिकाणी तिचे मन विशेष रमले.

संत बहिणाबाईंचे ७४ आत्मचरित्रपर, ३५ निर्याणाचे, ४०० भक्तीपर अभंग उपलब्ध आहेत. तसेच, आत्मचरित्रपर अभंगातून तिने स्वतःचे चरित्र सांगितले. कथा किर्तनामुळे तिला पतीच्या जाचाला तोंड द्यावे लागेल. जयरामस्वामींची भेट झाल्यानंतर तिने त्यांचे वर्णन केले. त्यातून जयरामस्वामींचे व्यक्तीचित्र साकार झाले आहे. त्यांच्याविषयीचा आदर व्यक्त झाला आहे. त्यांच्याकडूनच (जयरामस्वामी) प्रथम तुकारामांविषयी बहिणाबाईला ऐकायला मिळाले. आत्मचरित्रपर अभंगात तिच्या वयाच्या तिसऱ्या वर्षापासून अठरा

वर्षापर्यंतच्या पंधरा वर्षातील जीवनाचा आलेख रेखाटला आहे.

तुकारामांच्या भेटीची लागलेली ओढ व भेट झाल्यानंतरच्या अवर्णनीय आनंद तिने अत्यंत हळुवारपणे टिपला आहे. हा आनंद व्यक्त करताना बहिणाबाई म्हणतात, *बहिणी म्हणे जैसा समुद्र/ हृदयाकाशी चंद्र बोले वाचा//* समाधी ध्यानाचा अनुभव बहिणाबाईने फारच सुरेख वर्णन केलेला आहे.

*वाटे उठो नये जीव तरी/ सुख ते अंतरी हेलावले/ आनंद निर्भर होऊनिया मन/*
*करू आले स्नान इंद्रायणी/ घेतले दर्शन पांडुरंग मूर्ति/ नव झाली स्फूर्ती वदावया//*

भागवत धर्माची परंपरा सांगणारा बहिणाबाईंचा हा अभंग प्रसिद्ध आहे.

*संतकृपा झाली इमारत फळा आली //१//*
*ज्ञानदेवे रचिला पाया/ उभारिले देवालया //२//*
*नामा तयाचा किंकर/ तेणे रचिले ते आवार //३//*
*जनार्दन एकनाथ/ खांब दिला भागवत //४//*
*तुका झालासे कळस/ भजन करा सावकाश //५//*
*बहेणी फडकती ध्वजा/ निरुपण केले ओजा //६//*

प्रपंच व परमार्थ या दुहेरी गोष्टीत भरडून निघालेल्या बहिणाबाईला 'आनंद ओवरी' मध्ये समाधिस्थ बसले असता तुकारामदर्शन घडल्याचे वर्णन ती अभंगातून करते.

*संत देखता दृष्टी/ वृत्ती जाली उफराटी //*
*हरपल्या अवघ्या गोष्टी/ पडिले मौन //*
*आजि माझा जन्म सफल गे माये/ संत सज्जनाचे देखिले पाया //*
*त्यांचे चरणजे देहभार जाये/ सुख हे होय अनावर //*
*बहिणी म्हणे तेणे अहंपण माझे/ संसार दुःख उतरिले ओझे //*
*तुकाराम भेटला धन्य जिणे माझे/ कृतकृत्य जाले सहजची //*

बहिणाबाईंचा पती (नवरा) तिला मारझोड करी. तिच्या भक्तिमार्गात अडथळा आणी. तामसी स्वभाव, अहंकारी वृत्ती, वैचारिक विसंगती असणाऱ्या नवऱ्यासोबत तिने तडजोड केली. संसारात रस वाटणे तिच्यासाठी केवळ अशक्यप्राय गोष्ट होती.

*चित्ती समाधान केले असे एक/ प्रारब्धे हे दुःख आले भोगा //*
*भोगणे न चुके ब्रह्मादिका दुःख/ इतर हे रंक कोण तेथे //*
*बहिणी म्हणे माझ्या देहाचे प्रारब्ध/ ऐसिया गोविंद काय करी //*

हीच दैववादी बहिणाई जन्मजात ब्राह्मण्याला व जातधर्म भेदाभेदाला विरोध करते, तिची ही भूमिका केवळ उक्तीतूनच नाही तर वर्तनातून देखील ती सिद्ध करते. चोखामेळयाच्या संदर्भातील प्रसंगात पंढरपूरच्या ब्राह्मणांनी केलेला छळ तिला खटकतो.

*ब्राह्मण तो एक चोखामेळा महार/ भेदाभेद भ्रम अमंगळ ||*
*जेथे विकल्प तुटला/ तेथे वरण मिथ्या बोला ||*

*व्रजसूचि उपनिषद* बहिणाबाईंनी वाचले होते. त्या काळात असा ग्रंथ मिळवून अभ्यासपूर्ण अवलोकन करणे, प्रत्यक्ष व्यवहारात वर्तनाला व विचारांना महत्त्व देऊन आपले विचार सामान्यापर्यंत पोहचविण्याचे कार्य बहिणाबाईनी केल्याचे दिसते. जीवाने व देहाने अर्थात जन्माने ब्राह्मणत्व सिद्ध होत नाही, तर ते आत्मसाक्षात्काराने व विवेकाने सिद्ध होते असे *व्रजकोपनिषद* सांगते, हाच विचार पुढे नेत बहिणाई म्हणते –

*कर्म तेची ब्रह्म जाण/ ब्रह्म तोचि कर्म आपण*
*क्रम ब्रह्म नाही भिन्न/ देवार्थ बोले*

*व्रजसूची उपनिषदाचा* अनुवाद असणारे अठरा अभंग बहिणाबाईने लिहिले. *व्रजसूचीचा* पुरस्कार करणारी, त्याचे महत्त्व पटल्याने अनुवाद करणारी बहिणाबाई विवेकनिष्ठ, तर्कशुद्ध तर आहेच; पण प्रत्यक्ष जीवनात देखील तुकारामांचे शिष्यत्व स्वीकारून, ब्राह्मणाने शूद्राला गुरु करणे या गोष्टींमुळे तिने अनन्वित छळ सहन केला. तत्कालीन सामाजिक दोषांवर प्रबोधनात्मक लेखन तिच्या कवितेत आढळते. तसेच, मराठी संतवाङ्मयात *व्रजसूचीला* प्राधान्य देणारी रचना करणारी बहिणाबाई स्वतः ब्राह्मण असून देखील तिने *व्रजसूची* सारखा विषय निवडला व स्वतःचा प्रागतिक दृष्टीकोण सिद्ध केला.

बहिणाबाईने *श्रोता गाणे, डफ गाणे* रचले. यावरून ती किर्तन करीत असावी असे वाटते. तिने करूणपर अभंग रचले. फुगडी, झिम्मा, सौरी हमामा या स्त्रीगीतातून एकनाथांप्रमाणे परमार्थापर भारुडे रचली. तुकारामांप्रमाणे विरहात *विराण्या* रचल्या तर रामदासांप्रमाणे *मनाचा बोध* केला. सोपी, प्रासादिक भाषाशैली, पारमार्थिक बुद्धीनिष्ठता, तर्कसांगत परखडपणा या वैशिष्ट्यांनी युक्त अशी भारलेली बहिणाबाईंची कविता आहे. तसेच, एक स्त्री म्हणून बहिणाईचे विचार सुधारणावादी आहेत. स्त्रियांना वेदांचा अभ्यास करता येत नाही, गायत्री पठणचा ही हक्क नाही या गोष्टींची खंत व्यक्त करणारी प्रथम कवयित्री म्हणजेच बहिणाबाई! केवळ या गोष्टींमुळेच तिने *व्रजसूची* हे दुर्मिळ उपनिषद अभ्यासले. तसेच, तिला 'मूल ब्रह्मस्वरूपिणी' अशी उपाधी दिली आहे.

*तेज प्रकाशले लोचनी| बहिणी हरपली चिद्धनी ||*
*घट फुटलियावरी| नभ नभाचे अंतरी ||*
*एकसा देह गेलियानी| उरे स्वरूप चिद्धन ||*
*जळ आटलिया जाण| प्रतिबिंब म्हणे कोणा ||*
*लागली कापुराशी| अग्निरूप नाही मसी ||*
*बहेणी म्हणे नामा पाया| गेले ध्याऊनी अव्दया ||*

हे सांगून ती समाधिस्थ होते.

"वारकरी पंथात कर्मज्ञान आणि भक्ती यांना महत्त्व आहे. वारकरी पंथाने नामाला महत्त्व दिले. परमेश्वराचे नाव मुखात असू द्या. परमेश्वर केवळ नाम जपल्याने भेटू शकतो असे सर्वच वारकरी संतांचे म्हणणे आहे. नामामुळेच नामा तरला तुका उद्धारला म्हणूनच नामदेव म्हणतात, *हेची कर्म नाम हेची ब्रम्ह* तर तुकाराम विचारतात

*नाम घेता वाया गेला / ऐसा कोणे ऐयकिला*
*सांगा विनवितो तुम्हासी / संत महंत सिध्द ऋषी*

ज्ञानेश्वरांच्या मते नाम हे देवाचे द्धार असून त्याद्धारी क्षणभरी उभे राहिल्याने चारी मुक्ती साध्य होतात असे त्यांचे म्हणणे आहे. थोडक्यात, वारकरी पंथाने सर्वसामान्याना समजेल, झेपेल असा साधा सोपा परमार्थ मार्ग सांगितला कर्मकांड, यज्ञयाग, व्रत-वैकल्य यांना कमी महत्त्व दिले. महाराष्ट्रात सगुण भक्तीला अनुकुल तत्त्वज्ञान सांगून नामभक्तीला महत्त्व दिले. अशा प्रकारे सर्वसामान्यांच्या दृष्टीने वारकरी पंथाचे तत्त्वज्ञान उपयुक्त ठरणारे असेच होते."[१०]

**संत वेणाबाई**

रामदासांनी आपल्या पारमार्थिक ध्येय धोरणात जनसंपर्क, लोक उद्बोधन, शक्तीची उपासना आणि चैतन्याची निर्मिती या गोष्टींचा पुरस्कार केला. राज्यशक्तीसाठी आवश्यक असलेली लोकमानसाची जनजागृती, संत रामदास यांच्या चैतन्यमयी रामदासी पंथाच्या उभारणीतून व अनुयायांमार्फत होत होती.

अशा या रामदासांबद्दल वेणाबाईंच्या मनात आदर व ओढ निर्माण झाली. समर्थांनी तिला अनुग्रह दिला व शिष्या म्हणून स्वीकार केला. स्त्रियांचा उद्धार करण्याबरोबरच त्यांना अभिव्यक्ती व व्यक्तीमत्त्व विकासाच्या संधी देऊन धर्मकार्यासाठी या स्त्रीमंडळाचा

(संघटनाचा) वापर करून घेणे हे रामदासी पंथाचे प्रमुख वैशिष्ट्य होते. मुळातच शांत, सौम्य, विरक्त वृत्तीच्या वेणाबाईची *एकनाथ भागवत* वाचून त्यांचे मन आध्यात्माकडे, परमार्थाकडे वळले. तसेच, स्त्रियांच्या प्रगतीसाठी संघटन करणाऱ्या रामदासांच्या सान्निध्यात राहिली. त्याचप्रमाणे वेणाबाई समर्थांच्या सहवासात गायन, किर्तन, प्रवचन शिकली. महदाईसाला जसे स्वामी चक्रधरांच्या कृपेने काव्य स्फुरले त्याप्रमाणे वेणाबाई यांची काव्यप्रतिभा रामदासांच्या गुरु सहवासात फुलली. आपल्या प्रतिभेचे श्रेय गुरूला देताना वेणाबाई म्हणतात –

*समर्थ देणे वेणाबाईसी| वरदाने दिधले ||*
*सीता स्वयंवरे| रामायण वदविली ||*

*सीता स्वयंवर, संक्षिप्त रामायण* हे निवेदनपर झालेले ग्रंथ वेणाबाईने लिहिले. याशिवाय *कौल, रामगृहसंवाद* ही छोटी प्रकरणे लिहिली. वेणाबाई यांची लेखनशैली कथात्मक काव्याची होती. तसेच, तिने 'श्लोक' या रचनेचा उपयोग रामकथेत केला आहे. ती समर्थ रामदासांचा आदरपूर्वक उल्लेख आपल्या प्रत्येक ओळीच्या सुरुवातीस करते. त्याचप्रमाणे लहानपणापासून *एकनाथी भावार्थ रामायणाचे* वाचन करीत असल्याने वेणाबाईंच्या लेखनशैलीवर एकनाथांच्या या रचनेचा प्रभाव जाणवतो. नाथांचा ग्रंथ वाचूनच वेणाबाईंना प्रथम काव्यप्रतिभा स्फुरली. त्यांची कविता स्फुट कविता आहे. ती अनिभावपर नाही, तर निवेदनपर आहे. तसेच, जरी या रामदासांच्या शिष्या असल्या तरी त्यांच्या काव्यशैलीत रामदासांपेक्षा रचना, अनुभव यात भिन्नता असलेली दिसते. त्यांच्या रामायणावर आणि एकंदरच काव्यशैलीवर एकनाथांचा प्रभाव असलेला दिसतो. वाल्मिकी रामकथेत नाथांप्रमाणेच फेरफार स्वीकारून सुंदरकांडापाशी कथा पूर्ण केली आहे. त्याचप्रमाणे *सीता स्वयंवरात* तिने एकनाथांप्रमाणेच ओवी स्वरूपातून स्वतंत्र कथा रचली आहे. सुमारे १५६८ ओव्यांचा हा ग्रंथ आहे. मराठी भाषेला स्वतंत्र कथा देणारी वेणाबाई ही पहिली कवयित्री असल्याचे दिसून येते.

रामदासी पंथाची अनुयायी असलेली वेणाबाई आपल्या अभंगात रामनामाची थोरवी शब्दोशब्दी सांगते. व परमार्थाचा मार्ग रामाच्या भजनातून साधण्यास सांगते.

*धन्य होणे सफल जिणे राम गुणे होते*
*ध्यान पडे ज्यास त्यास सत्य कलो येते*
*सर्व सोडी राम जोडी भजनी निकाम*

*हाहि लोक परलोक त्यास सासुरवाडी*
*वेणी म्हणे भक्तजना भजने रामजोडी*

रामभक्ताच्या भक्तिरसाची वचने तिने साध्या, सरळ, सोप्या शब्दांत, भाषेत गुंफली आहेत. तसेच, वेणाबाईंचे लिखाण जास्त नाही. समर्थ रामदासांचे शिष्यत्व स्वीकारल्यानंतर अनेक संत कवयित्रींच्या पदरी दुःख, निराशा, संघर्ष अशा अनेक गोष्टी वाट्याला आल्या. मात्र इतर संत कवयित्रींप्रमाणे वेणाबाईंच्या वाट्याला संघर्ष आला नाही. त्यामुळे तिचे आयुष्य शांत व संथ राहिले. तसेच, चैत्र वद्य चतुर्दशीला वेणाबाईचे सीतास्वयंवरातले शेवटचे किर्तन झाले व त्या समर्थरूप झाल्या.

*पुरवी सकलही काम/ माझा बंध विमोचन राम*
*सरणही वेणा मग त्या रामा/ पावली पूर्णविराम माझा बंधविमोचन राम* //

तसेच, बहिणाई चौधरी यांच्या *माहेरची वाट* या कवितेत –

*रातदिन गजबज*
*असं खटल्याचं घर*
*सदा आबादी आबाद*
*माझं आसोद माहेर*

किंवा

*सासुरवाशीण* या कवितेत –

*उठ मध्यम राती मांड दयन तू नीट*
*अन चालव बाई घरोट*

अशा प्रकारे सुरेख रचना करणारी बहिणाबाई चौधरी यांची देखील कविता वैशिष्ट्यपूर्ण ठरणारी, आपलेपणा वाटणारी असलेली दिसून येते.

## ब) स्त्रीलिखित नवकवितेचा प्रारंभ काळ

नवकवितेच्या प्रारंभीच्या काळात बहिणाबाई चौधरी सोडल्या तर इतर कवयित्री शिक्षित, सुसंपन्न कौटुंबिक पार्श्वभूमी असणाऱ्या होत्या. इंदिरा संत, शांता शेळके या ज्येष्ठ कवयित्री तर स्वतः उच्चविद्याविभूषित असून उदारमतवादी कुटुंबातील होत्या. *सत्यकथा, साहित्य* या प्रसिद्ध असलेल्या वाङ्मयीन मासिकांतून त्यांचे लेखन प्रसिद्ध होई. तसेच, आद्य

संतकवयित्री महदंबेपासून बहिणाबाई चौधरी ते आजच्या कविता महाजनांपर्यंत स्त्री कवितेचा हा प्रवास विविधांगी स्थित्यंतरातून निर्माण झालेला दिसून येतो. ही स्थित्यंतरे पाहिली की संतकवयित्रींचा मुख्य आशय 'ईश्वरभक्ती' हा एकमेव असलेला दिसून येतो. त्याचबरोबर बहिणाबाईंच्या कवितेत संसारविषयक तत्वज्ञान येते, तेव्हा त्यांची कविता तत्वज्ञ वाटते. सभोवतालची व्यक्तिचित्रणे, स्वभावविशेष या गोष्टी अभिव्यक्त करणारी कविता ही सामाजिक वाटते. तसेच, आयुष्याशी झुंज देताना हीच कविता बऱ्यापैकी अस्तित्ववादी बनते. बहिणाबाईंच्या कवितेचे विषय निसर्ग, समाज, सांसारिक तत्वज्ञान हे आहेत. त्यांनी निसर्ग, शेती यातून रूपक व प्रतिमा निवडल्या आहेत.

"स्त्रियांची कविता हा स्त्रियांच्या जाणिवांच्या, आत्मिक व बौधिक विकासाचा प्रवास दाखवून देणारा दस्तएवज आहे असे आपल्याला म्हणता येते; ब्रिटिशांच्या आगमना नंतर लिहायला, विचार करायला वाचायला व आत्माविष्कार करायला लागलेल्या आधुनिक काळातल्या स्त्रिच्या व्यक्तिमत्त्वाला लाभत गेलेली विविध परिणामे गेल्या शतकातील स्त्रियांच्या कवितांमधून प्रकटताना दिसतात."[११] इंदिरा संतांची कविता सर्वप्रथमच 'विशुद्ध भावकविता' म्हणून शिक्कामोर्तब केली गेली. तसेच, इंदिरा संतांची कविता बहिणाबाईंच्या कवितेशी साधर्म्य साधते याचे कारण म्हणजे – इंदिरा संतांनी ही बऱ्याच प्रमाणात निसर्गातील प्रतिमा रूपकांचा वापर केला आहे; पण मुख्य फरक असा, की इंदिरा संतांनी प्रीतीची भावना व्यक्त करण्यासाठी निसर्गसुलभ प्रतिमा वापरल्या, बहिणाबाईंच्या कवितेत निसर्ग आहे पण प्रेमकविता नाही.

इंदिरा संतांची –

*निर्मल निर्भर वातावरणी*
*धुके तरंगे धूसर धूसर*
*झगमगते अन् नक्षी त्यावर*
*सोनेरी किरणांची सुंदर (शेला ०१)*

किंवा,

*ही निळीपांढरी शरदांतील दुपार*
*तापल्या दुधापरी ऊन हिचे हळुवार*
*दाटली साय की स्निग्ध शुभ्र आकाशी*

*फिरतात तशा या शुभ्र ढगांच्या राशी (शेला, २३)*

शांता शेळकेंच्या *डोंगरावर* या कवितेत –

*डोंगरावर सपाट जागी मी उभी, वर ओथंबलेले आभाळ,*
*स्वच्छ निळाईत डवरून आलेली ढगांची शुभ्र माळ*
*सुसाट वारे अंगाला झोंबणारे, पदर खेचणारे, आग्रही,*
*प्रत्येक गवतपात्यावर तिरप्या सूर्यकिरणाची सोनेरी सही*
*(गोंदण, १०)*

किंवा

*समोरचे झाड हिरवेगार, आकाशात बिंबलेले, स्तब्ध, अचल*
*स्तब्ध पलीकडे सर्वदूर पसरलेले निळेभोर आभाळ (११)*

यानंतरच्या पिढीतील कवयित्रींच्या कवितेत मात्र अशा प्रकारचे निसर्गवर्णन फारसे बघावयास मिळत नाही. उलट एखादी मानसिक जटिल गुंतागुंत व्यक्त करण्यासाठी त्यांनी निसर्गातील एखाद्या प्रतिमेचा वापर केल्याचे आढळते.

**उदाहरण:** प्रभा गणोरकरांची *विवर्त* मधली ही कविता –

*मला पक्ष्याचा डोळाच दिसला नव्हता तर*
*तो पक्षीही सबंध दिसला होता*
*शिवाय तो पक्षी जिथे बसला होता ते झाड,*
*झाडाची उत्सुक, लवलवती पाने*
*पिवळसर फुले, मधल्या तपकिरी परागांनी हसणारी*
*त्या तसल्या संध्याकाळी काळाभोर अंधार*
*दाटून आलेला असताना*
*खरे म्हणजे त्यावेळी ते झाड पाने मिटून*
*बसलेले असते मूक,*
*तेव्हा (विवर्त, १३)*

किंवा

*दूरच्या पहाडांवर धडाडलेले वणवे विझवित*
*तो आला तेव्हा उंच माना करून*

*त्याची वाट पाहात असलेल्या निलगिरीच्या*
*झाडांनी त्याला*
*शक्य तितके वाकून सलामी दिली*
*सिल्वर ओकच्या चमकदार कातर पानांनी*
*सळसळून त्याचे स्वागत केले. (१४)*

या कवितेचे स्वरूप म्हणजे मानसिक जटिलता उलगडण्यासाठी, भावनिकता मांडण्यासाठी वापरल्या. अनुराधा पाटील यांची आत्ममग्न भावनिकता निसर्गाचा आधार घेताना अशा रितीने व्यक्त होते –

*कोवळी पानं ओरबाडताना कुणी*
*अचानक मुळीच ओढावीत*
*आणि सुकत जावं रोपटं*
*तसं होतं गेलं जगताना*
*पसरल्या देहभर मुक्या कळ्या*
*असंच काळवंडतं आकाश कोणत्याही*
*संध्याकाळी (.... तरीही, १२)*

किंवा

*संध्याकाळच्या वेळी पाण्यावर दाटत जाणाऱ्या*
*सावळ्या सावल्या*
*मनाला लपेटून घेतात*
*दिवसेंदिवस मुकीच होत गेलेली*
*पाखरं चुकून आपल्यासाठी*
*एखादं गाणं गातात*

अशाप्रकारे अनुराधा पाटील यांनी निसर्गप्रतिमांचा वापर करुन प्रीती आपल्या कवितेतून हळुवारपणे व्यक्त केली आहे. तर, कविता महाजन यांची पुढीलप्रमाणे कविता –

*रात्रीच्या फिर्र जंगलातून*
*रातकिड्यांच्या नादात चालताना*
*दवानं ओले होतात केस*

*उघड्या पाठीला चावतो काळा किडा*
*काळोख भिन्नत जातो देहात कच्च*
*आणि सकाळी उंच घोड्यावर मांड ठोकून*
*चिंचोळया वाटेनं जाताना जागते मनात इच्छा*
*खोल दरीत कोसळून धुक्यात नष्ट हिण्याची*
*(मृगजळीच्या मासा, ६६)*

यावरून *निसर्ग* विषयबाबतची अनेक स्थित्यंतरे स्पष्टपणे लक्षात येतात.

सुहासिनी इर्लेकरांची *जानकी – एक जातक* ही कथानात्मक दीर्घ कविता. तसेच, *तुला म्हणून सांगते पोरी* या कवितेच्या पंक्ती –

*तुला म्हणून सांगते पोरी*
*पदरी पडलं पवित्र झालं*
*म्हणून रेखावा*
*कपाळ भरून कुंकवाचा मळवट*
*भरावा कोपराभर; रेशिमचुडा*
*धन्याच्या नापानं (गाथा, ५५)*

अशाप्रकारे बहिणाबाई चौधरींपासून, इंदिरा संत, शांता शेळके, सुहासिनी इर्लेकर यांच्यापर्यंत ही स्त्री कविता सासरचा जाच, कुंकू, रेशीमचुडा, माहेरपण, खटलं, घरची लक्ष्मी, फुलांची वेणी व गणगोत या चार भिंतीआडच्या उंबरठ्यामागे, पदरात हुंदके बाबत अशा अनेक गोष्टी दिसतात. तसेच, काहीशा ग्रामीण दृष्टीने निर्माण होणारी गादगे यांची कविता 'आई' बद्दल बोलताना व्यक्त झालेली दिसून येते ती म्हणजे –

*महिन्याचा चार आकडी पगार*
*झोकात पर्समध्ये ठेवताना*
*आठवतात माय*
*तुझे शब्द*
*'हाळद वाळली नव्हती*
*तवा इळा हाती आला*
*आख्खा आऊक्षाचा*

*त्योच साथी झाला*
*नव्हतं शिवारात रान*
*व्हता खोपाबी मोडका*
*हाती पायी बळ व्हतं*
*तिच देवाची किरपा'*
*आठवतं माय हे आठवतं*
*नि नोटा मोजणारी बोटं थरथरतात (अग्निजळ, ११०)*

पण हा कौटुंबिक धन्यताविषयक आशय यापुढील काळात मात्र बदललेला दिसतो.

*घरात काय राहिलं आहे' या कविता महाजनांच्या ओळीत,*
*घर घरच राहतं माणसं नसली तरी आणि*
*घरासाठी नसलेली माणसं गेली की घर*
*घर आहे हे जाणवतं लख्खपणे*
*तेव्हा बदलून जातं खूप काही*

याच कवितेच्या नंतरच्या ओळी अशा आहेत,

*आता घराला न्याहाळता येतं नीट स्वतःच्या नजरेनं*
*आणि स्वतःलाही मोजलं जातं स्वतःच्याच मापानं*
*आपल्या मनातले स्वर्ग व आपल्या मनातले नरक*
*हिंडून पाहता येतात प्रथम मोकळेपणानं (मृगजळीचा मासा, ११०)*

मानसिक विखुरलेपणापासून ते कौटुंबिक उद्ध्वस्ततेपर्यंतचा हा प्रवास व्यक्त करताना महाजनांची कविता पारंपारिक व्यवस्थेशी बंडखोरी करणारा आशय मांडते.आधुनिक काळात ज्या प्रमुख तीन प्रकारांची व्याप्ती झाली त्यापैकीच विशुद्ध काव्य, दुसरे प्रतीकवादी काव्य, तिसरे प्रतिमावादी काव्य हे होय. पाश्चात्य कवितेत १९ व्या शतकात निर्माण झालेल्या विशुद्ध काव्य परंपरेचा प्रभाव, परिणाम मराठी कवितेवर साधारणपणे १९५० ते १९६० च्या दशकात दिसून येतो. तसेच, कवयित्रींमधील विशुद्ध काव्यनिर्मितीचे सर्वप्रथम श्रेय १९५१ साली *शेला* हा पहिलाच काव्यसंग्रह प्रसिद्ध झाल्यानंतर इंदिरा संत यांना मिळाले.

अशा प्रकारे संत कवयित्रींच्या या वाटचालीत अनेक टप्पे, चढ-उतार, प्रत्येकीचे वेगवेगळे असलेले अनुभव, त्यातून मिळणारे मनोधैर्य, तसेच प्रेरणा या अशा अनेक गोष्टींची विविधता

या काव्यरचनेच्या दृष्टीकोनातून दिसून येते.

## क) १९७५ ते २००० या कालखंडातील स्त्रीलिखित कविता

१९७५ ते २००० या कालखंडातील कवयित्रींची कविता म्हणजे स्त्रीवादी कवितेची सुरुवात, उन्नती व स्त्रीचे आत्मभान होय. १९७५ हे आंतरराष्ट्रीय स्त्रीवर्ष म्हणून व पुढचे दशक हे स्त्रीदशक म्हणून घोषित झाल्यावर; भारतामध्ये स्त्री चळवळीच्या माध्यमातून अनेक स्त्रीप्रश्न निर्माण झाले. स्त्रीमुक्ती चळवळीतीला एक महत्त्वाचा असा साहित्यप्रकार म्हणजे कविता होय. तसेच, कवितेतून स्त्रीवादी विचारसरणीचे वेगवेगळे पैलू दिसायला लागले. या आंतरराष्ट्रीय वर्षाच्या निमित्ताने स्त्रियांनी समाजातील स्वतःच्या स्थानाचा शोध जागरूकतेने घेतला व त्याचा आविष्कार काव्यातून दिसू लागला.

१९७९ मध्ये मलिका अमर शेख यांचा *वाळूचा प्रियकर* हा स्त्रीशरीराच्या जाणीवा परखडपणे व्यक्त करणारा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. स्त्रीचे शारीरिक व मानसिक पातळीवर होणारे शोषण, एखाद्या अनुभवाच्या वेदनेतून निर्माण होणारे स्त्रीत्व आणि स्वत्व, नीरजा यांच्या *निरन्वय* (१९८७), *वेणा* (१९९४) या कवितासंग्रहात दिसून आले. या कालखंडात स्त्रीचे शैक्षणिक, आर्थिक, वैचारिक दृष्टीकोनातून परिवर्तन होऊ लागले. तिचे स्वतःचे करिअर व घर या दोन्ही गोष्टींना समान महत्त्व प्राप्त झाले. या दोन्ही हेतूंना सामोरे जाताना स्त्रीची घुसमट होऊ लागली. या आत्मसंघर्षाला कवितेत स्थान मिळाले. कवितेतून त्याची अभिव्यक्तीही ठामपणे दिसू लागली. तसेच, डॉ. अश्विनी धोंगडे यांचा *स्त्रीसूक्त* (१९८८), संजीवनी बोकील यांचा *काळीजकुपी* (१९९४) व संगीता बर्वे यांचा *मृगतृष्णा* (१९९८) हे कवितासंग्रह प्रकाशित झाले. त्यातून परंपरेचा आणि स्त्री म्हणून स्वतःला पडलेल्या प्रश्नांचा मागोवा घेतलेला दिसतो. १९७५ मध्ये सुरु झालेल्या स्त्रीवादी जाणिवा या सुरुवातीस रुजू लागल्या व २००० पर्यंत त्या वृद्धिंगत झालेल्या दिसतात. कवयित्रींच्या प्रकाशित होणाऱ्या काव्यसंग्रहांची संख्या १९७५ नंतरच्या कालखंडात वाढली. शिक्षणाचा वाढता प्रसार, मुबलक प्रकाशन संस्था, त्याचबरोबर अनियतकालिकांतून प्रसिद्ध होणाऱ्या कविता, दिवाळी अंकांचे वाढते प्रमाण, मंचीय कवितांना मिळणारा प्रतिसाद, छोट्या-मोठ्या गावांतून घेतली जाणारी साहित्य संमेलने, पुरस्कारांचे वाढते प्रमाण यांसारखी अनेक कारणे त्यामागे आहेत. या काळात मलिका अमर शेख, रजनी परुळेकर, अश्विनी धोंगडे, नीरजा, प्रज्ञा लोखंडे, अंजली कुलकर्णी, कविता महाजन या कवयित्रींनी प्रामुख्याने स्त्रीवादी कविता लिहिली. प्रभा गणोरकर, अरुणा ढेरे, सुहासिनी इर्लेकर, विजया

जहागीरदार, अनुराधा पाटील, हिरा बनसोडे, नीलिमा गुंडी, संगीता बर्वे, संजीवनी बोकील, मनिषा दीक्षित, आसावरी काकडे, सुनंदा भोसेकर, यशोधरा साठे, उषा मेहता, श्रद्धा पराते, ज्योती लांजेवार यांसारख्या कवयित्री पारंपारिक कवितेबरोबर स्त्रीवादी कवितेशी आपली नाळ जोडू पाहात होत्या. याचा परिणाम असा झाला की, मराठी कवयित्रींची कविता जाणिवेच्या, आविष्काराच्या दृष्टीने बदलत गेली. बदलत्या परिस्थितीचे चित्रण या कवितांतून स्पष्ट दिसू लागले. या कवितेत विविध प्रयोगही झाले. उषाकिरण आत्राम आणि कुसुम आलाम या आदिवासी कवयित्रींचे कवितासंग्रह प्रकाशित झाले.

कवयित्रींच्या कवितांची वैशिष्ट्ये पाहिली तर स्त्रीवादी कवितेचा पूर्णपणे नवीन प्रवाह आलेला दिसतो. परंपरा आणि नवता यांच्या संघर्षात परंपरेला नाकारण्याकडे कवयित्रींचा कल आहे. तसेच, आत्मभानाचे क्षितीज व अनुभवाचा परीघ रुंदावल्याने कविता विस्तारली. बदललेल्या सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणाचा परिणाम या कवितांवर झाला. त्यामुळे १९७५ नंतरची कवयित्रींची कविता, त्याचबरोबर नव्वदोत्तरीची कविता एकमेकांशी संबंधित राहिली. या सगळयाचा परिणाम २००० नंतरच्या कवितांवर झाला. या कालखंडातील काही कवयित्री अजूनही लिहित आहेत, तर नव्याने लिहिणाऱ्या कवयित्रींना या कवयित्रींचा वारसा लाभला आहे. तसेच, कविता हा वाङ्मयप्रकार लेखनास अवघड असून स्त्रियांनी तो प्रत्येक कालखंडात अधिकाअधिक उत्तमपणे सांभाळला आहे. अभंग, ओवी, वृत्तबद्ध कविता, मुक्तछंदातील व मुक्तशैलीतील कविता, दीर्घकाव्य, खंडकाव्य, हायकू, गझल, चारोळया अशा विविध रचनाप्रकारात कवयित्रींनी कविता लिहिल्या. परंतु भावकविता हाच त्यांच्या अभिव्यक्तीचा मुख्य घाट दिसतो. तसेच, कवयित्री अश्विनी धोंगडे यांच्या मते, कविता म्हणजे शब्दांचा, प्रतिमा-प्रतीकांचा फुलोरा नाही; तर आपल्या अंतर्यामी असलेल्या चेहऱ्याचा दर्शनी तुकडा वाटतो.

*कविता नसते प्रतिभेची आरास*
*नसते कोणाची मिरास*
*कविता आपला सोललेला चेहरा*
*कविता तळहातावरचा निखारा.*

मनाच्या तळाशी दमन झालेले कधीतरी ज्वालामुखी सारखे वर येते आणि *मध्यान्ह* या भारती बिर्जे डिग्गीकर यांच्या कवितासंग्रहातील कविता दिसू लागतात.

*ओठाच्या घट्ट मिटलेल्या दरांवर*

*आतून बसणाऱ्या धडका आवरणे*
*अपरिहार्यच असते हे काळ्या पांढऱ्या*
*ओळींमध्ये सर्व रंगतरंग उधाणून देणे.*

कविता ही कवयित्रींची सखी आहे. स्वतःचा स्वतःशीच मांडलेला खेळ, ज्यात जिंकण्या-हरण्याची स्पर्धा नाही, सोसलेल्या दुःखाला कवटाळण्याची इच्छा नाही, पण अभिव्यक्त होण्यास जीव मात्र तगमगतो ही तगमग, घुसमट मांडण्यासाठी कविता 'अपरिहार्य' ठरणे यातून कवितेशी असलेले घट्ट नाते दिसून येते. यावर प्रतिमा इंगोले यांच्या मते,

*कविते!*
*तू फक्त*
*रुसू नकोस*
*तुझ्यासाठी मी*
*रणरणत्या दुपारी*
*आणायला*
*तयारी आहे*
*अग्निफुलातील परागकण*

कवयित्री मीनाक्षी पाटील स्वतःच्या जिवंत असण्याचा अर्थ माझी कविता आहे असे लिहितात.

*आणि खरं सांगायचं तर*
*मी जिवंत आहे म्हणजे काय आहे*
*हे समजून घेण्यासाठीच मी कविता लिहितेय.*

भावकवितेबरोबरच गझल हा प्रकार सामर्थ्याने हाताळणाऱ्या सुनंदा शेळके यांनी गझलेपेक्षा काहीही मोठे नाही याची प्रांजळ कबुली देताना *मी न माझी* राहते असेही मत व्यक्त केले.

*हे न माझे,*
*ते न माझे,*
*मी न माझी,*
*हे खरे कोण माझे शोधताना,*
*फक्त ही उरते गझल.*

कवितेच्या उत्स्फुर्त उद्गार व त्या मागची उत्कटता या दशकातील नीलिमा गुंडी, कविता कुलकर्णी, शहाबाई यादव, शोभा रोकडे, स्वाती पाटणकर, रुपाली अवचरे इत्यादी कवयित्रींच्या कवितांतून दिसून येते. प्राचीन काळातील महदंबा ते आधुनिक काळातील कॉमन वुमन यांच्यात हा समान धागा आहे असे दिसते. तसेच, १९९० नंतरच्या कवयित्रींमध्ये लक्षणीय ठरलेली कवयित्री प्रज्ञा लोखंडे तिच्या *उत्कट जीवघेण्या धगीवर* या कवितासंग्रहात कवितेचा व शरीराचा संबंध जोडते. रक्तामांसात कविता भिनल्याशिवाय तिची अभिव्यक्ती होत नाही. कवितेचे अस्तित्व कोणाला तरी देणाऱ्याचे जीवन अवघड बनवणे हे कविता महाजन यांना रुचत नाही. त्या लिहितात,

*कविता अशी नुसती कुणाला ऐकवून जाऊ नये,*
*शब्दांसहित अर्थांसहित परत सांभाळून न्यावी.*
*कुणाच्याच मनात कधी तिचे घर बांधू नये;*
*जगणे मरणे कधी कुणाचे अवघड बनवू नये.*

कवितेबद्दलची सखोल जाण व निराळी अभिव्यक्ती या कवितांमधून व्यक्त होते. कविता ही संवेदनशील आणि प्रामाणिक अभिव्यक्ती आहे हे सांगणारी कविता या काळात दिसून येते. काही कवितांचा अपवाद वगळता कवितेबद्दलची भावुकता आणि प्रेम व त्यामुळे निर्माण होणारा शब्दपसारा हा अधिक आहे.

आईचं जगणं आणि जळणं हे तिच्या मुलांसाठीच असते. हे पिढ्यानं पिढ्या चालत आलेले सत्य मांडताना तिच्याबद्दलची कृतज्ञता संगीता बर्वे व्यक्त करतात.

*तू कष्ट करून शिकवलंस*
*म्हणून शिकले*
*म्हणून चांगलं घर मिळालं*
*कलेचं माहेरपण म्हणवणारं शहर मिळालं*
*कर्तुत्वाला वाव मिळाला*
*म्हणून मी आणि माझी मुलगी*
*टापटिपीत राहतो.*

काळ कितीही बदलला, मुली शिकल्या साक्षर झाल्या असल्या तरी स्त्री जन्मास चिकटून येणाऱ्या काही गोष्टी मर्यादित असतात. या अशा गोष्टींचे बाळकडू अनुपमा उजगरे *सांगी* या कवितासंग्रहात सांगतात,

*लक्षात घे बाई माझे,*
*बासरी कृष्णाच्याच हातात असते*
*राधेच्या हाती फुंकणीशिवाय काहीच नसते.*

बासरी व फुंकणी दोन्ही स्त्रीलिंगी शब्द असून बासरी वाजवणारा 'तो' असतो. बासरी स्त्रीलिंगी, वाजवणारा 'तो' आहे. म्हणजे त्याच्या हातात 'ती' चे स्थान आहे. राधा कृष्णाची सखी, प्रेयसी पण तीही जर फुंकणीला जवळ करते किंबहुना तिच्याही हाती जर फुंकणीच असेल तर आपण सामान्य माणसे आहोत. हे परंपरेने चालत आलेले *लक्षात घे बाई* या कवितेत कवयित्रीला सांगायचे आहे.

कवयित्री लक्ष्मी गवई त्यांच्या *नात्याचे पदर उलगडताना* कवितासंग्रहात धीटपणे आपल्या मुलाला भरारी घेण्यासाठी प्रवृत्त करतात. कवयित्री मनिषा दीक्षित आपल्या कवितेच्या माध्यमातून मुलांशी कॉम्प्युटरवर संवाद करतात.

जसे की –

*सुबत्तेचा फरकोट घातलेल्या आपल्या मुलांना बाऽऽय करून कॉम्प्युटर स्वीच ऑफ करताना*
*सारं बर्फ वितळून*
*धावत येत राहतं डोळ्यांतून !*

आईबद्दलची कृतज्ञता आणि आईला स्वतःच्या भावभावनांना घालावा लागणारा परिस्थितीजन्य बांध या दशकातील कवितांमधून दिसतो.

कवितेसारखी अगदी जिवाभावाची मैत्रीण ही सुद्धा कवयित्रीची सखी आहे. या सखीशी ती मनातील सर्व भावभावना बोलते. शैला सायनाकर, मेधा सामंत, स्मिता सुधीर पाटील, मंदा कदम इत्यादी कवयित्रींचे *सखी* या नावाचे कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. तसेच, कवयित्री स्मिता सुधीर पाटील लिहितात,

*धगधगत्या अग्निकुंडातल्या*
*याज्ञदेनेची तू वारस*
*युद्धभूमीवर लढणाऱ्या*
*लक्ष्मीचंही तू प्रतिक*
*घे स्वतःला ओळखून*
*जागव तुझ्यातलं स्फुल्लिंग*

*चेतव तुझ्यातलं अग्नित्व*

'वळून बघ', 'स्वतःला ओळख', जागृत कर', 'चेतव', 'सिद्ध हो' यांसारख्या आज्ञार्थी क्रियापदातून सखीमधले स्फुल्लिंग चेतवले जात आहे. जी सखी हे समजावून सांगत आहे, ती स्वतः लढाऊ झाली आहे. आता ती खचणारी, रडणारी राहिलेली नाही. कवयित्री मीरा *सरहद्द* या कवितासंग्रहात म्हणतात की,

*सखी, रडण्यापेक्षा हसूनच साजरं कर दुःख*
*अश्रू पुसणारे हात मिळणार नाहीत.*

स्वतःच्या अनुभवातून सखीला शहाणे करणे आणि वास्तवाला हसतमुखाने सामोरे जाणे हे या सखीला साधायचे आहे. तसेच, अंजली कुलकर्णी यांच्या मते,

*आसपासच्या सख्यांना*
*मदत कर त्यांना फुलं माळायला,*
*त्यांचे त्यांचे शिरपेच खोवायला*
*हात दे डोंगर चढणीवर चढताना....*

जसे एका सखीचे दुःख अनेक सखींचे असू शकते, तसे एका सखीची आत्मविश्वासपूर्ण कृती अनेक जणींना कृतीशील ठरू शकते.

कोणतीही चळवळ ही प्रत्येक स्त्रीचे प्रश्न सोडवू शकत नाही. पण मार्गदर्शनाचे काम करू शकते. स्त्रीमुक्ती आणि वैयक्तिक मुक्ती आणि समाजाची वैचारिक धारणा यातील फरक सखीला समजून सांगताना प्रतिमा इंगोले लिहितात,

*तुला मुक्त व्हायचेच*
*असेल तर....*
*पंखावर आकाश पेलावं लागेल*
*स्वतःच स्वयंभू व्हावं लागेल*

कदाचित आपल्याला जे साधले नाही ते सखीला साधले तर आनंदच आहे, पण त्यासाठी तिच्या जगण्यावर तरी तिचा अधिकार असायला हवा. शैला सायनाकर *सखी* या कवितासंग्रहात लिहितात,

माझं जगणं
कधीतरी

माझं
असू दे
सखी
ही एक
साधीशी
असोशी.

एकविसाव्या शतकातील स्त्रियांच्या कवितेत स्वतः काव्यनिर्मिती करणे आणि काव्याचा विषय होणे अशा गोष्टी स्त्रीने स्वीकारलेल्या दिसतात. तसेच, *संध्यारंग* या कवितासंग्रहात संध्या रंगारी म्हणतात,

*एक सांगू का साहेब*
*कुठलेच गुलाम मालकावर प्रेम करत नसतात*
*अन् मालक गुलामाला कधीच*
*बरोबरीचे हक्क देत नसतात.*

"स्वत:च्या जीवनाचा, स्त्री-जीवनाचा व एकूणच मानवी जीवनाचा काहीशा तत्त्वचिंतक वृत्तीने घेतलेला वेध आसावरी काकडे यांनी वीस पंचवीस वर्षाच्या कालावधीतील कवितांमधून व्यक्त केला आहे. तो अनुभवताना 'स्त्री' च्या प्रगल्भ व जीवन सम्मुख, गंभीर आशाप्रेरित वृत्तीचा व व्यक्तिमत्त्वाचा प्रत्यय येत राहतो." [१२] आसावरी काकडे यांनी *स्त्री असण्याचा अर्थ'* या त्यांच्या कवितासंग्रहाच्या अर्पणपत्रिकेत स्त्री असणे म्हणजे काय हे मार्मिक शब्दांतून व्यक्त केले आहे.

*स्त्रीचा देह असणं*
*म्हणजे स्त्री असणं नाही*
*स्त्री असणं म्हणजे*
*सर्जक आनंदाचा शोध घेत जगणं, जगवणं.*

तसेच, मातीतूनच आयुष्याची पाती पुन्हा एकदा फुलणार आहेत, हा विश्वास स्त्रीत्वात आहे. हे सांगताना सिसिलिया कार्व्हालो लिहितात,

*बाई : झटापट करते पाण्याशी,*
*दिवसभर, आगीशी झुंजते*

*तिन्हीप्रहर, तरीही दिवा लावते,*
*उजडे पसरवते घरभर*
*बाई : पोकळी व्यापत जाते*
*अवकाश होत जाते*
*अवकाश होत जाते*
*आणि आकाशाला येतो बहर*

पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रीचे जगणे म्हणजे गुलामाचे जगणे. 'पुरुष' हे आपले वर्चस्व कायम ठेवत असतात. याचा आता 'पुनर्विचार' करावयास हवा. तसेच, लोकांची मानसिकता देखील बदलावयास हवी. मालक-गुलाम या द्वंद्वातून स्वतःला मुक्त करत आत्मबळावर उभी राहणारी, आपल्या क्षमतांचा पुनर्विचार करणारी, स्वतःच्या खांद्यातला तसेच, मनगटातील मजबूतपणा समजणारी बाई आता बाईपणाची मर्यादा ओलांडते आहे.

*दशदिशा सामावून घेणाऱ्या मेंदूवर*
*विश्वास ठेवून*
*बाई ओलांडते बाईपणाची मर्यादा*
*विणू लागते एक स्वेटर*
*स्वतःच्या उबेसाठी.*

विवाह ही गोष्ट आपल्या समाजात फार महत्त्वाची मानली जाते. विवाहातील 'सप्तपदी' हा महत्त्वाचा विधी मानलं जातो, कारण तेव्हाच विवाह संपन्न झाला, असे गृहीत धरतात. सप्तपदीत तो पुढे व ती मागे असते. कवयित्री नीलम माणगावे यांना ही सप्तपदी मात्र माकडचेष्टा वाटते. परंपरेने चाललेल्या या विधीकडे जागरूकतेने पाहताना *जग* या कवितासंग्रहात त्या लिहितात,

*प्रिय*
*सोडूयात का आपण ही*
*सप्तपदीची माकडचेष्टा?*
*हातात हात घेऊन*
*खंद्याला खांदा जोडून*
*समांतर पावले टाकीत*
*घालू आपण नवी सप्तपदी*

*विवेकी वाटचालीची !*

नवी सप्तपदी ही समतेची, विवेकी वाटचालीची, परंपरेला दूर सारणारी, नवी व्यवस्था निर्माण करणारी, कार्यक्षमतेचा वसा घेणारी, पुढील पिढ्यांना मार्गदर्शक असणारी आणि स्त्रीच्या भूतकाळाला छेद देऊन आश्वासक भविष्यकाळ निर्माण करणारी अशी सप्तपदी आहे. १९८० नंतर कवयित्री अधिक संख्येने लिहायला लागल्या. अनुराधा पाटील, अरुणा ढेरे, रजनी परुळेकर, मलिका अमर शेख, प्रज्ञा लोखंडे, नीरजा, कविता महाजन इत्यादी कवयित्रींनी आपला खास ठसा उमटवलेला आहे. या कवयित्रींच्या काव्याबद्दल १९७५-१९८० नंतर अधिक संख्येने लिहिताना दिसतात.  तसेच, बाईला बाईपणाचा विसर पडलाय की काय इतक्या स्वतंत्रतेने त्या जगू पाहतात. या त्यांच्या बदललेल्या जीवनशैलीबद्दल प्रज्ञा लोखंडे *उत्कट जीवघेण्या धगीवर* या कवितासंग्रहात लिहितात,

*बायकांना अलीकडे काय झालंय?*
*विसर पडलाय का त्यांना आपल्या बाईपणाचा*
*इतक्या आक्रमक त्या कधीच नव्हत्या*
*हवा, पाणी आणि जमिनीइतकं*
*गृहीत आहे त्यांचं बाईपण*
*मग हे सगळं का नाकारताहेत त्या?*
*ही कसली भूल पडलीय त्यांना*
*आता अडखळत नाहीत त्यांची पावलं दाराशी*

नेमक्या शब्दात मुक्तपणे छांदोबद्ध झालेले हे काव्य स्त्रीवादी मराठी काव्यात भर टाकणारे आहे. रामायण व्यासांनी लिहिले, त्या रामायणात सीतेच्या वाट्याला फक्त उपेक्षा, दुःख आले. पण आता एकविसाव्या शतकात हे होणार नाही. कारण भूमिकन्या सीता पुन्हा जन्माला येते आहे असे शैला लोहिया यांना वाटते.

*दगडी वृंदावनाचे चिरे फोडून*
*पुन्हा एकदा जन्माला येतेय*
*'भूमिकन्या' सीता*
*नवे रामायण लिहिण्यासाठी*

सीता पुन्हा जन्माला येत आहे. पण रामाची सीता म्हणून नाही, कारण त्या रामायणाचे रचनाकार व्यास होते. आता लिहिल्या जाणाऱ्या रामायणाची रचनाकार स्वतः सीता असेल.

नायिकाही तीच आणि लिहिणारीही तीच. तसेच, प्रतिमा इंगोले *उदयसोहळा* या कवितासंग्रहात सीता आणि सावित्री यांची तुलना करताना लिहितात,

*सीता एक भावी सम्राज्ञी*
*आणि तू एक*
*सामान्य स्त्री !*
*म्हणूनच*
*तुझ्या प्रकाशाचे*
*किरण लेवून*
*उजळत गेलेल्या*
*आम्ही तरी*
*कृतज्ञता पूर्वक*
*उतराई व्हायलाच हवं*
*तुझं कौतुक करायलाच हवं.*

स्त्रीवादी कवितेने स्त्रियांच्या अनुभूतींची आणि अभिव्यक्तीची दालने उघडली. अन्याय सहन केला जाणार नाही अशी परखडपणे समज दिली. तसेच, स्त्री-पुरुष समानतेचा ध्यास घेतला. कोणत्याही नात्याचा पुनर्विचार करावयास हवा ही विचारसरणी पुढे येऊ लागली. एकूणच इ. स. २००० नंतर स्त्रीवादी कवितेने मराठी काव्यात स्वतःचा ठसा उमटविला.

**ड) २००० ते २०१० या कालखंडातील स्त्रीलिखित कविता**

इ. स. २००० ते २०१० या कालखंडात घडलेल्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक घटना अतिशय प्रखर होत्या, की याची अभिव्यक्ती कवितेतून दिसणे अपरीहार्य होते. या दशकात भौतिक सुखाने मनुष्य सुखी झाला खरा, परंतु त्याच्या मनात असुरक्षिततेची भीती निर्माण झाली. 'बॉम्ब हल्ला' कधीही, कोठेही होऊ शकतो अशी विचारसरणी दिसून येऊ लागली. कल्पना दुधाळ, आपल्या *सीझर कर म्हणतेय माती* या कवितासंग्रहात लिहितात,

*कधीही होऊ शकतो हल्ला*
*म्हणूनच अवयवहीन माणूस होऊन जगायचं मला*
*बाबा रे.... पैसा.... संपत्ती आणि आरोग्य सुरक्षेच्या*
*शेकडो योजना आल्या,*
*लॉकर सुविधा आल्या*

*पण इथं माणूस असुरक्षित झालाय*
*त्याचं काय?*

दहशतवादी, अतिरेकी यांचे हलले व त्यात निरपराध मनुष्यांची होणारी हत्या हे भेदक सत्य यातून दिसते.

राजकारणी मदत जाहीर करून मोठेपणा घेतात, पण प्रत्यक्षात ती मदत सर्वांपर्यंत पोहचत नाही. आणि जरी पोहचली तरी त्यासाठी जिवाचे रान करावे लागते. भाषा, जात, धर्म, प्रांत यांसारख्या कशाच्या ना कशाच्या नावावर वेगळी अशी चूल मांडली जात आहे. यावरूनच संध्या रंगारी *संध्यारंग* मधून असे लिहिताना दिसतात की,

*हा*
*भाषेच्या नावावर*
*वेगळी चूल मांडतोय.*
*तो*
*जातीच्या नावावर*
*गोठा बांधतोय*
*ते धर्माच्या नावावर*
*तुकडे पाडताहेत.*
*दोस्ता थोडंसं फिरून बघ ना*
*भारतात कानाकोपऱ्यात*
*किती पाकिस्तानं*
*उभे राहताहेत.*

दंगलीत घडून येते ती केवळ हिंसा ! मात्र येथे दुर्दैवाने हिंसा हे प्रगत देशाचे लक्षण मानले जाते आहे. यावरूनच मलिका अमर शेख या म्हणतात, की

*आम्ही करतोहोत हिंसेचं बारसं*
*हिंसाच आमची माता*
*हिंसाच आमचं पिता*
*हिंसाच आमचं कर्म*
*हिंसेचं केलं जातं रुपांतर तत्त्वात*
*संघटनेत?*

एका माणसाला दुसऱ्या माणसाविषयी सहानुभूती, दया, क्षमा नसणे ही घृणास्पद गोष्ट आहे. यावरूनच मनुष्य निर्दयी असलेला दिसतो. मानवामध्ये बुद्धी आणि वाणी या प्राण्यांपेक्षा अधिक मिळालेल्या देणग्यांचा मानवाने कसा दुरुपयोग केला. आता गिधाडेही माणसांना आम्ही तुमच्यापेक्षा बरे असे तीव्र उपहासात्मक म्हणू लागलेत. या विषयी कवयित्री कविता कुलकर्णी या *जन्मकवितेचा* या कवितासंग्रहात लिहितात,

*गिधाडे म्हणाली माणसांना*
*आम्ही बरे तुमच्यापेक्षा*
*प्राण्यांचे लचके तोडण्यासाठी*
*आम्ही निदान ते मरण्याचीतरी*
*करतो प्रतीक्षा....*

स्वातंत्र्याला पन्नास वर्षे पूर्ण झाल्यानंतर कुसुमाग्रजांनी स्वातंत्र्यदेवतेची विनवणी, *आर्जव* आपल्या काव्यातून केली. प्रचंड उद्वेग आणि असंतोष त्यातून व्यक्त झाला. असाच उद्वेग *मी २६ जानेवारी* या सई लळीत यांच्या कवितेतून *वांगड* या कवितासंग्रहात दिसतो.

*यावर्षी मी रविवारी आले म्हणून*
*सगळयांच्या शिव्या खाल्ल्या*
*बाबांनो, एकेकाळी माझ्यासाठी लोकांनी*
*आपली उभी आयुष्यं पणाला लावली होती.*
*मी २६ जानेवारी मलाच शरम वाटते माझी*
*भारतमातेला विचारते आता*
*कशी ही करंटी पोरं तुझी*

आज देखील आपल्या या समाजात वांझ स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन त्या स्त्रियांना अपराधी वाटावा असा आहे. मुलगा होणे किंवा मुलगी होणे हे तर पुरुषावर अवलंबून असते. परंतु वस्तूस्थितीकडे दुर्लक्ष करून, समजत असूनही डोळेझाक करणे ही करंटेपणाची बाब आहे. स्त्रीचं हे दुःख सुनिता झाडे यांनी *कॉमन वूमन* या कवितासंग्रहात नेमकेपणाने मांडलेले दिसून येते,

*एकीने भागवतातून समजावलं*
*मुलं-बाळाचे जंजाळ नसणारे*
*मुक्तीमार्गी असतात.... कारण*

*आपल्याच मुलांच्या हातून हीन होणे*
*ही नाथाघरची शिक्षा*
*नाथा....*
*तुझ्याघरची शिक्षा परवडली*
*नाथा पण मुक्तीची ही शर्त नको.*

म्हातारपणी काही मुलांकडून फारच वाईट वागणूक मिळत असते. तसेच, काही वृद्धांना वृद्धाश्रमात ठेवले जाते. आई-वडिलांना मुले कधी जड होत नसतात. मात्र मुलांना आई-वडिल जड होत असतात. शिकलेल्या मुलांना परदेशात जाऊन पैसा कमवायचा असतो. त्यासाठी आई-वडिलांना वृद्धाश्रमात ठेवतात. तसेच, त्यांना पाहण्यासाठी, काळजी घेण्यासाठी, भेटण्यासाठी, विचारपूस करण्यासाठी त्यांना वेळ मात्र नसतो. यावर संजीवनी तोफखाने *चांदणलेलं आभाळ* यात चारोळी लिहितात,

*मुलगा सून परदेशात*
*वृद्धाश्रमात बाप मेला*
*विमानाने धावत येऊन*
*तेरावा-चौदावा थाटात केला.*

मुलांनी पालकांना वृद्धाश्रमात ठेवून वाट्याला येणाऱ्या दुःखापेक्षा आपणहून वृद्धाश्रमात गेल्यास त्या दुःखाची तीव्रता तरी कमी होईल असा समंजस विचार ज्येष्ठ कवयित्री सरिता पदकी *लगनगंधार* मध्ये करतात. आई-वडिलांचे वृद्धाश्रमात राहणे म्हणजे मुलाच्या सुखाला जोजावणे असे त्यांना वाटते.

*तरी पण मी वृद्धाश्रमात जाणार आहे*
*कारण माझ्या म्हातारपणापासून*
*तुला सुटका हवी आहे*
*अन् तुला जे हवं ते*
*मला नकोसं कसं बरं असेल?*
*होय ना? मग आता तरी हास !*

एकूणच या सामाजिक परिस्थितीचा आढावा घेतला तर एका बाजूस भौतिकता तर दुसऱ्या बाजूस असुरक्षितता आहे. पैशाच्या मागे आपण धावत चाललेले आहोत. पण धावण्याला दिशा मात्र नाही. तसेच, प्रेम, आनंद, सुख, समाधान ही शाश्वत मूल्ये गमावून

बसलो आहोत. विभक्त कुटुंबपद्धतीमुळे नात्यात दुरावा निर्माण होत आहे, अलिप्तपणा आला आहे. 'लिव्ह इन रिलेशनशिप' या नव्या संकल्पनेमुळे कुटुंब संस्था विस्कळीत होत आहे. तसेच, घटस्फोटाचे प्रमाण वाढते आहे. करिअर या शब्दाला 'स्टेट्स' निर्माण झाल्यामुळे प्रत्येकजण त्यामागे लागला आहे. तसेच, संगणकीकरणामुळे फायद्याबरोबरच तोटेही वाढीस लागलेले दिसतात. स्त्रियांना एकविसाव्या शतकात नवतेबरोबर परंपरेचे पाशही ओढत आहेत. एकूणच आजची परिस्थिती द्विधा मनःस्थितीचे घोतक आहे, असे वाटते.

तरुण पिढीने पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण केले आहे. अशा काही गोष्टीवरून ग्रामीण कवयित्री कल्पना दुधाळ यांना ग्रामीण भागातल्या मुलींवर या जाहिरीतींचा झालेला परिणाम दिसतो. त्या म्हणतात,

*चोवीस तास स्कीन फ्रेश ठेवणारी क्रीम घेण्यासाठी*
*पोरगी दिवसभर मजुरी करते*
*पण क्रीम घेतेच*
*टी.व्ही. तल्या पोरीला खुन्नस देत....*
*.... उन्हात रापलेल्या कातडीला*
*सनस्क्रीन प्रोटेक्शन देते?*

'स्पर्धा' हा जणू महानगराचा श्वास झाला आहे. या स्पर्धा कशा कशाच्या असतील हे सुद्धा सांगणे कठीण आहे. एकूणच या महानगरात मानवी जगण्यातले सारे चैतन्य हरवून गेले आहे. तसेच, या दशकातील कवयित्रींनी आई, आजी, पती, मुलगी, मुलगा या जिव्हाळयाच्या नात्यांवरील व्यक्तींवर कविता लिहिल्या. अशीच एक कवयित्री प्रज्ञा लोखंडे *उत्कट जीवघेण्या धगीवर* या कवितासंग्रहात आर्जव करते, की

*एकदाच कर मायबाये ठसकेदार अदाकरी*
*जितीजागती*
*बाईपासून सुरु होऊन*
*बाईपणात संपणारी!*
*विठाबाई भाऊ मांग नारायणगावकरणीची!*

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, नेल्सन मंडेला, इंदिरा गांधी, ज्योतिबा फुले यांच्यावरील कविता कृतज्ञतेच्या भावनेने गुंफलेल्या आढळतात. अशा थोर व्यक्तींचे दीप आपल्या वाटेवर उजळत असतात. म्हणून आपल्या जगण्याच्या वाटा सोप्या होतात, ही भावना त्यामागे

आहे. कवयित्री मीना शिंदे यांनी *प्रियदर्शी अशोक* व *राजमाता अहिल्या* यांच्याबद्दल आदर वाटतो. अहिल्याबाई होळकर यांनी भारतीय इतिहासात स्वतःच्या कर्तुत्वाने मोठा ठसा उमटवला. शिवाजी महाराजांच्या काळातील रात्री कड्यावरून उतरणारी *हिरकणी* संजीवनी तडेगावकरांना उत्तुंग साहसाच्या उंचीची स्त्री वाटते. तसेच, कवयित्री हिरा बनसोडे *प्रिय रमाई* ला, रमाबाई आंबेडकरांना *फिनिक्स* या कवितासंग्रहास शतशः धन्यवाद देतात. सामान्यमाणसांमध्येही असामान्यत्व असते, जे कधी कधी त्यांच्याही लक्षात येत नाही. पण अशी माणसे इतरांना बळ देतात. कवयित्री सुनंदा भोसेकर यांनी *नत्थू छक्का, बाबल्या, काळी* या व्यक्तिरेखा रेखाटल्या.

कवयित्री इंदिरा संत, शांता शेळके यांनी निसर्ग कविता लिहिली. या दशकात निसर्गकविता लिहिली गेली, पण फार अभावानेच! याचे कारण म्हणजे स्त्रीवादी व स्त्रीकेंद्री कविता व त्यानंतर सामाजिक स्थितीवर भाष्य करणारी कविता याकडे कवयित्रींचा ओढा अधिक दिसतो. आता, तर एकविसाव्या शतकात सिमेंटची जंगले दिसतात. त्यामुळे निसर्गदर्शन कसे होणार? तरीही काही कवयित्रींनी कविता लिहिल्या. कवयित्री सुनंदा भोसेकर यांच्या मते,(*रे गोपाळा*)

*पळस फुलले आहेत बेहोष*
*पाकळयांच्या सडा पडून*
*शेंदरी झाली आहे जमीन*
*संध्याकाळ तकाकते*
*पलीकडल्या शेतांवर*
*आकाशही शेंदरी*
*जसे रानाचेच प्रतिबिंब*

आगळयावेगळया निसर्ग प्रतिमा घेऊन अश्विनी गुरव यांचा *उंच उंच झुला* हा कवितासंग्रह या दशकात येतो. त्यांच्या *नभ दाटलं'* या कवितेत याचा प्रत्यय येतो.

*अवखळ तोरड्यांनी पायी तोरड्या बांधल्या*
*फांद्या फांद्यांनी गळयात जणू चांदण्या गाळल्या.*

शैला लोहिया यांनी *पाऊस १, २, असर पावसा, संग* या निसर्गविषयक कविता लिहिल्या. तर विमल लिमये *झरोकांत कवितेत* निसर्गातील ऋतूंचा झाडांवर होणारा परिणाम दाखवतात. *हायकू* काव्यप्रकार शिरीष पै, शांता शेळके यांनी जसा हाताळला तसा

सरिता पदकी यांनीही वापरला. *लगनगंधार* या काव्यसंग्रहात पावसाचे हायकू येतात.

*आषाढपाऊस*
*टपटपतोय प्राजक्तात*
*धमन्यांतल्या रक्तात*
*फुलाचा डोळा*
*आसवानं भरला*
*पाऊस गहिवरला.*

माणूस व निसर्ग यांचे नातेसंबंध कमी होत आहे. *साजणवेळा, ऋतूनाद* मंदा कदम यांचे काव्यसंग्रह. निसर्ग व मानव यांचा संबंध दाखविताना त्या लिहितात,

*आला पहिला पाऊस*
*मना फुटातील पाने*
*निघोनिया गेला मळ*
*मनी हिरवे चांदणे....*

तर माया धुप्पड यांच्या *चांदणसाज* (२००१) या कवितासंग्रहात पावसावर कविता आहे.

आदिवासींची व्यथा कुसुम अलाम *रानआसवांची माय* या कवितासंग्रहात मांडतात,

*स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षात*
*व्यथा माझी अशी आहे*
*छातीवरती बंदूक आणि*
*पाठीमागे दंडुक आहे.*

सरकारी योजना व जंगल विषयक कायदे यामुळे आदिवासींचे मुक्तपण बंदिस्त झाले, याची खंत अलाम व्यक्त करतात.

१९६० नंतरच्या दशकात दलित कविता जोमाने मराठी साहित्यात आली. २००० नंतरच्या दशकातही दलित कवयित्री लिहित आहे. काही कवयित्री उच्चशिक्षित आहेत त्यामुळे त्यांची जीवनाकडे बघण्याची दृष्टी व्यापक व सखोल असलेली दिसते. केवळ दलित स्त्री हा केंद्रबिंदू न धरता समग्र स्त्रीवर्गाची दुःखे व तिला समाजव्यवस्थेत मिळालेले स्थान त्यांना महत्त्वाचे वाटते. हिरा बनसोडे यांचा *फिनिक्स* (२००१), विमल गाडेकर यांचा

*गुलमोहोर* (२००६), *दरवेळी* (२००९), सरिता जांभुळे यांचा *रानमाय* (२००४), आशालता कांबळे यांचा *याशोधराची लेक* (२००५) आणि माया वासनिक यांचा *अंतःक्षोभ* (२००६) हे कवितासंग्रह प्रकाशित झाले. स्वतःवरील व समग्र स्त्री जातीवर होणारे अन्याय सहन करून घेतले जाणार नाही. अशारितीने कवयित्री परखडपणे आपल्या कवितेत म्हणतात. १९८० पासून लेखन करणाऱ्या कवयित्रींमध्ये ज्योती लांजेवार यांचे *अजून वादळ उठले नाही* (२०००), *एका झाडाचे आक्रंदन* (२००८), संध्या रंगारी यांचे *कवडसा* (२००३), *संध्यारंग* (२०१०) या संग्रहांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. त्यांची कविता अधिकाधिक समृद्धमय झाली. छाया कोरेगावकर यांचा *एक अवकाश माझंही* हा कवितासंग्रह आहे. समाज गाणी लिहिणाऱ्या झिंगूबाई बोलके एक पायाने अपंग आहेत. त्यांचे *जपलेल्या जखमा* (२००३), *अंतरीचे उसासे*'(२००४), *स्त्रीच्या नाळेत* त्यांची *शेपटी अडकल्याने*'(२०१०) हे कवितासंग्रह प्रकाशित झाले. उषा अंभोरे यांचा *कथा पेरता रे पेरता* (२००४) हा देखील काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. तसेच, प्रज्ञा दया पवार (प्रज्ञा लोखंडे) यांच्या कवितेने तर स्वतःचे खास स्थान निर्माण केले आहे. कवयित्री अरुणा ढेरे यांनी गेली पंचवीस वर्षे विपुल लेखन (गद्य व पद्य) केले आहे. ओवी या पारंपरिक रचनाप्रकारातील नवा आशय खूप प्रभावी वाटतो. *निळ्या पारदर्शक अंधारात* या कवितासंग्रहातील ही ओवी,

*पुत्र पोटी ना आला, नाही उणे झाले काही*
*जिला ओळख स्वतःची, अशा लेकीची मी आई*

तसेच, त्यांनी कविता व चारोळया यांतील *रचनाप्रकार लहानसे काही* व *आणखी काही* लिहिला आहे.

*लहानसे काही* मध्ये त्या लिहितात,
*तिला मी दिलेले जुने गाणे*
*कितीतरी वर्षांनी*
*मित्राच्या घरातून तरळत आले*
*एका रात्रीत आयुष्यात केवढे तरी तडे गेले !*

*आणखी काही* मध्ये लिहितात,

*अजून प्रेम करताना*
*ती इतकी मोठी होते की मूलच होते*

*अजून शब्द स्मरताना*
*ती इतकी खरी होते की भूलच होते*
*आणखी काही.*

संगीता बर्वे यांनी *मृगतृष्णा* काव्यसंग्रहापासून ओवी व अभंग या छंदांचा वापर केला. यातून त्यांनी पारमार्थिक सुखाची ओढ व्यक्त केली. तर, सुहासिनी इर्लेकरांनी *आल्या जुळून तारा* हा गीतकाव्यसंग्रह प्रसिद्ध आहे.

शोभा रोकडे यांनी सख्याची आठवण लक्षात घेऊन *तू निरंतर माझ्यातून* यात अभंगमालिका गुंफली. *तुझी आठवण* ही अनेक अभंगाची सलग मालिका आहे.

**उदाहरण:** *तुझी आठवण*
*पाऊस मृगाचा*
*तृषार्त युगाचा*
*चातकाही.*

मंदा कदम यांनी ज्योतिबा फुले व सावित्री फुले यांच्या जीवनावर आधारित *सखी-सावित्री* हे खंडकाव्य लिहिले.

*सदकार्यावर ठेवून निष्ठा प्रहार सारे तिने साहिले*
*चिखलफेक वा अपशब्दांना गंधफुलापरी तिने झेलले.*
*स्त्रीशक्तीचा उंच मनोरा सावित्रीच हा त्याचा पाया*
*त्यागावरती झुलते स्त्रीप्रगतीची अवघी दुनिया.*

१९४५ नंतर मराठी काव्यातील खंडकाव्याचा प्रवाह क्षीण झाला. स्त्रियांनी खंडकाव्याची निर्मिती फारशी केली नाही, त्या पार्श्वभूमीवर एकविसाव्या शतकात खंडकाव्याची निर्मिती झाली. सुहासिनी इर्लेकर यांनी गौतम बुद्धांच्या चरित्रावर आधारित *बुद्धचरित गाऊ या* हे काव्य रचले आहे.

कवयित्री मीरा यांनी *यशोधरा* ही कविता म्हणजेच दीर्घकविता लिहिली. तिच्या जीवनकथेला बौद्धकालाची सीमा असली तरी ही दीर्घकविता त्या मर्यादा ओलांडून पुढे जातात. तसेच, ही आत्मकहाणी कुण्या एका यशोधरेची नाही. तसेच, प्रज्ञा दया पवार यांची *आरपार लयीत प्राणांतिक* या दीर्घकवितेतून स्त्रीत्वाची यातना, वेदना आदिम स्त्रीत्वाशी जोडून घेतली. तर नव्या जागतिकीकरणाच्या काळातील महानगरातील स्त्रीत्वाचे शोषण ठळकपणे येते ते म्हणजे, मीनाक्षी पाटील यांच्या *इज इट इन युवर डी एन ए* या

दीर्घकवितेत. प्रेम ही एकच भावना लक्षात घेऊन उषा मेहता यांची *मितवा* ही देखील कविता दिसते. तसेच, मंदा कदम यांच्या *चंदनाचे देणे* यात आजीचे काव्यात्म व्यक्तिचित्र रेखाटले. पस्तीस सुट्या कवितांची शृंखला म्हणजेच ही दीर्घकविता होय. या दिर्घकवितेचा वारसा रजनी परुळेकर यांनी पुढे चालू ठेवला आहे.

खंडकाव्य, गीतकाव्य, चरित्रकाव्य, दीर्घकाव्य याबरोबरच 'हायकू', 'चारोळया' हे काव्यप्रकार ही दिसतात. कवयित्री मीरा यांनी *हायकू येतोय* हा हायकूंचा संग्रह काढलाय.

*चंद्राचं साम्राज्य उदयाला येताना*
*नेमका आलाय हायकू*
*केविलवाण्या रात्रींना वाचवण्यासाठी*

आधीच्या पिढीत शिरीष पै, शांता शेळके यांनी हायकू लिहिले. हायकूचे श्रेय शिरीष पै यांनाच आहे.

कवयित्री माया दिलीप धुप्पड यांचा *पाऊस* हा चारोळीसंग्रह १९९८ मध्ये व *चंद्र* हा २००१ मध्ये प्रकाशित झाला.

*खिडकीमधून एक फांदी*
*घरात माझ्या डोकावत होती*
*ते झाडच पूर्ण आत घ्यावं*
*अशी इच्छा मनात होती.*

कवयित्री रेखा कोरे यांचा *रिमझिम* व विजया मारोतकर यांचा *हिंदोळा* हे चारोळि संग्रह या दशकातील आहेत. *तिनोळी* हा नवीन काव्यबंध अनुपमा उजगरे यांच्या *पश्चात* या काव्यसंग्रहात वाचायला मिळतो. एकूण ८४ तिनोळया यात आहेत. या तिनोळीत एखादे भाष्य केलेले दिसते. उदाहरणार्थ,

*कोसळू नयेत दरडी म्हणून लावली जाळी*
*जाळीच्या आत-बाहेर वाढल्या गेल्या वेली*
*स्त्रीजात, चिवट मेली !*

मराठी कवितेत १९६५ पासून गझलरचनेला सुरुवात झाली. सुरेश भट यांनी गझल या काव्यप्रकाराला चांगली प्रतिष्ठा मिळवून दिली. १९८० ते १९९० या काळात गझलनिर्मिती मोठ्या प्रमाणात झाली. नंतर मात्र त्याचा बहर ओसरला. मराठीत संगीता जोशी, शोभा तेलंग, आशा पांडे, ज्योती बालिगा, सुनंदा शेळके, फातिमा मुजावर, वंदना पाटील,

अनुराधा साळवेकर आणि क्रांती या महिला गझलकार आहेत. अलीकडच्या काळात नीला वाघमारे या दलित कवयित्रीचा *आरास* (२००५) हा गझलसंग्रह प्रसिद्ध झाला आहे. संगीता जोशी यांचे *म्युझिका* (१९८६) व *वेदना संवेदना* (१९९७) हे दोन्ही कविता व गझलसंग्रह प्रकाशित झालेले आहेत. *चांदणे उन्हातले* (२००४) हा फक्त गझलांचा संग्रह प्रकाशित झाला आहे.

काही उल्लेखनीय काव्यसंग्रह पुढीलप्रमाणे:

स्त्री-काव्यक्षेत्राचा विस्तार लक्षात घेता सर्वांचीच नोंद करणे शक्य नाही. त्यात रामकली पावसकर, *ओले अथांग श्वास* (२००९), उर्मिला चाकूरकर *पर्जन्यास्त्र* (२००६), वृषाली किन्हाळकर *तारी* (२००४), प्रतिमा सराफ *मातीत पूर्णत्वानं रुजण्यापूर्वी* (२०१०), श्यामला वनारसे *जाणिवांचे किनारे* (२००३), आश्लेषा महाजन *स्वसंवेध* (२००३), मीनल बाठे *अंतर्वेध* (२००३), स्नेहसुधा कुलकर्णी *जागेपणी जगताना* (२००३), शोभा तेलंग *बहरून ये जरासा* (२००३), भारती पांडे *मनवा* (२००३), माया धुप्पड *मनमोर* (२००४), नीलिमा गुंडी *प्रकाशाचे अंग* (२००५), सुजाता लोहकरे *मोर तू मोर* (२०१०) या काव्यसंग्रहांचा उल्लेख केला पाहिजे. या कालखंडात कवयित्री सुचिता खल्लाळ, ज्योत्स्ना चांदगुडे, स्वाती सामक, प्रभा सोनवणे, पद्मिनी कराडे, सावित्री जगदाळे, उषा चौधरी, स्वाती ठकार, वैजयंती सराफ, अनुराधा नेरुरकर, सुमान फडके, मृणालिनी कानेटकर-जोशी, वंदना महाजन, मीरा शिंदे, अंजली महागावकर, मृण्मयी भजक, अनघा तांबोळी आदी अनेक कवयित्री काव्यलेखन करीत असलेले दिसून येते.

## संदर्भ ग्रंथसूची

१. देशपांडे वामन नारायण, 'महदंबा आद्य मराठी कवयित्री', प्रथमावृत्ती१९३५, कॉटिनेंटल प्रकाशन, पुणे-२ पृ. ३

२. तत्रैव, पृ. ५

३. भिंगारकर द.बा , 'संत कवयित्री जनाबाई, चरित्र काव्य: कामगिरी, " संत जनाबाईची जीवनगाथा", मॅजिस्टिक प्रकाशन. पृ. १८

४. तत्रैव, पृ. ३१

५. तत्रैव,पृ. २०५

६. शेकडे वसंत सिताराम, ‘ संतमेळयाची अभंगवाणी’,प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास( प्रारंभ ते१८४०) नरेन्द्र प्रकाशन, अहमदनगर पहिली आवृत्ती २६ जानेवारी १९९२ पृ. ५२

७. तत्रैव, पृ. ५३

८. तत्रैव, पृ. ११०

९. तत्रैव, पृ. ११०

१०. तत्रैव, पृ. ४९, ५०

११. गणोरकर प्रभा, ‘आधुनिक कविता (१९७०- २००७)’ “मराठीतील स्त्रियांची कविता”, पहिली आवृत्ती ऑगस्ट २०१५, लोकवाङ्मयगृह प्रकाशन पृ. १८०

१२. तत्रैव , पृ. १८०

# प्रकरण चौथे: मराठी स्त्रीलिखित नाटकांचा अभ्यास

## अ) १८८० ते १९२०या कालखंडातील स्त्रीलिखित नाटक

कविता, कथा, कादंबरी, प्रवासवर्णने इत्यादी साहित्य-प्रकारापेक्षा *नाटक* हा वेगळा साहित्यप्रकार ठरतो. कारण, शब्द अविष्काराबरोबरच नाटकाचे मुल्य प्रयोगात्मक असते. भरतमुनिंनी नाट्यसूत्रात *प्रयोगप्रधानम हि नाट्यम* असे नाट्याचे वर्णन केले आहे. रंगमंचावर नटाच्या अभिनय कौशल्याबरोबरच जी शब्दबद्ध मांडणी (संहिता) मुखातून बाहेर पडते आणि प्रेक्षकांच्या पंचेंद्रियांना तिचा आस्वाद घेता येतो, ते म्हणजे नाटक. नाटक संहिता शब्दात आविष्कृत झाली कि, प्रयोगाकडे तिची वाटचाल सुरु होते. नाटकाच्या अनेक व्याख्या रंगकर्मी, अभ्यासकांनी मांडलेल्या आहेत. नाटकाच्या संपूर्ण कालावधीत जे नाटक प्रेक्षकांना आपल्याकडे खेचून धरू शकतं तेच योग्य व यशस्वी नाटक होय.

रसिक प्रेक्षकाला नियमितपणे रंगमंचावरील नाटक प्रयोग पाहायला उपलब्ध वेळ असेलच असे नसल्याने नाटक हे लिखित प्रकाशित होऊ लागले. इ.स. १८४३ साली विष्णुदास भावे यांनी कानडी मुलखात रूढ असलेल्या *यक्षगान* नाटकाचा आधार घेऊन मराठीतले पहिले नाटक "*सीतास्वयंवर*"[१] रचले. भावेंनी लिहिलेली नाटके कीर्तन परंपरेला अनुसरणारी होती. पण, ज्या सर्वार्थाने नाटक म्हणता येईल, असे नाटक भावे नाटकानंतर कित्येक दशकांनी उदयास आले. ज्याला अस्सल मराठी नाटक म्हटले जाऊ शकते. अशा नाटकाचे आद्य प्रवर्तक अण्णासाहेब किर्लोस्कर हे होत. कालिदासाच्या अजरामर शाकुंतलाचे १८८० साली किर्लोस्करांनी मराठी नाटकात रुपांतरीत केले.

त्यापूर्वी नाट्यविष्कारामध्ये गोंधळ, जागरण, तमाशा, भारुड हि रुपेही होती. लहानमोठ्या बोधयुक्त नाटकुल्यातून मनोरंजन होत असे. मात्र काळानुसार यात फक्त पुरुष पात्रेच काम करीत असत. स्त्री पात्रांची भूमिकाही पुरुष करत होते. त्यामुळे मिशी असलेले स्त्री पात्र चालत असे. कालांतराने स्त्रियाही याकडे वळलेल्या दिसतात.मराठी साहित्यात पुरुष नाटककारांबरोबरच स्त्री नाटककारांचा विचार करता, मराठी साहित्यात पहिल्या स्त्री नाटककार कोण? असा प्रश्न आवासून उभा राहतो. पण हा जरी वादाचा प्रश्न असला तरी तारा भवाळकर यांनी (स्त्री साहित्याचा मागोवा खंड १) यात सांगितल्याप्रमाणे "*संगीत सीताशुद्धी*"[२] हे इ.स. १८८७ साली काशीबाई फडके यांनी लिहिलेले पहिले स्त्रीलिखित नाटक असले तरी ते इ.स. १८९७ साली प्रकाशित झाले. तत्पूर्वी सोनाबाई चीमाजो केरकर यांचे "संगीत छत्रपती संभाजी"[३] हे नाटक प्रकाशित झाले. त्यामुळे संहिता लेखन करणाऱ्या

पहिल्या स्त्री नाटककार काशीबाई फडके असल्या तरी प्रत्यक्ष मुद्रित पुस्तकरूपात नाटकाचे प्रकाशन झालेल्या सोनाबाई केरकर या आद्य नाटककार ठरतात.

*संगीत सीताशुद्धी* हे काशीबाईंनी लिहिलेले पौराणिक नाटक आहे. या नाटकाची सुरुवात नांदीने होते, या नांदीत काशीबाई स्वत:चा उल्लेख *बलवकन्या* असा करतात. सीतेचे अपहरण, राम रावण युध्द, अग्नीदिव्य यासारख्या प्रसंगातून नाटक पुढे सरकते. काशीबाईंनी त्या काळातल्या पुरुष लिखित नाटकांच्या अनुकरणातून हे नाटक लिहिल्याचे ठळकपणे जाणवते. नाटकात काही प्रमाणात अति विश्लेषण असल्याने रटाळपणाही येतो. पण एकूणच त्यांच्या रचनेतील प्रौढता व प्रयत्ननिष्ठा ध्यानात घेतल्यास वयाच्या चौदाव्या वर्षी लिहिलेले हे नाटक इतिहासात नोंद होण्यास पात्र ठरते.

सोनाबाई चिमाजी केरकर यांनी वयाच्या सोळाव्या वर्षी *संगीत छत्रपती संभाजी* हे नाटक लिहिले. हे ऐतिहासिक नाटक आहे. या नाटकातून सोनाबाईंनी शिवाजी महाराज व त्यांचा पुत्र छत्रपती संभाजी या दोघांच्या गुणांची तुलना केली आहे. संभाजी महाराजांमुळे मराठी सत्तेची झालेली वाताहत; या नाटकातून प्रकट होते. त्याचप्रमाणे तत्कालीन पारंपारिक सहनशील स्त्रीचे दर्शन त्यांनी संभाजीच्या पत्नी येसूबाईंच्या माध्यमातून घडवले आहे.

सोनाबाई व काशीबाईंच्या नंतर काही वर्षांनी म्हणजेच १९०४ मध्ये हिराबाई पेडणेकर यांनी *संगीत जयद्रथ विडंबन* हे नाटक लिहिले आहे. त्याचप्रमाणे हिराबाईंनी १९१२ मध्ये *संगीत दामिनी* आणि *संगीत मीराबाई* ही दोन नाटके लिहिली. *संगीत दामिनी* या नाटकातून पती-पत्नींच्या नाजूक भावबंधनांची वीण त्यांनी घट्टबांधली आहे. *संगीत दामिनी* नाटकाचे कथानक काल्पनिक स्वरूपाचे आहे. दामिनी व तिच्या पतीची ताटातूट होते, ते परस्परांचा शोध घेतात. त्याकाळात त्यांच्या आयुष्यात झालेल्या घडामोडी, या घडामोडींबरोबरच तत्कालीन स्त्रियांचे मानसिक व सामाजिक जीवन यांचा परिचय हिराबाई येथे करून देतात. स्वत: अशिक्षित असूनही स्त्रीशिक्षणाविषयीची मते त्यांनी बिनचूकपणे नोंदवली आहेत आणि यामुळेच त्या काळात हिराबाईंनी केलेले हे असामान्य काम वाङ्मय साहित्यात अल्लेखानीय आहे.

एकूणच प्रारंभ ते१९२० च्या स्त्रीलिखित नाटकांचा अभ्यास करता असे जाणवते कि, या कालखंडात फक्त काशीबाई फडके , सोनाबाई चिमाजी केरकर व हिराबाई पेडणेकर या तीनच लेखिकांनी हाताच्या बोटावर मोजू येणार, एवढेच लेखन केले. सुरुवातीला लिहिलेल्या या नाटकांचे विषय हे पौराणिक व ऐतिहासिक स्वरूपाचे होते. पुराणात व

इतिहासात घडलेल्या घटना, प्रसंगांनाच त्यांनी संवाद रूपाने प्रकट केले. पण मुख्य म्हणजे ही जी सगळी नाटके होती; ती मुळात संगीत नाटके होती. हिराबाई पेडणेकर यांचे *संगीत दामिनी* हे नाटक काल्पनिक असल्यामुळे नाटकाच्या विषयात बदल घडून आणण्याचे प्रयत्न जरी स्त्री नाट्यलेखन कमी प्रमाणात झाले असले तरीही तत्कालीन परिस्थितीचा अंदाज घेता, या स्त्रियांचे हे नाट्यलेखन अतिशय महत्वाचे ठरते. थोडक्यात एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस व विसाव्या शतकाच्या सुरुवातीस स्त्रियांनी इतर वाङ्मयप्रकाराबरोबरच नाटक हा वाङ्मयप्रकारही स्त्रिया उत्तमरीत्या हाताळू शकतात हे सिध्द केले. या तीन लेखिकांनी स्त्री नाट्यलेखनाचा पाया घातला व पुढे १९२० च्या नंतर नाट्यक्षेत्रात स्त्रियांची संख्या वाढत गेली. त्याचप्रमाणे अनेक विषयांवर लेखिकांनी नाट्यलेखन करून नाटक हा साहित्यप्रकार समृध्द केला.

### ब) १९२० ते १९६० या कालखंडातील स्त्रीलिखित नाटक

विसाव्या शतकाच्या दोन शतकांपर्यंतफक्त काशीबाई फडके, सोनाबाई केरकर आणि हिराबाई पेडणेकर या स्त्रियांनी केलेले नाट्यलेखन सर्वपरिचित आहे. पण, १९२० ला सुरुवातीच्या काळातच गिरिजाबाई केळकर वाचक वर्गापुढे आल्या. १९२० ते १९६० या कालखंडातील महत्वाच्या स्त्रीनाटककारांविषयी येथे थोडक्यात लिहू इच्छिते.

#### १) गिरिजाबाई केळकर:

नाट्यसंमेलन अध्यक्षपदाच्या पहिल्या स्त्री नाटककार मानकरी म्हणून गिरिजाबाई केळकरांचे नाव घेतले जाते. १९२१ मध्ये *संगीत आयेषा* हे ऐतिहासिक नाटक प्रसिध्द झाले. तत्पूर्वी १९१२ ला *गृहिणी भूषण* व १९१३ ला *संगीत पुरुषांचे बंड* ही त्यांची गाजलेली नाटके. त्यांनी ऐतिहासिक नाटकांबरोबरच सामाजिक विषयांवरही नाट्यलेखन केले. १९३२ मध्ये *हीच मुलीची आई* हे सामाजिक नाटक त्यांनी लिहिले.

#### २) मालतीताई तेंडूलकर:

मालतीताई तेंडूलकर १९३३ साली *मराठ्यांचा राजा* हे ऐतिहासिक व *अर्धांगी* हे सामाजिक नाटक घेऊन वाचकांच्या भेटीस आल्या. घटस्फोट कायद्याच्या आवश्यकत्ते विषयीचे विचार व त्याचे स्त्री व पुरुष जीवनावर होणारे परिणाम यांचे चित्रण त्यांनी *अर्धांगी* या नाटकातून केले आहे.

#### ३) आनंदीबाई किर्लोस्कर :

१९४३ मध्ये *नव्या वाटा* हे नाटक आनंदीबाई किर्लोस्कर यांनी लिहिले. घटस्फोट कायदा सुरु होण्यापूर्वी स्त्रीला भोगावे लागणारे जीवन, पती सहवासात स्त्रीजीवनाला जाचणारे प्रश्न व एकूण घटस्फोट कायद्याची आवश्यकता, वैवाहिक जीवनात येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी आखलेली रूपरेषा या नाटकातून लेखिकेने उलगडलेली आहे. थोडक्यात स्त्रीजीवन सुधारण्यासाठी स्त्रीचाच पुढाकार आवश्यक आहे, असे आनंदीबाई सुचवतात.

**४) मालतीबाई बेडेकर**

*पारध* हे नाटक मालतीबाई बेडेकर यांनी १९१२ साली प्रसिद्ध केले. 'घटस्फोट' हाच विषय मालतीबाईंनी पुन्हा हिरहिरीने मांडला. तत्कालीन स्त्रीविषयक असणारा सामाजिक दृष्टीकोन यांवर बोट ठेवले. समाजात वावरत असताना स्त्रीची होणारी शारीरिक, मानसिक ओढाताण आणि अत्यंत सुशील स्त्रीची रखेल प्रवासगाथा समाजाकडून नकळत होते. याचे अत्यंत संवेदनशील चित्रण लेखिकेने या नाटकाद्वारे समोर आणले.

**५) सुधा साठे**

पुन्हा तोच विषय घेऊन १९४८ मध्ये सुधा साठेंनी *संगीत एकच गाठ* हे नाटक लिहिले. मात्र या नाटकाचा गाभा हा वधूपरीक्षा असा असल्याने संतापजनक आणि हास्यास्पद असणाऱ्या चालीरीती त्यांनी अधोरेखित केल्या आहेत. थोडक्यात समाजात बदल होत असताना स्त्रियांकडे पाहण्याचा समाजमनाचा दृष्टीकोन सुधा साठेंनी हुबेहूब रेखाटला आहे.

**६) कमला प्रभू**

"कसल्याही नवऱ्याला देव मानून आपण निर्बुद्ध दगड बनण्यापेक्षा दोघांनीही माणसाप्रमाणे वागणं चांगलं."[४] हे *पुढचं पाउल* नाटकाद्वारे उलगडणाऱ्या कमला प्रभू यांनी *संगीत घराकडे* हे नाटक १९४८ साली लिहिले. नवऱ्याची चूक असूनही स्त्रीनेच पडती बाजू घ्यावी, या मानसिकतेवर बोट ठेवणारे हे नाटक आहे. अनेक स्त्रियांना आपले आत्मभान जागृत करण्यासाठी प्रेरणा देणारे नाटक कमला प्रभूंनी लिहिले. पुरुषप्रधान व्यवस्थेला तडा देणारे हे उल्लेखनीय नाटक होय.

**७) शकुंतला परांजपे**

फ्रेंच भाषा अवगत असल्याने फ्रेंचमधून मराठी रुपांतर केलेली *सोयरिक* (१९३६) ही नाटके  शकुंतला परांजपे यांची कलाकृती होय. फ्रेंच भाषेत असलेली ही नाटके त्यांनी त्याच

तडजोडीने मराठीत आणली. माणसाचे दाखवायचे व खायचे दात वेगळे असतात, असे म्हणतात. या उक्तीवर भाष्य करणारे *पांघरलेली कातडी* हे नाटक त्यांनी लिहिले.

अशाप्रकारे १९२० ते १९५० पर्यंतची नाटके पहिली तर या महत्वाच्या लेखिकांनी नाटके लिहिली. या लेखिकांपैकी काही लेखिकांनी १९५० नंतर व १९६० नंतरही लेखन केले. बहुतांश १९५० नंतर लेखन करणाऱ्या बहुतेक लेखिकांनी १९६० नंतरही लेखनकार्य सुरु ठेवले. त्या लेखिकांचा उल्लेख '१९६० नंतरची मराठी स्त्रीलिखित नाटके' हा विषय मांडताना करू इच्छिते. १९२० टे १९५० पर्यंतची काही नाटके पुढीलप्रमाणे –

- क्षमाबाई राव- *केवळ ध्येयासाठी* (१९२६)
- चंद्राबाई शिंदे – *गृहिणीधर्म* (१९२६)
- इंदिराबाई पेंडसे- *कुलभूषण* (१९३३)
- वनिता देसाई – *प्रेमरहस्य* (१९३४), *म्हारिची पोर* (१९३६)
- मनोरमा लेले- *प्रणयप्रचीती* (१९३५)
- माई वरेरकर – *काकांची शशी* (१९३८)
- द्वारका दत्तात्रय गुप्ते – *प्रेमाचा होम* (१९४०)
- अनुसया वाघ – बालसंवाद (१९४१)
- विमल घैसास –*नंदादीप* (१९४९), *मदिरा* (१९४९)
- इंदुमती देशमुख – *शीला* (१९४९)
- उमाबाई सहस्त्रबुद्धे – *संगीत काहुर* (१९४८) *संगीत लोकराज्य* (१९४८)
- कृष्णाबाई मोरे – *माझी गुणाची पोर* (१९५०)
- पद्मा गोळे – *नवी जाणीव* (१९५०)
- विमल काळे – *भूमीला भार* (१९५०)
- भागिरथीबाई वैद्य – *ब्रम्हान्म बोध, संगीत सद्गुरू*

अशी अनेक नावे नाट्यसाहित्य कलाकृती अभ्यासांती समोर येतात. १९५० पर्यंतच्या नाट्यक्षेत्रातील सर्वच महिला या पांढरपेशा होत्या हे हि नमूद होत आहे. कारण शैक्षणिक व्यवस्थेकडे बघण्याचा दृष्टीकोन तत्कालीन परिस्थितीत वादाचा विषय होता. प्रारंभ

काळात पौराणिक, ऐतिहासिक विषयांची रेलचेल होती व काही कालावधीनंतर सामाजिक विषयही स्त्री मांडू लागली. पण, १९२० ते १९५० ह्या कालावधीत असंख्य स्त्रिया लिखित झाल्या.

पारंपारिक संस्कार, रूढी, परंपरा, प्रथा, व्रतवैकल्य, खाष्टसासू, कपटी नणंद, बेजबाबदार अथवा रंगेल नवरा.. एकूणच मानसिक शारीरिक छळ होत असणाऱ्या परिस्थितीमध्ये स्त्रियांना मोकळे करण्यासाठी त्यांचे मत परिवर्तन करण्यासाठी त्यांना उंबरठा ओलांडून शिक्षण घेण्यासाठी, स्वावलंबी होण्यासाठी या लेखिकांनी समाजप्रबोधनवादी नाटक पुस्तक रूपाने प्रकाशित करून मोलाचे कार्य केले आहेत. हळूहळू १९५० पर्यंतच्या नाट्यलेखनात अनेक प्रश्न मांडलेले आहेत हे लक्षात येते.

### क) १९५० ते १९६० या कालखंडातील स्त्रीलिखित नाटक

१९५०नंतरच्या नाटकाविषयी येथे विस्ताराने लिहू इच्छिते. कारण १९६० नंतरच स्त्रीलिखित मराठी नाटके, हा अभ्यासाचा मुख्य विषय आहे.

पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक विषय मांडत नाट्यलेखन विनोद आणि रंजकतेच्या स्वरूपाने पुढे सरकलेले दिसते. नंतरच्या नाट्यलेखनात १९५० च्या एक दोन दशकां आधीच्या लेखिका नाट्यलेखन करत आल्या. काहीजणी अनेक नवे-नवे  विषय नाटकातून हाताळू लागल्या, तर काहीजणी तेच-तेच विषय परत नव्याने हाताळू लागल्या. १९५० नंतर स्वातंत्र्योत्तर काळात घटस्फोटाचा, हुंडाबंदीचा कायदा पास झाला. थोडक्यात स्त्रीच्या स्वातंत्र्याला कायदेशीरपणे तरी मान्यता मिळाली होती आणि त्याचे पडसाद १९५० नंतरच्या स्त्रीलिखित नाटकातून दिसून येते. मुख्य विषयाला सुरुवात करण्यापूर्वी १९५० ते१९६० या कालखंडातील नाटकांचा थोडक्यात आढावा घेणे गरजेचे ठरते. १९५० ते १९६० या स्वातंत्र्योत्तर कालखंडात अनेक स्त्री नाटककारांनी लेखन केले. काही अपवाद वगळता या कालखंडातील बहुतेक लेखिकांनी १९६० नंतरही लेखन कार्य चालू ठेवले.

### १९५० ते १९६० मधील नाटके

#### १) मुक्ताबाई दीक्षित

१९५१ साली प्रकाशित झालेले *जुगार* हे मुक्ताबाई दीक्षित यांचे पहिले लक्षणीय नाटक आहे. हे नाटक तीन परभाषांमध्ये भाषांतरित झालेले आहे. या नाटकाच्या दोन आवृत्या निघाल्या असून अनपेक्षित यशही *जुगार* या नाटकाने प्राप्त केले. *जुगार* प्रमाणेच *अवलिया* आणि *संसार* हि नाटके १९५६ साली प्रकाशित झाली.

**२) सौ. शांता निसळ**

स्त्रीचे मनोविश्व उत्तम रीतीने टिपणाऱ्या स्त्री-नाटककार म्हणून शांता निसळ यांचा उल्लेख केला जातो. शांता निसळ यांनी १९५४ साली *सौभाग्यकांक्षिणी* आणि १९९७ साली *मृत्यू माघारी गेला'* हि दोन नाटके प्रकाशित केली.

३) सौ. मालतीताई दांडेकर

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील एक महत्वाच्या नाटककार म्हणून सौ. मालतीताई दांडेकर यांचे नाव घेतले जाते. १९५० ते १९६० च्या दरम्यान त्यांनी *ज्योती* हे नाटक १९५५ ला लिहिले. त्यांची सर्वाधिक नाटकेही १९६० नंतर त्यांनी लिहिली.

*ज्योती* हे नाटक पुरुषपात्र विरहीत नाटक आहे तत्कालीन लोकांच्या स्त्रीशिक्षणाविषयीच्या मानसिकतेचा विचार करून मालतीबाईंनी हे नाटक लिहिले.

**४) मालतीबाई बेडेकर**

या १९५० च्या आधीही नाटक लिहित होत्या आणि १९५० व १९६० नंतरही लिहिताना दिसतात. *हादरलेलं घर* हे १९५७ मध्ये लिहिलेले त्यांचे नाटक, किशोरवयीन मुलांच्या वर्तनामुळे घरावर आलेले सावट बेडेकर यांनी अधोरेखित केले आहे. मुलांच्या या मानसिकतेला घरातील मोठया व्यक्ती कशा जबाबदार ठरतात, त्याचे हे बोलके उदाहरण आहे.

**५) तारा वनारसे**

१९५५ साली तारा वनारसे यांनी *कक्षा* हे नाटक प्रसिद्ध केले. केवळ एका व्यक्तीला वचन दिले म्हणून ज्यावर मनापासून प्रेम केल, त्या प्रियकराला सोडून जाताना होणाऱ्या नायिकेच्या वेदना कक्षेतच फिरत राहिल्या. विशेष गाजलेले हे नाटक वाचकप्रिय आहे.

**६) कुमादिनी रांगणेकर**

*आंधळी कोशिंबीर* (१९५५), *बच्चू लच्छमन* (१९५९) हि दोन नाटके १९५० नंतर कुमुदिनी रांगणेकर यांनी लिहिली. त्यांची हि नाटके तत्कालीन सामाजिक परिस्थितीवर आधारित आहे. एका स्त्रीने दुसऱ्या स्त्रीला सहकार्य केले, तर किती चांगल्या गोष्टी घडू शकतात, हे सांगितले आहे.

**७) उमाबाई भट**

उमाबाई भट यांनी 'हुंडा' या समस्येवर भाष्य करणारे, प्रश्न उभा करणारे *पत्यांचा बंगला*

हे नाटक लिहिले आहे. तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे, मानसिकतेचे दर्शन या नाटकाद्वारे होते. मुलाच्या हुद्यावरून हुंड्याची रक्कम ठरवली जायची व यात गरीब मुलीचे लग्न होण्यास कठीणता निर्माण होई. त्यांना आपल्या मनासारखा जोदैर मिळणे कठीण होऊन जाई.

**८) शशिकला आळंदकर**

१९५० ते १९६० या कालखंडात शशिकला आळंदकर यांनी *सोनेरी चौकट, पिंजरा, लोका सांगे ब्रम्हज्ञान, संगीत तारू लागले किनारी* हि नाटके लिहिली.

**९) सुमतीदेवी धनवटे**

एक समर्थ संगीत नाटककार म्हणून ओळख असलेल्या सुमतीदेवी धनवटे यांची *'धुळीचे कण'* या नाटकातून मिळतो.

**प्रारंभ ते १९६० या कालखंडातील नाटकांचे निष्कर्ष**

प्रारंभ ते १९६० पर्यंतच्या स्त्रीलिखित नाटकांच्या अभ्यासात असे लक्षात येते कि, कमी कालावधीतच स्त्री नाटककारांनी नाट्यक्षेत्रात आपले स्वतंत्र स्थान प्राप्त केले. प्रारंभी १९२० पर्यंत काही मोजकीच स्त्री नाटके वाचकांच्या भेटीस आली आणि ती आत्ताच्या मानाने विषय, आशय, प्रायोगिक दृष्ट्या खूपच वेगळी होती.

१९२० पर्यंत काशीबाई फडके, सोनाबाई केरकर हिराबाई पेडणेकर या लेखिकांनी प्रारंभी ऐतिहासिक, पौराणिक विषयांवर लेखन केले. प्रारंभीची नाटके हि फक्त वाचक वर्गासाठी होती. त्याचे मोजकेच प्रयोग झाले. उदा. काशीबाई फडकेचे *संगीत दामिनी* नाटकाचा प्रयोग ललितकलादर्श मंडळीचे मालक व व्यवस्थापक यांच्या प्रोत्साहनामुळे ते प्रकाशनापूर्वीच रंगमंचावर आणण्यात आले.

१९२० नंतर मात्र स्त्री-नाटककारांची संख्या वाढत गेली. ऐतिहासिक आणि पौराणिक विषयांच्या चौकटीत वावरणारे नाटक ती चौकट ओलांडून नवनवीन विषय हाताळण्याचा प्रयत्न करू लागले. स्त्रीशिक्षण, स्त्रीसुधारणा, बालविधवा, पुनर्विवाह, घटस्फोट कायदा, स्त्रीची कौटुंबिक, सामाजिक स्तरावर होणारी पिळवणूक अशा वेगवेगळ्या विषयावर प्रखरपणे लेखन होऊ लागले. एकूणच ऐतिहासिक व पौराणिक विषय हळूहळू मागे पडून स्त्रियांनी सामाजिक विषयांची दखल घ्यायला सुरुवात केली. त्याचप्रमाणे सुरुवातीच्या नाटकात संगीताला जास्त वाव होता, पण हळूहळू कमीही झाले. एकूणच १९२० नंतर स्त्री-नाटककारांनी नाट्यक्षेत्रात कायापालट केलेला दिसतो. या कालखंडातील बहुतेक नाटके हि

पुरुषविरहित व केवळ महिला मंडळासाठी लिहिली गेली होती. प्रारंभ ते १९५० पर्यंतची नाटके ही हौशी महिला मंडळानीच सादर केली.

दीर्घ कालावधीनंतरच १९५१ मध्ये पुरुषविरहित नाटकाला छेद देऊन मुक्ताबाई दीक्षित यांनी *जुगार* या नाटकाद्वारे स्त्रियांना रंगभूमीवर स्थान मिळवून दिले. त्यामुळे प्रयोगाच्या दृष्टीने पहिली कुलवती नाटककार सौ. पद्मावती वर्तक व भीमसेन जोशी या कलावंतांनी *जुगार* या नाटकाच्या निमित्ताने एकत्र येऊन काम केले. थोडक्यात मुक्ताबाईंनी स्त्री नाट्यलेखनात परिवर्तन घडवून आणण्याचे कार्य केले. १९२० ते १९५० पर्यंतची नाटके ही केवळ 'स्त्री' ला केंद्रस्थानी ठेवून लिहिली गेली.

१९५० नंतर मात्र स्त्री जीवनाबरोबरच स्त्री नाटककारांनी कौटुंबिक, सामाजिक ,विनोदी, विज्ञानयुग अशा आधुनिक विषयांवर लेखन केले. डॉ. प्रतिमा इंगोले यांनी 'स्त्री साहित्याचा मागोवा खंड (इ.स. २००१ ते २०१०)' या ग्रंथात सांगितल्याप्रमाणे "१९५१ ते २००० या कालखंडात तर स्त्रियांच्या एकूण ८० ते ८५ नाट्यसंहिता प्रकाशित झालेल्या दिसतात."[५] त्याचप्रमाणे एकूणच १९५० ते २००० या कालखंडातील नाटकाविषयी बोलताना त्या म्हणतात की, "खरे तर नाट्यव्यवसाय आणि त्याची आर्थिक गणिते ही अजूनही पुरुषी मिरासदारी आहे. तरीही मुंबईसारख्या महानगराशी संबंधित लेखिकांना ह्या संधीचा अधिक लाभ झालेला दिसतो. सई परांजपे, सोनाली कुलकर्णी या तर निर्मात्या म्हणूनही काम करू लागलेल्या दिसतात. या कालखंडातील नाट्यलेखिका जरी उच्च स्तरातील लेखिका असल्या तरीही त्यातील काहींची अनुभव कक्षा अधिक विस्तारित व सखोल झालेली दिसून येते. स्त्री समस्यांच्या आकलनाची व्याप्तीही वाढलेली दिसून येते. या कालखंडात स्त्रीपात्री, महिला मंडळप्रधान या पठडीतून स्त्रियांचे नाटक बाहेर पडलेले दिसून येते"[६] त्यांनी मांडलेला हा निष्कर्ष तंतोतंत खरा आहे.

### ड) १९६० ते २०००या कालखंडातील स्त्रीलिखित नाटक

प्रारंभ ते १९६० पर्यंतच्या नाटकांच्या अभ्यासातून स्त्रीनाटककारांच्या आशय, विषयात कसे बदल होत गेले हे आपण पहिले. १९६० ते २००० या कालखंडात स्त्रीनाटकात कसे बदल होत गेले, त्यांचे आशय, विषय काय होते, या कालखंडात कोणत्या स्त्रीलेखिका होऊन गेल्या ते पाहू.

### १) ज्योत्स्ना भोळे- *आराधना*- गं. पा. परचुरे प्रकाशन मुंबई

ज्योत्स्ना भोळे या नामवंत गायिका व नाट्य अभिनेत्री आहेत. त्यांनी १९६० साली

*आराधना* हे नाटक लिहिले. आई-वडिलांची कहाणी एक मुलगी फ्लॅशबॅक पद्धतीने सांगते, अशी या नाटकाची कल्पकता आहे.

संगीत, समाजिक स्वरूपाचे हे नाटक 'सदानंद व बिना' या दोन पात्रांच्या आधारे. हिंदू-मुस्लीम या दोन धर्मातील स्त्री-पुरुषांच्या संसाराची कथा फ्लॅशबॅक पद्धतीने सांगितली आहे. मुंबई येथे या नाटकाचा पहिला प्रयोग झाला. कृष्णराव चोडणकर मंदाकिनी भडभडे , मास्टर अविनाश, खुद्द जोत्स्नाबाई असे नामवंत कलाकार या नाटकात होते. या नाटकासंबंधी तारा भवाळकर लिहितात की, "लेखकाने निर्माण केलेली भूमिका कलावंत जन्मभर आईच्या मायेने जतन करतो. म्हणून शोभत नसतानाही तरुण भूमिका करीत राहतो. लेखक हा केवळ जन्म देणारा डॉक्टर असतो. ही नाटकातील मध्यवर्ती कल्पना स्पृहणीय आहे."[७]

**२) विमल काळे – *संगीत मृगजळ* जोशी ब्रदर्स बुक सेलर्स अॅण्ड पब्लिशर्स , पुणे.**

१८५० ते १९५० या कालखंडात विमल काळे यांनी *भूमीला भार* आणि *छाया* ही दोन नाटके लिहिली. तर १९६० ला त्यांनी *संगीत मृगजळ* हे तिसरे नाटक लिहिले.

मृदुला या प्रतिनिधिक पात्राच्या आधारे, मुलीच्या लग्नाचा विषय येथे मांडला आहे. मुलगी शिकत असताना लग्नासाठी तिला प्रवृत्त करणे, स्वप्नरंजनेत वावरणाऱ्या त्या मुलीला नकार आल्यावर तिच्या मनावर होणारे आघात विमल काळेंनी येथे चित्रित केले आहे.

थोडक्यात त्याकाळी रूढ असलेली विवाहसंस्था त्याचे मुलींच्या जीवनात होणारे परिणाम येथे अधोरेखित केले आहे.

**३) शशिकला आळंदकर- *एकदाच गाऊ दे* १९६१ – ठकार आणि कंपनी प्रकाशन मुंबई**

*एकदाच गाऊ दे* हे १९६१ साली लिहिलेले शशिकला आळंदकर याचे संगीत नाटक आहे. टी. बी. हा रोग झालेल्या श्रीराम पात्राच्या जीवनात घडणाऱ्या चढ-उताराचे दर्शन घडवते.

गाण्यावर निस्सीम प्रेम करणारा श्रीराम डॉक्टरांनी गाणे न गाण्याचा सल्ला दिला असूनही रोहिणीबरोबर आयुष्यातील शेवटचे दिवस गाण्यातील मनसोक्त आनंद लुटण्यासाठी खर्ची घालतो. डॉक्टरांचा खोटा दाखला दाखवून, पत्नीलाही फसवतो. पण या सर्वांचा उलगडा होईपर्यंत तो मृत्युच्या दारात उभा असतो. असे नाटकाचे कथानक आहे.

असे हे स्त्रीपुरुष पात्रांचे नाटक आहे. नाटकातील संघर्ष, उत्सुकता अखेरपर्यंत ठेवणे, व्यक्तिरेखांचा ठसठशीतपणा या सगळया दृष्टीने हे नाटक सरस आहे. थोडक्यात या

नाटकाच्या आशयाचा योग्य अर्थ सांगताना तारा भवाळकर लिहितात की, "एखाद्या कलावंतांच्या जगण्याची सार्थकता त्याच्या कलेच्या संगतीतच असते"[८]

**४) आशा परचुरे- *समर्पण* १९६१ गं. पा. परचुरे प्रकाशन, मुंबई.**

पुरुषविरहित असे सामाजिक नाटक *समर्पण* १९६७ साली आशा परचुरे यांनी लिहिले. एखाद्या स्त्रीच्या जीवनात दुसरी स्त्री आली की तिच्या संसारात कसा गदारोळ माजतो याचे चित्रण त्यांनी गीता, नानासाहेब, डॉ. मिनल' अशा प्रातिनिधिक पात्रांद्वारे केले आहे.

या नाटकाद्वारे हिंदू स्त्रीची विवाहासंबंधीची कल्पना, त्याचप्रमाणे स्त्रीने स्त्रीच्या भावना समजून घेतल्या तर खूप प्रश्न सुटतील हा विचार मांडला आहे.

डॉ. मधुरा कोरान्ने म्हणतात की, "विवाहित पुरुषावर प्रेम करताना आपण दुसऱ्या एका स्त्रीच्या आयुष्याचा विध्वंस करीत आहोत ही जाणीव स्त्रीला होणे महत्वाचे आहे. ही जाणीव झाली तर परस्त्रीच्या आकर्षणामुळे उत्पन्न होणारी घटस्फोटाची समस्या निर्माण होण्याची शक्यता काही अशी कमी होईल."[९] हा विचार नाटकाच्या आशयाला पूरक आहे. नाटकाचे शीर्षक समर्पक असे आहे.

**५) कुमुदिनी रांगणेकर – *दारीच्या चिमण्या उडुनी जातो* - गं. पा. परचुरे प्रकाशन मुंबई.**

*दारीच्या चिमण्या उडुनी जाती* हे सामाजिक नाटक घेऊन १९६१ ला कुमुदिनी रांगणेकर पुन्हा आपल्या भेटीस येतात. तत्पूर्वी *आंधळी कोशिंबीर, बच्चू लछमन* ही त्यांची नाटके प्रकाशित झाली.

महिलामंडळासाठी लिहिले हे पुरूषपात्र विरहीत नाटक आहे. सावत्र आईच्या जाचाला कंटाळून आत्महत्येचा प्रयत्न करणारी उषा व त्यागभावनेची त्रिवेणी तिचा सांभाळ करून तिचे लग्न लावून देते. उषाच्या सुखासाठी ति दरमहा १५० हुंडाही देते.

या नाटकातूनही स्त्री त्यागाची भावना समोर आलीय. आशा परचुरे प्रमाणे पुन्हा एकदा तोच आशय वेगळ्या रीतीने मांडण्याचा प्रयत्न कुमुदिनी रांगणेकर यांनी केला आहे.

**६) मालती दांडेकर – *सोनेरी नदीचा राजा* १९६४ जोशी ब्रदर्स बुकसेलर्स**

१९६० नंतरच्या काळात मालतीबाई दांडेकर यांची *सोनेरी नदीचा राजा, जावई, संगीत संस्कार* ही तीन नाटके १९६४ साली प्रकाशित झाली. त्याचप्रमाणे १९८२ ला *मावशी द ग्रेट* हे विनोदी नाटकही प्रकाशित झाले.

मालतीबाईंच्या नाटकातील विषय हे समाजाच्या विकासाला हातभार लावणारे आहेत.

उदा. *संस्कार* या नाटकातून 'जन्मावर कोणाची उच्चनीचता अवलंबून नसून टी गुणवत्तेवर व व्यक्तिमत्वावर अवलंबून असते."[१०] "उत्तम संस्काराची जोड असेल तर गुणांचा मनोहर विकास होतो"[११] असा संदेश देते. त्याचप्रमाणे त्यांची इतर नाटकेही स्त्रीसमस्यांचे दर्शन घडवतात. त्यामुळे स्त्रीसमस्या प्रधान नाटके लिहिणाऱ्या नाटककारांमध्ये मालतीबाईंचे नाव उल्लेखनीय आहे.

**७) सरिता पदकी**

१९५६ साली सरिता पदकीचे *बाध* हे नाटक उमलत्या वयात फसलेल्या तरुणीची कथा आहे. तर १९६० नंतर त्यांनी *खून पाहावा करून* (१९६४), *पांथस्थ* (१९६५), *एक प्रेम झेलू बाई , सीता* (१९७९) हे अनुवादित नाटक व इतर नाटके प्रकाशित केली आहेत.

ऑर्थर वॅटकिन यांच्या नाटकाचे रुपांतर *खून पाहावा करून* यातून समोर येते. परीकथा रहस्यकथांवर आधारित हे नाटक आहे. तसेच, स्नेहलता रेड्डी यांचे मुळ तेलगु नाटक *सीता* याचा अनुवाद सरिता पदकींनी मराठीत केलेला आहे. रामायणाच्या कोणत्याही व्यक्तीवर आक्षेप न घेता सीतेवर झालेला अन्याय आणि अग्निदिव्यासाठी तिचा झालेला पराभव या नाटकातून मांडलेला आहे. रामायण अनेक अंगांनी बघण्याचा हेतू या नाटकाद्वारे उमगतो.

**८) मालतीबाई बेडेकर**

*पारध* व १९५८ साली *अलौकिक संसार* हे मालतीबाई बेडेकर यांचे नाटक प्रकाशित झाल्यानंतर त्यांनी *कलियुग ग बाई कलियुग* (१९६६) व *हिरा जो भंगला नाही* (१९६८) ही दोन नाटकेही प्रकाशित केली.

*कलियुग ग बाई कलियुग* या नाटकातून दोन पिढ्यांमधील होणारे बदल व दोन पिढीतील मतमतांतरे किंवा एकूणच मानसिकता या नाटकाद्वारे बेडेकर राजकीय विषयांवर बोलतात, या संदर्भात मधुरा कोरान्ने लिहितात की, "नाटकामधून एका स्त्रीने अशा पद्धतीने राजकीय भाष्य करणे ही गोष्ट आत्तापर्यंतच्या नाटकांमधून दिसत नाही. त्यादृष्टीने 'मालतीबाई बेडेकरांचे वेगळेपण जाणवते."[१२]

**९) लीला फणसकर**

*भावना* (१९६९), *रात्र संपली पण उजाडलं कुठं* यातून कौटुंबिक द्वंद्व समोर येतो. त्यातूनही एकत्र कसे रहावे असा संदेशही मिळतो. आणि *सती चांगुणा हाक फोडी* या नाटकातून अपत्य नसलेल्या दाम्पत्याचा भावनिक कोंडमारा समोर येतो. समाजाकडून होणारी मानसिक हानी आणि म्हणून दत्तक घेतलेले बाळ शिवलीलामृतातील दाखला देत

नाटकाचा समारोप होतो.

## १०) शिरीष पै

शिरीष पै यांनी *सोन्याची खाण* (१९६७) हे अनुवादित नाटक लिहिले. *खेळसावल्यांचा* (१९६८), *कळी एकदा फुलली होती*(१९७३), *झपाटलेली* ही स्वतंत्र नाटके त्यांनी प्रकाशित केली आहेत.

*कळी एकदा फुलली होती* या नाटकातून एका मुलीची व्यथा त्यांनी मांडली आहे. विभक्त आई-वडील, ताणतणाव, प्रेमाची आस आणि विमान अपघातातील तिचा दुर्दैवी मृत्यू हि सत्यघटना लेखिकेने नाटकातून अत्यंत संवेदनशिलतेने मांडली आहे. *झपाटलेली* या नाटकातून गूढ पिशाच रहस्य अंधश्रद्धा अशा आशयाचे हे नाटक एक वेगळाच प्रयोग साहित्यात दिसून येतो.

## ११) ज्योत्स्ना देवधर

१९६८ साली *कल्याणी* आणि १९८९ साली *निर्णय* ही दोन नाटके ज्योत्स्ना देवधर यांनी प्रकाशित केली आहेत.

*कल्याणी* या नाटकातून एकत्र कुटुंबातील विधवा, परित्यकता स्त्रियांमधील अतृप्त वासनांमुळे कोणतेही दाम्पत्य सुखी जीवन जगणार नाही, अशा शापामुळे कल्याणी नावाच्या गरीब घरच्या मुलीला सून म्हणून आल्यानंतर वैवाहिक संबंध कसे दुरावतात, त्यातून ती कसा मार्ग काढते याचे चित्रण लेखिकेने केले आहे.

तसेच *निर्णय* या नाटकातून स्त्रीमनाच्या अंतरांगातील अनेक खोल धागेदोरे अधोरेखित केले आहे. स्त्री-पुरुष भावना शारीरिक भूक, समाज अपत्यप्राप्ती, प्रश्न आणि एकूणच स्व निर्णय असा कथानक भाग पुढे सरकत जातो.

## १२) सुधा देशपांडे

भागवतात व महाभारतात जसे स्वर्गाचे स्वप्नरंजन वर्णन येते. त्याच स्वप्नरंजनावर आधारित असे *देवाघरची वाट* हे नाटक सुधा देशपांडे यांनी १९६९ मध्ये लिहिले. विज्ञानाचा आधार घेऊन त्याचे तर्क लावून हे नाटक कल्पकतेने लिहिले आहे. या नाटकातून लेखिकेची सूक्ष्म निरीक्षण करण्याची दृष्टी वाचकांच्या नजरेस येते. *हृदयपालट* हे ही १९६९ मध्येच त्यांनी सामाजिक विषयाचे नाटक लिहिले.

## १३) कविता नरवणे

कविता नरवणे यांची *नेपोलियन* (१९७७) आणि *फक्त तीन महिने* (१९७३) ही नाटके उल्लेखनीय आहेत.

नेपोलियनच्या जीवनातील नाट्यानं भारावून लेखिकेने त्याच्या जीवनावरील *नेपोलियन* हे नाटक लिहिले. या नाटकामधून नेपोलियनच्या जीवनचरित्राची माहिती मिळते.

*फक्त तीन महिने* हे एक सामाजिक नाटक आहे. एखाद्या जवळच्या व्यक्तीचा मृत्यू होणार या कल्पनेने होणारी मानवी अवस्था लेखिकेने या नाटकातून रंगवली आहे. कविता नरवणेची दोन्ही नाटके वेगळा विषय मांडतात. *कुत्र्याचे शेपूट* हे त्याचे अप्रकाशित नाटक.

## १४) आरती हवालदार

*यमी* नावाच्या एका स्पॅनिश नाटकाच्या इंग्रजी भाषांतरावरून रुपांतरीत केलेले *चांगुणा* हे नाटक १९७५ मध्ये आरती हवालदार (मानसी काणेकर) यांनी मराठी साहित्यात प्रसिद्ध केले. पती-पत्नीच्या अतिशय नाजूक मर्मबंधातली प्रेमभावना कशी खुनापर्यंत पोहोचते याचे परिणाम सांगणारे नाटक आहे. नवऱ्याचे शारीरिक प्रेम न मिळणे, त्यातून अपत्य प्राप्ती न होणे, वांझपणाचे ओझे नकळत डोक्यावर घेणे त्यातून सूड भावना जागृत होणे आणि नायिकेच्या हातून खून होणे असे कथानक या नाटकातून पुढे सरकते. नकारात्मकता असूनही त्यात बोध असल्याने हे नाटक रंगभूमीवरही अधिकाधिक प्रयोगाकडे झुकलेले आहे.

## १५) सई परांजपे

महत्वाच्या नाटककारांमध्ये सई परांजपे यांचेही नाव येते. नाट्यलेखनाबरोबरच निर्माती, दिग्दर्शन या गोष्टीही त्या करत असत. *जास्वंदी* (१९७६), *माझा खेळ मांडू दे* (१९८६), *नांदा सौख्य भरे, इडा पिडा टळो, सख्खे शेजारी, धीकुतान* इत्यादी नाटके त्यांनी लिहिली आहेत.

*जास्वंदी* या नाटकामध्ये अति श्रीमंतीच्या सोनेरी एअरकंडीशन पिंजऱ्यातील व्याकूळ पक्षिणीची व्यथा मांडली आहे. नाजूक विषयही लेखिकेने कोणताही आडपडदा न ठेवता स्पष्टपणे मांडल्यामुळे हे नाटक विशेष लोकप्रिय झाले आहे. गुजराती(जासवंती), सिंधी (पंजोर), हिंदी (पंजे) इ. भाषांतून या नाटकांचे प्रयोगही झाले.

*माझा खेळ मांडू दे* या नाटकातूनही स्त्रियांवरील अन्यायाची पातळी उघडी केलेली आहे. वसतिगृहातील तीन स्त्रियांभोवती हे कथानक फिरताना दिसते. पुरुषी वृत्तीवर टिका

करणारे हे नाटक असल्याचे लक्षात येते. एकूणच सई परांजपे यांची ही अतिशय लोकप्रिय नाटके होय.

## १६) ज्योती म्हापसेकर

ज्योती म्हापसेकर यांनी १९८३ साली *मुलगी झाली हो* हे सामाजिक विषय हाताळणारे मुक्तनाट्य लिहिले. पोवाडा, भारुड, गोंधळ, स्त्रियांची क्रीडागीते अशा वेगवेगळया गीतांचा, स्त्रीगीतांचा अविष्कार या नाटकातून होतो.

या नाटकाद्वारे लेखिकेने विविध चळवळीचे, स्त्रीमुक्ती आंदोलने, हुंडा, स्त्री अर्थार्जनाचा हक्क असे एकूण स्त्रीजीवनाशी निगडीत विषय हाताळले आहेत. स्त्रीच्या विकासासाठी स्त्रीला स्वत:पासून सुरुवात करावी लागेल असाही संदेश दिला आहे. मुलीच्या जन्मावेळी समाजाची असणारी मानसिकतेते परिवर्तन करण्यासाठी हे नाटक मदत करते.

## १७) मीना देशपांडे

वैज्ञानिक विषयाची जोड असणारे मीना देशपांडे यांचे *नलू सांगा कुणाची?* हे नाटक १९९९ मध्ये प्रकाशित झाले. विज्ञानातील ‘टेस्ट ट्यूब बेबी’ या संकल्पनेचा आधार घेऊन ‘नलू’ या नायिकेची होणारी घुसमट व नात्यातील संबंध लेखिकेने या नाटकाद्वारे रेखाटला आहे. एकूणच स्त्री नाटककारात एक नवीन विषयाची जोड मीना देशपांडे यांनी केली.

## १८) मेधा तेलंग

स्त्री-पुरुषांमधील मानसिक, शारीरिक भावनांचे दर्शन *मनोमयी* (२०००) या नाटकातून होते. लैंगिक संबंध, त्यामधील अतृप्तता व नंतर त्याचे होणारे परिणाम यात एकूणच स्त्रीवर असलेली जबाबदारी मेधा तेलंग यांनी परिणामकारक मांडली आहे. स्वैर जीवन, बंधन विरहित जीवन व बंधानातील जीवन या दोन घटकांतील शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

## १९) जयश्री घारपुरे

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या पत्नी यमुनाबाईच्या जीवन चरित्राच्या आधारे जयश्री घारपुरे यांनी *माई* हे नाटक २००० साली लिहिले. एका अर्थाने १९६० ते २००० या कालखंडातील हे शेवटचे नाटक.

सावरकरांची पत्नी म्हणून संसारात वावरत असताना त्याच्यासमोर आलेले संघर्षाचे जीवन, त्यांचे बालपणीचे जीवन असे विषय हाताळले आहेत. आदर्श स्त्रीचे दर्शन *माई* या नाटकाद्वारे लेखिकेने घडवले आहे. त्याचबरोबर तत्कालीन कुटुंबातील एकूणच वातावरण

अधिक ठाशीवपणे रेखाटले गेले आहे.

अशा अनेक लेखिकांनी १९६० ते २००० या दरम्यान अनेक नाटके लिहून प्रकाशित केली. पूर्वीच्या नाटकांच्या तुलनेने या कालखंडातील अनेक नाटकांचे प्रयोगही झाले. मुख्य म्हणजे पौराणिक, ऐतिहासिक विषयांवर होणारे लेखन १९६० नंतर हळूहळू कमी झाले. पण, सामाजिक विषयांच्या आशयात भरपूर बदल झालेत. कौटुंबिक, विनोदी, लैंगिक, वैज्ञानिक विषयही स्त्रिया उत्तमरीत्या हाताळताना दिसतात. उदा. टी.बी. रोगावर शशिकला आळंदकर *एकदाच गाऊ दे* नाटक लिहितात. *नलू सांगा कुणाची* या नाटकातून मीना देशपांडे 'टेस्ट ट्यूब बेबी' या संकल्पनेवर लिहितात. अशी अनेक उदाहरणे देता येतील. या कालखंडातील नाटकाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे या कालखंडात 'स्त्रीत्यागाची भावना' या विषयावर उत्तम लेखन केले गेले. एका स्त्रीनेच दुसऱ्या स्त्रीचे मन समजून घेतल्याने कसे प्रश्न सुटतील हेही सांगितले. एकूणच या कालखंडात जवळजवळ सगळेच विषय स्त्री-नाटककारांनी हाताळलेले दिसतात. पण एक मुद्दा इथे नमूद करावासा वाटतो. इथपर्यंतच्या अभ्यासात 'स्वातंत्र्य चळवळ' या महत्वपूर्ण विषयावर तसे लेखन झालेले दिसत नाही. तत्कालीन या मुख्य विषयावर स्त्री-नाटकार का लिहू शकल्या नाही? हा प्रश्न आवासून उभा राहतो.

### ड) १९६० ते २००० या कालखंडातील काही नाटके-

१) वसुंधरा पटवर्धन- *हिरकणी* – १९६१

२) प्रभा दाते- *दिवस सोनियाचा*-१९६१
- *प्रेम लाभे प्रेमळाला*-१९६१

३) माया अकोलकर – *नंदादीप तेवत राहा*- १९६३

४) सुशीला बापट – *श्रीमंत रघुनाथ पेशवे*- १९६६

५) सीमा साखरे- *महाराष्ट्राचा चेहरा*- १९६६

६) सुमती क्षेत्रमाडे- *मीच जाहले माझी मृगया*-१९६७

७) अरुंधती- *आपले अण्णा*-१९६८

८) सुहासिनी वाझकर – *रिती अशी प्रीतीची*-१९६९

९) सुहासिनी अभ्यंकर – *इथेची जन्मली कथा*- १९७०

१०) विमल लेले – *कथा हि मुग्धा शकुंतलेची* १९७३

- *असे हि प्रीत जगावेगळी* १९७४

११) ललिता बापट – *कैकेयी नाटक*- १९७६

रामविजय १९८४

१२) कुंदा पारसनीस – *पडदा*- १९७६

१३) सुलभा ठकार- *सं. इंद्रधनू*-१९८२

१४) रेखा बैजल – *आकाश ओढ*- १९८२

१५) उषा कुलकर्णी – *कसोटीचा क्षण*- १९८५

१६) वसुधा पाटील- *महाभारत* -१९८७

१७) माई पुंडलिक कुंभार- *कानीचे वारसे*-१९९०

### इ) २००० ते २०१० या कालखंडातील स्त्रीलिखित नाटक

१८५० ते २००० पर्यंतच्या नाटकांचा अभ्यास करताना वेगवेगळे निष्कर्ष समोर आले. स्त्री-नाटककारात व नाटकात होणारे परिवर्तनही अनुभवता आले. त्याचप्रमाणे २००० ते २०१० या दहा वर्षांच्या कालखंडात स्त्री-नाटककारांनी केलेली कामगिरी जाणून घेणे महत्वाचे ठरते.

या कालखंडातील स्त्री-नाटककार व नाटके यांचा परिचय करून देण्याअगोदर तत्कालीन नाटकाची पार्श्वभूमी थोडक्यात नमूद करते. २००१ ते २०१० या कालखंडातील स्त्री-नाटककारांनी नाटकांपेक्षा एकांकिका लिहिण्याकडे जास्त लक्ष केंद्रित केले. एकपात्री लेखन करण्याकडे स्त्रियांचा जास्त कल का होता? याचे कारण सांगताना डॉ. प्रतिमा इंगोले लिहितात की, "स्त्रियांनी एकपात्रीसारखे कलाप्रकार जास्त अवलंबिले याला नाटकाची प्रयोगक्षमता हे कारण असावे."[१३] त्यांनी नोंदवलेले हे कारण बहुतांशी बरोबर असल्याचे लक्षात येते.

या काळात काही प्रमुख स्त्री नाटककारांनी नाट्यलेखन केले असले तरी ती नाटके उत्कृष्ट दर्जाची, विषयात नाविन्यता असलेली, धारदार संवाद अशा गुणांनी युक्त होती.पण असे असले तरी तेवढे आर्थिक सहाय्य नसल्यामुळे स्त्रियांनी आपल्या चौकटीत राहून नाट्यलेखन केल्याचे जाणवते. काही महत्वाची नाटके व स्त्री-नाटकार.

### १) वसुधा पाटील

१९८७ मध्ये *महाभारत* हे नाटक वसुधा पाटील यांनी लिहिले व नंतर दीर्घ

कालावधीनंतर त्यांनी *पक्षितीर्थ* (२००३), *दीपगृह आणि समुद्रपक्षी* या दोन एकांकिका लिहून नाट्यलेखानांचा प्रवास पुन्हा सुरु केला. या दोन नाटकांनंतर त्यांनी *इनामदार घर अंधाराचं घर प्रकाशाचं, एकटा, स्त्री शतकांची, रक्त आणि गोचीड, अनाथ, उत्खनन, सूड मेरी गो राउंड, सरहद्द* अशा अनेक एकांकिका लिहिल्या.

देवाच्या नावावर होणारा अंधश्रद्धेचा बाजार, स्त्रीलंपटपणा, व्यसन, पुरुषाचे मन, शोषण करणारे पुरुष, अनाथ मुलं व इतर निरनिराळे विषय त्यांनी आपल्या नाटकातून मांडले.

नाटक लिहिण्यापेक्षा एकांकिका लिहिण्यात त्यांना जास्त रस असावा असे वाटते. त्यांच्या एकूणच एकांकिका विषयी बोलताना डॉ.प्रतिमा इंगोले म्हणतात की, “माणसाच्या रोजच्या जीवनातील नाट्य ताकदीने टिपणारी ही सर्व कथानके वैविध्यपूर्ण आहेतच, पण एकांकिकांचे परस्परांतील नातेसंबंध व प्रत्येक स्वभावधर्मानुसार होणारा त्यांचा विकास आणि त्यातूनच शेवटाकडे जाणारा त्यांचा अपरिहार्य प्रवास हे या लेखनाचे वैशिष्ट्य आहे. एकांकिकांचे नेपथ्य हे वैविध्यपूर्ण आहे.” [१४]

### २) प्रज्ञा दया पवार

प्रज्ञा दया पवार यांनी २००७ साली *धादांत खैरलांजी* हे नाटक लिहिले. एखाद्या चळवळीचा ज्वलंत विषय प्रथमच प्रज्ञा दया पवार यांच्या नाटकातून समोर येतो. दलितांवर व दलित महिलांवर होणारा अत्याचार याचा विरोध करणाऱ्या आंदोलनावर चळवळीवर हे नाटक लिहिले. एखाद्या चळवळीचा ज्वलंत विषय प्रथमच प्रज्ञा दया पवार यांच्या नाटकातून समोर येतो. दलितांवर व दलित महिलांवर होणारा अत्याचार याचा विरोध करणाऱ्या आंदोलनावर चळवळीवर हे नाटक लिहिले गेले. पुरुषप्रधान सत्तेखाली भरडली जाणारी स्त्री, तिच्यावर केले जाणारे मानसिक व शारीरिक अत्याचार, बलात्कार, निघृण हत्या अशा विषयांवर बोट ठेवले आहे. आपल्या हक्कासाठी लढणारी दलित स्त्री याचेही उत्कृष्ट चित्रण प्रज्ञा दया पवार यांनी केले आहे. एकूणच या नाटका संदर्भात असा तर्क काढला जातो, “१९९० च्या जागतिकीकरणानंतर गावपातळीवरील व शहर पातळीवरील जात वास्तव अधिक तीव्र झालेले आढळून येते, याचेही प्रत्यंतर या नाटकात येते.” [१५]

### ३) मनस्विनी लता रविंद्र

मनस्विनी लता रविंद्र यांचे २००७ साली *सिगारेटस, अलविदा* हे पुस्तक प्रकाशित

झाले. यात दोन नाटके आहेत.

*सिगारेटस* या नाटकात चार मित्रांची कथा सांगितली आहे. आधुनिक काळात वावरणारी तरुण पिढी व तिचे विचार लेखिकेने प्रखरपणे मांडले आहेत, स्त्री-पुरुषामधील भावनिक, लैंगिक संबंध असा विषय या नाटकातून मांडला आहे.

*अलविदा* या नाटकातून आई-वडील वेगळे झाले कि, त्यामुळे मुलांची होणारी फरफट त्यांनी येथे चित्रित केली आहे. एकूणच त्यांनी आपल्या नाटकातून सामाज वास्तवाचे अगदी सूक्ष्म रेखाटन केले आहे. या नाटकांच्या गौरवार्य डॉ. प्रतिमा इंगोले लिहितात, "सध्याचे जे समाजवास्तव आहे, ते लेखिकेने हळुवारपणे हाताळले आहे. नाटक हे तसे तांत्रिक माध्यम असूनही लेखिकेने ते समर्थपणे पेलले आहे."[१६]

**४) रसिका जोशी**

अभिनेत्री म्हणून प्रख्यात असलेल्या रसिका जोशी यांनी *व्हाईट लिली* आणि *नाईट रायडर* हे नाटक लिहिले. जागतिकीकरण, स्त्री-पुरुष नातेसंबंध, लैंगिक, वास्तव जीवन, आधुनिक युगात वाढलेला इंटरनेटचा प्रभाव या विषयांचे लेखन त्यांनी या नाटकाद्वारे केले आहे. या नाटकाचे प्रायोगिक रंगभूमीवर व व्यावसायिक रंगभूमीवरही प्रयोग झाले आहेत.

**५) प्रतिभा कुलकर्णी**

प्रतिभा कुलकर्णी यांचे २००२ साली *कलमी गुलाब* व २००६ साली *मृगजळाच्या मागे* ही दोन नाटके लिहिली. तसेच, ज्योत्स्ना देवधर यांच्या कथेला नाट्यरूप दिले. २००३ साली त्यांनी *बेघर* हे नाटक लिहिले तर *पाच कालदर्शिका व इतर नाटिका* या पुस्तकात एकपात्री व नाटिका प्रकाशित केल्या. तसेच, त्यांनी *सासूबाई तुम्ही सुद्धा* ही एकांकिका २०१० साली लिहिली.

त्यांनी या नाटकाद्वारे कौटुंबिक विषय मांडले आहे. उदा. विवाहानंतर संसारीकांना संसारात जाणवणारा ताण व एकूणच त्यांच्या संसाराची जडणघडण त्यांनी अधोरेखित केली आहे.

**६) सुनंदा साठे**

भारतीय रंगभूमीच्या जाणकार व विदर्भातील नामवंत स्त्री नाटककार सुनंदा साठे यांनी *मला जगायचय आहे* (२००५), *मातीला सुगंध फुलांचा* (२००५) *आम्ही तिघी* (२०१०) अशी नाटके व एकांकिका लिहिल्या.

सामाजिक, कौटुंबिक विषयांवर त्यांनी लेखन केले. समाजात माजलेले षडरीपू यामुळे

होणारी शोकांतिका व इतर वास्तव जीवनातील प्रश्न त्यांनी मांडले आहेत. *तेल गेले, तूप गेले* या एकांकिकेतून आपल्या लेखनातील विनोदी छटाही त्यांनी दाखवली आहे.

**७) सुनिता कावळे**

*कमलाताई होस्पेट* हे नाटक २००९ मध्ये त्यांनी प्रकाशित केले. या नाटकाद्वारे त्यांनी कमलाबाई होस्पेट यांचे चरित्र प्रकाशात आणले. समाजसेविका असलेल्या कमलाताई यांनी १९२० ला कॉंग्रेस अधिवेशनात स्वयंसेविका म्हणून काम करताना केलेली सामाजिक सेवा व त्यांनी स्थापन केलेला 'मातृसेवा संघ' हे त्यांचे कार्य अमुल्य असे आहे. म्हणूनच त्यांचे जीवन कार्य रेखाटणारे हे नाटक सुनिता कावळे यांनी लिहिले.

**८) मंगला बक्षी**

मंगला बक्षींनी आधुनिक काळात फोफावत चाललेली मॉल सेल संस्कृतीच्या विविध ऑफर्स व त्याला बळी पडणारे ग्राहक व मुख्य म्हणजे स्त्रिया या सगळया प्रकारांचे प्रत्ययकारी दर्शन *ऊनसावली* (२०१०) या नाटकाद्वारे घडवले आहे.

**९) माला केकतपुरे**

२००४ साली दोन दर्जेदार नाटके घेऊन माला केकतपुरे वाचक व रसिक वर्गाच्या भेटीस येतात. *फिनिक्स* व *पुन्हा वसंत फुलला* ही त्यांची दोन नाटके.

तनया नावाची नायिका आपला सुखी संस्कार करीत असताना तिची मुलगी थोडी मोठी झाल्यावर प्राध्यापकाची नोकरी करण्यास सुरुवात करते आणि त्यामुळे तिचे घराकडे दुर्लक्ष होते. यामुळे तिच्या मुलीवर बलात्कारासारखा प्रसंगही ओढवतो व एकूण त्यांची झालेली वाताहात येथे अधोरेखित केली आहे.

तसेच, *पुन्हा वसंत फुलेल* या नाटकातूनही नेहा नावाच्या समंजस, हुशार धीट, प्रामाणिक मुलीच्या आधारे पुन्हा स्त्री जीवनाचे दर्शन घडवले आहे. यातूनही स्त्रीवर होणारा 'बलात्कार' हा विषय पुन्हा मांडला आहे. समाज जरी सुधारला असला, स्त्री सुधारित झाली तरीपण या समाजात स्त्री अजूनही असुरक्षिततेच्या छायेत आहे. हा आशय इथे व्यक्त होतो.

**१०) प्रतिमा इंगोले**

*सिपनेचे स्वप्न* (२००६), *तारुण्याची बखर* (२०१०), वऱ्हाडी बोलीतले, *तुयासीचा वटा* (२००६) व *जलमाचा जोळा* (२००६) अशी नाटके व एकांकिका प्रतिमा इंगोले यांनी लिहिली. त्यांची ही नाटके दलित साहित्याचे प्रतीनिधीत्व करतात.

*सिपनेचे स्वप्न* या नाटकाचे शीर्षक समजावून सांगताना लेखिका लिहितात की, “विदर्भाची सार्वभौम लोकमाता म्हणजे पूर्णा नदी. पूर्णा म्हणजे पूर्णरूप, ब्रम्हजल, तर सिपना नदी मेळघाटाचे सुंदर स्वप्न.”[१७]

*तारुण्याची बखर* या नाटकातून समाजातील राजकारण, राजकारणी, दारू व या सर्वांच्या प्रभावामुळे अधोगतीच्या मार्गावर जाणारी तरुण पिढी याचे प्रत्ययकारी दर्शन घडविले आहे.

*तुयासीचा वटा* ही एकांकिका, *जलमाचा जोळा* व *तारुण्याची बखर* ही नाटके आकाशवाणीवर प्रसारित झाली. एकूणच ग्रामीण साहित्यातील समाज व भावजीवन त्यांनी टिपले आहे.

### ११) सुषमा देशपांडे

अभिनेत्री, पत्रकार, नाट्यलेखन व दिग्दर्शन अशा विविध क्षेत्रात काम करणाऱ्या सुषमा देशपांडे *व्हय! मी सावित्रीबाई बोलतेय* या सावित्रीबाई फुलेंच्या जीवनावरील नाट्यप्रयोगाने स्त्रीनाट्य लेखनात आपला वेगळा ठसा उमटविला व लोकप्रियता संपादन केली. तसेच, त्यांनी तमाशातील स्त्रीजीवनावर आधारित *तिच्या आईची गोष्ट अर्थात माझ्या आठवणींचा फड* हे नाटक १९९३ साली लिहिले. संशोधनपर असे स्त्री संतांवर आधारित त्यांनी *बयो दार उघड* हे नाटक लिहिले व ते प्रायोगिक दृष्ट्याही विशेष गाजले. अविष्कारनिर्मित यांनी मुंबई येथे हा पहिला प्रयोग केला, असे या नाटकाचे ७५ प्रयोग झाले.

आधुनिक स्त्रीला आत्मभान प्राप्त करून देण्यासाठी स्त्री चळवळीला नवी दिशा देण्यासाठी त्यांनी इतिहासातील स्त्री संताच्या कार्याचे दर्शन करून दिले आहे.

### १२) विनिता पिंपळखरे

दर्जेदार एकांकिका लेखनासाठी प्रसिद्ध असलेल्या विनिता पिंपळखरे यांनी वैविध्य विषयांवर अनेक एकांकिका लिहिल्या. त्यांच्या ५१ एकांकिकेचा पुण्यात महोत्सव झाला. १० महिलांसाठी व २४ प्रौढांसाठी अशी त्यांच्या एकांकिकेची विभागणी केली जाते. २००७ साली त्यांनी *सांजसावल्या'* ही एकांकिका उपलब्ध करून दिली.

निपुत्रिक वृद्ध जोडप्यांच्या संवेदनशील मनाचा उलगडा करणारे हे नाटक आहे. वत्सल व विनायक या निपुत्रिक पात्रांद्वारे वृद्धापकाळात त्यांनी सहन करावे लागणारे मानसिक दु:ख व आपल्या दु:खावर मात करण्यासाठी त्यांनी काढलेला तोडगा याचे चित्रण केले आहे.

प्रतिमा इंगोलेच्या मते “एकंदर हे नाट्य वृद्धापकाळ आणि निपुत्रीकात्व या समजातील महत्वाच्या समस्येवर प्रकाश टाकते व त्यावर चिंतन करायला भाग पाडते.” [१८]

**१३) आशा साठे**

*स्वयं, निजखूण* ही नाट्ये दीर्घांकाच्या रुपात आशा साठे रंगमंचावर घेऊन येतात. २००३ मध्ये प्रकाशित *स्वयं* या दीर्घांकाचे २५ प्रयोग झाले. स्वजीवनात उदभवणारे प्रश्न व उत्तरे यांचा वेध घेणारी ही नाट्ये आहेत. कर्तृत्ववान स्त्रियांच्या संघर्षावर येथे प्रकाश टाकला आहे. स्त्री नाट्यलेखनात स्त्रियांच्या अत्मचरित्रावर आधारित ‘ड्रॉक्युड्रामा’ लेखनाचा नवा प्रवास सुरु झाला.

**१४) रेखा वैजल**

कृत्रिम गर्भधारण करणारी रूपा व तिचे पती मोघे यांनी कृत्रिम गर्भधारण केल्यामुळे त्यांच्या मुलीला मतिमंदत्वाला वळी पडावं लागलं. आनुवंशिकतेमुळे त्यांच्यावर ओढवलेले संकट व नंतर रुप व मोघे यांच्यात झालेला संगर्ष त्याचे परिमाणकारक चित्रण *भिंत काचेची* या रेखा बैजल यांच्या नाटकाद्वारे समोर येते. हे नाटक आशय विषय दृष्ट्या वैविध्यपूर्ण आहे.  वैज्ञानिक विषयाची दखल या नाटकाद्वारे घेतली गेली आहे. या नाटकाचेही काही प्रयोग झाले.

**१५) शुभांगी भडभडे**

पुरुषपात्रविरहीत *कालंकिनी मी तुझ्यासाठी* ही एकांकिका शुभांगी भडभडे यांनी २००१ साली लिहिली. ही एकांकिका त्यांनी आपल्या *इदं न मम* या कादंबरीच्या आधारावर लिहिली आहे. किशोरवयात, कुमारीमाता झाल्यामुळे मुलीचा होणारा संघर्ष त्यांनी अधोरेखित केला आहे.

**१६) वसुधा पांडे**

*आधारवड, कर्तव्य* व *तडजोड* या तीन एकांकिकांच्या एकीकरणातून *बिल्बदल* हे पुस्तक २००२ साली वसुधा पांडेंनी लिहिले.

मुलीला आई-वडिलांची संपत्ती दिली तर तिनेच त्यांना आधार दिला पाहिजे. असे *आधारवड* मध्ये त्या सांगतात. *तडजोड* हे त्यांचे विनोदी नाटक आहे.

**१७) विजया ब्राम्हणकर**

स्त्री पुनर्विवाहाचा विषय आधुनिक काळात पुन्हा मांडण्याचा प्रयत्न विजया ब्राम्हणकर

यांनी *आधार शोधते मी'* या नाटकाद्वारे मांडला आहे. हे नाटक २००२ साली प्रकाशित झाले.

**१८) मृणालिनी चितळे**

मृणालिनी चितळे यांनी २००३ साली *आम्ही दोघी विहिणी तोडीच्या* हे विनोदी नाटक प्रकाशित केले.

एकूणच २००१ ते २००२ या कालखंडात स्त्री-नाटककारांनी नाटक क्षेत्रात भरीव कार्य केले. पण, नाटक लिहिण्यापेक्षा एकपात्री व एकांकिका लिहिण्याकडे त्यांचा जास्त कल होता. या कालखंडात नाटक, एकांकिकांचे प्रयोगही झालेले दिसून येतात. पण या दोघांच्या तुलनेने एकपात्री प्रयोग अधिक झाल्याचे दिसून येते. एकपात्री नाट्यकृतीमध्ये अनेक लेखिकांची नावे घेता येतात.

या कालखंडातील नाटकांचे विषयही पूर्वीच्या नाटकांपेक्षा पूर्णपणे वेगळे होते. या कालखंडात स्त्री-नाटककारांनी अंधश्रद्धा, व्यसनाधीनता तरुणाईची स्वतंत्र विचार करण्याची वृत्ती, स्त्रियांवर होणारे शारीरिक मानसिक अत्याचार उदा. बलात्कार जागतिकीकरण, गावपातळीवरील प्रश्न, दलित लोकांचे प्रश्न, स्त्री-पुरुष लैंगिकसंबंध , स्त्रीची मनोवृत्ती, आधुनिक जीवन, फ्लॅट, मॉल, सेल संस्कृती , नोकरदार स्त्री, निपुत्रिक जोडपं, वैज्ञानिक विषय अशा वैविध्यपूर्ण व वास्तव जीवनातील विषयाची दखल घेण्याचे कार्य २००१ ते २०१० या कालखंडातील स्त्री-नाटककारांनी केले. पूर्वीच्या स्त्री लिखित नाटकांपेक्षा या कालखंडातील स्त्री नाटकात विषयात व आशयात वैविध्यता जाणवते. तसेच, धारदार व प्रखर भाषा आणि प्रामाणिकपणा, सूक्ष्म निरीक्षण दृष्टी अशा विविध गुणांचे दर्शन होते. उपरोधक भाषा, विनोदी संवाद, नाट्यतंत्राचे ज्ञान या सर्वांमुळे या कालखंडातील स्त्री नाटकांनाही प्रतिसाद मिळालेला दिसून येतो.

थोडक्यात प्रारंभ ते २०१० पर्यंतच्या स्त्रीनाटकात आमुलाग्र बदल घडून आले. यातूनच स्त्री शिक्षण व स्त्रीविकासाची व विचारांची कक्षा रुंदावताना दिसते. एकूणच स्त्रीनाटककारांनीही मराठी साहित्य समृद्ध करण्यासाठी खारीचा वाटा उचलला आहे.

**समारोप**

'१९६० नंतरची स्त्रीलिखित मराठी नाटके' या विषयांचा अभ्यास करताना एकूणच स्त्रीलिखित मराठी नाटके या विषयावरही प्रकाश पडला. स्त्री नाटकांच्या या धावत्या अभ्यासात वेगवेगळ्या गोष्टी जाणवल्या.

एकूणच १८५० ते २०१० या कालखंडात स्त्री नाटककारांनी भरीव कार्य केले. अल्प काळातच स्वतःच्या अस्तित्वाला सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. मराठी लेखकांनी स्त्रियांचे नाटकाद्वारे केलेले मनोविश्लेषण व त्यापेक्षा स्वतः स्त्रियांनी केलेले स्त्रीचे मनोविश्लेषण हे साहजिकच उल्लेखनीय आहे. प्रारंभ काळात ऐतिहासिक, पौराणिक नाटके लिहिली गेली, आणि नंतर लेखिका सामाजिक विषयही उत्तमरीतीने हाताळताना दिसतात. काशीबाई फडके, सोनाबाई केरकर, हिराबाई पेडणेकर यांच्यापासून सुरु झालेली स्त्री नाटकांची परंपरा १९२१ नंतर अनेक नवनवीन स्त्री नाटककारांनी चालवली. उदा. गिरिजाबाई केळकर, मालतीबाई तेंडूलकर आनंदीबाई किर्लोस्कर अशा अनेक लेखिका चालवताना दिसतात.

पुराणातील व इतिहासातील घटनांवर नाटक लिहिण्याचे प्रमाण१९२० नंतर कमी झाले आणि 'स्त्रीशिक्षण व स्त्रीसमस्या' या विषयाला केंद्रस्थानी ठेवून भरपूर नाट्य लेखन केले गेल्याचे जाणवते. गिरिजाबाई पुरुषप्रधान संस्कृतीवर टीका करताना दिसतात, तत्कालीन समाजाचे चित्रण करणारी नाटके १९२० नंतरच्या काळात निर्माण होऊ लागली. आनंदीबाई, मालतीबाई, सुधा साठे यांनी 'घटस्फोट' कायद्याविषयी नाट्यलेखन केले. त्यात फ्रेंच भाषातून नाटक मराठीत आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य शकुंतला परांजपे यांनी केले. थोडक्यात या काळातील स्त्रिया लिखित झाल्या तरी काही अंशी त्या रूढी परंपरा घर-संसार या बंधनातून मुक्त झाल्या नाही, असे वारंवार जाणवते.

१९५०-६० या दशकात नाट्यलेखनात मन्वंतर घडून आले. ऐतिहासिक, पौराणिक विषयांच्या वर्तुळात फिरणारे स्त्रीलिखित नाटके नंतर सामाजिक विषयही मोठया हिरहिरीने मांडताना दिसतात. स्त्री नाटककारांनी जरी सामाजिक विषय हाताळला असला तरी 'स्त्रीच्या समस्या' हा विषयच नाटकाच्या केंद्रस्थानी होता. सौ. शांता निसळ यांच्यापासून मराठी स्त्रीनाटकात मनोविश्लेषणात्मक लेखन सुरु झाले. घटस्फोट, हुंडा, बालविधवा, पुनर्विवाह, स्त्रीशिक्षण हे स्त्रीनाटकांचे मुख्य विषय होते. त्यात क्वचित मालतीबाई दांडेकर *मावशी दि ग्रेट* सारखे विनोदी नाटक लिहितानाही दिसतात. प्रारंभ ते १९५० पर्यंतची स्त्रीलिखित नाटके ही पुरूषपात्र विरहित चाकोरीत होती. या चाकोरीतून मुक्ताबाई दीक्षित यांनी स्त्री नाटकांना बाहेर काढले. नंतर स्त्रीनाट्यलेखनात पुरुषपात्रांचाही समावेश झाला.

१९६० नंतर स्त्रियांच्या नाट्यविषयातही बदल झाले. पौराणिक ऐतिहासिक सामाजिक नाटकांचा प्रवास पुढे मनोविश्लेषणात्मक विज्ञानयुगातील नाटक फार्स नाटक, मुक्त नाट्य

इथपर्यंत झाला व त्यात लेखिकांनी यशही संपादन केले. अनुकरणातून झालेला हा प्रवास स्त्री-नाटककारांच्या स्वतंत्र विचारापर्यंत येऊन पोहचला.

१९६० ते २००० पर्यंतची नाटके ही विकासाकडे झुकताना दिसतात. पण, या कालखंडातही इतर विषयांबरोबर स्त्रीलाच केंद्रस्थानी ठेवून नाट्यलेखन झाले, पण २००० पासून स्त्रीनाट्यलेखनात आशय, विषय व प्रायोगिक दृष्ट्या अनपेक्षित बदल झाले. त्यामुळे या कालखंडातील स्त्री नाटकांचे प्रयोगही सादर होऊ लागले व त्याला भरघोस प्रतिसाद मिळाला. पण, या कालखंडात नाटके कमी असून एकपात्री नाट्यप्रयोग लिहिण्याचा प्रघात वाढलेला दिसतो. त्यामुळे या कालखंडातील नाटकांचा एकूणच अभ्यास करता असा प्रश्न पडतो कि नाटकांची जागा एकपात्री नाट्य व एकांकिकांनी घेतली आहे का? हे सर्व जरी असले तरी मात्र इतर वाङ्मय प्रकारांशी स्त्री नाट्यलेखनाची तुलना करता स्त्रीलिखित नाटके संख्येने अत्यंत कमी असल्याचे जाणवते. या संदर्भात डॉ. मधुरा कोरान्ने जोत्सनाबाई देवधर यांच्याबरोबर झालेल्या मुलाखतीतील संदर्भ देतात की, जोत्सनाबाईंच्या मते “या बाबतीत स्त्रियांना काही व्यावहारिक अडचणी आहेत. नाटक छापले जात नाही. प्रत्यक्ष प्रयोगाच्या संदर्भात नाटकाला जेवढा वेळ देणे आवश्यक असते तेवढा स्त्रीकडून दिला जात नाही, चर्चा केल्या जात नाहीत. त्यामुळे नाटक हे शेवटपर्यंत केले जाऊ शकत नाही. स्त्री नाटककारांच्या बाबतीत या मर्यादा पडतात. परंतु स्त्रिया चांगल्या रीतीने आपल्या समस्या मांडू शकतील असा विश्वास वाटतो!”[१९] एवढे असूनही स्त्री-नाटककारांनी नाटक लिखित स्वरुपात आणि रंगभूमीवरही लोकप्रियता मिळवून दिली.या विषयी डॉ. प्रतिमा इंगोले लिहितात की, “नाटक हे दृकश्राव्य व लोकप्रिय माध्यम आहे तो सशक्त अभिव्यक्तीचा प्रकार असूनही या कार्यकाळातील लेखिकांनी ताकदीने हे शिवधनुष्य पेलले आहे.”[२०]

थोडक्यात मराठी स्त्रीलिखित नाटके ही स्त्रीच्या एकूणच वाङ्मयीन क्षेत्रातील  व एकूणच मराठी साहित्यातील उल्लेखनीय कामगिरी आहे.

**निष्कर्ष**

१) १८०० ते १९२० या स्त्री नाटकांच्या प्रारंभ काळात ऐतिहासिक पौराणिक नाटके जास्त प्रमाणात स्त्री नाटककारांनी लिहिली.

२) १९२० नंतर सामाजिक विषय हाताळण्याकडे स्त्री-नाटकारांनी मजल मारली व त्या बरोबर शकुंतला परांजपे यांनी इतर भाषांतील नाटकांचा अनुवाद मराठीत करण्याचा नवा प्रघात पाडला.

३) स्त्री नाटककारांनी ‘स्त्री’ ला केंद्रस्थानी ठेऊन लेखन केले.

४) १८०० ते २००० पर्यंत स्त्री नाटककारांच्या नाटकांचे खूपच कमी प्रयोग झाले. मात्र २००० नंतर प्रायोगिक दृष्ट्या स्त्री नाटके प्रगतीच्या दिशेने झुकली.

५) स्त्री नाट्यलेखनाच्या प्रारंभ काळात लिहिली गेलेली संगीत व पुरुषविरहीत नाटके १९५० नंतर हळूहळू मागे पडताना दिसतात.

६) *मुक्ताबाई दीक्षित यांच्या जुगार* या नाटकापासून स्त्री कलाकारांना रंगभूमीवर स्थान प्राप्त झाले.

७) २००० नंतर नाटकापेक्षा एकांकिका व एकपात्री नाटके लिहिण्याकडे स्त्री नाटककारांचा कल वाढला.

८) प्रारंभ ते २००० पर्यंतच्या नाटकांच्या तुलनेने २००० नंतरची नाटके व एकांकिका लेखनातील भाषेत, आशय, विषयात अमुलाग्र बदल झाले.

९) वास्तव जीवनाचे निर्भीड प्रामाणिक व उपरोधक चित्र २००० नंतरच्या नाट्य अभ्यासांती समोर येते.

१०) एकूणच स्त्रीनाटककारांनी बहुतांश विषयाला स्पर्श केल्याचा जाणवते. पण, स्वातंत्र्यकाळातील चळवळीचे पडसाद स्त्री नाटकात दिसत नाहीत. दलित चळवळींचे पडसाद काही प्रमाणात येतात.

**संदर्भ ग्रंथसूची**


१) स्त्री साहित्याचा मागोवा खंड १ (इ.स. १८५० ते १९५०), तारा भवाळकर, पृष्ठ क्र. १८१

२) तत्रैव, तारा भवाळकर, पृष्ठ क्र. १८२

३) तत्रैव, तारा भवाळकर, पृष्ठ क्र. १८२

४) तत्रैव, तारा भवाळकर, पृष्ठ क्र. १८९

५) स्त्री साहित्याचा मागोवा खंड ४, डॉ. प्रतिमा इंगोले,पृष्ठ क्र. २१९

६) तत्रैव, प्रतिमा इंगोले, पृष्ठ क्र. १८९

७) स्त्री साहित्याचा मागोवा खंड १, तारा भवाळकर,पृष्ठ क्र. ३५५

८) तत्रैव, तारा भवाळकर, पृष्ठ क्र. ३५२

९) कोरान्ने मधुरा, स्त्री-नाटककारांची नाटके,स्नेहवर्धन प्रकशन,पुणे (१८५० ते २००२), पृ. ६७

१०) स्त्री साहित्याचा मागोवा खंड २, तारा भवाळकर, पृ. ३४७

११) तत्रैव , पृ. ३४७

१२)  कोरान्ने मधुरा, स्त्री नाटककारांची नाटके (१८५० ते २००२), पृ. ५९
१३)  स्त्री साहित्याचा मागोवा खंड ४, डॉ. प्रतिमा इंगोले,पृष्ठ क्र. २१९
१४)  तत्रैव, प्रतिमा इंगोले, पृष्ठ क्र. २२०
१५)  तत्रैव, प्रतिमा इंगोले, पृष्ठ क्र. २२२
१६)  तत्रैव, प्रतिमा इंगोले, पृष्ठ क्र.
१७)  तत्रैव, प्रतिमा इंगोले, पृष्ठ क्र. २२२
१८)  तत्रैव, प्रतिमा इंगोले, पृष्ठ क्र. २२४
१९)  कोरान्ने मधुरा, स्त्री नाटककारांची नाटके (१८५० ते २००२), पृ. ९४
२०)  स्त्री साहित्याचा मागोवा खंड ४, डॉ. प्रतिमा इंगोले,पृष्ठ क्र. २२९.

# प्रकरण पाचवे- मराठी स्त्रीलिखित नियतकालिके

## अ) १८५० ते १९२० या कालखंडातील स्त्रीलिखित नियतकालिके

मराठी नियतकालिकांचा प्रवास १८३२ पासून बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरु केलेल्या *दर्पण* या नियतकालिकापासून सुरु झाला. विशिष्ट उद्दिष्टे समोर ठेऊन स्वातंत्र्यपूर्व कालखंडात नियतकालिकांची निर्मिती होत गेली. १८५० ते १९५० या कालखंडात स्त्रियांनी आपले लेखन प्रबोधन अधिकाधिक समाजापर्यंत, स्त्रियांपर्यंत पोहचविण्याकरता नियतकालिकांचा आधार घेतलेला आहे. नियतकालिकांमधून लेखन करून स्त्रियांनी समाज प्रबोधनाचे मोलाचे कार्य केले आहे. स्त्रियांनी नियतकालिकांतून ललित लेख, स्फुट लेखन, संशोधन लेखन, मुलाखती, वैचारिक लेखन, समीक्षा लेखन अशा अनेक विविध स्वरूपाचे लेखन केलेले आहे.

भारतात ब्रिटीश राजवट स्थिर झाल्यानंतर सांस्कृतिक जीवनावर भाष्य करणारे इतिहासकार निर्माण झाले. त्यांनी भारतातील धर्म, अध्यात्म, साहित्य, कला, विज्ञान, कायदे या आधारे कधी भारतीयांना गौण मानले तर कधी गौरविले आहे. मात्र नियतकालिकांमधून सातत्याने समाजमनाचे परिवर्तन घडत गेले आहे. म्हणूनच त्या त्या काळातील समाजजीवनाचे आणि सांस्कृतिक परिस्थितीचे प्रतिबिंब नियतकालिकांतून समोर येते. समाजाकडून नियतकालिकांकडे आणि नियतकालिकांकडून पुन्हा समाजाकडे असा प्रवास लेखनाचा होत असतानाच आपसुकच समाज प्रबोधन होत आहे.

तत्कालीन सामाजिक घडामोडी, वैचारिक परिवर्तने, स्त्रियांसाठी होणारे नवे कायदे, शिक्षणामुळे त्यांच्यात झालेले परिवर्तन स्त्रियांच्या लेखनात येऊ लागले. त्यांची मानसिकता अधिक उंचावत जाऊन नव्याने मिळू लागलेल्या शिक्षणामुळे स्त्रीला स्वतःविषयी, स्वतःच्या जीवनाविषयी स्वतंत्र जाणीव होत गेली. प्रारंभी स्त्रिया नियतकालिकांमध्ये लेखन करण्यास बिचकत असत. त्यामुळे लेखन कमी असल्याचे समजते. मात्र वैचारिक देवाण – घेवाण करता स्त्रियांमध्ये झपाट्याने बदल होत गेले. आत्मविश्वासाने आणि अगदी वास्तवाला हात घालत स्त्रिया लिहित राहिल्या. जबाबदारीच्या जाणिवेतून लेखनात ठामपणा दिसू लागल्याने आणि कठीण विषयावरही अगदी सहज भाष्य करून इतर स्त्रियांना लिहिते करून हळूहळू स्त्रिया संपादन कक्षाकडे झेप घेऊ लागल्या. एकाच परिघात आपला खेळ मांडून तेच – तेच आयुष्य जगण्याकडे स्त्रियांनी आपसुकच पाठ फिरवली. स्व जाणीव, स्व कर्तुत्वाची

ढाल दाखवत स्त्रिया अतुलनीय कामगिरी बजावू लागल्या.

काळाच्या ओघात नियतकालिकांमधील विषय, आशय, गुणवत्ता यात परिवर्तन होत गेले. जशी परिस्थिती उद्भवली तसे लेखन अधिकाधिक सखोल, विस्तृत होत गेले. आणि त्यातूनच नियतकालिकांचे विविध टप्प्यात विभाजन होत गेले. उदाहरण वाङ्मयीन नियतकालिके, सामाजिक नियतकालिके, शैक्षणिक नियतकालिके, बालकुमार नियतकालिके या आणि या सारख्या प्रकारात विभाजन झाल्यामुळे अधिकाधिक सुशिक्षित वर्ग लेखनाकडे वळलेला दिसतो. हळूहळू स्त्रियांनी स्त्रियांसाठी प्रसिद्ध केलेल्या नियतकालिकांची संख्या वाढत जाऊन लैंगिक विषयांवर भाष्य करणारे शास्त्रीय माहिती देणारे नियतकालिक संपादन करून नियतकालिकांचा एक टप्पा झपाट्याने निर्माण होत गेला. नियतकालिकांच्या संपादन प्रक्रियेत *महिला* – माई वरेरकर (१९३१), *वाग्विलास* – कुमुदिनी खेर (१९३५) या नियतकालिकांमधून केवळ स्त्रीलिखित साहित्याचा ठसा उमटविलेला आहे. स्त्रियांच्या लेखनाच्या दृष्टीने कार्य करणारी अजूनही काही महत्त्वाच्या नियतकालिकांची कालानुक्रमे कार्य, उद्दिष्टे बदलत गेली. काही नियतकालिके समकालीन असल्याने समान ध्येये ही यातून दिसून येतात.

ऑगस्ट १८५५ ते मे १८५७ मध्ये स्टुडंट्स लिटररी ॲन्ड सायंटिफिक सोसायटीच्या वतीने *सुमित्र* या नियतकालिकाचे लेखन सातत्याने मराठी मुलींसाठी कार्यरत राहिले. *सुमित्र* चे संपादक रामचंद्र गोपाळ चिटणीस होते. त्यांनी स्त्रियांना उपयुक्त असा आशय विविध पद्धतींनी प्रकाशित केला. मात्र या नियतकालिकेत स्त्री लेखन नाही कारण स्त्रीशिक्षणाचा प्रारंभ या काळात नुकताच झाला होता. मात्र या नियतकालिकेचा उपयोग किंवा ध्येय हे स्त्री उन्नती असे असल्याने स्त्रियांना ते आपलेसे वाटत होते.

रावजी नारायण आठवले यांनीही स्त्रियांकरिता उपयुक्त असे *अबलामित्रचे* संपादन केले. या नियतकालिकेचा लेखन काळ सप्टेंबर १८७६ ते मे १८७८ असा होता.

स्त्रीने प्रसिद्ध केलेले आणि स्त्रीने संपादित केलेले पहिले मासिक म्हणजेच *आर्यभगिनी*. १८८६ मध्ये आनंदीबाई लाड यांनी ते संपादित केले. *आर्यभगिनी* याचे दुसरे संपादन माणिकबाई लाड यांनी केले आहे. त्यातला बहुतेक मजकूर त्या स्वतःच लिहित असत. मराठी, इंग्रजी बरोबर कानडी, गुजराती या भाषा स्त्रियांना परिचित होण्याचा हेतूही *आर्यभगिनीमधून* झाला आहे.

याच सुमारास *स्त्रीज्ञानप्रदीप* (१८६९), *स्त्रीसद्बोध – चिंतामणी* (१८८१), *गृहिणी* (१८८७), *स्त्रियांची मैत्रीण* (१८८८), *साध्वी* (१८८९) हि नियतकालिके प्रसिद्ध होत.

आर्यभगिनी सारखेच काम करणारे *स्त्रीशिक्षण चंडिका* (१८९९), *उर्वशी* ही मासिकेही स्त्री उन्नतीची परंपरा पुढे जाण्यास मदत करत होती. त्याचबरोबर काशिनाथ रघुनाथ मित्र यांनी १८९५ मध्ये *मासिक मनोरंजन* सुरु केले. जानेवारी १९८९५ ते फेब्रुवारी १९३५ असा कालखंड मनोरंजनचा आहे. स्त्रियांची उन्नती झाल्याखेरीज देशाची उन्नती होणार नाही असे संपादकांचे ठाम मत त्यांनी यातून मांडले. कमलाबाई देशपांडे यांनी *बालिकादर्श* (मार्च १९१७ ते फेब्रुवारी १९१९) याचे संपादन केले. तारा टिळक, पिरोज आनंदकर, वसंत मराठे यांनी *गृहलक्ष्मी* नावाचे मासिक संपादित केले. 'स्त्री राष्ट्राची शक्ती व वैभव आणि मानवजातीचे सौंदर्य आहे' हे गृहलक्ष्मीचे ब्रीदवाक्य होते.

एकूणच मराठी नियतकालिकांचा प्रवास पाहता १८३२ ला सुरु झालेल्या *दर्पण* पासून १९२० पर्यंतचा प्रवास अतिशय संथ गतीने वाहत असणाऱ्या झऱ्याचे अधिक प्रवाही नदीत रुपांतर झाल्याचे स्पष्ट होत आहे. त्यानंतरच्या काळात मात्र प्रवाह अधिकाधिक जोर धरत असल्याचे लक्षात येते. स्त्रियांनी स्त्रियांसाठी, स्त्री कल्याणासाठी, स्त्री कर्तुत्वाला सलाम करण्यासाठीची ही केवळ सुरुवात होती. कारण स्व जाणीव या शब्दाचे आत्मभान आणि स्व परीक्षणाचे धागेदोरे स्त्रियांना सुशिक्षित होऊन लेखणीद्वारेच मिळाले. प्रारंभी लिहिण्याची भाषा, बोलण्याची भाषा यामधील फरकही स्त्रियांना फारसा कळत नसावा. मात्र लेखनाने आणि वाचनाने आपोआप स्त्रिया तार्किक मांडणी करू लागल्या. पूर्वी मनात येईल ते विचार स्व भाषेत त्या लिहित होत्या. बाह्य जीवनाशी संबंध आल्यानंतर वस्तुस्थिती, वास्तवता, सापेक्षी मुद्दे त्या आत्मसात करू लागल्या. अभिव्यक्ती, आविष्कार शैलीचा लेखनात गंधही नसलेल्या स्त्रिया संख्यात्मक विकासबरोबर गुणात्मक विकासातही निपुण झाल्या. त्यांच्या लेखणीला सातत्य आल्याने आपसुकच यातून मोठ्या प्रमाणातून सामाजिक प्रबोधन झाले.

माणिकबाई लाड यांनी संपादित केलेल्या *आर्यभगिनी* मासिकातून स्त्रियांना उपजीविकेच्या साधनांचीही माहिती मिळत असे. शिक्षणासारख्या विषयात स्त्रियांनी निपुण होऊन काळाच्या गरजेनुसार स्व बळावर जगण्यासाठी क्रांतिकारी विचार या मासिकेतून मांडले गेले आहेत. पंडिता रमाबाई, मिसेस बाईंडर यांची भाषणे या मासिकाने प्रसिद्धीस आणली. त्याचबरोबर पिरोजबाई कोठारी, सोन्याबाई गाडेकर, माणिकबाई चापशी, एस. व्ही, धुरंधर या लेखिका आर्यभगिनीमधून घडल्या आहेत.

सुरुवातीला नियतकालिकांबरोबर स्त्रीचा संबंध फार विशेष नव्हता मात्र कालांतराने एक सामाजिक विषय ते स्त्रीचा आतला आवाज असा प्रवास घडत गेला.

१८६४ मध्ये *स्त्रीभूषण* हे स्त्रियांसाठी नियतकालिक सुरु केले गेले. मुंबईतील सदाशिव

ज्ञानेश्वर प्रभू आणि त्यांच्या मंडळींनी ते संपादित केले. या मासिकात स्त्रीधर्म, सद्‌गुणी स्त्रियांचे वर्णन, स्त्री शिक्षण, पाकशास्त्र, स्त्री करमणूक, स्त्रियोपचार, स्त्रीगीत, ईश्वरी ज्ञान इत्यादी विविध विषय होते. त्याचबरोबर जानेवारी १८७४ मध्ये विष्णूशास्त्री चिपळूणकरांनी *निबंधमाला* सुरु केली. समाजाची वाचक प्रियता अधिक वाढीस लागली. १८७४ ते १९१० या कालखंडात सुमारे ५०० नियतकालिके प्रसिद्ध असल्याचा उल्लेख मराठी वाङ्मय साहित्यात सापडतो. १९६७ ते १८८९ मध्ये केवळ स्त्रियांसाठी आणि कौटुंबिक माहिती देणारी सुमारे १५ नियतकालिके होती. १८८६ मध्ये सुरु झालेल्या *आर्यभगिनीच्या* पहिल्या वर्षाच्या पहिल्या अंकावरील नोंद.... "हे मासिक मिसेस राधाबाई आत्माराम सगुण ह्यांच्या आश्रयाने स्त्रियांकरिता एका स्त्रीकडून छापून प्रसिद्ध होत आहे. स्त्री शिक्षण प्रसाराचे साधन स्त्रीने पत्करले असे आपल्या लोकांत हे पहिलेच उदाहरण आहे. त्यासाठी कुलीन स्त्रियांनी व स्वदेश हितेच्छू गृहस्थांनी उदार आश्रय देऊन उत्तेजन द्यावे. अशी सविनय प्रार्थना आहे". [१]

महात्मा जोतिबा फुले यांची विद्यार्थिनी मुक्ताबाई हिने *मांग महारांच्या दुःखविषयी निबंध* लिहिला आहे. तो निबंध *ज्ञानोदय* १५ फेब्रुवारी १८५५ आणि १ मार्च १८५५ अशा दोन अंकांमध्ये प्रसिद्ध झाला आहे. मुक्ताबाईने निबंधात समाजातील कटू वास्तवता मांडलेली आहे. वयाच्या १४व्या वर्षी नियतकालिकातून निबंध लेखन करून स्त्रियांसाठी गद्य लेखनाचे पहिले पाऊल मुक्ताबाईंनी उचलल्याचे स्पष्ट होते.

जुन्या परंपरागत विचारांतून स्त्रियांनी बाहेर पडावे आणि अधिकाधिक वेळ विद्येसाठी, शिक्षणासाठी द्यावा हा विचार केवळ लेखनातूनच नव्हे तर पुस्तक परीक्षणे, जाहिराती, बोधवाक्ये यां मधूनही व्यक्त होत गेला.

नियतकालिकांचा प्रवास स्त्रियांसाठी आणि एकूणच समाजासाठी अधिकाधिक उद्बोधक ठरला. १८३२ ते १९२० च्या कालखंडात नियतकालिकांचा प्रवाह ओघ कमी असला तरी १९२० नंतर मात्र प्रवाहाने अधिक जोर धरल्याचे स्पष्ट होते.

### ब) १९२० ते १९५० या कालखंडातील स्त्रीलिखित नियतकालिके

मराठी साहित्यातील १९२० ते १९५० या कालखंडातील नियतकालिकांचा विचार किंवा अभ्यास करताना सर्वप्रथम *गृहलक्ष्मी* (जून १९२७ ते मे १९३१) *नवी गृहलक्ष्मी* (जानेवारी १९३४ ते डिसेंबर १९३५) हे नियतकालिक समोर येते. हे मासिक केवळ स्त्रियांकरिता सुरु केले होते. या मासिकाचे संपादन तारा टिळक, पिरोज आनंदकर यांनी

वसंत मराठे यांच्या सहाय्याने संपादित केले होते. 'ज्ञानी व स्वतंत्र स्त्री राष्ट्राची शक्ती व वैभव आणि मानवजातीचे सौंदर्य आहे' हे गृहलक्ष्मीचे ब्रीदवाक्य होते. स्त्रीजीवनातील बदलांनी घेतलेला वेग गृहलक्ष्मी मध्ये दिसून येतो. दैनंदिन घरगुती विषयांच्या पलीकडे व्यापक स्तरावर नेण्याचे प्रयत्न या मासिकातून झालेले आहेत. या मासिकाचा उद्देश फक्त स्त्रियांकरता असा असला तरी स्त्री सुधारणेच्या वाटेत सुशिक्षित पुरुष लेखकांचेही सहाय्य लाभलेले आहे. डिसेंबर १९२७ चा *शिशु विशेषांक* आणि जून १९२८ चा *पतिता विशेषांक* या दोन्ही अंकांमधून स्त्रियांनी आपले विचार व्यतीत केलेले आहेत. १९२८ मध्ये *गृहलक्ष्मी* बंद पडले मात्र १९३४ मध्ये पु. ना. वर्दे यांनी *नवी गृहलक्ष्मी* या नावाने नव्याने मासिक सुरु केले.

शंकरराव किर्लोस्करांनी संपादन केलेले *स्त्री* मासिक ही याच कालखंडातील आहे. (स्त्री – प्रथमांक ऑगस्ट १९३०) शंकरराव किर्लोस्करांनी स्त्रियांचे पान हा विभाग सुरु केला त्यानंतर त्याचे परिवर्तन *स्त्री* या मासिकात झाले. गंगाबाई जांभेकरांनी *स्त्री* मासिक स्वतंत्र करण्याचा मानस केला होता. त्यानुसार ते कार्य त्यांनी पूर्ण केले. *स्त्री* या मासिकात ललित साहित्य, वैचारिक साहित्य, सांस्कृतिक बदल, संघटनात्मक प्रयत्न, दैनंदिन जीवनातील माहिती, ज्ञान देणारे विषय हाताळले आहेत. स्त्री वर्गाला एकूण महाराष्ट्रीय महिला वर्गाला आवडणारे मासिक असा उल्लेख या मासिकाचा होता.

या मासिकाच्या पाठोपाठ माई वरेरकरांनी संपादित केलेले *महिला* (जुलै १९३३ ते दिवाळी १९३६) हे मासिक स्त्रियांचे उच्च दर्जाचे मासिक असे संबोधले गेले. त्याच काळात गांधीजींच्या प्रभावाखाली जनता असल्याने आपसुकच स्त्रियांवरही प्रभाव पडला होता. त्यातूनच १९३३ पर्यंतच्या काळात स्त्रियांनी विविध क्षेत्रात कर्तुत्व गाजवण्यास सुरुवात केली होती. स्त्रियांचा परिचय, मुलाखती, नवनवीन कायद्यांच्या माहिती, कथा, ग्रंथपरीक्षण असे त्या मासिकाचे स्वरूप होते. या मासिकात अनेक प्रकारे स्त्रियांसोबत घडणाऱ्या लहान – मोठ्या घडामोडींवर प्रकाश टाकला होता.

नालीनीबाई शिंदे यांनी संपादित केलेले आणि मराठा समाजाच्या वतीने प्रसिद्ध झालेले *भगिनी* (ऑक्टोबर १९४१ ते डिसेंबर १९५०) हे मासिक होय. या मासिकाचे संपूर्ण कार्य हे स्त्रियांचेच होते. या मासिकांत स्त्रियांविषयी कथा, कविता, स्फुट लेखन तर होतेच बरोबर बालसाहित्यही होते. या मासिकात अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे अहवाल, वेगवेगळे विचार लेखनबद्ध झालेले आहेत.

१९४८ च्या सालात *वनिता विश्व* नावाचे मासिक डॉ. चंद्रकला हाटे यांनी संपादित केले.

त्यांनी समाजशास्त्रात पी एच् डी. केल्यामुळे स्त्रियांकरिता मासिक असावे असे त्यांना वाटे. त्यांचे स्वप्न *वनिता विश्व* ने पूर्ण झाले.

१९३४ ते १९३७ च्या कालखंडात *जननी* नावाचे मासिक सुरु झाले. परंतु ते स्त्रियांसाठी नसून पूर्ण कुटुंबासाठी महत्त्वाचे होते. *जननी* या मासिकातून स्त्रियांना होणाऱ्या रोगांवर अधिक माहिती साठा या मासिकातून प्रसारित झाला. *जननी* म्हणजे शास्त्र-माता असे ठिकठिकाणी या  मासिकाचे उल्लेख केले आहेत.

लैंगिक विषयावर भाष्य करणारे *सवाईजीवन* (१९४१ – १९५०) हे मासिक ही लोकप्रिय होते. आयुष्यातील नाजूक वळणांवर उघडपणे बोलता येत नसल्यामुळे या मासिकामार्फत अनेक खुलासे होत असत. यांच्या संपादिका शोभना नावाच्या बाई होत्या. या मासिकामध्ये एकूणच स्त्री – पुरुष समानता ते विषमता, चढ – उतार या सगळयांचा टप्या टप्प्याने विचार करत विस्तृत अंगाने वेध घेतला आहे. शास्त्रोक्त लैंगिक शिक्षण देण्याचा प्रयत्न या मासिकाने केलेला दिसतो.

१९४१ च्या काळात लैंगिकते विषयी बोलणे म्हणजे अगदीच गलिच्छपणाची लक्षणे असा समज होता. परंतु या काळात असा विषय घेऊन मासिक काढणे हा फार मोठा लढा असल्याचे समजते. *सवाईजीवन* याप्रमाणेच *यौवन* (१९४१) हे ही एक मासिक प्रसिद्ध होत असे. त्याचप्रमाणे *रति* (१९५०) साली हे ही एक मासिक शकुंतला जी. ए. यांनी संपादित केले. मात्र वरील दोन मासिकांच्या बाबतीत संपादकांनी आपली ओळख गुप्त ठेवल्याचे लक्षात येत.

*मराठी ग्रंथसंग्राहक* (१९४६ – १९४९) हे मासिक लीला मस्तकार रेळे आणि स. त्र्यं. सहस्त्रबुद्धे यांनी १९४५ मध्ये संपादित केले. या मासिकाचे वैशिष्ट्ये म्हणजे मराठी ग्रंथवाङ्मय व्यवहाराला चांगले स्वरूप यावे, दोष, त्रुटी नाहीशा व्हाव्यात तसेच ग्रंथांचे वर्गीकरण, ग्रंथपालाची भूमिका या विषयांवर अधिक सविस्तर चर्चा केलेली आहे.

१९४९ – १९५० च्या काळात *श्रमिक महिला* नावाचे मासिक लानीबाई देसाई, शांता मुखर्जी, प्रतिभा पटवर्धन या भगिनींनी एकत्र येऊन सुरु केले. या काळातील महिला नोकरी करत असत आणि त्यांची संसारातून, समाजातून आणि नोकरीच्या ठिकाणाहून होणारी कुचंबणा या मासिकातून समोर आली.

एकूणच १९२० – १९५० च्या काळातील महिलांचे जीवन अनेक दुःखद यातनांनी बरबटलेले होते. अंधारलेल्या या त्यांच्या जीवनात मासिकांमार्फत अनेक बदल होत गेले.

कळत – नकळत अनेक नाजूक विषयही मासिकांमधून प्रसिद्ध होत गेले. त्यातून स्त्रियांविषयी जागृती आणि त्यांच्या प्रश्नांमुळे समाज परिवर्तनात भर पडत गेलेली दिसून येते. आपल्या वाट्याला आलेल्या अनुभवाने त्या अधिक प्रगल्भ होत गेल्या. लेखनी हातात घेऊन त्या सामाजिक अस्थिरता मांडू लागल्या. अर्थातच स्त्रियांनी स्त्रियांसाठी आणि काही वैचारिक थोर पुरुषांनीही या बाबत परिश्रम घेऊन स्त्री उन्नती साठी मासिके संपादित करून समकालीन स्त्रीला मानाने जगण्याचा सूर गवसून दिला हे निश्चितच मान्य करावे लागते.

१९२० – १९५० हा कालखंड म्हणजे स्वातंत्र्यपूर्व ते स्वातंत्र्यतेच्या पहाटे पर्यंतचा काळ. अनेक नेते, महात्मे यांच्या प्रभावी विचारांचे समर्थन करण्यात समाजमन एकवटले होते. नव्या नव्या विचारांची देवाण – घेवाण होत होती. आणि याच काळात स्त्रियांच्या दुःखावर फुंकर घालण्याचे काम नियतकालिकांनी केले आहे. १९५० नंतर मात्र नियतकालिकांमध्ये कमालीचे बदल होत गेले. स्त्रिया आपले विचार रोखठोकपणे मांडू लागल्याचे १९५० नंतरच्या नियतकालिकांच्या मुखपृष्ठांवरूनही सिद्ध होत गेले. त्याचा आढावा पुढे घेतला आहे.

## क)१९५० ते २००० या कालखंडातील स्त्रीलिखित नियतकालिके

बाळशास्त्री जांभेकरांनी १८३२ साली नियतकालिकांच्या प्रवासाची मुहूर्तमेढ रोवली. त्यानंतर टप्प्या टप्प्यांनी त्यात बदल होत गेले. सुरुवातीला स्त्री संबंधी न येता एकूण समाजाबदल नियतकालिकांमधून येत असे. काळाची गरज पहाता नियतकालिकांमधून स्त्री लेखनाच्या पर्वाची सुरुवात झाली. नियमित लेखन करून स्त्रियांनी अनेक समस्या नियतकालिकांमधून मांडल्या. वाचक भूमिकेतून स्त्री सातत्याने सामाजिक बदलात सक्रीय राहिल्याने आपसुकच तिच्या विचारात बदल होत गेले. १८६७ मध्ये विविधज्ञानविस्तारच्या अंकात *कुलस्त्रिया व गृहस्थ यांच्या करिता उपयुक्त* असे घोषवाक्य होते. आणि यामुळेच केवळ स्त्रियांकरिता स्वतंत्र नियतकालिक असावे अशी संकल्पना उदयाला आली. त्यासाठी अनेकांनी पुढाकार घेतला. आणि परिणामतः नियतकालिक आणि स्त्री यांच्यात घट्ट विण गुंफली गेली.

*बाळबोधमेवा* (१८७३), *गृहिणी रत्नमाला* (१९१६), *गृहलक्ष्मी* (१९२७), *गृहिणी* (१९२७), *प्रगती* (१९२९), *स्त्री* (१९३०), *महिला* (१९३३), *जननी* (१९३४), *भगिनी* (१९३५), *शारदा* (१९३७), *वनिता विश्व* (१९४८), *श्रमिक महिला* (१९४९).... या टप्प्यांनी प्रवास करत नियतकालिके स्त्री प्रश्नांना स्पर्श करत असल्याचे लक्षात येते.

रंजनवादी मासिके, वाङ्मयीन नियतकालिके, स्त्रीमुक्तीचा विचार असणारी किंवा स्त्रीवादी मासिके या टप्प्यांत स्त्रियांचे लेखन प्रसिद्ध आहेत.

भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर एकूणच राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक बाजूनेही नियतकालिकांचे स्वरूप बदलत गेले. १९७५ साली नव्या आचार विचारांनी नियतकालिके अधिक संपन्न झाली. १९७५ हे साल महिला वर्ष असल्याची उद्घघोषणा झाली. १९७५ नंतर *प्रेरक ललकारी, बायजा, स्त्री उवाच, मिळून साऱ्याजणी, दिशा* या प्रकारची स्त्री मुक्ती चळवळ असणारी नियतकालिके नव्याने स्त्री उन्नतीसाठी पुढे सरसावली आहेत. स्त्रियांचे विविध मार्गांनी होणारे शोषण, अन्याय, अत्याचार, स्त्री मुक्तीच्या जगभरातील चळवळी, नवीन दिशा, भारतातील स्त्रियांची परिस्थिती, धार्मिकतेचा मुखवटा घेऊन स्त्रीचा केला जाणारा छळ, कुटुंबातील आणि समाजातील स्त्रीचे दुय्यम स्थान या विषयी सातत्याने लिहिण्याचे कार्य या मासिकांनी केले आहे. त्यामुळे स्त्रियांची स्वतःकडे, जीवनाकडे, कुटुंबाकडे, समाजाकडे डोळसपणे पाहण्याची एक दृष्टी हळूहळू निर्माण झाल्याचे लक्षात येते. आपसुकच स्त्री – पुरुष समानता हा नवीन विचार स्त्रियांनी आत्मसात करायला सुरुवात केली. तिचे विचार, तिची भाषा अधिकच प्रगल्भ होत गेली. त्यांच्या साहित्यात वस्तूनिष्ठा मुद्देसूदपणा, संशोधनात्मक, विवेचनात्मक, वैचारिकता अतिशय प्रभावीपणे आल्याचे दिसून येते. तत्कालीन पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांचे लेखन प्रसिद्ध झाले, वाचकांच्या पसंतीस येऊ लागले. उदाहरण कुसुमावती देशपांडे, इरावती कर्वे, दुर्गाबाई भागवत.

१९७५ नंतर स्त्रियांचे अनेक प्रश्न, समस्या नियतकालिकांच्या मदतीने समाजात पोहचण्यास सुरुवात झाली. हुंडाबळी, घटस्फोट, गर्भजल तपासणी, स्त्रीभ्रूण हत्या, लैंगिक छळ असे अनेक प्रश्न व्यासपीठावरून स्त्रिया धाडसाने मांडू लागल्या.

१९५० च्या नंतर केवळ स्त्री प्रश्ना पेक्षा स्त्रिया रंजक प्रधान नियतकालिके आणि वाङ्मयीन समीक्षाप्रधान नियतकालिके या टप्प्यात लेखन करू लागल्या. हळूहळू स्त्रिया लोकप्रियतेच्या शिखरावर पोहचू लागल्या. कथा, कादंबरी, कविता, लेख, ललित साहित्याने त्यांचे नटलेले लेखन त्या दरमहा प्रसिद्ध होणाऱ्या अंकांमध्ये, दिवाळी अंकांमध्ये आत्मविश्वासाने प्रसारित करू लागल्या. शैलजा राजे, ज्योत्स्ना देवधर, शकुंतला गोगटे, चंद्रप्रभा जोगळेकर, मृणालिनी देसाई, शुभ सोलापूरकर, शकुंतला फडणीस, योगिनी जोगळेकर, गिरीजा कीर अशी वैचारिक स्त्रियांची फळीच निर्माण झालेली लक्षात येते. याच काळात *माहेर, मानिनी, ललना, गृहलक्ष्मी, वहिनी, अनुराधा, प्रियंवदा* ही नियतकालिके लोकप्रिय होती.

१९५३ मध्ये स्त्री मासिकाने दुर्गाबाई देशमुख यांची मुलाखत प्रसिद्ध केली. स्वातंत्र्याबरोबर स्त्रियांना स्वतःचे हक्क, अधिकार, सवलती मिळत गेल्या. नोकरदार स्त्रियांचे प्रमाण वाढले. एकूणच स्त्री वर्गाचा संपूर्ण मागोवा *स्त्री* मासिकाने घेतला आहे. १९७५ च्या आंतरराष्ट्रीय महिला वर्षा निमित्त *स्त्री* मासिकाने महत्त्वाची जबाबदारी पेलली आहे. स्त्री प्रश्नांचा वाचा फोडण्यासाठी १९७४ पासून शांताबाई किर्लोस्कर प्रयत्नशील होत्या. फ्रेंच लेखिका सिमॉन द बोऱ्हा यांच्या *सेकंड सेक्स* आणि *नेचर ऑफ दि सेकंड सेक्स* या पुस्तकांवर आधारित लेखनमाला *स्त्री* मधून शांताबाईंनी प्रसिद्ध केली आहे.

*सत्यकथा, मौज, ललित, मराठी साहित्य पत्रिका, मराठी संशोधन पत्रिका* यांसारखी मासिके, त्रैमासिके या काळात अधिक लोकप्रियतेच्या शिखरावर पोहचली आहेत. *सत्यकथा* या मासिकाने कथा, कविता, ललित लेख, दीर्घकथा, लघुकादंबऱ्यांची परंपरा सुरु केली.

इंदिरा संत, अनुराधा पोतदार, पद्मा गोळे, शांता शेळके, अरुणा ढेरे, अनुराधा पाटील यांच्या कविता, सत्यकथा, मौज यामधून प्रसिद्ध होत, तर लघुकथा लेखनात विजया, राजाध्यक्ष, कमल देसाई, गौरी देशपांडे, आशा बगे, उर्मिला सिरूर, निर्मला देशपांडे, सानिया यांनी दीर्घकथा, लघुकादंबरीचे लेखनही केलेले दिसते. त्याचप्रमाणे एकांकिका लेखन व ललितलेखनात नीलिमा भावे, विद्युल्लता अकलुजकर, पद्मिनी बिनिवाले, वसुधा माने, वसुधा पाटील, पद्मजा फाटक या लेखिकांनी मोलाची कामगिरी बजावली आहे. इरावती कर्वे, विजया राजाध्यक्ष, सरोजिनी वैद्य, उषा देशमुख या स्त्रियांनी *सत्यकथा* तून सातत्याने समीक्षालेखन आणि वैचारिक लेखनही केले.

आपापल्या वाङ्मयीन कार्याने प्रत्येक स्त्रीने आपापली वेगळी जागा निर्माण केली आहे. १९५० नंतर मात्र सातत्याने लेखनाशी निगडीत राहून सर्वच क्षेत्रातील स्त्रियांनी सर्वांगीण विकासाचा पल्ला गाठला असल्याचे त्यांच्या लेखनशैली तसेच विचारशैलीवरून स्पष्ट होते. १९७५ ते २००० या कालखंडात नियतकालिकांच्या क्षेत्रात प्रवाहित झालेल्या स्त्रिया अधिक विकसित प्रवाहाच्या जोरात लेखन करू लागल्याचे स्पष्ट होते. लेखनातील व्यापकता, चौकस दृष्टीक्षेप यातून प्रगल्भ झालेले लेखन अतिशय लोकप्रिय होत गेले.

नियतकालिकांच्या मदतीने स्त्रियांनी प्रश्न मांडले आणि प्रत्येक स्तरातील स्त्रियांचे वेगवेगळे प्रश्न असल्याचे, स्पष्ट होत गेले. ग्रामीण, शहरी, दलित,अशा विविध स्तरातील प्रश्न समोर आल्यानंतर अनेक नियतकालिकांमधून त्याचे समर्थन झाले; ही स्त्री जागृतीची लाट मराठी पुरतीच मर्यादित न राहता अनेक भारतीय भाषांमध्ये उसळली गेली. परिणामी अनेक भारतीय भाषांच्या नियतकालिकांमधून स्त्री जागृतता अधिक प्रखर स्वरुपात समोर

आली. *दिशा, महिला आंदोलन पत्रिका, प्रेरक ललकारी, बायजा, स्त्रीउवाच, मिळून साऱ्याजणी* इत्यादी मराठी नियतकालिके प्रसिद्ध झाली. तर *मानुषी* हे मासिक हिंदी व इंग्रजी मध्ये संपादित झाले. *नारीमुक्ती* (गुजराती), *सबला* (हिंदी), *समता* (कन्नड), *मानवी* (मल्याळम), *संघर्ष* (इंग्रजी), *सचेतना, सबल* (बंगाली) इत्यादी नियतकालिकांमधून स्त्री जागृतीची पेटती मशाल अधिक प्रेरक बनत गेली.

स्त्रियांच्या प्रश्नांचा विचार आणि स्त्रीवरील अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे हे सूत्र मासिकांच्या उपशीर्षकातून व्यक्त होताना दिसते.

**उदाहरण:** *एकमेका साह्य करू / समाजवाद साकार करू– महिला आंदोलन पत्रिका.*

*पददलितांची पिळवणूकीतून मुक्ती व्हावी हा एकाच ध्यास मनी घेऊन जाऊ आपण निर्मू आपला नवसमाज – प्रेरक ललकारी.*

*स्त्रियांच्या प्रश्नांवर समाजाचे प्रबोधन करणारे एकमेव मासिक – बायजा.*

*स्वतःशीच नव्याने संवाद सुरु करणारे मासिक – मिळून साऱ्याजणी.*

या शीर्षकातून, उपशीर्षकातून स्त्रियांसाठी ही नियतकालिके किती महत्त्वाची भूमिका बजावत आहेत हे स्पष्ट होते.

याच काळात नियतकालिकांमध्ये कथा, एकांकिका लेखनातही बदलत्या स्त्री जीवनाचा वेध घेतला आहे. स्त्रीमनाचे अनेक कंगोरे, परिवर्तन, आंदोलन, विद्रोह वेदना या व्यक्त करण्याचे एक प्रमुख व्यासपीठ म्हणजे नियतकालिक असे सूत्र जुळलेले दिसते.

अलीकडे ८ मार्च हा *आंतरराष्ट्रीय महिला* दिन मानला जातो. या दिनाचे महत्त्व अनेक सामाजिक संस्था, तसेच वेगवेगळया प्रवाहांद्वारे समजते. मात्र नियतकालिकांनी तर या दिनाचे स्वागत करून येणाऱ्या पिढ्यांना स्त्री जागृतीचा वसा देण्याचे महत्त्वाचे काम हाती घेतल्याचे दिसून येते.

२००० सालाच्या अखेरीपर्यंत स्त्रिया अधिकाधिक स्वातंत्र्यात असल्याचे त्यांच्या साहित्यातून दिसून येते. अनेक गोष्टींमध्ये स्वतःला कमी लेखणारी स्त्री, उंबरठ्यापर्यंतच सीमा आहे असे वागणारी स्त्री पुरुषांच्या बरोबरीने काम करू लागली आहे. प्रत्येक क्षेत्रात त्या स्वतःला अजमावू पहात आहेत. पुरुषांच्या वर्चस्वामुळे दबून असलेली स्त्री आता तटस्थ विचारांची बनत असलेली दिसून येते. नियतकालिकांमधून प्रसिद्ध होणाऱ्या कथा, लघुकथा, दीर्घकथा, लेख, स्फुटलेख, कविता, कादंबऱ्या यामधून तिचे विचार, प्रतिमा अतिशय वैचारिक दृष्टीने मांडलेले स्पष्ट होतात.

नियतकालिकांतील स्त्रियांच्या लेखन दृष्टीने १९५० ते २००० या वर्षात स्त्रियांची सर्वांगीण दृष्टीने विकास क्षमता स्पष्ट होते. सुरुवातीपासून संथ लेखन चालू झाले. हळूहळू प्रवाह वाढत गेला आणि कालांतराने स्त्रियांनी आपले सामर्थ्य त्यांच्या लेखनीतून समाजापुढे मांडलेले आहे. त्यांच्या वैचारिक प्रगल्भतेतून एकूणच समाज परिवर्तन होण्यास मदत झाली.

नियतकालिकांच्यामुळे स्त्रियांना निरनिराळया गोष्टींची माहिती मिळाली, प्रेरणा मिळाली आणि आपसुकच त्यांच्या प्रश्नांना हक्काचे आणि महत्त्वाचे व्यासपीठ नियतकालिकांच्या मार्फत स्त्रियांना उपलब्ध झाले.

१९७५ च्या महिला वर्षानंतर निर्माण झालेले सामाजिक परिवर्तन, स्त्रीमुक्ती विचार, चळवळ, त्यांचा प्रचार, प्रसार स्त्रीवादी जाणिवांचा जागर या सगळयांवर अतिशय परिणाम झाला. *चुल आणि मूल* या विश्वात गुरफटलेली स्त्री आता मोठ्या प्रमाणात राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक बदलांचा एक महत्त्वाचा भाग बनली आहे. नियतकालिकांच्या महत्त्वाच्या टप्प्यांचा विचार करताना १९७५ ते २००० या काळातील स्त्रीलिखित किंवा संपादित नियतकालिकांचे कार्य अतिशय महत्त्वाचे ठरते.

**ड) २००० ते २०१० या कालखंडातील स्त्रीलिखित नियतकालिके**

प्रारंभीच्या काळात नियतकालिकांचे काम हे समाजप्रबोधनाबरोबर जनसंपर्काचे प्रभावी माध्यमाची महत्त्वाची भूमिका बजावणे हे होते. आजही ते आहे. पण त्याची रचना आणि विस्तारवृद्धी मोठ्या प्रमाणात झाली आहे. स्त्रियांच्या आयुष्यात नियतकालिकांचे कार्य हे अतिशय महत्त्वाचे आहे. समाजातील अनेक ज्वलंत प्रश्न असलेले विषय त्या अत्यंत वैचारिक दृष्टीने मांडू लागल्या.

१९७५ नंतर स्त्री नियतकालिकांचा स्वतंत्र प्रवाह सुरु झाला. स्त्री विचारांचे पहिले व्यासपीठ आणि स्त्रीला अधिक वैचारिक पद्धतीने विकसित करण्याचे काम नियतकालिकांमधून होत गेले.

*माहेर, मानिनी, गृहलक्ष्मी, ललना, वहिनी, चारचौघी*.... या सारख्या अनेक मासिकातून स्त्री मनाच्या अनेक कप्प्यांची जडणघडण झाली. नियतकालिकातून प्रसारित झालेले लेख, आदी साहित्य स्त्रीला आपलेसे वाटू लागले. तिने स्पंदने लेखनातून मांडून मनाचे दरवाजे खोलले आणि ही स्थित्यंतरे सुमनताई बेहेरे, मंगला गोडबोले, स्वाती चिटणीस, मालती काखारकर, कुसुम अभ्यंकर, इंद्रायणी सावकार, योगिनी जोगळेकर, ज्योत्स्ना देवधर, शकुंतला गोगटे, नयना आचार्य, सुमती क्षेत्रमाडे यांच्या लेखनामुळे मार्मिक, कथा, आरोग्य, सामाजिक भान, प्रश्न, कौटुंबिक प्रश्न अश्या निरनिराळया विषयांची ओळख स्त्रीला होत

गेली.

२००१ ते २००० च्या कालखंडात समाजात विचाराने जगू पाहणाऱ्या स्त्रीला आत्मविश्वासाने चार पैसे कमविण्यासाठी लघुउद्योग, गृहउद्योगा सारख्या गोष्टींची माहितीही या नियतकालिकांमधून प्रसिद्ध होत गेली. १९७५ ते २००० च्या कालखंडात सुरु असणाऱ्या स्त्री-मुक्ती चळवळीचे हे घवघवीत यश होते. स्त्री मनातील बदल, अन्याया विरोधाची पाऊले, समानतेचे धडे, हक्कांची मागणी यातून आजची स्त्री घडत गेली, कष्ट करून स्वाभिमानाने जगू लागली. सकारात्मक बदल घडवून सन्मानाने जगण्यासाठी *महिला आंदोलन पत्रिका, स्त्रीउवाच, बायजा, प्रेरक ललकारी, मिळून साऱ्याजनी, आकांक्षा* या नियतकालिकांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली आहे.

नियतकालिकाचा हेतू, भूमिका, उद्दिष्ट्ये, आखणी, मांडणी, मजकूर, शब्दांकन, सजवट या प्रत्येक गोष्टीचा स्त्री मनावर परिणाम होणे आवश्यक होते आणि तसे झालेही. अनेक नियतकालिकांचा स्वर हा स्त्रीवादी असल्याचेही समजते आणि याचे मुख्य कारण म्हणजे स्त्रियांना समाजाने दिलेली दुय्यम वागणूक.

२००० ते २०१० च्या कालखंडात प्रसिद्धीच्या झोतात असलेली नियतकालिके पुढील प्रमाणे....

१. प्रतिमा कुलकर्णी -अहेड या संस्थेसाठी '*प्रतिबिंब*' हे द्वैमासिक संपादित करत आहेत.
२. मीनाक्षी मून- यशोधरा महिला मंडळ या संस्थेसाठी '*आम्ही मैतरणी*' हे त्रैमासिक प्रसिद्ध करत आहेत.
३. डॉ. नीलम गोऱ्हे- स्त्री आधार केंद्रासाठी '*आम्ही स्त्रिया*' हे वार्षिक नियतकालिक प्रसिद्ध करत आहेत.
४. सुमन बंग-चेतना विकास संस्थेसाठी '*सखी*' हे त्रैमासिक संपादित करत आहेत.
५. माधुरी वैध- *विपुलश्री.*
६. संजीवनी कुलकर्णी- *पालकनीती* – महाराष्ट्र फाउंडेशनचा पुरस्कार या मासिकेला मिळाला आहे.
७. अरुणा साबने-*आकांक्षा.*
८. संपादक. प्रज्ञा दया पवार– *बायजा, परिवर्तनाचा वाटसरू*
९. मीरा सिरसमकर- *स्त्री.*

१०. संपादक रुपा नायर-*मार्गेश्वरी.*

वरील अनेक नियतकालिकांमधून अनेक अमानुष प्रथेचे खंडण करणारे, समाज प्रबोधन करणारे लेखन प्रसिद्ध झाले आहे. स्त्रियांचे शिक्षण, जबाबदारी, घर – नोकरी ही दुहेरी घुसमट, समाजातील चौकट, कुटुंबातील स्थान, समाजातील दुय्यम वागणूक, असुरक्षितता, लैंगिक शोषण, बलात्कार, विनयभंग, मानसिक ताण, प्रेम, विरह, विवाह, हुंडा, स्त्रीभ्रूण हत्या, समलिंगी विवाह, कष्टकरी, ग्रामीण, दलित, आदिवासी स्त्रियांचे दुःखे, त्यांचे प्रश्न, त्यांचा लढा, अपुरा विकास, पुरुषसत्ताक पद्धतीचा जाच, कॉर्परेट जगातील स्त्रियांची फसवणूक, पिळवणूक, मुलींना पळवून त्यांना विकणे, वेश्या व्यवसायाकरिता प्रवृत्त करणे, स्त्रियांच्या अब्रूची गावभर धिंड काढणे, गुप्तांगावर हत्याराने वार अथवा चटके देणे, नोकरीच्या ठिकाणी मानसिक छळ करणे. या आणि यासारख्या कितीतरी अमानुष गोष्टींचा सामना स्त्रियांना करावा लागत आहे. म्हणूनच या प्रश्नांना हाताशी घेऊन नियतकालिकांमधून सतत स्त्री सबलीकरणाचे धडे लेखिकांनी अतिशय व्यापक दृष्टीने मांडले आहेत.

आफ्रिकन राष्ट्रे, इथिओपिया, इजिप्त, इरिटेरिया, झांबिया, केनिया, गिनिआ, लिबेरिया, युगांडा, कॅमरून, बेनिनि या सारख्या अनेक राष्ट्रांमधून स्त्री-सुता नावाची फिमेल जनायटल म्युटिलेशन नावाची स्त्री जीवनाला वेदना देणारी प्रथा सर्रास चालू आहे. या प्रथेविरुद्धही स्त्रियांनी लढा दिला आहे.

जगाच्या अनेक कोपऱ्यामध्ये विव्हळत पडणाऱ्या बलात्कारी महिलांची संख्या दर अर्धा तासाला एक इतकी असणे हे मुळी पाशवीवृत्तीचे एक उदाहरणच आहे. पिडित महिला ही सहा महिन्याच्या बाळापासून ते ९० वर्षाच्या वृद्ध महिले पर्यंत असणे हे ही एका पाशवीवृत्तीचे उदाहरण आहे. मूळतः महिला – स्त्री ही उपभोगाकरिता असलेली गोष्ट उपभोग घेतल्यानंतर विव्हळत सोडायची किंवा इत्या करायची ही मक्तेदारी पुरुषांना दिलीच कोणी? असे अनेक सवालही नियतकालिकांमधून झाले.

स्त्रियांना ब्रेस्ट कॅन्सर, कॅन्सर, विद्रुपता, कोड, मासिक पाळी, शरीरशास्त्राशी ओळख अशा वेगवेगळया विषयांमध्ये शिक्षण घेताना लाज, संकोच वाटतो मात्र नियतकालिकांनी हे विषय आणि दैनंदिन जीवनाची संपर्क मुल्ये, जगण्याच्या नव्या दिशा स्त्रियांसाठी अधिक व्यापक अंगाने विस्तृत केल्या आहेत. त्यातून अनेक महिला शिकल्या, कामधंदा करू लागल्या, अन्यायाला प्रतिकार करू लागल्या हे यश नियतकालिकांचे आणि प्रगत

विचारशैली असणाऱ्या लेखिकांचेही आहे.

२००० नंतरच्या स्त्रियांनी विक्रमी लेखन करून समाजप्रबोधन केले आहे. *बायजा, मिळून साऱ्याजनी, विपुलश्री* या आदी नियतकालिकांची कामगिरी अतुलनीय आहे.

विद्या बाळ, तारा भवाळकर, अश्विनी धोंगडे, ज्योती लांजेवार, सरिता पदकी, कमल देसाई, उर्मिला पवार, सुकन्या आगाशे, संजीवनी मराठे, हिरा बनसोडे, छाया दातार, सुशीला पगारिया, कुमुद पावडे, शांता किर्लोस्कर, गौरी देशपांडे, अंजली सोमण, लीलावती भागवत, प्रतिभा रानडे, बेबी कांबळे, अनुराधा गुरव, पुष्पा भावे, कालिंदी देशपांडे, मुमताज रहिमतपुरे, आसावरी काकडे, प्रतिमा इंगोले, मंदा खांडगे, तारा रेड्डी, लीला दीक्षित, शमा दलवाई, शैला सातपुते, लता भिसे, विजया लवाटे, राजेश्वरी देशपांडे, कविता महाजन, अनुराधा काळेले, सरिता सडेकर, प्रतिमा परदेशी, इंदूमती पाटणकर, प्रज्ञा लोखंडे, शारदा साठे, उषा वाघ, सुलभा ब्रम्हे, अनुराधा गुरव.... आदी स्त्री लेखिकांनी प्रगत विचारशैलीने आणि प्रगल्भ मनाने जागतिकीकरणाचा विचार करून २००१ च्या जनगणनेत स्त्रियांच्या घटत्या संख्येचा विचार करून अतिशय समर्पक आणि ज्वलंत प्रश्न ऐरणीवर आणले आहेत.

एकूणच या कालखंडातील लेखन हे स्त्रीवादी लढा या प्रकारचे आहे.

**संदर्भ-**

१. स्त्री साहित्याचा मागोवा खंड -१

# प्रकरण सहावे: मराठी स्त्रीलिखित प्रवासवर्णने

अ)१८८०ते १९२० या कालखंडातील स्त्रीलिखित प्रवासवर्णन

ब) १९२० ते १९५०या कालखंडातील स्त्रीलिखित प्रवासवर्णन

क)१९५० ते २००० या कालखंडातील स्त्रीलिखित प्रवासवर्णन

ड) २००० ते २०१० या कालखंडातील स्त्रीलिखित प्रवासवर्णन

## अ) १८८०ते १९२०या कालखंडातील प्रवासवर्णने

स्त्रियांमध्ये शिक्षणाचा प्रसार अत्यंत कमी असल्याने प्रारंभीच्या काळात ललित लेखनाचा स्त्रोत ही अल्प असल्याचे अभ्यासांती समजते. तत्कालीन परिस्थितीत स्त्रियांना उंबरठा ओलांडणेच मोठे अवघड होते; तर त्यांनी प्रवास करून त्यावर भाष्य करणे तर फारच विरळ होते. अत्याधुनिक सोयी-सुविधा नसल्याने प्रवासाची साधनेही कमी होती. एकूणच स्त्रियांच्या लेखनविश्वात यामुळे परिणाम झालेला दिसून येतो. मात्र काही लेखिकांनी प्रवासवर्णने केवळ स्वतःचे विचार, स्वतःचे मन मोकळे करण्यासाठी लिहिली आहेत आणि म्हणूनच नाही म्हटले तरी प्रवासवर्णनही स्त्रियांनी हाताळल्याचे समाधान यातून होताना दिसते.

### पंडिता रमाबाई

प्रवासवर्णनाच्या टप्प्यात पंडिता रमाबाईंचे नाव प्रामुख्याने येते. त्यांचे वडील अनंतशास्त्री डोंगरे हे सतत भ्रमण करत असत आणि कुटुंबालाही घेऊन जात असत. रमाबाई सहा महिन्यांच्या असल्यापासून ते अखेरपर्यंत सतत वडिलांप्रमाणेच भ्रमंती करत राहिल्या. अनेक धर्मक्षेत्रे त्यांनी कुटुंबासोबत पाहिली होती. नंतरच्या काळात रमाबाई १८८३ साली इंग्लंडला गेल्या आणि त्यांनी इंग्लंडचा प्रवास सफाईदार इंग्रजी येत नसतानाही एकटीने केला आहे हे त्या काळचे नवलच होते. आपल्या देशावर अनेक वर्षे राज्य करणारे इंग्रज लोक, त्यांची तत्वप्रणाली, कार्यक्षमता, यंत्रसामुग्री आणि त्यांच्यातील एकनिष्ठेबद्दल रमाबाईंना अधिक कुतूहल होते. *इंग्लंडचा प्रवास* हे खरं तर पत्ररुपी झालेले लेखन होय. अत्यंत सूक्ष्म बदलही रमाबाईंनी यातून नोंदवले आहेत.

१८८९ साली रमाबाई अमेरिकेला गेल्या. पहिल्या महिला डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या पदवी प्रदान सोहळयात पंडिता रमाबाईंची उपस्थिती प्रार्थनीय मानणाऱ्या आनंदीबाईसाठी रमाबाई अमेरिकेला गेल्या. तो पर्यंत पाश्चात्य जीवन अंगवळणी पडल्याने त्यांना फारसे

अवघड गेले नाही. मात्र अनेक अडथळे कायम होते. अमेरिका – स्वैराचार – भीतीदायक बोटीतला प्रवास – समृद्ध ग्रंथालय, अनेक संस्था – अमेरिकन संस्कृती – स्वातंत्र्य या सगळयात त्या भारावून जात. भारत – अमेरिका तुलना होत गेली. त्यांची व्याख्याने, भारताची झालेली दुर्दैवी अवस्था अमेरिकेत त्यांनी अत्यंत समंजसपणे मांडली; आणि त्यातूनच अमेरिकन मिशनकडून 'शारदा सदन' साठी दहा वर्षांची आर्थिक मदतही त्यांनी संपादन केली.

वरील दोन्ही पुस्तकातून रमाबाईंचे अधिक व्यापक दृष्टीकोन अधोरेखित होत गेले आहेत. भारताबाहेरची आणि भारतातील परिस्थिती अधिक व्यापक अंगाने त्यांनी पारखल्याने काळाच्याही खूप पुढचा विचार त्या करत असत.

**पार्वतीबाई चिटनवीस**

१९१५ साली प्रकाशित झालेले *आमचा जगाचा प्रवास* हे प्रवासवर्णन पार्वतीबाई चिटनवीस यांनी पती समवेत केलेला प्रवास लेखनबद्ध स्वरुपात मांडला आहे. इंग्लंड, स्कॉटलंड, फ्रांस, बेल्जम, जर्मनी, इटली, इजिप्त, सिंगापूर, जपान, अमेरिका, आयर्लंड, डब्लिन, एडिंबरो इत्यादी देशाचे दर्शन घेतलेल्या पार्वतीबाई चिटनवीस खरंच ग्रेटच. प्रत्येक देशाचे निराळेपण, सांस्कृतिक घडामोडी, संगीत, पोशाख, पेहराव, भाषा, खेळ, स्वच्छता, गैरवापर, स्वैराचार, नैसर्गिक सौंदर्य, धर्म भावना, म्युझियम, राजकीय स्थिती – नियम आणि एकूणच प्रवासातील गुण-दोष आणि भेट दिलेल्या देशांची नीतीमत्ता त्यांनी अतिशय सूक्ष्मपणे मांडली आहे. जगाची सफर केलेल्या या भ्रमंती दाम्पत्यांला मात्र आपलाच देश किती छान वाटतो हे ही त्यांनी अधोरेखित केले आहे.

प्रारंभ ते १९२० च्या कालखंडात या दोनच लेखिकांनी प्रवासवर्णने लिहिल्याचे अभ्यासातून स्पष्ट होते. १९२१ नंतरच्या कालखंडातील प्रवासवर्णनाचा अभ्यास पुढीलप्रमाणे.

**ब) १९२० ते १९५० या कालखंडातील प्रवासवर्णने**

**अन्नपुर्णाबाई सुगवेकर**

पंडिता रमाबाई आणि पार्वतीबाई चिटनवीस यांच्या नंतर १९२८ साली *आमचा त्रिस्थळीचा प्रवास* अथवा *काशी यात्रा* हे प्रवासवर्णन अन्नपुर्णाबाई सुगवेकर यांनी लिहिले.

प्राथमिक शिक्षिका असलेल्या अन्नपुर्णाबाईंनी धार्मिक यात्रा करून उत्तर भारतातील अनेक बारकावे टिपले आहेत. प्रवासातील अडचणी, उपाय, धर्मकृत्ये, खर्च, प्रेक्षणीय स्थळे या सर्वांची वर्गवारी त्यांनी त्या प्रवासवर्णनातून मांडली आहे.

**शांताबाई नाशिककर**

कवयित्री शांताबाई नाशिककर यांनी १९३३ साली *म्हैसूरकडील प्रवासवर्णन* हे पुस्तक प्रकाशित केले आहे. म्हैसूरचे वेगळेपण, वैशिष्ट्ये, राजवंशावळ, संस्थाने आणि म्हैसूरच्या आजुबाजूचे सौंदर्य लेखिकेने अधोरेखित केले आहे. मुळतः लेखिका कवयित्री असल्याने हे प्रवासवर्णन अतिशय नवख्या वर्णनांनी नटलेले आहे.

**सरोजिनी देशपांडे**

१९३६ साली पतीसमवेत युरोप दौरा करून *युरोपच्या अंतरंगात* हे प्रवासवर्णन सरोजिनी देशपांडे यांनी प्रकाशित केले. केसरी मधूनही अनेक लेख त्यांनी प्रसिद्ध केले होते. या पुस्तकात त्यांनी रोजनिशीतली जोड, पत्रव्यवहार आणि स्वानुभव प्रकट केल्याने हे पुस्तक वेगळया पद्धतीने गुंफले गेल्याचे लक्षात येते. त्यानंतर त्यांनी अनेक दौरे केले. परिषदा भरवल्या, व्याख्याने दिली. एकूणच उंबरठा ओलांडू न शकणाऱ्या परिस्थितीत त्यांनी मोलाची कामगिरी बजावली होती. या पुस्तकातून त्यांची प्रांजळ निवेदन पद्धतही प्रामुख्याने अधोरेखित होताना दिसते.

**उमाबाई चापेकर**

पद्यमय यात्रावर्णन १९४३ मध्ये उमाबाई चापेकर यांनी *श्री मुक्तीनाथ – यात्रा वर्णन* (अभंग) या प्रवासातून आपण संपादित केलेल्या ज्ञानाचा इतरांना फायदा होण्यासाठी अत्यंत विलोभनीय पद्धतीने लिहिले आहे. यात्रेला जाण्याची माहिती, उपयुक्त साधनसामुग्री, क्षेत्राची संपूर्ण माहिती, भौगोलिक परिस्थिती आणि लागणारा वेळ आणि होणारा त्रास त्यातून मिळालेला आनंद हे सर्व वर्णन या लेखिकेने पद्यमय स्वरुपात रेशीम धाग्याप्रमाणे गुंफलेले आहे. ५१९ अभंगातून उमाबाईंनी यात्रेचे वर्णन रेखाटून पद्यमय (एकमेव) प्रवासवर्णन प्रसिद्ध करून मराठी साहित्याला वेगळी उंची दिली आहे.

अन्नपुर्णाबाई सुगवेकर, शांताबाई नाशिककर, सरोजिनी देशपांडे, उमाबाई चापेकर यांच्या प्रमाणे कमला फडके, प्रेम कंटक, आनंदीबाई जयवंत, शांता धांदरफळे यांनीही प्रवासवर्णने लिहिली. *भारतातील नद्यांचे वर्णन* १९३८ साली प्रेम कंटक यांनी प्रकाशित केलेले प्रवासवर्णन भौगोलिक परिस्थितीचा पुरावा आहे. १९४४ साली *चितोड* हे

प्रवासवर्णन आनंदीबाई जयवंत यांनी लिहून एक अनोखे दर्शन त्यातून घडविले आहे. त्याच बरोबर १९५० साली शांता धांदरफळे यांचे *हा देश ही माणसे* हे प्रवासवर्णन विविध बदलांची मालिकाच समोर आणते.

प्रसिद्ध कथा-कादंबरीकार. सी. फडके यांच्या पत्नी कमला फडके यांनीही *त्रिवेंद्रमची सफर* हे प्रवासवर्णन अतिशय सहज, साध्या परंतु आकर्षक पद्धतीने मांडलेले आहे. दक्षिण हिंदुस्थानचं एक वेगळं काव्यात्मक आणि विलोभनीय रूप लेखिकेने वर्णनातील शब्दरचनेने अधिकाधिक आकर्षक केले आहे.

१९२१ ते १९५० या टप्प्यातील प्रवासवर्णने ही इतकीच आढळतात. काही हेतुपूर्वक प्रवासवर्णने आहेत तर काही तीर्थयात्रा आणि मनःशांतीसाठीची आहेत. मात्र या सर्व प्रवासवर्णनातून तत्कालीन परिस्थितीची जाणीव होते. अनेक निरीक्षणे आणि तपशील या प्रवासवर्णनाची वैशिष्ट्येपूर्ण देणगीच आहे. १९५१ नंतरची प्रवासवर्णनाची प्रवासक्षमता काही अंशी वाढलेली आहे ते पुढील अभ्यासातून स्पष्ट होईलच.

### क) १९५० ते २००० या कालंडातील प्रवासवर्णने

स्वतंत्र वाङ्मय प्रकार म्हणून स्वतःची ओळख निर्माण करणारा हा ललित गद्याचा एक उपघटक असणारा साहित्य प्रकार आहे. भ्रमंती करून आल्यानंतर त्या स्थळाचे संपूर्ण वर्णन ऐतिहासिक, पौराणिक, सांस्कृतिक, भौगोलिक, राजकीय दृष्ट्या लेखनबद्ध होत गेले. प्रारंभी ते वृत्तपत्र, मासिके यातून प्रसिद्ध होत गेले तर अलीकडे या लेखन प्रकाराचे स्वतंत्र पुस्तक जन्मले आहे.

पंडिता रमाबाईंनी प्रवासवर्णनाच्या साहित्यिक प्रकाराचा श्री गणेश केला. त्यानंतर पार्वतीबाई चिटनवीस, अन्नपुर्णाबाई सुगवेकर, शांताबाई नाशिककर, सरोजिनी देशपांडे, उमाबाई चापेकर, कमला फडके, प्रेम कंटक, आनंदीबाई जयवंत, शांता धांदरफळे या लेखिकांनी निरनिराळया स्वरूपाचा प्रवास त्यांच्या लेखनीतून शब्दबद्ध केला आहे. परदेशातील प्रवास, तेथील राहणीमान, राजकीय, भौगोलिक, सांस्कृतिक वलय, शिस्त, कायदा या अनेक प्रकारांचे वर्णन करत नकळत तुलनात्मक दृष्ट्याही हे लेखन पुढे सरकताना दिसते.

काही लेखिकांनी केलेल्या तीर्थयात्रा आणि आलेले अनुभव गुण दोषांसकट अधोरेखित केले आहेत.

चारुशीला गुप्ते यांचे *बर्फाच्या दुनियेत* हे प्रवासवर्णन अतिशय बोलके आहे.

अनौपचारिकता आणि मुक्त चिंतन शैलीमुळे हे प्रवासवर्णन वाचकाच्या पसंतीस पडते.

सुमारे ६००० मैलांचा प्रवास करणाऱ्या विजया जोशी यांनीही प्रवासवर्णनातून तुलनात्मक प्रश्न समोर ठेवले आहेत. पॅरीस, जर्मनी, ऑस्ट्रिया, सुएझ, दमास्कस, इस्तंबूल, स्वित्झर्लंड या अनेक देशांची भ्रमंती करून स्त्री स्वातंत्र्याची एक वेगळीच मुलभूत प्रश्न फळीच त्यांनी लेखनीतून मांडली.

कालांतराने प्रवासवर्णन कथात्मक आणि विशिष्ट पात्राच्या आधारे अधिक ठळकपणे लेखनीबद्ध झाले. मुक्त केणेकर, मृणालिनी देसाई, इंदुमती शेवडे, इंदू साक्रीकर या कथा लेखिकांनी प्रवासवर्णनातून व्यक्तिचित्रणे अतिशय सहज मांडलेली आहेत. रंजक्तेची जोड मिळत गेल्याने वाचकवर्ग प्रवासवर्णनाच्या अधिक प्रेमात पडलेला असल्याचे समजते. उदाहरण मेधा काळे यांची *शालीमारची साद, कोनार्क ते कन्याकुमारी, गीर गिरनार गरबा, हल्दीघाटीतून कुलूघाटीट* ही प्रवासवर्णने वाचकांच्या पसंतीची आहेत.

सुधा गोखले, उषा देशपांडे, वासंती घैघास, साधना कामत, मधुवंती सप्रे, शकुंतला खोत, शीला शिवडे, सुलभा हेर्लेकर, वसुधा गोखले, मनिषा शहा, सुहासिनी मुळगांवकर, वसुधा माने या लेखिकांनी प्रवासवर्णनातून 'मी' चा शोध घेतला आहे. मी कोठे गेले, मी काय पाहिले, मी काय अनुभवले, मी काय मिळवले अन् गमवले या सगळयात 'मी'चा शोध घेत प्रवासवर्णनाच्या साहित्य प्रकाराला वेगळीच वलय प्राप्त करून दिली आहेत. ज्या प्रांतात आपण जातो, तेथील भाषा, वेशभूषा, भौगोलीकता, बरे-वाईट, अनुभव, आहार या सगळयाबरोबर समरूप व्हावेच लागते. नको तिथे नको ते हट्ट धरून ठेवले तर प्रवासाची मजाच काय? या प्रकारचे विचारही लेखिका मांडताना दिसतात. अचानक उद्भवणाऱ्या व्याधी, हवामानाशी सूत न जुळल्याने झालेला त्रास, खरेदी, सच्चेपणा, खोटारडेपणा, आचार-विचार यांचा सखोल अभ्यास चार भिंतीतून बाहेर पडणाऱ्या स्त्रीला करता येऊ लागला. वैचारिकता अधिक प्रगल्भ होत गेली.

*लेगॉसचे दिवस* या शोभा बेन्द्रेंच्या प्रवासवर्णनात अनेक व्यक्तिरेखा वाचकांना भेटतात. त्यांच्याप्रमाणे हेमा जावडेकर – *जिप्सी लैला*, मीना प्रभू – *माझे लंडन* या लेखिकांनीही प्रवासवर्णनातून लहान-मोठ्या बारकाव्यांसह व्यक्तिचित्रणे अधिक स्पष्ट केली आहेत.

सौ. नंदा मडकईकर यांचे प्रवासवर्णन मात्र थोडे निराळे आहे. धर्मकांडात बुडालेले लोक, मृत्यूतांडव, प्रेते, स्मशान या सगळया भीषण परिस्थितीचे लेखनबद्ध रूप मडकईकरांनी मांडले आहे. अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत.

उर्मिला साळुंखे यांचे *केल्याने देशाटन* हे नवे जग, नवी माणसे दर्शविणारे प्रवासवर्णन

आहे तर अश्विनी धोंगडे यांचे *देशांतर* हे प्रवासवर्णन स्त्रीवादी भूमिका बजाविणारे आहे. मीना प्रभू – *दक्षिणरंग*, हेमा लेले – *सलाम बाहरीन* ही प्रवासवर्णने ऐतिहासिक, भौगोलिक स्थळांचा वेध घेणारी आहेत.

एकूणच १९५१ ते २००० च्या टप्प्यात प्रवासवर्णन हा साहित्यप्रकार एका वेगळया स्वरुपात समोर आला आहे. केवळ मनोरंजन म्हणून या प्रकाराकडे स्त्रीने न पहाता अनेक अंगांनी प्रवासवर्णनाच्या सखोल गाभ्यात पोहोचण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे.

सौंदर्यात्मकता, काव्यात्मकता, कथात्मकता, रमणीयता, चित्तवेधकता, लौकिकता, पौराणिकता, ऐतिहासिकता, भौगोलिकता, रंजकता, शोधात्मकता अशा निरनिराळया अंगांनी प्रवासवर्णने खुलली आहेत.

प्रामुख्याने विदेशी केलेला प्रवास, आलेले बरे-वाईट अनुभव, तुलना, अडचणींवर केलेली मात, इतर स्त्री पुरुषांची मानसिकता, चालीरीती – रूढी – परंपरा, शिस्त, कायदे, ठिकाणाची वैशिष्ट्ये, स्त्रीत्त्वाची जाणीव, स्त्रीवादी विचारशैली आणि एकूणच समाज परिवर्तनाबरोबर स्त्रीने स्वतःचा घेतलेला शोध प्रवासवर्णनातून समोर येत आहे. स्त्री म्हणून उंबरठ्या आत स्वतःला एक स्वातंत्र्य व्यक्ती आहे ही जाणीव झाल्याने तिने केलेला प्रवास, प्रवासात भेटलेली माणसे, स्थळे आणि आलेले अनुभव याची साखळी स्त्रियांनी प्रवासवर्णनातून गुंफलेली आहे.

### ड) २००० ते २०१०या कालखंडातील प्रवासवर्णने

पृथ्वीच्या एका कोपऱ्यातील व्यक्ती पृथ्वीच्या अनेक कोपऱ्यांची भ्रमंती करायला लागते, कधी पर्यटन म्हणून तर कधी संशोधन म्हणून तर कधी अपवादात्मक पद्धतीने. आणि यातूनच आलेले अनुभव जेव्हा ती व्यक्ती शब्दबद्ध पद्धतीने मांडते तेव्हा ललित गद्यातील प्रवासवर्णन हा टप्पा उदयास येतो.

वेगवेगळया देशात भ्रमंती करून चालीरीती माहिती करून घेण्यासाठी, छंद आवड जोपासण्यासाठी किंवा कौटुंबिक अथवा गटाने केलेले पर्यटन प्रवासवर्णनामध्ये प्रामुख्याने आढळते.

सुधा गोखले यांनी *मोहतरम्मा ते अम्मा* हे प्रवासवर्णन लिहून नंदनवन असलेले काश्मिर दहशतवादांनी कसे पोखरून काढले आहे,हे अधोरेखित केले आहे. मुस्लीम कुटुंबे, सततचे बलात्कार सहन करणाऱ्या स्त्रिया, जीव मुठीत घेऊन जगणारे जीव, तरूण पिढीची दहशतवादाकडे असलेली ओढ, भ्रमनिरास, अगतिक यातनांचे हे प्रवासवर्णन मराठी

प्रवासवर्णनामध्ये अतिशय वेगळे ठरले आहे. कारण एकट्या स्त्रीने स्वतःच्या जीवावर बेतलेल्या प्रसंगातूनही बचाव करत, शोध घेत लिहिलेले हे प्रवासवर्णन आहे.

जपान, ब्राझील, चिली, फ्रांस, चीन, श्रीलंका, पाकिस्तान, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड इत्यादी देशात पती शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांच्या समवेत केलेला प्रवास डॉ. मंगला नारळीकर यांनी *पाहिलेले देश, भेटलेली माणसे* या प्रवासवर्णनातून शब्दबद्ध केलेला आहे. ओघवती भाषाशैली असल्याने लेखिका प्रत्येक देशाचे वेगळेपण तुलनात्मक दृष्ट्या मांडतात आणि वाचकाला शब्दातून देश भ्रमंती घडवून आणतात.

व्यवसायाने डॉक्टर असलेले दळवी दाम्पत्य सौदी अरेबियातील कष्टमय जीवन सुमारे पंचवीस वर्षं जवळून पाहतात. डॉ. उज्वला दळवी यांनी *सोन्याच्या धुराचे ठसके* या प्रवासवर्णनातून संपूर्ण सौदी अरेबियन जीवन वृत्तांत शब्दबद्ध केला आहे.

उद्याची महासत्ता होण्याचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या चीनचे *चीन: दर्शन उगवत्या महासत्तेचे* हे प्रवासवर्णन वसुधा गोडबोले यांनी लिहिले आहे.

कथा, कादंबरी विश्वात वेगळा ठसा निर्माण करणाऱ्या सानिया यांचा *प्रवास* हा लेखसंग्रह उल्लेखनीय आहे. वडिलांच्या आणि नवऱ्याच्या बदलीच्या नोकरीमुळे त्यांची सतत भ्रमंती होत गेली आणि त्यानंतर चर्चासत्रांमुळे अनेक देशोदेशी भटकंती झाली त्यातूनच त्यांनी *प्रवास* हा लेखसंग्रह प्रसिद्ध केला. व्यापक अनुभवविश्व आणि चिंतन यामुळेच हे प्रवासवर्णन उल्लेखनीय आहे.

नर्मदा दरीवरील धरणामुळे तिच्या काठावरील जैवविविधता पाण्याखाली जाईल म्हणून ते डोळे भरून पहाण्यासाठी भारती ठाकूर यांनी मैत्रिणींसह हेतुपूर्वक भ्रमंती केली. *नर्मदा परिक्रमा: एक अंतर्यात्रा* या प्रवासवर्णनातून त्यांनी एक भावनिक गुंता, द्वंद्व समोर आणली आहेत. एकूणच या प्रवासवर्णनात संपूर्ण नर्मदायान लेखिकेने रेखाटले आहे.

२००१ ते २०१० मध्ये सर्वाधिक प्रवासवर्णने रेखाटणारी लेखिका म्हणजे मीना प्रभू होय. *मेक्सिकोपर्व* (२००१), *चिनीमाती* (२००३), *इजिप्तायन* (२००५), *ग्रीकांजली* (२००६), *तुर्कनामा* (२००६), *गाथा इराणी* (२००८), *रोमराज्य – १ व २* (२००९), *वाट तिबेटची* (२०१०) ही दीर्घ प्रवासवर्णने त्यांनी प्रसिद्ध केली आहेत. *मेक्सिकोपर्व* मध्ये लेखिका अनेक शहरांची सफर घडवून आणते. भौगोलिक आणि आधुनिक जीवनशैलीही टिपते. आदिवासी जमात आणि तेथील बाजार पाहून नकळत ती भारतीय जीवनाशी तुलना करते. अमेरिकेच्या अत्यंत जवळ असूनही मेक्सिको पुढारलेला नाही हे सांगायला लेखिका विसरत नाही.

*चिनीमाती* मध्ये लेखिका अनेक चौकसबुद्धीने जगताना दिसते. मोठी शहरे, त्यांची वैशिष्ट्ये, भाषाशैली, सामाजिक-सांस्कृतिक विचारसरणी लेखिका मांडताना दिसते. चीनची अतिप्राचीन संस्कृती लेखिकेला खिळवून ठेवते. त्या देशाचा इतिहास, भूगोल प्रेक्षणीय वास्तू, सांस्कृतिक वारसा मनाला भुरळ पाडणारा असल्याचे प्रवासवर्णनातून समोर येते. अनेक वैशिष्ट्येपूर्ण असलेला चीन अतिशय समर्पक पद्धतीने लेखिकेने मांडला आहे.

*इजिप्तायन* मध्ये इस्त्रायल, जॉर्डन, इजिप्त या देशांमध्ये एकटीने केलेली भ्रमंती रेखाटली आहे. येशू ख्रिस्ताची जन्मभूमी, वेगवेगळा सांस्कृतिक वारसा असलेली शहरे, प्राचीन सांस्कृतिक वारसा, कलाकुसूर,पिरॅमिड्स,प्राचीन कला, लिपी, धर्म, ग्रंथ, भाषाशैली, जीवनशैली अतिशय चौकसबुद्धीने लेखिकेने मांडलेले आहे. *ग्रीकांजली, तुर्कनामा, गाथा इराणी, रोमराज्य – १ व २* या सर्व प्रवासवर्णनातून प्रत्येक देशाची ठेवण कशी वैशिष्ट्यपूर्ण आहे हे लेखिकेने अधोरेखित केले आहे. अनेक प्रसंगांना सामोरे जात हा प्रवासाचा स्व हट्ट लेखिका पूर्ण करताना दिसते.

विविधात्मक प्राचीन मंदिरे, लेण्या, शिल्पे, ऐतिहासिक दृष्ट्या, महत्त्वाची स्थळे यांची भ्रमंती करून *वेगळी माती वेगळा वास* हे प्रवासवर्णन अरुणा ढेरे यांनी रेखाटले आहे. अनेक लहान-लहान शिल्पातील बारकावे, लेण्यांची ठेवण, वास्तू प्रकार, मंदिर आणि त्यातील वैशिष्ट्ये, कलात्मकता, यांचा संगम या प्रवासवर्णनातून समोर येतो.

गिर्यारोहणाची अत्यंत आवड असलेल्या राणी दुर्वे यांनी *लक्ष पावलांचे अर्घ्य* हा प्रवास लेखसंग्रह प्रसिद्ध केला. प्रामुख्याने अवघड असणाऱ्या गोष्टीला प्राधान्य देत लेखिका ट्रेक्स करते. नद्या, पर्वतशिखरे, मंदिरे, महत्त्वाची ऐतिहासिक व भौगोलिक ठिकाणे, ऱ्हास होत चाललेली वास्तू शिल्पे, गंगटोक ट्रेक्सचे अनुभव या प्रवासलेख संग्रहाचे विशेष ठरत आहेत.

डॉ. अनुराधा मालशे यांना फेलोशिप मिळाली आणि त्यांनी दक्षिण आफ्रिकेचा दौरा केला. दरम्यान दक्षिण आफ्रिकेतील वर्णद्वेष, विवाहव्यवस्था, गुन्हेगारी, दारिद्र्य, रोगराई, गरीब-श्रीमंत दरी त्यांच्या मनात घर करून गेली. त्यांना आलेले अनुभव *इसिडिंगो* या प्रवासवर्णनातून शब्दबद्ध केले आहेत.

२००४ मध्ये मंगला गोगटे यांनी *वेलकम टू फिनलंड* हे प्रवासवर्णन लिहून फिनलंड मधील लोकांची, संस्कृतीची, प्रथांची ओळख करून दिली आहे. तर अपर्णा वेलणकर यांनी २००७ मध्ये *फॉर हिअर, ऑर टू गो?* हे प्रवासवर्णन प्रत्यक्ष मुलाखतींच्या माध्यमातून रेखाटले आहे. प्रामुख्याने आय. टी. क्रांती, इंटरनेट क्षेत्र, भारतीयांचे तिथले नागरिकत्व

आणि एकूणच जीवन संघर्ष असलेले हे प्रवासवर्णन महत्त्वाचे आहे.

राणी दुर्वे यांच्या प्रमाणेच राधिका टिपरे यांनीही हिमालयाच्या कुशीत अनेक ट्रेक्स केले. मनाली, कैलासपर्वत, गंगोत्री, गोमुख, तपोवन, अलकनंदा, पिंडारी ग्लेशियर, दार्जीलिंग, केदारनाथ, बद्रीनाथ, नेपाळ, लेह-लदाख हे असंख्य ट्रेक्स करून नैसर्गिक सौंदर्याची नवी ओळख *साद देती गिरिशिखरे* या त्यांच्या (२००७) प्रवासवर्णनातून नव्याने करून दिली आहे.

प्रा. मनिषा टिकेकर यांनी राज्यशास्त्र या विषया संदर्भात १९९९ मध्ये पाकिस्तानात जाऊन अभ्यास केला. पाकिस्तानी राजकारण, समाजकारण, सांस्कृतिक परिस्थिती, सामान्य माणूस, स्त्रियांचे प्रश्न, इतर इस्लामी देशांबरोबर पाकिस्तानचे असलेले संबंध, भारताबद्दलची मनातील असूया या सर्व परिस्थितीचे चित्रण लेखिकेने *कुंपणापलीकडला देश पाकिस्तान* (२००२) मध्ये केले आहे. "सध्याचे युग हे प्रवासाचे युग आहे. मी केलेल्या असंख्य प्रवासांपैकी,काही थोड्यांचेच वर्णन माझ्या हातून लिहिले गेले. त्या प्रवासाची ही छोटीशी झलक. जग खूप विशाल आहे, आपण पाहू तेवढे कमीच, कितीही पाहिले तरी काहीतरी राहणारच बघायचे. काहीतरी बघायचे आहे ही भावनाच आपल्या जगण्याला अर्थ देणारी, बळ पुरविणारी आहे ना? ठिकाण कोणते पाहिले ते किती प्रसिद्ध आहे, परदेशातील आहे का येथील जवळचे या सर्वांपेक्षा ते कसे बघितले याला महत्त्व आहे. मग तो खंडाळ्याचा घाट असो नाहितर नायगाराच्या कोसळणाऱ्या धारा असोत. मनाला होणारा आनंद, बहरुन आलेल्या चित्तवृत्ती ह्याच गोष्टी खऱ्या महत्त्वाच्या. तसेच माझ्या मुलांच्या आग्रहामुळे ही प्रवासचित्रे तुमच्या पर्यंत पोहोचविण्याचा विचार केलाय." [१]

परदेशी प्रवासवर्णनामध्ये तारा वनारसे यांचे *तिळा तिळा दार उघड* (२००८); अंजली कीर्तने यांचे *कॅलिडोस्कोप,* परिणिता माईनकुर्वे यांचे *सदाबहार सत्तावन* ; शोभा शेट्ये यांचे *साता समुद्रापलीकडच जग*; सुनंदा साठे यांचा *माझी युरोप गाथा*; शैलजा दाबके – *चला इंग्लंडला*; अश्विनी धोंगडे – *मध्यरात्रीच्या सूर्याचा देश - फिनलंड*; वनमाला पानसे – *रंग अमेरिकेचे, तरंग मनाचे*, दीपा कित्तूर – *अनोखा अलास्का*; स्मिता भागवत – *ओ कॅनडा*; कमलिनी फडके – *अरब मुद्रा*; मंदाकिनी गोगटे – *जांबो जांबो ग्वाना*.... इत्यादी महत्त्वपूर्ण प्रवासवर्णने वाचकांचे लक्ष वेधतात. तर भारत भ्रमंती करणाऱ्या लेखिकांमध्ये प्रतिभा भालेराव – *दिव्यत्वाचा साक्षात्कार*, वासंती घैघास – *सफर हिमाचल लदाखची*, *सफर*

*बद्रीकेदार – गंगोत्री – यमुनोत्रीची, साद पूर्व घाटाची*; माधुरी पंडितराव – *भारतदर्शन*; सुनीती मराठे – *प्रवासचित्रे*; अरुंधती जोगळेकर – *अरुपडै विङ्*; उषा पाणंदीकर – *पूर्वरूप*; रसिका लोटलीकर – *वंडर्स ऑफ सेवन सिस्टर्स*; शैला कामात.... आदि लेखिकांचा समावेश आहे.

मुळतः प्रवासवर्णन या साहित्यप्रकाराचा मुख्य हेतू हाच आहे कि, ज्या व्यक्तीने तो प्रवास, ती भ्रमंती केली आहे, ती इतरांना समजावी, भ्रमंती केलेल्या व्यक्तीचे अनुभव इतरांना समजावे, त्यातून नवे काही उदयाला यावे. कधी केवळ कुतूहल म्हणून घडलेले परदेशी दौरे किंवा अभ्यासांती घडलेला परदेशी प्रवास हा इतर कोणाच्याही वाट्याला येऊ शकतो. 'पुढच्यास ठेस, मागचा शहाणा' या म्हणीप्रमाणे जाणाऱ्या व्यक्तीला मिळालेला आनंद मागाहून जाणाऱ्या व्यक्तीला द्विगुणीत आनंद कसा मिळेल ही माहिती देते. तर आधी जाणाऱ्या व्यक्तीला मिळालेले दुःख मागाहून जाणाऱ्या व्यक्तीला नकळत शहाणे करत असते.

परदेश प्रवास, भारत भ्रमंती यातून स्त्रियांनी त्यांचे अनेक अनुभवविश्व अलगद मोकळे केले आहे. निरनिराळ्या संस्कृती, भाषा, वेशभूषा, आहार, जीवनक्रम, राजकारण, समाजकारण, सांस्कृतिक वारसा, प्राचीन पाळेमुळे, नैसर्गिक सौंदर्य, कायदे-नियम, स्त्रियांचे प्रश्न, वर्णद्वेष, श्रीमंत-गरीब दरी, दहशतवाद, युद्धनीती, आधुनिकता, दारिद्र्य.... अशा विविध टप्प्यांचा अभ्यास लेखिकांनी आपापल्या प्रवासवर्णनातून मांडलेला आहे.

एकूणच वरील सर्व प्रवासवर्णनातील सखोल गाभ्यातून वाचकाला त्या-त्या ठिकाणी जाण्यासाठी एक मार्गदर्शक म्हणून प्रवासवर्णन भूमिका बजावते आहे किंवा वाचकाला त्या-त्या प्रदेशातून शब्दबद्ध पद्धतीतून फेरफटका मारून आणण्याचे काम प्रवासवर्णने नकळत करत आहे.

**संदर्भ ग्रंथसूची**

१. सुनीता मराठे, प्रवासचित्रे, प्रथमावृत्ती ५ मे २००८ स्नेहवर्धन प्रकाशन, पृ. क्र. ८

# प्रकरण सातवे: मराठी स्त्रीलिखित समीक्षा

**प्रस्तावना:**

साधारण स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये स्त्रियांनी अनेक वाङ्मयप्रकार मराठीमध्ये हाताळलेले दिसतात. कथा, कविता, नाटक, ललित लेखन, कांदबरी, इतिहास लेखन, लोकसाहित्य अनुवाद, समीक्षा अशा अनेक साहित्य प्रकारांमध्ये स्त्रियांनी केलेली कामगिरी व लेखन हे महत्त्वाचे ठरते. स्त्रियांचे एकूण समीक्षेला असलेले योगदान याविषयी ऊहापोह आपणांस प्रस्तुत लेखनामध्ये करावयाचा आहे.

भाषेत आधी साहित्य निर्माण होते आणि मग त्यावर विविध लेखकांकडून समीक्षा केली जाते. साहित्यविश्वातील समीक्षेचे महत्त्व हे अनन्यसाधारण आहे. साहित्यकृती वाचकांपर्यंत अधिक चांगल्या पध्दतीने पोहचविण्याचा 'समीक्षा' हा एक उत्तम मार्ग आहे.

स्त्री साहित्य समीक्षेचा विचार करताना १९५०-२००० व त्यानंतर २००० ते २०१५ पर्यंतचा काळ आपणांस येथे अभ्यासासाठी अभिप्रेत आहे. २६ जून १९७५ साली भारतात आणीबाणी जाहीर झाली; आणि त्याच वर्षी युनोने आंतरराष्ट्रीय महिला वर्ष जाहीर केले व तेव्हापासून खऱ्या अर्थाने जागतिक पातळीवरील सर्वच क्षेत्रात महिलांचा मुक्त संचार खऱ्या अर्थाने सुरू झाला. पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून समानतेच्या तत्त्वावर स्त्री ताठ मानेने स्वतःच्या पायावर उभी राहिली व अनेक क्षेत्रामध्ये आपल्या कर्तृत्वाने यश शिखरे पादाक्रांत करू लागली.

**स्त्रीलिखित समीक्षाः व्याप्ती आणि मर्यादा: -**

समीक्षा ही साहित्यनिर्मितीनंतरची एक महत्त्वाची प्रक्रिया आहे. एकूणच समृदध साहित्यनिर्मिती वाचकांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहचविण्यात समीक्षेचा मोलाचा वाटा आहे.

परंतु इ.स. १९५० नंतरच्या काळखंडातील समीक्षेचा अभ्यास या प्रबंधात केला आहे. या काळात समीक्षेच्या अभ्यासासाठी घालून घेतलेल्या मर्यादा व या क्षेत्राच्या व्याप्तीत बसणारे जवळजवळ १७० ग्रंथ आढळून येतात.

मराठीमध्ये आजवर प्रकाशित झालेले स्त्रीलिखित समीक्षेचे सर्व ग्रंथ या अभ्यासात घेता आले नाहीत . परंतु साधारणतः महत्त्वाचे असे सर्वच ग्रंथ या अभ्यासात समाविष्ट झालेले आहेत असे आपण म्हणू शकतो. ग्रंथ रूपाने प्रसिद्ध झालेली समीक्षा व संशोधन वाङ्.मय या

अभ्यासासाठी विचारात घ्यायचे आहे.

**स्त्रीलिखित समीक्षा: स्वरूप -**

प्रस्तुत लेखामध्ये साहित्य क्षेत्रातील सुरूवातीपासूनच्या सर्वच स्त्रीलिखित समीक्षा लेखनाचा परामर्श घेता आलेला नाही. कारण स्त्रियांनी लिहिलेल्या साहित्य, समीक्षा संशोधनाचा हा धावता आढावा आहे. या प्रकारामध्ये 'व्यक्ती आणि वाङ्.मय' या स्वरूपाचे समीक्षालेखन विपुल प्रमाणात झाल्याचे आढळून येते. आणि त्यानंतर प्राचीन साहित्य, लोकसाहित्य व अर्वाचीन साहित्याची समीक्षा असे ढोबळ मानाने तीन भाग पडतात.

स्त्रीलिखित समीक्षेमध्ये अर्वाचीन साहित्यात कथा, कविता, कादंबरी, नाटक, आत्मचरित्र व्याकरण, भाषाशास्त्र, वाङ्मय इतिहास अशा विषयातून विभाग करून त्या विषयांवरील समीक्षेच्या विचार केलेला आहे. एकूणच १९५० ते २०१५ या कालखंडात निर्माण झालेल्या स्त्रीलिखित समीक्षेचा अभ्यास करताना वाङ्मयप्रकारानुरूप समीक्षेचा अभ्यास केला आहे.

**स्त्रीलिखित समीक्षा: साहित्य प्रकारानुसार**

**अ) व्यक्ती आणि वाङ्मयपर समीक्षा:**

मुळातच विद्यापीठात पदव्युत्तर पदव्यांसाठी सादर झालेल्या प्रबंधांना ग्रंथरूप देऊन निर्माण झालेल्या साहित्यप्रकाराकडे पाहिले असता त्यात व्यक्ती आणि वाड.मय या शीर्षकाखाली मोठया प्रमाणावर लेखन झालेले दिसते. वेणुबाई पानसे यांनी संपादित केलेला *ह.ना. आपटे याचे चरित्र वाङ्.मय विवेचन* या प्रबंध लेखनापासून याची सुरूवात होते असे आपणांस म्हणता येईल. ग्रंथकाराच्या खाजगी जीवनाला महत्त्व देत ग्रंथ व ग्रंथकाराचे जीवन यांचा भावपूर्ण संबंध अधोरेखित करत वेणुबाई पानसे यांनी ह.ना. आपटे यांच्या लेखनाविषयाची आपली दिशा स्पष्ट केलेली आहे. यानंतरच्या काळात लेखकाचे व्यक्तिमत्त्व आणि व्यक्तित्व अभ्यासाच्या आधारे साहित्य हे समीक्षेच्या माध्यमातून उलगडून दाखविण्याचा प्रयत्न सुरू झाला. १९३१ साली प्रकाशित झालेल्या *ह.ना. आपटे* यांच्या जीवनचरित्रावरील ग्रंथानंतर जवळजवळ ४० वर्षानंतर *व्यक्ती व वाङ्मय* विषयक ग्रंथ प्रकाशित झाला. निर्मला कणेकर लिखित *कवी बी काव्यचर्चा व चरित्र* हा ग्रंथ १९७२ साली प्रसिद्ध झाला. राजकीय कविता, प्रेम कविता, त्यांनी केलेले रसग्रहण इ. ची चर्चा यात

आढळते. रहस्यमयतेचा गाभा असलेल्या कवी बी यांच्या कविता त्यांच्या चरित्रातून मांडण्याचा प्रयत्न या ग्रंथात निर्मला कणेकरांनी केलेला आहे.

आशयघनता व सौंदर्यानुभुतीचे अनुपम दर्शन आपल्या कवितेतून घडविणारे कविवर्य भास्कर रामचंद्र तांबे, आशा सावदेकर यांनी तांबे यांच्या प्रेमविषयक, सामाजिक, विधवाविषयक, भावगीते, नाट्याकाव्ये इत्यादी काव्याचा परामर्श त्यांच्या चरित्रात्मक अभ्यासातून केला आहे. १९७९ साली सुनंदा दास यांच्या संशोधनातून *य.गो. जोशी : व्यक्ती आणि वाङ्.मय* हा ग्रंथ सिद्ध झाला. य.गो.जोशी यांचे जीवनविषयक तत्त्वज्ञान हे एका समाजशिक्षकाचे होते आणि याचे प्रतिबिंब य.गों.जोशीच्या साहित्यनिर्मितीत दिसत होते. या सर्व गोष्टींचा परामर्श सुनंदा दास यांनी आपल्या ग्रंथात घेतला आहे. ज्येष्ठ समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकर यांच्याबद्दल त्यांच्या चरित्रविषयक ग्रंथातून सुनंदा देशपांडे यांनी *रा.भि. जोशी: साहित्ययात्रा* या पुस्तकामध्ये जोशी सरांची अंतर्मुखता त्यांची अभिजाततेकडे असलेली ओढ आधुनिक वाङ्.मयाच्या सामर्थ्याची त्यांना असलेली जाणीव अलका इनामदार यांनी करून दिली.

मराठी साहित्य क्षेत्रात विनोदाच्या अंगाने पूर्वपरंपरेने चालत आलेली वाट निवडण्यापेक्षा *चि.वि.जोशी* यांनी आपली वेगळी वाट चोखंदळली आहे. विदयुल्लता वैदय यांनी आपल्या *अक्षरहास्य* या समीक्षात्मक विनोदाच्या तात्विक उपपत्तीमध्ये न गुंतता समर्थपणे चि.विं ची वेगळी वैशिष्ट्ये वाचकांना उलगडून दाखविलेली आहे. हिंदुत्वाचा अभिमान, प्रखर आत्मनिष्ठा, संस्कार आणि देवावरील श्रद्धा अशा व्यक्ती विशेषणांमुळे ओळखले जाणारे *पु. भा. भावे* हे जीवनविषयक ठाम भूमिका असलेले तत्त्वज्ञ होते. या. सर्व गोष्टींचे प्रतिबिंब त्यांच्या साहित्यातून व्यक्त होत राहिले. परिणामी त्यांची मते एकाच वाटेने जात व आग्रही होत गेली. मंगला आठलेकर यांनी आपल्या *पु. भा.भावेः साहित्यविचार* या प्रबंधातून भावेच्या व्यक्तिगत विचारांचे व त्यातील साहित्य अनुबंधाचे चित्रण चिकित्सकपणे वाचकांच्या पुढे ठेवले आहे. मराठी साहित्यक्षेत्रात प्रतिभावंत ग्रंथकार म्हणून ओळखले जाणारे *तात्यासाहेब* उर्फ *कुसुमाग्रज उर्फ वि.वा. शिरवाडकर* यांच्या साहित्याचा समग्र अभ्यास आपल्या *कुसुमाग्रजः साहित्य दर्शन* या ग्रंथात उषा देशमुख यांनी केलेला आहे. त्यांच्या या ग्रंथासंर्भात शुभांगी पातुरकर म्हणतात, " या ग्रंथातून उषा देशमुख यांनी वि.वा.शिरवाडकरांचा अभ्यासपूर्ण आढावा घेतला आहे. उत्तम संदर्भ मूल्य असलेला हा ग्रंथ नव्या संशोधनाला प्रेरणा देणारा आहे. थोडक्यात शिरवाडकरांच्या साहित्याचा

समग्र अभ्यास ग्रंथ्ररुपाने उपलब्ध करुन देण्याची महत्त्वाची कामगिरी उषा देशमुख यांनी उत्तमरित्या पार पाडली आहे."[१] कुसुमाग्रजांच्या जीवनदृष्टीत आणि साहित्यसृष्टीत अनुभवाला येणारी एकरूपता लेखिकेने अचूकपणे टिपत कुसुमाग्रजांचे जीवनचरित्र व साहित्यविचार लेखिकेने वाचकांपुढे ठेवले आहेत. 'आधुनिक गदयाचे जनक' म्हणून ओळखले जाणारे बाळशास्त्री जांभेकर यांची प्रबोधनाची वाट नलिनी मोकाटे यांनी आपल्या प्रबंधातून चिकित्सकपणे मांडली आहे.

स्त्रीलिखित समीक्षेतील महत्त्वाचे नाव विजया राजाध्यक्ष. *मर्ढेकरांची कविता: स्वरूप आणि संदर्भ* या प्रबंधामध्ये मर्ढेकरांच्या व्यक्तीमत्वापासून कवितेपर्यंतचा प्रवास उलगडून दाखविलेला आहे. १९९४ साली *भूमिकन्या: बहिणाबाई चोधरी एक चिंतन* या आपल्या प्रबंधामध्ये स्नेहलता चोधरी यांनी बहिणाबाईंचे जीवनभाष्य आणि त्यांच्या जीवनानुभवाला झालेला तत्वज्ञानाचा स्पर्श स्पष्ट करून सांगितलेला आहे. मराठी साहित्यात आणि समाज मनात आपल्या लेखनाने, संशोधनाने एक वेगळे स्थान मिळवलेल्या दुर्गा भागवत यांच्या ललित लेखनाचा अभ्यास मीना वैशंपायन यांनी आपल्या *दुर्गापर्व* या प्रबंधात केलेला आहे.

अशाप्रकारे प्रभावती येळगावकर, मंगला वैष्णव, अनुराधा पोतदार, अंजली सरदेसाई, नीला पांढरे, छाया बकाणे आदि लेखिकांनी व्यक्ती आणि वाङ्.मय या प्रकारात विपुल समीक्षा लेखन करून अनेक लेखकांचे जीवनचरित्र उलगडून दाखवले आहे.

विजया राजाध्यक्ष हे मराठी स्त्रीलिखित समीक्षाक्षेत्रातील एक अग्रस्थानी असलेले नाव आहे.*पुन्हा मर्ढेकर*(२००८) या त्यांच्या समीक्षाग्रंथामध्ये त्यांनी मर्ढेकरांच्या कवितेवर प्रकाश टाकलेला आहे. तर *शोध मर्ढेकरांचा* (२००९)या त्यांच्या समीक्षाग्रंथामध्ये कवीच्या वैयक्तिक तसेच भोवतालच्या जीवनावर प्रकाश टाकलेला आहे. तर *बहुपेढी विंदा, भाग १* (२००५)आणि *भाग २* (२००६) या त्यांच्या दोन खंडामध्ये असलेले समीक्षाग्रंथ समीक्षेच्या क्षेत्रात महत्त्वाचे आहेत. कवी विंदा करंदीकरांचे एकूणच साहित्यसमीक्षेतील योगदान व त्यांच्या वाङमयीन प्रवासाची जडणघडण विजयाबाईंनी या दोन खंडातील समीक्षेमध्ये मांडली आहे. विजयबाईंच्या लेखनाबाबत रुपाली शिंदे लिहितात की, "कवी वि.द.करंदीकर यांच्या दीर्घ वाङ्मयीन प्रवासाची जडणघडण त्यांनी लिहिलेल्या साहित्यसमीक्षेत स्पष्ट होणारी संकल्पनात्मक तात्त्विक चर्चा, साहित्यातील मूलभूत प्रश्नांची चर्चा यांचा सर्व

बाजूंनी विचार करीत विंदांचे योगदान विजयाबाईंनी स्पष्ट केले आहे. या शब्दांत त्यांच्या कार्यांचे कौतुक शिंदे यांनी केले आहे."[२] *वासुदेव बळवंत पटवर्धन* हा सरोजिनी वैदय यांचा चरित्रात्मक समीक्षा ग्रंथ संशोधनपर अभ्यासावर आधारित आहे. वा. ब. पटवर्धन यांनी *काव्य आणि काव्योदय* या ग्रंथाची रचना केली असून त्यांची सामाजिक आणि वाङमयीन दृष्टी कशा प्रकारची होती् याचा चिकित्सक अभ्यास करून लेखिकेने ती स्पष्ट केली आहे.

वाचक श्रोत्यांच्या मनावर अधिराज्य गाजविणाऱ्या कवीमध्ये कवी मंगेश पाडगावकरांचा समावेश होतो. त्यांच्या कवितेची समीक्षा सुलभा दुसाने यांनी *मंगेश पाडगावकरांची कविता* या आपल्या ग्रंथामध्ये केली आहे. कवीच्या काव्यप्रवासाच्या तसेच कवितेतील मर्मस्थनांचा शोध घेण्याच्या हेतूने त्यांनी ही काव्यसमीक्षा केली आहे. तर पाडगावकरांच्या साह्यिाचा अभ्यासपूर्ण परामर्श घेत कांचन पाडगावकर यांनी *आनंदयात्री पाडगावकर* हा ग्रंथ लिहिला आहे.परभाषेतील दर्जेदार साह्यिाचे सौंदर्य उलगडून दाखवत श्रद्धा पराते यांनी *अमृता प्रीतमत् एक चिंतन* हा ग्रंथ लिहिला आहे.

पु.भा.भावे यांचा समावेश १९४५ नंतरच्या मराठी नवकथेच्या शिल्पकारांपैकी एक कथाकार म्हणून होतो. नीलिमा निशाणदार यांनी *कथाकार पु.भा.भावे* (२०००) या ग्रंथामध्ये भावेंच्या कथालेखनाची वैशिष्ट्ये आणि त्यांच्या कथेवरील आक्षेपांची चिकित्सा त्यांनी या ग्रंथामध्ये केली आहे. तसेच मंगला आठलेकर यांनी पु.भा.भावेंच्या कथेची वैशिष्टये महत्त्व सांगत भावेंच्या कथांचा नेमकेपणाने वेध घेतला आहे.

चि.त्र्यं.खानोलकर हे एक कवी कादंबरीकार नाटककार म्हणून प्रसिदध आहेत. पुष्पलता राजापुरे-तापस यांनी *खानोलकरांची नाटयसृष्टी* (२००३) या ग्रंथामध्ये खानोलरांच्या नाटयसृष्टीचा वेध घेतला आहे. द्वंद्वात्मकता हे खानोलकरांच्या नाटयसृष्टीचे वैशिष्ट्य आहे. हे *एक शून्य बाजीराव* नाटकातून प्रत्ययाला येते. राजापुरे यांनी खानोलकरांच्या नाटकांची वैशिष्टये आपल्या अभ्यासातून सांगितलेली आहेत.

वासंती देवधर यांनी *दिवाकर कृष्ण* यांच्या कथावैशिष्ट्यांची नोंद घेत *दिवाकर कृष्ण: व्यकती व वाङमय* (२००७) हा ग्रंथ लिहिला आहे. मनोविश्लेषणात्मकता,

काव्यात्मकता आणि सूचकता हे गुणविशेष. तर सहेतूकता, भावविवशता हे कथादोष *दिवाकर कृष्ण* यांच्या कथालेखनातून व्यक्त होतात. ग.दि.माडगूळकरांना गीतकार गीतरामायणकार अशा नावांनी संबोधले जाते. वासंती राक्षे यांनी माडगूळकरांच्या कथा आणि कादंबऱ्यांची समीक्षा *गदिमा साहित्य आणि लोकतत्व* या ग्रंथामध्ये केली आहे.

गणेश रंगणाथ दंडवते यांचे बडोद्यातील वाङ्मयीन कार्य आणि त्यांचे महत्त्व याचा अभ्यास करून मृणालिणी कामत यांनी *एक अलक्षित वाङ्मयसेवक* या अभ्यासपूर्ण ग्रंथाची रचना केली आहे. भाषाव्यवहाराचा ग्रंथनिर्मितीशी जवळचा संबंध असल्याने ग्रंथनिर्मितीबरोबरच भाषाव्यवहाराचा कशा पद्धतीने विकास होतो, हे या ग्रंथात त्यांनी सांगितले आहे. आधुनिक मराठी वाङ्मय, मराठी कादंबरी, मराठी नाटक, या सगळयांचा वाङ्मयेतिहास हा गणेश रंगणाथ दंडवते यांनी रचला हे लेखिकेने पुराव्यानिशी स्पष्ट केले आहे.

माता द्रौपदी,चार्वाक, या विद्याधर पुंडलिकांच्या एकांकिका विशेष गाजलेल्या असून त्यामध्ये मानवी मनातील भावना, एकाकीपणाची जाणीव, मानवी मनातील भावभावनांचा परस्परविरोधी संघर्ष आाणि सूड भावनेचे शेवटी अश्रू आणि दुखा:त रूपांतर होते. या सगळयांची जाणीव त्यांच्या एकांकिकांमधून स्पष्ट होते. एकूणच त्यांच्या समग्र साहित्याचा अभ्यास करून अरूंधती वैद्य यांनी *विद्याधर पुंडलिकांचे ललित साहित्य: स्वरूप व समीक्षा* (२००५) हा ग्रंथ लिहिला.

गंगाधर गाडगीळांनी कथा, नाटक, आत्मचरित्र, विनोद, प्रवासवर्णन या अशा अनेक साहित्यप्रकारांवर भरपूर प्रमाणात समीक्षालेखन केलेले आहे. त्या समीक्षेवरील समीक्षात्मक लेखन भारती निरगुडकर यांनी *गाडगीळांची समीक्षारूपे* या ग्रंथामध्ये केलेले आहे.

संशोधनपर आणि ललित गद्यलेखनाने मराठी साहित्यविश्व हे समृद्ध केलेले आहे. याबाबतीत *दुर्गा भागवत* आणि *इरावती कर्वे* यांची नावे मराठी साह्यि विश्वात महत्त्वाची आहेत. शकुंतला भावे लिखित *वेध दुर्गाबाईंच्या साह्यिाचा* आणि उषा कोटबागी लिखित *इरावती कर्वे : व्यक्ती आणि वाङमय* या दोन ग्रंथावरून त्यांच्या अभ्यासाचे महत्त्व स्त्री

अभ्यासकांनी जाणले हे लक्षात येते. दुर्गाबाईंच्या ललितलेखनाचे विशेष *लोकसाहित्याच्या अभ्यासाची पद्धतशीर मांडणी* या शकुंतला भावे यांच्या ग्रंथात सिद्ध केले आहेत. तर ललित निबंधाच्या अग्रदूत असे इरावती कर्वेंना संबोधणाऱ्या उषा कोटबागी *यांनी इरावती कर्वे : व्यक्ती आणि वाङ्मय* (२००५) या समीक्षा ग्रंथामध्ये इरावतीबाईंच्या वाङ्मयाचा समग्र अभ्यास केला आहे.

**ब) प्राचीन साहित्याची समीक्षा:**

भारतीय संस्कृती ही जगातील एक प्राचीन संस्कृती म्हणून ओळखली जाते. या संस्कृतीचा पाया हा मुळातच नैतिकतेवर आधारीत आहे. सांस्कृतिक विविधतेमुळे भारतीय संस्कृती ही समृद्धीच्या शिखरांवर पोहोचली. याच भारतीय संस्कृतीतील नैतिकता, सांस्कृतिकता, ऐतिहासिकता आणि सामाजिक जीवनपटाचा आधारस्तंभ असलेले *रामायण* आणि *महाभारत* ही महाकाव्ये भारतीय समाजमनाच्या एका कप्प्यामध्ये आपले पाय घट्ट रोवून आहेत. संपूर्ण भारतातून अनेक लेखक, संशोधक, समीक्षकांनी या दोन ग्रंथांचा आपल्या काळानुरूप आपल्या विचार-विवेचनातून, तत्वज्ञानाचा धांडोळा घेण्याचा प्रयत्न केला आहे. *महाभारत* हा ग्रंथ खूपच व्यामिश्र, समग्र व दीर्घ स्वरूपाचा असल्याने त्याचे पूनर्मूल्यांकन हे विविध काळात विविध समीक्षक व लेखकांकडून, न्यायव्यवस्था, समाजदर्शन, राजकीय व्यवहार, धार्मिक दर्शन तसेच महाभारताच्या अभ्यासातून त्यांच्या अंतःस्थ सौंदर्याचा शोध घेत महाभारतावर मूलभूत संशोधन करणाऱ्या लेखकांमध्ये इरावती कर्वे हे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. आपल्या *युगांत* या कादंबरीमध्ये त्यांनी महाभारताचा समग्र आढावा घेतला आहे. मूळ मानववंश शास्त्रज्ञ असल्याने मानवी इतिहास आणि उत्क्रांती या दोन भक्कम आधारावर त्यांचे संशोधन उभे आहे.

महाभारतातील ‘कर्ण’ एक अतिशय लोकप्रिय व्यक्तीरेखा आहे. मराठी साहित्य व समीक्षकांनी या व्यक्तीरेखेचे चित्रण विविध पध्द्तीने केलेले दिसते. कादंबरी नाटक, ललितलेख या वाड्.मय प्रकाराच्या स्वरूपात कर्णाचे चरित्र व व्यक्तीमत्त्वाचे मूल्यांकन आणि पूनर्लेखन करण्याचा प्रयत्न मराठी लेखकांनी केलेला आढळतो. सुशिला पाटील यांनी

आपल्या *मराठी साहित्यातील कर्ण* या ग्रंथामध्ये 'कर्ण' या व्यक्तीरेखेचा सांगोपांग मागोवा घेतलेला आहे. सीमा कुळकर्णी यांनी आपल्या *रामायण: तुलनात्मक दृष्टीक्षेप* या प्रबंधामध्ये रामायणाचा सखोल अभ्यास केलेला दिसतो. मराठी समीक्षा क्षेत्रात रामायणावर अभ्यास झालेला हा महत्त्वाचा ग्रंथ आहे.

**क) संत साहित्याची समीक्षा:**

मध्ययुगीन मराठी वाङ्.मय निर्मिती ही साधारणः इ.स.९ व्या शतकापासून झाली. परदेशी आक्रमणाच्या पार्श्वभूमीवर पिचलेल्या समाजव्यवस्थेला प्रबोधनाकडे आणि आत्मनिर्भरतेकडे घेऊन जाणारे संत साहित्य हा एक महत्त्वाचा वाङ्.मयप्रकार म्हणता येईल. मराठी संत आणि त्यांचे काव्य याबद्दल मराठी समाज मनात एक अंतःस्थ असा भावबंध आहे. मराठी कवितेचा उगम असलेली संत कविता म्हणून या काव्याचा वारंवार समीक्षकांकडून पुनरावलोकन करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. त्यास स्त्री समीक्षक देखील अपवाद नाहीत. संत साहित्याचा सर्वांगाने अभ्यास स्त्री समीक्षकांनी केलेला आहे. विशेषत: संत कवयित्रींच्या काव्यामागील प्रेरणा, त्यांच्या काव्यातून उमटणारे स्त्री मनाचे हुंकार, भाव, आपल्या लेखणीतून शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न त्यातून दिसून येतो.

शालिनी जावडेकर यांनी आपल्या *संत बहिणाबाईची गाथा* या आपल्या ग्रंथातून असा प्रयत्न केल्याचे दिसते. प्राचीन मराठी संत साहित्यातील पाच कवयित्रींच्या काव्यनिर्मितीचे स्वरूप स्पष्ट करून प्राचीन मराठी कवितेतील त्याचे स्थान, निश्चित करण्याचा प्रयत्न सुहासिनी इर्लेकर यांनी आपल्या *प्राचीन मराठी कवयित्रींचे वाङ्.मयीन कार्य (१९८०)* या ग्रंथात केला आहे.

संत मालिकेतील एक प्रमुख संत म्हणून तुकाराम सामान्य जनांना अधिक आपलेसे वाटतात. परंपरागत महाजनकी ते संत तुकाराम महाराज होण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास हा सामान्य माणसाला स्वबळावर स्वत्व सिद्ध करण्यासाठी प्रेरणा देतो. मराठी स्त्री समीक्षकांनी विविध दृष्टिकोनातून तुकारामांच्या साहित्याचा परामर्ष घेतलेला आहे. त्यापैकी मालती पाटील यांनी आपल्या *तुकारामाची प्रतिमा सृष्टी व त्यांच्या काव्यात्मव्यक्तीचे मूल्यमापन* या ग्रंथातून 'सर्वात्म भावी तुकाराम' तसेच तुकारामांच्या जीवनातील अंतर्बाह्य संघर्षाची अनुभव रूपे प्रगट केलेली आहेत. याच पठडीमध्ये अनुराधा पोतदार यांनी आपल्या

*तुकाराम: कथात्म साहित्य एक अभ्यास* या प्रबंधात तुकारामांच्या चरित्रावर आधारित अभ्यास सादर केलेला आहे.

संतसाहित्याच्या इमारतीचा पाया ठरलेले ज्ञानेश्वर हे लौकिक अर्थाने आपल्या साहित्य योगदानामुळे वेगळे ठरतात. म्हणूनच त्यांचा अभ्यास समीक्षेच्या अभ्यासात महत्त्वाचा ठरतो. सुशिला पाटील यांनी आपल्या ज्ञानेश्वरीतून प्राप्त होणारे *ज्ञानेश्वरांचे व्यक्तिमत्त्व* (१९८४) या ग्रंथात हा अभ्यास केल्याचे दिसते. तर ज्ञानेश्वरांच्या अभिरूची संपन्न तत्त्वाज्ञानामागील प्रेरणा आणि त्याचे सखोल तत्त्वज्ञान यांचा धांडोळा पद्मा कुलकर्णी यांनी आपल्या *ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान* या ग्रंथात केला आहे. ज्ञानेश्वरांचा वाङ्.मयीन विचारप्रवाह त्यांच्याच सौंदर्यवादी विवेचन परंपरेतून उलगडून दाखवत शामला मुजुमदार यांनी *ज्ञानेश्वरांचा अलौकिकतावाद* हा प्रबंध सिद्ध केला.  ज्ञानेश्वरी हे काव्य कि तत्त्वज्ञान हा मूलभूत प्रश्न समीक्षकांनी अनेक दृष्टिंनी चर्चिलेला आहे. ज्ञानदेवांनी विपुल अभंगरचना केली. ज्ञानदेवांनी योजिलेला शब्दकळा, त्यामागील सौंदर्याचा वेध घेणारा *ज्ञानदेवांच्या अभंगातील शब्दकळा* हा ग्रंथ वसुंधरा बनहट्टी यांनी लिहिलेला आहे. दिपा क्षीरसागर यांनी आपल्या *संत ज्ञानेश्वर आणि संत मीराबाई यांची मधुराभक्ती* या ग्रंथात दोन्ही संतांच्या मधुराभक्तीचा तुलनात्मक अभ्यास केलेला आहे.

प्राचीन मराठी वाङ्.मयाचा बराचसा भाग स्फुट काव्याने आख्यानांनी व्यापलेला आहे. या स्फुट काव्यांचे स्वरूप त्यांच्या निर्मिती मागील प्रेरणा याचा समग्र विचार अनुराधा कुळकर्णी यांनी आपल्या *प्राचीन मराठीतील स्फूट आख्यान काव्यांचा अभ्यास* या ग्रंथात केला आहे. पंडित कवी 'श्रीधर' यांच्यावर आधारित *श्रीधरांची स्फुट कविता आकलन आणि आस्वाद* हा शोभना डिंगरे यांचा ग्रंथ आहे.

संत एकनाथांच्या स्फुट लेखनातील वैशिष्ट्ये टिपणारा *संत एकनाथांचे स्फुट लेखन* हा ग्रंथ कुमोद गोसावी यांचा आहे. एकनाथ महाराजांनी प्रबोधनासाठी भारूड हे माध्यम एका वेगळया दृष्टीकोनातून समाजासमोर उभे केले. जवळपास सर्व संतांनी भारूडे रचली असली तरी नाथांनी हाताळलेला हा वाङ्.मय प्रकार वाङ्.मयाचे एक व्यवच्छेदक लक्षण बनला. भारूडामधील उपहास, रहस्यमयता, अध्यात्मातील अवस्था, उपरोध, मनोरंजन यामुळे वाचकांना आणि अभ्यासकांना भारूडाने स्वतःकडे वारंवार खेचलेले दिसून येते. म्हणूनच समग्र भारूड वाङ्.मयाचा अभ्यास त्यादृष्टिने अधिक महत्त्वाचा ठरतो. कुंदा जगदाळे यांनी आपल्या *भारूड वाङ्.मय: एक चिकित्सक अभ्यास* या ग्रंथात हा समग्र अभ्यास केलेला

दिसून येतो.

सुहासिनी इर्लेकरांनी संपादित केलेले *संत नामदेवकृत श्री ज्ञानदेव चरित्र*, पदमावती क्षोत्रीय यांनी लिहिलेले *संत चोखामेळा आणि परिवार*, लीला गोविलकर यांनी लिहिलेले *पंडीत कवी मुक्तेश्वर* या लेखनातून संबंधित कवींच्या काव्यदृष्टीचे ज्ञान होते. *विष्णुदास नाम्याचे महाभारत* या आपल्या पुस्तकामध्ये सरोजिनी शेंडे यांनी महाभारताचे वेगळेपण अधोरेखित केले आहे. महाराष्ट्राच्या इतिहासातील संपन्न अशा यादवकालीन वाड्.मयाचा आढावा घेताना सुहासिनी इर्लेकर यांनी *मराठी काव्यसमीक्षा* या आपल्या ग्रंथामधून ओव्या, धवळे, ज्ञानेश्वरांची गूढ रचना, जनाबाईचे अभंग, सांप्रदायिक काव्य परंपरा असा समग्र आढावा घेतला आहे.

महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधरस्वामी, त्यांचे जीवनकार्य, त्यांचे आचरण, स्वभाववैशिष्टये या सगळयांचा धागा एकत्र करून सुमन बेलवलकर यांनी *लीळाचरित्रातील समाजदर्शन* हा ग्रंथ लिहिला.चक्रधरस्वामींचा समाजातील विविध घटकांकडे बघण्याचा दृष्टीकोन हा अतिशय तर्कशुध्द होता. एकत्र आणि विभक्त कुटुंबपदधतीबरोबरच कुटुंबसंस्था ही पितृप्रधान तसेच पुरूष केंद्रित असल्यामुळे साहजिकच पुरूषांचे वर्चस्व होते. निसर्गत: देणगी असलेला मासिक धर्म आणि स्त्रीची अमंगळता अस्पृश्यता याविषयी तकालीन समाजात असलेला धर्मवादी दृष्टीकोन नाकारत चक्रधरस्वामींनी स्त्री चे महत्त्व पटवून दिले आहे. स्त्रियांच्या विटाळाची अस्पर्शता मोडून काढत, या एकाच कारणामुळे स्त्री ला तुच्छ लेखले जाऊ नये असे चक्रधरांनी सांगितले व स्त्रियांना महानुभाव पंथात प्रवेश दिला. त्याकाळी राजव्यवहारात वापरल्या जाणाऱ्या रूवा, दाम, कवड्या, पाईका या धातूंच्या नाण्यांची माहिती ही *लीळाचरित्र* या ग्रंथामधून मिळते.

दीपा देशपांडे यांनी *महानुभावीय लोकसाहित्य* हा ग्रंथ महानुभाव पंथातील शिष्यांनी लोकसाह्यिाचा केलेला अभ्यास यावर संशोधन करून सिद्ध केलेला आहे. चरित्रग्रंथलेखन,स्फुटकाव्य, आरत्या, स्तोत्रे, पदे, पोवाडे अशी मौलिक स्वरूपाची साहित्यनिर्मिती करून महानुभाव पंथीयांनी निर्माण केलेले आपले स्थान आणि त्याद्वारा महानुभाव पंथाचा प्रसार होण्याच्या दृष्टीने केलेले कार्य निश्चितच महत्त्वपूर्ण आहे.

*लीळाचरित्र* हा ग्रंथ महानुभाव पंथ तसेच मराठी साहित्य आणि संस्कृतीच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जातो. त्यामुळे या ग्रंथावर अनेक अभ्यासकांनी संशोधन करून त्यातून पुढे आलेले जे काही वादविवादाचे विषय आहेत. त्याचा चिकित्सक पद्धतीने अभ्यास करून स्नेहा महांबरे यांनी *लीळाचरित्र वादस्थळ आणि संपादन* हा ग्रंथ लिहिला. *लीळाचरित्र* हा चरित्रग्रंथ आहे. तसेच त्याला आत्मचरित्रही म्हणता येते. हे या ग्रंथात लेखिकेने सप्रमाण सिद्ध केले आहे.

नामस्मरणावर आधारित भक्तिमार्गाचा अवलंब करत संतांनी पंथप्रसार केला. त्यावर अनेक अभ्यासकांनी संशोधन करत वारकरी संप्रदायाने दिलेल्या मूल्यांचा अन्वयार्थ लावण्याचे तसेच अभंगरचनेचा संतांच्या जीवनकार्यांशी असलेला संबंध शोधण्याचे काम केले. या सर्वांचा प्रत्ययार्थ गौरी नामजोशी यांनी *नाममहिमा* हा ग्रंथ लिहिला.

अस्पृश्य कुटुंबात जन्माला आलेल्या चोखोबांनी आपल्या वाटयाला आलेले दु:ख, वेदना या आपल्या कवितांमधून व्यक्त केलेल्या आहेत.चोखोबांची कविता ही जातीयतेविरूदध केलेल्या संघर्षाचे प्रतीक होती. तत्कालीन समाजजीवनातील सामाजिक विषमता, अस्पृश्यता, कटुता ही चोखोबांनी आपल्या कवितांमधून सांगितली आहेत. या सगळया गोष्टींचा संदर्भ उराशी बाळगून सरिता हरिदास जांभुळे यांनी *चोखोबाची कविता* हा ग्रंथ लिहिला.

जनाबाईंचे चरित्र त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटना या सगळया गोष्टींचा विचार करत रेखा जगनाळे यांनी *संत कवयित्री जनाबाई काव्यदर्शन* हा आपला ग्रंथ सिद्ध केला. जनाबाईंच्या घराण्याला भक्तिपरंपरा नव्हती. तसेच समाजामध्ये प्रतिष्ठा ही नव्हती. तरी देखील तिने भक्तिमार्गाची वाटचाल स्वत: केली ही विशेष बाब आहे.

मुक्ताबाईंच्या अभंगरचनेचा अभ्यास करत अभंगरचनेतून व्यक्त होणारे तिचे चरित्र आणि व्यक्तिमत्त्व केतकी मोडक यांनी आपल्या *संत मुक्ताबाई व्यक्ति आणि वाङ्मय* ग्रंथात व्यक्त केले आहे.

*मनाचे श्लोक* हा वनिता ठाकूर यांचा संशोधनपर ग्रंथ आहे. समर्थ रामदासांचा एकूणच रचनेचा अभ्यास करताना मनाचे श्लोक आणि त्यांची दुसरी महत्त्ववपूर्ण रचना म्हणजे

*दासबोध*, हे दोन्ही विचारात घ्यावे लागतात. लेखिकेने *मनाचे श्लोक आणि रामदासांच्या अन्य साहित्याच्या तुलना* या संशोधन ग्रंथामध्ये रामदासांच्या रचनेचा अभ्यास केलेला आहे. शोभा कराळे लिखित *वीरशैव मराठी अभंग कविता* हा मराठी संतसाहित्यापासून दुर्लक्षित राहिलेल्या वीरशैव संतांच्या अभंगरचनेची ओळख करून देणारा ग्रंथ आहे. वीरशैवांनी मराठी भाषेतून विपुल व विस्तृत अशा प्रकारची काव्यरचना केलेली आहे. लेखिकेने सहा वीरशैव कवींच्या अभंगरचनेचा विचार करत जवळपास साडेचौदा हजार अभंगाचा आढावा घेतला आहे.

**ड) लोकसाहित्याची समीक्षा:**

महाराष्ट्राला लोककलांची बहुमूल्य देणगी लाभलेली आहे. वर्षानुवर्षे मौखिक परंपरेने जपत आलेला ठेवा उत्तरोत्तर साहित्याच्या स्वरूपात संपादित होत गेला. लोकसाहित्य हा पाया असलेले खूप साहित्य निर्माण झाले व त्यानंतर त्यावर समीक्षा व संशोधनही होऊ लागले. अशा लोकसाहित्याच्या प्रांतातील स्त्री समीक्षकांचे योगदान हे भरीव स्वरूपाचे आहे. यामध्ये अग्रक्रमाने घ्यावे असे नाव म्हणजे दुर्गा भागवत. त्यांच्या चिकित्सक अभ्यास वृत्तीचा परिचय करून देणारा *लोकसाहित्याची रूपरेषा* हा ग्रंथ १९५६ साली लिहिला गेला. अनेक प्रांतातील लोकसाहित्याचा आणि मिथकांचा प्रगाढ अभ्यास असल्यामुळे लोकसाहित्य, त्याचे महत्त्व आणि सांस्कृतिक अभिसरणातील त्याचे स्थान हे आपल्या चिकित्सक व विश्लेषक वृत्तीने त्यांनी सांगितले आहे. व्यापक अर्थाने लोकसाहित्य ही संज्ञा आपल्या लेखनात वापरणाऱ्या दुर्गा भागवत या महत्त्वाच्या लेखिका आहे. धर्म आणि साहित्य यांच्यातील अंतःस्थ संबंधाचे सखोल चिंतन प्रगट करणारा दुर्गाबाईंचा *धर्म आणि लोकसाहित्य* हा ग्रंथ लोकसाहित्याच्या अभ्यासकांना वेगळी दिशा दर्शविणारा आहे.

सरोजिनी बाबर या लोकसाहित्याच्या क्षेत्रातील संकलक, संपादक आणि अभ्यासक म्हणून मराठी साहित्यविश्वात प्रसिध्द आहेत. भौतिक स्वरूपात जपलेले हे लोकसाहित्य संपादित करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. अपौरूषेय गणले जाणारे वाड्.मय, प्राचीन मराठी काव्य, अलिखित स्त्री वाड्.मय इतिहासकालीन पत्रव्यवहार या सर्वांचा परिचय त्यांनी सखोलपणे आपल्या *वनिता सारस्वत* (१९६१) या ग्रंथात करून दिलेला आहे.

*लोकसाहित्य* या  दुसऱ्या ग्रंथात त्यांनी लोकसाहित्य या संकल्पनेचे व्यापक विश्लेषण करून लोकसाहित्याच्या विविध अभ्यास दिशांचे मार्गदर्शन संशोधक व इतर अभ्यासकांना केलेले आहे. *अडगुळं मडगुळं, इथे इथे बस रे काऊ* यासारख्या बालकवितांचा तसेच चिऊ काऊच्या बालकथांचा परिचय आपल्या *लोकलेणे* या ग्रंथात करून देणाऱ्या पद्मा मोरजे याचेही कार्य लेखन क्षेत्रात दखलपात्र आहे.

लोकसाहित्याचा हा अभ्यास समीक्षा हे फक्त प्रादेशिक भागापुरतेच मर्यादित न राहता या सीमारेषा ओलांडून त्यापलीकडे पोहोचलेले आहे. कर्नाटक, आंध्रप्रदेश या सीमा प्रदेशांमध्ये आढळणाऱ्या लोकसाहित्याचा अभ्यास करणाऱ्या तारा परांजपे यांनी त्यांच्या *सीमा प्रदेशातील भावगंगा* या ग्रंथामध्ये वेगवेगळया प्रदेशातील लोकसाहित्याचे भावविश्व अभ्यासकांना उलगडून दाखवलेले आहे. *लोकसाहित्यातील स्त्रीगीते* हा विदया व्यवहारे यांचा ग्रंथही याच अनुंषगाने परस्पर एकरूपेतून साहित्याचा अभ्यास करणाऱ्या एका वेगळया धाटणीचा ठरतो. लोककला व लोकपरंपरेचा अभ्यास करणाऱ्या स्त्री अभ्यासकांमध्ये वैदेही कोळेकर यांचे संशोधन हे व्यापक पातळीवरील आहे. मराठी लोककथांमधील रंजकता, प्रबोधनात्मकता, श्रद्धावृत्ती, एकूण त्याची सखोलता तपासून जागतिक पातळीवरील लोककथा व लोकसाहित्याशी त्याचे संबंध शोधण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. तसेच या लोककथांचे सत्त्व, त्यांचे समाजमान्यत्व असा बहुपेढी अभ्यास त्यांनी आपल्या *मराठी लोककथा स्वरूप मीमांसा* या ग्रंथामध्ये केला आहे.

लोककला आणि लोकपरंपरेतील स्त्रीजीवन यांच्यातील परस्परसंबंधांचे दर्शन घडवून त्यांचा अभ्यास करून तारा भवाळकर यांनी *लोकांगण* (२००६) हा समीक्षा ग्रंथ वाचकांस उपलब्ध करून दिला. तसेच लोकसाहित्याच्या समीक्षक व अभ्यासक असलेल्या तारा भवाळकर यांचा *लोकसाहित्याच्या अभ्यासदिशा* (२००९) हा ग्रंथ लोकसाहित्याच्या अभ्यासाची व्याप्ती स्पष्ट करत; लोकसाहित्याच्या अभ्यासकांना मार्गदर्शन करणारा ठरतो. रा. चिं.ढेरे हे संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक आहेत. त्यांनी केलेल्या संशोधनाचा अभ्यास करून तारा भवाळकर यांनी *संस्कृतीची शोधयात्रा* हा ग्रंथ लिहिला. रा.चिं.च्या अभ्यासाचा भाग असलेली आदिमसंस्कृती, लोकसंस्कृती आणि नागरसंस्कृती याबाबत सांगताना लेखिकेने नागरसंस्कृती ही लोकसंस्कृतीशी कशा पद्धतीने जोडली गेलेली असते याबाबत

लेखिकेने आपल्या या ग्रंथात सांगितले आहे.

शोभा नाईक यांचा लोकसंचितातील *स्त्रीचिन्नावेध* (२०१०) हा ग्रंथ बेळगाव परिसरातील मराठी लोकगीतांच्या संकलनात्मक अभ्यासातून त्यावर संशोधन करून सिद्ध केला आहे. या लोकगीतांमध्ये लोकगीतांतील स्त्रीकेंद्रित जीवन नातेसंबंध समाजजीवन यावर लेखिकेने संशोधन करत आज लोकगीतांचे झालेले विस्मरण आणि लोकगीते गाणारी स्त्री लोप पावत जात असल्याची विवशता व्यक्त केली आहे.

लोकसाहित्यात आधुनिक कालखंडात योगदान देणाऱ्या महत्त्वाच्या स्त्री समीक्षक म्हणजे कुन्ता जगदाळे यांचा *मराठी मुस्लीम ओव्या* हा ग्रंथ हिंदू मुस्लीम धर्मीयांचे परस्परांचे असलेले नाते सांगणारा आहे. त्यांनी हिंदूधर्मीय स्त्रीने रचलेली ओवी आणि मुस्लिमधर्मीय स्त्रीने रचलेली ओवी यांची तुलना या ग्रंथात केली आहे.

आदिवासी मौखिक परंपरेचा शोध घेऊन आदिवासी स्त्रीजीवनाची वैशिष्ट्ये मांडत अलका हिवाळे यांनी *आदिवासी लोकगीतांतील स्त्रीजीवन* हा ग्रंथ सिद्ध केला. जुन्या मूल्यांमध्ये अडकलेल्या आदिवासी स्त्रीचे चित्र लोकगीतांतून व्यक्त होते. नव्या युगासोबतच स्वत:मध्ये परिवर्तन करू इच्छिणारी स्त्री लोकगीतांतून व्यक्त होत स्वत:ला बदलण्यासाठी उत्सुक असलेली आणि दुसऱ्या बाजूला परंपरेमध्ये अडकलेला पुरूष हा अलका हिवाळे यांच्या अभ्यासाचा एक महत्त्वपूर्ण पैलू आहे. त्यांच्या ग्रंथाच्यासंदर्भात रुपाली शिंदे म्हणतात की, "आदिवासी लोकसाहित्याच्या अभ्यासाकडे अभ्यासक क्वचित वळतात. या पार्श्वभूमीवर आदिवासींच्या वसाहतीत प्रत्यक्ष जाऊन आदिवासींच्या भेटीगाठी आणि चर्चेतून अलका यांनी आदिवासी लोकगीतांमधील स्त्रीजीवन या विषयाचा केलेला अभ्यास उल्लेखनीय वाटतो." [३]

आगरी संस्कृतीचे महत्त्व विशद करत श्रीमती सुनंदा मोरखेडकर यांनी *आगरी लोकगीते आणि परंपरा* हा ग्रंथ सिद्ध केला.आगरी लोकांच्या लग्नातील धवळे, गौरी गणपतीची अनेक गाणी, स्त्रियांची लोकगीते यांचा अभ्यास करून लेखिकेने आगरी लोकांची परंपरा त्यांचे राहणीमान याबाबत वैशिष्टये नोंदविली आहेत.

समर्थ स्त्रियांचा इतिहास हे आशालता कांबळे लिखित पुस्तक बौद्ध काळातील थेरी

(भिक्षुकी )यांच्या मनोबलाचा शोध घेणार आहे. स्त्रीच्या विराटपणाचा, तिच्या नैसर्गिक स्वातंत्र्याचा आणि तिच्या जैविकतेचा शोध घेणारे हे पुस्तक महत्त्वाचे आहे.

अशा प्रकारे विस्तृत व्यापक समाजजीवनाचा अविभाज्य भाग असलेल्या लोकपरंपरा, लोककला, लोककथा एकूणच समग्र लोकसाहित्याचे लेखन, संशोधन व समीक्षा या क्षेत्रातील स्त्री लेखिकांचे योगदान त्यांनी केलेले संशोधन व त्यातून इतर नवसंशोधकांना मिळालेली दिशा ही निशितच मार्गदर्शक आहे. या स्त्रीलेखिकांच्या अन्ययसाधारण कामगिरीमुळे मराठी सारस्वतातील लोकसाहित्याचे अभंग समृद्ध झाले आहे.

### इ) अर्वाचीन साहित्य: कवितेची समीक्षा:

अलका चिडगोपकर यांनी आपल्या *बहिणाबाईची गाणी: एक काव्यदर्शन* या आपल्या ग्रंथामध्ये बहिणाबाईच्या काव्याचा सखोल परामर्ष घेतलेला आहे. खानदेशी कवितेचे लेणे ठरलेल्या *काव्यरत्नावली* या आपल्या ग्रंथात खानदेशी कवितेचा सखोल अभ्यास करून शकुंतला आठवले यांनी खानदेशी भाषा व त्यातून व्यक्त झालेल्या भावना यांचे सखोल चिंतन केलेले आहे.

मराठी समीक्षा विश्वातील एक महत्त्वाचे नाव म्हणजे विजया राजाध्यक्ष. विषेशतः अर्वाचीन कवितेच्या समीक्षेमध्ये विजया राजध्याक्ष यांचे नाव प्रकर्षाने घ्यावे लागते. मर्ढेकरांच्या कवितांवरील त्यांचे संशोधन हे खूप भरीव स्वरूपाचे आहे. त्या व्यतिरिक्त कवितेच्या प्रांतातील मुशाफिरी करताना त्यांच्या मनाला भावलेल्या, भिडलेल्या विचारांना अस्वस्थ करून गेलेल्या कवींच्या कविता यांचे तरल चित्रण त्यांनी आपल्या *कवितारती* मध्ये केलेले आहे. या ग्रंथातून कवींच्या वैयक्तिक काव्यानुभवावर व त्यातून व्यक्त होणाऱ्या जीवनावर प्रकाश टाकणारे ठरते. *वेध कवितेचा* या त्यांच्या आणखी एका लेखसंग्रहातील लेख त्यांच्या या चिकित्सक वृत्तीचा प्रत्यय करून देतात.

मराठी कविता क्षेत्रातील असेच एक महत्त्वाचे नाव म्हणजे इंदिरा संत. प्राचीन कवितेशी असणारे इंदिरा संतांच्या कवितेचे नाते समजुन घेत त्यांच्या काव्यसंग्रहाचे विश्लेषणात्मक मूल्यमापन करीत सुनीता जोशी यांनी आपला *इंदिरा संत यांची कविता: एक आकलन* हा ग्रंथ सिद्ध केला आहे. इंदिरा संतांच्या कवितेचा आपल्या मनावर झालेला परिणाम वर्णन करताना त्या कवितांचे वैयक्तिक रसग्रहण चित्रा देशपांडे यांनी आपल्या *इंदिरा संत यांच्या भावकवितांचा गर्भ रेशमी शेला* या ग्रंथामध्ये केले आहे. मराठी

प्रतिभाशाली लेखकांमध्ये ठळकपणे घ्यावे असे नाव म्हणजे आरती प्रभु उर्फ चि.त्र्यं. खानोलकर, कथा, कादंबरी, नाटक कविता अशा अनेक विविध प्रांतामधून मुक्तपणे संचार करणारे आरती प्रभू जेव्हा कविता करतात, तेव्हा त्या कविता वाचकमनाच्या तळाशी खोल रूतून बसणाऱ्या ठरतात. त्यांच्या या संवेदनशीलतेचे व कवितांचे मर्मबंध उलगडून दाखवण्याचा प्रयत्न माधवी वैद्य यांनी आपल्या *आरती प्रभूंची कविता* या पुस्तकांमध्ये केलेले आहे.

अरूणा ढेरे हे नाव मराठी साहित्य व कविता विश्वात अग्रक्रमाने घ्यावे असे आहे. मूलतः कवयित्रीचा पिंड असल्यामुळे त्यांच्या समीक्षा या तात्विकतेबरोबरच तरल मनाचे भावबंध व्यक्त करणाऱ्या पातळीवर पोहोचतात. कवितेचे भावतत्त्व समजून घेण्यासाठी वेळोवेळी लिहिलेल्या समीक्षा लेखनाचा समावेश असलेला *कवितेच्या शोधात* हा अरूणा ढेरे यांचा ग्रंथ निशितच समीक्षेच्या क्षेत्रात महत्त्वाचा आहे. याबरोबरच अनुराधा पोतदार यांचा *सहकंप* तसेच मराठी दलित कवितेचे स्वरूप दाखवणारा ललिता कुंभोजकर यांचा *दलित कविताः एक दर्शन* तसेच पुष्पा राजापुरे यांचे *सुर्वे यांचे विदयापीठ* असे अनेक विविध ग्रंथ कवितेच्या क्षेत्रातील समीक्षेचे मानदंड ठरलेले आहेत.

एकूणच मराठी साह्यिविश्वात काव्यसमीक्षा ही फक्त १९५० ते२००० एवढया काळापुरतीच मर्यादित न राहता ती पुढे एकविसाव्या शतकात देखील करण्यात आलेली दिसते. एकविसाव्या शतकातदेखील स्त्रीलिखित साहित्याचा अभ्यास अनेक संशोधकांनी केलेला दिसतो,यामध्ये अग्रस्थानी उल्लेख करावयाचा झाल्यास निलीमा गुंडी यांचे नाव पुढे येते. त्यांनी इ.स. १९५० ते २००० पर्यंतच्या कालखंडातील स्त्रीकाव्याची समीक्षा आपल्या *लाटांचे मनोगत* या ग्रंथामध्ये केली आहे. स्त्रीचे आंतरिक जीवन; स्त्रीकाव्यातील जाणिवांचा तिचा प्रवास, स्त्रीला तिच्या स्वत:च्या जगण्याचे तसेच भोवतालच्या जगाविषयीचे प्राप्त झालेले ज्ञान त्यांनी *लाटांचे मनोगत* (२००८) या आपल्या ग्रंथामध्ये मांडलेले आहे. पुरूषप्रधान संस्कृतीत सत्ता ही पुरूषाच्या हाती असल्यामुळे स्त्रीला कमी लेखले जाते. मुळात स्त्रीला कमी लेखण्याचे कारण म्हणजे पुरूषाकडे पुनरूपादनाची क्षमता ही स्त्री पेक्षा अधिक असते असे लेखिकेने या ग्रंथात सांगितले आहे.

*मराठी काव्यातील स्त्रीचित्रण* हा वेदश्री थिगळे यांचा समीक्षा ग्रंथ प्राचीन मराठी

काव्यापासून सुरूवात करीत तीन कालखंडातील मराठी काव्यसृष्टीमध्ये काव्यलेखन करणाऱ्या स्त्रियांचे चित्रण या विषयावर लिहिलेला आहे. यामध्ये त्यांनी प्राचीन, अर्वाचीन आाणि आधुनिक कालखंडातील कवयित्रींच्या कवितेत स्वत:च्या अस्तिवाचा शोध घेत आपली स्त्रीत्त्वाची भूमिका वेगवेगळया नात्यांच्या भूमिकेतून स्पष्ट केलेली आहे. अरूण कोलटकर, दि.पु.चित्रे हे आधुनिक काळातील कवी आहेत. या आधुनिक कवींच्या कवितेतील स्त्रीचित्रणाशी संबंधित अशी काही ठळक वैशिष्टये वेदश्री थिगळे यांनी नोंदविली आहेत. एखादया कवीच्या कवितेची वैशिष्टयपूर्णता जाणून घेऊन त्यावर स्त्रियांनी समीक्षा केल्याचे आढळून येते. यासंदर्भात आशा सावदेकरांचे नाव पुढे येते. त्यांनी कवी बा.भ.बोरकरांच्या कवितेची वैशिष्टयपूर्णता जाणून घेऊन त्यावर काव्यसमीक्षा लिहिलेली आहे. मागील काही वर्षांत आस्वादक समीक्षा भरपूर मोठया प्रमाणात लिहिली गेली. वेगवेगळया कवींवर लिहिलेल्या लेखांचे संग्रह करून त्यावर पुस्तक प्रकाशित करण्याचे कामही झाले आहे. या संदर्भात *काव्यगंगेच्या तटावर* हा आशा सावदेकरांचा आस्वादक समीक्षा ग्रंथ प्रसिद्ध आहे.

आधुनिक कालखंडात काव्यसमीक्षा करणाऱ्या लेखिकांची संख्या हल्ली वाढत चालली आहे. कारण स्त्रीमनाच्या भावना त्यांना कवितेमधून अलगदरित्या स्पष्ट करत अभिव्यक्त होता येत असल्यामुळे या क्षेत्रात लेखनाचे प्रमाण वाढले आहे. त्यापैकी अलका चिडगोपकर यांचा *अर्वाचीन मराठी कवयित्री* हा १९५० ते २००० या कालखंडातील स्त्रीकवितेची समीक्षा करणारा ग्रंथ प्रसिदध आहे.

**फ) नाटकाची समीक्षा:**

मराठी रंगभूमी आणि त्यावर सादर होणारे नाटक हा महत्त्वाचा विषय आहे. दृकश्राव्य माध्यमाचा पाया असलेल्या मराठी नाटक संहितांना मराठी साहित्यात अग्रस्थान प्राप्त झालेले आहे. किर्लोस्करांचे *सौभद्र,* देवलांचे *संगीतशारदा,* गोविंदाग्रजांचे *एकच प्याला* मामा वरेरकरांचे *आंधळयाची शाळा,* आचार्य अत्र्यांचे *लग्नाची बेडी, तो मी नव्हेच,* पु.ल. देशपांडे यांचे *तुझे आहे तुजपाशी*, वसंत कानेटकरांचे *रायगडाला जेव्हा जाग येते*, विजय तेडुलकरांचे *शांतता कोर्ट चालू आहे*, *घाशीराम घोतवाल*, शफाअत खान यांचे *शोभायात्रा,*

सतीश  आळेकर यांचे *महानिर्वाण* अशा अनेक विविध नाटकांमधून मराठी समाजाच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक, सांस्कृतिक अशा नानाविध विचारधारांचे प्रवाह उगम पावलेले दिसतात. नाट्यासंहिताच्या अभ्यासावर भर देण्याचा स्त्री अभ्यासकांनी प्रयत्न केलेला दिसतो. या नाट्कांची समीक्षा स्त्रीलिखित नाट्यसमीक्षा या सदरात समविष्ट होते.

'मराठी रंगभूमीचे जनक' म्हणून परिचित असणाऱ्या विष्णुदास भावे यांच्या नाटकाचा मूलस्त्रोत कोणता? याविषयी अभ्यासकांचे विविध विचारप्रवाह आहेत. हा स्त्रोत तंजावरी नाटके आहे. हे सिद्ध करण्याचा प्रयत्न सरोजिनी शेंडे यांनी आपल्या मराठी नाटकांची गंगोत्री अर्थात *तंजावरी मराठी संगीत नाटके* या ग्रंथात केला आहे. 'नाट्याशास्त्राचे जनक' 'भरतमुनी' यांच्यापासून आधुनिक लोकनाट्यापर्यंत भारतीय रंगभूमीची परंपरा ही अविरत असून आजच्या प्रादेशिक लोकनाट्यामागे संस्कृत रंगभूमीची परंपरा आहे. अशा स्वरूपाचा सिद्धांत मांडण्याचा प्रयत्न माया सरदेसाई यांनी *भारतीय रंगभूमीची परंपरा* या पुस्तकात केलेला आहे. या अनुषंगाने तारा भवाळकर यांचेच *मिथक आणि नाटक* हा एक समीक्षाग्रंथ महत्त्वाचा ठरतो. नाटकाची संहिता आणि रंगमंचावरील नाट्याविष्कार हे दोन परस्परावलंबी घटक आहेत. मराठी रंगभूमीच्या उगमापासून या प्रवासात या दोन घटकांचा विकास कसा घडून आला. याचा परामर्श शोभा देशमुख यांनी आपल्या *नाट्यलेखन आणि नाटयविष्कार* या आपल्या ग्रंथात घेतलेला आहे.

मराठी साहित्यातील अनुवादित कथा, कादंबऱ्या, नाटके यांनी प्रारंभीचे मराठी साहित्य हे खऱ्या अर्थाने समृद्ध केले. अनुवादित नाटकाची खास वैशिष्ट्यपूर्ण परंपरा मराठी साहित्यविश्वात आहे. शोभा देशमुख यांनी आपल्या *रंगभूमी अनुवादित नाटकांची* या पुस्तकांमध्ये मराठी नाटकांच्या निर्मितीमागील प्रेरणा, पाश्चिमात्त्य नाटकांचे मराठी रंगभूमीवरील स्वरूप  अशा अनेक अंगाने धांडोळा घेतलेला आहे. १९३०-१९५० ते ५५ पर्यंतचा काळ हा मराठी रंगभूमीचे अंधारयुग म्हणून ओळखला जातो. परंतु या काळातही काही नाटके आणि नाटककार यांच्या वाटचालीच्या खुणा आढळतात. मामा वरेकरांच्या *आंधळयाची शाळा* या नवीन नाटकीय प्रवृत्तीचा उदय व यानंतरचा काळ हा सांस्कृतिकदृष्टया महत्त्वाचा आहे. या संक्रमण काळात मराठी रंगभूमी ही कशी बदलत गेली हे नाट्यासंहितांच्या संदर्भात तपासत शुभदा शेळके यांनी या नाट्यासंक्रमण काळाचा

मागोव आपल्या *काही नाटके काही नाटककार* या ग्रंथात घेतलेला आहे. चाळीशीच्या दशकातील महत्त्वाचे नाटककार म्हणून आचार्य अत्रेंचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागते. वसुंधरा देवस्थळी यांनी तत्कालीन रंगभूमी, अत्रे यांच्या नाटकातील विनोद व संगीत तसेच त्यांच्या नाटकावर झालेला टिकेचा व त्या टिकेवर अंत्र्यांनी केलेल्या समर्थनाचा यथोचित परामर्श आपल्या *नाटककार अत्रे* या आपल्या ग्रंथामध्ये घेतलेला दिसतो. मरगळलेल्या मराठी रंगभूमीला पुनरूज्जीवन प्राप्त करून देणाऱ्या नाटककारांमध्ये मो.ग. रांगणेकर यांचा सिंहाचा वाटा आहे. सामान्य प्रेक्षक डोळयासमोर ठेवून नाटके लिहिणारा, दृष्य प्रेरणामूलक नाटय प्रतिभा लाभलेला हा नव्या काळाचा नाटककार हा निष्कर्ष काढलेल्या मोहिनी बर्वे यांनी रांगणेकरांच्या नाटकांचा विविधांगानी परामर्ष घेत *मो. ग. रांगणेकरांची नाट्यसिद्धी* हा ग्रंथ लिहिला.

कुसुमाग्रज उर्फ वि.वा. शिरवाडकर यांच्या वाड्.मयीन योगदानाच्या कुतूहलापोटी शोभा देशमुख यांचा *शिरवाडकरांची नाटके* हा ग्रंथ सिद्ध झाला. कारण कवी आणि नाटककार या दोन्ही प्रवृत्तींचा मिलाफ शिरवाडकरांच्या मध्ये बघण्यास मिळतो. विजय तेंडुलकर यांच्यानंतर महत्त्वाचे मराठी नाटककार म्हणून महेश एलकुंचवार यांचे नाव अग्रक्रमाने येते. मोजकेच पण लक्षणीय लेखन केलेल्या एलकुंचवारांच्या नाटकांनी नाट्यावर्तुळ ढवळून काढले असेही म्हणता येते. क्षणभंगुर मानवी जीवनाच्या प्रयोजनातील अर्थहीनतेने व्याकूळ झालेल्या या नाटककाराला या प्रयोजनाचा शोध का घ्यावासा वाटला याचा अभ्यास संध्या अमृते यांनी आपल्या *एलकुंचवारांची नाट्यसृष्टी* या ग्रंथात केलेला आहे.

स्वाती कर्वे यांनी *दळवींची नाटके:एक अंतर्वेध* या आपल्या ग्रंथातून जयवंत दळवी यांच्या नाटकांचा अभ्यास केलेला आहे. सुप्रसिध्द समीक्षक उमा दादेगावकर यांनी जयवंत दळवी यांच्या *बॅरिस्टर* या आधी कथा मग कादंबरी आणि त्यानंतर नाटक या प्रवासाच्या जडणघडणीवर वाड्.मयीन रचनांतरांचा अभ्यास करण्याचा पहिला प्रयत्न मराठी साहित्यामध्ये केला. याचे फलदृप म्हणून *बॅरिस्टर: तीन रूपे* हा त्यांचा समीक्षा ग्रंथ खूपच गाजला. *मराठी कादंबऱ्याची रंगयात्रा* हा शुभदा खाडीलकर यांचा ग्रंथ हा १९२२-१९८२ या काळातील साठ कांदबऱ्यांचा अभ्यास मांडतो. असाच मराठी कादंबऱ्यांचा नाट्यारूपांतराचा अभ्यास करत कल्पना कामत यांनी *मराठी कादंबऱ्याची नाट्यारूपांतरणे* हा ग्रंथ सिद्ध केला. वीणा देव, शकुंतला खोत, सुनीता सहस्त्रबुद्धे, मुक्ता मनोहर, विजया

टिळक अशा अनेक लेखिकांनी मराठी नाटकातील समीक्षा क्षेत्रात दिलेले योगदान हे अनन्यसाधारण आहे. या महत्त्वाच्या अनेक स्त्री समीक्षकांमुळे नाट्यसृष्टीच्या उगमापासून ते आजपर्यंत बदलत गेलेले स्वरूप उलगडण्यास मदत झाली.

सुधा पेशकर यांचा *स्त्री नाटककारांचे योगदान* (२०१०) हा नाटयसमीक्षात्मक ग्रंथ अतिशय महत्त्वपूर्ण आहे. इ .स. १९८२ ते २००७ या एकशे दहा वर्षांच्या काळातील स्त्री नाटककारांनी मराठी नाटकाला काय दिले याचा विचार त्यानी आपल्या या ग्रंथात मांडला आहे. नाटक लिहिल्यानंतरच्या स्त्रियांना येणाऱ्या अनेक अडचणी त्यांनी या ग्रंथात सांगितल्या आहेत. काही कारणांमुळे स्त्रियांनी लिहिलेली नाटके ही अप्रकाशित राहिलेली आहेत,हे लेखिकेने निदर्शनास आणून दिलेले आहे.

मराठी नाटयसृष्टीतील अतिशय महत्त्वाचे असे नाव म्हणजे मधुरा कोरान्ने. त्यांचा *नाटयाक्षरे* (२००५) हा ग्रंथ स्त्रीचे समाजातील तसेच कुटुंबातील तिचे स्थान, स्त्रीची मानसिकता यावर प्रकाश टाकणारा आहे. तसेच *स्त्री नाटककारांची नाटके* (२००२) हा देखील त्यांचा ग्रंथ मराठी नाटयसमीक्षेच्या दृष्टीने अतिशय महत्त्ववपूर्ण असाच आहे. इ. स. १८५० ते २००४ या कालखंडातील स्त्रीलिखित नाटकांचा अभ्यास करून त्यांनी हा ग्रंथ सिद्ध केला आहे. सोनाबाई केरकर या पहिल्या नाटककार आहेत हे सिद्ध करणारे सप्रमाण विवेचन लेखिकेने या ग्रंथात केले आहे.

स्त्रियांनी कमी प्रमाणात नाट्यलेखन केलेले आहे यामागे नेमके कोणते कारण असावे याचे उत्तर शोधताना लेखिकेने स्त्री मनाशी निगडीत अनेक कारणे सांगितली आहेत. स्त्री ही कल्पनेपेक्षा स्वानुभवाला प्राधान्य देते. तसेच स्त्रीला अनेक मर्यादा असतात असेही लेखिकेने पटवून दिलेले आहे. या सर्व गोष्टींचा परामर्श घेत लेखिकेने यामुळेच कदाचित स्त्रिया नाटकाकडे वळल्या नसाव्यात असे सांगितले आहे. एकंदरीत मधुरा कोरान्ने यांनी स्त्री नाटककारांच्या बाबतीत केलेले समीक्षालेखन हे स्त्रीलिखित मराठी नाट्यसमीक्षेत भर घालणारे आहे. *एकपात्री प्रयोग:स्वरूप आणि कलारूप* (२००८) ह्या मधुरा कोरान्ने लिखित समीक्षा ग्रंथात एकपात्री प्रयोगाची प्रयोजने सांगितली आहेत. स्त्रियांचा कल हा एकपात्री प्रयोग करण्याकडे अधिक प्रमाणात असल्याचे दिसून येते .आस्वाद एकपात्री प्रयोगाचे

कालचे आणि आजचे स्वरूप,  एकपात्री कलाकारांचे मनोगत या सगळयांचा आढावा त्यांनी आपल्या या ग्रंथात घेतला आहे. तसेच *नाटयगंध* या त्यांच्या पुस्तकात त्यांनी आतापर्यंतच्या सर्व नाटकांचा आढावा घेतलेला आहे.

शोभा देशमुख यांचा *मराठी नाटकातील स्त्रीरूपे* हा समीक्षा ग्रंथ नाटयांतर्गत स्त्रीरूपांचे दर्शन घडविणारा आहे. विजय तेंडूलकर, चि.त्र्यं.खानोलकर आणि महेश एलकुंचवार या तीन नाटककारांचा सखोलपणे अभ्यास करून सुप्रिया पेंढारी यांनी *नाटयसृष्टीतील विद्रोह आणि नवता* हा आपला समीक्षाग्रंथ सिद्ध केला. आधीच्या काही नाटककारांचा परामर्श घेत या तिघांच्या नाटकातील विद्रोहाचे स्वरूप कसे होते हे सांगून या नाटककारांचे मराठी नाटयसृष्टीतील योगदान कसे महत्वपूर्ण आहे,याबद्दल त्यांनी आपल्या या ग्रंथात सांगितले आहे.

*संगीत शारदा* या नाटकाचा तत्कालीन समाजावर कलाक्षेत्रावर झालेला परिणाम विशद करत अंजली जोशी यांनी *संगीत शारदा : वाङ्मयीन घटना* या ग्रंथामधून या नाटकावर गेल्या दहा वर्षात झालेल्या टीकेचे संशोधन करून आपला हा ग्रंथ सिद्ध केला.

दिग्दर्शन आणि प्रेक्षकाची भूमिका कशी असावी नवीन नाटककाराने लिहिलेले प्रेक्षकांपर्यंत कसे पोचवावे हे सर्व सांगताना पुष्पा काणे यांचा *तंत्र नाटयदिग्दर्शनाचे* हा ग्रंथ अतिशय महत्त्ववपूर्ण ठरतो.

*वेध नाटकांचा* (२००१) या आरती कुलकर्णी यांच्या ग्रंथात नाटकाची मांडणी, कथा, पात्रांचे स्वभावचित्रण या सर्वांच्या अनुषंगाने काही महत्त्वाच्या नाटकांवर समीक्षात्मक लेखन केले आहे.

त्याचप्रमाणे पाश्चात्त्य अभ्यासकांनी नाटकाविषयी जी काही आपली मते मांडली आहेत याचा अभ्यास करून उज्ज्वला जाधव यांनी *मराठी शोकात्म नाटक* (२००५) हा ग्रंथ लिहिला. तर सैद्धांतिक पातळीवर शोकांतिकेचा परामर्श घेत *मराठी नाटकातील शोकांतिकेचा नवा प्रवाह* (२००९) हा ग्रंथ संध्या टिळक यांनी सिद्ध केला आहे.

### ठ) कादंबरीची समीक्षा

मराठी नाटयसंहितांवर विपुल प्रमाणात व विस्तृत प्रमाणावर लिखाण आणि समीक्षा करणाऱ्या स्त्री समीक्षक 'कादंबरी' या वाङमयप्रकाराकडे प्रारंभीच्या काळात कमी प्रमाणात वळलेल्या दिसतात. कुसुमावती देशपांडे यांचा *मराठी कादंबरीचे पहिले शतक* (१९५३)आणि उषा हस्तक यांचे *कादंबरी आणि मराठी कादंबरी* (१९९३) हे ग्रंथ मराठी कादंबरीची समीक्षा करणारे असले तरी दोन्ही लेखिकांच्या भिन्न विचार प्रवृत्तींमुळे तिचे स्वरूपही वेगळे आहे.

१९६९ साली अचला जोशींनी दिलेल्या व्याख्यानांचे ग्रंथरूप म्हणजे त्यांचा *हरी नारायण आपटे यांच्या कादंबऱ्या* हा ग्रंथ समीक्षेच्या प्रांतात महत्त्वाचा आहे. आपटे यांच्या कादंबऱ्यांच्या यशापयशाचे मापन त्यांनी या ग्रंथात केले आहे. ह. ना.आपटेंचे अनेक पैलू उलगडत जीवनाकडे सजगतेने आणि डोळस दृष्टीने बघत ह. ना. आपटे यांचे लेखनसामर्थ्य आणि त्यापुढे जाऊन त्यांच्या लेखनमर्यादा यांचे सखोल विश्लेषण अचला जोशी यांनी प्रस्तुत ग्रंथात केले आहे.

अनेक समीक्षकांनी टीका केलेले समीक्षक म्हणजे श्री.व्यं.केतकर. यांच्या या आक्षेपांच्या पार्श्वभूमीवर भागवतांनी *केतकरी कादंबरी* हा ग्रंथ लिहिला. केतकरांनी आपल्या लिखाणाला कादंबऱ्याचे स्वरूप देऊन लोकांना चकवले, असे अनेकविध आक्षेप केतकरांच्या कादंबऱ्यावर घेतले गेले. असे असताना या आक्षेपाशी केतकरांच्या कादंबऱ्या कितपत एकरूप पावतात याची तपासणी दुर्गा भागवत यांनी केली आहे. खानोलकर उर्फ आरती प्रभू हे असेच एक प्रतिभावान लेखक कवी आहेत. |त्यांच्या कादंबऱ्यांनी मराठी सारस्वत विश्वाला नवी दिशा दिली,असे म्हणण्यापेक्षा समाजातील विकृत मनोवृत्ती वासनाधीनता, दु:ख, दैन्य, वंचना, परंपरा इत्यादींचा सक्षमपणे वेध घेण्याचे श्रेय निश्चितच त्यांच्या कादंबऱ्यांना जाते. खानोलकरांच्या चौदा कादंबऱ्यांची समीक्षा करून खानोलकरांच्या लेखनीची बलस्थाने मर्यादा यांचा वेध माधवी वैदय यांनी आपल्या *खानोलकरांची कादंबरी*

या ग्रंथामध्ये घेतला आहे.

विसावे शतक हे सर्वच बाबींनी वैशिष्टयपूर्ण अशा संक्रमण अवस्थेतून ढवळून निघाले. तत्कालीन समाजसुधारणेचे जे अनेक पैलू सुधारकांनी आपल्या विचारांमार्फत उलगडून दाखविले व अनेक चालीरीतींना विरोध करून त्या मोडीत काढल्या. स्त्री सुधारणेच्या अंगाने विचार करावयाचा झाल्यास स्त्रीशिक्षण, बालजरठविवाह, विधवापुनर्विवाह हे अनेक प्रश्न महत्त्वाचे होते. शिक्षणाच्या माध्यमातून लिहू वाचू शकत असलेल्या स्त्रियांना काय वाटते, त्यांची मानसिकता काय अशा अनेक प्रश्नांचा धांडोळा घेत स्त्रीलिखित *कादंबऱ्या: प्रेरणा आणि प्रवृत्ती* या आपल्या ग्रंथात विदया देवधर यांनी या अनेक महत्त्वाच्या बाबींचा ऊहापोह केलेला आहे. शोभना खटावकर यांनी *भाऊंच्या अष्टनायिका* हा वि.स. खांडेकरांच्या नायिकांच्या दृष्टीने अभ्यास करणारा ग्रंथ लिहिला,तर ग.त्र्यं.माडखोलकर यांच्या कादंबऱ्याचा काहीसा याच अंगाने अभ्यास करणारा प्रवास मंदाकिनी सकदेव यांनी आपल्या *माडखोलकरी कादंबरीत ललिता ते रेणुका* या ग्रंथात केला.

अशाप्रकारे मराठीत कथालेखन करणाऱ्या लेखिका खूप असल्या तरी कथांची समीक्षा करणाऱ्या स्त्री समीक्षक तुलनेने कमी आढळतात असे आपणांस म्हणता येवू शकते. लेखिकांमध्ये असेच एक समर्थ नाव आशा बगे. आशा बगे यांच्या कादंबऱ्याचे वेगळेपण, कथांची आशयघनता, संगीताची पार्श्वभूमी अशा अनेक वैशिष्टयांचे कथन सुलभा इर्लेकर यांनी आपल्या *आशा बगे : नवे अस्तित्त्व* या छोटेखानी समीक्षा पुस्तिकेत केलेला आहे. बहुचर्चित *रणांगण* या विश्राम बेडेकरांच्या कादंबरीवरील मंजुषा सोमण यांचा *रणांगण: समीक्षेची समीक्षा* तसेच विभा शहा यांचा ऐतिहासिक मराठी कादंबऱ्यांचे स्वरूप व्यक्त करणारा *मराठी ऐतिहासिक कादंबरी* हे दोन ग्रंथ निश्चितच समीक्षेच्या प्रांतात वाचकांच्या पसंतीस उतरतात.

*स्त्रियांचे गदयलेखन* हा मधुबाला खोपडे यांचा कादंबरीची समीक्षा करणारा ग्रंथ कादंबरी विश्वात लोकप्रिय झालेला आहे. इ.स. १९५० ते १९२० या कालखंडातील स्त्री कादंबरीकारांच्या लेखनाचा अभ्यास करून त्यांनी हा ग्रंथ लिहिला आहे. तसेच प्रमिला भिरूड यांचा *मराठी कादंबरीत स्त्रियांचे योगदान* हा ग्रंथ त्यांनी १९५०ते १९४७ या

कालखंडातील स्त्रीलिखित कादंबऱ्यांची समीक्षा करून सिद्ध केला आहे.पारतंत्र्यात असणाऱ्या मध्यमवर्गीय स्त्रियांच्या दु:खाचे वर्णन करत, त्यांच्या कुटुंबाचे चित्रण, त्यांच्यावर लादण्यात आलेले कडक निर्बंध, जाचक रूढी या सगळयांचा वेध घेत प्रमिला भिरूड यांनी हा कादंबरी समीक्षात्मक ग्रंथ लिहिला.

विशिष्ट अशा रचना वैशिष्टयामुळे तसेच आशयामुळे कादंबरीचे काही उपप्रकार पडतात. त्यांचा अभ्यास करून मराठी स्त्रियांनी कादंबरी समीक्षात्मक लेखन केलेले दिसते. राजकीय क्षेत्राबाबत सांगताना राजकीय कादंबऱ्यांचे स्वरूप आणि भवितव्य याबाबत माहिती देऊन नलिनी महाडिक यांनी *मराठी कादंबऱ्यांचे अंतरंग* हा राजकीय क्षेत्राशी निगडीत कादंबरी समीक्षात्मक ग्रंथ लिहिला. तर स्त्रीवादाबाबत आपले विचार मांडत वा.म. जोशी यांच्या कादंबऱ्यांचा स्त्रीवादी दृष्टीकोनातून विचार मांडत वंदना महाजन यांनी *मराठी कादंबरीतील स्त्रीवाद* या ग्रंथाचे लेखन केले.

व्यक्तिजीवनाचा इतिहास हा आत्मचरित्रात्मक कादंबरी या प्रकारच्या कादंबरीचा मुख्य विषय असतो. तर व्यक्तिजीवनावर आधारित वाङमयीन कलाकृती हे आत्मचरित्रात्मक कादंबरीचे वैशिष्ट्य आहे असे सांगत महालक्ष्मी मोराळे यांनी *आत्मचरित्रात्मक कादंबरीत: वाङमयप्रकार व चर्चा* हा समीक्षात्मक ग्रंथ लिहिला
सामाजिक आशयाचा अभ्यास करत मराठी कादंबरीची समीक्षा करताना सुवर्णा नाईक-निंबाळकर यांनी *शोध झाडाझडतीचा* हा ग्रंथ प्रसिद्ध केला. धरणग्रस्त ग्रामस्थांच्या उद्ध्वस्त झालेल्या जीवनाचा आणि त्यांच्या समस्यांचा आढावा विश्वास पाटील यांनी आपल्या *झाडाझडती* या कादंबरीत घेतलेला आहे.

### ग) दलित कादंबरीची समीक्षा:

समाजातील विविध वर्गस्तर, प्रदेश , कालखंड, सामाजिक समस्या या सर्व दृष्टीकोनातून स्त्रियांनी कादंबरीचा अभ्यास केला व त्यातूनच ‘दलित कादंबरी’ हा एक भाग पुढे आला. सुशीला ढगे लिखित मराठी *दलित कादंबरीची अभिनय वाटचाल* या ग्रंथामध्ये दलित कादंबरीची वैशिष्टयपूर्णता सांगण्यात आलेली आहे. त्यांच्या या कादंबरीबद्द्ल

रुपाली शिंदे म्हणतात की, "या ग्रंथामध्ये वास्तववादी आशयाचे चित्रण पात्रमुखी निवेदन आणि दृश्यात्मकता ही तीन वैशिष्टये यात व्यक्त झाली आहेत." [४] जीवनाचे प्रत्यक्ष दर्शन घडविणारे माध्यम या दृष्टीकोनातून दलित कादंबरीकारांनी कादंबरीचे लेखन करून उदयास येत असलेल्या नव्या जीवन जाणिवांचे चित्रण दलित कादंबरीतून केलेले आहे.

त्याचप्रमाणे दलित कादंबरीची समीक्षा करून नंदा मेश्राम यांनी *दलित कादंबरी स्वरूप व समीक्षा* (२००६) हा ग्रंथ लिहून त्यामधून त्यांनी दलित कादंबरीचे आशयानुसार होणारे वर्गीकरण, तिचे प्रकार, दलित कादंबरीतून व्यक्त होणारा सामाजिक आशय आणि या सगळयांमधून पुढे येणारी दलित कादंबरीची बलस्थाने लेखिकेने या ग्रंथात मांडली आहेत. या ग्रंथाबद्दल स्वत: नंदा मेश्राम म्हणतात की, "दलित कादंबरीतून व्यक्त होणाऱ्या अनुभवांचे तडकाफडकी नामांकन करुन तिला निकालात काढण्यापूर्वी समाजात आढळणारे आंतरिक पोटभेद आणि त्यातून वाट्याला येणारी उपेक्षेची सल एक जातीय आणि एकसंघ असणार नाही याचे भान ठेवून दलित कादंबरीवर भाष्य केले पाहिजे." [५] *मराठी दलित कादंबरीतील स्त्रीचित्रण (२००८)* हा ज्योती लांजेवर यांनी लिहिलेल्या समीक्षाग्रंथ इ.स. १९४७ ते १९७७ या कालखंडात प्रसिद्ध झालेल्या कादंबऱ्यांवर प्रकाश टाकणारा आहे. स्त्रीच्या सामर्थ्यशक्तिचा परिचय देत लेखिकेने या कादंबरीतील स्त्रिया अन्यायाविरूदध कशाप्रकारे लढतात हतबल निराश होऊन त्या हार न पत्करता प्रतिकूल परिस्थितीशी कशाप्रकारे झुंज देतात याचा उल्लेख या कादंबरीत आलेला आहे.

### घ) आत्मचरित्राची समीक्षा

आत्मचरित्रांचा अभ्यासही काही मोजक्याच स्त्री लेखिकांनी केलेला आढळतो. *दलित पुरूषांच्या आत्मचरित्रातील स्त्रीप्रतिभा* हा शोभा भागवत संपादित ग्रंथ आहे. आत्मचरित्राच्या प्रकाराचा अभ्यासपूर्ण विचार करत *आधुनिक मराठी वाङ्मयातील स्त्रियांची आत्मचरित्रे (१९१९ ते १९७५)हा* विमल भालेराव यांचा ग्रंथ महत्त्वपूर्ण मानता येतो.

*तिसऱ्या बिंदूच्या शोधात*(२००१) हा तारा भवाळकर यांचा ग्रंथ आहे. दुभंगलेल्या नात्यांचे दर्शन, मैत्रीपूर्ण सहजीवनाचा अभाव, आधुनिक स्त्री मनातील इच्छा-आकांक्षा या

अलीकडच्या काळातील स्त्री आत्मकथनांमधून व्यक्त झालेल्या दिसतात. पुरूषाने मैत्रीपूर्ण हात पुढे करून स्त्रीमन जाणून घेऊन खऱ्या दिलदारीने तिचा विश्वास संपादित करून एक विश्वासू मित्र म्हणून पुढे यावे असे तारा भवाळकरांना वाटते.

स्त्रीवादी चळवळीच्या विचारांचा परिणाम स्त्री साहित्यावर सत्तरच्या दशकात झालेला दिसतो आणि मराठी साहित्य समीक्षेच्या वर्तुळात स्त्रीवादी समीक्षापद्धतीची चर्चा झालेली दिसून येते.इ.स.१९७५ ते १९९५ या कालखंडातील स्त्री आत्मकथनांचा अभ्यास करताना स्त्रीवादी समीक्षेचे उपयोजन शोभा पाटील यांनी *स्त्रियांची आत्मचरित्रे: स्त्रीवादी शोध* या ग्रंथामध्ये केले आहे. वैवाहिक जीवनात सहन करावा लागणारा कोंडमारा निर्भीडपणे स्त्रियांनी या आत्मकथनांमध्ये सांगितलेला आहे. अन्यायाची जाणीव व्यक्त करणे, आत्मशोध घेणे ही या आत्मकथनांची वैशिष्ट्ये आहेत असे शोभा पाटील यांनी आपल्या या ग्रंथात सांगितले आहे.

*स्त्रीवादी विचार आणि समीक्षेचा मागोवा* (२००७) या ग्रंथामध्ये पाश्चात्त्य स्त्रीवादाच्या अनुषंगाने स्त्री स्वातंत्र्याविषयीच्या जाणीवेचा विकास कसा झाला याचा प्रवास शोभा पाटील यांनी आपल्या या ग्रंथात सांगितला आहे.वंदना महाजन यांच्या स्त्रीवाद आणि मराठी साहित्य या समीक्षा ग्रंथात स्त्रीवादी चळवळ ,चळवळीच्या दिशा या अंगाने विवेचन केले आहे. ''१९६०नंतरच्या स्त्रीलिखित  साहित्याचा आढावा घेत असताना एक गोष्ट जाणवते कि स्त्रियांना आपल्या माणूसपणाचे सजग भान येणे त्यांच्यातील मानवतावादी दृष्टिकोन खऱ्या अर्थाने विकसित होणे हि वाटते तितकी सोपी गोष्ट नाही.या वाटेवरचे असंख्य प्रश्न स्त्रियांना गोंधळात टाकणारे आहेत आणि त्यांचे प्रतिबिंब साहित्यात उमटलेले दिसते.'' ६

१९७५ नंतरच्या कालखंडातील स्त्री कथाकारांपैकी सानिया या एक महत्त्वाच्या स्त्री कथाकार मानल्या जातात. यासंदर्भात त्यांचे कथालेखनही वैशिष्टयपूर्ण मानले जाते. सानिया यांच्या *साहित्य आणि स्त्रीवाद* या ग्रंथामध्ये सानियांच्या कादंबरीलेखनाची समीक्षा शिल्पा म्हात्रे- काकडे यांनी केली आहे. स्त्री पुरूषांची मुक्त मैत्री, स्वतंत्र वाटचाल करणाऱ्या स्त्रीला पाठींबा देणारे पुरूष वर्चस्व गाजवणारे पुरूष, स्त्रीचा आत्मशोध,

आडनावांचा उल्लेख नसणाऱ्या व्यक्तिरेखा ही सारी वैशिष्ट्ये कादंबऱ्यामधून येतात.

भारतीय संदर्भचौकटीत स्त्रीवादी समीक्षेचे निकष लावताना विविध सामाजिक स्तरावर विभागलेले स्त्रीजीवन, सीमा, भौगोलिक परिसर, जात, लैंगिकता यांचा विचार होण्याची गरज आहे. स्त्रीत्वाचा विचार करताना त्यातील कुटुंब, शिक्षण, अर्थ, धर्म हे घटक विचारात घ्यायला हवेत असे मत शोभा नाईक यांनी आपल्या *भारतीय संदर्भातून स्त्रीवाद: स्त्रीवादी समीक्षा आणि उपयोजन* या ग्रंथात मांडले आहे. कमल देसाई यांच्या दोन लघुकादंबऱ्यांची समीक्षा तसेच भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबऱ्यांची समीक्षा शोभा नाईक यांनी आपल्या या ग्रंथात केली आहे. प्रतिभा पाटणे यांनी नवभारत अंतर्गत मराठीतील समीक्षाविचार या ग्रंथात नवभारत या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या साहित्य आणि समीक्षेवरील लेखांचे एकत्रीकरण केले आहे. "वाङ्मयातील सौंदर्य हे वाङ्मयाचे साधन आहे.लेखक आपल्या मनातील विचार रसिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी शब्दसौंदर्य ,रचना सौंदर्याची मदत घेत असतो "[७]

*कोरा कागद, निळी शाई* या ग्रंथामध्ये भारतीय लेखिकांचे अनुभवविश्व आणि आविष्कार, स्वातंत्र्यासाठी स्त्रियांनी स्वत:शी आणि इतरांशी केलेला संघर्ष नंदिनी आत्मसिद्ध यांनी मांडलेला आहे. आस्वादाच्या अंगाने स्त्रीजीवनातील अवस्थांतरणाचा प्रवास स्त्रीवादी जाणिवेचा आधार घेत लेखिकेने सांगितलेला आहे. स्त्रीवादी समीक्षेतील एक महत्त्वाचे अंग म्हणजे आस्वादक समीक्षा. ललित साहित्यातून व्यक्त होणारा अनुभव आस्वादक समीक्षेत मांडला जातो. नीलिमा गुंडी, प्रतिमा इंगोले, मीना वैशंपायन, सिसिलिया कार्वालो राजश्री पवार, नंदिनी आत्मसिद्ध अशा अनेक स्त्रीलेखिकांनी आस्वादक समीक्षेचे उपयोजन करून ग्रंथलेखन केले आहे.

*अक्षरस्पंदन* (२००७) या नीलिमा गुंडीलिखित ग्रंथामध्ये त्यांनी साहित्यक्षेत्रातील काही थोर कलावंत, भाषाप्रभू यांच्या केलेल्या कार्याचे मर्म सांगून हा ग्रंथ लिहिला आहे. विविध कलाकृतींवरील आस्वादक लेखनाचा संग्रह राजश्री पवार यांच्या *साहित्य परिघ* या ग्रंथामध्ये करण्यात आलेला आहे. *आस्वादगंध* या पुस्तकात आपल्याला आवडलेल्या

पुस्तकांवरील तसेच साहित्यप्रवाहांवरील लेख प्रतिमा इंगोले यांनी समाविष्ट केले आहेत. तसेच साहित्यविषयक आस्वादक लेखन *साहित्यवेध* या ग्रंथात मीना वैशंपायन यांनी मांडले आहे. *चांदणे शुभ्रनिर्मळ* या सिसिलिया कार्व्हालो यांनी लिहिलेल्या ग्रंथात आस्वादक रसिकाच्या भूमिकेतून लिहिलेले त्यांचे लेख समाविष्ट करण्यात आले आहेत. *यह गुलिस्ताद्वं हमारा* या ग्रंथात नंदिनी आत्मसिद्ध यांनी भारतातील भिन्नभिन्न परंपरा आणि येथील समाजाची वाटचाल कशाप्रकारे झाली हे मांडले आहे.

**ट) साहित्यशास्त्र आणि समीक्षा:**

मा. गो. देशमुख यांनी मराठीचे वेगळे साहित्यशास्त्र उभारण्याचा प्रयत्न केला. त्यांचा अभ्यास प्रवास पुढे चालवत उषा देशमुख यांनी *मराठीचे साहित्यशास्त्र: रामदास ते रामजोशी* या आपल्या प्रबंधातून मराठी साहित्यातील प्राचीन आणि मध्ययुगीन कालखंडातील काव्यनिर्मितीचे प्रयोजन, त्यांच्या निर्मितीमागील प्रेरणा या गोष्टी पायाभूत मानून यावर काव्यशास्त्राची मुर्हूतमेढ रोवण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिश शासनव्यवस्थेच्या अंमला नंतर रूजलेल्या नव्या शिक्षणप्रवाहाचा प्रवाह हा साहित्याच्या प्रांतातही पडला. पाश्चात्त्य समीक्षेच्या अंगाने मराठी साहित्यातील समीक्षेच्या प्रांतात नानाविध पद्धती उगम पावल्या व रूढ झाल्या. मानवी वासना, इच्छा, भावना यांचा मनोरा ज्या आदिबंधावर अवलंबून असतो ती आदिबंधात्मक समीक्षा पद्धती ही एक नवी पद्धत समीक्षेत प्रचलित झाली. या आदिबंधात्मक समीक्षेचे विश्लेषणात्मक विवेचन करताना जी.ए.कुलकर्णी, गो.नी. दांडेकर यांसारख्या ज्येष्ठ साहित्यिकांच्या काही कादंबऱ्यांचा आस्वादक समीक्षेच्या पध्दतीने अरूणा ढेरे यांनी लेखन केलेले आहे. तशीच स्त्रीवादी लेखन आणि स्त्रियांचे लेखन यात नेहमी गल्लत केली जाते असे उमा दादेगावकर यांनी सांगितले आहे. सुप्रसिदध लेखिका व समीक्षक अश्विनी धोंगडे यांनी आपल्या *स्त्रीवादी समीक्षा: स्वरूप आणि उपयोजन* या आपल्या ग्रंथात स्त्रीवादाच्या उदयाची पाश्वर्भूमी, त्याचा इतिहास याचा वेध घेत स्त्रीवादी समीक्षेचा अभ्यास स्पष्ट केला आहे. स्त्रीकेंद्री दृष्टीकोनातून वाङ्मयीन कलाकृतीकडे वर्णन आणि पितृसत्ताक समाजपद्धतीत वाङ्मयीन समीक्षेच्या माध्यमातून या पद्धतीला दिलेला धडका असे स्त्रीवादी समीक्षेचे वर्णन अश्विनी धोंगडे यांनी केले आहे.

महाराष्ट्रामध्ये आगरकरांपासून विवेकवादाची परंपरा रूढ झाली. या पार्श्वभूमीवर *विवेकाची गोठी* या आपल्या ग्रंथात म. गं. नातू यांनी आगरकर, वा. म. जोशी, कोल्हटकर, महात्मा फुले यांच्या विचारांचा आणि साहित्याचा वेध घेत त्यांचे मूल्यमापन करण्याचा आगळा वेगळा प्रयत्न केलेला आहे. रामदासांच्या समग्र वाङमयाचा आढावा घेताना त्यांच्या लेखनातील विविध पैलूंचे दर्शन घडविणारा *समर्थ साहित्यातील आकृतीबंध* हा उषा जोशी यांचा महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. आशयानुसार आविष्कार आणि आविष्कारातील अभिव्यक्ती याचे प्रतिबिंब समर्थ रामदासांच्या काव्यात कसे परावर्तित होते हे उषा जोशी यांनी सखोल विवेचनातून व्यक्त केले आहे.

अभिनवगुप्तांनी समर्थांनी केलेल्या साहित्यविचाराला झुगारून देत इंग्रजी साहित्यविचारांच्या परिचयानंतर हळूहळू वाढत गेलेल्या लौकिकतावादी विचारांच्या खूणा स्पष्ट करताना अरूणा देशमुख यांनी *मराठीतील लौकिकतावादी साहित्यविचार* हा महत्त्वपूर्ण ग्रंथ सिद्ध केला. मर्ढेकर आणि नंतर मर्ढेकरांचा सौंदर्यवाद या गोष्टींनी प्रभावित बेडेकर, कुरूंदकर यांनी यादृष्टीने केलेले लिखाण महत्त्वपूर्ण आहे असा विचार अरूणा देशमुख व्यक्त करतात. याच संदर्भातला पुष्पा भावे यांचा *सौंदर्यविचार* हा ग्रंथ अभ्यासपूर्ण आहे. मराठीत विनोदी लेखन भरपूर झालेले असले तरी त्यांचा सखोल अभ्यास मात्र त्या तुलनेने कमी झालेला दिसतो. या विनोदाची मीमांसा करताना उषा कुलकर्णी यांनी कोल्हटकर पूर्व काळापासून ते पु.ल.देशपांडे यांच्यापर्यंत विनोदाच्या विविध स्तराचे विश्लेषण आपल्या *मराठी विनोद संशोधनात्मक आणि विश्लेषक प्रबंध* या ग्रंथात केलेले आहे.

**च) व्याकरणशास्त्र,भाषाशास्त्र, अलंकार, छंदशास्त्र:**

मालती बेडेकरांचा *वाक्यविचार* हा ग्रंथ मराठी व्याकरणाच्या क्षेत्रात महत्त्ववपूर्ण आहे.तसेच अर्थविज्ञान, त्याचे स्वरूप, महत्त्व, इतिहास आणि उपयुक्तता स्पष्ट करून शब्दाला अर्थ कसा प्राप्त होतो, तो कसा बदलतो, याचे विवेचन करीत शब्दविचार, अर्थविचार, अर्थसंकोच, अर्थच्युती इत्यादी संज्ञांची अनुराधा पोतदार यांनी विस्ताराने चर्चा करून *मराठीचा अर्थविचार* (१९६९) हा ग्रंथ लिहिला. *मराठी व्याकरण: उदय आणि*

*विकास* हा लीला गोविलकर लिखित ग्रंथ मराठी व्याकरणाचा इतिहास जाणून घेण्याच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त आहे. मुक्तछंदाचा उगम, त्याचे काव्यव्यवहारातील स्थान व महत्त्व, याचे विवेचन करून शुभांगी पातुरकरांनी *मराठी मुक्तछंद* हा ग्रंथ लिहिला आहे. मीना जोशी यांचा *उच्चार कोकणी बोली* (१९७८) आणि विजया चिटणीस यांचा *खानदेशी : एक स्थानिक अभ्यास* (१९८४) हे ग्रंथ भाषाशास्त्रीय दृष्टीकोनातून विविध बोलींचा अभ्यास करणारे असून अशा प्रकारचे ग्रंथही स्त्रियांनी लिहिलेले आहेत.

**निष्कर्ष:**

एकूणच प्रस्तुत स्त्रीसमीक्षेचे आणि संशोधनाचे आपणास दोन भागात विभाजन करता येते, यांपैकी एक मोठा भाग हा विविध विद्यापीठीय उच्च पदव्यांसाठी लिहिण्यात आलेला आणि नंतर ग्रंथरूप देण्यात आलेला संशोधनाचा आहे, तर दुसरा भाग हा विद्यापीठीय संशोधनापलीकडे जाऊन स्वतंत्रपणे केलेल्या समीक्षा लेखनाचा आहे. यात आस्वादकतेपासून ते सैद्धांतिक अशा सर्व समीक्षेची व्याप्ती दिसते. आज विविध क्षेत्रांमध्ये उच्चशिक्षण घेणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढत आहे. उच्चशिक्षणानंतर बहुसंख्य स्त्रिया पीएच.डी.साठी संशोधन करू लागल्या. कुसुमावती देशपांडे, इरावती कर्वे, दुर्गा भागवत, सरोजिनी बाबर, इंदुमती शेवडे या मागील पिढीतील समीक्षक आणि नंतर सरोजिनी वैदय, विजया राजाध्यक्ष, उषा देशमुख, उषा हस्तक, तारा भवाळकर, अरूणा ढेरे या आत्ताच्या पिढीतील समीक्षक, संशोधक. स्त्रियांनी केलेले संशोधन व समीक्षालेखन अर्थातच स्त्रियांच्या या क्षेत्रातील कामगिरीसाठी आशादायक व आदर्शवत चित्र उभे करणारे आहे. आजच्या स्त्री संशोधक-समीक्षकांनी काही विषय आपल्या लेखनात समाविष्ट केलेले नाहीत असे प्रकर्षाने जाणवते. उदाहरणार्थ शाहिरी वाङमय, बखर वाङमय, एकांकिका, व्यक्तिचित्रण, वाङमयीन चळवळी, विद्रोही साहित्यविचार, मार्क्सवादी लेखन असे अनेकविध विषय आजही स्त्रियांच्या लेखणीतून फारसे प्रगट झालेले दिसत नाहीत.

**संदर्भग्रंथ**

१. छंद-शास्त्रीय समीक्षा पृ.क्र. १४८ व १४९

२. स्त्री साहित्याचा मागोवा खंड४ पृ. क्र. २९५

३. स्त्री साहित्याचा मागोवा खंड४ पृ. क्र ३११

४. स्त्री साहित्याचा मागोवा खंड४ पृ. क्र३०२

५. स्त्री साहित्याचा मागोवा खंड४ पृ. क्र३०३

६. महाजन वंदना , स्त्रीवाद आणि मराठी साहित्य,विजय प्रकाशन ,द्वि.आ. २०१५.पृ . २३२

७. पाटणे प्रतिभा ,नवभारत अंतर्गत मराठीतील समीक्षाविचार ,स्नेहवर्धन प्रकाशन,प.आ. पृ. १५

# प्रकरण आठवे – स्त्रीलिखित इतर साहित्य

**घटक: अ ललित गद्याचे स्वरूप**

अ) १८३० ते १९५० या कालखंडातील ललित गद्य

ब) १९५० ते २००० या कालखंडातील ललित गद्य

क) २००० ते २०१० या कालखंडातील ललित गद्य

## अ) १८३० ते १९५० या कालखंडातील ललित गद्य

ललितगद्य हा एक लवचिक वाङ्मयप्रकार आहे. 'फ़ॉर्मलेस फ़ॉर्म' या नावाने तो इंग्रजीत ओळखला जातो. मराठी वाङ्मयप्रकारामध्ये 'ललित गद्य' या साहित्यप्रकारात मुख्यत्वे संमिश्रपणा अधिक आहे. त्यामुळे अनेक नावे असली तरी त्यांचा या प्रकारात समावेश होतो. उदाहरणार्थ निबंध, लघुनिबंध, गुजगोष्टी, ललित निबंध, ललित लेख, पत्रे, आठवणी, व्यक्तिचित्रणे, इत्यादी...

अनेक नियतकालिकांतून बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, बाबा पद्मनजी, गो. ना. माडगांवकर, शि. म. परांजपे, गो. ग. आगरकर, अ. ब. कोल्हटकर, कृष्णशास्त्री चिपळूणकर, विष्णूशास्त्री चिपळूणकर यांनी विपुल प्रमाणात निबंधलेखन केलेले आहेत.

**श्रीमती फेरार:**

प्रारंभ ते १९२० या टप्प्याचा अभ्यास केला तर केवळ नाशिकला राहणाऱ्या श्रीमती फेरार यांचा दीर्घ निबंधाचा *कुटुंब प्रवर्तन नीति* हा ग्रंथ १८३५ साली प्रकाशित झालेला होता. त्यानंतर १८३५ लाच *तेनरी आणि त्याला सांभाळणारा गडी संतू याची गोष्ट* हाही ग्रंथ प्रकाशित झाला. १८३८ साली *बाळबोध गोष्टी, शास्त्रातील सुबोध धडे, यात्रेकऱ्याचा वृत्तांत, वाटसराची गोष्ट* हे दीर्घ निबंध प्रसिद्ध झालेले आढळतात. त्यांच्या शिवाय ग्रंथरूपाने इतर कोणत्याही लेखिकेचे लघुनिबंध लेखन अभ्यासात आढळत नाही. मात्र तत्कालीन नियतकालिकांमधून *स्त्री भूषण* (१८६४), *स्त्री सद्बोध चिंतामणी* (१८८५), *स्त्री सौंदयलतिका* (१८८६), *स्त्री शिक्षण चंद्रिका* (१८९९), *स्त्रियांची मैत्रीण* (१८९३), *गृहिणीरत्नमाला* (१९१८), *मनोरमा* (१९२९), *महिला, वनिताविश्व* स्त्रियांनी मोठ्या प्रमाणात निबंधलेखन केलेले आहे. त्यातील लेखनविषय ही बाल संगोपन, संसार कसा करावा, स्त्री सुधारणा, विधवांची स्थिती, व्रतवैकल्ये, स्त्रियांची कर्तव्ये, स्त्री शिक्षण, जबाबदाऱ्या, फॅशन्स, विवाह... या प्रकारचे होते. सरळ साध्या लेखनशैलीतले निबंध

असल्याचे कारण तेव्हा नुकत्याच स्त्रिया लिहू-वाचू लागल्या होत्या. जसे सुचेल तसे त्या निबंधातून व्यक्त होत गेल्या. त्यामुळे लेखनात जरी दोष असले तरी तत्कालीन स्त्री-जीवन त्यांच्या लेखनामुळे समजू लागले. म्हणूनच प्रारंभ ते १९२० च्या या टप्प्याचा अभ्यास करताना त्यांच्या लेखनीचा आशय अधिक महत्त्वाचा ठरत आहे.

१९२१ ते १९५० या टप्प्याचा अभ्यास करताना समजते की त्या काळी प्रसिद्ध होत असणाऱ्या *यशवंत*, *माधुरी*, *ज्योत्स्ना*, *मनोरंज*, *स्त्री*, *रत्नाकर*, *अभिरुची*, *किर्लोस्कर*, *विविधज्ञानविस्तार* या नियतकालिकांमधून अनेक स्त्रियांनी तत्कालीन समाजावर प्रकाश टाकण्यासाठी लघुनिबंधाचे लेखन केले आहे. मात्र लघुनिबंधाचे स्वतंत्र संग्रहरूपाने तीन लेखिकांचे प्रकाशन झाले आहे. शकुंतला परांजपे (१९४४ – *भिल्लीणीची बोरे*), कुसुमावती देशपांडे (१९४६ – *मोळी*), डॉ. इरावती कर्वे (१९४९ – *परिपूर्ती*).

**शकुंतला परांजपे:**

शकुंतला परांजपे यांनी अत्यंत विनोदी शैलीत आणि मार्मिकतेचा आधार घेत समाजातील विसंगती त्यांच्या संग्रहातून अधोरेखित केल्या आहेत. १९४४ मध्ये प्रकाशित झालेल्या *भिल्लीणीची बोरे* या लेखसंग्रहातून *मुके सोबती, शेळीची शिकार, माझी प्रेतयात्रा, अण्णांना, मुलगी असती तर !* हे लघुनिबंध विशेष आकर्षकपणे त्यांनी लिहिले आहेत. दैनंदिन जीवनातले अनेक हलके-फुलके प्रसंग, गमती-जमती मुळे त्यांच्या लेखनाला सहजता प्राप्त झाली आहे. अनेक ठिकाणी त्यांनी वास्तव उभे केल्याने, भाषेतील नाविन्य, खटकेबाजपणा यामुळे त्यांचा लघुनिबंध संग्रह अधिक दर्जेदार आहे.

**कुसुमावती देशपांडे:**

“लघुनिबंध हा लेखनप्रकार ज्यांनी ज्यांनी हाताळला त्या सर्वात कुसुमावती देशपांडे यांचा लघुनिबंध त्यांच्या स्वतंत्र वृत्तीतून जन्मलेला आहे. *जांभई* मध्ये त्या कॉलेजातील तरुण, बुद्धिमान मुलींचे व मध्यमवयस्क, विणीत बसलेल्या चौघा जावाजावांचे अनुभव सांगतात. *माध्यान्ह, मध्यरात्र, चंद्रास्त* हे त्यांचे लघुनिबंध म्हणजे त्यांनी केलेले प्रकट चिंतनच होय. या चिंतनामध्ये निसर्ग हा त्यांच्या संवेदनशील मनाचा सोबती आहे.”[१] १९४६ साली कुसुमावती देशपांडे यांचा *मोळी*' हा लेखसंग्रह प्रकाशित झाला. *चंद्रास्त*, *दमडी* आणि *नदी किनारी* हे लेख अधिक भावूकतेने लिहिलेले आहेत. त्यामुळे त्यांच्या

लेखनात काव्यात्मक पातळीचाही स्पर्श असल्याचा भास होतो. श्री. पु. भागवत या संदर्भात म्हणतात, “मराठी लघुनिबंधातील नकली व नाटकी वैयक्तिकतेच्या जागी कुसुमावतींनी आत्मनिष्ठा आणली. खोल उत्कट अनुभवांचा प्रगल्भ, तत्त्वलक्ष्यी व तरल आविष्कार साधला. संवेदनांचे व भावनांचे अस्सल काव्य व्यक्त केले.”[२] मुळच्या संवेदनशील असलेल्या कुसुमावती पाहिलेले दृश्य, घटना, व्यक्ती यांचे चिंतन व्यापक पातळीने करताना दिसतात, म्हणून त्यांचा लघुनिबंध संग्रह अधिकाधिक लोकप्रिय ठरला आहे.

**डॉ. इरावती कर्वे**:

प्राध्यापिका आणि समाजशास्त्रज्ञ असलेल्या डॉ. इरावती कर्वे यांचा *परिपूर्ती* हा लेखसंग्रह १९४९ मध्ये प्रकाशित झाला. इरावतीबाईंचे लेखन अत्यंत वैचारिक असल्याने प्रत्येक लेख वाचनीय आहे. मानवी जीवन, सहसंबंध, प्रवृत्ती, समाज, लोकसाहित्य, संस्कृती यांचा मानवी मेंदूवर झालेला सकारात्मक-नकारात्मक परिणाम, बदल त्यांच्या लेखनीचा विषय आहे. *बीजक्षेत्र* हा त्यांचा एक लेख आजही सुमारे ६० वर्षानंतरही अधिक वैचारिक वाटू लागतो. स्त्रीचा तिच्या शरीरावर सुद्धा हक्क नसल्याचे ते एक सत्य त्या काळात परखडपणे मांडल्याने विशेष कौतुक वाटते. पंढरपूरला वारी बरोबर जाणाऱ्या इरावतीबाईंना स्वानुभाव आले तेही त्यांनी एका लेखनातून अत्यंत परखडपणे मांडले आहे. अनेक जाती-धर्मांचे लोक, साक्षर, निरक्षर, वारीचे पारंपारिक ज्ञान, गायन, किर्तन आणि ज्ञानबा-तुकारामाचा जयघोषाने प्रफुल्लीत झालेले वातावरण अत्यंत सुबकपणे लेखिकेने मांडले आहे. तर जिथे जातीय भेद, वाद दिसला तेथे त्यांची लेखणी प्रखर झालेली आहे.

एकूणच लघुनिबंधाच्या लेखनीला स्त्रियांकडून सुरुवात झाल्यानंतर ते १९५० च्या कालखंडापर्यंत असे लक्षात येते की, शिक्षणाची आवड-ओढ निर्माण होईपर्यंत मध्ये खूप काळ लोटला आहे. त्यानंतर जसे सुचेल तसे, अगदी काही ठिकाणी बाळबोधवृत्तीनेही स्त्रियांनी लेखन केले आहे. मात्र त्या परिस्थितीत वाङ्मय त्यांच्याकडून अधिक अपेक्षाही करू शकत नाही. तत्कालीन नियतकालिकांमुळे मात्र अनेक स्त्रियांना लेखनीबद्दल आपुलकी निर्माण झाली असावी यात शंका वाटत नाही.

कुसुमावती देशपांडे, डॉ. इरावती कर्वे आणि शकुंतलाबाई परांजपे या तीन लेखिकांची मुळतः पार्श्वभूमीच अधिक प्रगल्भ, सधन आणि वाडवडिलांकडून ज्ञानाचे मिळालेले बाळकडू असलेली होती, आणि म्हणूनच या तीन लेखिकांचे लेखन, परखडवृत्ती, वैचारिकता, संवेदनशीलता यामुळे त्यांचे लेखन कौशल्य अधिक मार्मिक झालेले आहे.

कथा, कादंबरी, कविता, चरित्र, आत्मचरित्र या वाङ्मयीन प्रकारातील लेखन अधिक असल्याने लघुनिबंधाकडे लेखिका अधिक वळलेल्या नसल्याचे लक्षात येते. मात्र ज्या लेखिकांनी लघुनिबंधामध्ये लेखन केले आहे तेही महत्त्वाचेच आहे.

१९५१ नंतर मात्र स्त्री अधिक विचारी होत गेली, अनेक क्षेत्रात स्वतःचे स्थान निर्माण करू लागली, स्वाभाविकपणे या टप्प्यात स्त्रियांनी लघुनिबंधही विपूल प्रमाणात लिहिले हे पुढील अभ्यासातून स्पष्ट होईलच.

## ब) १९५० ते २००० या कालखंडातील ललित गद्य

देशात स्वातंत्र्याचे वारे वाहू लागल्यानंतर अनेक प्रकारे राजकीय, सामाजिक परिस्थिती बदलत गेली. साहित्यालाही नवे वळण लागले. सामान्य स्त्री शिक्षणाकडे वळू लागली. तत्कालीन स्त्री स्वातंत्र्याचा खऱ्या अर्थाने उपभोग घेऊ लागली. याच काळात सर्वाधिक लेखन होत गेले. अनेक नियतकालिकांचा, साप्ताहिकांचा जन्म या काळात झाला. *स्त्री – माहेर, मेनका, प्रपंच, यामिनी, वहिनी, सुवासिनी, रोहिणी, मिळून साऱ्याजणी, अंतर्नाद, विपुलश्री...* इत्यादी मासिक, दैनिक नियतकालिकांमधून स्त्री व्यक्त होत गेली. भावलेले अनुभव, सुख-दुःखाचा काळ, नैसर्गिक निरीक्षण, ऐतिहासिक लेखन, प्रवासातील अनुभव, भेटलेली माणसे, वाचलेली पुस्तके, सामाजिक बांधिलकी, माणसा-माणसातील विसंगती... हे त्यांच्या लेखणीचे विषय होत गेले आणि त्यामुळेच त्यांचे विचार अधिकाधिक प्रगल्भ होत गेले. यामध्ये दुर्गा भागवत, इंदिरा संत, इरावती कर्वे, शिरीष पै, विजया राजाध्यक्ष, शांता शेळके, अरुणा ढेरे, सरोजिनी वैद्य, ज्योत्स्ना देवधर, मंगला गोडबोले, पद्मा फाटक या आणि अजून काही लेखिकांचे लेखन अधिक प्रभावी झालेले आहे.

### दुर्गा भागवत:

मानावंशास्त्र, समाजशास्त्र, बौद्ध आणि पाली धर्माच्या अभ्यासक, आदिवासी जीवनाच्या भाष्यकार, विविध ललितलेखकार आणि अनेक कलांमध्ये निपुण असणाऱ्या *दुर्गा भागवत* या कालखंडातील महत्त्वाच्या लेखिका होय.

*ऋतुचक्र* (१९५६), *भावमुद्रा* (१९६०), *पैसं* (१९७०), *डूब* (१९७५), *आठवले तसे* (१९९१), *दुपानी* (१९९५), *गोधडी* (१९९६), *खमंग* (२०००) हे आठ ललितलेख संग्रह त्यांनी लिहिले. *ऋतुचक्र* या संग्रहाचा जन्म कसा झाला? याचे वेगळेपण उल्लेखनीय आहे. अंथरुणाला खिळल्यानंतर सेकंद, मिनिट, तास, दिवस, महिने, ऋतू, वर्ष गेली आणि पडल्या

जागी सृष्टीची नवी अनुभूती झाली त्यातूनच *ऋतुचक्र* जन्मले आहे. याप्रमाणे त्यांचे सर्वच ललित संग्रह अत्यंत हेतूपूर्वक आणि वाचनीय ठरले आहेत. त्याचबरोबर "दुर्गाबाईंच्या लेखनामागे वात्सल्याने काठोकाठ भरलेले स्त्रीमन आहे हे *'भावमुद्रा'* व *'रुपरंग'* मधील काही लेखन वाचताना जाणवते. ही स्त्री तशी एकटी आहे. पण तिला स्त्रीच्या वाट्याला आलेले दु:ख झपाटून टाकते. 'पैसं' मध्ये हेच मन विशाल होते. त्यांना जाणवणाऱ्या व्यक्ती त्या अशा तऱ्हेने रेखाटतात की, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगळेपण ध्यानात येते." [३]

**इंदिरा संत:**

संसारातील सुख-दुःखाच्या चढ-उतारांचा आलेख *मृद्गंध* (१९८९), *फुलवेल* (१९९७) या ललितलेखसंग्रहातून इंदिरा संत यांनी मांडला आहे. बाळपणीच्या गमती-जमती, खेळ, भोवतालची अनेक सूक्ष्म निरीक्षणे, प्रेमविवाह, शिक्षण, संसार, अपत्ये, संगोपन, सुखा पाठोपाठ येणारे दुःख त्यांनी अत्यंत पारदर्शक शैलीतून व्यतीत केले आहे. संग्रहातील अनेक लेख हे त्यांचे प्रतिबिंबच आहे.

**इरावती कर्वे:**

इरावती कर्वे यांनी १९६० साली *भोवरा* आणि १९७२ साली *गंगाजल* हे दोन ललित लेखसंग्रह प्रकाशित केले आहेत. समाजशास्त्रज्ञ असल्यामुळे त्यांचे लिखाण अधिक प्रमाणात वैचारिक असल्याचे जाणवते. समोर घडणाऱ्या घटनेचा सर्वांगाने विचार करून त्यावर भाष्य करणे ही त्यांची एक वेगळीच ओळख होय. *बॉयफ्रेंड, किंकाळी, देवळाविना गाव, पुनर्जन्माचा बिनतोड पुरावा* हे उल्लेखनीय लेख त्यांनी लिहिले आहेत.

**शिरीष पै:**

सुप्रसिद्ध लेखक, वक्ता, पत्रकार, विडंबनकार, संपादक, नाटककार, निर्माता अशी वेगवेगळी ओळख असणारे आचार्य अत्रे यांची सुकन्या *शिरीष पै* होय. "ही लेखिका विलक्षण संवेदनशील आणि अंतर्मुख आहे, हे जाणवते."[४] शिरीष पै यांनी *मी, माझे, मला* (१९९१), *अनुभवांती* (१९९३), *मैलोन मैल* (१९९४), *टिप फुले टिप ग* (१९९६), *कोलाडा* (१९९८), *सय* (१९९७) इत्यादी ललित लेखसंग्रह लिहिले आहेत. बालपणीच्या रम्य आठवणी, खंडाळा, नाशिक, मुंबई, कोकण येथील वास्तव्याच्या आठवणी, आई-

वडिलांमधील दुरावा, सुखामागून येणारी दुःखद पहाट, शाळा, कॉलेज, मित्र, मैत्रिणी, प्रेमविवाह या साऱ्याचे चित्रण त्यांच्या लेखांमधून आढळते. अतिशय संवेदनशीलता, उत्कटता आणि स्वत्वाचा शोध त्यांनी प्रामुख्याने लेखांमधून मांडला आहे.

**विजया राजाध्यक्ष:**

समीक्षक आणि कथाकार म्हणून ओळख असणाऱ्या *विजया राजाध्यक्ष* यांनी *कदंब* (१९७९), *अवतीभवती* (१९८२), *तळयात-मळयात* (१९९७) हे ललित लेख संग्रह लिहिले आहेत. अफाट वाचन, चित्रपट, सभोवतालच्या घडामोडी आणि त्यावर केलेले चिंतन हा त्यांच्या ललित लेखांचा मूळ गाभा आहे. स्व चा शोध, धार्मिकता, मृत्यूविषयीचे विचार, सामाजिक स्थितीचे भान लेखिकेने अतिशय सहज मांडले आहे.

**शांता शेळके:**

आयुष्यात जगण्यासाठी आलेले प्रत्येक क्षण भर-भरून जगलेल्या लेखिका म्हणजे शांता शेळके. *शब्दांच्या दुनियेत* (१९५९), *पावसाआधीचा पाऊस* (१९८५), *आनंदाचे झाड* (१९८२), *एकपानी* (१९८९), *संस्मरणे* (१९९०), *मदरंगी* (१९८९), *जाणता अजाणता* (१९९५), *सांगावेसे वाटते म्हणून* (१९९८), *इतस्ततः* (१९९८), *पत्रंपुष्पं* (१९९८), *ललित नभी मेघ चार* (१९९८), *रंगरेषा* (१९९९), *मनातले घर* (२०००) *काही जवळ काही दूर* (२००१), *गुलाब, काटे, कळया* (२००२) इत्यादी ललितलेख संग्रहांचे लेखन त्यांनी सभोवताली घडणाऱ्या सूक्ष्म निरीक्षणांनी, स्वानुभावांनी केले आहे. अनेक ठिकाणी झालेला प्रवास, प्रवासात भेटलेली माणसे, प्राणी, वास्तव्याच्या जागा, सोय-गैरसोय, एकूणच सृष्टीत असलेली आणि लेखिकेच्या दृष्टीस पडलेली प्रत्येक गोष्ट लेखिकेच्या लेखनात उतरलेली आहे. बालपण-शाळा-कॉलेज, प्राणी-पक्षी, अनेक ठिकाणी आणि समाजातील बरे-वाईट अनुभवांनी हे ललितलेख संग्रह भरलेले आहेत. अर्थातच या सगळयामागे लेखिकेचे वाचन कौशल्य अधोरेखित होते.

**अरुणा ढेरे:**

भाषेवर विलक्षण प्रभुत्व असलेल्या *अरुणा ढेरे* यांनी *लावण्ययात्रा* (१९८७), *मनातलं आभाळ* (१९९४) हे ललित लेखसंग्रह लिहिले आहेत. लेखिकेने रामायण, महाभारत, वेद, धर्म, संस्कृती, लोकसाहित्य, लोकपरंपरा यांचा अनेकांगी अभ्यास केलेला असल्याने त्यांच्या साहित्यातही त्याचे प्रतिबिंब पडलेले आहे. लेखिकेने पौराणिक पात्रांचा अभ्यास करताना त्यांच्या मनातले विश्व लेखांमधून मांडले आहे. अनेक विशेषणे आणि काव्यात्मकतेची किनार

असलेले हे लेखसंग्रह अधिक लोकप्रिय ठरलेले आहेत.

**सरोजिनी वैद्य:**

अफाट वाचन, अभ्यासू आणि चिंतनशील वृत्ती, त्याचवेळी जागी होणारी समीक्षक आणि ललित लेखिका अत्यंत सफाईदारपणे साहित्यात ठसा उमटविण्यात यशस्वी होते त्या म्हणजे *सरोजिनी वैद्य*. *पहाटपाणी* (१९७५), *शब्दायन* (१९८०) या त्यांच्या ललित लेखसंग्रहातून अनेक गोष्टी अत्यंत बारकाव्याने स्पष्ट केल्या आहेत.

**ज्योत्स्ना देवधर:**

*आठवणींचे चतकोर* (१९९०), *मूठभर माणुसकी* (१९९८) हे दोन ललित लेखसंग्रह *ज्योत्स्ना देवधर* यांनी लिहिले. माहेर जोधपूर आणि वैवाहिक जीवनाचा प्रारंभ पुण्यात झाल्याने ओघाने जोधपूर आणि पुण्याची तुलना लेखिकेने केली आहे. घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीकडे अत्यंत डोळसपणे बघण्याची सवय लेखिकेची असल्याने त्यांच्या लिखाणातून त्यांचे वैचारिक व्यक्तित्व समोर येते. *आम्ही बायका, अडगळ, सुखाची गोधडी, माणुसकीचे पदर* इत्यादी लेख अंतर्मुख आहेत. अनेक लहान प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहिल्याने त्यांचे ललित लेखसंग्रह लोकप्रिय ठरले आहेत.

**मंगला गोडबोले:**

ललित गद्य प्रकारात अत्यंत शोध विषय घेऊन मार्मिक आणि विनोदी अशा दोनही शैलीतून लिखाण करणाऱ्या लेखिका म्हणजे मंगला गोडबोले. *झुळुक* (१९८५), *पुन्हा झुळुक* (१९८९), *नवी झुळुक* (१९९४), *सहवास हा सुखाचा* (१९९८), *अळवावरचे थेंब* ,*आणि मी* इत्यादी लेखसंग्रह त्यांच्या नावे आहेत. रोजच्या धकाधकीच्या जीवनातील ताण-तणावाच्या प्रसंगातही लेखिकेने विनोदी शैलीची किनार अतिशय सफाईदारपणे मांडली आहे. भेटणारी माणसे, त्यांच्या सवयी, लकबी, सांगत-विसंगतपणा यातून होणारे विनोद आणि बोध मांडताना लेखिकेची चिंतनशीलता, संबंधित व्यक्ती वाचकाच्या डोळयासमोर उभे राहण्याचे कौशल्य अधोरेखित होते.

**पद्मजा फाटक:**

*माणूस माझी जात* (१९९२), *सोने लुमिएर* , *गर्भश्रीमंतीचे झाड* इत्यादी ललित लेखसंग्रह *पद्मजा फाटक* यांनी लिहिले आहेत. लेखिकेच्या लेखनाचे वैशिष्ट्ये म्हणजे जे विचार मनात चालू आहेत त्याचे प्रतिबिंब अतिशय खोडकरपणे आणि गांभीर्य या दोनही

शैलीतून लेखनीतून उतरले आहे. एखादा अनुभव तारुण्य, प्रौढत्व आणि वार्धक्य या तीनही स्तरातून कसा घेत येईल हा वैचारिक सूक्ष्मपणा लेखिकेची एक वेगळीच ओळख आहे. अनेक स्थळ, गाव, शहरे, निसर्गातील बर्कावे, भूतकाळ... इत्यादी त्यांच्या लेखणीचे विषय ठरले आहेत.

**निर्मला मोने:**

*झोपाळ्याचं घर* (१९९१) हा ललित लेकसंग्रह निर्मला मोने यांनी लिहिला आहे. त्यांच्या लेखनातून झोपाळा कसा दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग होतो, लहान-मोठी सारी कामे झोपाळ्यावर केल्याने त्याच्याशी असलेले घट्ट नाते लेखिकेने अधोरेखित केले आहे.

**मंदा खांडगे:**

१९९२ साली *वैभव पेशवेकालीन वाड्याचे* हे पुस्तक मंदा खांडगे यांनी प्रसिद्ध केले. ऐतिहासिक नोंदी, कागदपत्रे, वाडे, त्यांचे वेगळेपण, वास्तूशास्त्राचा उपयोग, पेशवाई परंपरा, कोरीव नक्षी काम, भक्कम भिंती, अनेक वाड्यांचे भूयारी मार्ग, देवघर अशा विविध गोष्टींचा तपशील लेखिकेने अत्यंत काळजीपूर्वक मांडला आहे. ऐतिहासिक अभ्यासाच्या दृष्टीने हे पुस्तक महत्त्वपूर्ण ठरते.

**वसुंधरा पटवर्धन:**

जीवनविषयक तत्व सांगणारा *मी भटकते आहे* (१९५९) हा ललित लेखसंग्रह *वसुंधरा पटवर्धन* यांनी लिहिला आहे. स्वप्न, चाहूल, प्रश्न-उत्तर यांचा सुरेख मेळ घालत लेखिकेने लेख लिहिले आहेत. स्वतःला आलेले अनुभव, भेटलेली माणसे, घटना यांचे तपशील त्यांनी दिलेले आहेत.

**वासंती मुझुमदार:**

वासंती मुझुमदार यांनी *नदीकाठी* हे ललितगद्य लिहिले आहे. बालस्मृती, तारुण्य, कऱ्हाडची गरम संस्कृती, व्यक्तीचित्रण आणि आयुष्याची जडणघडण या साऱ्या स्मृतींचे *नदीकाठी* हे ललितगद्य किनारा दाखवत आहे.

**गौरी देशपांडे:**

गौरी देशपांडे यांनी १९९६ साली *विंचुर्णीचे धडे* हा लेखसंग्रह प्रसिद्ध केला आहे. विंचुर्णी नावाच्या अत्यंत खेडेगावचे गरमदर्शन त्यांच्या ललितगद्यातून होते. ओसाड, माळरान,

तुरळक घरे, दुष्काळ, गैरसोय, अशिक्षितता यांचे विदारक वर्णन त्यांनी संग्रहातून समोर मांडले आहे.

**विधुल्लेखा अकळूजकर:**

विविध कारणांमुळे परदेशात गेलेल्या किंवा तेथेच वास्तव्य करणाऱ्या अनेक स्त्रियांनी त्यांचे अनुभवविश्व शब्दबद्ध केले आहे. *मेरा जूता है जपानी* (१९९०), *मेपलची पाने* (१९९७), *यथा काष्टं च काष्टं च* (१९९१) इत्यादी लेखसंग्रह विधुल्लेखा अकळूजकर यांनी लिहिले आहेत. भारत आणि अमेरिकेतल्या जीवनशैलीत अगदी सहजरित्या जाणवणारी किंवा भासणारी तफावत लेखिकेने अधोरेखित केली आहे. अमेरिकन संस्कृती, स्त्रीजीवन, निसर्गाची विविध रूपे, जगभरातून अमेरिकेत वास्तव्यास आलेली माणसे, नीतिमुल्ये, कडक नियम यांचे दर्शन त्यांनी अनेक लेखातून करून दिले आहे.

**डॉ. अजिता काळे:**

१९७० साली अमेरिकेत गेलेल्या आणि तेथेच स्थायिक होऊन संतती नियमन केंद्र चालविणाऱ्या डॉ. अजिता काळे यांनीही *देशांतरीच्या गोष्टी सांगता* (१९९९) या ललित लेखसंग्रहातून अमेरिकेतील विकसित देशातील स्त्री आणि महाराष्ट्रातल्या कोपऱ्यातल्या, खेड्यातील स्त्री या दोघींची शारीरिक, मानसिक कुचंबना किती समान आहे हे लेखनबद्ध केले आहे. अलिशानपणाचा बुरखा काढल्यानंतर स्त्रियांच्या शरीर आणि मनाच्या जखमा त्यांनी अत्यंत भावशील पद्धतीने मांडल्या आहेत.

**शोभा चित्रे:**

अमेरिका आणि भारत यांची तुलना करणारे लेखसंग्रह शोभा चित्रे यांनीही लिहिले आहेत. *गोठलेल्या वाटा* , *गौरी गौरी तू कुठं आलीस* या पुस्तकातून भारत-अमेरिका तुलना आणि भावनिक कोंडमारा अधोरेखित झाले आहे. भयाण वास्तवता, बदलती नाती, अमेरिकन नागरिकत्व, भारताशी नाळ तोडून अमेरिकेशी जोडलेले संबंध, पाश्चात्य गोष्टींचा भडिमार, समलिंगी आकर्षण, सोय-गैरसोय इत्यादी वर्णने लेखिकेने अनेक वर्षांच्या अमेरिकेतील वास्तव्यामुळे अत्यंत सखोलपणे मांडली आहेत.

या लेखिकांप्रमाणे अनेक लेखिकांनी ललित लेखसंग्रहामध्ये परदेशात आलेले अनुभव मांडले आहेत. लंडनमध्ये डॉक्टरकी करताना आलेले अनुभव मीना प्रभू यांनी *माझं लंडन* (१९९१) यातून मांडले आहेत. *वर्षा पुराणिक* यांनी *फणसवाडी ते फिलाडेल्फिया* (१९९३), हेमा देवरे – *विश्व विदेश सेवेचे*, उषा गडकरी – *पश्चिमेच्या वृक्षाला पूर्वेची ओढ* (१९९१),

प्रतिभा रानडे – *अफगाण डायरी* (१९८२), विजया काळे – *विसरू म्हणता विसरेना* (१९८९)....... या प्रमाणे अनेक लेखिकांनी स्वानुभव चित्रित केले आहेत. त्यामुळे जगाच्या कानाकोपऱ्यातील अनेक माहिती मिळत आहेत.

ललित गद्यात प्रामुख्याने मनाला भावलेल्या गोष्टी, ठिकाण, माणसं, घटना, निसर्गातील बदल, बालपण, शालेय जीवन, घडणीचा काळ, वैवाहिक जीवन, संघर्ष आणि एकूणच मेंदूला भिडलेली गोष्ट लिखित स्वरूपात लेखिकांनी जेव्हा मानली त्यातूनच नव्या संघर्षमय आणि त्याच वेळी विनोदात्मक साहित्यात त्याची नोंद होत गेली. विविध क्षेत्रातील अनेक स्त्रियांनी ललित गद्य या साहित्यप्रकाराला आपलेसे केले आहे.

मराठी चित्रपट सृष्टीत आपला ठसा उमटवत असताना अनेक अभिनेत्रींनी ललित गद्य या प्रकारात लेखन केलेले आहे. *फुलपंखी* (१९९१) आणि *बोन्साय* (१९९८) हे दोन ललित लेखसंग्रह निशिगंधा वाड यांनी लिहिले आहेत. त्याच बरोबर स्मिता तळवलकर यांनी *पिंपळपान* (१९९२), *प्रिया तेंडुलकर* यांनी *पंचतारांकित* आणि *असंही* ही दोन ललितगद्य लिहिली आहेत. *तर* अश्विनी भावे यांनी *मनोभावे* हा ललित लेखसंग्रह लिहिला आहे.

निसर्गाची विविध रूपे *वृक्षागान* (१९८४), *फुलवा* (१९९१), *हिरवाई* (१९९४) या ललित लेखसंग्रहातून शरदिनी उहाणुकर यांनी *चाफा बोलेना* , *जास्वंद* , *मुकी अन् बोलकीही* इत्यादी लेखसंग्रह पुराणकालीन असलेल्या वर्णनाचा आधार घेत आणि श्लोकांचा अभ्यास करत लिहिले आहेत. या संग्रहातून त्यांनी आयुर्वेदातील पानाफुलांचे औषधी गुणधर्मही अधोरेखित केले आहेत.

नीलिमा भावे – *खूणगाठी* (१९८९), सुधा सोमण – *मी अर्धांगिनी* , *लाल दिव्याची गाडी* , वसुधा माने – *गोव्याचे दिवस* (१९८६), शकुंतला फडणीस – *होल्डॉल* , सुलभा द्रविड – *भिंतीवरची माणसे* , हेमा लेले – *ऐलमा पैलमा* (२०००), सुनीला रेड्डी – *निसर्गसूक्त* (२०००), माधवी कुंटे – *बिलोरी* (१९९५), गिरीजा कीर – *लावण्यखुणा* (१९९३), विजया संगवई – *गंधबावरी* (१९८०) अंजली कुलकर्णी – *हृदयस्पर्शी* (१९९९) सिसिलिया कार्व्हालो – *प्रकाशझोत* (१९९०), *मोगऱ्याचा मांडव* (१९९९), मंदा कदम – *गंधवीणा* (१९९२), शैलजा जोशी – *चैत्रपालवी* (१९९२), तारा नरोन्हा – *रंगफुलोरा* (१९८५), लीला बावडेकर – *निसर्ग खुणावतो आहे* , सुमेधा कामत देसाय – *उपवन* , विमला जोशी – *पाऊलखुणा* (१९८५), *कोथिंबीरीची फुले* , *तेथ लावण्याची ठेव* (२०००), मोहिनी वर्दे –

*तनुभव* (१९९३), शैलजा राजे – *हितगुज* (१९७०), सुधाताई जोशी – *एकत्र गुंफुनि जीवित धागे* (१९९२) *साखळीतील दुवे*, शांता बुद्धीसागर – *सहज जाता जाता* (१९७३), ज्ञानदा नाईक – *जरासे वेगळे* (१९९४).

१९५१ ते २००० या कालखंडातील स्त्रीलिखित ललित गद्याचा आढावा घेता लक्षात येते की, आपापल्या अनुभव विश्वाला स्त्रियांनी अत्यंत सुरेख प्रकारे लिखित स्वरूपात सादर केले आहे. देश-विदेशात आलेले अनुभव, तफावत, बरे-वाईट अनुभव, तुलना, नैसर्गिक सौंदर्य, सामान्यजन, गरीबी-श्रीमंती, बालपण, तारुण्य... अशा एकूणच मनात आलेल्या विचारांना लेखनबद्ध केल्याने या टप्प्यातील ललितगद्यात स्त्रियांचे योगदान मोठे आहे.

ललितगद्याचे लेखन केवळ मनाच्या शांतीसाठी नसून जीवनानुभव, सामाजिक विसंगती, लौकिक पातळी, नैतिक मूल्ये, वैचारिक चिंतनशीलता, भावनिक पातळी आणि आयुष्याकडे तटस्थपणे पहाण्याची दृष्टीचे असल्याने वाचनीय झाले असून साहित्यात वेगळेच स्थान ललितगद्याला प्राप्त झाले आहे.

### क) २००० ते २०१० या कालखंडातील ललित गद्य

१९५१ ते २००० च्या टप्प्यात आपण ललित गद्याचा चढता आलेख पाहिलेलाच आहे. आणि २००१ ते २०१० या टप्प्याचा अभ्यास करताना लक्षात येते की, स्त्री ललित लेखसंग्रहाचे दालन अधिकाधिक समृद्ध झाले आहे. ललित गद्याला अलिकडे 'मुक्त गद्य' असेही संबोधले जाऊ लागले आहे. कारण या साहित्य प्रकाराला कोणीही चौकात बंद करू शकत नाही. मनात आलेला गांभीर्याचा अथवा विनोदाचा कोणताही क्षण ललित गद्यात मोडतो. त्यामुळेच एकाचवेळी अनेक विषय ललित गद्यात समाविष्ट होताना दिसतात. परिणामी वाचकांना नाविन्याची ओढ कायम असल्याने ललित गद्य अधिक लोकप्रिय होत आहे. अशा या लवचीक वाङ्मय प्रकारात अनेक लेखिकांनी नव्याने लेखन केले आहे तर काही लेखिकांनी २००० पूर्वीही लेखन केले आहे.

#### वसुधा पाटील:

*वसुधा पाटील* यांनी २००१ मध्ये *उतरती उन्हं* हा ललित लेखसंग्रह प्रसिद्ध केला. लेखांचा विस्तार मोठा असला तरी आशय आणि विषयाचा विचार करता त्यांनी जीवनाकडे अतिशय संवेदनशीलवृत्तीने पाहिल्याचे लक्षात येते. अनेक नाजूक विषय, नव्या भावभावना, विविध छटातून त्यांच्या लेखांतून डोकावतात.

**शांता शेळके**:

*काही जवळ काही दूर* (२००१), *गुलाब, काटे, कळ्या* (२००२) हे लेखसंग्रह कवीमनाच्या *शांता शेळके* यांनी लिहिले आहेत. अ ते ज्ञ पर्यंतचा कोणताही विषय शांताबाईंनी लेखांमध्ये गुंफला तरी तो हरप्रकारे नावीन्यपूर्णच वाटतो. क्षणात तत्वज्ञान तर क्षणात ओव्या, लोकगीते, भावनिकता, तटस्थता, पाश्चिमात्य विचारवंताची मते, सुप्रसिद्ध कवींची विचारशैली, स्वानुभव यांचा सुरेख मेळ त्यांच्या ललित लेखसंग्रहातून समोर येतो.

**शिरीष पै**:

विलक्षण अंतर्मुखता आणि अति संवेदनशीलतेने आत्मपर ललित लेखसंग्रह लिहिणाऱ्या शिरीष पै यांचा *हाती शिल्लक* (२००१) हा ललित लेखसंग्रह अतिशय लोकप्रिय ठरला आहे.

**सुनीता देशपांडे:**

*मण्यांची माळ* (२००२), *मनातलं अवकाश* (२००६) हे दोन ललित लेखसंग्रह सुनीता देशपांडे यांचे आहेत. त्यांच्या सहज, साध्या, सरळ मात्र प्रभावी लेखनामुळे अनेक लेख अतिशय लोकप्रिय ठरले आहेत. भाषेवर प्रभुत्व, निर्मळ, प्रांजळ विचार, विषयाची गांभीर्यता, सखोलपणा, कौटुंबिक प्रसंग यांचे चित्रण त्यांनी लेखांमधून मांडले आहे. त्यांचे काही लेख आठवणींना उजाळा देणारे आहेत तर काही चिंतनात्मक विषयावर भाष्य करणारे आहेत. पु. ल. देशपांडे यांच्या समवेत थाटलेल्या चौपन्न वर्षाच्या संसारातील अनेक आठवणी त्यांनी खेळकर वृत्तीने मांडल्या आहेत.

**मंगला गोडबोले:**

विनोदी लेखन करत आपलं वेगळं स्थान निर्माण करणाऱ्या मंगला गोडबोले यांनी *अशी घरं अशी माणसं* (२००१), *गाठ आहे लग्नाशी* (२००३), *सुखी स्त्रीची साडी* (२००३), *पर्स हरवलेली बाई* (२००५) हे ललित लेखसंग्रह लिहिले. उत्तम वाङ्मयीन दर्जा, नरम विनोदी उपमा, रंजकता, विनोदी टीका आणि त्याचबरोबर हेतूपूर्वक केलेले लेखन यामुळे गोडबोले यांचा वाचकवर्ग अधिक प्रमाणात आहे. स्त्री आणि तिला चिटकलेली लेबल, त्या लेबलप्रमाणे तिची कर्तव्ये गोडबोल्यांनी अतिशय सोप्या रितीने मात्र परिणामकारक पद्धतीने मांडली आहेत.

**अरुणा ढेरे:**

सुप्रसिद्ध कवयित्री अरुणा ढेरे यांनी *आठवणीतले आंगण* (२००१), *नव्या-जुन्या काठावरती* (२००१), *माणूस आणि माती* (२००४), *कवितेच्या वाटेवर* (२०१०) इत्यादी ललित लेखसंग्रह लिहिले आहेत. शहरी वातावरणाचा प्रभाव त्यांच्या मनावर असला तरी ग्रामीण संस्कृतीची ओढ त्यांच्या लेखनातून जाणवते. लोकसंस्कृतीचा सखोल अभ्यासकर्त्या म्हणून त्यांची ओळख आहे. लोकसंस्कृतीचे उपासक, सण, उत्सव, श्रद्धा, परंपरा यांचे भरभरून वर्णन त्यांच्या लेखांमधून जाणवते. *नव्या-जुन्या काठावरती* मध्ये थोर विभूतींबद्दल लेख लिहिले आहेत. *माणूस आणि माती* या लेखसंग्रहातून आदर्श व्यक्तिमत्त्वाचे घटनाप्रसंग त्यांनी मांडले आहेत. तर *कवितेच्या वाटेवर* यातून काव्य मध्यवर्ती ठेऊन लेख निर्मिती केली आहे.

**डॉ. मंदा खांडगे:**

*डॉ. मंदा खांडगे* यांनीही ललित गद्यात वेगळेच स्थान निर्माण केले आहे. *कवीच्या गावा जावे* (२००१), *सोनफुलं* (२०१०) हे त्यांचे उल्लेखनीय लेखसंग्रह आहेत. *कवीच्या गावा जावे* यातून एकूण तेरा कवी आणि कवयित्रींच्या काव्यमय प्रवासाचा आढावा त्यांनी घेतला आहे. कवी-त्यांचे काव्य-गाभा-कवीचे मूळ\गाव-भौगोलिक परिस्थिती आणि त्यांचे अंतरंग अगदी जिज्ञासू वृत्तीने लेखिकेने मांडले आहे. तर *सोनफुलं* मधून बालपणीच्या आठवणींची श्रीमंती त्यांनी अधोरेखित केली आहे. या ललित लेखसंग्रहातील सूर्यास्त*, ठकी, खुर्ची, मी एक थांबलेली, रस्ता भरून वाहे* हे लेख वाचकप्रिय ठरलेले आहेत.

**सिसिलिया कार्व्हालो:**

नैसर्गिक सौंदर्याची अतिव ओढ आणि लेखन, काव्याचे वेड असणारी कवयित्री-लेखिका म्हणजे सिसिलिया कार्व्हालो. वसई हे त्यांचे गाव, आणि निसर्गाची मुक्त उधळण, हे वसईचे वैशिष्ट्ये. त्यातच लेखिकेने केलेले लेखन अतिशय विलोभनीय ठरले आहे. अनेक लेखांमधून त्यांच्या कल्पना, काव्यात्मकता, भाषा, निरीक्षणे असल्याने लेखन अधिक समृद्ध झाले आहे. २००४ मधील *मुठीतले आकाश* हा त्यांचा अधिक लोकप्रिय असलेला ललित लेखसंग्रह आहे.

**ज्योत्स्ना आफळे, नंदा सुर्वे**:

ज्योत्स्ना आफळे – *अशाच एखाद्या निवांत क्षणी* (२००४), नंदा सुर्वे – *पाने उलटताना*

(२००४) या दोनही लेखिकांनी जीवनात आपापले बालपण, शिक्षण, कॉलेज, नातेसंबंध, व्यावहारिक जीवनात आलेले अनुभव लेखांमधून अधोरेखित केले आहे.

**रंजना पंडित, कविता मेहेंदळे**:

*मन शुद्ध तुझं* (२००४) हा लेखसंग्रह रंजना पंडित यांनी लिहिला आहे. या संग्रहातून लेखिकेने अनेक गंभीर विषय हाताळले आहेत. आकाशवाणीमध्ये निवेदक म्हणून काम करताना आलेले अनुभव, स्त्री मन, बंडखोर स्त्री असे निरनिराळे विषय त्यांच्या लेखनीतून अधिक धारधार पद्धतीने मांडले गेले आहेत. तर नातेसंबंधावर अधिक प्रकाश टाकत कविता मेहेंदळे यांनी *भावमुक्ता* (२००४) या लेखसंग्रहातून लेखन केले आहे. सामाजिक भान, कौटुंबिक नातेसंबंध यावर प्रकाश टाकत लेखिकेने अनेक प्रश्नांची उत्तरे लेखांमधून दिली आहेत. तर *गोफ* (२००४) या लेखसंग्रहातून अंजली देशपांडे यांनी वधू-वर सूचक मंडळी – लग्न, अडचणी, अपेक्षा, खरेदी, संसार यावर नजर टाकत लेखनिर्मिती केली आहे. विवाह विषयक उपयुक्त सूचनाही त्यांनी याद्वारे सांगितल्या आहेत. तर *गुलाबदाणी* (२००४) या ललित लेखसंग्रहातून सुवर्णा दिवेकर यांनी भिक्षुकी करणारे, सत्यनारायण पूजा सांगणारे, विवाह जमविणारे भिक्षुकभट यांची आताच्या काळातील आणि पूर्वीच्या काळातील तुलनात्मक मांडणी केली आहे.

२००५ मध्ये विधुल्लेखा अकळूजकर यांनी कॅनडात वास्तव्य करूनही मराठी, संस्कृत, हिंदी, पाली, अर्धमागधी, कोकणी, इंग्लिश, जर्मन, फ्रेंच या भाषांची सांगड घालत *शब्दवेध* हे पुस्तक उपलब्ध करून देत मोलाची कामगिरी बजावली आहे.

वैदेही देशपांडे यांनी *मुक्काम : आर्मी पोस्ट ऑफिस* हा ललित लेखसंग्रह २००५ मध्ये प्रसिद्ध केला आहे. भारतीय सैन्यातील एकूण सुख-दुःखाचा आलेख यातून त्यांनी मांडला आहे. सैन्य, शिस्त, अधिकारी, ड्युटी, विविध प्रांत, भाषा आणि नवरे कामावर गेल्यानंतर त्यांच्या बायकांचे विश्व लेखिकेने अधोरेखित केले आहे.

२००५ मध्येच *जा उडुनि जा पाखरा* हा लेखसंग्रह रिजवाना कश्यप यांनी लिहिला आहे. यातून त्यांनी जीवनातील विविध टप्प्यावर येणारे अनुभवविश्व आणि गतकाळातील आठवणींना उजाळा दिला आहे. तर विमला जोशी यांनी *खिडक्या आणि झरोके* या २००५ च्या ललित लेखसंग्रहातून मनाला भावलेल्या अनेक गोष्टींचे लेख त्यांनी लेखन स्वरूपात मांडले आहेत.

माझं अंतर्विश्व म्हणजेच ललित असे म्हणणाऱ्या रेखा बैजल यांनी २००६ मध्ये *नक्षत्र* तर २००७ मध्ये *प्रकाश शलाका* हे दोन ललित लेखसंग्रह लिहिले. आयुष्य-प्रश्न-उत्तर-

जाणीव, अनुभवविश्व, स्वान्तसुखाय अशा अत्यंत सोप्या आणि सहज वैचारिकतेने त्यांनी चिंतनशील लेखन केले आहे.

२००६ मध्ये शकुंतला फडणीस यांनी *प्रेशस स्टोन* हा ललित लेखसंग्रह लिहिला तर *डॉ. अश्विनी धोंगडे* यांनी प्राध्यापक आणि प्राचार्य म्हणून कार्यरत असताना अनेक मुलांशी संवाद घडत गेला त्यातून अनेक समस्या त्यांना उलगडत गेल्या त्यांना मार्गी लावल्यानंतर त्यांनी २००६ मध्ये *जगणे व्हावे सुंदर म्हणुनी* हा लेखसंग्रह लिहिला. तर आलेल्या प्रत्येक अनुभवाला, आव्हानाला हसत सामोऱ्या जाणाऱ्या माधुरी शानभाग यांनी *फुले आणि पत्री* हा ललित लेखसंग्रह २००६ मध्ये लिहिला. मनात येणारा प्रत्येक विचार त्यांनी प्रांजळपणे मांडलेला आहे त्यामुळे त्यांचे लेखन अत्यंत मोकळेपणाचे वाटते.

२००७ मध्ये *स्पर्श सुवर्णाचा* हा ललित लेखसंग्रह शीला निपुणगे यांनी लिहिला आहे. जीवनप्रवासाची आत्मकथनात्मक पर्वणी त्यांनी यातून मांडली आहे. तर *प्रेमाची माणसं* (२००७) या लेखसंग्रहातून अनघा केसकर यांनी जीवन जगत असताना भेटलेली माणसे, त्यांचे दृष्टिकोन, विचारशैली अनेक लेखांमधून मांडली आहे.

२००१ ते २०१० या टप्प्याचा अधिक अभ्यास पहाता लक्षात येते की अत्यंत प्रांजळपणे अनेक लेखिकांनी लेखन केले आहे, तर काही लेखिकांनी केवळ भूतकाळाला प्राधान्य दिले आहे. मात्र काही ललितगद्य हे चिंतनात्मक, विनोदी असेही आहे. लेखन विस्तार विस्तृत असल्याने सर्वच लेखिकांचा उल्लेख झालाच असेल असेही नाही, मात्र काही लेखिकांचे लेखन अनासये दुर्लक्षित होऊन जाते. काही लेखिकांच्या विषयात एकसुरीपणा असल्यानेही ही बाब घडू शकते. मात्र त्यातूनही नाविण्यपूर्ण लेखन करतानाही लेखिका दिसतात. उदाहरणार्थ वासंती मुझुमदार यांनी *झळाळ* या लेखसंग्रहातून निरनिराळे विषय हाताळले आहेत. व्यक्तिचित्रण, परदेश वर्णन आणि त्यांच्या चिकित्सक बुद्धीचा कस लेखनातून जाणवतो. तर डॉ. सुलभा हेर्लेकर यांनी *दूर दिव्याच्या सायंकाळी* या लेख संग्रहातून काव्यात्मकता अधोरेखित केली आहे.

विदर्भातील शेतकऱ्यांची परिस्थिती, हाल, दुःख अधोरेखित करणाऱ्या विदर्भकन्या प्रतिमा इंगोले यांनी त्यांच्या *झेंडवाईचे दिवे* या ललित लेखसंग्रहातून लयास जाणाऱ्या ग्रामीण संस्कृतीची माहिती दिली आहे. अनेक गोष्टी काळाबरोबर बदलत जात असल्याने मनातील खळबळ लेखिकेने शब्दबद्ध केली आहे. *घर कौलारू* या ललित लेखसंग्रहातून निर्मला माने यांनी कोकणाचे विलोभनीय वर्णन केले आहे. कोकण प्रदेश, शेती, सौंदर्य, कष्टाळू माणसे, गरीब सोशिक स्त्रिया, जेमतेम शिक्षण असले तरी जगण्याच्या अनेक पद्धती

आत्मसात करणाऱ्या कोकणवासीयांचे चित्रण या लेखांमधून लेखिकेने केले आहे. डॉ. नीलिमा गुंडी यांनी *शब्दांची पहाट* या लेखसंग्रहातून लहान मुलांच्या चौकस बुद्धी विषयी, त्यांची कल्पनाशक्ती, तर्क-वितर्क, त्यांच्या विकासाचे टप्पे असा वेगळा विषय मांडलेला आहे. *मनाचिये अंधाराचा* या ललित लेखसंग्रहातून *शशिकला उपाध्ये* यांनी समाजातील दरी स्पष्ट केली आहे. अनेक अनुत्तरीत प्रश्नांना पुढे आणले आहे. अनेक लहान-मोठ्या गोष्टींमधून समाजाची घडी व्यवस्थित बसू शकते असेही लेखिका सुचविताना दिसते, मात्र जो-तो आपल्यावरच खुष आणि मश्गुल असेल तर सामाजिक, राजकीय प्रश्न कधीच सुटू शकत नाही हे लेखिका स्पष्ट करते. विनिता महाजनी यांनी *दर्यापार* तर विजया काळे यांनी *अल्याड पल्याड* या ललित लेखसंग्रहातून परदेशातील पर्यटन, वास्तव्य करताना आलेल्या अनुभवांची पर्वणीच मांडली आहे.

... याशिवाय गिरीजा कीर – *ओंजळीतील पसायदान* (२००९), मीना पाटकर – *अशी माणसे भवती* (२००२), शोभा कुलकर्णी – *चैत्रांगण* (२००२), शुभांगी भडभडे – *थेंबांची रांगोळी* (२००२), प्रमिला पटवर्धन – *समृद्धी* (२००२), शैला लोहिया – *मनतरंग* (२००२), यशोधरा भोसले – *बंजाऱ्याचे घर* , सुनीता मराठे – *माळ्यावरची अडगळ* , आश्लेषा महाजन – *रूजवाई* , मृणाल कुलकर्णी – *मेकअप उतरल्यावर* (२००८), सोनाली कुलकर्णी – *सो कुल* (२००९), राणी दुर्वे – *अवघाचि शेजार*, वनिता देशमुख – *पाखरं* (२००३), संध्या रंगारी – *चांदणचुरा* (२००७), माया दामोदर – *मंथन* (२००८), प्रा. उषा आंभेरे – *मीरा* (२००५)...

.आदी लेखिकांनी ललितगद्य या प्रकारातून आपले विचार मांडले आहेत. काळानुसार ललितगद्य लेखनाचे विषयही बदलत गेले आहेत. संगणक युगातल्या माणसाचे विचार, तरुणाईचे विचार, जेष्ठांचे विचार, जगण्यातील हरवत जात असलेली गंमत, बोथट होत असलेली माणुसकी... असे नवे विषय या प्रकारातून समोर येत आहेत. मात्र काही अंशी विषय एकसुरीपणाचेही आढळतात. सुनीता देशपांडे, मंगला गोडबोले, शांता शेळके, वसुधा पाटील, अरुणा ढेरे, ज्योत्स्ना आफळे, सिसिलिया कार्व्हालो या आदि लेखिकांनी मात्र त्यांच्या लेखनातील वैचारिक पातळी आणि मनातील भाव कल्लोळ यांची उत्तम सांगड घालत लेखन केलेले दिसते.

वाचकाला सतत नवे खाद्य हवे असते. म्हणून प्रत्येक वेळी आपले लेखन पडताळून पहाणे

गरजेचे आहे. ललित गद्य हा प्रकार मुक्त असल्याने कोणतीही चौकट किंवा साच्या या वाङ्मय प्रकाराला बांधून ठेवू शकत नाही. यासाठीच या वाङ्मय प्रकारातून नवे विचार, नवा आशय, नव्या कल्पना, नव्या प्रतिमा याबरोबर आजच्या जगाशी सतत संपर्क असण्याची गरज आहे.

एकूणच २००१ ते २०१० च्या टप्प्याचा अभ्यास करताना लक्षात येते की, ललित गद्य हा प्रकार अधिकाधिक लेखिका आपलासा करताना दिसत आहेत.

**संदर्भ ग्रंथसूची**


१. भालचंद्र फडके, "स्त्रियांचे अन्य लेखन", मराठी लेखिका : चिंता व चिंतन, श्रीविद्या प्रकाशन, पहिली आवृत्ती मार्च १९८० पृ. २२६

२. भालचंद्र फडके, "स्त्रियांचे अन्य लेखन", मराठी लेखिका : चिंता व चिंतन, श्रीविद्या प्रकाशन, पहिली आवृत्ती मार्च १९८० पृ. २२६

३. भालचंद्र फडके, "स्त्रियांचे अन्य लेखन", मराठी लेखिका : चिंता व चिंतन, श्रीविद्या प्रकाशन, पहिली आवृत्ती मार्च १९८० पृ. २२८

४. डॉ. कीर्ती मुळीक, 'ललितगद्य' , स्त्री साहित्याचा मागोवा खंड ४ इ. स. २००१ ते २०१७, डायमंड प्रकाशन, प्रथमावृत्ती नोव्हेंबर २०१५, पृ. क्र.२३३

## घटक: ब स्त्रीलिखित वैचारिक गद्याचे स्वरूप

### अ)१८३० ते १९०० या कालखंडातील स्त्रियांचे वैचारिक लेखन:

मराठी वाङ्मयपरंपरेत लेखिकांनी वेगवेगळे साहित्यप्रकार उत्तमरित्य हाताळले. कथा, कविता, कादंबरी, प्रवासवर्णने, ललितगद्य याप्रमाणेच 'वैचारिक लेखन' करण्यासही लेखिकांनी आपला सहभाग दर्शवला. स्त्रियांचे वैचारिक लेखन हे संख्येने कमी असले तरी ते महत्त्वपूर्ण असे आहे. स्त्री शिक्षणाचा प्रसार झाल्यापासून स्त्रियांचे लेखन क्षेत्रात्तील कार्य सुरु झाले. सावित्रीबाई फुले व ज्योतिबा फुले यांच्या प्रयत्नानेच स्त्रीशिक्षणास चालना मिळाली.

इ. स. १८१२ मध्ये हॅरिफ्ट ज्युबेल व ज्युडसन यांच्या विचारातून खेड्यामधून सामुदायिक शिक्षणाचा यशस्वी प्रयत्न घडवून आणला गेला. त्याच्या या प्रयत्नाने 'स्त्रीलाही पुरुषांप्रमाणे जगण्याचा अधिकार आहे'. हा विचार स्त्रीमनापर्यंत पोहचवण्यासाठी विविध सुबोध पुस्तिकांतून वेगवेगळे स्त्रीविषयक लेख प्रसिद्ध होऊ लागले. स्त्रीच्या समस्या, स्त्रीची मानसिकता, स्त्री जीवन, स्त्रीचे समाजात होणारे शोषण अशा असंख्य विषयावर लेखनाबरोबर चळवळी सुरु झाल्या. समाजसुधारकांनी स्त्री सुधारणासाठी प्रयत्न सुरु केले आणि या चळवळीचे पडसाद १८३२ पासून नियतकालिकामध्ये दिसू लागले. स्त्री वैचारिक लेखनाचा प्रारंभ हा १८३२ मध्येच झाला.

सुरुवातीच्या काळात स्त्रियांनी केलेले वैचारिक लेखन हे वृत्तपत्रासाठी होते. १८३२ मध्ये *माता* या वृत्तपत्रातून 'स्त्री' मनाचा वेध घेणारे लेखन झाले. स्त्री वैचारिक लेखनास प्रारंभ झाला; तो *माता* या वृत्तपत्रामुळेच. 'स्त्री'ला स्वभानाची जाणीव झाल्यानंतर स्त्रियांनी आपले प्रश्न, विचार मुक्तपणे मांडण्यास सुरुवात केली. पण ती अजूनही तत्कालीन सामाजिक बंधनातून बाहेर पडली नव्हती, त्यामुळे सुरुवातीच्या काळात स्त्रियांनी जे वैचारिक लेखन केले, त्याला स्वतःचे नाव न देता *एक भगिनी, एक गरीब भगिनी* अशा नावाने स्त्रियांनी लेखन केले. आपल्या लेखनाद्वारे त्यांनी विधवा पुनर्विवाह, बालविवाह, सती प्रथा, केशवपन अशा कलंकित प्रथांवर हल्ला चढवला.

१८३० ते १९०० या कालखंडात अनेक विचारवंत विधवा विवाहाविषयी मत मतांतरे नोंदवत होते. त्यांची मतमतांतरे *इंदुप्रकाश* या अंकातून प्रकाशित होत होती. या प्रेरणेनेच १३ सप्टेंबर १८८६ च्या *इंदूप्रकाश* च्या अंकात एका विचारवंत स्त्रीने बालविवाह, विधवा विवाह या विषयावर बोलणारे पुरुष, स्त्रीची मनःस्थिती जाणून न घेता स्त्रियांविषयी त्या विचारवंतांची असलेली मतमतांतरे, एकूण या सर्वात पुरुषांचाच फायदा कसा होतो.

इत्यादी विषयांवर प्रखरपणे *आपली भगिनी* या नावाने लेखन केले. तिचे हे लेखन तटस्थ स्वरूपाचे होते.

'बालविवाह' या एकाच विषयाचे विविध कंगोरे घेऊन स्त्रियांनी वैचारिक लेखन केले. 'बालविवाह' या विषयाला अनुसरूनच स्त्रियांनी स्त्रीची लैंगिक भावना, शरीररचना, वयात येणे, स्त्रीचे समाजाकडून होणारे शोषण या विषयावरही वृत्तपत्रातून लेखन केले. या लेखनातून मुलींच्या लग्नाचे वय ठरविले जावे असा एक विचारही मांडला गेला. याविषयी अनेक विचारवंतांनी आपली मते मांडली. अशा विचारवंतांच्या मताला एका भगिनीने १६ डिसेंबर १८८९ च्या *सुधारक* या अंकात आपले विचार मांडून खोडून काढण्याचा प्रयत्न केला. या अंकातील पत्रात ती म्हणते, "नुकतीच सामाजिक सुधारणा परिषद झाली. यात मोठमोठया विचारवंतांच्या सह्या आहेत. त्यात सहा कलमे आहेत. मुलींच्या लग्नाचे वय १० वर्षांचे ठेविले आहे. हे कलम ते कशाला? आणि त्याच्याखाली प्रतिज्ञा ती कशाला करून घ्यायची? आजकाल प्रतिज्ञेशिवाय मुली बारा बारा वर्षाच्या लग्नाला लोक ठेवू लागले आहेत आणि या प्रतिज्ञापत्रकावर १० वर्षांचे कलम ते कशाला ठेवले आहे? बारा आणि चवदा असती तर काय वावगे होते? असली अर्धीमुर्धी सुधारणा करून भागल्याचा आव आणणारे सुधारक मी म्हणते या काळी उपयोगाचे नाहीत. त्याला गोस्वामीसारख्या रात्रंदिवस त्याच उद्योगात निमग्न असणारा मनुष्य असला पाहिजे." [१]

उपरोक्त भगिनीच्या लेखनातून ती भगिनी तत्कालीन वर्तमानबद्दल किती जागृत होती, याची कल्पना करता येते.

१८३० नंतरच स्त्रियांनी विविध विषय हाताळले. पण तरीही स्त्रियांचे हे लेखन 'स्त्रीकेंद्रित' विषयांवरच असल्याचे जाणवते. पण 'चूल आणि मूल' या बंधनात जखडलेल्या स्त्रियांनी एकत्र येऊन सभा संमेलने, चर्चासत्रे घेऊन तर्कशुद्ध पद्धतीने निर्भीडपणे वृत्तपत्र व मासिकातून लेखन केले, हे तत्कालीन समाजस्थिती पाहता क्रांतिकारकच असे होते.

१८८०-८१ या कालखंडात वैचारिक लेखन करणाऱ्या लेखिकांमध्ये सर्वात महत्त्वाचे नाव म्हणजे ताराबाई शिंदे. इ. स. १८८१ साली विजयालक्ष्मी नावाच्या एका विधवेने गर्भपात केल्यामुळे तिच्यावर खटला झाला आणि या विषयांवर अनेक जाणकारांनी लेखन केले, मते व्यक्त केली. या विषयीची मते *पुणे वैभव* या पत्राद्वारे येत होती. या विषया संदर्भातच प्रेरणा घेऊन ताराबाई शिंदेंनी *स्त्री-पुरुष* हा निबंध लिहिला. या संदर्भात ताराबाई शिंदे लिहितात की, "बावनखणीसारख्या गृहशाला बांधण्याऐवजी घरच बांधावे लागेल व तुमच्या करिता बारीक मोठे टोलेजंग कारागृह करणे भाग पडेल. कसे म्हणाल? तर

जिचा सरकार पुनर्विवाह करून देईल ती, त्या लहानशा गृहराष्ट्रात आपल्या नूतन पतीबरोबर आनंदात राहून सरकारास आजन्मपर्यंत कल्याण इच्छील, ....' "विधवांना फशी पडणाऱ्या पुरुषांनाच कारागृहात टाकून सरकारने अशा लक्षावधी नरपशूंपासून कामे करवून घ्यावीत म्हणजे गरीब बिचाऱ्या बैल, हेले, घोडे, गाढ्विंचे कष्टांमुळे होणारे हाल वाचतील व सरकारला पुण्यप्राप्ती होऊन खजिना भरती करता येईल."[२]

ताराबाईंचे हे वैचारिक लेखन म्हणजे वैचारिक लेखनाचा एक उत्कृष्ट नमुनाच होता. त्याचप्रमाणे ताराबाईंनी सती प्रथेच्या विरोधातही टोकदार असे लेखन केले. *स्त्री-पुरुष तुलना* या पुस्तकात त्या केशवपन पद्धतीवर हल्ला चढवताना असेही म्हणतात की, "तुमच्या बायका मेल्या म्हणजे तुम्हीही आपले तोंड काळे करून, दाढ्या-मिश्या भादरून यावत आजन्मपर्यंत कोठेही अरण्यवासात का राहू नये बरे?"[३] ताराबाईंनी आपल्या लेखणीतून देवालाही सोडले नाही. त्यांचे एकूणच लेखन हे धारदार विचार मांडणारे होते. समाजातील सर्व क्षेत्रात स्त्री व पुरुष यांना कसे समान हक्क आहेत हा विषय त्यांनी हिरहिरीने मांडला. एकूणच स्त्रीलेखनाच्या सुरुवातीच्या काळातच एवढे क्रांतिकारक विचार ताराबाई शिंदे यांनी मांडले हे उल्लेखनीय असेच आहे.

ताराबाईंच्या बरोबरीनेच १८४० ते १९१० याच कालखंडात पंडिता रमाबाई सरस्वती यांनीही *स्त्री-धर्मनीती* या पुस्तकातून आपले विचार मांडले. पंडिता रमाबाईचे उपरोक्त पुस्तक प्रसिद्धीस पावले. पण तत्कालीन समाजाने त्यांच्या विचारांची दखल घेतली नाही. तसेच ख्रिस्ती धर्मियांनी विधवांच्या हितासाठी कार्य करणारे बालहत्या प्रतिबंधक गृहे काढली. जेणे करून कोणतीही विधवा गर्भपात करणार नाही. या संदर्भात रमाबाईंनी आपल्या *शब्दबीज* या पुस्तकात असे लिहिले की, "माझ्या स्वतःच्या देशातील हिंदूंनी असल्या पतित स्त्रियांसाठी अशा प्रकारचे (रिस्क्यू होम) काम केलेले मी कधी पाहिले नाही, की ऐकलेले नाही. कोणीही या पतितांशी प्रेमळपणाने बोलल्याचे मला ठाऊक नाही किंवा वाममार्गापासून दूर सारण्याचा कोणी प्रयत्न केल्याचेही मी कधी पाहिले नाही. अशा स्त्रियांच्या बाबतीत हिंदू शास्त्रे फार कठोर आहेत."[४] असे प्रामाणिक मत रमाबाई सरस्वती यांनी मांडले. रमाबाईंनी आपल्या लेखनातून स्त्रीने समाजात, कुटुंबात, पतीशी कसे वागावे, कोणती कामे करावी, आळस झटकून कशाप्रकारे काम करावे अशा प्रकारचे अनेक विचार स्त्रियांच्या मनात रुजवण्याचा प्रयत्न केला. पण असे असले तरी रमाबाईंनी ख्रिस्ती धर्मतत्त्वे मांडली व स्वतः ख्रिस्ती धर्म स्विकारला.

रमाबाईंच्या उलट सावित्रीबाई फुलेंनी कार्य केले. स्वधर्मात राहूनच स्त्रियांना इंग्रजी

विद्या शिकण्यास, शिक्षण घेण्यास प्रवृत्त केले. सावित्रीबाईंनी जसे काव्य लिहिले तसे त्यांनी वैचारिक निबंधही लिहिले. उदाहरण : *विद्यादान* हा त्यांचा वैचारिक निबंध. या निबंधातून त्या शिक्षण घेतल्याने मनुष्याचा होणारा सर्वांगीण विकास व शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी आवश्यक घटक हा विचार मांडतात.

याच कालखंडात ख्रिस्त धर्म प्रचार करणाऱ्या सी. पी. फेरार यांच्या पत्नी मिसेस फेरार यांनीही या कालखंडात वैचारिक दृष्टिने लेखन केले. *कुटुंब प्रवर्तन नीती* हे त्यांचे वैचारिक दृष्टिकोनातून लिहिलेले पुस्तक. तद्प्रमाणे त्यांनी ख्रिस्ती धर्मप्रचारकी स्वरूपाचेही लेखन केले.

थोडक्यात या कालखंडात वृत्तपत्र,मासिक व स्त्रीशिक्षण या घटकांच्या एकत्रीकरणानेच स्त्रिया निर्भिडपणे लेखन करू लागल्या. *दर्पण* या वृत्तपत्रापासूनच निनावी लेखन करण्यापासून नाव देऊन लेखन करण्याचा प्रवास स्त्रियांनी केला. तसेच १८९६ मध्ये *मनोरंजन, सुधारक* या सारख्या वृत्तपत्रातून स्त्रियांनी लेखन केले. याच कालखंडात अनेक स्त्रियांनी धर्मांतर केल्यामुळे ख्रिस्ती धर्मात जाऊनही त्यांनी लेखन केले. त्यात अनुसया ख्रिस्ती, दिनूबाई, वेणूबाई केळकर यांची नावे घेता येतील.

१९०० नंतरच्या कालखंडात मात्र विविध विचारप्रणालींच्या प्रभावाने व चळवळींमुळे पुरुषाबरोबर स्त्रियांनीही नव्या जोमाने लेखन केले. १९०० पूर्वी जरी स्त्रियांचे लेखन वृत्तपत्र व मासिकातून अल्प प्रमाणात झाले असले तरी ते दखल घेण्याजोगे होते.

### ब) १९०० ते १९५० या कालखंडातील स्त्रियांचे वैचारिक लेखन

इ.स. १९०० नंतरच स्त्रियांचे शिक्षण क्षेत्रातील कार्य सुरु झाले. १९०० – १९५० या कालखंडात बहुतांश स्त्रियांनी शिक्षणाच्या जोरावर प्रबोधनपर असे लेखन २० व्या शतकाच्या प्रारंभी केले. शिक्षणामुळे स्त्रियांच्या विचारात, वागण्यात बदल झाला. थोडक्यात स्त्रियांचा सर्वांगीण विकास होण्यास शिक्षण हे स्त्रियांसाठी महत्त्वपूर्ण ठरले. प्रारंभ ते १९०० पर्यंत स्त्रियांनी मासिक, नियतकालिके, वृत्तपत्र या माध्यमातून लेखन केले. १९०० पर्यंतच्या कालखंडात पुस्तक रुपात लेखन करणाऱ्या काही मोजक्याच स्त्रिया होत्या. पण १९०० नंतर स्त्रियांचे वैचारिक लेखन हे पुस्तक रूपानेही वाचकांसमोर येऊ लागले. १९०० ते १९५० या कालखंडाच्या सुरुवातीलाही लेखिकांनी बालविवाह, बालविधवा, विधवा विवाह, केशवपन, हुंडाबळी, स्त्रियांच्या समस्या या विषयांवर लेखन झाले. पण १९३० नंतर मात्र स्त्रियांच्या वैचारिक लेखन विषयात नवीन विषयांची भर पडली. १९३०

पर्यंत स्त्रियांची वैचारिक पुस्तकेही संख्येने कमीच होती. पण १९३० नंतर नवीन विषयांच्या जोडीने स्त्रियांनी वैचारिक लेखन जोमदारपणे सुरु केले व नंतर अनेक स्त्री लिखित वैचारिक पुस्तके प्रकाशित झाली.

१९३० नंतर अनुसूया काळे *(पातिव्रत्य विचार)*, मधुराबाई जोशी *(भावी आयुष्य सुखमय करण्याची तरूण पिढीवर असलेली जबाबदारी)*, कमलाबाई किबे *(तरूण मुलीस पत्र)* अशा वैचारिक पुस्तकांचे लेखन झाले. या पुस्तकांच्या शीर्षकावरूनच यातील विषयांशी परिचय होतो. या कालखंडात गिरिजाबाई केळकर यांनी केलेले वैचारिक लेखन उल्लेखनीय आहे. *गृहिणीभूषण भाग – १* हे त्यांचे पुस्तक लोकप्रिय झाले. यात त्यांनी मुला-मुलींना सारखाच अभ्यासक्रम शिकवणे उपयोगाचे नाही, मुलींना कसे वेगळे शिक्षण द्यावे हे सांगितले आहे. स्त्रियांना व्यावहारिक शिक्षणाबरोबर घर उत्तम व सुखदायक करण्याचे, चालीरीती, गृहकृत्ये, संसार यांचे ज्ञान द्यावे असे त्या *गृहिणीभूषण भाग – १* या पुस्तकातून आपले मत मांडतात.

तसेच गिरिजाबाईंनी *संसार सोपान* नावाचं १९३९ मध्ये अजून एक वैचारिक पुस्तक लिहिले. यात त्या एकत्र कुटुंब पद्धती व विभक्त कुटुंब पद्धती यातील अंतर स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतात. तसेच मुलींच्या शिक्षणाचा त्यांच्या संसारिक जीवनात कसा परिणाम होतो, याकडेही वाचकांचे लक्ष पुरवण्याचा प्रयत्न केला आहे. थोडक्यात गिरिजाबाईंनी मुलींच्या शिक्षणापेक्षा तिने संसारिक जीवनात कसे वागावे, वावरावे याचे शिक्षण देण्याकडे अधिक लक्ष पुरवला आहे.

गिरिजाबाईंप्रमाणेच पुराणातील संदर्भ घेऊन यशोदाबाई भट यांनी *आर्य स्त्री रत्ने* या नावाचे वैचारिक पुस्तक लिहिले. या पुस्तकांतून त्यांनी आर्यसंस्कृती व त्यावेळच्या साध्वींचे संसारिक जीवन यावर प्रकाश टाकला आहे. यात त्यांनी आर्य सहा स्त्रियांच्या चरित्रकथा लिहिल्या आहेत. एका पत्नीने आपल्या पतीचे आयुष्य, आरोग्य वाढवण्यासाठी काय काय केले पाहिजे ? हे सांगितले आहे. पुरुषांच्या वाकड्या नजरा स्त्रियांनीच सरळ करायला पाहिजे असे त्या म्हणतात. त्यांचा हा संदेश आजही वर्तमान काळास लागू होतो.

१९३०-४० या कालखंडात प्रबोधनपर लेखन स्त्रियांनी केलेच; पण त्यापेक्षा भारतीय संस्कृती, स्त्रीजीवन, स्त्रियांची कर्तव्ये, जबाबदाऱ्या या विषयांचेही जोरदार लेखन झाले. रमाबाई रानडे, काशिबाई कानिटकर, काशीबाई हेरलेकर, मधुराबाई जोशी, पार्वतीबाई आठवले, गिरिजाबाई केळकर, यशोदाबाई भट यासारख्या स्त्रियांनी प्रारंभ ते १९४० पर्यंत वैचारिक लेखनात आपले योगदान दिले.

१९३०-४० नंतर स्त्रियांचे शिक्षणक्षेत्रातील कार्य वाढत गेले व त्यानंतर स्त्रियांनी इतर वाङ्मय प्रकारही मोठया हिरहिरीने हाताळले व त्याच बरोबर वैचारिक लेखनही केले. पण १९४० नंतर मात्र स्त्रियांचे वैचारिक विषय हे प्रारंभीच्या विषयांपेक्षा खूपच वेगळे होते. विभावरी शिरुरकर यांनी बंडखोरीच्या अंगाने जाणारे वैचारिक लेखन केले. तसेच दुर्गाबाई भागवत यांनी १९४७ साली *राजारामशास्त्री भागवत व्यक्तिचित्र व वाङ्मय विवेचन* हे पुस्तक प्रकाशित केले. स्वातंत्र्यानंतर भारतीय स्त्रियांचे जीवन व स्त्री जीवनातील स्थित्यंतरे मांडणारे लेखन वसुंधरा पटवर्धन यांनी *आमचे स्त्री जीवन* या आपल्या पुस्तकातून केले. स्त्रीचे स्वतंत्र्य व तिचा आत्मसन्मान, स्त्री शिक्षणाचे महत्त्व, स्त्री स्वतंत्र यांचा नव्या दृष्टिकोनातून केलेला विचार वसुंधरा पटवर्धनाच्या लेखणीतून जाणवतो. प्रारंभीच्या स्त्रियांनी स्त्रीशिक्षणाबरोबर 'स्त्री'ची आपल्या संसारा कुटुंबाप्रती असणारी कर्तव्ये, जबाबदारी यावर अधिक भर दिली. पण 'स्त्रीनेही स्वावलंबी जीवन जगावे' असा मोलाचा विचार मांडण्याचे कार्य त्यांनी आपल्या लेखनाद्वारे केले. 'स्त्री-पुरुष समानता' या विषयाला थोडेफार जवळ जाणारे लेखन वसुंधरा पटवर्धनांनी केले असल्याचे जाणवते.

*शिक्षकांचा पेशा* या पुस्तकांतून स्त्रियांनी शिक्षक म्हणून कामगिरी करावी असा विचार चित्रा नाईक या लेखिकेने मांडला आहे. चित्रा नाईक स्वतः शिक्षणाधिकारी असल्याने शिक्षक हा किती प्रतिष्ठित व्यवसाय आहे व विवाहित आणि अविवाहित महिला या क्षेत्रात कशाप्रकारे काम करू शकतील, यातून त्यांना कसा फायदा होईल, सरकारनी स्त्रियांसाठी या व्यवसायात कोण कोणते खास नियम केलेत; याविषयी त्यांनी या पुस्तकाद्वारे लेखन केले आहे. स्त्रियांसाठी हा व्यवसाय कसा फायदेशीर आहे हे त्यांनी आपल्या *शिक्षकाचा पेशा* या पुस्तकाद्वारे पटवून दिले आहे.

समाजशास्त्र व मानववंशशास्त्र या विषयाच्या अंगाने कलात्मक व वैचारिक लेखन करणाऱ्या लेखिका म्हणजे इरावती कर्वे. इरावती कर्वे यांचे लेखन हे बहुविध अंगानी परिपूर्ण आहे. *मराठी लोकांची संस्कृती* यातून मराठी लोकांची संस्कृती, आचारविचार, एकूणच मराठ्यांची वाटचाल याचे प्रभावी लेखन केले आहे. महाराष्ट्रीयन संस्कृतीचा समाजशास्त्रीय अंगाने विचार करून त्यांनी विविध प्रश्नोत्तरांचा उलगडा *मराठी लोकांची संस्कृती* या पुस्तकाद्वारे केला आहे. मराठी वैचारिक वाङ्मयात इरावती कर्वे यांचे नाव अग्रगण्य आहे.

इरावती कर्वेप्रमाणेच पण एक नवा विषय मांडण्याचा प्रयत्न १९५० मध्ये कुसुमावती देशपांडे यांनीही केला आहे. त्यांनी *मराठी कादंबरी पहिले शतक* (१८५० – १९५०) या नावाचा ग्रंथ संपादित केला. या ग्रंथाद्वारे त्यांनी अनेक लेखक, लेखिका व त्यांचे कादंबरी

लेखन याचा परिचय करून दिला आहे. तसेच त्या कादंबऱ्यांचे मूल्यमापनही केले आहे. त्यांनी तटस्थ रीतीने उपरोक्त त्यांच्या पुस्तकातून कादंबरीचा विविध अंगांनी विचार करून त्यातील गुणदोष दाखवले आहे.

थोडक्यात प्रारंभ ते १९०० या काळात स्त्रियांच्या वैचारिक लेखनात जे थोडेफार बदल झाले, त्याचे पडसाद विसाव्या शतकाच्या प्रारंभ काळातही दिसून येतात. पण १९३० पर्यंत 'स्त्री'लाच केंद्रस्थानी ठेवून स्त्रियांनी वैचारिक लेखन केल्याचे जाणवते. पण १९३० नंतर मात्र स्त्रियांबरोबरच समाजातील इतर घटकांचाही स्त्री वैचारिक लेखनात विचार करण्यात आला. १९३० ते १९५० पर्यंतच्या स्त्रियांच्या वैचारिक लेखन विषयात आमुलाग बदल झाला. नंतरच्या स्त्रियांनी म्हणजेच इरावती कर्वे, कुसुमावती देशपांडे यांनी केवळ 'स्त्री'चा विचार न करता समाजातील अन्य घटकांचा विचार करून लेखन केले. स्त्री जीवनाबरोबर संस्कृती, समाज, इतिहास, धर्म यांच्या आधारे लेखन करण्यात आले. १९५० पर्यंत उपरोक्त विषयांवरचे लेखन अल्प प्रमाणात झाले असले, तरी ते विशिष्ट दर्जाचे लेखन होते.

### क)१९५० ते २००० या कालखंडातील स्त्रियांचे वैचारिक लेखन

१९३० ते १९५० या कालखंडातील वैचारिक साहित्य हे १९५० नंतरच्या साहित्यापेक्षा वेगळे होते. कारण स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारतापुढे अनेक आव्हाने उभी राहिली आणि साहजिकच त्याचे प्रतिबिंब १९५० नंतरच्या वैचारिक साहित्यात दिसून येऊ लागले. या काळात अनेक विचार प्रणालींचा उदय झाला आणि याद्वारे वैचारिक साहित्याला एक नवी दिशा मिळाली.

१९५६ ते १९६१ या काळात चित्रा नाईक यांनी *भारतातील प्राथमिक शिक्षण, प्राथमिक विज्ञानातील प्रयोग, तिसरीचे अध्यापन* अशा विषयांवर त्यांनी चाळीसच्यावर पुस्तके लिहिली. त्यांचे शिक्षण विषयक लेख, पुस्तके ही समाजात शिक्षणाविषयी मतपरिवर्तन घडवण्यास कारणीभूत आहेत. शिक्षणाविषयीचे त्यांचे संशोधन विचारांच्या कक्षा रुंदावणारे आहे. एक नवी दिशा विद्यार्थ्यांबरोबर शिक्षकांनाही डॉ. चित्रा नाईक यांनी आपल्या लेखनाद्वारे दिली आहे. त्याचप्रमाणे लीला पाटील यांनीही डॉ. चित्रा नाईक यांच्या प्रमाणेच विद्यार्थ्यांना डोळस शिक्षण दिले तरच त्यांचा विकास होईल, या भूमिकेतून त्यांनी लेखन केले आहे. प्राचार्य लीला पाटील यांच्या लेखाविषयी रंजना फडके लिहितात की, "नव्या पिढीतून चांगले नागरिक घडावेत, त्यासाठी मनाची मशागत करणारे शिक्षण असावे. यासाठी शिक्षण परिवार, समाज, शासन सर्वांनीच शिक्षणातील प्रदूषण दूर करण्याचा

मनापासून प्रयत्न करायला हवा. तरच शिक्षणाचे व्यापक विश्व विचाराने आत्मसात करून आचाराद्वारे त्याला प्रत्यक्षात साकार करता येईल."[५] लीला पाटील यांचे वैचारिक ग्रंथ पुढीलप्रमाणे – *अंकुरांचे निःश्वास* (१९८५), *ऐलमा पैलमा शिक्षण देवा* (१९८७), *परिवर्तनशील शिक्षण* (१९९५), *अर्थपूर्ण आनंद शिक्षणासाठी* (१९९९), *आजचे शिक्षण आजच्या समस्या* (१९७१) असे लीला पाटील यांचे शिक्षणविषयक वैचारिक विचार मांडणारे ग्रंथ.

लीलावती भागवत यांनीही स्त्री वैचारिक लेखनात आपले महत्त्वपूर्ण असे योगदान दिले आहे. त्यांचा *मराठी बालसाहित्य प्रवाह व स्वरूप* हा ग्रंथ मुळात बालसाहित्याशी निगडित आहे, तरी पण ह्या ग्रंथाद्वारे त्यांनी वैचारिक स्वरूपाचे लेखन केले आहे. मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी कोणत्या प्रकारचे शिक्षण देणे आवश्यक आहे, ते त्यांनी या ग्रंथाद्वारे मांडले आहे. त्याचप्रमाणे १९८० साली त्यांनी *बालवाडी* ही पुस्तिका प्रकाशित केली. या पुस्तिकेतही लीलावती भागवत यांनी मुलांच्या व्यक्तिमत्त्व जडणघडणीचा विचार मांडला आहे. त्यांची ही दोन पुस्तके वैचारिक स्वरुपाची असली तरी बालसाहित्यातही त्यांचा उल्लेख केला जातो. पण संपूर्ण वैचारिक स्वरूपाचे लेखन लीलावती भागवतांनी *मुलांची जडण घडण : एक जबाबदारी* या पुस्तकाद्वारे केले आहे. या पुस्तकातून त्यांनी शिक्षक व पालक यांची मुलांच्या विकासासाठी असलेली जबाबदारी व एकूणच मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त घटक त्यांनी या पुस्तकातून सांगितले आहे. तसेच ताराबाई मोडक यांनीही *बिचारी बालके, आमचे घर, बालविकास व शिस्त* या पुस्तकांद्वारे पालक शिक्षक यांना मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी मार्गदर्शन करणारी पुस्तके लिहिली. पालकांना मार्गदर्शन करणारे *पालक मार्गदर्शिका* हे पुस्तक १९८९ मध्ये आशा परुळेकर यांनी लिहिले. तसेच त्यांनी मुलांना जाणवणारा मानसिक ताण-तणाव, समस्या, मुलांचे मानसिक गुणदोष यांच्यावर १९९० साली *मुलांचे मानसिक तणाव आणि उपचार* हे पुस्तक प्रकाशित केले. या पुस्तकातून त्यांनी पालक व शिक्षक या दोघांनाही मार्गदर्शनपर असे लेखन केले आहे. मुलांमधील असलेले सुप्तगुण कसे ओळखावे व त्या गुणांचा कसा विकास घडवावा, मुलांच्या सुप्तगुणांचा विकास घडवण्यासाठी पालक व शिक्षक यांची असणारी जबाबदारी याचे शास्त्रोक्त पद्धतीने लेखन आशा परुळेकर आपल्या *मुलांचे सुप्तगुण कसे ओळखल?* (१९९१) या पुस्तकातून करतात. तसेच त्यांनी *तारुण्याच्या सीमारेषेवर* (१९९३) हे कुमारवयीन मुलांसाठी व शिक्षक पालकांसाठी लिहिलेले पुस्तक. *आपली मुले व नैतिकता* (१९९८), *चाकोरीबाहेरील मुले* (१९९६), *आरसा : स्वतःला ओळखण्याचा* (१९८९), *दिलासा व*

*मार्गदर्शन* (१९९०), *जनमनाचे मानसशास्त्र* (१९९०), *व्यक्तिमत्त्व विकास* (१९९१) इत्यादी पुस्तकाद्वारेही आशा परुळेकर यांनी मुलांच्या प्रती असणारी पालकांची व शिक्षकांची जबाबदारी व पालक शिक्षक यांना मार्गदर्शन केले आहे. त्यांनी या पुस्तकांतून मुलांचा मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास केल्याचा जाणवतो. त्यांचे हे वैचारिक लेखन मुलांना, विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून लिहिले गेले आहे.

रोहिणी चितळे यांनी १९९२ मध्ये *मुलांशी संवाद* नावाचा ग्रंथ लिहिला. मुलांवर चांगले संस्कार करावयाचे असेल तर त्यांच्या घरातील माणसांनी त्यांच्याशी विश्वासाचे, प्रेमाचे नाते जोडले पाहिजे तरच मुले दुर्गुणाकडे न जाताचांगला मार्ग स्विकारतील असे रोहिणी चितळे आपल्या पुस्तकातून सांगतात. रोहिणी चितळे प्रमाणेच पण प्रगल्भ विचारदृष्टी घेऊन मंगला गोडबोले यांनी *माझी पालक नीती* नावाचे पुस्तक १९९३ साली प्रकाशित केले. तसेच मीना चंदावरकर यांनी *उमलती मुलं* (१९९३) नावाचं पुस्तक लिहिलं. रमा मराठे यांनी *असे घडवा मुलांचे व्यक्तिमत्त्व* (१९९५), लता चौधरी *रेघोट्या व चिमुकली मने* (१९९२) अशी शिक्षक व पालक यांना विद्यार्थ्यांचा, मुलांचा शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकास कसा घडवता येईल, यासाठी मार्गदर्शन केले आहे.

१९०० ते २००० या कालखंडातील स्त्रियांनी मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार करणारे वैचारिक लेखनही केले आहे. शिक्षणविषयक क्षेत्रातील मानसशास्त्रीय दृष्टीने लेखन केले गेले यात डॉ. मेधा कुमठेकर यांच्या *कोंडलेली मने* (१९८६) या पुस्तकाचा उल्लेख करावा लागतो. यात त्यांनी मुलांना वाढत्या वयात जाणवणाऱ्या समस्या व त्याचा त्यांच्या मनावर होणारा परिणाम व उपाय त्यांनी उपरोक्त पुस्तकातून सांगितले आहे. डॉ. मेधा कुमठेकर प्रमाणेच संपादिका स्वर्णलता भिशीकर तांनी *मनाचा शोध* हे पुस्तक १९८८ साली प्रकाशित केले. यातून त्यांनी मानवी मनाविषयी असलेली प्रत्येक देशातील लोकांची वेगवेगळी मते अनेक लेखांच्या माध्यमातून सांगितली आहे. बागेश्री पारीख व प्रतिमा घीवाला या दोघांनी मिळून १९८८ मध्ये *समस्या साहचर्याच्या* हे सतरा लेखांचे पुस्तक लिहिले. लग्नसंस्था, लग्नसंस्थेतील समस्या, तिचे अस्तित्व टिकवण्यासाठी कोणते प्रयत्न करावे? इत्यादी माहिती उपरोक्त पुस्तकातून मिळते. १९८६ ला आशा मुंडले यांनी *घर* हे मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून लिहिलेले पुस्तक. तसेच त्यांनी *घराचे घरपण* व *मारण्याचे मन, प्रत्येक मुलाला घर हवं, शरीराचे मानसशास्त्र* असे अनेकविध विषयांवर ३३ लेख आशा मुंडले यांनी लिहिले आहे.

१९ व्या शतकातील स्त्री वैचारिक लेखनामध्ये महत्त्वपूर्ण असे नाव म्हणजे इरावती कर्वे

यांचे. इरावती कर्वेच्या वैचारिक लेखनात मानववंशशास्त्र, संस्कृती यांचा विचार केला आहे. इरावतीबाईंचे वैचारिक लेखन हे वाचकांच्या विचारांच्या कक्षा रुंदावण्यास मदत करते. *हिंदूची समाजरचना* हे १९६४ साली लिहिलेले त्यांचे पहिले पुस्तक होय. हिंदुधर्मातील रीतीरिवाज, आचार-विचार, जाती-धर्म, वैविध्यता, तत्त्वज्ञान, हिंदूची मानसिकता या सर्व घटकांचे तात्त्विक विवेचन *हिंदुची समाजरचना* या ग्रंथात इरावतीबाईंनी केले आहे. तसेच *हिंदू समाज : एक अन्वयार्थ* हा ग्रंथही उपरोक्त ग्रंथाप्रमाणेच आहे. या ग्रंथात एखाद्या समाजरचनेचा काळ, अस्तित्व यांचा अभ्यास करताना इरावती कर्वे म्हणतात, "एखाद्या समाजरचनेत अंगी ताण व दबाव ह्यांना तोंड देण्याचे सामर्थ्य किती आहे यावर तो समाज किती काळापासून अस्तित्वात आहे हे सांगता येते."[६] एकूणच या दोन पुस्तकांद्वारे त्या हिंदू समाज व हिंदू संस्कृतीच्या इतिहासाची ओळख करून देतात. इरावती कर्वे यांच्या वैचारिक व एकूणच लेखनाविषयी डॉ. शौनक कुलकर्णी लिहितात की, "डॉ. इरावती कर्व्यांचे सर्वच लेखन आपल्या तीक्ष्ण निरीक्षण शक्तीवर, विचार मंथनावर आणि संशोधनकीय कार्यावर आधारित आहे. त्यांच्या लेखनातून त्यांच्या प्रज्ञेचे प्रत्यंतर येते. त्यांच्या वैचारिक आणि सांस्कृतिक साहित्यातील काही पुस्तकांचा बानगी दाखल येथे विचार केला आहे. या सर्वांतून त्यांच्या मानवशास्त्रीय विचारांचे प्रतिबिंब दिसते."[७]

भारतीय समाज, आधुनिक काळातील भारतीय समाज, भारतातील खेडी, जातीव्यवस्था, समाजरचना या घटकांच्या आधारे स्त्री वैचारिक लेखिका कमल मुळे व सुधा काळदाते यांनीही ग्रंथलेखन केले. *भारतीय मध्यमवर्ग* (१९७३), *महाराष्ट्रातील आधुनिकीकरण व भारतीय खेडी व जाती* (१९७६) हे कमल मुळे यांची ग्रंथरचना. तर सुधा काळदाते यांनी *भारतीय समाजरचना* (१९७६) व *आधुनिक भारताच्या सामाजिक समस्या* (१९७८) हे दोन ग्रंथ लिहिले. भारतातील विवाहसंस्था, कुटुंबसंस्था, जातीसंस्था, औद्योगिकीकरण, संस्कृतिकीकरण, सामाजीकरण या सगळयाचे दर्शन त्या आपल्या ग्रंथातून घडवतात. आधुनिक काळात लोकांपुढे निर्माण होणाऱ्या समस्यांचे चित्रण सुमन पाटे यांनी १९६८ मध्ये लिहिलेल्या *सामाजिक विघटन व समस्या* या पुस्तकात करतात. या पुस्तकात त्यांनी मांडलेले तपशील अभ्यासपूर्ण रीतीने पडताळून मांडले आहे. १९८३ मध्ये डॉ. इंदुमती पारीख यांनी *लोकसंख्येचा भस्मासुर* हे पुस्तक लिहिले. इंदुमतींनी कुटुंबनियोजन, लोकसंख्या शिक्षण, लैंगिक शिक्षण, कुमारवयातील मुलामुली, अंधश्रद्धा निर्मुलन या सगळयांची शास्त्रीय माहिती त्या देतात. तसेच एक जबाबदार नागरिक म्हणून या समस्यांचे निर्मुलन करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीची असलेली जबाबदारी इंदुमती पारीख मुद्देसूदरित्या

मांडतात.

वैचारिक लेखनाच्या संदर्भात स्त्रियांनी अनुवादित वैचारिक लेखनही केल्याचे जाणवते. स्त्री वैचारिक अनुवादित लेखनाच्या क्षेत्रात पहिले नाव पुढे येते ते कृष्णाबाई मोटे यांचे. कृष्णाबाई मोटे यांनी १९६७ मध्ये *सामाजिक मानव जातीचा यथायोग्य अभ्यास* हे पुस्तक लिहिले. अमेरिकन लेखक स्टुअर्ट चेस यांच्या *The proper study of Mankind* या पुस्तकाचा अनुवाद कृष्णाबाई मोटे यांनी केला आहे. या पुस्तकातून त्यांनी व्यक्ती आणि समाज यांच्यातील नातेसंबंधाचा उलघडा शास्त्रोक्त पद्धतीने केला आहे. चेसांचा ग्रंथ कृष्णाबाईंच्या अनुवादामुळे सर्वांना परिचित झाला व समाजाचा, संस्कृतीचा अभ्यास करण्यास एक नवी दिशा मिळाली. कृष्णाबाई प्रमाणेच यशोदा भागवत यांनी लंडन येथील डॉ. एच. जे. आयझेक व डॉ. डी. के. नियास या लेखकांच्या 'Astrology : Science or Superstition?'या पुस्तकाचे अनुवादित लेखन 'फलज्योतिष : शास्त्र की अंधश्रध्दा?' या नावाने १९९७ साली केले. या पुस्तकात ज्योतिषी व ज्योतिषशास्त्र, अंधश्रध्दा याचा शास्त्रानुसार अभ्यास केला आहे. स्त्री वैचारिक लेखनात अनुवादित लेखन मोजक्याच प्रमाणात झाले.

समाजसेवेच्या कार्यास्थिळ किंवा समाज कल्याणाच्या उद्दिष्ट्याने अनेक लेखिकांनी लेखन केले, यात कुसुम पटवर्धन या लेखिकेने 'लोकशाही' नावाचे पुस्तक १९७७ ला प्रकाशित केले. भारतीय लोकशाही मूल्ये व लोकशाहीला असणारा धोका, त्यांचे निवारण करण्यासाठी उपयुक्त घटकांची नेमकी मांडणी केली आहे. समाज कल्याणाच्या उद्दिष्ट्याने ज्या-ज्या सामाजिक संस्था कार्यरत होत्या, त्या संस्थाचे कार्य, उद्दिष्ट यांची तोंड ओळख सर्वांना करून देण्याच्या हेतूने पुष्पा मायदेव यांनी 'सामाजिक संस्था' हे पुस्तक १९७७ साली लिहिले. स्वातंत्र्योत्तर काळात समाजसेवेच्या उद्दिष्टाने अनेक संघटना निर्माण झाल्या. त्यात दलित संघटना, स्त्रीसंघटना, लोकसमित्या अशा वेगवेगळया संघटनांचे कार्य, त्या संस्थांची माहिती, त्यांचे लोकशाहीशी असलेले संबंध या सगळयाची माहिती कमल पाध्ये यांनी 'सामाजिक संघटना : उद्दिष्ट आणि कार्य' या पुस्तकात सांगितले आहे. कुटुंब व समाज याच्यामधील नाते संबंधाचा उलगडा शकुंतला नारगोळकर 'कौटुंबिक फायदे आणि समाज परिवर्तन' (१९७७) व पद्मा ब्रम्हे 'कुटुंब व समाज' (१९७८) या दोन लेखिकांनी केला आहे. समाज, समाजातील व्यक्ती, त्या समाजातील कुटुंब व्यवस्था, कुटुंबातील व्यक्तींचे स्थान, अंधश्रध्दा, कुटुंबात असलेली बंधने या सर्व घटकांवर उपरोक्त दोन्ही लेखिका आवर्जून लिहितात.

स्त्रियांनी वैचारिक लेखनात जवळजवळ सगळेच विषय हाताळले आहे. शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, आधुनिक विषयांबरोबरच स्त्रियांनी राजकीय विषय घेऊनही वैचारिक लेखन केले. यात महत्त्वपूर्ण अशा लेखिका म्हणजे डॉ. नलिनी पंडित. डॉ. नलिनी पंडित यांनी वेगवेगळ्या नियतकालिकातूनही वैचारिक लेखन केले. आहे. त्यांचे राजकीय विषयांवरील वैचारिक ग्रंथ पुढीलप्रमाणे – 'संक्रमण काळाचे आव्हान' व 'साहित्यविचार आणि समाजचिंतन' हे गौरवग्रंथ. या ग्रंथात त्यांनी राजकीय, सामाजिक व धर्मातील राजकारण या विषयांवर प्रदीर्घ लेख लिहिले. तसेच त्यांचे 'महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास', 'जातीवाद आणि वर्गवाद', 'स्वातंत्र्योत्तर काळातील दलितांचा प्रश्न', 'धर्मशासन आणि समाज', इत्यादी ग्रंथ. डॉ. नलिनी पंडितांच्या नावावर आहेत. त्यांनी आपल्या ह्या ग्रंथांद्वारे अनेक राजकीय विषयांची वाचकांना ओळख करून दिली. वाचकांचे राजकीय क्षेत्रातील विचार प्रगल्भ करण्यास त्यांची उपरोक्त पुस्तके मदत करतात. सुमन दाभोळकर या लेखिकेनेही 'समाजवाद' हे पुस्तक लिहिले. यातून समाजाची वाटचाल, इतिहास व विविध विचारप्रणालीचा प्रभाव या सगळ्यांचा आढावा घेतला आहे. त्यांच्या 'समाजवाद' या पुस्तकाविषयी मत व्यक्त करताना रंजना फडके लिहितात, "आपला समाज संपन्न असावा असे प्रत्येकाला वाटले पाहिजे. त्यासाठी माणसाच्या बौद्धिक, वैचारिक, मानसिक उत्क्रांतीचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. आज समाजधारणेचा धर्म कोणता याचा विचार करताना माणसाने माणसाला जपण्याचा सनातन धर्म टिकवला पाहिजे. कल्याणकारी राजव्यवस्था, राष्ट्राचा विकास म्हणजे प्रत्येकाचा विकास हे ब्रीद प्रत्येकाने पाळले पाहिजे. हाच मार्गदर्शक विचार सुमन दाभोळकर यांच्या लेखनातून जाणवतो."[८] राजकीय लढ्याच्या संदर्भातही डॉ. सुमन वैद्य व डॉ. शांता कोठेकर यांनी लेखन केले आहे. 'महाराष्ट्रातील काँग्रेसचा स्वातंत्र्य लढा' व 'अयोध्या आंदोलन : काळ आज उद्या' ही पुस्तके त्यांनी लिहिली. या पुस्तकांद्वारे स्वातंत्र्य काळात काँग्रेस पक्षाने दिलेला लढा, त्यासाठी अनेक नेत्यांनी कशाप्रकारे कार्य केले, स्वातंत्र्यासाठी त्यांना कोणकोणते त्याग सहन करावे लागले याची माहिती दिली आहे. तर अयोध्या आंदोलनाचे विविध कंगोरे लेखिकेने वाचकांसमोर आणले आहे. तसेच अनेक आघाडीवर असलेल्या नेत्यांच्या मुलाखतीही या पुस्तकांतून प्रकाशित केल्या आहेत.

अशा प्रकारे स्त्री लेखिकांनी अर्थशास्त्र, परराष्ट्रीय, राष्ट्रीय धोरण या विषयांवरही काही प्रमाणात लेखन केले आहे. तरीही त्यांचे ते लेखन उल्लेखनीय आहे. या लेखिकात हेमलता राईरकर (कर पद्धती आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्था), कमल मुळे (भारताचे परराष्ट्रीय धोरण)

ह्याचा उल्लेख करता येते.

स्त्री राजकीय वैचारिक लेखनाचा विचार करता असेही लक्षात येते, की राजकीय विषय अधिक व्यापक बनवण्याच्या उद्दिष्ट्याने स्त्रियांनी राजकीय विषयांवरील पुस्तकांचेही अनुवादित लेखन केले आहे. अनुसूया लिमये यांनी आंतरराष्ट्रीय साम्यवाद यावर आधारलेला सिडने हुक या लेखिकांचा ग्रंथाचा अनुवाद १९६२ साली 'जागतिक साम्यवाद' या नावाने केला. तसेच रुथ बेने फिकटे यांच्या 'Race and Racism' या पुस्तकाचा अनुवाद मीनाक्षी दीक्षित यांनी केला. अनुवादित पुस्तकाचे नाव 'वंश आणि वंशवाद', डॉ. सुमन वैद्य व डॉ. शांता कोठेकर यांनी मिळून 'साम्राज्यवादी षडयंत्र' या नावाचे अनुवादित पुस्तक निर्मिले.

थोडक्यात १९५० ते २००० या कालखंडात स्त्री वैचारिक लेखिकांनी महत्त्वपूर्ण असे विषय लेखकांच्या समोर उभे केले. शिक्षण क्षेत्रापासून राजकीय क्षेत्रापर्यंतचे विषय मोठया कसबीने त्यांनी हाताळले. वैचारिक लेखनात स्त्रियांचे लेखन कमी असले तरी ते दर्जेदार आहे. बदलत्या काळानुसार स्त्रियांनी वैचारिक लेखनात विषय हाताळले व वैचारिक साहित्याच्या क्षेत्रात आपले एक वेगळे स्थान निर्माण केले.

## स्त्रीवाद आणि वैचारिक लेखन

स्वातंत्र्योत्तर काळात 'स्त्री'ला स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव झाली.शिक्षण क्षेत्रामुळे स्त्रिया लिखित झाल्या. हळूहळू त्यांच्या विचारांची प्रगल्भता वाढत गेली. या सर्वांमुळे १९७५ ते १९८५ या दशकात 'स्त्रीवाद' या नव्या विचारप्रणालीचा जन्म झाला. स्त्री जीवनातील या नव्या विचाराने स्त्रियांनी स्त्रीवादी वैचारिक लेखन केले. या संदर्भात स्वाती कर्वे लिहितात की, "१९७५ च्या महिला वर्षांनी नवविचारांचा स्फोट झाला आणि १९७५ ते १९८५ या दशकात स्त्रीवादी विचारांना बळकटी येऊन विविध संदर्भ प्राप्त झाले. स्त्रीवादी जाणिवा बहुआयामीबनल्या. स्त्रीवादी विचार, स्त्रीमुक्तीचा विचार, चळवळ, विद्रोहापुरता मर्यादित राहिला नाही. त्यांचा व्यूह विकसित होत गेला. परिणामी स्त्रीवादी वैचारिक लेखन विस्तारत गेले."[९]

स्त्रीवादी विचारांची तात्विक मांडणी करणारे लेखन हे १९७५ पूर्वीही काही प्रमाणात लिहिले गेले. यात कमलाबाई टिळकांच्या 'स्त्री जीवनविषयक काही प्रश्न', 'स्त्री जीवनाची काही क्षितिजे' या पुस्तकांचा उल्लेख करता येतो. १९७६ साली कृष्णाबाई मोटे यांनी 'काळाची पावले' या पुस्तकातून स्त्रीजीवनाचे बदलते स्वरूप मांडले आहे. स्त्री समोर उभे राहणारे विविध प्रश्न, काळानुसार त्यांच्या समोर उभी राहणारी आव्हाने याचा वेध

कृष्णाबाई मोटेंनी घेतला आहे. १९७५ पूर्वी स्त्रीची असलेली मानसिकता व १९७५ नंतर स्त्री मानसिकतेत झालेला बदल या दोन घटकांना केंद्रस्थानी ठेवून डॉ. चंद्रकला हाटे यांनी 'स्वातंत्र्योत्तर भारतीय स्त्री' हा ग्रंथ लिहिला. स्वातंत्र्यप्राप्ती नंतर स्त्रीजीवन कसे बदलत गेले स्त्रीचे कुटुंबातील स्थान, समाजातील स्थान, स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्व, स्वातंत्र्यानंतरही स्त्रियांना मिळणारी तुच्छ वागणूक, सत्ताधारी पुरुष, स्त्री संघटना अशा अनेक विषयांवर संशोधन सर्वेक्षण करून डॉ. चंद्रकला हाटे यांनी 'स्वातंत्र्योत्तर भारतीय स्त्री' हा ग्रंथ प्रकाशित केला आहे. पाश्चात्य स्त्रीजीवन व भारतीय स्त्री जीवन, स्त्रीचळवळी यातील साम्यभेद पडताळण्यासाठी पाश्चात्य स्त्रीजीवनावर आधारित सिमॉन बोआच्या 'सेकंड सेक्स' या पुस्तकाचा सरानुवाद शांता किर्लोस्कर यांनी 'बायकांचा जन्म' या नावाने केला आहे.

स्त्रीवादी विचारांना पाठिंबा देण्यासाठी स्त्रीवादी विचारांचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी 'स्त्रीमुक्ती चळवळ', 'स्त्री पुरुष', 'स्त्री विमुक्ती', 'पुरुषकेंद्री', 'स्त्रीमुक्ती केव्हा कशी', 'स्त्रीमुक्ती संग्राम', 'पुरुषप्रधान संस्कृती', 'अबला होई प्रबला', 'स्त्रीमुक्तीच्या दिशेने', 'स्त्रीमुक्ती एक कुतुहल' इत्यादी पुस्तके लिहिली गेली. उपरोक्त पुस्तकांद्वारे लेखिका कुमुद करकरे, छाया दातार, मालिनी तुळपुळे, सरोजिनी शारंगपाणी, चंपा लिमये, सुहासिनी इर्लेकर, उषा खाडीलकर या लेखिकांनी स्त्रीवादी चळवळीला पाठिंबा मिळवून दिला. समाजात वावरणाऱ्या स्त्रियांना आत्मभान प्राप्त करून दिले. त्यांना संघर्ष, विद्रोह करायला प्रवृत्त केले. स्त्रीवादी चळवळ ही पुरुषांविरोधी नसून पुरुषसत्तेविरोधी, स्त्री पुरुष असमानते विरोधात असल्याचे सांगितले. स्त्रीवादी चळवळीबाबत समाजात असलेले गैरसमज दूर करण्याचा त्यांनी आपल्या लेखनाद्वारे प्रयत्न केले. तसेच स्त्री-जीवन, समाज आणि संस्कृती, परदेशी स्त्रीजीवन या सगळया घटकांवर अनेक लेखिकांनी आपल्या लेखनाद्वारे प्रकाश टाकला आहे.

स्त्रीवादी संकल्पनेचे वैचारिक दृष्टिने लेखन करताना भारतीय स्त्रीजीवनाचा ऐतिहासिक आढावा घेणारे लेखनही स्त्री वैचारिक लेखिकांनी केले आहे. भारताच्या इतिहासात स्त्रीला असलेले स्थान यांचा वैचारिक दृष्टीने अभ्यास करून स्त्रीजीवनविषयक नवीन दृष्टी वाचकांना देण्याचा प्रयत्न लेखिकांनी केला आहे. वेदकाळापासून ते आधुनिक काळापर्यंत स्त्रीजीवनातील विविध कंगोरे स्त्रीवादी वैचारिक लेखनात स्त्रियांनी मांडले आहे.

भारतीय स्त्रीजीवनाचा आढावा घेणारे लेखन १९७६ साली अनुसूया लिमये यांनी 'स्त्रीचे स्थान व भूमिका' या ग्रंथात घेतला आहे. तसेच 'भारतीय स्त्री जीवन' (१९८६) हे गीता साने लिखित पुस्तक ही भारतीय स्त्री जीवनाचा आढावा घेण्याच्या दृष्टिने महत्त्वपूर्ण आहे. 'भारतीय स्त्री जीवन' या पुस्तकात गीता साने यांनी वेश्या स्त्रियांचे जीवन, त्यांचे

समाजातील स्थान हा विषयही उत्कृष्टरीत्या हाताळला आहे. त्यांच्या या ग्रंथाच्या गौरवार्थ स्वाती कर्वे म्हणतात की, “स्त्रियांची वैचारिक लेखनाची क्षमता, अभ्यास्कृती, संशोधनाची चिकाटी, वस्तुनिष्ठ दृष्टी आणि महत्त्वाचे म्हणजे समाजशास्त्रीय विचारांची बैठक १९५० ते २००० या काळात कशी विकसित होत होती,, याची साक्ष पटवणारे ‘भारतीय स्त्री जीवन’ हे पुस्तक आहे. स्त्रियांच्या विकासक्रमामध्ये एका प्रगल्भ टप्प्याचे घोतक आहे, असे म्हणावेसे वाटते.”[१०]

वैचारिक लेखनात स्त्रिया जशजश्या आपल्या विचारांच्या कक्षा विस्तारू लागल्या. त्यांनी नवनवीन विषय हाताळण्यास सुरुवात केली. त्या संशोधनपर, अभ्यासपूर्ण लेखन करु लागल्या. स्त्रीवादी चळवळीने तर स्त्रीचे व्यक्तिमत्त्व बदलण्यास मोलाची भर घातली. त्यामुळेच या काळात स्त्रियांच्या वैचारिक लेखनात विषयांचे वैविध्य असलेले जाणवते.

१९७५ पूर्वी मतदानाच्या हक्कासाठी इंग्लंडमधील स्त्रियांनी एमिली पखर्स्ट यांच्या नेतृत्वाखाली सफ्रेजेट चळवळ सुरु केली. या चळवळीचा इतिहास इंदुमती केळकर यांनी ‘सफ्रेजेट आंदोलन’ या पुस्तकात लिहिला आहे. म्हणजेच भारताबरोबर भारताबाहेर घडणाऱ्या घटना, समस्यांवरही भारतीय स्त्रियांनी जागृतपणे व अभ्यासपूर्ण लेखन केले होते. स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांनी घेतलेला पुढाकार राजकीय क्षेत्रातील स्त्रियांचे कर्तृत्त्व, स्त्रियांचे राजकीय क्षेत्रातील कार्य, विविध आंदोलनातील त्यांचा सक्रीय सहभाग या सर्वांचे अभ्यासपूर्ण विवेचन रोहिणी गवाणकर या लेखिकेने आपल्या ‘मराठी स्त्रीशक्तीचे राजकारणी रूप’ या पुस्तकात केले आहे. या पुस्तकातून स्त्रीशक्ती व स्त्रियांचा राजकीय क्स्गेत्रातील निर्भिड वावर यावर प्रकाश पडतो.

प्रतिभा रानडे यांच्या ‘बुरख्या आडच्या स्त्रिया’ पुस्तकापासून स्त्रियांचे वैचारिक प्रकारातील लिखाण नव्या विषयाने व्यापक व विस्तारीत होत गेले. प्रतिभा रानडे यांनी ‘स्त्रीवादी’ दृष्टिकोनातून मुस्लिम स्त्रियांच्या वेदना, त्यांना बुरख्या आड जगावं लागणारं बंदिस्त जीवन, मुस्लिम स्त्रियांवर लादलेली ब्बंधाने याचा शोध प्रतिभा रानडेंनी मुस्लिम धर्माच्या इतिहासाची पडताळणी करून घेण्याचा प्रयत्न ‘बुरख्या आडच्या स्त्रिया’ या पुस्तकाद्वारे केला आहे. मुस्लिम स्त्रियांना त्यांच्यावर धर्माच्या नावाखाली लादलेल्या बंधनांचा आदर, त्यांची मानसिकता या सगळयांचे वर्णन प्रतिभा रानडे उपरोक्त पुस्तकाद्वारे करतात. तसेच १९९३-९४ या काळात ‘शुक्रवारची कहाणी’ नावाचे पुस्तकही, प्रतिभा रानडेंनी लिहिले. कुटुंबातील जबाबदाऱ्या संभाळतानाच स्त्रीने आपले आत्मभान,, आत्मसन्मानही राखला पाहिजे, स्त्रियांचे प्रश्न ह्या सगळ्या गोष्टींचे विवेचन या ग्रंथात केले

आहे.

मुस्लिम स्त्रियांच्या समस्याचे चित्रण प्रतिभा रानडे यांनी उत्तमरित्य केले. तसेच विद्युत भागवत यांनी ग्रामीण, स्त्रीजीवनाच आढावा आपल्या 'मी बाई आहे म्हणून' या १९८४ साली संपादित केलेल्या पुस्तकातून घेतला आहे. कष्टाळू, सहनशील, दुबळया, ग्रामीण स्त्रीचे व तिच्या जीवनातील समस्याचे चित्रण वैचारिक पद्धतीने त्यांनी मांडले आहे. विद्युत भागवतांप्रमाणेच प्रतिमा इंगोलेही 'स्त्रीचे भावविश्व आणि आधुनिकता' या पुस्तकात ग्रामीण स्त्रियांचा विषय मांडतात. स्त्रीसुधारणेसाठी शिक्षण हा एकमेव मार्ग असल्याचे त्या सूचित करतात.

सुमतीबाई संत यांनी स्त्रीजीवनाचा नवा विचार मांडला. १९८६ साली 'त्यांच्या कपाळी कलंक लावू नका' या पुस्तकात त्या पतीत स्त्रियांना समाजाकडून जो त्रास सहन करावा लागतो, स्त्रियांना जी उपेक्षित वागणूक समाज देतो, या प्रश्नांवर त्या कळकळीने लिहितात.

१९५० ते २००० या कालखंडात स्त्रियांनी संशोधन प्रकल्पाच्या माध्यमातून वैचारिक लेखन केले. 'स्त्री मुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा' हा संशोधन प्रकल्प डॉ. सुमा चिटणीस यांनी टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेसच्या 'स्त्री अभ्यास केंद्रा' तर्फे संपादित केला. तसेच 'स्त्री प्रश्नांची चर्चा : एकोणिसावे शतक' हा प्रतिभा रानडे स्वतंत्र प्रकल्प आहे, तर 'स्त्री अस्मितेचा आविष्कार : एकोणिसावे शतक' मृणालिनी जोगळेकर यांनी लिहिला. तर स्त्री अभ्यास केंद्राने घातलेल्या विसाव्या शतकातील स्त्रियांच्या कर्तृत्वाचा शोध या प्रकल्पासाठी विनया खडपेकर यांनी 'स्त्री स्वातंत्र्यवादिनी : विसाव्या शतकातील परिवर्तने' या नावाने बदलत स्त्री जीवनाचा आढावा घेतला. डॉ. लीला दीक्षितांनी 'प्राचीन मराठी साहित्यातील स्त्रीरूप' या नावाचा संशोधन ग्रंथ प्रसिद्ध केला. १९८५ मध्ये पद्मजा मोरजे यांनी 'स्त्री मुक्ती चळवळ व लोकसाहित्य' हे पुस्तक प्रकाशित केले. 'स्त्री-वाणी' या संस्थेमार्फत लेखिका शोभा भागवत यांनी 'तराळ-अंतराळ', बलुत, उपरा, आठवणीचे पक्षी, मुक्काम पोष्ट, देवाचे गोठणे या पुस्तकाच्या आधारावर 'दलित पुरुषांच्या आत्मचरित्रातील स्त्री प्रतिमा' या १९८७ साली लिहिला. स्त्रियांनी एकत्र येऊन मैत्रीण नावाचा गट स्थापन केला व 'स्त्री उवाच' गट असे नाव दिली. या गटाने 'आम्हीही इतिहास घडवला' हे आंबेडकरी चळवळीतील स्त्रियांवर आधारलेले पुस्तक उर्मिला पवार व मीनाक्षी मून यांनी लिहिले. तर माधुरी गोखले, विनया खडपेकर, नीरा आडारकर, छाया दातार, प्रतिभा रानडे या स्त्री लेखिकांनी एकत्र येऊन 'स्वतःला शोधताना' हे पुस्तक लिहिले.

एकंदरीत १९५० ते २००० या कालखंडात स्त्रियांनी संशोधन प्रकल्पाच्या माध्यमातून

जे वैचारिक लेखन केले ते स्त्री केंद्रित होते. इतिहासातील कर्तृत्ववान स्त्रियांच्या कार्याचा त्यांच्या प्रतिमांचा, स्त्रीजीवन, तत्कालीन रूढी परंपरा स्त्रियांना धर्माने दिलेली बंधने या सगळयाचा आढावा उपरोक्त विविध प्रकल्पाच्या माध्यमातून वैचारिक लेखन करणाऱ्या स्त्रियांनी घेतला आहे. अशा विविध प्रकल्पाच्या माध्यमातून इंदुमती शेवडे, नीलिमा भावे, प्रतिभा रानडे, मृणालिनी जोगळेकर, डॉ. तारा भवाळकर, लीला दीक्षित, डॉ. पद्मजा मोरजे, उर्मिला पवार, मीनाक्षी मून या लेखिकांनी वैचारिक लेखनात आपले योगदान दिले.

१९५० ते २००० याच काळात स्त्रीवादी संकल्पनेतून वैचारिक समीक्षा हा प्रकारही स्त्रियांच्या वैचारिक लेखनात सुरु झाला. स्त्रीवादी समीक्षा विचारांचे मूळ हे पाश्चात्य संस्कृतीतून आले. १९६० नंतर पाश्चात्य देशात स्त्रीवादी समीक्षा विचारांची मांडणी झाली आणि या प्रेरणेनेच अश्विनी धोंगडे यांनी १९९३ साली पाश्चात्य समीक्षा विचारांचा परिचय करून देण्यासाठी 'स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप व उपयोजन' हे पुस्तक लिहिले. त्याचबरोबर १९९६ ते १९९९ मध्ये मंगला वरखेडे यांनी 'स्त्रीवादी समीक्षा विचार', 'स्त्रियांची नवकथा : वाट आणि वळणे', 'स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप व उपयोजन' ही पुस्तके लिहिली.

थोडक्यात प्रारंभ काळात स्वतःचे नाव न देता लेखन करणाऱ्या स्त्रिया नंतरच्या काळात निर्भिडपणे विविध विषय वाचकांसमोर मांडू लागल्या. स्त्रियांच्या वैचारिक लेखनात प्रारंभ ते २००० पर्यंत आशय-विषय व साहित्यिक दर्जाच्या दृष्टिनेही अनपेक्षित असे बदल घडून आले. वैचारिक लेखिकांनी समाजातील सर्वच बारीक-सारीक विषयांना आपल्या लेखनाद्वारे मांडले. पण 'स्त्रीजीवन' हा विषय बहुतांश स्त्री वैचारिक लेखनात केंद्रस्थानी होता. सुरुवातीचे स्त्रियांचे वैचारिक लेखन हे विद्यार्थी केंद्रित होते. पण हळूहळू त्यात मार्गदर्शनपर, शिक्षणविषयक, राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विषयही वैचारिक अंगाने येऊ लागले. १९५० ते २००० या काळातील स्त्रियांच्या वैचारिक लेखनाबाबत स्वाती कर्वे लिहितात की, "१९५० नंतर स्त्रीजीवनात, समाजात आणि संस्कृतीमध्ये कोणकोणते बदल झाले; स्त्रीजीवनाची वाटचाल कोणत्या दिशेने झाली; स्त्री, कुटुंब, समाज व संस्कृती यांचे आंतरसंबंध कसे बदलत गेले, हे जाणून घेण्यास या काळातील स्त्रियांचे वैचारिक लेखन मुख्य आधार ठरतो. त्या त्या विषयांच्या दृष्टिने स्त्रियांचे लेखन महत्त्वाची भर घालणारे ठरतेच, त्याचबरोबर सांस्कृतिक दस्तऐवज म्हणून सदर लेखनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. यादवकालीन समाज जीवनाच्या दृष्टिने 'महानुभावीय गद्याला' जे महत्त्व आहे, तसेच महत्त्व १९५० ते २००० या काळातील स्त्रीजीवन आणि समाज संस्कृतीच्या दृष्टिने स्त्रियांच्या बहुविध वैचारिक लेखनाला आहे."[११]

## २००० ते २०१० या कालखंडातील स्त्रियांचे वैचारिक लेखन-

२००० ते २०१० या कालखंडात भारतात औद्योगिकीकरणाचा प्रसार झाला, आणि त्याचे पडसाद वैचारिक लेखनामध्येही दिसू लागले. पण तरी सुद्धा स्त्रियांनी केलेल्या वैचारिक लेखनात तत्कालीन औद्योगिकीकरणाचे पडसाद दिसून येत नाही.

२००० ते २०१० या कालखंडातील स्त्रियांच्या वैचारिक लेखनाचा अभ्यास करता 'स्त्री प्रश्नाची वाटचाल' हा विद्युत भागवत यांचा ग्रंथ २००४ मध्ये प्रकाशित झाला त्याचा उल्लेख करता येतो. महाराष्ट्रातील स्त्री चळवळ; स्त्री समस्या या विषयांची वैचारिक दृष्टिकोनातून उपरोक्त पुस्तकात वेध घेतला आहे. तसेच शारदा साठे यांनी रोजच्या व्यवहारात, स्त्रीला सहन करावे लागणारे त्रास, नोकरी बरोबरच घरसंसार सांभाळणे, पतीची मर्जी राखणे हे स्त्रीला करावेच लागते. स्त्रीच्या शरीरावर पुरुषाची असणारी सत्ता यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी स्त्रियांनीच पुढाकार घेतला पाहिजे. स्वतःच्या रक्षणासाठी स्त्रियांनी जागृत होण्याची गरज आहे असा विचार शारदा साठे आपल्या 'स्त्रीमुक्ती रोजच्या व्यवहारातील' या ग्रंथात मांडतात. तसेच शारदा साठेंनी 'ललकार' या शीर्षकाचा ग्रंहीथ २००५ साली लिहिला. या ग्रंथाचा परिचय करून देताना रुपाली शिंदे म्हणतात, "स्त्रियांचे हक्क हे मानवी हक्क आहेत' आणि 'स्त्रियांच्या नजरेतून जगाकडे पाहा' या दोन घोषणांचे प्रतिबिंब या ग्रंथामध्ये लिहिलेल्या लेखांमध्ये दिसते. स्त्रीमुक्ती संघटनेच्या संचालकांचा वैचारिक मांडणीचा पट लेखिकेने वाचकांच्यासमोर ठेवला आहे."[१२]

स्त्रीमुक्ती चळवळीचा आधार घेऊनच करुणा गोखले यांनी 'बाईमाणूस' हा ग्रंथ २०१० साली लिहिला, तर मंगला खिंवसरा यांनी 'स्त्रीमुक्ती चळवळ आणि वृत्तपत्रांचा इतिहास' हा ग्रंथ लिहिला. या दोन्हीही ग्रंथातून लेखिकांनी स्त्रीमुक्ती चळवळीचा विषय मांडला आहे. कुटुंबव्यवस्थेत वावरत असताना स्त्रीला पाहिजे असलेले एक स्वातंत्र्य व्यक्ती म्हणून स्थान या विषयावर जोर देऊन करुणा गोखले यांनी लिहिले. स्त्रीमुक्तीवादाच्या परिणामांचे चित्रणही करुणा गोखले करतात. तर मंगला खिंवसरा यांनी स्त्रीमुक्तीचळवळ अनि९ वृत्तपत्रातून या चळवळीचे दिसून येणारे पडसाद यांचा उलगडा त्या करतात. स्त्रीमुक्ती चळवळ ही फक्त शहरी व मध्यमवर्गीय स्त्रियांचा विचार करते व वृत्तपत्रांनीही या स्त्रियांचाच गौरव केला. पण ग्रामीण, दलित, आदिवासी स्त्री यांना या चळवळीत किंवा वृत्तपत्रलेखनात जागा मिळाली नाही. त्यामुळे ग्रामीण, दलित, आदिवासी स्त्रियांनाही या चळवळीत सामावून घेणे गरजेचे आहे, असे लेखिका उपरोक्त ग्रंथात म्हणतात.

बदलत्या स्त्रीजीवनाचा, स्त्रीप्रश्नाचा, स्त्रियांच्या चळवळींचा,स्वातंत्र्याचा परिचय डॉ.

नीलम गोऱ्हे यांनी २००६ साली लिहिलेल्या 'स्त्री प्रश्नांचा वेध' या ग्रंथातून करून दिला आहे. वर्तमान काळाचे भान ठेवून नीलम गोऱ्हेंनी उपरोक्त ग्रंथ सिद्ध केला आहे. तसेच आशा खांडेकर गवई यांनीही 'महिला अत्याचार' हा विषयही मोठया हिरहिरीने मांडला. त्यांनी सर्वेक्षण करून स्त्रीवर होणारा अत्याचार या विषयांवर 'महिलांच्या मानवधिकरांचे उल्लंघन' हा ग्रंथ लिहिला. स्त्रीवर होणारा अत्याचार, शारीरिक बळजबरी, अपहरण, हुंडाबळी या विषयांवर त्यांनी उपरोक्त ग्रंथातून संशोधनात्मक असे लेखन केले आहे.

२००० पूर्वी स्त्रियांनी राजकीय विषयांवरील बहुतांश लेख, पुस्तके लिहिली. त्याचप्रमाणे २००० नंतरही प्रतिभा रानडे, मनिषा टिकेकर सारख्या लेखिकांनी राजकीय विषयांवरचे वैचारिक लेखन केले. फाळणीनंतर भारत आणि पाकीस्तान या दोन राष्ट्रांचा राजकीय, धार्मिक, सामाजिक, शासकीय घटकांचा विचार त्यांच्या परस्परांशी असलेला संबंध प्रतिभा रानडे 'फाळणी ते फाळणी' या ग्रंथातून स्पष्ट करतात. तसेच पाकिस्तानी न्यायसंस्था, शासनसंस्था, दहशतवाद व पाकिस्तानची एकूण परिस्थिती यांना अनुसरून 'पाकीस्तान अस्मितेच्या शोधात' हा ग्रंथ लिहिला. प्रतिभा रानडेंबरोबरच मनिषा टिकेकर यांनीही पाकिस्तानात वास्तव्य करून तेथील परिस्थिती, क्षेत्रांची माहिती, विविध लोकांच्या मुलाखती, अनौपचारिक झालेले संभाषण या सगळयाचा विचार करून 'कुंपणापलिकडचा देश पाकीस्तान' हा ग्रंथ लिहिला.

समाजविकासासाठी, समाजाला प्रगतीप्रथावर नेण्यासाठी मनुष्याचा सर्वांगीण विकास झाला असा आशय इंदुमती पारीख आपल्या 'समाज विकासासाठी व्यक्तिविकास' या ग्रंथातून मांडतात. 'समाज विकासासाठी व्यक्तिविकास' या ग्रंथाच्या संदर्भात लेखिका रुपाली शिंदे लिहितात की, 'अनौपचारिक शिक्षणाला केंद्रस्थानी ठेवून व्यक्तिविकास साध्य करताना शिस्तबद्ध आणि सुसूत्र जीवनपद्धती, बुद्धीशी अनुभवांची सांगड घालणे, यांची खूप गरज आहे. माहितीचा योग्य प्रकारे वापर करता येणे म्हणजे ज्ञान. या ज्ञानाची व्यक्तिविकासासाठी गरज आहे. स्वतःचे जीवन अर्थपूर्ण करीत असताना त्याचा फायदा इतरांना कसा देता येईल यासंबंधी विचार या ग्रंथामध्ये मांडलेले आहेत."[१३]

प्रारंभीच्या स्त्रीविचारिक लेखनात स्त्रियांनी पालक व त्याचे पाल्य, शिक्षक व विद्यार्थी यांचे परस्पर संबंध कसे असावे?, पालकांनी आपल्या मुलांची कशी काळजी घ्यावी?, शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी कसे वागावे यावर आपल्या ग्रंथांमधून चर्चा केली. त्याचप्रमाणे पुन्हा तोच विषय घेऊन २००० नंतर डॉ. लता काटदरे यांनी 'शिक्षणयात्रा' हा ग्रंथ लिहिला.मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा विषय त्यांनी आपल्या ग्रंथाद्वारे मांडला आहे.

२००० ते २०१० या कालखंडातही स्त्रियांनी संशोधनात्मक वैचारिक लेखन करून ग्रंथ संपादन केले आहे. २००० नंतर अशा प्रकारे संशोधनात्मक लेखन करणाऱ्या लेखिकात हेमलता पाटील, दीपा क्षीरसागर, डॉ. प्रतिमा इंगोले, सुरेखा सावंत या लेखिकेंचा आवर्जून उल्लेख केला जातो. मराठवाड्यातील स्त्रियांनी केलेल्या 'मुक्तीचळवळीचे' चित्रण दीपा क्षीरसागर 'झाले मोकळे आकाश' या ग्रंथातून मांडतात. त्यांनी केलेले या ग्रंथातील लिखाण हे प्रत्यक्ष अनुभव घेतलेल्या स्त्रिया, चळवळीतील स्त्रिया यांच्याशी चर्चा, संवाद करून त्यांच्या मुलाखती घेऊन दीपा क्षीरसागर यांनी उपरोक्त ग्रंथ निर्मिला आहे. तसेच मराठवाड्यातील समाजस्थिती, शेती व्यवसाय व मराठवाड्याचा होणारा विकास त्याचप्रमाणे मराठवाड्यातील समस्या यावर हेमलता पाटील यांनी 'तांड्यावरील स्त्री आणि शहरी तसेच ग्रामीण स्त्रिया' हा ग्रंथ २००९ साली प्रकाशित केला.

ग्रामीण स्त्रीजीवन व ग्रामीण स्त्री आणि आधुनिक समाज यांच्या परस्पर संबंधाचा उलगडा करणारे लेखन डॉ. प्रतिमा इंगोले २००० साली लिहिलेल्या 'स्त्रीचे भावविश्व आणी आधुनिकता' या पुस्तकातून करतात. तसेच, मुंबईतील कोळी समाजाच्या जीवनाचा अभ्यास करून सुरेखा सावंत यांनी 'मुंबईतील कोळी समाज : काल आणि आज' हा ग्रंथ लिहिला.

२००० नंतरच्या काळातील स्त्रियांच्या वैचारिक लेखनाचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे या कालखंडात स्त्रियांनी आंतरविद्याशाखीय वैचारिक लेखन केले. विविध राष्ट्रांमध्ये झालेल्या क्रांतीचा, चळवळीचा परिणाम होऊन विविध विचारवंतांनी आपली मतमतांतरे नोंदवली. या सगळयाचा अभ्यास करून डॉ. सुमन बेहरे २००२ 'अभिजात सामाजिक विचारवंत' हे पुस्तक लिहिले. विविध विचारप्रवाहांचा ऐतिहासिक दृष्टिने त्यांनी आढावा घेतला आहे. तसेच, इतिहासाचा आधार घेऊनच महाराष्ट्रातील पेशवाई व पेशवेकालीन रंगील व रंगेल जीवन पेशवेकालीन सामाजिक, सांस्कृतिक स्थिती यांच्या कारण मीमांसेचा अभ्यास डॉ. वर्षा शिरगावकर यांनी केला आहे. त्यांनी २००१ साली 'पेशव्यांचे विलासी जीवन' हा ग्रंथ प्रकाशित केला. विचारवंत मिशेल फुकोंच्या संकल्पनाचा आधार घेऊन त्यांनी उपरोक्त ग्रंथ वैचारिक पातळीवर लिहिला आहे.

डॉ. अरुणा ढेरे यांनी २००४ साली विवेक व विद्रोह' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाविषयी रुपाली शिंदे आपले मत व्यक्त करताना लिहितात की, "या पुस्तकामध्ये समाजासाठी, देशासाठी बलिदान करण्यामागे, प्राणांची आहुती देण्यामागे केवळ वेडे साहस, आंधळी निष्ठा आणि निःसंग वृत्ती हे गुण नसावेत. बलिदानामध्येही विवेक असावा असे लेखिकेला वाटते. ज्या ध्येयासाठी विचार साध्य होण्यासाठी आपण बलिदान करण्यासाठी तयार झालो आहेत

त्याचा विचार आणि ध्येयप्राप्त आस्था असलीच पाहिजे. त्याच्या बरोबरीनेच जीवितप्राणावरही तितकीच आस्था असली पाहिजे. प्राणाहुतीमध्ये जीवितप्राण यःक्ष्चित मानून प्राणत्याग केला जातो; परंतु प्राणाहुतीमधील प्राणांची आस्था विचारमूल्य म्हणून मानली, तर ते बलिदान समाजधारक आणि शुभंकर प्रेरणा बनते; हा लेखिकेचा विचार नव्वदनंतरच्या काळात असलेल्या धार्मिक उन्मादातून उभा राहिलेला हिंसाचार, दहशतवाद यांच्या संदर्भात महत्त्वपूर्ण वाटतो."[१४]

भाऊ दाजी लाड यांच्या ऐतिहासिक कार्याचा आढावा घेणारे लेखन डॉ. सुरेखा सावंत 'भाऊ दाजी लाड यांचे राजकीय व सामाजिक कार्य' या ग्रंथातून करतात. तसेच, आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंवर प्रकाश टाकण्याच्या उद्देश्याने प्रा. सुशीला मून जाधव यांनी 'भगवान गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय स्त्री' हा ग्रंथ लिहितात. तसेच, ऐतिहासिक पत्रपुराव्यांच्या आधारे डॉ. माधवी खरात यांनी आंबेडकरांचे जीवनविश्व व गुणवैशिष्ट याचे दर्शन घडवण्यासाठी 'पत्रांच्या अंतरंगातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर' हा ग्रंथ २००१ मध्ये लिहिला.

महाराष्ट्रात घडलेल्या ऐतिहासिक घटना, प्रसंग, आंदोलनावर प्रकास टाकण्यासाठी प्रा. सुहासिनी देशपांडे यांनी 'संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील शाहिरांचे योगदान' हा ग्रंथ लिहिला. तर मनिषा पाटील यांनी २००१ मध्ये 'रणरागिणी संयुक्त महाराष्ट्राच्या' हा ग्रंथ सुहासिनी देशपांडेच्या ग्रंथाच्या विरुद्ध आहे. शाहिराचे महाराष्ट्राच्या इतिहासात असलेले महत्त्वपूर्ण स्थान याविषयी प्रा. सुहासिनी देशपांडे लिहितात. शाहिरांनी कलानिर्मिती केल्याचेही त्या म्हणतात. तर शाहिरीचा विचार कलात्मक अंगानी न करता एक वेगळा दृष्टिकोण मनिषा पाटील आपल्या ग्रंथातून मांडतात.

धर्म, संस्कृती याविषयावरही स्त्रियांनी लेखन केलेले आढळते. २०००-२०१० या कालखंडातही वैचारिक लेखिकांनी धर्म, संस्कृती या विषयालाही स्पर्श केला. २००५ साली बौद्धधर्म व बौद्ध धर्मात स्त्रियांना असलेले मानाचे स्थान, स्त्रीविषयक बौद्ध धर्माची मते डॉ. लता छत्रे 'बौद्ध धर्मातील स्त्रीविचार' या ग्रंथात मांडतात. पुष्पा त्रिलोकेकर यांनी वाचकांना 'देवसंकल्पनेशी' परिचय करून दिला. त्यांनी 'देवांची जन्मकथा' हा ग्रंथ २००७ मध्ये लिहिला असून यात माणसांच्या मनात 'देव' ही संकल्पना कशी निर्माण झाली? देव संकल्पनेतून नंतर देवदेवतांच्या कथांचा जन्म कसा झाला? मनुष्य प्राण्याची देवावर असलेली श्रद्धा, लोकसमजुती या सगळया प्रश्नांचा वेध घेण्याचा प्रयत्न पुष्पा त्रिलोकेकर 'देवांची जन्मकथा' या ग्रंथातून करतात.

समाजातील पुरुषसत्ता व स्त्री या पुरुषसत्तेच्या गुलामगिरीत कशी अडकत गेली. स्त्रीचे जगणे अनेक बंधनांनी कशाप्रकारे अडकून गेले. या सगळ्याचा चिकित्सक पद्धतीने वेध डॉ. मंगला आठलेकर यांनी 'महापुरुषांच्या नजरेतून स्त्री' या पुस्तकातून घेतला आहे. इतिहास विषयाचा चिकित्सक अभ्यास करण्याबरोबर वासंती फडके य. दि. फडके यांनी मुंबईतील समाजजीवनाचा, तेथील विविध घटकांचा वैचारिक दृष्टिने अभ्यास 'मुंबईचे खरे मालक कोण?' या ग्रंथातून केला आहे.

स्त्री वैचारिक लेखनात एक नवा विषय मांडण्याचा प्रयत्न किशोरी आमोणकर, डॉ. सुलभा ठकार, रोजना भडकमकर, सुलभा पिशवीकर, मोहना मार्डीकर, अंजली मालकर यांनी केला. 'संगीत' या विषयावर उपरोक्त लेखिकांनी संशोधनात्मक, चिकित्सक लेखन केले. २००० नंतरच्या वैचारिक लेखनात 'संगीत' ह्या नव्या विषयाने पर्दापण केले. भारतात संगीत कलेचा उगम कसा झाला? संगीतात राग कसे निर्माण झाले? भारतीय संगीतातील वैशिष्ट्य, संगीतकलाशास्त्र, परंपरा जपण्यासाठी झालेले प्रयत्न या विषयांवर डॉ. सुलभा ठकार यांनी २००२ मध्ये 'भारतीय संगीत शास्त्र : नवा अन्वयार्थ' हा ग्रंथ लिहिला. तसेच, संगीताची शास्त्रीय माहिती देण्याच्या उद्देश्याने रोजना भडकमकर यांनी २००४ मध्ये 'संगीतातील सौंदर्यस्थळे' व 'संगीतयात्रा : बंदिश विभाग' हे दोन ग्रंथ लिहिले. भरतमूनींच्या रससिद्धांताच्या आधारे किशोरी आमोणकर यांनी २००९ मध्ये 'स्वरार्थमणी' हा ग्रंथ लिहिला. सुलभ पिशवीकर यांनी अच्युत गोडबोले यांच्या मदतीने 'नादवेध' हा ग्रंथ लिहिला. तर सैद्धांतिक व क्रियात्मक या दोन पद्धतीने शास्त्रीय संगीताचा परिचय करून देण्यासाठी मोहना मार्डीकर 'संगीतशास्त्र परिचय' हा ग्रंथ लिहितात. मराठवाड्यातील संगीत शास्त्राचा शोध घेताना इतिहासकालीन संगीत काळानुसार कसे बदलत गेले, याविषयी अंजली मालकर यांनी 'मराठवाड्यातील अभिजात संगीत' नावाचा ग्रंथ लिहिला. संगीतशास्त्रा बरोबरच भारतातील नृत्य कळेविषयी सुजाता नातू यांनी 'कथक : एक सौंदर्यशास्त्र' हा ग्रंथ सिद्ध केला.

स्त्रियांचे वैचारिक लेखन हे त्या त्याकाळी पूरक असलेले जाणवते. २०००-२०१० या या काळात चित्रपटविषय अनेक तंत्रांची शास्त्रशुद्ध माहिती देणारा ग्रंथ अरुणा दामले यांनी लिहिला. चित्रपटातील तांत्रिक व साहित्यिक भागांची विश्लेषणात्मक मांडणी 'लालित्य' या ग्रंथात अरुणा दामलेंनी केली आहे. तर  श्यामल वनारसेनी २०१० मध्ये 'सत्यजित राय आणि भारतीय मन्वंतर' या ग्रंथात बदलत्या समाजजीवनाचे, स्त्रीजीवनाचे, रात्रीच्या इच्छा, आकांक्षाचे चित्रण चित्रपटातून कसे दाखवले जाते, सत्यजित राय यांनी बदलत्या जीवनाचे

चित्रण आपल्या चित्रपटातून कसे केले आहे या विषयावर प्रभावी लेखन केले आहे.

थोडक्यात २००० ते २०१० या कालखंडात स्त्रियांनी केलेले वैचारिक लेखन हे खूपच वेगळे आहे. या कालखंडातील लेखिका तत्कालीन समाजजीवनाशी, विविध घटकांशी एकरूप होऊन लिहिताना, दिसतात. चित्रपट, संगीतशास्त्र सारख्या नव्या विषयांवर वैचारिक दृष्टिकोनातून २०००-२०१० या कालखंडात लेखन झाल्याचे दिसते. ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक, शास्त्र, कला अशा विविध विषयांना उपरोक्त कालखंडात स्त्रियांनी स्पर्श केलेला दिसतो. संशोधनात्मक लेखन करण्यावरही २०००-२०१० या कालखंडातील बहुतेक लेखिकांनी भर दिली. तसेच, चित्रपटासारख्या विषयाची तांत्रिक व कलात्मक माहिती वाचकांना करून दिधली. असे असले तरी प्रारंभी पासून ते २०१० पर्यंत स्त्रियांचे वैचारिक लेखन हे 'स्त्री केंद्रित' असल्याचे प्रकर्षाने जाणवते.

## समारोप

प्रारंभ काळात म्हणजे १८३०-१८४० च्या सुमारास स्त्रियांनी वैचारिक लेखन करण्यास सुरुवात केली. प्रारंभ ते २०१० या कालखंडातील स्त्री वैचारिक लेखनाचा अभ्यास केला असते असे जाणवते की, प्रारंभीचे स्त्रीवैचारिक लेखन हे कालखंडानुसार बदलत गेले. त्यातील आशय विषयात आमूलाग बदल झालेले दिसते. मुख्य म्हणजे सुरुवातीच्या काळात स्त्रियांनी केलेले वैचारिक लेखन हे वर्तमानपत्रांपुरते मर्यादित होते. एवढेच नव्हे तर त्यावेळेस ज्या लेखिकांनी वैचारिक लेखन केले ते आपले नाव न देता, एक 'भगिनी' अशा वेगवेगळया गुप्त नावांनी केले. पण १८५० नंतर ताराबाई शिंदे, पंडित रमाबाई या लेखिकांपासून स्त्रियांच्या वैचारिक लेखनात बदल होत गेले. ताराबाई, रमाबाई या लेखिकांनी निर्भिडपणे पुस्तकरूपाने लेखन केले. केशवपन, विधवा स्त्री, बालहत्या, पुनर्विवाह यासारख्या प्रश्नांवर बोट ठेवले. १८०० ते १९०० या कालखंडातील अनेक लेखिकांनी ख्रिस्ती धर्म स्विकारल्यामुळे ख्रिस्ती धर्मतत्त्व सांगणारी वैचारिक पुस्तकेही लिहिली गेली. यात मिसेस फरार यांचे नाव अग्रगण्य आहे. या संदर्भात डॉ. मधुबाला खोपडे यांनी डॉ. विलास खोले यांनी मांडलेले मत सांगितले आगे, ते असे "प्रबोधनाला सुरुवात होत असतानाच 'दर्पण' हे वृत्तपत्र (१८३२) सुरु झाल्यापासून तीन वर्षाच्या आत मिसेस फरार यांनी हे विचार मांडावेत व ते स्त्रीसुधारणेच्या इतिहासाच्या अग्रस्थानी असावेत हे अर्थपूर्ण होय. पुढे पन्नास वर्षांनी ताराबाई शिंदे यांनी स्त्रीपुरुषांविषयी तुलनात्मक विवेचन करण्यासाठी अनुकूल अशी पृष्ठभूमी तयार करण्याचे काम एका परीने मिसेस फरार यांच्या लेखनामुळे घडले असे आज म्हणता येईल."[१५] १८०० ते १९०० या कालखंडात काही

मोजक्याच स्त्रियांनी वैचारिक लेखन केले.

१९०० नंतर स्त्रियांच्या वैचारिक लेखनात बदल झाल्याचे जाणवते. १९०० नंतरच्या काळात लेखिकांनी स्त्रियांच्या समस्यांबरोबर स्त्री उन्नतीचा विचारही आपल्या लेखनातून मांडला. तसेच, १९५० नंतर स्त्रिया शिक्षित झाल्याने त्यांची विचार करण्याची पातळी वाढली, व त्यांनी आर्थिक, सामाजिक विषयांवर स्त्रियांच्या स्वावलंबननाचा विचार करणारे लेखन केले. पण तरीही १९००-१९५० या कालखंडातील वैचारिक लेखन हे संकुचितच आहे.

१९५० नंतरच्या स्त्रीवैचारिक लेखनात स्त्रियांच्या विचारांच्या कक्षा रुंदाव्ल्याचे जाणवते. १९५० ते २००० या कालखंडातील स्त्रीवैचारिक लेखिकांनी निबंधातूनही वैचारिक लेखन केल्याचे आढळते. या संदर्भात डॉ. निर्मलकुमार फडकुले म्हणतात की, “याच कालखंडात काही लेखिकांनी वैचारिक निबंधलेखन केले. दुर्गा भागवत, श्रीमती म. गं. नातू, नलिनी पंडित इत्यादी नावे दृष्टिसमोर येतात. स्फुट आणि ग्रांथिक स्वरूपाचे लेखन या लेखिकांनी केले आहे. ‘लोकसाहित्य’ या विषयावर दुर्गा भागवतांचे लेखन म्हणजे त्यांचे स्वतंत्र संशोधन आहे. याच विषयावर सरोजिनी बाबर यांनीही विपुल लेखन केले आहे. ग्रामीण संस्कृती, जीवनपद्धती यांचे दर्शन घडविताना त्यांनी मीमांसाही केली. ‘विवेकाची गाठी’ या पुस्तकात म. गं. नातू यांचे निबंध संकलित झाले आहेत. बुद्धिनिष्ठ विचारांचे सडेतोड व साधार प्रतिपादन करणारी ही निबंध लेखिका थोडेच पण विचारसंपन्न साहित्य देऊन गेली.”[१६] १९५० ते २००० या कालखंडात स्त्रियांनी विद्यार्थी केंद्रित लेखन केले. पालकांचे आपल्या मुलांशी कसे संबंध असावे, शिक्षकांनी मुलांना कसे मार्गदर्शन करावे, मुलांच्या समस्या, त्यावर उपाययोजना या विषयांवर बहुतांश लेखन झाले. विविध विचारप्रवाह,नवी जाणीवा यांच्या माध्यमातून स्त्रीवैचारिक लेखन एका वेगळया उंचीवर गेले. राजकीय, सामाजिक, आर्थिक, मार्गदर्शनपर, विद्यार्थी केंद्रित, अनुवादित अशा अनेक विषयांवर लेखन झाले, हे खरे असले तरी वैचारिक लेखिकांनी या सर्व विषयांचा संबंध ‘स्त्री’ शी जोडला आहे. स्त्रियांचे व उपरोक्त विषयांचे परस्पर संबंध याची नोंद १९५० ते २००० या कालखंडातील लेखिकांनी घेतली आहे.

‘स्त्रीवाद’ या संकल्पनेचा १९७५ ला उदय झाल्यानंतर वैचारिक लेखिकांनी मोठया प्रमाणावर स्त्रीवादावर वैचारिक लेखन केले. थोडक्यात १९५० ते २००० या कालखंडातील लेखिकांचे वैचारिक लेखन हे वैविध्यपूर्ण आहे. स्त्रियांच्या वैचारिक लेखनामुळे स्त्रीजीवन व समाजात बदल घडून आल्याचे दिसून येते आणि या बदलांचे प्रतिबिंब २००० नंतरच्या

स्त्रीवैचारिक लेखनात दिसून येते.

२००० ते २०१० या कालखंडात स्त्रियांनी बदलत्या जीवनाचे, तंत्राचे, शास्त्रांचे वास्तवचित्रण केले आहे. इतिहासातील घटनांचा विश्लेषणात्मक वेध घेऊन लेखन केलेले दिसते. थोडक्यात स्त्रियांच्या वैचारिक लेखनाच्या कक्षा रुंदावल्या. एकूण स्त्रियांचे लेखन हे प्रगल्भ झाल्याचे दिसून येते. हे सगळे खरे असले तरी स्त्रियांनी केलेल्या वैचारिक लेखनात मिज्क्या स्त्रिया सोडल्या तर स्त्रियांचे वैचारिक लेखन हे परिश्रमपूर्वक झाले नाही. वैचारिक लेखिकांनी फक्त स्त्री परिघात राहूनच बहुतांश विषय हाताळले. पण असे असले तरी वैचारिक साहित्यात स्त्रियांचे वैचारिक लेखन हे दर्जेदार असल्याचेही मानले जाते.

## संदर्भग्रंथ


१. स्त्री साहित्याचा मागोवा खंड – १ पृ. २२५.

२. स्त्री साहित्याचा मागोवा खंड – १ पृ. २२७.

३. तत्रैव पृ. २२८.

४. तत्रैव पृ. २२८.

५. स्त्री साहित्याचा मागोवा खंड – २ पृ. ४७३.

६. तत्रैव पृ. ४८१.

७. इरावती कर्वे आणि विंदा करंदीकर, संपादक डॉ. पुष्पलता राजापुरे तापस, पृ. ६७.

८. स्त्री साहित्याचा मागोवा खंड – २ पृ. ४८८.

९. तत्रैव पृ. ८९३.

१०.तत्रैव पृ. ४९९.

११.तत्रैव पृ. ५२४.

१२.स्त्री साहित्याचा मागोवा खंड – ४ पृ. २८९.

१३.तत्रैव पृ. २८३.

१४.तत्रैव पृ. २८६.

१५.स्त्रियांचे गद्यलेखन, डॉ. मधुबाला खोपडे पृ. २१२.

१६.प्रदक्षिणा खंड – २ पृ. २७९.

## घटक क) स्त्रीलिखित मराठी बालसाहित्य

अ)१८५०ते१९५० या कालखंडातील बालसाहित्य

ब) १९५० ते २००० या कालखंडातील बालसाहित्य

क) २००० ते २०१० या कालखंडातील बालसाहित्य

### अ) १८५०ते१९५० या कालखंडातील स्त्रीलिखित बालसाहित्य

मुलांच्या किंवा बालकांच्या मनोरंजनासाठी लिहिलेले साहित्य म्हणजे 'बालसाहित्य' होय. 'बालसाहित्य' या प्रकारात कथा, कादंबरी, कविता, चरित्र, नाटक यांचाही समावेश केला जातो. पण, हे वाङ्मयप्रकार बालसाहित्यात विशिष्ट वयोगटानुसार लिहिले गेले. बालसाहित्यात वयोगटानुसार शिशुगीत, बाळगीत, किशोरगीत असे प्रकार पडतात; आणि त्यानुसार बालसाहित्याची निर्मिती होते. पण, बालसाहित्याच्या प्रारंभ काळाचा विचार केला असता, प्रारंभ काळात केवळ वीरांच्या कथा, पुराणकथा, संतकथा या विषयांनी बालसाहित्याची निर्मिती होत होती. सर्वप्रथम १८१५ ला वैजनाथ शास्त्री यांनी पंचतंत्रातील गोष्टी बंगालीमधून मराठीत अनुवाद केल्या आणि तेव्हापासून बालसाहित्य पुस्तक रूपाने प्रसिद्ध झाले. तद्पुर्वी ते मौखिक स्वरुपात आढळते. वैजनाथ शास्त्री यांनी बालसाहित्याचा पाया घातला, तरी बालसाहित्याची खरी सुरुवात बापू छत्रें पासून झाली असे मानले जाते. बापू छत्रेंच्या नंतर बालसाहित्य लिहिणारे अनेक लेखक व लेखिका तयार झाल्या ज्यांनी बालसाहित्य समृद्ध केले.

'बालसाहित्यात' स्त्रीलिखित बालसाहित्याचा विचार केल्यास मिस मेरी भोर यांचे नाव पुढे येते. मुलांच्या भावना जाणून उत्तम बालकविता लिहिणाऱ्या मिस मेरी भोर या बालसाहित्याच्या उगमस्थानी दिसतात. मिस मेरी भोर यांची *चेंडू* ही पहिली कविता तसेच नंतर पुढे लक्ष्मीबाई टिळक यांनीही *आकड्यांची ओळख, कावळा* यासारख्या कविता लिहिल्या. त्यांचा १९५१ मध्ये *भरली घागर* नावाचा संग्रह प्रकाशित झाला. लक्ष्मीबाईंच्या कविता या मुलांच्या बालमनावर संस्कार करणाऱ्या व विनोदी होत्या. त्याचप्रमाणे शिशु शिक्षणाची सुरुवात करणाऱ्या ताराबाई मोडक (१८९२-१९७३) यांनीही "*थेंबा थेंबा, थांब थांब दोरी तुझी लांब लांब आकाशात पोचली,तिथे कशी पोचली?*" [१]

अशी व अशासारख्या अत्यंत मधुर लोकप्रिय कविता लिहिल्या. शिशुगटातील मुलांसाठी *फुलांचा कुरकुला* नावाचा काशीताई नाटेकर यांचा बालकविता संग्रह प्रसिद्ध आहे.

काशीताईंनी प्राणी-पक्षी यांच्याशी असलेले लहान मुलांचे नाते याला अनुसरून कविता लिहिल्या. मुलांच्या जवळचे नातलग मुलांविषयी कसे प्रेमाने वागतात, त्याचे लाड करतात. याविषयी त्या लिहितात,

"माझ्या या दारातून कोण कोण येत कोण कोण येते?
मामा येतो, मामी येते
गोड गोड खून देऊन जाते
काका येतो काकी येते
छान छान बाहुली देऊन जाते" [२]

अनुताईंनी अशा प्रकारे अनेक बालकविता लिहिल्या. त्यानंतर पुढे कावेरी कर्वे, सरला देवधर (*हा घोडा गाडीवाला, गोपाळकाला*) एमिली विसेल, सरस्वती सुभेदार, अपर्णा देशपांडे, संजीवनी मराठे, शांता शेळके या कवयित्रीची नावे घेता येतील.

अशा प्रकारे विविध नातेसंबंध पशु-पक्षी, निसर्गातील घटक यांच्या आधारे नाद मधुर सुरेल, शब्दचमत्कृतीपूर्ण अशा बालकवितांचे लेखन केले गेले व त्यानंतर शांता शेळके, विजया जहागीरदार, वृंदा लिमये, संजीवनी मराठे, सरिता पदकी, अरुणा ढेरे यांसारख्या कवयित्रींनी बालसाहित्य हाताळण्यास सुरुवात केली.

बालसाहित्यातील सर्वात प्रसिद्ध प्रकार म्हणजे 'बालकथा'. बालकथांचे आकर्षण हे सगळ्यांनाच होते. रामायण महाभारत, पंचतंत्र पुराणातील कथा यांच्या आधारे बालकथा लिहिल्या गेल्या. १८०६ साली सख्खन पंडित नावाच्या गृहस्थाने *इसापनीती* हे इंग्रजीतून मराठीत अनुवादित केले. त्याचे नाव *बालबोध मुक्तावली* असे होते. यापासून मराठी बालसाहित्याची सुरुवात झाली.

प्रारंभ ते १९५० या कालखंडात इत्यादि लेखिकांची नावे घेता येतात. उषा अपरे यांनी *प्राणिगावच्या मौज* या पुस्तकातून प्राण्यांच्या व मुलांच्या नात्यातील बालकथा लिहिल्या. तसेच प्राणिकथांवर मालतीबाई दांडेकर यांनीही *टीत्रूची बहादुरी* हे बालकथांचे पुस्तक लिहिले. आनंदीबाई जयवंत यांचे *वाघाची मावशी आणि इतर कथा* हे पुस्तक. १९५० पर्यंत हाताच्या बोटावर मोजता येतील एवढी नावे बालकथाप्रकारात बघायला मिळतात.

बालकथांमध्ये बाललोककथा लिहिण्यास १९०० नंतर सुरुवात झाली. विष्णू कर्वे यांनी *लहान मुलांच्या गोष्टी* या नावाने मुलांसाठी लोककथा लिहिल्या. त्याचप्रमाणे स्त्रियांचे लोककथा प्रकारातील योगदान पहिले. तर सर्वप्रथम ताराबाई मोडक यांचे नाव येते. ताराबाई मोडक यांनी पारंपारिक लोककथा लिहिल्या. त्यांची *न्हाविणीची गोष्ट* ही

लोककथा प्रसिद्ध आहे. तसेच, त्यांनी *बादशहा आणि बिरबल* नावाचे पुस्तक लिहिले. त्यांच्या लोककथा या रंजक, चातुर्य, बुद्धिमत्ता यांच्यावर आधारित आहे. ताराबाईप्रमाणेच कावेरी कर्वे यांनी *बोलका शंख* नावाचे लोककथांचे पुस्तक लिहिले. त्याचप्रमाणे मालतीबाई दांडेकर यांनी लोककथांच्या क्षेत्रात महत्वपूर्ण कामगिरी केली. त्यांचे *माईच्या गोष्टी, शततारका, ताईंच्या गोष्टी* इत्यादी त्यांचे लोककथासंग्रह प्रसिद्ध झाले. मालतीबाईचे बालसाहित्यातील योगदान विशद करताना लीलावती भागवत लिहितात की, "मालतीबाई दांडेकर हे नाव किशोर साहित्यात जरी परिचयाचे असले तरी लोककथा, परीकथा आणि बालकथा यांतही त्यांची लेखणी जास्त रमते. छोट्या मुलांना कशाप्रकारचे वाङ्मय देणे आवश्यक आहे आणि ते कसे रंजक करावे याची त्यांना चांगली जाण आहे. मालतीबाईंनी बालसाहित्याच्या मालेत बरेच अनमोल मोती गुंफले आहेत."[३] लीलावती भागवतांनी मांडलेले हे मत तंतोतंत खरे आहे.

बालसाहित्यात महत्वपूर्ण भाग म्हणजे परीकथा, साहसकथा व पौराणिक कथांचा होय. १९५० पर्यंत परीकथांचे लेखन करणाऱ्या स्त्रीलेखिकांमध्ये मालतीबाई दांडेकर या होत. त्यांची *मोहनमाळ, परीचा बाग* (१९४४) ही पुस्तके प्रसिद्ध आहेत. प्रभा जोशी यांची *राणीचा रत्नहार, रत्नमाला आणि इतर गोष्टी, निवडुंगाची स्वप्ने* इत्यादी पुस्तके होत. पण, १९५० पर्यंत साहसकथा लेखनामध्ये फक्त मालतीबाई दांडेकर व पिरोज आनंदकर या दोघांचाच उल्लेख केला जातो. तसेच, सामाजिक कथालेखनही १८५० ते१९५० या कालखंडातील काही लेखिकांनी केले. वास्तवदर्शन घडवण्याच्या उद्देशाने गीता साने यांनी *चिमण्या गोष्टी* हा कथासंग्रह लिहिला. तसेच, लीला दीक्षित यांनी सांगितल्याप्रमाणे "प्रभावती जोशी व म.गो. जोशी यांच्या *'रत्नमाला आणि इतर गोष्टी*,' आनंदीबाई जयवंत यांचे '*बाबूच्या लीला'* या पुस्तकांनी वास्तवकथा सांगून विशेषतः शिशुगटाला आनंदित केले. श्रीमती पिरोज आनंदकर यांनी *'किशोरकथा'* लिहिल्या. चांगली वास्तवकथा या दृष्टीने इंदिरा तेलंग यांच्या '*इनची स्वप्ने'* हे पुस्तक मोलाचे आहे. कावेरी कर्वे यांची '*चिंगी', 'गुलाबराणी'* ही दोन पुस्तके मुलीचे वास्तवदर्शन घडविणारी पुस्तके आहेत." [४]

बालसाहित्यात इतर साहित्यप्रकाराबरोबर बालकादंबरीही लिहिल्या गेल्या. या कादंबऱ्या विशेषतः वास्तव जीवनाशी परिचित होणाऱ्या कुमारवयातील मुलांसाठी लिहिल्या गेल्या. पण, बालकादंबरी लेखन करणाऱ्या स्त्रिया १८५० ते १९५० या कालखंडात मोजक्याच होत्या. या लेखिकांमध्ये उषा आपटेंची *तीन शिलेदार* (१९४८), कावेरी कर्वे *चिंगी,* रत्नप्रभा घारपुरे *लिलूच्या लीला* या कादंबरीचा उल्लेख करता येईल.

तसेच, मालतीबाई दांडेकर सारख्या लेखिकेने *सोनेरी नदीचा राजा* (१९४४) व *सोन्याची गिरणी* (१९४४) या रंजनप्रधान कादंबऱ्या लिहिल्या. कमलाबाई टिळकांनी *झोपडपट्यांतील झिपऱ्या* ही एका अनाथ मुलांवर आधारित कादंबरी लिहिली. तसेच, *Around the world in eighty days* या कादंबरीचा *ऐंशी दिवसात पृथ्वी प्रदक्षिणा* या नावाने अनुवाद केला.

तसेच, थोडक्यात बालसाहित्यात पुढील लेखिका व त्यांच्या पुस्तकांचा उल्लेख करता येतो. उदा.

१) कमलाबाई देशपांडे- *चिमण्या* (व्यक्तीचित्रणात्मक)

२) डॉ. चारुशीला गुप्ते – *वासुदेव बळवंत, बाजीप्रभू*

३) मालती दांडेकर – *जगातील जमती,मैत्रिणी*

४) चारुशीला गुप्ते – *काश्मिरी करंडी*

५) कुमुदिनी रांगणेकर –*देशोदेशीचे सोंगडी*

६) मालतीबाई- *उद्याची कन्या, कन्येस प्रेमभेट*

७) पिरोज आनंदकर – *इंद्रधनुचा पूल, भूगोलावरील भ्रमण*

इत्यादी पुस्तके बालसाहित्यात मोडतात.

१८५० ते १९५० उपरोक्त उल्लेखिलेल्या मोजक्याच स्त्रियांनी बालसाहित्य लेखन केले. बालसाहित्यात नाटक हा प्रकार हाताळलेला दिसत नाही. या संदर्भात लीला दीक्षित लिहितात, " कुमुदिनी रांगणेकरांनी मुलांसाठी *'हादगा'* हे नाटक १९४९ मध्ये लिहिले. त्याचे प्रयोग शाळांतून कदाचित झाले असतील; पण, त्याची नोंद कुठेही नाही. जानकीबाई विद्धांस यांनी शाळेतील छोट्या मुलांना अभिनय करून म्हणता येतील अशी काही गीते लिहिली. त्यामध्ये काही नाट्यात्म गुण आहेत. म्हणून याची नोंद येथे करीत आहे. *'बालसंवादगीते'* या नावाने पुस्तक १९३९ मध्ये प्रसिद्ध झाले आणि शाळांमधून त्यातील संवादगीते सादर झाली. ताराबाई मोडक यांनी लिहिलेली काही गीते अभिनय गुणाला वाव असलेली होती. ती गीते मुले अभिनयासह सादर करीत असत, अशा काही नोंदी सापडतात. या नोंदिव्यातिरिक्त १९५० पूर्वी स्त्रियांनी बालनाट्याच्या क्षेत्रात काही भरीव लेखन केल्याची नोंद नाही." [५] थोडक्यात १८५० ते १९५० या कालखंडात लिहिलेले बालसाहित्य अल्प प्रमाणात असले तरी ते मुलांची मानसिकता जाणून लिहिण्याचा प्रयत्न १८५० ते

१९५० या कालखंडातील लेखिकांनी केला.

१९५० ते २००० या कालखंडात बालसाहित्य जरी अल्प प्रमाणात लिहिले असले, तरीही १९५० नंतर बालसाहित्य भरभराटीला आले. कथा, कादंबरी, कविता, नाटक, एकांकिका असे विविध वाङ्मयप्रकार बालसाहित्यात विपुल प्रमाणात लिहिले गेले ते १९५० नंतरच. रामायण महाभारताच्या कथांतील बालसाहित्य १९५० नंतर आधुनिक काळाशीही एकरूप झाले. मुलांच्या मनावर संस्कार करणाऱ्या साहसकथा, विज्ञानकथा अशा कथा लिहिल्या गेल्या व त्याचप्रमाणे नादमय अशी बडबडगीते, कविताही मोठया प्रमाणात लिहिल्या गेल्या. तसेच, इतर वाङ्मयप्रकारही हाताळले गेले.

१९५० ते २००० या कालखंडातील स्त्रीलिखित बालसाहित्यात 'कविता' या प्रकाराचा विचार करता असे जाणवते की, या कालखंडातील कवयित्रींनी बालकविता प्रकारात विविध विषय हाताळले. पशु-प्राणी, बाहुली-पऱ्या, आई-मुल, निसर्ग, देशाभिमान अशा वेगवेगळया विषयांवर यमक जुळवून तालबद्ध अशा रचना तयार केल्या. लहान मुलांना विविध पशु-पक्षी, प्राणी यांच्या विषयी कुतूहल असते, आवड असते आणि यालाच अनुसरून लीलावती भागवत या कवयित्रीने *हा घोडा गाडीवाला* हा बालकविता संग्रह लिहिला. तसेच *आला विदुषक आला* हा कवितासंग्रह ही त्यांच्या नावावर आहे. समर्पक उपमांनी तालबद्ध अशी रचना लीलावती भागवत यांनी आपल्या बालकवितासंग्रहातून केली. तालबद्धता लीलावती भागवतांच्या कवितेची वैशिष्ट्य होय. तसेच, बालकांना नाचायला लावणारे, अभिनयपर अशी तालबद्ध रचना सरला देवधर यांनीही केली. त्यांचे *गोपाळकाला* व *हा घोडा गाडीवाला* हे बालगीतांचे संग्रह प्रसिद्ध आहे. पशुपक्ष्यांवर लिहिणाऱ्या कविता लेखन करणाऱ्या कवयित्रींमध्ये शांता शेळके यांचे नाव घेतले जाते. *थुई थुई नाचमोरा, चिमणचारा, झोपेचा गाव* व *आपले सोबती, कविता करणारा कावळा* हे शांता शेळकेंचे बालकवितासंग्रह बालकांच्या कल्पनाशक्तीचा विचार करून तारा वैशंपायन यांनी *कुकूच कोंबडा* हा पशुपक्ष्यांच्या बालगीताचा संग्रह लिहिला. सरिता पद्कींनी शिशुगटातील मुलांसाठी त्यांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळावी म्हणून शिशुगीते लिहिली. *गुटर्र गुंड गुटर्र गुंड* हा सरिता पद्कींचा बालकवितासंग्रह. सुमती पायगावकर यांनी लेखिका व कवयित्री अशा दोन्हीही क्षेत्रात प्रमुख भूमिका बजावली. त्यांचे सगळेच लेखन हे बालसाहित्याच्या आधारेच झाले आहे. *'पोपटदादाचं लग्न'* हा त्यांचा उल्लेखनीय बालकवितासंग्रह होय .

अशा प्रकारे शिशुगटासाठी व पशुपक्ष्यावर आधारित अशा अनेक बालकविता लिहिल्या

गेल्या. त्यात इंदिरा संत, सरिता वैद्य, वसुंधरा देसाई, ममता तावडे, इंदिरा कुलकर्णी अशा अनेक कवयित्रींचा उल्लेख करता येतो.

बालगीतात कवयित्रींनी पर्यावरण विषय हाताळला यात निर्मला सरडा, सुखद ऋषी, संगीता बर्वे, इंदिरा संत या कावयित्रींचाही उल्लेख करता येतो. झाडे, वने यांचे पर्यावरणाशी असलेले नाते कसे महत्वपूर्ण आहे, हे त्यांनी सांगितले आहे. तसेच, आश्लेषा महाजन या कवयित्रींनी निर्सार्गातील विविध घटकांचे महत्व सांगताना *मुलांसाठी सुंदर सचित्र गाणी* हा संग्रह लिहिला. निसर्ग कविता लिहिणाऱ्या कावयित्रीत शांता शेळकेंचाही उल्लेख केला जातो. तसेच निसर्गातील विवध रंगांचे दर्शन कृ. व. निकुंब यांनी आपल्या *तृणबाळे* या कवितेतून घडवले आहे. इंदिरा संतांनी पाउस व पावसामुळे निसर्गात होत असलेले बदल याचे वर्णन आपल्या बालकवितेतून केले आहे. तसेच, प्रभा पार्डीकर, विमल लिमये या कवयित्रींनी पावसावरच्या कविता लिहिल्या. निसर्ग व पर्यावरणाच्या आधारे मुलांना चांगला संदेश देण्याच्या उद्देशाने अरुणा ढेरे यांनी *सुंदर जग हे* हा कवितासंग्रह लिहिला. त्यांच्या *पावसाळ्याचा खेळ, सरीवर सरी, मोर नाचतो, आला उन्हाळा, निळी नदी* ह्या प्रसिद्ध कविता होय. अरुणा ढेरें प्रमाणेच नीलिमा गुंडी यांनी *आभाळला फळा, रंगाचा ठाव* आणि *कानामात्रा* हे कवितासंग्रह लिहिले.

लहान मुलांना कल्पनेतील स्वप्नातील जगाविषयी कुतूहल असते. स्वप्नातील नगरी, परी, जादूही पऱ्या अशा विविध गोष्टींच्या कल्पना लहान मुलं करत असतात. त्यामुळे बालकवितांमध्ये पऱ्या, बाहुल्यावरही कविता लिहिल्या गेल्या. समुद्रकिनारी वाळूचे बनवलेले किल्ले दुसऱ्या दिवशी गायब कसे होतात. या मुलांच्या कल्पनेतील प्रश्नांचे उत्तर देताना निर्मला देशपांडे यांनी *जलपऱ्यांची मोठी चलाख जात, किल्ले चोरून नेतात समुद्राच्या आत* ही कविता लिहिली. तसेच, *परी निघाली बाजारा* ही निर्मला देशपांडेंची कविता, त्याचप्रमाणे *स्वप्ननगरी जादू व्हावी एकदा तरी,तुमची आमची गंमत परी* या परीविषयीच्या कविताही वैशाली जोशी, संगीता बर्वे, सुमन कासार या कवयित्रींनी लिहिल्या. तसेच, बाहुली गीतेही लिहिली गेली.

आई व मूल यांच्यामधील नात्याचा, वात्सल्य भावनेचा उलगडा करणाऱ्या बालकविताही१९५० ते २००० या कालखंडातील स्त्रियांनी लिहिल्या. आई-मूलाच्या नात्यातील भावनावर कविता लिहिणाऱ्या कवयित्रीत शांता शेळके, निर्मला देशपांडे, शिरीष पै, संजीवनी बोकील या कवयित्रींचा उल्लेख करता येतो.

लहान मुलांना आईविषयी असणारे प्रेम, आदर, आईच्या जवळ राहण्यात मुलांना

मिळणारा आनंद या सगळयाचे चित्रण शिरीष पै यांनी आपल्या *आईची गाणी* या बालगीतसंग्रहात केले आहे. तसेच *दत्तक बाळ* या कवितेत हेमा लेलेंनी दत्तक मुलाला आपल्या आईविषयी असणारे प्रेम *दत्तक बाळ* या कवितेत आले आहे.

*झोपेच्या गावाला जाणेकिती सोपे,*
*आईला द्यावे फक्त दोन पापे*

या कवितेतून शांता शेळके यांनी आई व मुलांमध्ये असणारे प्रेम चित्रित केले आहे. त्याचप्रमाणे घरातील इतर मंडळींशी लहान मुलांचे असणारे सुंदर नाते निर्मला देशपांडे, शांता शेळके या कवयित्रींनी आपल्या कविताद्वारे उभे केले आहे.

१९५० ते २००० हा कालखंड म्हणजे अनेक देशभक्ताच्या कार्यांनी भारावून गेलेला काळ. या कालखंडात अनेक देशभक्तीपर गीते लिहिली गेली. मुलांना देशाबद्दल अभिमान वाटावा यासाठी, देशासाठी कार्य केलेले हुतात्मे नेते यांच्यावर आधारित स्फूर्ती गीतेही लिहिली गेली. संजीवनी मराठे यांनी *भाग्य तिलक, हाक मारते आई* ही गीते लिहिली, तर *स्वातंत्र्यगीते* हे पुस्तक श्रीमती शिदोरे यांनी लिहिले. तर *चाफ्याची फुले* या कवितासंग्रहात सुमती पायगावकर यांनी *शूर शिपाई* हि कविता लिहिली. त्याचप्रमाणे स्वातंत्र्यकाळातील महनीय व्यक्ती पंडित नेहरू, गांधीजी यांच्यावरील कविताही हेमलता लाटकर यांनी लिहिल्या. त्याचप्रमाणे इंदिरा अत्रे, शशिकला साळगावकर यांनी शिवाजीराजांच्या पराक्रमाचे वर्णन करणारी काव्ये लिहिली.

बालकवितेतील महत्त्वपूर्ण गीते म्हणजे बडबडगीते होय. १९६० ते १९७० या कालखंडात विंदा करंदीकरांनी बडबडगीतांच्या लेखनास सुरूवात केली. बडबडगीते लेखनात मराठी कवयित्रींचा विचार करता सरीता पदकी, वृंदा लिमये यासारख्या कवयित्रींचा उल्लेख करता येतो. बडबडगीतांचे खास वैशिष्ट्य म्हणजे विषय वैविध्यता. बडबडगीते ही ताल, लय यांनी बद्ध होती म्हणून ती सहज मुलांच्या तोंडी येत. सरीता पदकी यांनी *गार्मुष्का* हा बडबडगीतांचा संग्रह प्रकाशित केला. तसेच, वेगवेगळ्या विषयांवर त्यांनी बडबडगीते लिहिली. सरीता पदकी प्रमाणेच वृंदा लिमयेंनी विविध बडबडगीते लिहिली. त्यांच्या बडबडगीतात *झुक झुक आगगाडी* हे प्रसिद्ध बडबडगीत होय. त्याचप्रमाणे वृंदा लिमये यांनी *जंतर मंतर, कमाल धमाल* हे बडबडगीतांचे संग्रह लिहिलेत. विजया ब्राम्हणकर यांनी *किलबिलाट, चिवचिवाट* ही बडबडगीतांची पुस्तके प्रकाशित केली.

अशा प्रकारे १९५० ते २००० या कालखंडात बालगीते लिहिण्यास अनेक कवयित्रींनी हातभार लावला. त्यांच्या बालगीतात विषयांचे वैविध्य तर होतेच, त्याचबरोबर

सहजसुलभ भाषेत तालबद्ध अशी रचना कवयित्रींनी केली. तसेच, १९५० ते २००० या कालखंडातील बालगीतात आधुनिकतेचाही आविष्कार झाला. तसेच, उपदेशपर कविताही लिहिल्या गेल्या.

## ब)१९५० ते २००० या कालखंडातील स्त्रीलिखित बालसाहित्य

### बालसाहित्यकथा

बालसाहित्यात 'कथा' हा वाङ्मयप्रकार मोठया प्रमाणात हाताळला गेला. प्रारंभ काळापासून कथा हा वाङ्मयप्रकार वाचनीय ठरला आहे. रामायण-महाभारतातील कथा, जातककथा, वेताळकथा, लोककथा, परीकथा, कल्पनारम्य कथा, पौराणिक कथा, ऐतिहासिक कथा व चरित्र कथा, चातुर्य कथा, राजा-राणीच्या कथा, साहसकथा अशा वेगवेगळया विषयांनी प्रारंभी कथालेखन हे समृद्ध बनले. पण नंतर नंतर कथालेखनातील विषयातही बदल होऊ लागले. प्रत्येक काळाशी निगडीत घटना-प्रसंगांचा वेध कथा लेखनाद्वारे घेतला गेला.

१९५० ते २००० या कालखंडातील कथालेखकांचा अभ्यास केला असता. बहुतांश लेखिकांनी बालकथा लेखनात आपला सहभाग दर्शवला. लोककथा, प्राणिकथा, परीकथा, कल्पनारम्य कथा, पौराणिक कथा, ऐतिहासिक व चरित्रकथा, चातुर्यकथा, राजा-राणीच्या कथा, विज्ञान कथा, साहसकथा, पर्यावरण कथा, वास्तवकथा अशा वेगवेगळया विषयांना अनुसरून विविध लेखिकांनी बालकथा लिहिल्या व बालकथालेखन समृद्ध केले.

'लोककथा' ह्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित केल्या जातात. पण या लोककथांचे लेखन असे झाले नव्हते. त्या तोंडीच सांगितल्या जात. पण १९५० नंतर लोककथा लेखनाला खऱ्या अर्थाने सुरूवात झाली. बाललोककथा लेखनातील लेखिकांचा विचार करता दुर्गाबाई भागवतांचे नाव अग्रगण्य आहे. दुर्गाबाई भागवतांनी जातक कथालेखन केले. *पुंगनूरचे शहाणे, रानझरा, तुळशीचे लग्न, वनवासी राजपुत्र, चंद्रलेखा आणि आठ चोर* ही त्यांची बाललोककथांची पुस्तके. दुर्गाबाईंच्या लोककथा ह्या मुलांवर संस्कार करणाऱ्या, नीतीबोध करणाऱ्या आहेत. दुर्गाबाईंप्रमाणेच मालतीबाई दांडेकर यांनीही बालसाहित्यात भरभरून लेखन केले. मालतीबाईच्या लोककथा लेखनातील विषय हे रंजक शैलीतील होते. त्यांनी देश-विदेशातील कथाही लिहिल्या. चमत्कार, रंजकता, कल्पनाविलास यांनी समृद्ध अशा लोककथा मालतीबाईंनी लिहिल्या. *नऊ देश नऊ कथा, ताईच्या गोष्टी, गमतीदार लोककथा, काश्मीरच्या लोककथा, शततारका, माईच्या गोष्टी* ही

त्यांची लोककथांची पुस्तके व लोककथा होय. मुलांचे मनोरंजन करण्याच्या हेतूने सविता जाजोदिया यांनी चातुर्य लोककथा व मूर्खाच्या लोककथा लिहिल्या. सविता जाजोदिया यांची *चतुराई, पढतमुर्ख, अकलेचे कांदे, पेडगावच्या कथा, अशी उमलली फुले* इत्यादी लोककथांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्याचप्रमाणे अनेक लेखिकांनी विविध देशातील लोककथा लिहिल्या. यात *जमिनीवर चालणारे जहाज* (तारा पंडित), *रंजक गोष्टी* (शांता शेळके) या लेखिकांचा उल्लेख करता येतो.

लोककथांप्रमाणेच मुलांच्या आवडीच्या कथा म्हणजे प्राणिकथा होय. विविध प्राणी, पशु-पक्षी यांच्या माध्यमातून कथालेखन केले गेले. प्राणिकथाद्वारे मुलांवर संस्कार करण्यासाठी त्यांना हितोपदेश करण्यासाठी व रंजकता म्हणून प्राणिकथांवर भर दिली गेली. उदाहरणार्थ : गर्व झालेल्या माशांची नंतर कशी फजिती होते, अशा आशयाची कथा मालतीबाई दांडेकर यांनी *वितभर तळ्यात हातभर मासा* हि कथा लिहिली. *वितभर तळ्यात हातभर मासा* या नावाचा मालतीबाईंचा कथासंग्रहही आहे. तसेच कृष्णाबाई मोटे यांनी *प्राण्यांची अजब घरे* व *जीवसृष्टीच्या नवलकथा* ही प्राणिकथांची दोन पुस्तके लिहिली. लीलावती भागवत यांनीही *चिंटू-पिंटूचा पराक्रम आणि इतर गोष्टी* व *बडबड मामा* ही दोन प्राणिकथांची पुस्तके लिहिली. *फंटुश,पिटुकली पिंटी मावशी, आता छान वाटतंय, मला मालक हवाय* या लीलावातीबाईंच्या उल्लेखनीय कथा. लीलावतीबाई प्रमाणेच नलिनी देवळे (*लताचा छब्या*), सुमती पायगावकर (*कोल्हेताईच्या कुई*), कुमुदिनी रांगणेकर (*इच्छामणी व इतर गोष्टी, 'ऐका हं'*), मंदा खांडगे (*पक्षीमित्र*), लीला दीक्षित (*मुके मित्र*), दीपा गोवारीकर (*तळ्याकाठी मळ्याकाठी*) या लेखिकांनीही प्राणिकथासंग्रह लिहिले. प्राणिकथा ह्या मुलांच्या आकर्षणाचा विषय ठरल्यामुळे १९५० ते २००० या कालखंडात अनेक प्राणिकथा लिहिल्या गेल्या. त्याद्वारे मुलांचे मनोरंजन तर झालेच त्याशिवाय, नीतीबोध, उपदेशही मुलांना केले गेले.

'परीकथा' या मुख्यतः पाच ते सहा वयोगटांवरील मुलांसाठी लिहिल्या गेल्या. मुलींना परीकथांचे आकर्षण होते. 'परीकथा' या काल्पनिक रीतीने रंगवून सांगितल्या गेल्या, त्याचबरोबर मुलांना आनंद मिळेल व त्यांच्यावर संस्कार होतील अशा रीतीने परीकथांची मांडणी केली गेली. परीकथांच्या लेखनावर बहुतांश पाश्चात्य साहित्याचा संस्कृतीचा प्रभाव असल्याचे जाणवते. पऱ्यांचे जग, जादु अशा वेगवेगळया रोमांचक कथा भागांनी देशोदेशीच्या परीकथा घेऊन मराठी बालसाहित्यात लेखिकांनी परीकथा लिहिल्या. मालतीबाई दांडेकर यांनी *मोहनमाळ, परीची बाग* हे परीकथांचे दोन कथासंग्रह लिहिले.

तसेच, वंदना विटणकर यांनी *अनारपरी* हा परीकथासंग्रह लिहिला. सविता जाजोदियांचे *बुटक्यांच्या गोष्टी, परीचे वरदान* ही दोन परीकथांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. ही परीकथांची पुस्तके विशिष्ट वयोगटासाठी लिहिली गेली. काही उल्लेखनीय परीकथा पुढीलप्रमाणे.

*संशोधक जादुगर* (सरिता पदकी), *तळ्यातले रहस्य* (सुशीला चिकटे), *सोनेरी केसांचा मुलगा* (भारती टोळ), *वेताळनगरी आणि साहसी हेमचंद्र* (गिरीजा कीर), *गंधवेडी रातराणी* (मुमताज रहिमतपुरे), *जादुचा पाळणा* (सुशीला मराठे), *चमचम काजवे* (मंदा पाटील).

या सर्व परीकथा खेळकर शैलीत अद्‌भुत, विस्मयकारकतेने लिहिल्या आहेत. नाट्यात्मक रीतीने व सुलभ भाषेतून सहज रसाळपणे लेखिकांनी मुलांना परीकथांचा आस्वाद घ्यायला लावला.

परीकथांच्या जोडीलाच कल्पनारम्य कथाही पश्चात्याच्या अनुकरणाने मराठीत लिहिल्या गेल्या. ताराबाई मोडक यांनी *सवाई विक्रम* व *जादुचा घोडा* ही दोन पुस्तके लिहिली. प्रभा जोशी यांनी बोधपर कथालेखन केले. *रत्नमाला व इतर गोष्टी, राणीचा रत्नहार* हे त्यांचे कल्पनारम्य कथासंग्रह. पाश्चात्य कथा कल्पनेच्या आधारे शांता शेळके यांनी *लिली* हा कथासंग्रह लिहिला. तर कल्पनारम्य कथासंग्रहात उल्लेखनीय कथासंग्रह म्हणजे डॉ. लीला दीक्षित यांचे *सुमनकथा* व *श्रीफल* हे दोन कथासंग्रह होय. कल्पनारम्य कथालेखनामध्ये आनंदीबाई शिर्के, मालती दांडेकर, ललिता बापट, इंदुमती अरकडी, आशा भाजेकर, गिरीजा कीर, लीला दीक्षित या लेखिका १९५० ते २००० या काळात अग्रगण्य होत्या.

पौराणिक कथालेखन हे प्रारंभापासून लेखिकांनी बालसाहित्यात आणले व १९५० नंतरही पौराणिक कथालेखनाची परंपरा सुरू राहिली. विविध व्रतवैकल्यांच्या कथा नलिनी देवळेंनी लिहिल्या. *व्रतांच्या कथा* हे त्यांचे पुस्तक प्रसिद्ध झाले. तसेच, वंदना पोंक्षेनी *गजगौरीच्या व्रतांची* कथा लिहिली.

रामायणातील कथांचा वैचारिक दृष्टीने विचार करून सुमती पायगावकर यांनी *संपूर्ण रामायण दाशरथी* हा कथासंग्रह लिहिला. तर राम अंजनी कथेवर आधारित *रक्त आणि दूध* ही कथा योगिनी जोगळेकरांनी लिहिली. भागवताच्या आधारे *सोन्याची नगरी* हे कथांचे पुस्तक कमलाबाई टिळकांनी लिहिले. शिशुगटातील मुलांना आवडतील अशा कथा संध्या मुधोळकर यांनी *श्रीकृष्णाच्या गोष्टी* या पुस्तकात लिहिल्या. पुराणातील उद्बोधक कथा भाग घेऊन व मुलांच्या मनावर संस्कार करण्याच्या हेतूने उषा परांडे यांनी *श्रीमद्भागवत कथा* हे पुस्तक प्रकाशित केले. श्रीकृष्ण व इतर भागवतातील व्यक्तिरेखांच्या आधारे त्यांनी उपरोक्त ग्रंथ प्रकाशित केला. दुष्यंत शकुंतला या पौराणिक व्यक्तिच्या जीवनातील कथा

कोमल नाईक यांनी *हरवलेली अंगठी* या पुस्तकात प्रसिद्ध केल्या.

पौराणिक कथांप्रमाणेच बालसाहित्य लेखनात स्त्रियांनी ऐतिहासिक कथा व चरित्रकथा लिहिल्या. पण इतर कथाविषयांच्या तुलनेने लेखिकांनी ऐतिहासिक कथा कमी प्रमाणात लिहिल्या. भारत, अरेबिया, रशिया, चीन, जपान, नॉर्वे या सारख्या *नऊ देशांच्या नऊ कथा* या कथासंग्रहात लिहिल्या. श्यामल शिरोळकर यांनी मुलांवर संस्कार करणाऱ्या कथा लिहिल्या. इतिहासातील उल्लेखनीय स्त्रियांच्या आदर्श कर्तुत्वाची ओळख करून देण्यासाठी श्यामला शिरोळकर यांनी *आईच्या आठवणी* हे पुस्तक लिहिले. *पराक्रमी स्त्रिया* या पुस्तकातून अहिल्याबाई, चाँदबिबी, राणी लक्ष्मीबाई, राणी चन्नमा या स्त्रियांच्या पराक्रमाची कथानके आशा परूळेकर यांनी चित्रित केली आहे. तसेच *भारतीय वीरांगना* या पुस्तकात रझिया सुलतान, सुंदरा, शरण कौर अशा स्त्रियांच्या कथा आशा परूळेकरांनी लिहिल्या. अनुराधा गुरव यांनीही भारतीय स्त्रियांच्या पराक्रमाच्या कथा *पणती जपून ठेवा, एकेकाळच्या आम्ही बालिका* या पुस्तकातून लिहिल्या. ऐतिहासिक स्त्रियांच्या कथाबरोबर इतर ऐतिहासिक पराक्रमी पुरुष, ऐतिहासिक घटना यावरही कथालेखन केले गेले. नयनतारा देसाई यांच्या पासून स्त्रियांच्या पराक्रमाबरोबर इतर कथाविषय हाताळण्यास सुरूवात झाली. नयनतारा देसाईंनी *साडेतीन शहाणे, संचित व चतुर नाना* हि तीन पुस्तके लिहिली. त्यांची ही पुस्तके पेशवाईतील पराक्रमी पुरुषांची व्यक्तिचित्रे आपल्या कथांद्वारे रेखाटतात. पेशवाईतील नावाजलेल्या पुरुष मंडळीची व त्याच्या कार्याची उत्तम रेखाटन नयनतारा देसाईंनी केले आहे. त्यामुळे ऐतिहासिक कथा लिहिण्यास नयनतारा देसाईचे नाव अग्रगण्य आहे. औरंगजेब, राणा प्रताप या ऐतिहासिक व्यक्तिरेखेच्या आधारे शैलजा काळे यांनी कथा लिहिल्या. स्वातंत्र्ययुद्धात ज्या-ज्या क्रांतीकारांनी, देशभक्तांनी जी कामगिरी केली, आपल्या प्राणांची आहुती दिली अशा हुतात्म्यावर देशभक्ती कथा लीला दीक्षित यांनी *क्रांतिकारकांच्या कथा* या पुस्तकात लिहिल्या आहेत. तर जागतिक राजकारणाचे रंग पालटणारी घटना म्हणजे जर्मनीतील जॉर्जिया ऑगस्टा विद्यापीठाची ढासळणारी शिक्षण परंपरा व जॉर्जिया ऑगस्टा विद्यापीठाचा सुवर्णकाळ याचे वर्णन पद्मा फाटक यांनी *एक होती विद्यानगरी* या कथेत केले आहे. अरुणा ढेरे यांच्या *ही गंगेपरी पवित्र कथा, अग्नीतून झळाळले सोने, जेव्हा सम्राटही सतीपुढे नमतो* या उल्लेखनीय कथा आहेत. *जीवन त्यांना कळले हो* ही अरुणा ढेरेंची चरित्रकथा होय. *शील हे कवच जीवनाचे, कुमार कथासंग्रहे* हे अरुणा ढेरेंचे बालऐतिहासिक कथासंग्रह होय.

१९५० ते २००० या कालखंडात मुलांच्या मनोरंजनासाठी चातुर्यकथाही लिहिण्यात

आल्या. चातुर्यकथा या मुलांच्या अधिक जवळच्या होत्या. त्यामुळे त्यांचे मनोरंजन तर होतच होते. त्याचबरोबर त्याच्यामधील चौकसपणा, हजरजबाबीपणा हे गुणविकसित होत गेले. बालसाहित्य लेखनात चातुर्यकथांचे लेखन तारा चौधरी यांनी अत्यंत सोप्या व खुसखुशीत विनोदी शैलीत केले. *चतुर बिरबल, तेनालीराम* ह्या चतुर, बुद्धिवान व्यक्तींवर चातुर्यकथा बहुतांश प्रमाणात लिहिल्या गेल्या. ज्ञानदा नाईक यांनी नसरुद्दीनच्या चातुर्यकथा लिहिल्या. त्यांनी नसरुद्दीनच्या निवडक कथा *नसरुद्दीन मुलाच्या गोष्टी* या पुस्तकातून प्रकाशित केल्या. तर कमलाबाई टिळकांनी इटलीतील व्हेनिस शहरातील अँतोनिओ बॅसानिओ हा धनाढ्य व्यापारी व त्याचा मित्र शायलॉक या सावकार व बॅसानिओची हुशार पत्नी पोर्शिया यांच्यावर आधारित *फक्त पौंडभर मांस* ही कथा लिहिली.

मुलांना लहानपणापासून राजा-राणीच्या कथा ऐकायला आवडतात. राजा-राणीची प्रेम कहाणी, बुद्धिवान राजा, मुर्खराजा या सारख्या विषयांच्या कथा मुलांच्या मनोरंजनासाठी व त्यांना बोध घडवण्यासाठी काही लेखिकांनी लिहिल्या. *एका आळशी राजाची गोष्ट* लीला पाटील यांनी *आळशी राजाचे डोळे उघडले* या शीर्षकाच्या कथेत लिहिले. तर सविता जाजोदिया यांनी राजकुमार व राजकन्या यांच्यावर कथा लिहिल्या. *कुंडलपूरचा जादूगार व जादूची नगरी, माणिकमोत्याचे सोनेरी कालवण* या सविता जाजोदियांच्या उल्लेखनीय कथा. तसेच, मंदा पाटील यांच्या *शिकार, उदार वीरेंद्र* या कथाही साहसी राजकुमारावर आधारित आहेत. मंदा खांडगे यांनी १९५० ते २००० या काळातील उल्लेखनीय चातुर्यकथा लेखिकांनी सांगितल्या आहेत. त्या पुढील प्रमाणे “शरदिनी मोहिते – *‘खरबुजा राणीची गोष्ट’*, सरिता वैद्य – *‘गर्वाचे घर’*, हेमा नरगुंदे – *‘भोळी पर्वती’*, मुमताज रहिमतपुरे – *‘मी माझ्या नशिबाची’* ” ६. आपल्या राज्यातील माहिती मिळविण्यासाठी राजा वेळ बदलून राज्यात फिरतो व नंतर आपल्या राज्यातील मदतगार म्हातारीचा सत्कार करतो अशा कथानकाची कथा रेचल गडकर यांनी *राजकन्या मोनिका* या शीर्षकाने लिहिली. राजाराणीच्या गोष्टीमध्ये सुमती क्षेत्रमाडे यांच्या *मणिदीप* हा संग्रह लिहिला. यात मणिदिपांपैकी मातृगुप्त चंद्रापीड प्रवरसेन व मेघवाहन अशा काश्मिरी इतिहासातील आदर्श राजांच्या कथा उपरोक्त पुस्तकात सुमती क्षेत्रमाडेंनी लिहिल्या. पण आजच्या आधुनिक काळात राजा-राणीच्या गोष्टी लिहिण्याचे प्रमाण कमी झाले आहे.

राजाराणीच्या गोष्टी लिहिण्याचे प्रमाण १९५० ते २००० या कालखंडात कमी झाले असले तरीही या काळात विज्ञान व पर्यावरणाच्या प्रगतीचे पडसादही बालकथालेखनात दिसतात. मुलांना वैज्ञानिक गोष्टी कळाव्या, विज्ञानाबद्दल त्यांना आकर्षण वाटेल या

उद्देश्याने शांता देशपांडे यांनी *सुलभ विज्ञानमाला* लिहिली. वैज्ञानिकांची चरित्रे व वैज्ञानिक प्रयोग याविषयी शांता देशपांडे यांनी मुलांसाठी *शास्त्रज्ञांच्या सत्यकथा : भाग ४, विज्ञानाचे शिल्पकार : भाग ३* ही पुस्तके लिहिली. विज्ञानातील कथारंजकतेने सांगणाऱ्या व विज्ञानाचा आणि मानवी जीवनाचा एकमेकांशी असलेला संबंध शांता पेंडसे यांनी *गगनाला गवसणी, शास्त्रज्ञांच्या सत्यकथा : भाग १ ते ४, विज्ञानाचे शिल्पकार : भाग ३* हे कथासंग्रह लिहिले. कुमारवयातील मुलांसाठी शैला नानोटकर यांनी *विज्ञानाच्या पाऊलखुणा १ व २* हे पुस्तक लिहिले. यात त्यांनी मुलांना समजतील, त्यांना आकलन होईल अशा वैज्ञानिक प्रयोगांचा आधार घेऊन सुलभ अशा कथा लिहिल्या आहेत. तर शास्त्रज्ञांच्या व त्यांच्या शोधांच्या कथा नंदिनी थत्ते यांनी *शोधांच्या जन्मकथा* पुस्तकात लिहिल्या. त्याचप्रमाणे हम्प्रेडेव्ही, मायकेल फॅरेडे, गुटेनबर्ग यांच्याही शोधांच्या कथा *विज्ञानातील ज्ञानेश्वर* या पुस्तकात पुष्पा मेढेकर यांनी प्रकाशित केले. अँथनी ल्युवेनहोएक, लाप्तारो सॅपलझिनी, लुई पाश्चर, रोनाल्ड रॉस, बॅरिस्टा ग्रासी अशा संशोधकांच्या शोधाच्या कथा मृणाली ढवळेकर यांनी *दृष्टीआडची सृष्टी* या कथासंग्रहात विज्ञान कथा लिहिल्या. काल्पनिक वैज्ञानिक कथालेखनात रेखा बैजल यांनी उत्तम कामगिरी केली आहे. *अंतरिक्षातील शेजारी, आदर्श लक्षधिश* हे रेखा बैजल यांचे काल्पनिक विज्ञानकथासंग्रह होय.

विज्ञानकथा लेखनाबरोबरच पर्यावरण विषयक कथाही १९५० ते २००० या कालखंडात लिहिल्या गेल्या. वेताळ व राजा विक्रमादित्य यांच्या आधारे अनुराधा फाटक यांनी *वेताळाच्या पर्यावरण कथा* या कथासंग्रहात पर्यावरणाचे महत्त्व मुलांना पटवून दिले आहे. त्याचप्रमाणे जंगलतोड विषयक प्रश्न मालती कुलकर्णी यांनी *लाकुडतोड्याच्या* कथेत सांगितले आहे. पर्यावरणविषयक कथालेखनात मृणालिनी ढवळे (*विज्ञानदेवीची कहाणी*), इंदिरा कुलकर्णी (*वृक्ष मित्र*), इत्यादी कथासंग्रहात पर्यावरण व पर्यावरणाचे महत्त्व, वृक्षारोपणाचे महत्त्व, पर्यावरण व मानवी संबंध याचे चित्रण लेखिकांनी करण्याचा प्रयत्न केला आहे.

साहसकथा या नेहमीच मुलांना भुरळ घालत असतात. साहसकथा मुलांना नकळतपणे साहसी बनवत असतात, त्यांच्या बालमनावर संकटांना कशाप्रकारे धीराने तोंड दिले पाहिजे अशा प्रकारचे छोटे मोठे संस्कार घडवत असतात. १९५० ते २००० या कालखंडात शैलजा राजे, सरिता वैद्य, शकुंतला फडणीस, मंदा खांडगे, लीला दीक्षित, सुधा पेठे अशा विविध लेखिकांनी साहस कथालेखन केले. पण लेखकांच्या मानाने लेखिकांनी लिहिलेल्या साहसकथा कमीच होत्या.

शैलजा राजे यांनी *गुप्तहेर क्षितीज* या कथासंग्रहात साहसकथा लिहिल्या. क्षितीज नावाचा मुलगा कशाप्रकारे हारालू या गुप्तहेराला पकडतो ते उपरोक्त कथासंग्रहातील कथेत सांगितले आहे. तसेच लीला पाटील यांनी *चिमुरडीची बहादुरी* ही कथा लिहिली. सरिता वैद्य (*वीरबाला*), आशा भाजेकर (*बिज्जी*), लीला दीक्षित (*पद्याचा पराक्रम*), आशा भाजेकर (*बांदुल्याच्या साहसाची कथा*), शकुंतला फडणवीस (*शेवंती, बिरजू परत येतो*), गिरीजा कीर (*झंप्या द ग्रेट*), मंदा खांडगे (*भिवा*), सुधा पेठे (*एकाकीपणाचा क्रूस, रक्त गोठवणारी पहाट, होरपळलेली स्वप्ने*) इत्यादी लेखिकांच्या कथा साहसकथेत अग्रगणी व उल्लेखनीय आहेत. साहसकथा संदर्भात मंदा खांडगे लिहितात की, "साहस ही तर मुलांची सहजप्रवृत्ती; तिला चेतना देऊन मुलांमधील ही प्रवृत्ती वाढवून तिची जोपासना करण्याचे काम या अशा कथा नक्कीच करतील." ७

परीकथा, साहसकथा, कल्पनारम्यकथा या प्रकारच्या कथा ह्या ठराविक वयोगटापुरत्या मर्यादित होत्या. पण जसजसे मुलांचे वय वाढत जाते तसतसे मुलं कल्पनारम्य जगातून बाहेर पडत असतात. त्यांचे मन परिपक्व बनते. त्यांच्या बुद्धिचा विकास होत असतो. समाजातील वास्तव घटनाबाबत ते आकर्षित होत असतात. मुलांच्या याच मानसिकतेचा विचार करून बालसाहित्यात वास्तवकथांचा जन्म झाला. बहुतांश लेखिकांनी बालसाहित्यात वास्तव कथालेखन केले. वास्तव जीवनातील घटना, लोकांची मानसिकता, नात्यातील संबंध या व अशा अनेक विषयांवर वास्तवकथाद्वारे प्रकाश टाकला गेला. अनुराधा वैद्य *नवी आई, मिठू मिठू पोपट* या वास्तवकथात 'भूतदया' हा विषय सहज सुंदरतेने हाताळतात. तर कोकणातील वातावरणाचे दर्शन, तेथील संस्कृतीचे दर्शन व मुलांवर चांगले संस्कार घडवणे यासाठी डॉ. लीला दीक्षित यांनी अनेक कथासंग्रह लिहिले. *लाखाचे बक्षीस, अक्षय शिदोरी, नाच रे मोर, कुशल, सागरसूर* ह्या त्यांच्या प्रसिद्ध कथा आहेत. तसेच एकूण बावीस कथासंग्रह त्यांनी लिहिले. *आजीची गोधडी* या कथेत लीला दीक्षितांनी नातवंडे व आजीची कथा सांगितली आहे. *मयुराची गोष्ट, वंडरबॉय* हे आशा भाजेकर यांचे कथासंग्रह. मुलांच्या मानसिकतेचा विचार करून आशा भाजेकर यांनी विविध वास्तवकथा लिहिल्या. *जगावेगळी आजी, मदतीचा हात, घर माझे कौलारू, मधू आणि मिनी, रेशीमगाठ, अनवाणी* या आशा भाजेकर यांच्या उल्लेखनीय वास्तवकथा आहेत. वास्तवकथा लेखनातील लेखिका व त्यांच्या कथा पुढीलप्रमाणे – शकुंतला फडणवीस – *माठ आणि माठ,* मीना मिटावलकर – *संगणकाची चूक, वेळेचे महत्त्व, वाढदिवस,* लक्ष्मी गोडाम

– *हृदयपरिवर्तन,* शुभदा साने – *मजेचा तास,* हेमलता धारवाडकर – *दृष्टीसमोर सृष्टी, पाऊले चालती,* डॉ. लीला पाटील – *बिरू,* माधुरी भिडे – *आम्ही चांगले होणार,* ऋतुजा पितळे – *गोष्ट कानाओठांची,* उज्ज्वला केळकर – *संगुची स्वप्ने,* मीनाक्षी सरदेसाई – *एप्रिलचे मुर्ख,* वासंती जोशी – *श्रीमंत कुंभार,* रजनी हिरळीकर – *दिनूमामा आणि पंढरी फुले,* विनया साठे – *गुड बाय छोट्या मित्रा,* शैलजा काळे – *किमया, ठोंब्या, सभागृह, वाटाड्या,* श्यामला कुलकर्णी – *मैत्रीण, आजी परत येते, अनु टेलिफोन करत,* सुलोचना लिमये – *उंटावरची शहाणी, देव तारी त्याला कोण मारी,* मंदा खांडगे – *माकडवाला जगू, दोडी, मामाचा वाडा, चिरेबंदी,* मीनाक्षी सरदेसाई – *पेरुवली आजी, मिनूची आजी,* अनुराधा गुरव – *शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ, नवी पंढरीची वाट,* सुशीला मराठे – प्रकाशाची स्वप्ने, साहसी लखू, तारा कुलकर्णी – आजोबा दत्तक घेणे आहे, कल्पना, कविता मेहंदळे – सोनचाफा, लिनी पाटील – गोष्टी गमतीच्या, शैलजा जोशी – एकदा काय झाले, शकुंतला बोरगावकर – अनमोल गोष्टी, थेंबे थेंबे तळे साचे, प्रतिमा इंगोले – करारी आजीचे व्यक्तिचित्र, योगिनी जोगळेकर – स्वातीचे शिंपले, मंगला गोडबोले – नीरु आणि नेहा, मुक्त पेडणेकर – पाहे प्रसादाची वाट, सुमन फडके – झोपाळू चिंगा, सरिता वैद्य – मुलांना वर्गात सांगायच्या गोष्टी, वासंती इनामदार – आचरणाचे तेज, सुखाचा मंत्र.

ह्या १९५० ते २००० या कालखंडातील वास्तवकथा लेखन करणाऱ्या काही लेखिका व त्यांच्या कथा होय. या लेखिकांनी वास्तव जीवनातील सर्व विषयांना स्पर्श केल्याचे जाणवते. आजी-आजोबा यांचे घरातील नातवंडांच्या मनातील स्थान, लहान मुलांमधील परोपकारी वृत्ती, लहान मुलांची स्वभाव वैशिष्ट्ये, मूक-बधिर मुले, साहसी मुले अशा प्रकारच्या विविध विषयांना स्पर्श करण्याचे काम लेखिकांनी केले. मुलांच्या बालमनावर संस्कार घडवण्याच्या उद्देश्याने अशा विषयांचे लेखन झाले असावे. १९५० नंतरच्या वास्तवकथा संदर्भात मंदा खांडगे म्हणतात “एकोणीसशे पन्नासनंतरच्या पुढच्या दोन दशकांपर्यंतची वास्तवकथा तर बव्हंशी बोधकथाच वाटावी अशी मांडणी आणि कथेची प्रकृती दिसते. पुढील दोन दशकांत हीच कथा उपदेशाच्या कचाट्यातून सुटलेली दिसते.”[८] या कालखंडात बालकथांना बहर आलेली दिसून येते. मुलांच्या पसंतीस पडतील असे विविध

विषय निवडून अनेक लेखिकांनी बालकथेचा प्रांत समृद्ध केला असल्याचे दिसून येते.

**बालकादंबरी**

कविता, कथांप्रमाणेच कादंबरी हा वाङ्मयप्रकारही बालसाहित्यातील वैशिष्ट्यपूर्ण वाङ्मयप्रकार आहे. प्रारंभ ते १९५० पर्यंत काही मोजक्याच लेखिकांनी कादंबरी हा प्रकार हाताळला. पण १९५० नंतर वास्तवपूर्ण कादंबरी लेखन होऊ लागले व बालकादंबरी हा प्रकार वाचनीय ठरला. अनेक लेखक, लेखिकांनी आकर्षकपणे कादंबरी लेखन केले.

१९५० ते २००० या कालखंडातील बालकादंबरी लेखनात लेखिकांचा विचार करता मालतीबाई दांडेकरांचे नाव सर्वप्रथम घेण्यात येते. विविध जातीधर्मातील मागासवर्गीय लोकांचे वास्तवपूर्ण चित्रण मालतीबाईंनी आपल्या कादंबऱ्यातून केले आहे. *दगडातून देव, अंधारातील तारे* ह्या मालतीबाईंच्या उल्लेखनीय बालकादंबऱ्या, मागासवर्गीय लोकांच्या संवेदनाचे दर्शन घडवतात. सामाजिक कादंबरी प्रकारात मालतीबाईंच्या उपरोक्त कादंबऱ्यांचा विचार करता येतो. तसेच चंबळखोऱ्यातील लोक, दरोडेखोर यांच्या जीवनविषयक संस्कृतीचे चित्रण श्यामल शिरोळकर यांनी *चंबळेची मुले* या कादंबरीत केले आहे. श्यामल शिरोळकर व फणी मजुमदार यांनी मिळून भिल्ल जातीतील मुलगा व त्यांच्या हातून चुकून जखमी झालेला पक्षी व त्यामुळे मुलाला किती दुःख होते अशा रीतीच्या कथानकावर आधारित *जा उडुनि पाखरा* ही कादंबरी लिहिली. गावातील संस्कृती, परंपरा, समाज, नातेसंबंध याविषयी सरोजिनी बाबर यांनी *आजोळघरची शाळा* या कादंबरीतून लेखन केले आहे. शरदिनी मोहिते यांनी *गरीबाची पोरं* ह्या कादंबरीतून गरीब श्रीमंत यांच्यातील परस्पर संबंध स्पष्ट करताना समाजाची मानसिकता स्पष्ट केली आहे. तसेच *रमीजा* ही अनाथ मुलाची कथा सांगणारी कादंबरी मुमताज रहिमतपुरे यांनी लिहिली. समाजात वावरत असताना मनुष्य अनेक नातेसंबंध जपत असतो. अशा नात्यातील महत्त्वाचे नाते म्हणजे मैत्रीचे. मैत्रीच्या नात्यातील भावबंध टिपणारी उल्लेखनीय कादंबरी डॉ. लीला दीक्षित यांनी *मैत्री* या नावाने लिहिली. तसेच *टिल्लोजी* ही बालकादंबरीही लीला दीक्षित यांनी लिहिली. *फ्लॅट नंबर दहा* ही शैलजा काळे यांची आधुनिक समाजातील कुटुंबदर्शन घडवणारी कादंबरी. फ्लॅट संस्कृतीमुळे माणसे कशी दुरावत चालली आहे व याचा परिणाम बालमनावर व नव्या पिढीवर कसा होतो हा विषय अत्यंत हिरहिरीने मांडण्याचा प्रयत्न शैलजा काळेंनी केला आहे. ज्ञानदा नाईक यांनी गरीब मुलांची शिक्षणाबद्दल, कामाबद्दल असणारी तळमळ, संकटावर मात करण्याची त्यांची जिद्द या वास्तवपरिस्थितीचे दर्शन *आजीचा गाव* व *झकासमैत्री* या कादंबरीतून केले आहे. तसेच; गरीब, साहसी धाकू ह्या

मुलाची कथा शकुंतला आठवले यांनी *धाकू* या सामाजिक कादंबरीतून लिहिली आहे. तसेच कष्टाळू, मेहनती यशवदा ही मुलगी गावातून शहरात येऊन कशी काम करते यावर रजनी हिरळीकरांनी लेखन केले. *एक होता भिकू* (लीला शहा), *सुमी आणि सोन्या* (अनुराधा वैद्य), *बंधमुक्त (*अनुराधा वैद्य) ह्या सामाजिक विषय हाताळणाऱ्या कादंबऱ्या आहेत.

सामाजिक विषयांबरोबर बालकादंबरी लेखनात लेखिकांनी कौटुंबिक विषयही हाताळले. कुटुंबातील विविध नातेसंबंधाचे, कुटुंबातील व्यक्तींच्या मानसिकतेचे, नात्यातील जिव्हाळयाचे चित्रण कौटुंबिक कादंबरीद्वारे १९५० नंतर अनेक लेखिकांनी केले. मालतीबाईंची *गुलाबकळी* व लीलावती भागवतांची *पांढरा चाफा* ह्या कादंबऱ्या आजी व नात-नातू यांच्या संबंधाचे, संवेदनशील मुलांचे जीवन चित्र रेखाटतात. मुलामुलीचे वाढत्या वयात एकमेकांविषयी असलेले आकर्षण, लग्नाविषयी असणारे कुतूहल या मानसिकतेवर *सोयरीक* ही कादंबरी कुमुदिनी पवार यांनी लिहिली. तसेच, परंपरागत चालत आलेली मुलीच्या जगण्याची स्थिती, कुटुंबातील, समाजातील मुलीला दिलेली वागणूक, आधुनिक काळातही परंपरागत विचारांची मांडणी कशी केली जाते या विषयाच्या आधारे लिहिलेली *जीवनातील ऐश्वर्य* ही कुमुदिनी पवारांची कादंबरी आहे. अशाप्रकारे अनेक लेखिकांनी कुटुंबव्यवस्था व कुटुंबातील व्यक्तिचित्रणे यावर अनेक कादंबऱ्या लिहिल्या. पुढील काही उल्लेखनीय कौटुंबिक बालकादंबऱ्या *पंप्याचे घरकुल* (सरोजिनी वझे व मालती गुप्ते), *वीर बहादूर, वाळवंटातील सफर* (निर्मला दाते),*तळयात मळयात* (सुशीला मराठे), *करारी आजी* (प्रतिमा इंगोले), *आजोबा* (लीला गोळे), *घरकोंबडा* (अश्विनी धोंगडे) या कादंबऱ्यातून मुलांचे घरातील व्यक्तीशी असलेले नातेसंबंध, भावबंध, जिव्हाळा, कुटुंबातील संघर्ष ह्या सगळयाचे नकळत दर्शन होते.

मुलांच्या पराक्रमाच्या, साहसी वृत्तीच्या कथालेखनाबरोबर बालसाहित्यात लेखिकांनी साहस-पराक्रमांच्या कादंबऱ्याही लिहिल्या. *चंदेलीचं साहस, सुनीलकुमार* या मालतीबाई दांडेकरांच्या व *भिंगरी अनं भक्या* ही लीलावती भागवतांच्या कादंबऱ्या साहसी, धाडसी मुलांचे व्यक्तिचित्र रेखाटणाऱ्या आहेत. चौफुली कंपू व त्याचे मित्रमैत्रीण वेगवेगळया संकटांना कशाप्रकारे धीटपणे, युक्तीने सामोरे जातात, हे दाखवणाऱ्या तीन कादंबऱ्या लीलावती भागवतांनी *चौफुली कंपूच्या धाडसी मोहिमा* या नावाने लिहिल्या आहेत. लीलावती भागवतां प्रमाणेच नयनतारा देसाईंनीही *अजब करामत (भाग १ आणि भाग २)* व *साहसी अभिषेक* या दोन कादंबऱ्या लिहिल्या. गिर्यारोहण व त्याविषयी मुलांना असलेली आवड लक्षात घेऊन *हर हर महादेव* ही कादंबरी शैलजा काळेंनी लिहिली.

कोकणातला निसर्ग-पर्यावरण याचे हुबेहूब वर्णन लीला दीक्षित यांनी *धीरु* या कादंबरीतून केले आहे. धीरु या साहसी मुलाची कथा *धीरु* या कादंबरीत सांगितली आहे. गावात नदीला पूर येतो त्यावेळी चतुर, साहसी धीरु गावातील कितीतरी लोकांचे प्राण वाचवतो याविषयी लिहिले आहे. त्याचप्रमाणे मंदा खांडगे यांची *जंगलातलं गुपित,* उषा लेले *धाडसी चीकू,* रेखा बर्वे *अमिताभच साहस, होनाच्या शोधात अमिताभ, अमिताभची शिकार, धर्मसंकटात अमिताभ, अमिताभ मुरूडबाहेर* अशा पाच कादंबऱ्या लिहिल्या. आशा भाजेकर *(अजब गजब मांडली),* आशा कमलंराजाज्ञा (*खसखसपूरचे चार बहादूर),* लीला महाजन *(दरीतला दणका),* सुशीला चिकटे *(तळ्यातले रहस्य, अद्‌भुत ढोलवादक),* मुक्ता केणेकर *(कवीची करामत)* या साहसपर कादंबऱ्या व लेखिका प्रसिद्ध आहे.

मालतीबाई दांडेकरांनी *उदयकुमार आणि कुमार अनिरुद्ध राया अथवा बालमूर्तिकार* या भारतीय संस्कृतीच्या मूर्तिकारांचे दर्शन घडवणारे लेखन केले आहे. मुलांना नीतीमत्तेचा बोध घडवण्यासाठी श्यामल शिरोळकरांनी *भूकंप, मंदिर* या कादंबऱ्या लिहिल्या. आपली संस्कृती, परंपरा, रीतीरिवाज याविषयी महत्त्वपूर्ण लेखन करणाऱ्या लेखिका सरोजिनी बाबर यांनी *भूक लाडू, तहान लाडू, खडीची चोळी, ठेवणीतली पगडी अन जरीकाठी उपरणं,लाडाची लढाई* अशा विविध कादंबरीद्वारे सरोजिनी बाबर यांनी आदर्श भारतीय संस्कृतीचे चित्र रेखाटले आहे. शैलजा राजेंची *देव परतले* ही बालकादंबरीही भारतीय धर्मसंस्कृतीवर आधारित आहे.

बालसाहित्याच्या संदर्भात ऐतिहासिक व्यक्तिचित्रणावर कादंबरी लिहिल्या गेल्या. इतिहासातील महनीय व्यक्तीच्या कार्यकर्तुत्वाचा आढावा घेण्याचा प्रयत्न १९५० ते २००० या कालखंडातील बालसाहित्य लेखन करणाऱ्या लेखिकांनी केला आहे. नयनतारा देसाई यांनी *दुसरा शहाणा, देवाजीपंत चोरघडे, नाना फडणीस, अर्धा शहाणा, दैव जाणिले कुणी वाराणशी बाई* या ऐतिहासिक व्यक्तिचित्रणात्मक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्याचप्रमाणे इतिहासातील महनीय व्यक्तिमत्त्व म्हणजे ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा परिचय करून देण्याच्या उद्देश्याने *साऊ आजी* ही ऐतिहासिक कादंबरी सुमन पाटील यांनी लिहिली. शिवकालीन ऐतिहासिक प्रसंग सगळयाच मुलांना आवडतात. शिवाजी महाराज हे मुलांचे प्रेरणास्थान आहेत. त्यामुळे ह्याचा विचार करून गीता नाईक यांनी *शिवकालीन जासूद बहिर्जीची पराक्रम गाथा* या विषयाचा आधार घेऊन पाच कादंबरी लिहिल्या. *स्वराज्याचा सूर्योदय, राजद्रोह्यांचे शिरकाण, विध्वंसक तोफखाना,*

*आकाशगंगा, दुष्टांचा संहार* या गीता नाईक यांच्या एकाच विषयाच्या पाच कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. तसेच शिवाजी महाराजासोबत स्वराज्य स्थापनेच्यावेळी अनेक पराक्रमी व्यक्तींनी आपल्यापरिने प्रयत्न केले. पण त्या सर्वच व्यक्तींशी मुले किंवा वाचकवर्ग परिचित असतोच असं नाही. त्यामुळे अशा पराक्रमी व्यक्तींची ओळख पटवून देण्याच्या उद्देश्याने नलिनी सहस्त्रबुद्धे यांनी *लयाजी पाटील* या शिवकालीन पराक्रमी व्यक्तिमत्त्वावर *पालखी* ही कादंबरी लिहिली. लीला गोळे यांच्या नावावर *आम्ही किशोर भारताचे* ही कादंबरीमाला आहे.

बालसाहित्यात 'कथा' या वाङ्मयप्रकारात पर्यावरण-विज्ञान विषयक कथालेखनात वैज्ञानिक व पर्यावरणाशी नाते जोडणाऱ्या कथा मोठया प्रमाणात लिहिल्याचे दिसते. आधुनिक काळाशी नाते जोडणारे असे त्यांचे स्वरूप होते. त्याचप्रमाणे बालकादंबरी लेखनातही विज्ञान व पर्यावरण विषयक कादंबरी लेखन झालेले आहे. लीलावती भागवत यांनी निसर्गाशी, पर्यावरणाशी नाते सांगणारी, निसर्गाचे महत्त्व पटवून देणारी *संस्कृतीची शिदोरी* आणि सृष्टीशी जडवू नाते ह्या दोन कादंबऱ्या लिहिल्या. तसेच विज्ञानातील विविध प्रयोग यावर शरदिनी मोहिते यांनी *दिवाफूल* ही कादंबरी लिहिली. तसेच विज्ञानातील शास्त्रांचा, प्रयोगांचा आधार घेऊन कल्पनारम्य अशी कादंबरी नयनतारा देसाईंनी लिहिली. *अवकाशातील दहशतवाद्यांचा कर्दनकाळ– भाग १ ते ४* ही नयनतारा देसाईंची कादंबरी विज्ञानातील नव्या बदलांच्या कल्पना वाचकांसमोर ठेवते. भविष्यकाळात विज्ञानात होणारे बदल व त्यांचा मानवी जीवनावर होणारा परिणाम याचे चित्रण *परकीय दहशतवाद्यांचा अवकाशातील कर्दनकाळ* या कादंबरीत गीता नाईक यांनी केले आहे. तसेच जात, धर्म, प्रांत, राष्ट्र यावर *आकाशगंगा* ही कादंबरी गीता नाईक यांनी लिहिली. खगोलशास्त्र या विज्ञानातील शास्त्राचा आधार घेऊन मीना शेटे यांनी *रिपेक्स* ही कादंबरी लिहिली. मंगळग्रहावरील प्राण्यांनी पृथ्वीवर हल्ला केला आणि त्या हल्ल्याचा परतवा पृथ्वीवरील माणसांनी कशा प्रकारे केला या कल्पनेचा आधार घेऊन *परग्रहावर विजय* ही कादंबरी वर्षा गजेंद्र गडकरांनी प्रकाशित केली. 'हॅम' या शास्त्रज्ञांच्या चरित्राचा आधार घेऊन नंदिनी थत्ते आणि सुधीर थत्ते यांनी मिळून *हॅलो, मी हॅम* ही कादंबरी लिहिली. पर्यावरणाचे महत्त्व सांगताना आशा भांड यांनी *माणूस बोलू लागला* ही कादंबरी लिहिली. सोमनाथ हा कादंबरीतील नायक आपल्या ओसाड पडलेल्या गावाचे वृक्षारोपण करून वृक्षारोपणाचे महत्त्व सांगून कसे हिरव्यागार गावात रुपांतर करतो या कथानकाला अनुसरून आशा भांड यांनी उपरोक्त कादंबरी लिहिली. 'मोरा' विषयीची माहिती मुमताज रहिमतपुरे यांच्या

*देवपाखरू* या कादंबरीतून मिळते. तर जंगलतोडीमुळे होणारी निसर्गाची हानी यावर सुनिता नागपूरकर यांनी *कांचनवनची जिद्दी मुलं* ही कादंबरी सुलभ भाषेत वाचकांसमोर ठेवली. निसर्गातील प्राणी, पक्षी, झाड-झुडपे यांच्या आधारे निसर्ग मानवी जीवन कसे सुखकर करतो. या विषयाची दखल मानसी हजेरी यांनी घेतली आहे. *निसर्गराजा* ही निसर्गाचे महत्त्व सांगणारी मानसी हजेरीची कादंबरी होय. त्याचप्रमाणे, समाजात चालणारे गैरव्यवहार, अंधश्रद्धा, जानवरांची केली जाणारी शिकार, विज्ञानातील प्रगती अशा अनेक विषयांवर कादंबरी लेखन केले. मृणालिनी ढवळे *(दृष्टीआडची सृष्टी),* शरदिनी मोहिते *(आकाशवेलीची फुले),* सुमती इनामदार *(कुंतल आणि कौस्तुभवाडी),* लीला बावडेकर *(पाठलाग),* कुमुदिनी पवार *(नाते),* वसुंधरा पटवर्धन *(जयंतच्या गोष्टी),* ललिता बापट *(इकड्च तिकड्च, हरवलेला अर्धातास)* ह्या काही कादंबऱ्या उपरोक्त विषयाला अनुरूप अशा आहेत.

मुलांचे मनोरंजन करण्याच्या उद्देश्याने कल्पनारम्य अशा कादंबऱ्यांचे लेखन झाले. मुलांचे आनंदविश्व हे छोट्या छोट्या गोष्टीत लपलेले असते. फुला-पानात, पक्ष्यात, निसर्गातील वास्तवातील लहान लहान वस्तूशी त्यांचे नाते असते. याचा विचार करूनच १९५० ते २००० या कालखंडातील लेखिकांनी मुलांच्या मनाला आनंद देणाऱ्या गोष्टीचा आधार घेऊन कल्पनारम्य कादंबऱ्या बालवाङ्मयात लिहिल्या. सुमती पायगांवकर यांनी मुलांचे मन जाणून *फेनाली, चाफ्याची फुले, हिमाली* या कादंबऱ्या मुलांच्या पसंतीस पडतील अशा सहजसुलभ भाषेत लिहिल्या. तर सरिता वैद्य व सई परांजपे यांनी मुलांना खेळण्यात आनंद वाटतो हे जाणून *मदतीचे हात, बंड्या प्रधान, मधूराणी* (सरिता वैद्य), *हरवलेल्या खेळयांचे राज्य* (सई परांजपे) ह्या कादंबऱ्यांचे लेखन केले. हुशार शेतकरणीची कथा सुवर्णा काळेंनी *एकेकाळच्या आम्ही बालिका* या कादंबरीत सांगितली आहे. तर मुलांना गोष्टीचे वेड असते हे लक्षात घेऊन निर्मलादेवीनाईक-निंबाळकर यांनी *गोष्टीच्या राज्यात शुभा* ही कादंबरी लिहिली. शुभा ह्या नायिकेला विविध गोष्टी ऐकण्यात रस असतो आणि अशी ही शुभदा एकदा गोष्टींच्या राज्यात जाते. तेथील अनुभव घेते. असे कथानक निर्मलादेवींनी उपरोक्त कादंबरीतून मांडले आहे. निर्मलादेवी नाईक निंबाळकरांप्रमाणे मंदा खांडगे यांनी *खेळण्यांच्या राज्यात* या कादंबरीत खेळण्याच्या भावभावना टिपण्याचा प्रयत्न केला आहे. *सात रंग सात सूर* ही कादंबरी शैला लोहिये यांनी मुलांच्या सर्वांगीण विकास व मनोरंजन करण्याच्या उद्देश्याने लिहिली. मीनाक्षी सरदेसाईची *बंटू मुंबईला जातो,*

*हरवलेल्या बाळाची गोष्ट* ह्या कादंबऱ्याही निसर्ग व प्राणी जीवनावर आधारित आहेत. तर विजया वाड यांनी स्पायडरमॅन व मुले याच्यावर गंमतीशीर कादंबरी *टिंकूटिंकलया* शीर्षकाने प्रसिद्ध केली. तसेच कल्पनेच्या आधारे *अद्‌भुत जगाच्या सफरीवर* ही कादंबरीही विजया वाड यांनी आकर्षकरित्या वाचकांसमोर ठेवली. अशा रीतीने अनेक लेखिकांनी बालकादंबरी लेखन करून १९५० ते २००० या काळात बालकादंबरीचा प्रांत समृद्ध केला.१९५० पूर्वी काही मोजक्याच प्रमाणात बालकादंबरी लेखन केले गेले. पण १९५० नंतर विषयांचे वैविध्य घेऊन उत्तम दर्जाची बालकादंबरी लिहिण्यास लेखिका यशस्वी ठरल्या.

**बालनाटक**

बालसाहित्यात कथा, कविता, कादंबरी लेखन १९५० नंतर मोठया प्रमाणात हाताळण्यात आले. त्याबरोबरीने काही प्रमाणात नाटक, एकांकिका, चरित्रे हे वाङ्मयप्रकारही लेखिकांनी हाताळले. बालसाहित्याच्या प्रारंभ काळात हातावर मोजली जातील एवढीच बालनाटके लिहिली. पण १९५० नंतर बालनाटकात भर पडत गेली. त्यामुळे १९५० नंतर व्यावसायिक बालरंगभूमीसाठी नाटके व शालेय रंगभूमीसाठी नाटके अशा दोन भागात नाट्यलेखन सुरु झाले.

सई परांजपे यांनी *पत्तेनगरी, शेपटीचा शाप, झाली काय गंमत, ढेकूण, पक्ष्यांचे कविसंमेलन, भटक्याचे भविष्य* अशा शीर्षकांची नाटके मुलांच्या सादरीकरणाकरता लिहिली. सई परांजपेची नाटके ही बालमनाचा वेध घेणारी आहेत. तसेच, विनोदी शैलीत बोधपर, उपदेशपर लेखन सई परांजपेंनी आपल्या बालनाटकांतून केले आहे. तर सई परांजपे प्रमाणेच व्यावसायिक बालनाट्य संस्थेची स्थापन सुधा करमरकर यांनी केली. या संस्थेमार्फत सुधा करमरकर यांनी दोन पुस्तके संपादित केली. *बालरंगभूमी भाग १ व बालरंगभूमी भाग २* या सुधा करमरकर संपादित पुस्तकात अनेक लेखिकांनी नाटके लिहिली. कल्पना आगाशे *(हा नाद सोडसोड)*, इंदुमती गोखले *(प्रतिज्ञा),* उषा कुलकर्णी *(कसोटीचा क्षण),* मृण्मयी बारपांडे *(कृष्णाचा दादा)* ह्या व यासारख्या अनेक लेखिकांनी *बालरंगभूमी भाग १ व २* मध्ये नाट्यलेखन केले.

प्रतिभा निमकर या लेखिकेने *पंखाविना पाखरू, जीवनदान, मला न्याय हवा* अशी तीन नाटके लिहिली. मुलांच्या मनावर संस्कार करणारी त्यांची नाटके आहेत. मृण्मयी देशपांडे यांनी मुलांचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून विशद करून मोठ्यांनी लहानांशी कसे वागावे हे सांगणारी पाच नाटके लिहिली. *लाखाची गोष्ट, कोडगी, भित्यापाठी ब्रम्हराक्षस, स्पॉटीमनी*

*वा!, गोष्ट एका सुशीची* ही मृण्मयी बारपांडेची पाच नाटके. त्याचप्रमाणे शालेय विद्यार्थ्यांच्या हितासाठी, त्यांच्या मनोरंजनासाठी, शैक्षणिक दृष्टीकोनातूनही *ठोंब्या, सत्यकाम, जाबाल* ही तीन नाटके लिहिली आणि *चांदण्यांचे दागिने* हे काव्यमय नाटकही मृण्मयी बारपांडेनी लिहिले. पुराणातील देवदेवतांच्या आधारे समाजात चाललेली अनीती यावर बोट ठेवण्याचे काम *ग रे गणपतीचा, द रे देवाचा* या नाटकातून वैजयंती पेठकरांनी केले. संत ज्ञानेश्वरांचा लोकांनी केलेला छळ, समाजातून त्यांना व त्यांच्या भावंडांना दिलेला त्रास या ज्ञानेश्वरांच्या जीवनावर आशा सुतार यांनी *संन्याशांची पोरं* हे नाटक लिहिले. घरातील सगळयांची काळजी घेणारी ही आईच असते. आई ही घरातील प्रत्येक सदस्यांची काळजी घेते खास करून आपल्या मुलांची पण बहुतेकवेळी मुले मस्ती करतात, आईचं ऐकत नाही या कारणामुळे जर आई संपावर गेली तर काय परिस्थिती होईल? तसेच, आई मुलांना काम सांगते म्हणून मूले रागावतात, निराश होतात. या आशयाला अनुसरून मनीषा बर्वे नी *संप* व शैलजा काळेंनी *आईची हुकुमशाही नष्ट करा* ही नाटके लिहिली. प्रमिला परांजपे यांनी *आम्ही पऱ्या आकाशीच्या*, मीनाक्षी सरदेसाई *मडक्यांमध्ये दडलंय काय?*, डॉ. विजया वाड *चिंगू चिंगम बबली बबलगम, गमत्या गुड्डू, मिनी मंगळवार* असे विविध विषय लेखिकांनी नाटकाद्वारे मांडले. १९५० नंतरच्या बालनाट्य लेखनात गिरीजा कीर यांनी प्रबोधनपर नाट्यलेखन केले. *एक अर्ज आहे बाप्पा आणि इतर नाटिका, ए बम्बैकि रानी देखो आणि इतर नाटिका, झालाच पाहिजे व इतर नाटिके* ही गिरीजा कीर यांची नाटके होय. १९५०-२००० या कालखंडात शकुंतला फडणवीस सारख्या लेखिकेने बालसाहित्यात रहस्यप्रधान नाटकेही लिहिली. *आत कोण आहे?* ही शकुंतला फडणवीसांचे रहस्यप्रधान नाटक होय. तसेच, *राजाला सदरा हवाय* हे नाटकही शकुंतला फडणवीसांनी लिहिले. जयश्री गोडसे, सुशीला वाडीकर, उज्ज्वला केळकर, इंदुमती जोंधळे, विनीता पिंपळखरे, सुमती इनामदार या लेखिकांनीही १९५० नंतरच्या बालनाट्य लेखनात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

तसेच, यंत्रमानव हुंडाबळी शालेय जीवनातील विद्यार्थ्यांच्या समस्या अशा आधुनिक विषयांवरही नाट्यलेखन झालेले दिसते. नीता भट्टे *(जाइचा माणूस अर्थात अज्यात मज्यात ऑटोच्या राज्यात)*,उषा कुलकर्णी *(रोबो येतोय)*, सुमती गांधी *(गीता गोपाळ रोबोच्या प्रदेशात, गीता गोपाळ लोककथांच्या राज्यात)*, शरदिनी मोहिते *(हे दुखतंय अन ते दुखतंय)*, मुमताज रहिमतपुरे *(किती दिवस)*, वंदना विटणकर *(रॉबिनहुड)*, कुंदा पारसनीस *(राजकन्येचा वाढदिवस)* ही नाटके यंत्रमानवाचा विषय बालवाचकांसमोर मांडतात.

नाट्यलेखनाबरोबर लेखिकांनी एकांकिका लेखनही केल्याचे दिसते. मालती दांडेकर

*(चंदनाचे पाट सोनियाचे ताट)*, जोत्स्ना चांदगुडे *(चिरंजीवी सप्तक, क्रांती सेवेचे फळ)*, अरुणा श्रीखंडे *(चांगभलं! चांगभलं)*, सुनिता खानोलकर *(जादूगर)*,इंदिरा काळे *(विद्येचे महत्त्व, वैराग्याच्या झोपडीत अरुण, असे पाहुणे येती, दे रे हरी खाटल्यावरी, मोलकरीण येता घरा, तू फुलली नाहीस)* अशा एकांकीकांचे लेखन १९५० ते २००० या कालखंडातील लेखिकांनी केले. नाट्यलेखनात व एकांकिका लेखनात लेखिकांनी वैविध्यपूर्ण लेखन केले. त्यांच्या नाट्य विषयात नाविन्यता होती आणि उत्कृष्टरित्या, मुलांच्या पसंतीस पडतील अशी नाटके १९५० ते २००० या कालखंडातील लेखिकांनी लिहिली.

एकांकिका लेखनाबरोबर बालसाहित्यात चरित्र लेखनही अनेक लेखिकांनी केले. क्रांतिकारक नेते, साहित्यिक कलाकार, शास्त्रज्ञ, उद्योगपती, देव-देवता, संत यांच्यावर १९५०-२००० या कालखंडात लेखिकांनी बालसाहित्यात चरित्रलेखन काही प्रमाणात केले. मुलांना पराक्रमी व्यक्तीचे कार्यकर्तृत्त्व सांगण्याच्या उद्देश्याने व मुलांना प्रेरित करण्याच्या उद्देश्याने लेखिकांनी चरित्रलेखन केले. नयनतारा देसाईंनी *राजगुरू, भगतसिंह, सुखदेव, दामोदर, चापेकर* या पाच क्रांतीकारकांची चरित्रे *पाच महान क्रांतिकारक* या पुस्तकांतून प्रसिद्ध केला आहे. त्याचप्रमाणे *अहिल्याबाई होळकर, राजा राममोहन रॉय, ज्योतिबा फुले, ताराबाई मोडक, अनुताई वाघ* यांचे चरित्र गिरीजा कीर यांनी आपल्या *देणारे हात* या पुस्तकात लिहिले आहे. दलितांचे उद्धार कर्ते बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्तृत्त्वाचा परिचय करून देण्याच्या उद्देश्याने लैला महाजन यांनी *विद्येच्या वाटेवर* हे बाबासाहेबांचे चरित्र पुस्तक लिहिले व स्नेहसुधा कुलकर्णी यांनीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांची चरित्रे लिहिली. कुसुम बेदरकर यांनी *क्रांतीकन्या इंदिरा* व *मुलांचे महर्षी, समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकर, पंडित रमाबाई* ही चरित्र पुस्तके बालवाचकांसमोर ठेवली. वर्षा प्रभू व सुधाकर प्रभू यांनी मिळून *तेथे कर माझे जुळती* हे पुस्तक प्रसिद्ध केले. या पुस्तकात त्यांनी महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची चरित्रे दिली आहेत. तसेच निर्मला किराणे *(पंडित जवाहरलाल नेहरू)*, शांता गोसावी *(मुलाफुलांचे नेहरू)*, ममता तावडे *(गुलाबाचे फुल)* या लेखिकांनी पंडित जवाहरलाल नेहरूचे चरित्र लिहिले. कमला मेहरे यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे चरित्र लिहिले. शुभदा धारूरकर आणि वि. ल. धारूरकर यांनी *अग्निशिखा* हे चरित्राचे पुस्तक प्रसिद्ध केले. या पुस्तकात त्यांनी भारतातील कर्तृत्त्ववान स्त्रियांची चरित्रे लिहिली आहेत. तद्प्रमाणे इंदुमती फाटक *(आमचे तात्या सेनापती बापट)*,पुष्पा मर्ढेकर *(तेजाचा वारसा बाबा आमटे)*, सुरेखा दीक्षित *(तेजाचा वारसा मृत्युंजय सावरकर)*, अनघा

अडावदकर *(मुलांचे विनोबा)*, निर्मला देशपांडे *(विनोबा)*, तारा धर्माधिकारी *(बाबा आमटे)*, चारुशीला *(मातोश्री जिजाबाई)*, सुजाता भागवत *(महाराणी येसूबाई गोपिकाबाई पेशवे)*, सुलभ द्रवीड *(अद्वितीय अहिल्याबाई)*, ज्योत्स्ना देवधर *(तेजस्विनी, महायोगी अरविंद)*, सुशीला वाडीकर *(सम्राट अशोक : भारताचे मानकरी, इंदिरा गांधी)*, लुब्धा आपटे *(राजर्षी शाहू महाराज)*,सरोजिनी बाबर *(इंदिरा प्रदर्शिनी)*, मंदा खांडगे *(केशवसुत)*, स्वाती खंडकर *(लेखक द. मा. मिरासदार)*, मृणालिनी देसाई *(कथा बापूंची)*, लीला शहा *(ज्योतिबा झाले महात्मा फुले)*, मंदा खांडगे *(ज्योतिर्मयी)*, सरिता वैद्य *(जगप्रसिद्ध स्त्रीरत्ने)*, सुलभ शहा *(राष्ट्रमाता कस्तुरबा, भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद, एक होते ज्योतिबा, थोर विदुषी सरोजिनी नायडू)* अशी क्रांतिकारक, कर्तृत्ववान व्यक्तिवर लेखिकांनी उपरोक्त चरित्रे प्रसिद्ध केली. जे. आर. डी. टाटा सारख्या उद्योगपतींवरही श्वेता गानूनी *तेजाचा वारसा* हे चरित्र लिहिले. सुमती देवस्थळी, अमृता कुलकर्णी, मृण्मयी बारपांडे, पुष्पा मेढेकर यांनी प्रसिद्ध शास्त्रज्ञाची चरित्रे लिहिली. तद्प्रमाणे स्त्री संत, संत, देवदेवतांवरही १९५० ते २००० या कालखंडात लेखिकांनी बालसाहित्यात चरित्रलेखन केल्याचेही आढळते.

थोडक्यात बालसाहित्यात १९५० नंतरच विपुल प्रमाणात लेखन केले गेले. अनेक लेखिकांनी नाविन्यपूर्ण लेखन केले. जवळजवळ बालसाहित्यात सर्वच वाङ्मयप्रकार हाताळले गेले व त्यांच्या ताजेपणा होता. नवनवीन विषयांना स्पर्श झाल्यामुळे १९५० नंतरचे स्त्रियांनी केलेले बालसाहित्य हे उत्कृष्ट दर्जाचे ठरले. मनोरंजनाबरोबर लेखिकांनी प्रबोधनात्मक लेखनही केले. १९५० ते २००० या कालखंडातील बालसाहित्याच्या संदर्भात मंदा खांडगे आपले मत व्यक्त करताना म्हणतात “इ. स. १९५० ते २००० या पन्नास वर्षामधील बालसाहित्य विश्वातील सर्वच वाङ्मयप्रकारांचा वेध या दोन लेखातून घेतलेला आहे. या काळात भरपूर साहित्य लिहिले गेले. रंजन आणि उद्बोधन यांचा मेळ घालून स्त्रियांनी सकस लेखन केलेले दिसते. विषयांची विविधता आली. ज्ञानाचा परीघ विविध मितीनी विस्तारला. त्याचे भान काही लेखिकांनी ठेवलेले दिसते. आजचे युग माहिती आणि तंत्रज्ञान याचे युग आहे. हा संदर्भ लक्षात घेऊन मात्र फारसे लेखन स्त्रियांनी केलेले दिसत नाही.”[९]

### क)२००० ते २०१० या कालखंडातील स्त्रीलिखित बालसाहित्य

बालसाहित्याचा अभ्यास करताना प्रारंभ ते २००० पर्यंतच्या काळात बालसाहित्यात बदल होत गेले व बालसाहित्यात भरही पडत गेली. कथा, कविता, कादंबरी,

नाटक, एकांकिका असे बहुविध प्रकार बालसाहित्यात हाताळले गेले.

कविता, कथा, कादंबरी, बालनाट्य हे प्रकार २००० नंतरही बालसाहित्यात दिसून येतात. २००० ते २०१० या कालखंडातील बालकवितांचा विचार करता २००० पूर्वी लेखन करणाऱ्या काही कवयित्रींनी २००० नंतरच्या काळातही कविता लेखन केले. २००० नंतरच्या कालखंडात संगीता बर्वे *(गंमत झाली भारी),* मीना *खोंड (हॅपी बर्थ डे),* सुवर्णा ढोबळे *(गानपाऊस),* विजया जहागीरदार *(फजितवाडा)* ह्या सारख्या अनेक कवयित्रींनी कविता लेखन केले. निसर्ग कविता, प्राणी कविता, वास्तव जीवनातील कविता अशा वेगवेगळ्या विषयांवर २००० नंतर बालकविता लेखन झालेले पाहायला मिळते. डॉ. वासंती इनामदार *(वर्षा ऋतुचे हे रूप),* सुमती पवार *(चला पेरू पाचू रे),* ज्योती देवळालीकर *(पाऊस आणि माती),* विमल लिमये *(पावसाची धार, पहिल्या वहिल्या पावसाचे स्वागत),* प्रतिमा इंगोले *(पाऊस)* अशा पावसावर आधारित अनेक कविता कवयित्रींनी लिहिल्या. त्यांच्याबरोबर चंद्र, सूर्य, प्राणी, नदी यांच्या आधारेही कविता लेखन झाले. कविता मेहेंदळे यांनी *भरारी* हा बालगीतांचा संग्रह लिहिला. चंद्र, सूर्य यांच्यावरील नाते त्यांच्या *भांडण* या कवितेतून सांगितले आहे. निरुपमा कुलकर्णी *(खारटपाणी)* या निसर्ग कविता उपरोक्त कवयित्रींनी लिहिल्या. तसेच माया धुप्पड *(एक चिमणी भिजली),* निर्मला देशपांडे *(किलबिल),* विमल लिमये *(माणसं आमचे दोस्त)* या कवयित्रींनी प्राण्यांच्या जीवनावरच्या बालकविता लिहिल्या.

प्रतिमा इंगोले, शकुंतला फडणीस, प्रतिभा गारटकर, नीलिमा गुंडी, संगीता बर्वे या कवयित्रींनी बहुतांश बालांचे कुटुंबातील व्यक्तिंशी असलेले नातेसंबंध कवितेतून स्पष्ट केले आहे. उन्हाळ्याच्या सुट्टीत मामाच्या गावी जायला मुले उत्सुक असतात. प्रतिमा इंगोले यांनी

*उन्हाळ्याची सुट्टी, मजाच मजा*
*मला बोलावतो, मामांचा गजा*

ही कविता लिहिली. तसेच, आधुनिक मानवी जीवनात संस्कृतीत, राहणीमानात होणारे बदल *मामाचा वाडा* या कवितेतून शकुंतला फडणीस यांनी चित्रित केले आहे. संगीता बर्वे यांनी *झाड आजोबा* हा बालगीतांचा संग्रह प्रसिद्ध केला.

बदलत्या जीवनाचे, विज्ञानयुगाचे चित्रही २००० नंतरच्या बालकवयित्रींनी बालसाहित्यात रेखाटले आहे. कविता कुलकर्णी यांनी *टि. व्ही. तली माणसं* ही कविता लिहिली. यात लहान मुलीला टि. व्ही. तल्या माणसांविषयी वाटणारे आकर्षण व आपण ही

टि. व्ही. त जाण्याची इच्छा उपरोक्त कवितेतून व्यक्त होते. त्याच्या प्रमाणे अरुणा अंतरकर *(टि. व्ही. गा(ऱ्हा)णे)*, प्रांजल धडफळे *(पुरे झाला टि. व्ही.)*, निर्मला देशपांडे *(किलबिल किलबिल)* या कवितेतून टि. व्ही. मुलांच्या आकर्षणाचा कसा विषय ठरला आहे व त्यामुळे मुलांवर होणारे परिणाम कवयित्रींनी स्पष्ट केले आहे. प्रतिमा विश्वास यांनी विज्ञानाचे महत्त्व सांगताना *विज्ञानाची किमया* ही कविता लिहिली.

काही कवयित्रींनी म्हणीचा आधार घेऊन बालकविता लेखन केलेले दिसून येते. मीनाक्षी सरदेसाई *(म्हणींची बोलगाणी)*, सुनंदा देशपांडे *(इरिंग मिरिंग)*, जयश्री बापट *(आजीची गाणी गाऊ, रंगवायची मजा घेऊ)*, वृषाली पाटील *(कधी कधी मला वाटते)*, लीला दीक्षित *(गाणारे झाड)*, संगीता बर्वे *(गंमत झाली भारी)*, नीलिमा गुंडी *(तळे)* इत्यादी बालकविता प्रसिद्ध आहेत. बालकवितात दीर्घ बालकविताही लिहिल्या गेल्या. सुहासिनी इर्लेकर *(मी भारतीय आहे)*, सुवर्णा ढोबळे (गानपाऊस), प्रतिमा इंगोले (गोविंदा गीत), सरिता वैद्य (खाऊचं झाड, चिंटूचा *पराक्रम, अफलातून बंड्या)* ही उल्लेखनीय दीर्घ कविता आहेत.

अशा प्रकारे २००० ते २०१० या कालखंडातही विपुल प्रमाणात कविता लेखन केलेले दिसून येते. बालकवितांचे विषयही काळाला अनुसरूनच आहे. वास्तव जीवनातील प्रसंगांचे व आधुनिक काळाशी निगडीत विषयांची दखल कवयित्रींनी २००० ते २०१० नंतरच्या बालसाहित्यातून घेतल्याचे दिसते. काळानुसार बालसाहित्याचे स्वरूप बदल्याचे अभ्यासांती जाणवते. २००० नंतरच्या बालकवितेच्या संदर्भात डॉ. गीता काटे म्हणतात की, “मुलांनाही आता मोठ्यांच्या बोलण्यातून महागाईसारख्या समस्या समजू लागल्या आहेत. एवढेच नाही, तर त्या बालगीतातही आल्या आहेत. आजच्या बालकवितेतच हे नवेपण आहे. मुलांशी संबंधित, त्यांच्या अवतीभोवतीच्या बदललेल्या वातावरणाचे प्रतिबिंब त्यात असे सहज उमटलेले दिसते. मात्र बालगीतात मुलांना नवे काही देताना कवितेचा विषय, आशय, शब्दमर्यादा इत्यादींचेही भान ठेवावे लागते. आठ-दहा ओळींच्या बालकवितेत आपल्या मनातील आशय सुबोधपणे व्यक्त करण्याचे कसब अनेक कवयित्रींमध्ये निश्चितपणे आहे.”[१०] डॉ. गीता काटें चेही मांडलेले मत तंतोतंत खरे आहे.

२००० नंतर कथा हा वाङ्मयप्रकारही मोठया संख्येने हाताळला गेला. अनेक लेखिकांनी विविध विषयावरील कथालेखन केले. प्रारंभ काळातील कथा विषयही लेखिकांनी २००० नंतरही बालकथातून मांडले. बालसाहित्य कथालेखन हे संच स्वरुपात मोठया प्रमाणात आढळते. मंजूषा आमडेकरांनी *तेनालीरामाच्या गोष्टीचा संच* प्रकाशित केला. निर्मला सारडा व रेचेल गडकर यांनी *बिरबल व बादशहा यांच्या गोष्टींचा संच* लिहिला. तसेच मंजूषा

आमडेकर यांनी *फ्रँकलिन* ही १० पुस्तकांची मालिका लिहिली. सुनिता करवळे यांनी *कॉलनी आजी (भाग १ व २),* स्मिता देवधर *(गोष्टीच गोष्टी ७ भाग),* मेधा आंबेडकर *(गोष्टीच गोष्टी भाग ८),* माधुरी पुरंदरे *(वाचू आनंदे भाग १, २. ३. ४),* विशाखा देवधर *(दाजीबाच्या ओसरीवर भाग १, २),* शर्मिष्ठा ठाकूर *(गलिव्हरच्या समुद्र सफरी भाग १, २)* इत्यादी बालसाहित्य संच कथालेखनात उल्लेखनीय आहे.

मुलांचे मनोरंजन करण्याच्या दृष्टीकोनातून जन्माला आलेली कथा नंतर मुलांना मनोरंजनाबरोबरच नवनवीन माहिती देण्याच्या उद्देश्याने बालसाहित्य अधिक समृद्ध होत गेले. मुलांच्या जिज्ञासाची तृती होण्यासाठी मंगला दिघे *(मनोरंजक विज्ञानकथा),* विद्या गारखेडकर *(थोर संशोधक),* स्मिता देवधर *(आकाशातील गमती जमती),* माधुरी मुळे *(श्रद्धा अंधश्रद्धा)* अशा प्रकारचे अनेक लेखन लेखिकांनी विविध कथासंग्रहाच्या माध्यमातून विविध विषयांची माहिती मुलांना देण्याचा प्रयत्न लेखिकांनी केला. प्रत्येक कालखंडातील मुलांना अद्भुतरम्य, रहस्यकथांचे आकर्षण असलेले दिसून येते. बालसाहित्यात मुलांच्या आवडीचे विषय लक्षात घेऊन कथालेखन झाले. त्यात अद्भुतरम्य कथालेखनही आकर्षकरित्या लेखिकांनी केले. २००० नंतरच्या कालखंडात मृण्मयी बारपांडे *(भुयारातील रहस्य, हस्तिदंती छडी आणि गोष्टी देशो देशीच्या),* चारुता पुराणिक, सीमा बापट *(जाइचा स्कार्फ व रहस्य चोरीच्या हाराचे),* मृणालिनी केळकर *(गाणाऱ्या टेकडीचे रहस्य),* ईशा सावंत *(जादूची काठी)* इत्यादी उल्लेखनीय रहस्यकथा होय. तसेच, चरित्रकथा लिहिण्याचा प्रघात पूर्वीपासूनच होता; तो तसाच पुढे चालत राहिला. क्रांतिकारक, साहित्यिक, शास्त्रज्ञ, राजकीय नेते, समाजसुधारक, कलाकार इत्यादी क्षेत्रातील महत्त्वपूर्ण कामगिरी बजावणाऱ्या महनीय व्यक्तिच्या कथा २००० नंतरही लेखिकांनी बालसाहित्यात लिहिल्या. त्याचप्रमाणे पौराणिक कथालेखनही प्रारंभ काळापासूनच बालसाहित्यात होते. तसेच ते २००० नंतरही बालसाहित्यात असल्याचेही आढळते. पौराणिक काळातील देवदेवता, शौर्यपुरुष-स्त्रिया या सगळयांना बालसाहित्य कथालेखनात २००० नंतरही स्थान मिळवून देण्याचे काम सुमती निरगुडकर, सुमन भडभडे, लीला पाटील, प्रतिमा इंगोले सारख्या लेखिकांनी केले. २००० नंतर सुमती निरगुडकर यांनी *पवनपुत्र हनुमान* ही कथा लिहिली. नंतर २०१० पर्यंत शैलजा काळे *(कथा रामायणाची, कथा महाभारताची, कथा कृष्णाच्या),* विमल वाणी *(श्रीकृष्णाच्या गोष्टी),* भावना जाधव *(अर्जुन आणि किराल),* सुमन भडभडे *(बालशिवाजी),* लीला पाटील *(सेनापती तात्या टोपे)* अशा प्रकारच्या अनेक कथा २००० ते २०१० या कालखंडात प्रसिद्ध झाल्या.

प्राणीकथा व पर्यावरण कथाही बहुतांश प्रमाणात लिहिल्या गेल्या. हत्ती, बदक, मुंग्या, झुरळ, मधमाशी, गोगलगाय, पोपट अशा वन्यप्राणी, पशुपक्षी, किटक या सर्वांवर आधारित आकर्षक व सुलभ अशा कथा लिहिल्या गेल्या. मंदा खांडगे *(हिरवे जग),* उज्ज्वला केळकर *(गर्विष्ठ सूर्यफूल आणि गंमत गोष्टी, फुलपाखरांना रंग मिळाले तेव्हा, बदकाचे बूट आणि गंमत गोष्टी, आणि जंगल हसले),* मानसी हजेरी *(भोलूची गोष्ट, मिठ्ठू),* वेदवती जोग *(पिल्लू घरातलं आणि बाहेरचं)* शरयू सोनावळे *(बाहुल्यांची शाळा),* वसुंधरा हुईडगोल *(ढेकरोजी ढेरपोटे),* मंदा खांडगे *(चीचू)* अशा कथा व बालकथासंग्रह २००० ते २०१० या कालखंडात लेखिकांनी उत्तमरीत्या बालवाचकांसमोर ठेवले. प्राणी जगातील बारीकसारीक विषयाला हलक्या फुलक्या रीतीने बालवाचकांच्या पुढे सादर केले. त्यामुळे प्राणीकथा हा प्रकारकथा बालसाहित्य लेखनातील आकर्षणाचा विषय ठरला. तसेच सुनिता नागपूरकर सारख्या लेखिकांनी पर्यावरणाच्या आधारे बालकथालेखन केले. मुलांना पर्यावरणाची आवड निर्माण व्हावी, पर्यावरण रक्षणासाठी मुलांवर संस्कार घडवण्याच्या हेतूने *मैत्री, मायेचं झाड, मी आहे नदी* अशा पर्यावरणपर कथा सुनिता नागपूरकर यांनी लिहिल्या.

तसेच, अनेक उल्लेखनीय व वैविध्यपूर्ण कथालेखन २००० नंतरही बालसाहित्यात झाले. प्रभावती आठवले *(धाडसी मायलेकी),* शरयू सोनवणे *(कपिला निघाली मुंबईला),* कविता मेहंदळे *(फुलाची परडी),* शकुंतला फडणवीस *(पत्राचा प्रवास आणि इतर कथा, पैज जिंकली छोट्यानं आणि इतर कथा, आजीचा धडा आणि इतर कथा),* डॉ. लीला दीक्षित *(मैत्री मोलाची),* विजया वाड *(उत्तम कथा, धम्माल गोष्टी, चम्मतग चष्टीगो, झकास गोष्टी),* सुनिता नागपूरकर *(प्राण्यांची सहल),* अनघा मोरजे *(सोनकळी),* सई लिमये *(मनातली शाळा),* मंगला दिघे (*म्हणी अनुभवाच्या खाणी),* डॉ. छाया कावळे *(झोपला मारुती),* शैलजा काळे *(वाचवा)* इत्यादी कथासंग्रह २००० ते २०१० या कालखंडात विषयांचे वैविध्य घेऊन बालवाचकांसमोर लेखिकांनी आणले.

२००० ते २०१० या कालखंडात बालकथालेखन हा वाङ्मयप्रकार लेखिकांनी विपुल प्रमाणात हाताळला. पण काही प्रमाणात का होईना बालकादंबरी व बालनाट्य हा प्रकारही लेखिकांनी हाताळला. अनुराधा वैद्य यांनी बालमजुरी हा विषय आपल्या *बंधमुक्त* या कादंबरीच्याद्वारे प्रकाशात आणले. तर सद्‌गुणी सुरूचे दर्शन विजया ब्राम्हणकरांनी केले. मंगला दिघे यांनी *लाल्या द डिटेक्टिव भाग १ व २* ह्या रहस्यमय कादंबऱ्या लिहिल्या. तसेच वृंदा दिवाण यांची *पंपूशेट* व सरिता वैद्य यांची *अफलातून बंड्या प्रधान* या मनोरंजक कादंबऱ्या बालवाचकांसाठी लिहिल्या गेल्या. मुलांमधील साहसी गुण जागृत करण्याच्या

दृष्टीकोनातून शैलजा काळेंनी *हर हर महादेव* व उर्मिला राघवेंद्रनी *आदित्याची डिस्नेलँड सफर* ह्या कादंबऱ्या प्रसिद्ध केल्या. त्याचप्रमाणे मंदा खांडगे *(मॉली)*, विद्या डेंगळे *(गुगी पुरण)*, कविता महाजन *(कुडु)* या बालकादंबऱ्याही बालवाचकांच्या आकर्षणाचा विषय ठरल्या. मोजक्याच कादंबऱ्यांनी बालसाहित्यात विषयांचे वैविध्य राखले.

कादंबरीप्रमाणेच कमी प्रमाणात का होईना पण बालनाटकांची निर्मितीही करण्यास लेखिका मागे राहिल्या नाहीत – इंदुमती देव *(देवघरची फुले)*, शालिनी कनिवट पोरे *(वृक्षराज आम्हा सगेसोयरे)*, गिरीजा कीर *(नाटकंच नाटकं)*, संध्या देशपांडे *(पक्षीतीर्थ आणि इतर एकांकिका)*, शैलजा जोग *(टफू)*, विदुला कुडेकर *(अबोल आणि इतर धमाल बालनाट्य)*, लीला दीक्षित *(बिल्वदल)*, सुनंदा उमर्जी *(बहारदार नाटिका)*, नीला जोशी *(हसरी नाटुकली)*, सिंधूताई आंबिके *(नाटिका)*, सुषमा अभ्यंकर *(राक्षस अप्पु झिंदाबाद, परीचा फटका)*, प्रतिमा इंगोले *(मोठ्ठं व्हायचं कसं)* अशी अनेक बालनाट्ये लिहून बालसाहित्यात लेखिकांनी मोलाची भर घातली. मनोरंजन, ज्ञान, कल्पना यांच्या संमिश्राने ही नाटके बालकांच्या पसंतीसही उतरली. एकूणच बालसाहित्याच्या संदर्भात लीलावती भागवत म्हणतात “या साहित्यातून मुलांना त्यांच्या अवतीभोवतीच्या तसेच दूरस्थ जीवनाचाही परिचय करून दिला गेला. त्यांना सौंदर्यदृष्टीची जाणीव होईल असा प्रयत्न केला गेला. हस्त खेळत मजेत जगण्यासाठी मानसिक बळ दिले. त्यांच्या विचारांनाही थोडीफार जग आणली आणि त्यांच्या वयोमानाप्रमाणे रंजक असे साहित्य त्यांच्यासाठी लिहून त्यांना वाचनाचा आनंद प्राप्त करून दिला.”[११]

## संदर्भ ग्रंथसूची


१. स्त्री साहित्याचा मागोवा खंड-१२५१
२. स्त्री साहित्याचा मागोवा खंड-१ पृ. २५१
३. मराठी बालसाहित्य प्रवाह आणि स्वरुप पृ. १५६
४. स्त्री साहित्याचा मागोवा खंड-१ पृ. २५५
५. स्त्री साहित्याचा मागोवा खंड-१ पृ. २५७
६. स्त्री साहित्याचा मागोवा खंड-२ पृ.
७. स्त्री साहित्याचा मागोवा खंड-२ पृ. ५९३
८. स्त्री साहित्याचा मागोवा खंड-४ पृ. ५९४
९. स्त्री साहित्याचा मागोवा खंड-२ पृ. ६२५
१०. स्त्री साहित्याचा मागोवा खंड-४ पृ.३२९
११. मराठी बालसाहित्य प्रवाह आणि स्वरुप पृ. १६५

# घटक ड : स्त्रीलिखित अनुवादित साहित्य

अ)१८५० ते १९५० या कालखंडातील स्त्रीलिखित अनुवादलेखन

ब) १९५० ते २००० या कालखंडातील स्त्रीलिखित अनुवादलेखन

क) २००० ते २०१० या कालखंडातील स्त्रीलिखित अनुवादलेखन

## अ)१८५० ते १९५० या कालखंडातील स्त्रीलिखित अनुवादलेखन

ब्रिटिश राजवटीतच मराठी साहित्यात कथा, कविता, कादंबरी, नाटक असे विविध साहित्यप्रवाह निर्माण झाले. लेखक, लेखिकांनी विविध साहित्यप्रकार उत्तम प्रकारे हाताळले. त्याचप्रमाणे १९०० नंतरच्या कालखंडात कथा, कविता, कादंबरी, नाटक या स्वातंत्र्य साहित्यप्रकारांचे अनुवादित लेखन करण्याचा प्रयत्नही सुरु झाला आणि लेखिकांचा हा प्रयत्न यशस्वीरीत्या पार पाडला.

अनुवादित लेखनात लेखिकांच्या लेखनाचा विचार करता, स्त्रियांचे इंग्रजी शिक्षण सुरु झाल्यानंतरच स्त्रियांना इतर भाषांचे आकलन होण्यास सुरु झाले व त्यानंतर त्यांनी इतर भाषा आत्मसात करून, शिकून स्त्रियांनी अनुवादित लेखन करण्यास प्रारंभ केला. १९०९ मध्ये स्त्री अनुवादित *सरोजिनी* ही कादंबरी मराठीत प्रकाशित झाली. सरस्वतीबाई भिडे यांनी श्रीयुत दामोदर मुखोपाध्याय प्रणीत यांची बंगाली कादंबरी *मा ओ मेये* याचा अनुवाद केला. त्याचप्रमाणे नंतरच्या काळात किशोरीलाल गोस्वामी यांनी *राजकुमारी* या हिंदी कादंबरीचा १९१२ मध्ये अनुवाद केला. पण या कादंबऱ्यांचा अनुवाद करताना लेखिकांनी मराठी वाचकांचा पसंतीचा विचार केला आहे. मराठी वाचकांच्या पसंतीस उतरेल असे लेखन लेखिकांनी जाणीवपूर्वक केल्याचे अभ्यासांती दिसून येते.या कादंबऱ्या संदर्भात व एकूणच बंगाली अनुवादित कादंबऱ्या संदर्भात भारती पांडे म्हणतात कि,

‘स्त्रियांना शिक्षण कोणत्या भाषेत द्यावे-इंग्रजीत कि मातृभाषेत?’ यावरची चर्चा त्या काळात रंगात आलेली होती. म्हणूनच या अनुवादिकांना या भाषांचे औपचारिक शिक्षण मिळाले असेल असे वाटत नाही. त्यातही बंगाली लिपीही वेगळी असल्याने अनुवादिकेला अधिक अभ्यास करावा लागला असावा आणि तो तिने केला हे महत्त्वाचे वाटते.”[१]

तसेच १९२० ते १९३० या कालखंडात लेखिकांनी गुजराती, इंग्रजी अशा भाषातील कादंबऱ्यांचाही मराठीत अनुवाद केला. गिरिजाबाई केळकर यांनी *स्त्रियोनु स्वर्ग* या वैद्य अमृतलालजी पढियार यांच्या कादंबरीचे १९२१ मध्ये *स्त्रियांचा स्वर्ग* या शीर्षकाने मराठीत अनुवाद केला. इंदिराबाई सहस्त्रबुद्धे व इंदुमती जगताप यांनी १९२४ साली अनुवादित

लेखनात आपले योगदान दिले. *द वूमन हू डिड* या ॲलन चार्ल्स यांच्या इंग्रजी कादंबरीचा अनुवाद *केवळ ध्येयासाठी* या नावाने इंदिरा सहस्त्रबुद्धेंनी केला. व विल्यम शेक्सपीयरच्या *ऑथेल्लो* या नाटकाच्या कथानकाचा संक्षिप्त अनुवाद केला. १९२९ साली जगन्नाथ पंडितांच्या *गंगा लहरी* काव्याचे भाषांतर आनंदीबाई लेले यांनी *सुबोध गंगालहरी* या शीर्षकाने केले. या ग्रंथाद्वारे आनंदीबाईचे संस्कृत भाषेवरील प्रभुत्वही दिसून येते.

१९३० ते १९४० या कालखंडात लेखिकांनी आठ अनुवादक पुस्तक प्रकाशित केली. नंतरच्या काळात शकुंतला परांजपे सारख्या लेखिकांनी फ्रेंच भाषेतूनही मराठी अनुवाद केलेला दिसून येतो. १९३६ मध्ये लाबिश, युजेन व मार्टेन एड यांच्या *ला पूद्र ओ-सि-य* या पुस्तकांचे *सोयरीक* या नावाने शकुंतलाबाईंनी अनुवाद केला. तसेच *लव्हाय्याच द मासिच पेटिशॉ* या पुस्तकाचे *चढा आहे* या शीर्षकाने शकुंतला परांजपेंनी अनुवाद केला. शकुंतला परांजपेंची *सोयरिक* हा अनुवाद मराठीतील स्त्रीलिखित पहिला विनोदी अनुवाद असावा असे मानले जाते. शकुंतलाबाईंच्या अनुवादा संदर्भातून भारती पांडे लिहितात, “शकुंतलाबाईंनी या दोन्ही फ्रेंच कथानकांना उत्कृष्टपणे मराठी वेष चढवला आहे. या दोन्ही अनुवादांची भाषा सोपी, रोजच्या व्यवहारातील आणि ठसकेबाज आहे. मानवी स्वभावावर आधारलेले सुंदर विनोदही या अनुवादांमध्ये आढळतात.”[२]

नाटकाचे अनुवाद लेखनही १८५० ते १९५० या कालखंडात लेखिकांनी केले. कन्हैयातील मुन्शी यांच्या *काकाची शशी* या गुजराती नाटकाचा अनुवाद वटेरकरांनी *काकाची शशी* याच नावाने प्रभात संगीत मंडळातर्फे नाटक सादर केले. १९३६ मध्ये गुजराती *दिव्यचक्षू* या कादंबरीचा अनुवाद रत्नप्रभा रणदिवे यांनी केला. एक उत्कृष्ट अनुवाद लेखन कमला दीक्षित यांनी १९३९ मध्ये केला. वुई *आर नॉट अलोन* या जेम्स हिल्टनच्या कादंबरीचा अनुवाद *निज्वलंक* या शीर्षकाने केला. १९४० नंतर अनुवाद लेखन क्षेत्रात मालतीबाई दांडेकर सारख्या लेखिकेचे नावही समोर येते. मालतीबाईंनी अनेक इंग्रजी बालकथांचे अनुवाद केले. *चिनीगुलाब* या पुस्तकातील काही कथांचा अनुवाद मालतीबाईंनी केला. १९४१ मध्ये *छानगोष्टी, माणिकमोती, चिमण्या कळ्या, विक्रमाचा विक्रम* ही मालतीबाईंची काही निवडक पुस्तके. तसेच १९५० मध्ये मेरी कॉटेली यांनी *शिष्का* या इंग्रजी कादंबरीचा *पुनर्जन्म* हा अनुवाद केला.

कमला फडकेंनी स्टफिन लीकॉक यांच्या इंग्रजी लेखांचे मराठीत रुपांतर उत्तम रित्या केले आहे. १९४४ साली *छायानट* व *पूर्णिमा’* या दोन अनुवादित केलेल्या कादंबऱ्या रत्नप्रभा रणदिवेच्या नावावर आहे. तसेच मालतीबाई चोळकट *(चित्रलेखा)*, शांता शेळके *(विधवेचा*

*पुनर्विवाह)* अशी मराठी अनुवादक पुस्तके १९०० ते १९५० या कालखंडात उल्लेखनीय आहेत.

१८५० ते १९५० या काळात साधारणतः तीस ते पस्तीस मराठी अनुवाद झाले. इंग्रजी, फ्रेंच, चीन, बंगाली, गुजराती अशा अनेक भाषांतील पुस्तकांचे मराठीत अनुवाद लेखकांनी केले. साधारणत: १९०० नंतरच स्त्रियांनी अनुवाद करण्याच्या क्षेत्रात आपले कार्य सुरु केले. लेखकांनी उत्तम दर्जाचे अनुवाद लेखन शब्दशः भाषांतरे किंवा रुपांतरांच्या स्वरुपात केले. प्रारंभीच्या अनुवाद लेखनाच्या काळातच लेखकांनी मराठी वाचकांच्या पसंतीस पडेल याचा विचार करूनच इतर भाषांतील पुस्तके मराठीत अनुवादित केले. मुलांच्या आवडीनिवडींचा विचार करूनही मालतीबाई दांडेकर व इतर काही लेखिकांनी इतर भाषांतील अनेक बालकथा मराठीत आणल्या. प्रारंभीच्या काळातही लेखिकांनी उत्तम प्रकारे अनुवाद लेखन केले व अनुवादाच्या क्षेत्रात त्यांचे कार्य ही विस्तारले व काळानुसार अनुवादकांचे तंत्र विकसित होत गेले.

## ब) १९५० ते २०००या कालखंडातील स्त्रीलिखित अनुवादलेखन

१९५० नंतर अनुवाद करण्याच्या क्षेत्रात अनेक मराठी लेखिकांनी पर्दापण केले. विविध वाङ्मय प्रकारांना हाताळून त्यांनी अनुवाद क्षेत्र विकसित करण्याचा प्रयत्न केला. इतर भाषांतील, कलाकृती त्याच ताकदीनिशी मराठीत आणण्याचा लेखिकांचा प्रयत्न १९५० च्या नंतर खऱ्या अर्थाने सफल झाला. त्यामुळे या कालखंडात स्वैर अनुवाद, भावानुवाद, मुक्त अनुवाद हे प्रकार निर्माण झाले. १९५० पूर्वी जरी स्त्रियांनी अनुवादाच्या क्षेत्रात कार्य सुरु केले असले, तरी स्त्रियांचे अनुवाद क्षेत्रातील कार्य १९५० नंतर भरभराटीस आले. १९५० ते २००० या कालखंडात तब्बल दोन हजार ललित पुस्तके व इतर धार्मिक तात्विक पुस्तके यांचा अनुवाद विविध भाषांतून मराठीत केला गेला.

अनुवाद क्षेत्रात कादंबरी या वाङ्मय प्रकाराचा विचार केला असता. इंग्रजी, कन्नड, बंगाली, मल्याळी, गुजराती, संस्कृत अशा विविध भाषांतील कादंबऱ्या स्त्री अनुवादकांनी मराठीत आणल्या. या भाषा शिवाय इतर अनेक भाषांतील कादंबऱ्या काही प्रमाणात का होईना पण मराठीत आणल्या गेल्याचे दिसून येते. त्यामुळे इतर वाङ्मय प्रकारापेक्षा स्त्रियांनी कादंबरी या वाङ्मयप्रकारातून अधिक अनुवादात्मक लेखन केल्याचे जाणवते.

१९५० ते २००० या कालखंडातील पहिली अनुवाद केलेली कादंबरी म्हणजे *अमर प्रीती* ही कादंबरी मालतीबाई दांडेकर यांनी *शिस्का* या इंग्रजी कादंबरीचा अनुवाद केला. तसेच

रायडर हैगार्डच्या *किंग सॉलोमन्स माइन्स* चा अनुवाद *सुलीमानचा खजिना* या शीर्षकाने मालतीबाईंनी केला. मालतीबाई नंतर कृष्णाबाई मोटे यांनी १९५२ साली ई. बी. व्हाईट या इंग्रजी कादंबरीकाराच्या एका कादंबरीचा *शार्लटचे जाळे* नावाने अनुवाद केला. शांताबाई शेळके यांनी १९५७ साली *प्रिझनर ऑफ झेंडा* कादंबरीचा *औट घटकेचा राजा* व १९६० ला *रूपर्ट ऑफ हेंटझा* कादंबरीचा *गाठ पडली ठका ठका* असे अनुवाद केले. उपरोक्त दोन्ही कादंबऱ्या या ॲन्थनी होप यांनी लिहिल्या. इंग्रजीतील *स्केपगोट* या प्रसिद्ध कादंबरीचा अनुवाद शकुंतला जोग यांनी केला. त्याच प्रमाणे शांताबाई शेळकेंनी *लिटल विमेन* व *गुड वाइव्हज* या दोन कादंबऱ्यांच्या एकत्रीकरणातून *चौघीजणी* ही अनुवाद केलेली कादंबरी वाचकप्रिय ठरली. या कादंबरीच्या संदर्भात आशा कर्दळे लिहितात की, “शंभर वर्षांपूर्वीचा काळ शांताबाईंनी अनुवादातही जिवंत केला आहे. अशी साधी मूल्याधिळित जीवनपद्धती, असे बालपण आपल्याकडेही होते. म्हणून ही कादंबरी जवळची वाटते. शांताबाईंची अनुवादाची शैली विषयानुरूप अतिशय घरगुती, संस्कारशील आणि भावपूर्ण आहे.”[३] अशा प्रकारे सर्वच लेखिकांनी केलेले अनुवाद हे परिश्रमपूर्वक केले आहे. मनात एक चांगला उद्देश व हेतू ठेवून अनुवादित लेखन झाले. १९५० ते १९७५ पर्यंतच्या कालखंडात निर्मला गोडबोले *(अंकल टॉम्स केबिन)*, कमलं देसाई *(शिलो)* अशा अनुवादित कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. १९७५ नंतरही इंग्रजीतून मराठीत कादंबऱ्यांचे अनुवाद झाले. सिंधू अभ्यंकर यांनी ॲलेक्स हॅले यांच्या *रूट्स* या कादंबरीला मराठीत आणले. तसेच इंग्रजीतील नोबेल पुरस्कार विजेती कादंबरी *द गुड अर्थ* याचा अनुवाद भारती पांडे यांनी *काळी* या नावाने केला. पर्ल बक यांनी लिहिलेल्या कादंबरीचा तेवढ्याच ताकदीने उत्कृष्ट असे अनुवाद लेखन भारती पांडेंनी केले. तसेच *ब्लासफेमी* या कादंबरीचा अनुवादही भारती पांडेंनी केला. पर्ल बकच्या इतरही काही कादंबऱ्यांचा अनुवाद आशा कर्दळे *(अखरचे पात्र),* मंगला निगुंडकर *(गृहस्वामिनी),* कुमुदिनी रांगणेकर *(पोर्ट्रेट ऑफ अ मॅरेज)* या लेखिकांनी केला. तसेच मंजिरी जोशी, मोहनतारा पाटील या लेखिकांनीही १९७५ ते १९८० च्या दशकात इंग्रजी कादंबरी अनुवाद क्षेत्रात कार्य केले. १९८० ते २००० पर्यंत अनेक इंग्रजी कादंबऱ्याचे मराठीत अनुवाद केले गेले. १९८० ते २००० या कालखंडातील इंग्रजीतून मराठीत अनुवादित झालेल्या काही उल्लेखनीय कादंबऱ्या पुढीलप्रमाणे सांगता येतील. *वाट दीर्घ मौनाची* – सानिया, *दॅट लॉंग सायलेन्स* – शशी देशपांडे, *सिबिल* –माधवी कोल्हटकर, सैबेरियातून पलायन- वसुधा माने, ॲज फॉर ॲज माय फीट् विल कॅरी मी - जे. एम. बॉअर, तू असा जवळी रहा. - पद्य अभ्यंकर, तिच्या वडिलांची मुलगी- वनिता सावंत,मध्यज्य-

लीना सोहनी, मध्यरात्रीचा नवा पैलू- मोहनतारा पाटील, सुत्रचालक. विनया खडपेकर, अजून वाढवा ती झाडे- शैला सायनाकर. या सारख्या चारशे कादंबऱ्या इंग्रजीतून मराठीत स्त्रियांनी अनुवादित केल्या.

इंग्रजी कादंबऱ्याप्रमाणेच कन्नड कादंबऱ्याचा अनुवादही स्त्रियांनी केलेला पाहायला मिळतो. उमा कुलकर्णी या कन्नड मधून मराठीत अनुवाद करणाऱ्या महत्त्वपूर्ण लेखिका. उमा कुलकर्णी यांनी कन्नड मधून मराठीत अनेक कादंबऱ्या आणल्या. एस. एल. भैरवा यांनी *पर्व, परिशोध, वंशवृक्ष, तंतू* या कादंबऱ्यांचा अनुवाद उमा कुलकर्णींनी केला. तसेच भैरप्पाच्या *दाटू* या कादंबरीचा – *जा ओलांडूनी* व *इंचू* या कादंबरीचा *काठ* या नावानेही अनुवाद केला आहे. उमा कुलकर्णी यांनी भैरप्पाच्या सगळयाचे कादंबऱ्याचे उत्कृष्ट असे अनुवादित लेखन केले. भैरप्पाच्या कादंबऱ्याप्रमाणेच *तनामनाच्या भोवऱ्यात, अंतराळ, कार्यालो, गूढ माणूस, चिदंबर रहस्य* या कादंबऱ्या उमा कुलकर्णींनी अनुवादित केल्या आहेत. मीना वांगीकर, अनुपमा निरंजन, मीरा शिरली, शामलता काकडे या लेखिकांनी ही कन्नड कादंबऱ्याचे मराठीत अनुवादित लेखन केले. मीना वांगीकरांची *मुकज्जी,* अनुपमा निरंजन यांची *स्त्री माझे नाव* या कादंबऱ्या अनुवादित केलेल्या आहेत.

इंग्रजी व कन्नड कादंबऱ्याबरोबरच स्त्रियांनी बंगाली, मल्याळी, गुजराती या भाषांमधूनही बहुतांश कादंबऱ्या मराठीत अनुवादित केलेली आहे. तर पंजाबी, हिंदी, उडिया अशा भाषांतूनही काही मोजक्या कादंबऱ्यांचे अनुवादित लेखन स्त्रियांनी केल्याचे अभ्यासांती लक्षात येते. लीना सोहोनींनी बंगाली मधल्या *लज्ज्य* कादंबरीला मराठीत स्थान प्राप्त करून दिले तर मृणालिनी गडकरी यांनी *फेरा* या बंगाली कादंबरीचा अनुवाद केला. बंगलीतल्या प्रसिद्ध कादंबरी लेखिका महाश्वेतादेवी व आशापूर्णादेवी यांच्या कादंबऱ्यांच्याही मराठीत अनुवाद करण्याचा प्रयत्न स्त्री लेखिकांनी केला. प्रभा श्रीनिवास यांनी महाश्वेतादेवींच्या *अरण्येर अधिकार* चा अनुवाद केला तर अरुणा कुवेकर यांनी महाश्वेतादेवींच्या *हजार चुराशीर माँ* या कादंबरीचा अनुवाद केला आहे. महाश्वेतादेवीच्या बरोबरच आशापूर्णा देवीच्या कादंबरीचेही अनुवाद झालेले दिसून येतात. मृणालिनी केळकर यांनी लिहिलेली *पहिले वचन* ही कादंबरी *प्रथम प्रतिश्रुती* या आशापूर्णा देवींच्या कादंबरीचा अनुवाद आहे. तसेच बलाईचन्द यांच्या *भूवनशोम* कादंबरीचा अनुवाद अरुंधती महांबरे यांनी केला. अशाप्रकारे बंगालीमधून नारा पंडित यांनी *स्वप्न, लज्जाहीन, मंदिरा, सुंदरबनच्या जंगलात* अशा कादंबऱ्याचे अनुवाद मराठीत केले व अनुवादाच्या क्षेत्रात स्त्रियांनी पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम केले.

मल्याळी भाषेतून मराठीत कादंबरी अनुवाद करणाऱ्या विशेष उल्लेखनीय लेखिका म्हणजे धनश्री हळबे. मुळ मल्याळी कादंबरीचा अनुवाद धनश्री हळबीनीं केला. *अग्निसाक्षी, विषकन्या, औसेपची मुल शोधते मार्ग स्वप्नांचा, माहे नदीचा तेरावा* या कादंबऱ्याचे अनुवादित लेखन धनश्री हळबेंनी केले. धनश्री हळबेंप्रमाणेच लीला बावडेकर यांनी मल्याळी साहित्यातील श्री तकळी शिवशंकर पिल्ले यांच्या *थोतीयुदे माकन* या कादंबरीचा अनुवाद *भंग्याचा पोर* या शीर्षकाने केला.

तसेच गुजराती व संस्कृत साहित्यातील कादंबरीचे अनुवादही मराठीत झाले. अंजनी नरवणे यांनी *बावडी, अणसार, सागरतीरी* या गुजराती कादंबऱ्यांचा मराठी वाचकास परिचय करून दिला. तर अनघा प्रभू देसाई यांनी *अमृतयात्रा,* स्मिता भागवत यांनी *प्रकाशाची सावली,परतुनी ये घनश्याम* या गुजराती कादंबऱ्यांचा मराठी अनुवाद केला तर संस्कृतमधून मराठीत कादंबरी अनुवाद करणाऱ्या प्रसिद्ध लेखिका म्हणजे दुर्गाबाई भागवत. बाण भट्टाची संस्कृत भाषेतील कादंबरी दुर्गाबाई भागवतांनी मराठीत आणली. विमल लेले यांनी १९८६ साली *पूर्णाहूती* ही कादंबरी कालिदासांच्या *मालविकाग्निमित्रा* या संस्कृत नाटकावरून लिहिले. अशा काही मोजक्या संस्कृत कादंबऱ्यांचे अनुवाद लेखिकांनी केले.

कादंबरी अनुवादकांच्या क्षेत्रात हेमा जावडेकर, सुषमा शाळीग्राम, शरयू पेडणेकर, शुभदा खडिलकर, प्रतिभा रानडे, प्रज्ञा तपस्वी, शांता शेळके, मंजू गुप्ता, वसुधा माने या लेखिकांचा उल्लेखही करता येतो. १९५० ते २००० या कालखंडात ह्या लेखिकांनी इतर भाषांतील कादंबऱ्यांचा मराठीत अनुवाद करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

अनुवाद करण्याच्या क्षेत्रात कादंबरी या वाङ्मयप्रकाराबरोबरच कथा, कविता, नाटक, चरित्रे, आत्मचरित्रे या साहित्यप्रकारांचीही दखल लेखिकांनी घेतली. 'कथा' या वाङ्मयप्रकाराचा विचार करता लेखिकांनी इतर भाषांतील अनेक कथा मराठीत आणल्या. कथांचे अनुवादित लेखन करणाऱ्या महत्त्वपूर्ण लेखिका म्हणजे दुर्गाबाई भागवत. दुर्गाबाई भागवतांनी खंड सात मधील *जातक कथांचे* अनुवादित लेखन केले व त्याच बरोबर *अरेबियन नाईट्स* या *खंड १४* मधील कथांचे मराठीत अनुवाद केले. *सिद्धार्थ जातक* नावाने दुर्गाबाईंनी पाली कथांचे अनुवादित लेखन केले. दुर्गाबाईंचे अनुवाद १९७५ ते १९७८ या काळात प्रसिद्ध झाले. गौरी देशपांडे या लेखिकेने टिचर्ड बर्टनच्या *अरेबियन नाईट्स* या इंग्रजी कादंबरीचा अनुवाद मराठीत केला. शिरिष पै या लेखिकेने १९५६ साली *अखेरचे पान आणि इतर कथा* इंग्रजीत अनुवाद केलेले पुस्तक आहे. एलगर एलन पोच्या कथांचा *तीन कथा* नावाने कमला फडके यांनी १९६५ साली अनुवाद केला. स्त्री अनुवाद लेखनाच्या

संदर्भात विचार करता हिंदी भाषेतून मराठीत खूपच कमी प्रमाणात अनुवादित लेखन झालेले पाहायला मिळते. 'कथा' या वाङ्मय प्रकारच्या संदर्भात शुभ चिटणीस, माधवी देसाई, नीलिमा साने या लेखिकांचा उल्लेख अनुवादित लेखनाच्या संदर्भात करता येतो.

अनुवादाच्या क्षेत्रात स्त्रियांनी 'नाटक' या वाङ्मयप्रकारची ही दखल घेतलेली दिसून येते. मराठीतील अनुवादित नाटकांचा विचार करता फ्रेंच भाषेतील साहित्यातून अनेक फ्रेंच नाटकांचा मराठीत अनुवाद झालेला दिसून येतो. फ्रेंच मधील बॅकेट, मोलिएर, अनुई अशा प्रसिद्ध नाटककारांच्या नाटकांचा मराठी वाचकांना व रसिकांना माधुरी पुरंदरे, शांता वैद्य, मीरा गुणाकारी यांनी परिचय करून दिला. मोलिएरच्या *दो जुआँ* या नाटकाचे भाषांतर माधुरी पुरंदरे यांनी *न भयम् न लज्जा* या नावाने केले. तसेच *वेटिंग फॉर गोदे* या नाटकाचाही उत्कृष्ट अनुवाद माधुरी पुरंदरेंनी केला. माधुरी पुरंदरे प्रमाणेच शांता वैद्य या लेखिकेने ही *ॲलिगॉन* आणि *ल तार्त्युफ* या फ्रेंच नाटकांचा अनुवाद केला. त्यामुळे शांता वैद्य यांचेही नाव अनुवादाच्या क्षेत्रात घेतले जाते. तसेच त्यांनी *ल व्हायाजर सां बागाजव* या फ्रेंच नाटकाचा अनुवाद ही केला आहे. *इन कॅमेरा* या नावाने मीरा गुणाकारी यांनी *वी क्लो* या फ्रेंच नाटकाचा अनुवाद केला.

शांता वैद्य, माधुरी भिडे, पद्मजा फाटक, प्रज्ञा उदगावकर या लेखिकांनी ग्रीक नाटकांचे मराठीत अनुवाद केले. 'ग्रीक शोकनाट्ये' मराठीत अनुवादित करण्याची कामगिरी माधुरी भिडे यांनी उत्तम रित्या पार पाडली. त्यांनी इस्किलस या थोर ग्रीक नाटककारांच्या सहा शोकनाटकांचा अनुवाद मराठीत केला. तसेच शांता वैद्य यांनी सॉफक्लीझच्या काही नाटकांना मराठीत आणले. प्रज्ञा उदगावकर यांनीही सॉफक्लीझच्या *किंग इंडियन्स* या नाटकाचा अनुवाद *राजा इंडियन्स* या शीर्षकाने केला.

इंग्रजी भाषेतील अनेक नाटके मराठीत आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य इंदुमती जगताप, शशिकला बेहरे, कुसुम मेहेंदळे, लीला चिटणीस यांसारख्या लेखिकांनी केले. इंग्रजीतील प्राख्यात नाटककार शेक्सपिअर, ऑथेल्लो यांच्या नाटकांचा अनुवाद मराठी लेखकांनी केलेला दिसून येतो. *टेम्पेस्ट व ट्वेलथ नाईट* या शेक्सपिअरच्या नाटकांचा मराठीत अनुवाद शशिकला बेहेरे यांनी १९५८ मध्ये केला. तर इंदुमती जगताप यांनी *ऑथेल्लो* चा अनुवाद केला. कुसुम मेहेंदळे चा *इथे शत्रू नाहीत* या शीर्षकाने *ॲज यू लाईक इट* या इंग्रजी नाटकाचा अनुवाद केला. तर लीला चिटणीस यांनी *द सॅक्रेड फ्लेम* या नाटकाचा अनुवाद *एक रात्र अर्धा दिवस* या नावाने केला. अशा प्रकारे इंग्रजी भाषेतील नाटके मराठीत आणण्याचा प्रयत्न झाला व यातील काही नाटके रंगभूमीवरही सादर झाली. फ्रेंच, ग्रीक, इंग्रजी या भाषेतील

नाटकांबरोबरच कन्नड भाषेतील नाटकांचाही अनुवाद लेखिकांनी केलेला दिसतो. कन्नड भाषातील साहित्य मराठीत आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करणाऱ्या उमा कुलकर्णी यांनी 'नाटक' ह्या साहित्य प्रकाराचीही दखल घेतली. *जो कुमार स्वामी, नलेदंड, नागमंडल* अशा तीन कन्नड नाटकांचा अनुवाद उमा कुलकर्णींनी केला. कन्नड प्रमाणे तेलगू, गुजराती, संस्कृत या भाषातील काही मोजकीच नाटके मराठीत अनुवादित झालेली दिसून येतील.

नाटकांप्रमाणेच लेखिकांनी विविध भाषांतील चरित्रे-आत्मचरित्रे यांचेही मराठीत अनुवाद केले. शांताबाई शेळके यांनी *आंधळी* व *आंधळ्याचे डोळे* ही दोन पुस्तके इंग्रजी मधून अनुवादित केली. *हेलन केलर* यांचे चरित्र व *वेद मेहता* यांचे आत्मचरित्र कॅथरिन ओवेन्स पीअर्स यांनी लिहिले. त्यांच्या ह्या पुस्तकाचे अनुवादित लेखन शांताबाईंनी केले. *फेस टू फेस* या वेद मेहताच्या आत्मचरित्राचा अनुवादही शांताबाई शेळके यांनी केला. लीना सोहोनी यांनी विल्यम हॉफर्ट व बेटी महमुदी यांच्या पुस्तकांचे *नॉट विदाऊट माय डॉटर* या नावाने अनुवादित लेखन केले. तसेच *किरण बेदी, साईबाबा* यांच्या चरित्राचाही अनुवाद लीना सोहोनींनी केला. आशा कर्दळे यांनी लिव उलमन या नायजेरियन अभिनेत्रीच्या आत्मचरित्राचा  मराठीत अनुवाद केला. तसेच हॉलिवूड अभिनेत्री इनग्रिड कार्मन हिच्या *माय स्टोरी* या आत्मचरित्राचा मराठीत अनुवाद केला. *नाईट, आयडेअर स्टेफी, अ डबल लाइफ* या चरित्राला व आत्मचरित्राला मराठीत यशस्वीरीत्या आणण्याचा प्रयत्न आशा कर्दळे यांनी केला. तसेच मंजिरी दामले *(बुलेट फॉर बुलेट),* ज्योत्स्ना काळे *(काळे गाणे),* उषा शेठ *(माझी नीता),* माधुरी शानबाग *(अग्निपंख)* अशा काही लेखिकांनी चरित्रे व आत्मचरित्रे मराठीत आणण्याचा प्रयत्न केला. पण चरित्र व इतर भाषांतील आत्मचरित्रांचा विचार करता फक्त इंग्रजी भाषेतील चरित्र व आत्मचरित्र लेखिकांनी मराठीत आणली.

इतर साहित्यप्रकारांच्या तुलनेत काव्याचे अनुवाद स्त्रियांनी मोजक्याच प्रमाणात केलेले दिसून येते. शांताबाई शेळके यांनी कालिदासांच्या *मेघदूत* या काव्याचे मराठीत अनुवादित लेखन केले. मीरा गुणकारी यांनी फ्रेंच मधील प्रख्यात कवी जाद पडजाद यांच्या निवडक कवितांचा फ्रेंचमधून मराठीत अनुवाद केला. अत्यंत उत्कृष्ट असा अनुवाद मृणालिनी गडकरी यांनी तसलीमा नासरीन यांच्या बंगाली कवितांचा केला आहे. संत बहिणाबाईंनी *वज्र सुची* या काव्याचा नौवाद केला. तसेच काव्याचा अनुवाद करणाऱ्या सरिता पदकी *सात रंगाच्या कमानी माझ्या पापण्यांवर,* शांताबाई शेळके, शिरीष पै *हायकू,* शिरीष पै *ध्रुव, हायकू,* भावना वैष्णव *गीतांजली,*  शैलजा देवी *सावित्री,* अंजली ठाकूर *समओवी ज्ञानेश्वरी* या कवयित्रींचा काव्य अनुवाद क्षेत्रात आवर्जून उल्लेख करावा लागतो.

वैचारिक साहित्याचे अनुवाद करणाऱ्या अग्रगणी लेखिका म्हणजे दुर्गाबाई भागवत होय. *वॉल्डन* या पुस्तकाचा अनुवाद दुर्गाबाईंनी १९६५ साली केला. तसेच *थोरोजी चिंतनिळा* याचा अनुवादही दुर्गाबाई भागवतांनी केला. भारती पांडे यांनी *हार्ट फुल ऑफ बर्डन (व्यार्थन मनानं सांगावसं वाटतं कि.....?).*

## क) २००० ते २०१० या कालखंडातील स्त्रीलिखित अनुवादलेखन

काळानुसार अनुवाद क्षेत्रात स्त्रियांनी मोठया संख्येने भाग घेतला. इतर भाषांमधील साहित्यातील अनेक वाङ्मयप्रकारांचे भाषांतर लेखिकांनी केले. कथा, कविता, कादंबऱ्या या वाङ्मयप्रकारामध्ये मोठया प्रमाणात अनुवादित लेखन झाल्याचे दिसून येते.

'कादंबरी' या वाङ्मय प्रकाराचा विचार करता २००० ते २०१० पर्यंतच्या कालखंडात इंग्रजी भाषेतील अनेक कादंबऱ्याचा मराठीत अनुवाद झाला. *द गॉड ऑफ स्मॉल थिंग* या अरुंधती रॉय यांच्या कादंबरीचा अपर्णा वेलणकर यांनी मराठी अनुवाद केला. या कादंबरीसाठी 'बुकर पुरस्कार' प्राप्त झाला. तसेच अपर्णा वेलणकर यांना या अनुवादा संदर्भात २००३ मध्ये साहित्य अकादमी पुरस्कारही प्रदान करण्यात आला. तसेच सरोज देशपांडे यांनी शशी देशपांडे यांच्या *स्मॉल रेमिडीज* या इंग्रजी कादंबरीचा मराठीत *उपाय साधेसोपे* हा अनुवाद केला. शशी देशपांडेच्या *ए मॅटरऑफ टाईम* या कादंबरीचा अनुवादही देशपांडेनी केला त्यासाठी त्यांना २०१० चा साहित्य अकादमीचा पुरस्कारही प्राप्त झाला. उत्कृष्ट निवेदनात्मक कादंबरीचा नमुना म्हणजे *खोट सांगेना* ही कादंबरी. उर्मिला देशपांडे यांच्या इंग्रजी कादंबरीचा अनुवाद उज्ज्वला गोखलेंनी केला. *नेमसेक* (उल्कर राऊत), *प्रतिस्पर्धी* (रेखा सबनीस), *स्लमडॉग मिलियनेअर* (वंदना अत्रे), *शकुंतला : स्मृतीचा खेळ* (अर्चना मिरजकर), *समुद्राकाठचं गाव* (विजया देव) अशा इंग्रजी मधून मराठीत अनुवादित झालेल्या कादंबऱ्याही विशेष प्रसिद्ध आहेत.

इंग्रजीशिवाय इतर भाषांतील कादंबऱ्यांचा अनुवादही मराठीत झालेला दिसून येतो. ह्यात अंजनी नरवणे यांनी गुजरातीमधून मराठीत आणलेली *रेतीची पक्षी* सुषमा करोगल यांची *आगंतुक, आयोध्येचा रावण आणि लंकेचा राम* ही सुषमा शाळीग्राम यांनी गुजरातीतून मराठीत अनुवाद केलेली कादंबरी. तसेच वसुधा सहस्त्रबुद्धे यांनी *ही माझी भूमी, आवा* ह्या चित्रा मुद्गल यांच्या हिंदी कादंबरीचा मराठीत अनुवाद केला आहे. उमा दादेभावकर यांनी *पुण्ययोगा* या कादंबरीचा हिंदीतून मराठीत अनुवाद केला. वेद राही यांची हिंदीमध्ये अनुवादित झालेली *ललद्यद* या कादंबरीला हिंदीतून मराठीत आणण्याचा

प्रयत्न माधवी कुंटे यांनी केला. तसेच 'स्त्री व प्रजनन' या विषयांवर भाष्य करणारी मृदुला गर्ग यांची *कठगुलाब* ही हिंदी कादंबरी मराठीत आणण्याचा मान वनिता सावंत यांना जातो. इतर भाषांचा विचार करता बंगाली, कन्नड. मल्याळम या भाषांतील कादंबऱ्यांनाही लेखिकांनी अनुवादाच्या माध्यमातून मराठी वाचकांच्या भेटीस आणल्या. मेघ तासकर यांनी *बऊ ठाकुरांनी रहाट* या बंगाली कादंबरीचा अनुवाद रवींद्रनाथ टागोर यांच्या १५० व्या जन्मशताब्दी वर्षात प्रसिद्ध केले. त्याच प्रमाणे शरदचंद्र चट्टोपाध्याय यांच्या *देवदास, परिणीता, आवरा मसीहा* या बंगाली कादंबऱ्यांचा मराठी अनुवाद शरदिनी मोहिते यांनी उत्तमरित्या केला आहे. बंगाली साहित्य मराठीत आणणाऱ्या अग्रगणी व उल्लेखनीय लेखिका म्हणजे मृणालिनी गडकरी. *गांधर्वी* (२००६), *आलो अंधारी* (२००८), *माझं कुंवारपण, गोसावी बागेतील भूत* (२००३), *आनंदमठ* अशा बंगाली कादंबऱ्या आपल्या कसबदार शैलीतून त्यांनी मराठीत आणल्या *नष्टनाडे, भालच, दुईबीन* ह्या रवींद्रनाथांच्या बंगाली लघु कादंबऱ्याचा अनुवाद नीलिमा भावे यांनी केला. तसेच रंजना पाठक या लेखिकेने *प्रथम आवृत्ती* या ऐतिहासिक बंगाली कादंबरीला मराठीत मानाचे स्थान मिळवून दिले. २००० चा साहित्य अकादमी पुरस्कार रंजना पाठक ह्यांना त्यांच्या ह्या कादंबरी अनुवादासाठी मिळाला. इंग्रजीप्रमाणेच बहुसंख्य बंगाली कादंबरीचाही मराठीत उत्कृष्ट अनुवाद झालेले अभ्यासांती दिसून येते. उमा कुलकर्णी, मीना वांगीकर या लेखिकांनी कन्नड भाषेतील कादंबऱ्या मराठीत आणणाचा यशस्वी प्रयोग केला. एस. एस. भैरप्पा व एम. एस. पुररणा यांच्या गाजलेल्या कन्नड कादंबऱ्या मराठीत अनुवाद केल्या. *मद्र* (२०००), *सार्थ* (२००३), *आवरण* (२००९) ह्या भैरप्पाच्या कन्नड कादंबऱ्या २००० ते २०१० या कालखंडात उमा कुलकर्णींनी मराठीत आणल्या. तसेच *काव्हलो, अवस्था, महाश्वेता, डॉलर बहु, करावे मस भरावे* ह्याही बंगालीमधील उल्लेखनीय कादंबऱ्या उमा कुलकर्णी यांनी मराठीत अनुवादित केल्या. उमा कुलकर्णी प्रमाणेच मीना वांगीकर यांनी रेखा काखंडळी या कन्नड लेखिकेची *ब्रह्मांड* ही कादंबरी २०१० साली मराठीत अनुवादित केली. एकंदरीत उमा कुलकर्णी यांनी मराठी साहित्यात अनुवादाच्या माध्यमातून विशेष भर घातलेली दिसून येते. मल्याळम भाषेतून मराठीत कादंबरी अनुवाद केलेल्या लेखिकेत धनश्री हळबे यांचे नावही नोंदपात्र ठरते. *चिंगारी* (२००३), *अपराजिता* (२००३), *किमयागार* (२००४), *अंतर्जनम* (२००३) ह्या मल्याळम कादंबऱ्यांचे अनुवादित लेखन धनश्री हळबे यांनी केले.

कादंबरी अनुवादानंतर लेखिकांनी कथांचे अनुवादित लेखन करण्यास सुरुवात केली. इंग्रजी भाषेतील कादंबऱ्याप्रमाणेच इंग्रजी कथांचाही अनुवाद केला गेला. *आफ्टर कुरुक्षेत्र* या

महाश्वेतादेवींच्या इंग्रजी कथासंग्रहाचा अनुवाद वर्षा काळे यांनी २००० ते २०१० या कालखंडात केला. तर स्त्री जीवनातील संघर्षाचे चित्रण वसुधा जोशी यांनी *नीसगाथा* या अनुवादित पुस्तकात केले आहे. सुधा मूर्ती यांच्या इंग्रजी कथांचा अनुवाद लीना सोहोनी यांनी केला. तसेच मीना वैशंपायन यांनी *द खिमू विदिन* नावाने स्वाती गांगूली व शर्मिष्ठा दासगुप्ता यांच्या कथा मराठीत आणल्या. भारती पांडे यांनी *इंटरप्रिटर ऑफ मालडीव्ज* हा झूंपा लाहिरी यांचा कथासंग्रह मराठीत भाषांतरित केला. कथा वाङ्मयातील इंग्रजी विज्ञानकथा मराठीत आणण्याचे श्रेय सुजाता गोडबोलेकडे जाते. सुजाता गोडबोले यांनी आयझॅक ॲसिमव्हया या इंग्रजी लेखकाच्या अठरा विज्ञानकथा संग्रहांना मराठीत यशस्वीरीत्या आणले. इंग्रजी प्रमाणेच हिंदी, गुजराती, कन्नड, मल्याळम, बंगाली या भारतीय भाषांतील कथांचेही मराठीत अनुवादित लेखन झाले असल्याचे दिसून येते. काही अंशी रशियन, फ्रेंच, जपानी, जर्मनी या भाषेतील कथाही मराठी वाचकांच्या पुढे आणण्याचा प्रयत्न स्त्रियांनी केलेला जाणवतो. मृणालिनी गडकरी, नीलिमा भावे या लेखिकांनी बंगाली कथांचा मराठी अनुवाद केला. *काबुलीवाला आणि इतर कथा, पोस्टमास्टर आणि इतर कथा* या रवींद्रनाथ टागोरांच्या बंगाली कथासंग्रहाचा, अनुवाद मृणालिनी गडकरींनी केला. तसेच २००४ च्या साहित्य अकादमी पुरस्कार मिळवलेली *देवदास* या शरदचंद्राच्या कथांचाही अनुवाद मृणालिनी गडकरींनी केला. तर नीलिमा भावे यांनी *रोबर्टसनचं माणिक* या सत्यजित राय यांच्या बंगाली कथासंग्रहाचा अनुवाद केला. तसेच उपेंद्र किशोर रायचौधरींची *नष्टनाडे, जीवनस्मृत* या आत्मकथांचे अनुवादित लेखनही त्यांनी केले.

हिंदी भाषेतील काही कथासंग्रह ही मराठीत भाषांतरित झालेले पाहावयास मिळतात. वनिता सावंत *(दूविधा, द्वंद)*, विमला जोशी *(पगडंडिया)*, कविता महाजन *(अनुभवाच्या आकाशातील चंद्र, नागयाप्रमाणेच वाजणारे शब्द, रजई)*, आसावरी काकडे *(बोल माधवी)* हे काही उल्लेखनीय कथासंग्रह हिंदीतून मराठीत आणले गेले. तसेच गुजराती भाषेतील अनुवादाच्या संदर्भात सुषमा लेले, अंजनी नरवणे या लेखिकांचा उल्लेख करता येतो. तर *वैदेही, सामान्यातील असामान्य, यु-आर, या* अनंतमुर्ती यांच्या कथा उमा कुलकर्णी यांनी कन्नड मधून मराठीत आणल्या. एम. टी. वासुदेवन नायर याचा *कोडंगत्रावा व कथा गजराजांच्या* अशा मल्याळम कथासंग्रहाचा अनुवाद २००८ ते २००९ या काळात धनश्री हबळे यांनी केला.

२००० नंतरच्या काळातील स्त्रियांनी लिहिलेल्या नाटकांच्या अनुवादाचा अभ्यास

करता उमा कुलकर्णी, संध्या देशपांडे, सरोज देशपांडे, मेघ पानसरे, सुनंदा महाजन या लेखिकेची नावे घेता येतात. २००० ते २०१० या कालखंडातील अनुवादित नाटकांविषयी रूपाली शिंदे लिहितात की, "दोन हजाराच्या दशकात स्त्रियांनी मराठी भाषेत अनुवाद केलेल्या नाटकांपैकी कन्नड नाटकांचे प्रमाण उल्लेखनीय आहे. उमा कुलकर्णी, संध्या देशपांडे, सरोज देशपांडे यांनी केलेले नाटकांचे अनुवाद महत्त्वपूर्ण आहे."[४]

चंद्रशेखर कंबार यांच्या *चाफा* हे नाटक कन्नड लोककथेवर आधारलेले आहे. या नाटकाचा अनुवाद संध्या देशपांडे यांनी केला. आत्मनिवेदन अशी गिरीश कर्नाड यांची *भंगलेलं बिंब* व *पुष्पसाज* ही दोन नाटके सरोज देशपांडे यांनी मराठीत अनुवादित केली आहेत. शिरीष कर्नाड यांच्या *टिपू सुलतानचं स्वप्न, कारेसावरी* या नाटकांना मराठीत उमा कुलकर्णी व सरोज देशपांडे यांनी स्थान मिळवून दिले. संध्या देशपांडे यांनी *दिशांतर* या डी. एस. चौगले यांच्या कन्नड नाटकाचा अनुवाद केला. एकूणच २००० च्या दशकात कन्नड भाषेतील अनेक नाटके मराठी रंगभूमीवर आणण्याचे काम उपरोल्लेखित लेखिकांनी केले. कन्नड भाषेतील नाटकांशिवाय वीणा आलासे सारख्या लेखिकांनी मनोज मिश्रा यांच्या *राजदर्शन* या बंगाली नाटकाचा मराठीत अनुवाद केला. सतिश आळेकर यांच्या *उद्‌ध्वस्त धर्मशाळा,* शफाअतखान यांचे *शोभयात्रा* या बंगाली नाटकांना वीणा आलासेंनी मराठी साहित्यात स्थान मिळवून दिले.

'कविता' हा वाङ्मयप्रकार इतर साहित्यप्रकारांच्या तुलनेने खूपच वेगळा आहे. इतर साहित्यप्रकार हे गद्य स्वरुपात असते तर 'कविता' किंवा 'काव्य' पद्य स्वरुपात असते. कमीत कमी शब्दात जास्तीतजास्त आशय वाचकांपर्यंत पोहचवण्याचे काम 'कविता' हा वाङ्मय प्रकार करतो. कविता ही प्रत्येक वाचकांपर्यंत त्याच्या आकलनातून आशय पोहचवत असते. त्यामुळे स्त्रियांना अनुवादाच्या क्षेत्रात कवितांचे अनुवाद करणे जोखमीचे वाटते. त्यामुळे स्त्री अनुवादित कवितांचे प्रमाण कमी असल्याचे जाणवते. प्रसिद्ध कवयित्री आणि अनुवादक आसावरी काकडे यांनी *बोलो माधवी* या चंद्रप्रकाश देवल यांच्या हिंदी कविता संग्रहाचा मराठीत अनुवाद केला. या अनुवादासाठी त्यांना २००६ चा साहित्य अकादमीचा पुरस्कारही प्राप्त झाला. सुनंदा महाजन या लेखिका व कवयित्रीने हॉलोकॉस्टच्या कविता *जर्मन जयू कवयित्रींची कैफियत* हा कवितासंग्रह मराठीत भाषांतरित करण्याचा प्रयत्न केला. एकूणच २००० ते २०१० या कालखंडात कवितांचे अनुवाद करण्यास मराठी कवयित्रींना हवे तसे यश मिळाले नाही.

कथा, कविता, कादंबरी या महत्त्वपूर्ण वाङ्मय प्रकाराबरोबरच आत्मचरित्र व वैचारिक

साहित्याचाही काही प्रमाणात स्त्रियांनी अनुवाद केल्याचे अभ्यासांती दिसून येते. वीणा आलासे यांनी *राससुंदरी दासी, विनोदिनी दासी, बीनादास* या तीन आत्मचरित्राचा मराठीत अनुवाद केला. तर मृणालिनी गडकरी यांनी बेबी हालदार यांच्या बंगाली आत्मचरित्रांचा व तसलिमा नाजरिन या बांगलादेशीय लेखिकेचा *आमार मेथेबेल्या* हे आत्मचरित्र *माझं कुवारपण* या शीर्षकाने मराठीत आणले. तसेच *आधा लेखा दास्ताऐवज* या इंदिरा गोस्वामीच्या आत्मचरित्राला अपर्णा वेलणकर यांनी *अधीमधी कहाणी* नावाने मराठी वाचकांपुढे ठेवले. *माझं नाव भैरप्पा* हे कन्नड लेखक एस. एल. भैरप्पांचे आत्मचरित्र उमा कुलकर्णी यांनी अत्यंत उत्तमरित्या मराठीत आणण्याचा प्रयत्न केला. *आवारा मजीहा* (शरदिनी मोहिते), *जीवन स्मृती* (नीलिमा भावे) ही अनुवादित आत्मचरित्रेही मराठीत प्रसिद्ध आहेत. वैचारिक अनुवादाच्या संदर्भात शारदा साठे, करुणा गोखले, मीना कर्णिक, सुप्रिया सहस्त्रबुद्धे, श्यामला वनारसे, कमला देसाई या लेखिकांचा उल्लेख करता येतो.

एकूणच २००० ते २०१० या कालखंडात विपुल प्रमाणात लेखिकांनी अनुवाद केलेले दिसून येतात. इतर वाङ्मय प्रकारच्या तुलनेत 'कविता'चे अनुवाद खूपच कमी प्रमाणात झाले. पण इतर भाषा शिकून त्या भाषेतील साहित्य मराठीत आणणे हे जोखमीचे काम मराठी लेखिकांनी उत्कृष्टरित्या पार पाडले आहे. या संदर्भात, डॉ. सुषमा पौडवाल यांनी असे म्हटले आहे की, "अनुवादकार्य हे भाषासमृद्धी, राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक आणि सांस्कृतिक अभिसरणाच्या दृष्टीने फार मोलाचे आणि आव्हानात्मक स्वरूपाचे कार्य आहे. स्त्री अनुवादकांनी २००१ ते २०१० या दशकात हे आव्हान लीलया पेलले आहे."[५] मराठी लेखिकांनी केलेले हे अनुवाद क्षेत्रातील काम वाखाणण्याजोगे आहे. या अनुवादामुळे मराठी साहित्यात भर तर पडलीच याशिवाय मराठी वाचकांना इतर प्रदेशातील भाषा, संस्कृती, निसर्गसौंदर्य, मानसिकता यांचेही दर्शन होते. त्यामुळे अनुवादित साहित्यकृती या त्यांच्यातून व्यक्त होणारा आशय, जीवनदर्शन आणि कलानिर्मिती यांची पार्श्वभूमी घेऊन संस्कृती दर्शन घडवितात.

**संदर्भ ग्रंथसूची**

१) स्त्री साहित्याचा मागोवा खंड-१ पृ. २६२

२) तत्रैव पृ. २६६

३) स्त्री साहित्याचा मागोवा खंड-२ पृ. ६२८

४) स्त्री साहित्याचा मागोवा खंड-४ पृ. ३६४

५) ) तत्रैव पृ. ३८८

## घटक:इ - स्त्रीलिखित संपादित साहित्य

### अ)१८५० ते १९५० या कालखंडातील स्त्रीलिखित संपादित लेखन

रमाबाई जोशी यांचे १८५७ साली प्रकाशित झालेले संपादित पुस्तक म्हणजे *काकड आरत्या, गाणी व काही घरगुती वैद्यकीय उपचार* हे होय. रमाबाई जोशी या आपल्या संग्रहाला *संपादिका* म्हणून नाव लावतात. तसेच त्या संग्राहक सुद्धा आहेत. त्यांनी सर्व संत मंडळींचे अभंग, गीते यांचा सहभाग नोंदविलेला दिसून येतो. तसेच स्वतः रचलेली गाणी हे देखील त्यामध्ये असलेले दिसून येते. तसेच अंतिम पानावर घरगुती औषधे, उपचारपद्धती दिलेली आहेत. या पूर्वीच्या कालखंडात देखील 'कविता पाठवावेत' असे आवाहन करून महाराष्ट्रातील बऱ्याच ठिकाणाहून कविता येत असत. याचे श्रेष्ठत्त्व आणि श्रेयत्त्व सरस्वतीबाई भिडे यांच्याकडे जाते. त्यांनी १९२२ साली *अभिनव काव्यमाला* हा संग्रह संपादित केलेला दिसतो.

सरस्वती भिडे यांनी 'संपादन' या वेगळया प्रकाराला सुरुवात केली. कविता संग्रह करायचा आहे, त्यासाठी स्त्रियांनी आपापली कविता प्रकाशित व्हावी असे वाटत असेल, तर त्यांनी माझ्याकडे द्यावीत, असे आवाहन त्यांनी *ज्ञानप्रकाश* व *केसरी* यातून केले. संपादन प्रक्रिया सरस्वतीबाई यांनी उत्तमपद्धतीने सांभाळली. ९८ कवितांचा समावेश या संग्रहात झाला. त्यात ३२ कवयित्रींचा सहभाग होता. यात परंपरा व आधुनिकता असे दोन प्रवाह आले आहेत. सर्व तऱ्हेच्या कविता यांच्या पुस्तकात समाविष्ट झालेल्या दिसतात.

संपादनाचे मूळ प्रयोजन म्हणजे स्त्रियांमध्ये साहित्याची विशेष रुची, आवड, निर्माण करून तसेच कवयित्रींना प्रेरणा देणे, त्याचबरोबर नवोदित कवयित्रींचे असलेले कवितासंग्रह प्रसिद्ध करावे त्यामुळे त्यांच्यात आत्मविश्वास वृद्धिंगत होईल. तसेच नवी साहित्यकृती निर्माण व्हावी असा ही उद्देश्य होता.

वेणूताई मोडक या अहमदनगर येथील वाङ्मयोपासक मंडळाच्या संपादिका होत्या. त्यांनी १९३२ साली *कलिका* काव्यसंग्रह प्रसिद्ध केला. त्याचबरोबर संपादिका अनुबाई वहिनीसाहेब घोरपडे (इचलकरंजी) यांनी १९३३ साली *कवी – कूजन* हा काव्यसंग्रह संपादित केला. काशीबाई कानिटकर यांचे कन्यारत्न म्हणजेच अनुबाई होय. राजकुमारी अक्कासाहेब पंत यांनी १९३४ साली *भावलेखा* हा काव्यसंग्रह संपादित केला. यामध्ये औंधच्या संस्थानामधील कवींच्या कविता आहेत. हे संस्थान म्हणजे कलेचे माहेरघर म्हणून ओळखले जाते, असे त्या सांगतात.

या सर्व काव्यसंग्रहावरून असे लक्षात येते की, त्यात सखोलपणा असा दिसत नाही. तसेच प्रत्येक कविता त्यांनी ग्रंथात समावेश केलेला दिसत नाही. राजकुमारी अक्कासाहेब यांनी *हिमकालिका* हा कथासंग्रह संपादित केला. यामध्ये वा. ना. देशपांडे, ना. धों. ताम्हणकर, स्वतः अक्कासाहेब, वा. धों. गुर्जर या सर्वांच्या कथा असलेल्या दिसतात.

*हिमकालिका* याचे प्रकाशन करताना संपादिकेने आपले मनोगत व्यक्त केले नाही. त्यामुळे संपादनाचा नेमका तो अर्थ काय? प्रयोजन, उद्देश्य काय? असा प्रश्न निर्माण होतो. केवळ लेखकांना व्यासपीठ मिळावे व वाचकांना कथा साहित्यप्रकाराचा आस्वाद मिळावा यासाठी निर्मिती झाली असे वाटते. तसेच चांगला वाचकवर्ग मिळवून देण्याचे श्रेयत्त्व या संपादनाकडे जाते.

नारायण सीताराम फडके म्हणजेच ना. सी. फडके यांच्या वाणीने भरलेली सभा मंत्रमुग्ध होत असत. त्यांचे हे वक्तृत्व लेखणीबद्ध करण्याचे काम कमल दीक्षित यांनी केले. त्यांनी १९४० साली *प्रो. फडके यांची गाजलेली भाषणे* यावर ही भाषणे संपादनाद्वारे निर्माण केली. खरे तर या पुस्तकास संपादित म्हणून ओळखले जात नाही. परंतु साचा मात्र संपादितपणाचा दिसतो. त्यामुळे, याची नोंद ठेवणे गरजेचे ठरते. ना. सी. फडके यांच्या वक्तृत्वशैलीची निश्चितता जाणवते.

१९२९ साली साताऱ्याच्या 'ऐक्य संपादन मंडळा'ने *हरिभाऊंची पत्रे* संपादित केली. यामध्ये लेखिका काशीताई कानिटकर व गोविंदराव कानिटकर यांना *हरिभाऊंनी लिहिलेल्या पत्रांचा संग्रह.* यामध्ये प्रस्तावनेचे कार्य वा. ना. देशपांडे यांनी केलेले दिसते. तर *दोन शब्द* असे काशीताईंचे मनोगत आहे. यावर संपादिकेचे नाव नाही; परंतु सारे श्रेयत्त्व काशीताईंकडेच जाते.

एकूणच नेमक्या अशा संपादनाचा विचार प्रत्येकाने साहित्यनिष्ठा या उद्देश्याने केले. त्यांनी संपादिलेल्या ग्रंथात पुरुष आणि स्त्री यांचा सहभाग दिसतो. तसेच स्त्रियांचे संपादन सदोष व पुरुषांचे निर्दोष असे थोडेफार दिसून येते. परंतु कमी-जास्त दोष दोघांतही आहेत हे सुद्धा तितकेच जाणवते.

आजच्या आधुनिक युगात जितकी योग्य अशी मूल्ये दिसत आहे. तशी १९५० साली व त्यापूर्वी तशी दिसत नव्हती. तसेच आताच्याप्रमाणे हा वाङ्मयप्रकार महत्त्वाचा ठरतो. तसा पूर्वी मात्र ह्या वाङ्मयप्रकाराला फार असे महत्त्वाचे स्थान नसलेले दिसते.

# संपादित साहित्य घटक २

## ब) १९५० ते २००० या कालखंडातील स्त्रीलिखित संपादित लेखन

१९५० नंतर स्त्रियांची शैक्षणिक उन्नती होऊन त्यांची काही संपादने झालीत. या संपादित प्रकाशनाची सुरुवात म्हणी, ओव्या, लोकगीत यांच्या संकलनाने झाली. याचे स्वरूप संग्रह व नंतर प्रस्तावना अशी झाली. या काळात ६० संपादने पुस्तके दिसतात. त्याचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे –

१. एकाच व्यक्तीच्या साहित्याचे कार्य कर्तृत्वाचे संपादन.
२. साहित्य प्रकारचे संपादन.
३. प्राचीन साहित्य हस्तलिखितांचे संपादन.
४. चर्चासत्रांचे संपादन.

उषाबाई दामले यांनी *महाराष्ट्रातील स्त्रियांची मुखोद्गत गीते* यांचे एकत्रीकरण करून मे १९५२ मध्ये ती प्रसिद्ध केली. कुसाबाई दत्तोपंत दामले या संग्राहिका होत्या. तर मालतीबाई दांडेकर यांनीही *सातारा जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील स्त्रियांचे काव्य लोकसाहित्याचे लेणे* या पुस्तकात केले. यात पहिल्या भागात स्नेहबंध, कृषीजीवन सांगणाऱ्या ओव्या तर दुसऱ्यात कौटुंबिक ओव्या, तिसऱ्यात समाजदर्शन व चौथ्यात भाषेचे लेणे आदि विषय होते.

स्त्रीच्या भावजीवनाचा मागोवा घेणारी अनेक कवने, उखाणे, कथा, भारुडे, ओव्या, कहाण्या, स्त्रीगीते, आख्यायिका इत्यादीचे सहकार्यासह संकलन केले. त्यांपैकी पहिले संपादन हे *सुंबरानं मांडिलं* हे सरोजिनी बाबर यांचे १९५७ साली प्रसिद्ध झाले. सुंबरानं म्हणजे स्मरणपूर्वक. मानवी स्वभाववैशिष्ट्यांचे वर्णन करणारी २० गाणी व कथांचा समाविष्ट आहे. सरोजिनीबाईंनी *जा माझ्या माहेरा* या पुस्तकात 'माहेर' या शब्दातील मायेचा ओलावा सांगणाऱ्या गीतांचे संकलन केले. आदि स्त्रीमनाची अवस्था १५ लेख व स्त्रीगीतांतून सांगितली. तर दिनानाथ दलाल यांनी रंगीत चित्र रेखाटली. लोकसंस्कृती व लोकसाहित्य अभ्यासक व संशोधक यांचे १५ जुलै १९६४ साली संमेलन झाले. त्यात ४ ओळीच्या संकलनाने ते संकलन म्हणजे यशवंतराव यांच्या संकलनाने *लोकसाहित्य साजरिणगार* हे निराळे ठरते. लोकजीवनाची व्यक्तिदर्शने म्हणजे हे लोकसाहित्य असे ते म्हणत. तर २१ संशोधकांचे सरोजिनी बाबर यांच्यासह लेख आहेत.

संग्रहित लोकगीतांचे संकलन बाबर यांनी *जनलोकाचा सामवेद* या नावाने संपादित केले. नऊशे पानांचा ग्रंथ एकवीस भगत आहे. शेवटी परप्रांतीय लोकांची लोकगीतेही समाविष्ट आहेत. तसेच बाबर यांनी *जाई-मोगरा* व *तीर्थांचे सागर* यांची दोन संकलने केली आहेत. तसेच लहान मुलांसाठी, सर्वत्र रूढ झालेल्या २१ कथासंग्रह *सांगी-पांगी* या नावानेच डॉ. सरोजिनी बाबर यांनी संपादित केले. या पुस्तकांची शीर्षके ही मनोवेधक असत. तर *राजविलासी केवडा* या नावाने पती-पत्नींचे मधुर प्रीती असणाऱ्या ओव्या-उखाणे, लोकगीते, लग्नाची गाणी, इत्यादीचे संकलन आहे. तसेच मालती शर्मा यांचा लेख हिंदी भाषेतील *जोगीजीवन* व *डोग्रा पहाडी फोकसाँग्ज* हा इंग्रजी लेख डॉ. करणसिंग या सर्व लेखांमुळे पुस्तक फार उपयोगी ठरले. १९९२ मध्ये *कारगिरी* या बारा बलुतेदारांची ओळख करून देणारे पुस्तक त्यांनी संपादिले. या पुस्तकांची १९५७ साली मालिका सुरु करून या पुस्तकाचे योगदान डॉ. सरोजिनी बाबर यांनी लोकांसमोर दाखविले. बंगाली बालगीतांचा अनुवाद दुर्गा भागवत यांनी *लोकसाहित्य* या नावाने केला. हे बालगीत रवींद्रनाथ ठाकूर यांनी संकलित केले. १८८४ पासून स्वतः भटकंती करून बालगीते गोळा केले आहेत.

१९५० ते १९७५ या काळात व्यापक असे लोकसाहित्य नाही. निवडक कवितांची संपादने यात मर्ढेकर यांच्या *अजून येतो वास फुलांना* या कवितेसह थॉमस हार्डी यांच्या ही कविता दिसते. डॉ. अनुराधा पोतदार यांनी *बाल विहंग* नावाने एकच कवी घेऊन त्यांच्या निवडक काव्याचे रसग्रहणात्मक प्रस्तावनेसह पुस्तक संपादित केले. यात बालकवींच्या ७५ कवितांचा समावेश आहे. *आनंदी आनंद गडे, कवी बाळे, निर्झरास, फुलराणी बालविहग* इत्यादीचा समावेश आहे. स्वतः अनुराधाताईंनी बालकवींची कविताही उलगडली आहे.

काव्यसमीक्षेचा संग्रह १९६१ मध्ये डॉ. सरोजिनी वैद्य, सरोजिनी कुलकर्णी यांनी केले. तसेच लेखक, कवी यांच्या वाङ्मयपरिचयाचा आढावा *मराठी साहित्य दर्शन* (मालिका) यातून दिसते. या मालिकेतील पुस्तकात संजीवनी मराठे यांच्या सहा काव्यसंग्रहातील काही निवडक कविता आहेत. प्रस्तावनेत त्यांच्या गुण-दोषांचे अभ्यास आहेत. त्यात १९४३ ते १९६१ पर्यंतच्या सर्व काव्यातिहास दिसून येतो. डॉ. वर्टी यांच्या कथांचे दोन भागात संपादन डॉ. सुमती पंडित कुलकर्णी यांनी *परिपाक* यामध्ये केले. त्या *अमृत* मासिकाचे संपादक होत्या. यांची कथांची जात विनोदी असे. चि. वि. जोशी यांच्याशी साधर्म्य दाखवणारी आहे. डॉ. अनुराधा पोतदार यांनी पं. महादेवशास्त्री जोशी यांच्या निवडक कथांचे संकलन (एकत्रीकरण) *कांचनाची निरांजने* या नावाने केले. हा शब्दप्रयोग बा. भ. बोरकरांच्या एका प्रेमकवितेत आहे. यात १२ कथा आहेत. पुत्रवती, घर, रिघी या कथा

आहेत. शांता शेळके यांनी *निशिगंध* हे प्र. के. अत्रेंचे साहित्यसंपादन केले. लता मंगेशकर यांची २५ वर्षे पूर्ण झाल्यामुळे *रौप्यमहोत्सवी स्मरणिका* २५ एप्रिल १९६७ साली प्रकाशित झाली. हे पुस्तक संपादित करणारे शांता शेळके, डॉ. सरोजिनी वैद्य व वृंदा लिमये इत्यादी होय.

ह. रा. महाजनी यांनी *रविवारची चिंतनिका* हे १९६४ पासून १९६७ पर्यंत दर रविवारी सदर लिहित असत. ते पुढे नष्ट होऊ नये म्हणून त्यांच्या कन्या कमलिनी फडके यांनी संपादित केले. एकूण २४ लेख *चिंतनशलाका* या पुस्तकात आहे. एका विषयावर संशोधन करून निष्कर्ष पुस्तकरूपाने मांडण्याचे कार्य माया सरदेसाई यांनी *मराठी रंगभूमीचा उषःकाल* या ग्रंथात केले. तंजावरचे २ रे शाहराज भोसले (इ. स. १६७४ ते १७११) यांची नाटके ही मराठीतील पहिली उपलब्ध नाटके आहेत.

अशाप्रकारे 'संपादन' या वाङ्मयप्रकारात लोकसाहित्याची संपादने, निवडक कवितांची संपादने, गद्य लेखनाची संपादने, व्यक्तिविशेष संपादने, साक्षेपी संपादने, संशोधनात्मक संपादने, चर्चा लेखनाची संपादने इत्यादी संपादनांचा विचार या भागात केलेला दिसून येतो.

## संपादित साहित्यः

घटक – २

केलेल्या अभ्यासाचे अचूक वर्गीकरण म्हणजे वर्गीकरण करण्याचे कौशल्य होय. हे कौशल्य म्हणजेच संपादनकौशल्य असे दिसते. यात स्त्री, पुरुष संपादन करीत असतात. लेखकाला जसे ग्रंथाचे श्रेय दिले जाते, तसे संपादकाला संपादिताचे दिले जात नाही. तर त्यात असणाऱ्या लेखकांच्या लेखाला दिले जाते. ललित, वैचारिक अशाप्रकारचे ही लिखाण स्त्रीलेखनातून दिसते. या काळात स्त्री-संपादने भरपूर झाली. लोकसाहित्य व लोककला यातील संपादने सरोजिनी बाबर करतात. समीक्षा विषयक साहित्याचा तात्त्विक विचार डॉ. सरोजिनी वैद्य इत्यादींनी केले आहे.

**संपादनातील प्रकार.**

१. कविता.
२. कथा.
३. कादंबरी.
४. नाटक.
५. आत्मचरित्र.

६. लघुनिबंध.

७. पत्रसंग्रह.

८. भाषणसंग्रह.

९. समीक्षात्मक.

१०.प्रबंधाच्या साररूपांचे संपादन.

तसेच गौरवाच्या प्रेरणेतून संपादने, साहित्यकृतीच्या गौरवार्थ संपादने, एकाच लेखकाच्या निवडक साहित्याची संपादने, एका साहित्य प्रकारची प्रातिनिधिक संपादने, चर्चासत्रातील शोधनिबंधाची संपादने, अभ्यासक्रमानुसार संपादने, इत्यादी संपादनाचा यात समावेश असून या सर्वांनी साहित्यात मोलाचे योगदान दिलेले दिसून येते. त्यामुळे त्यांचा उल्लेख करणे गरजेचे ठरते.

संपादनामागील असणारी प्रेरणा फार महत्त्वपूर्ण असते. या प्रेरणेनुसार संपादनांचे वर्गीकरण नेमके व स्पष्ट होईल असे लक्षात घेऊन मांडणी केली. या काळातील स्त्री-संपादनांच्या अध्ययनानंतर प्रमुख प्रेरणा पुढीलप्रमाणे –

१. गौरवपर –

i. लेखकाचा गौरव करण्याच्या हेतूने निर्माण झालेली संपादने

ii. साहित्यकृतीचा गौरव.

२. अप्रत्यक्ष गौरवपर –

एका लेखकाचे निवडक साहित्य.

३. शोधनिबंधावरून संदर्भ तयार करणे.

४. स्त्रीवादी भान.

५. विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमाप्रमाणे.

इत्यादी प्रेरणा असलेल्या दिसून येतात.

संपादक हा प्रस्तावनेत परिचयात्मक, गौरवपर लिखाण करतात. हे संपादन आस्वादक पद्धतीचे असते. संपादितांनी या काळात बरीच पुस्तके लिहिली.

उदाहरण *मी पाहिलेले यशवंतराव*– सरोजिनी बाबर (१९८८) *जन्मशताब्दी* – त्र्यं. शं. शेजवलकर : *व्यक्तित्व व कर्तृत्व* – सरोजिनी वैद्य (१९९५).

डॉ. चिं. ना. परचुरे व डॉ. सुप्रिया अत्रे यांच्या सहसंपादनातून अप्रकाशित साधनांतून

दिसणारे आनंदी गोपाळ (१९९७) हे महत्त्वपूर्ण ठरते. तसेच प्रा. वीण देव यांनी १९८४ साली *कादंबरीकार गो. नी. दांडेकर* हे पुस्तक संपादित केले.

साहित्यकृतीच्या गौरवार्थ झालेल्या संपादनात आनंद यादव – *गोतावळा – साद व प्रतिसाद* (१९९१) कीर्ती यादव यांनी संपादिले आहे. *मनोहर तरी... – वाचन व विवेचन* हे २००० साली विजया राजाध्यक्ष व श्री. पु. भागवत, तर *// स्वामी // एक शोध* २००१ मीरा धांडगे व *विशाखा : अर्घ्यदान* – १९९४ डॉ. उषा देशमुख इत्यादींनी संपादित केलेले दिसते.

तसेच एका लेखकाच्या निवडक साहित्य संपादनात १९८२ साली शांता शेळके यांनी *रत्नाकर मतकरी निवडक गूढकथा,* अनुराधा पोतदार १९८३ साली वि. न. कुलकर्णी संपादित *कविता मृगधारा मनातले, अत्रे – शिरीष पै* (१९९७) व वामन देशपांडे, नंदा पैठणकर (१९९४) *प्रिय. जी. ए. स. न. वि. वि. निवडक रा. भि. जोशी* (१९९६) – नीलिमा भावे *प्रभा गणोरकरांनी गंगाधर गाडगीळ : व्यक्ती व सृष्टी* (१९९७) संपादित झाला.
डॉ. वि. भा. देशपांडे व स्नेहल तावरे यांनी १९९० मध्ये *मराठी भाषा व साहित्य* १९६० ते १९८५ हे पुस्तक संपादन केले. मराठी भाषेचा विस्तार, विकास यावर निबंधलेखन केले. अविनाश आवलगावकर व मृणालिनी शहा यांनी *मराठीचे भवितव्य* २००१ हे पुस्तक संपादित केले. वि. भा. देशपांडे व सुषमा जोगळेकर यांनी २००० साली *मराठी कलाभिरुची* हे संपादित केले.

अभ्यासक्रमानुसार ही काही संपादने असलेली दिसतात. यामध्ये *त्रिदल* (१९९४), *साहित्यविचार* (१९९५), *चौरंगी* ही छोटेखानी पुस्तके सर्व विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिली. *सौंदर्योत्सव* (१९९६) व *चैतन्यवेळ* (१९९८) ही प्रातिनिधिक काव्यसंपादने आहेत. पुष्पा राजापुरे यांनी १९९३ साली *सुर्वे यांचे विद्यापीठ* हे पुस्तक संपादित केले. *भाषांतर मीमांसा* (१९९७) हे पुस्तक अंजली सोमण व कल्याण काळे यांनी संपादित केलेले असल्याचे दिसून येते. विखागौरी टिळक व डॉ. द. दि. पुंडे यांनी *मराठी वाङ्मयाची सद्य:स्थिती* (१९९८) नावाचे पुस्तक संपादित केले.

अशाप्रकारे १८५० – १९५० आणि १९५१ ते २००० या कालखंडातील स्त्रीलिखित असलेले संपादित साहित्य हा वाङ्मय प्रकार विशेष उल्लेखनीय ठरलेला दिसून येतो. या वाङ्मयप्रकाराने मोलाचे योगदान दिलेले आहे. इतर वाङ्मयप्रकाराप्रमाणे महत्त्वपूर्ण ठरणारा हा संपादित वाङ्मय प्रकार सुद्धा अतिशय महत्त्वाचा ठरतो !

### क) २००० ते २०१० या कालखंडातील स्त्रीलिखित संपादित लेखन

एखादा विशिष्ट विषय पक्का करून त्यावर लिहिण्यास प्रेरणा देणे, प्रेरित करणे, त्या लेखाचे एकत्रीकरण करणे व लेखांची सुयोग्यरीत्या मांडणी करणे हे सर्व म्हणजेच संपादन होय. संपादक हा सर्व विषयांना धरून मांडणी करीत असतो. म्हणजेच राजकीय, सामाजिक, आर्थिक, साहित्यिक कोणत्याही विषयानुसार मांडणी करीत त्यात भर घालत असतो. या सर्व पार्श्वभूमीवर भेदभाव न ठेवता स्त्रियांचेही मत-मतांतरे संपदना द्वारे व्यक्त झाल्याचे दिसते.

सामाजिक स्थित्यंतरातील वास्तवचित्र, बदलती वाङ्मयीन विचारकृती, एखादी कलाकृती एककेंद्रित करून त्याविषयी संपादित करणे, चर्चा, शिबिरे यातील विषय हाताळणे, व्यक्तिविशिष्ट अभिनंदनपर संपादन इत्यादी प्रेरणा या संपादनामागे असल्याचे जाणवते.

स्त्रियांना सामाजिकदृष्ट्या असलेले महत्त्व, त्यात झालेली बदलते स्वरूप, पद्धती याचा ऊहापोह विद्या बाळ, विद्युत भागवत, डॉ. गीताली वि. मं., पुष्पा भावे, सुमती लांडे यांनी आपल्या संपादनात नोंदविल्याचे दिसते. तसेच राजकारण, समाजकारण, आर्थिकता यानुसार ही स्त्रियांचा विचार केला जातो.

डॉ. गीताली वि. मं. यांचा संपादित ग्रंथ म्हणजे *स्त्रीप्रश्न सोडवताना* (२००९), रोहिणी गवाणकर व उषा ठक्कर यांचा *घडता घडविता....* (२००७) तर वसुधा जोशी व लता जाधव यांचा *सामाजिक परिवर्तन : चिकित्सा व उपाय* (२००९) या सहसंपादित ग्रंथ असल्याचे दिसते. या संपादनावरून स्त्रिया ह्या पुरुषांप्रमाणे कशा सक्षम आहेत हा विचार मांडला आहे. सुमती लांडे यांनी २००७ साली *स्त्रीपुरुष नातेसंबंध* हा ग्रंथ संपादित केला. स्त्रीपुरुष नातेसंबंधाला फारच महत्त्व असल्याचे त्यांच्या या ग्रंथातून दिसते. तसेच सुमती लांडे व श्रुती तांबे यांनी २००३ साली *स्त्रीवाद* हा ग्रंथ संपादित केला. त्यात पुरूषी व्यवस्थेमागील ऐतिहासिक, आर्थिक, राजकीय अशी कारणे शोधली. तसेच सुमती लांडे यांनी २००८ साली *शब्दालय* या दिवाळी अंकातून *वाङ्मयीन चळवळी व दृष्टीकोन* हा ग्रंथ संपादित केला.

ज्योती लांजेवार, शुभदा देशमुख, शैला लोहिया, निर्मला पुरंदरे, कुसुम कर्णिक, कुमुद रेगे इत्यादींनी *घडता घडविता* या ग्रंथात आत्मकथनपर लेख लिहिले. इतरांचे व त्यांचे स्वतःचे जीवन यामुळेच बदललेले दिसून येते. हा ग्रंथ लिहिला. मराठीपणाची व्यापकता त्यांनी आधुनिक काळाच्या साहाय्याने मांडलेली दिसते.

मृणालिनी शहा व अविनाश आवलगावकर यांनी *मराठीचे भवितव्य* हा ग्रंथ संपादित

केला. जागतिकीकरणाच्या महासागरात मराठीचे स्थान यावर भर दिलेला दिसतो. तसेच जागतिकीकरणाच्या क्षेत्रातही स्त्रियांचा सहभाग उत्तरोत्तर वाढत असलेला दिसत आहे.

शुभदा चौकर यांनी २००८ साली संपादिलेला ग्रंथ म्हणजे *सक्षम मी* हा होय. यामध्ये गावोगावी निर्माण केलेले प्रकल्प व त्यांची (प्रकल्प) झालेली यशोमय वाटचाल यावर भाष्य केलेले दिसते. याचे श्रेयत्व सत्ताकेंद्रित महिलांकडे जाते.

अंजली मुळे व डॉ. गीताली वि. मं. यांच्या संपादित ग्रंथातून *स्त्री चळवळ व राजकारण, समतेसाठी सत्तासंघर्ष* (२००१) हा ग्रंथ लिहिला. यामध्ये स्त्री-पुरुषांची सामाजिक भानाविषयी, त्यातून स्त्रियांना मिळणारा मान या सर्वांविषयी दोघांचीही सदविवेकबुद्धी जागृत ठेवण्याचे कार्य त्यातून केलेले दिसते.

प्रतिमा जोशी व पुष्पा भावे यांच्या *शोध बाईमाणसाच्या जिन्याचा* (२००४) हा ग्रंथ संपादित केला. व इतरांनी स्त्री जीवनमानाचा चिकित्सकपणे शोध घेतला. तसेच या काळात आता पहिल्यांदा राजकीय क्षेत्रावर, विषयांवर संपादने निर्माण होऊ लागली आहेत.

समाजाचे प्रवाह जसे बदलतात तसे साहित्याचेही प्रवाह बदलत असतात. समाजाचे प्रतिबिंब हे साहित्यकृतीत निर्माण होत असतात.

विद्या विद्वंस, पद्मजा फाटक, दीपा गोवारीकर यांनी २००४ साली *बापलेकी* हा ग्रंथ संपादित केला. यामध्ये वडील या भूमिकेत काळानुसार कसे बदल होत गेले, तसेच सामाजिकता, मानसिकता यामध्ये कसे बदल होत गेले. ते ही येथे संपादकांनी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच बापलेक या दोघांच्या नात्यांचा वेध ही घेतला आहे.

'साहित्यप्रेमी भगिनी मंडळ' या संस्थेने संशोधन विभाग १९९७ साली सुरु केले. तसेच ही संस्था साहित्यिक वातावरणाला भरीव योगदान देत असे. यांच्यातर्फे *स्त्री साहित्याचा मागोवा (इ. स. १८५० ते २०००)* हा त्रिखंडात्मक प्रकल्प असून तो त्यांनी पूर्णत्वास नेला. इ. स. १८५० ते १९५० हा पहिला खंड आहे. तर इ. स. १९५१ ते २००० हा दुसरा खंड असून तिसरा मात्र पुस्तकांची अद्ययावत सूची यांचा आहे. तसेच लेखिका यांचा ही परिचय आहे. या प्रकल्पाचे संपादन विनया खडपेकर, डॉ. मंदा खांडगे, डॉ. लीला दीक्षित, डॉ. अरुणा ढेरे यांनी केलेले दिसून येते.

डॉ. निशिकांत मिरजकर, डॉ. नीलिमा गुंडी, डॉ. विद्या देवधर, डॉ. मंदा खांडगे यांनी *भारतीय भाषांतील स्त्री साहित्याचा मागोवा* हा ग्रंथ २००७ साली प्रकाशित झाला. हा ग्रंथ म्हणजे द्विखंडात्मक होय. भारतीय संविधान मान्यताप्राप्त असलेल्या वीस भाषेतील स्त्री वाङ्मयाचा विचार केला. तसेच अनुवाद, लेखक, शब्दार्थ यांची सूची त्याचबरोबर संपादक

यांचाही / या सर्व सर्वांचा परिशिष्टात विचार झालेला दिसतो. यावरून संपादनाचे श्रम लक्षात येते. विविध साहित्यकृतीतून स्त्री अभिव्यक्त होऊ लागली.

डॉ. स्वाती कर्वे यांनी *स्त्रीविकासाच्या पाऊलखुणा* हा ग्रंथ संपादित केला. तसेच त्यांनी २००८ साली *स्त्रीविकासाचे नवीन क्षितीज* हा ग्रंथ ही संपादित केला. यात त्यांनी १९५० ते २००७या कालखंडातील स्त्रियांच्या विकासाविषयी भाष्य केले आहे.अभ्यासला आहे. त्याचबरोबर २००९ साली प्रकाशित झालेला *स्त्रियांची शतपत्रे* मधील विविध नियतकालिकातील स्त्रियांच्या १०० पत्रव्यवहारांचे, वैचारिक लेख या सर्वांचे संपादन झालेले आहे. मेधा राजहंस आणि विद्या बाल यांनी *मिळवतीची पोतडी* (२००५) याचे संपादन केले. त्यामध्ये घर, नोकरी सांभाळणाऱ्या स्त्रियांनी व ग्रामीण भागातील स्त्रियांनी या संपादनासाठी लेख लिहिले.

डॉ. नीलिमा गुंडी यांनी २०१० साली *स्त्रीमिती* हा ग्रंथ संपादित केला. तसेच या ग्रंथाला प्रास्ताविकतेचे श्रेय पुष्पा भावे व मनोगताचे श्रेय विद्या बाळ यांच्याकडे जाते.

२००८ साली डॉ. मेधा सिधये यांनी *नाट्यसंमेलनाध्याक्षांची भाषणे* हा ग्रंथ संपादित केला. यामध्ये १९४९ ते २००० या स्वातंत्र्योत्तर काळातील नाट्यसंमेलन अध्यक्ष यांची भाषणे संपादित केलेली आहेत. तसेच उज्ज्वला मेहेंदळे यांनी २००८ साली *दुसऱ्या पिढीचे आत्मकथन* हा ग्रंथ संपादित केला. यामध्ये संपादक, नाटककार, साहित्यिक, पत्रकार अशा आत्मकथनांचा समावेश आहे. त्यामध्ये एकूण ३७ आत्मकथने आहे. या लोकांचे अनुभवविश्व वाचक, रसिक यांच्याकडे आत्मकथनांची दालने उघडावीत, हा उद्देश्य होता. तृप्ती अंधारे यांनी २००७ साली *श्वास नवे कवितेचे* हा कवितासंग्रह संपादित केला. यामध्ये मराठवाड्यातील नवोदित कवींच्या कविता त्यात असलेल्या दिसून येतात. यामध्ये १२ नवोदितांच्या कवितांचा समावेश असलेला दिसतो. तसेच २००७ साली उषा खंदारे यांनी *कविता स्त्रीजाणीवेच्या* याचे संपादन केले. हे संपादन काळाशी साम्यत्व दर्शविणारे ठरते. त्याचबरोबर डॉ. लीला दीक्षित यांनी २००७ साली *शतकातील बालकविता* याचे संपादन केलेले आहे. यामध्ये नामवंत असलेल्या कवींच्या बालकवितेच समावेश आहे.

*उन्मेख* या कवितासंग्रहाचे संपादन मीरा शिंदे व शलाका माटे, मंदा खांडगे यांनी केले. तसेच २००१ साली डॉ. विद्युल्लेखा अकलूजकर यांनी *विदेशिनी* हा ग्रंथ संपादित केला. यामध्ये *एकता* नावाच्या त्रैमासिकातील कथांचा समावेश आहे. हे त्रैमासिक कॅनडा या देशातून प्रकाशित होत. ते २१ वर्षांपासून प्रकाशित झालेले दिसते. २००४ साली *मराठी कथा : विसावे शतक* हा ग्रंथ सुधा जोशी व के. ज. पुरोहित यांनी संपादित केला. तसेच डॉ.

पुष्पा राजापुरे – तापस यांनी *१९८० नंतरचे स्त्रीनिर्मित कथनपर साहित्य* हा ग्रंथ संपादित केला. तसेच २००४ साली सतीश जकातदार व वंदना भले यांनी *फ्लॅशबॅक* हा ग्रंथ संपादित केला. १९६१ ते १९६८ या कालखंडातील चित्रपटाविषयी लेखांचे संपादन केले. मनोरंजनापेक्षा वाचकवृंदांना विचार करण्यास भाग पाडावे, यासाठी या संपादनाचा उद्देश्य दिसतो.

बालकांच्या मनात साहित्याची आवड निर्माण केली ते म्हणजे *किशोर* मासिकाने. २००७ साली *निवडक किशोर* या सप्तखंडात्मक संपादनामधून ज्ञानदा नाईक यांनी पहिल्या दोन खंडात निवडक *कथा व कविता* यांचे संपादन तर तिसऱ्यामध्ये *कादंबरी,* चौथ्यामध्ये *एकांकिका,* पाचव्यात *दीर्घकथा,* सहाव्यात *गंमतगाणी* व सातव्या खंडामध्ये *कादंबरीकार* (भाग २) अशी वर्गवारी केली आहे. याचे संपादन २००८ साली झाले.

२००१ साली माधुरी पुरंदरे त्यांच्यासोबत सहसंपादक म्हणून नंदिता वागळे या दोघींनी *वाचू आनंदे* हा ग्रंथ संपादित केला. या ग्रंथाचे कुमार व बाल असे विभाग केलेले आहेत. या अशा विस्तृत संपादनाची पातळी दिसून येते. तसेच परंपरागत आलेल्या साहित्याचे संवर्धन करणे हे सुद्धा दिसते. २००८ साली *छात्रांचे विचारवैभव* या ग्रंथाचे संपादन संगीता पुराणिक यांनी केले. त्याचबरोबर २००२ साली प्रतिमा इंगोले यांचे *वऱ्हाडी लोकगाथा,* ललिता नाडकर्णी यांचे २००५ चे ग्रंथसंपादन म्हणजे 'सार्थक *वाटे झालिया वेचांचे (भाग २),* तर २००२ साली नंदा सुर्वे यांनी *ओव्या विठाईच्या* हा ग्रंथ संपादित केला. तसेच २००२ साली सिसिलिया कार्व्हालो यांनी *हिंदोळा* हा ग्रंथ संपादित केला. यामध्ये वसईमधील ख्रिस्ती धर्मातील परंपरागत लोकगीतांचे संकलन केले आहे.

संपादनाचे विषय हे अनेकदा चर्चासत्रे, शिबिरे यामधून आलेले असतात. २००८ साली विजया राजाध्यक्ष यांनी *मराठी कादंबरी : आस्वादयात्रा* हा ग्रंथ संपादित केला. हा ग्रंथ पॉप्युलर प्रकाशनातर्फे 'मराठी साहित्य आस्वाद' या शिबिराचे आयोजन केले. तसेच २००७ साली डॉ. मृणालिनी शहा व डॉ. विद्यागौरी टिळक यांनी पुणे विद्यापीठात झालेल्या मराठी विभागाकडून चर्चासत्राचे संपादन केले. तेव्हा *आधुनिक मराठी साहित्य व सामाजिकता* हा ग्रंथ संपादित केला. अंजली मुळे यांनी *निःशब्दता ओलांडताना* हा ग्रंथ संपादित केला.

डॉ. जयश्री पाटणकर यांनी २००५ साली *सामाजिक भाषाविज्ञान : कक्षा आणि अभ्यास* हा ग्रंथ संपादित केला. 'समाजभाषाविज्ञान : व्याप्ती व स्वरूप' या विषयावर नाशिक येथे झालेल्या चर्चासत्रातील लेखांत विषयानुसार इतर लेखांची वृद्धी करून हा लेखसंग्रह निर्माण केला. डॉ. विद्यागौरी टिळक व डॉ. अंजली जोशी यांनी व्याख्यानमालेत १८९९ साली का.

ना. साने यांनी व्याख्यान दिले. त्याचे संपादित टिळक व जोशी यांनी केलेले दिसते.

काही विद्वान मंडळींनी २० व्या शतकात समाजासाठी मोलाचे कार्य केलेले दिसतात व देशाला उन्नतीमार्गावर नेण्याचे ही कार्य केले. डॉ. श्रीराम लागू, डॉ. अनिल काकोडकर, जयंत नारळीकर इत्यादींनी कार्य केले व त्यांच्या कार्याची प्रचीती मुलाखतीतून आविष्कृत करून त्याचे संपादन २००५ साली डॉ. स्नेहसुधा कुलकर्णी यांनी केले. त्यांच्या या ग्रंथाचे नाव *प्रज्ञावंतांची दैनंदिनी* हा ग्रंथ त्यांनी संपादित केला.

अशाप्रकारे चर्चासत्रे, शिबिरे यांच्या साहाय्याने संपादनाला मोलाचे कर्तृत्त्व, प्रेरणा प्राप्त होत असते.

डॉ. मृणालिनी शहा यांनी २००८ साली विष्णुभट्ट गोडसे वरसईकर यांचे *माझा प्रवास* हे संपादन केले. तर ज्योतिबा फुले यांचे *तृतीयरत्न* हे नाटक असून त्याचे डॉ. निळा पांढरे यांनी २००९ साली संपादन केले.

उर्मिला पवार यांच्या *आयदान* या ग्रंथाला डॉ. सिसिलिया कार्व्हालो व सतीश काळसेकर यांनी २००७ साली *आयदान :सांस्कृतिक ठेवा* हा ग्रंथ संपादित केला. सुषमा करोगल व केशव गद्रे यांचा ग्रंथ म्हणजे *टीकास्वयंवर* होय. यावर १९९० साली भालचंद्र नेमाडे यांनी समीक्षात्मक लेखसंग्रह निर्माण केला. तसेच १९७९ साली *बेगम बर्वे* हे सतीश आळेकर यांचे नाटक प्रचलित असलेले दिसते. यावर डॉ. रेखा इनामदार साने यांनी २०१० साली *बेगम बर्वेविषयी* असे संपादन केले.

संपादनात आणखी एक प्रकार प्रचलित असलेला दिसतो तो म्हणजे 'गौरवपर ग्रंथ' होय. डॉ. मंदा खांडगे व डॉ. लीला दीक्षित यांच्या सहसंपादनातून *बालशिक्षण, बालसाहित्य : विविध आयाम* हा ग्रंथ २००६ साली प्रकाशित झाला. ग. ह. पाटील यांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून हा ग्रंथ म्हणजेच गौरवग्रंथ उदयास आला. ग. ह. पाटील हे एक ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञही आहेत. तसेच त्यांचे बालसाहित्यात भरीव योगदान ही आहे. डॉ. स्नेहल तावरे यांनी डॉ. मा. गो. देशमुख व त्यांच्या समकालीन असणारे लेखक यांच्या साहित्यिक कर्तृत्त्वाचा आढावा घेतला. ते त्यांच्या *वैदर्भी प्रतिभा* या संपादित ग्रंथातून.

डॉ. द. भि. कुलकर्णी यांचा गौरवग्रंथ २००८ साली डॉ. शामला मुजुमदार यांनी केला. त्याचे नाव म्हणजे *समीक्षेची क्षितिजे* होय. प्रमुख समीक्षकांमध्ये डॉ. द. भि. कुलकर्णी यांना ओळखले जाते. त्यांनी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद ही भूषविले आहे. तसेच डॉ. लीला गोविलकर यांच्या गौरव-ग्रंथाचे डॉ. विद्यागौरी टिळक यांनी २००५ साली *समीक्षा विविधा* हा ग्रंथ संपादित केला. डॉ. रा. चि. ढेरे यांच्या गौरव-ग्रंथाचे संपादन डॉ. अरुणा ढेरे व वर्षा

गजेंद्रगडकर यांनी *लोकसंस्कृतीचे प्रतिभा दर्शन* यातून केले. डॉ. रा. चिं. ढेरे यांच्या कन्या डॉ. अरुणा ढेरे असलेले दिसतात. तसेच गौरव-ग्रंथाचे संपादन करताना विविधता दिसते.

शोभा उबगडे यांनी राम शेवाळकर यांचे विचार *पत्रसंवाद* (२००५) या संपादनातून केले. या संपादनाच्या प्रकारावरून पत्रात्मक संपादनाचा परिचय होतो. तसेच सुरेखा पाणंदीकर यांनी २००२ साली *आजी आजोबांची पत्रे* हे पत्रात्मक संपादन केले.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर व आनंदीबाई शिर्के यांच्या पत्रव्यवहाराचे डॉ. अंजली सोमण यांनी २००५ साली *एका स्नेहबंधाची गोष्ट* हे पत्रात्मक संपादन केले. श्री. मा. कुलकर्णी यांच्या *आठवणपार* लेखांचे संपादन माया तुळपुळे व डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी २०१० साली *श्रीमान* यामधून केले.

वि. सु. वाळिंबे यांच्या आठवणींच्या लेखसंग्रहाचे संपादन डॉ. अरुणा ढेरे यांनी *उमदा लेख उमदा माणूस* या ग्रंथातून २००१ साली केले. तसेच शांता शेळके यांच्या *स्मृतीपार* संपादनाद्वारे २००२ साली कविता जपे यांनी *शान्तस्मरण* हा ग्रंथ संपादित केला. त्याचप्रमाणे गिरीजा कीर यांच्या आठवणी एकत्रित करून २००३ साली अरुण मैड, रेखा मैड व रविंद्र पाटकर यांनी *गिरिजायन* हा ग्रंथ संपादित केला आहे. त्यांच्या (गिरिजाबाईंच्या) वाङ्मयाचा व्यापकपणा दिसून येतो.

अनंत काणेकर यांच्या स्मृतीपार संपादनातून त्यांच्या पत्नी कमल काणेकर यांनी २००५ *अनन्वय* हा आठवणपार लेख संपादित केला. तसेच डॉ. शकुंतला क्षीरसागर यांनी आपल्या पतीचे चरित्र व साहित्यिक चरित्र संपादित केले. ते म्हणजे २००७ साली केलेले *श्री. के. क्षीरसागर* हे होय. तसेच त्यांनी ललित लेखन ही केले आहे.

पतीच्या व्यक्तिमत्त्वाबरोबरच वडिलांचेही व्यक्तिमत्त्व सांगणाऱ्या लेखिका ज्ञानदा नाईक यांनी २०१० साली *व्यंकटेश माडगूळकर : लेखक व माणूस* हा ग्रंथ संपादित केला.

मराठी स्त्रीवादी लेखिकांमधील अतिशय नामांकित नाव म्हणजे गौरी देशपांडे होय. त्यांच्या साहित्याचे व आठवणींचे संपादन मेधा राजहंस यांनी २००५ साली *गौरी मनातली* ह्या संपादनाद्वारे केले. तर विद्या बाळ, गीताली वि. मं., वंदना भागवत यांनी २००८ साली *कथा गौरीची* हा ग्रंथ संपादित केला. २००९ साली पुष्पा भावे यांनी *जहन्नम – निवडक प्रतिमा जोशी* असा ग्रंथ संपादित केला. तसेच पुष्पा भावेंचे आणखी एक संपादन म्हणजे *आम्हाला भेटलेले डॉ. श्रीराम लागू* (२००२) हे होय.

योगिनी जोगळेकर यांच्या कथालेखनाचे संपादन सुनेत्रा ओक यांनी २००२ साली *कथायोगिनी* भाग १ व २ या खंडात केले. पहिल्या गटात १९५४ ते १९७५ व दुसऱ्यात

१९७६ ते १९९० अशा कथा आहेत. १९६० नंतरच्या कथावाङ्मयामधील सार्थकी दिशा भारत सासणे यांनी दिले. यावरून २००८ साली प्रिया जामकर यांनी *भारत सासणे यांच्या निवडक कथा* हा ग्रंथ संपादित केला. डॉ. चारुशीला ओक यांनी डॉ. विजया वाड यांच्या कथेचा परामर्श त्यांनी *निवडक विजया वाड* २००८ साली घेतला. त्यांनी (विजया वाड) *कथुली* हा नवा वाङ्मयप्रकार रूढ केला. कथुलीमध्ये कथा, व्यक्तीरेखा, परस्परसंबंध, संघर्ष असतो. तसेच सत्त्वशीलता सामंत यांनी बा. भ. बोरकरांच्या कवितांचे संपादन केले. नामदेव ढसाळ यांच्या कवितांच्या प्रकाशित करण्याच्या उद्देश्याने सतीश काळसेकर व प्रज्ञा लोखंडे यांनी २००७ साली *मी भयंकराच्या दरवाज्यात उभा आहे* हा ग्रंथ संपादित केला. यामध्ये *गोलपीठापासून ते तुझे बोट धरून चालतो आहे मी* पर्यंत संपादन व अप्रकाशित कवितांचाही समावेश आहे.

दत्ता हलसगीकर यांच्या निवडक कवितांचे संपादन २०१० साली *प्रतिबिंब,* या ग्रंथातून डॉ. लीला दीक्षित यांनी केले. शिरीष पै यांनी सुरेश भटांच्या कविता निवडल्या. त्यात त्यांनी १९४६ ते २००२ सालातील कविता घेतल्या आहेत. त्यांनी २०१० साली *सुरेश भट यांची निवडक कविता* हा ग्रंथ संपादित केला. मात्र या काळात एक उणीव राहते ती म्हणजे संत, पंडिती काव्याचा विचार केला गेला नाही.

शांताबाई किर्लोस्कर यांच्या निवडक वाङ्मयाचे संपादन २००८ साली *प्राजक्ताची फुले* या संपादनातून डॉ. अनघा केसकर यांनी केले. तर प्रभाकर पाध्ये यांच्या निवडक साहित्याचे संपादन २००९ साली *अगस्तीचे अंगण* या नावाने डॉ. रेखा इनामदार-साने व डॉ. विलास खोते यांनी संपादित केले. दुर्गाबाई भागवत यांच्या २०१० साली झालेल्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून त्यांच्या चर्चासत्रे, निबंध यांचे संपादन दिसते. हे संपादन डॉ. अरुणा ढेरे यांनी *दुर्गा भागवत : व्यक्ती, विचार व कार्य* या ग्रंथातून केले.

अशा प्रकारे गौरवपर संपादनाचा विस्तृतपणे विचार केलेला दिसून येतो. तसेच स्त्रियांनी या काळात 'संपादन' वाङ्मयप्रकारासाठी अतिशय मेहनत घेतलेली दिसते. तसेच त्यासाठी निर्माण करावे लागणारे कष्टप्रद विचार, कर्तृत्त्व व भरीव योगदान याचीही येथे प्रचीती आलेली दिसते. २०००-२०१० या कालखंडातील संपादित साहित्याच्या संदर्भात मंदा खांडगे यांनी स्त्री साहित्याचा मागोवा खंड-४ यामध्ये असे म्हटले आहे की, "संपादन क्षेत्रातही स्त्रियांचे काम नोंद घेण्यासारखे आहे. संपादन करणारी व्यक्ती त्या-त्या क्षेत्रातील जाणकार, व्यासंगी, अभ्यासक असावी लागते. शोधनिबंधाची संपादने, निवडक ललितकृतींची संपादने, गौरवग्रंथाची संपादने स्त्रियांनी परिश्रमपूर्वक केलेली आहेत. विजया

राजाध्यक्ष, अनुराधा पोतदार, सरोजिनी वैद्य यांनी केलेली संपादने शिस्तपूर्ण आहेत. वाङ्मयमूल्याचे भान ठेवणारी आहेत. काही स्त्रीपुरुषांनी सहसंपादनेही केली आहेत. प्रस्तुत दशकात त्याचे प्रमाण कमी होऊन स्त्रिया स्वतंत्रपणे संपादने करताना दिसतात. या दशकात स्त्रियांनी त्यात भरीव कामगिरी केली आहे."[१]

**संदर्भ ग्रंथसूची**

स्त्री साहित्याचा मागोवा खंड-४ पृ. १५

## घटक : ई - स्त्रीलिखित संकीर्ण साहित्य

या साहित्यप्रकारात स्थापत्यशास्त्र, पाकशास्त्र, वैद्यकशास्त्र, उद्योग, कलाकौशल्य, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, विज्ञान, इत्यादींचा समावेश आहे. या काळात शिक्षण घेणाऱ्या स्त्रिया कमी होत्या व 'संकीर्ण' विभागाचे स्वरूप हे १८५० ते १९५० या काळात दिसते. पण १८५० ते १९५० यामध्ये एक ही पुस्तक दिसत नाही. या विभागात असणाऱ्या पुस्तकांना वाङ्मयीन मूल्य असून जनप्रबोधन हा हेतू असलेला दिसतो. १९०० ते १९५० या काळात स्त्रीशिक्षणाला बहर येत होता.

१९०१ साली सीताबाई छत्रे यांनी *विधवा दुःख निवेदन* हे पुस्तक लिहिले. तसेच १९४३ साली दुर्गा भागवत यांनी *राजभाषेचा तोरा* हे पुस्तक लिहिले. राधाबाई जोशी यांनी १९१६ साली *कोकणस्थ वा चित्पावन ब्राह्मणातील लग्नसमारंभ* हे पुस्तक लिहिले. तसेच मयुर जोशी यांनी खोलवर विचार लग्नाच्या वयासंबंधी केलेला दिसतो. त्यावेळी नव्या-जुन्या विचारांची तुलना करतात. प्रत्येक लेखिकेची मतमतांतरे होत असलेली दिसून येतात. त्याचबरोबर बालविवाह पद्धतीमुळे शारीरिक व मानसिक हानी होण्याची शक्यता असते; किंबहुना ती होतेच !

यावरून जसा लग्नाच्या वयाचा प्रश्न दिसतो, तसाच एक प्रश्न उद्भवलेला दिसून येतो तो प्रश्न म्हणजे – 'हुंडा' ! ही प्रथा अतिशय अन्यायकारक आहे. यात शारीरिक व मानसिक हानी सुद्धा घडत असते. हुंडा या प्रथेने आजच्या काळात वेगळेच रूप धारण केलेले दिसते. परंतु पूर्वी, हुंडा या प्रथेची मानसिकता वेगळी होती. ती म्हणजे सोने, नाणे रूपाने दिलेला हुंडा आपल्या मुलीला संकटकाळी, वेळप्रसंगी मदतीचा ठरावा, या हेतूने दिला जायचा. परंतु या काळात मात्र, हा विचार कोणीच करीत नाही. उलट हुंडा देत नाहीत किंवा कमी दिला आहे, म्हणून त्या नववधूची मारझोड होत आलेली दिसते. यावरून सर्व लेखिकांना वाटते की ही प्रथा बंद व्हावी. तसेच तरूणवर्गांनी देखील याबाबत पुढाकार घेतला पाहिजे. यावरूनच एक महाराष्ट्र टाईम्समधील उदाहरण म्हणजे – हुंडा न घेण्याविषयी ठरविलेल्या वराची प्रतिज्ञा दिसते. जेव्हा त्या वराची आई गुपचूप हुंडा घेते व त्या वराला जेव्हा हे मांडवात समजते, तेव्हा तो आईला हुंडा परत करण्यास सांगतो; अशी प्रतिज्ञा सर्व तरूणमंडळींनी घेणे गरजेचे आहे, हे लेखिकेने कळकळीने सांगितलेले दिसून येते.

शिक्षणामुळेच लिहू शकतो, आपल्या ज्ञानात अधिक भर घालू शकतो याची जाणीव स्त्रियांना झाली होती. त्यामुळे या स्त्री शिक्षण काळातील स्त्रियांनी शैक्षणिक महत्त्व फार

मोलाचे असे असते, हे लक्षात घेतले होते. परंतु गृहकृत्यदक्ष असे स्त्रियांनी असलेच पाहिजे, या वृत्तीतून त्या बाहेर पडल्या नाही. त्यामुळे २१ व्या शतकामधील प्रारंभी दिल्या जाणाऱ्या शिक्षणाबद्दल नाराजी व्यक्त केली. तसेच स्त्रियांनी आपल्या पायावर उभे राहून नोकरीकरण्यापेक्षा गृहस्थश्रमातील संसार, मुल-बाळ, त्यांचा अभ्यास, गृहजीवनातील संगीत, शिवणकाम, हस्तव्यवसाय इत्यादी जोपासावेत, असे विचार असत. तसेच शिक्षण घेतलेल्या मुली घरकामात लक्षच देत नाहीत, असा सूर मालती दांडेकर यांच्या *भावी गृहिणी* अर्थात *उद्याची कन्या* (१९४७), गिरीजा केळकर यांच्या *गृहिणीभूषण* (१९२१) व रमाबाई पटवर्धन यांच्या *स्त्रियांचे कल्याण* (१९४७) इत्यादीच्या लिखाणातून जाणवतो. तसेच स्त्रिया जास्त शिकल्या तर त्यांच्याबरोबरीचा वर मिळणे कठीण जाईल व त्या संसारसुखापासून दूर जातील अशी काळजी लेखिकांनी व्यक्त केली. तसेच *राष्ट्रजननी* या दुर्गा नेने यांच्या पुस्तकात प्राथमिक शिक्षण तरी मुला-मुलींना द्यावे असे म्हणत. त्यामुळे एकमेकांविषयी आदर, समानता याकडे बघण्याचा दृष्टिकोन चांगला राहण्यास मदत होईल. गृहिणीभूषणमधील गिरिजाबाई केळकर यांनी शिक्षणाचा फार मोठा तोटा हे लक्षात आणून दिले. त्याचबरोबर नेमधर्म असतील, चालीरीती असतील त्यासाठी शास्त्रीय दृष्टिकोन बघून तो जपावा. तसेच जन्माचे वाकडेपण निर्माण करणारे प्रसंग सुधारणेच्या काळात टाळले पाहिजेत व हे बदल घडवून आणणे, स्त्रियांच्या हातात आहे. याचबरोबर समाजसेवा व क्लबसंस्कृती यांचा विचार, उल्लेख एकत्र केलेला दिसतो; परंतु समाजाला उपयोगी ठरेल अशी कामे करताना आदर्श संसार करता येतो असे उदाहरण मात्र दिलेले दिसत नाही.

तसेच गृहिणीने कसे वागावे, कसे बोलावे इत्यादी गोष्टींविषयी संकीर्ण विभागात भर घातला आहे. घराची स्वच्छता, मुलांची योग्य काळजी, आरोग्य या सर्वांकडे उत्तम लक्ष असावे, मुलींनी शिकूनसवरून नम्र असावे, काटकसरपणा असावा इत्यादी गोष्टींविषयी सांगितलेले आहे. तसेच आलेले पाहुणे, मित्रपरिवार यांच्याशी कशापद्धतीचा मेळ असावा हेही सांगितले. संसार सोपानमध्ये (१९३९) गिरीजा केळकर म्हणतात, आजच्या स्त्रियांचा तयार पदार्थ विकत घेण्याकडे जास्त कल वाढला आहे. तसेच शाकाहारी अन्न खावे, असे त्या शाकाहाराचे महत्त्व पटवून देतात. आता पाश्चात्य देशात ही शाकाहार बनत चालले आहे, हेही त्या सांगतात. हे सर्व १९३९ च्या *संसार सोपान* या पुस्तकात सांगितले आहे. या सर्वांबरोबरच स्त्री-पुरुष समानतेचा ही प्रश्न महत्त्वाचा असलेला ठरतो. कोणासही गौणत्व न ठरविता सर्वांनी समानतेने गुण्यागोविंदाने राहिले पाहिजे. कोणत्याही बाबतीचा भेदभाव न ठेवता, व्यक्ती-व्यक्तींचा द्वेष न करता, सर्वांचा आदर ठेवत समानतेने वागळे पाहिजे. तसेच

संततिनियमन या मुद्याचा विचार करताना स्त्री-पुरुष समानतेच्या भूमिकेतून शांता नाशिककर यांना वाटते की, लग्नानंतर २/३ वर्षे एकमेकांचा विश्वास, प्रेम या गोष्टी महत्त्वाच्या असून त्यामुळे २/३ वर्षानंतर संततीचा विचार करावा, असे त्या सुचवित. तसेच मालती दांडेकर यांना वाटते, की मुलं किती व्हावी, किती अंतराने व्हावी हा निर्णय पूर्णपणे आईनेच घ्यावा. हा विचार *आकर्षक संसारमधून* त्यांनी मांडला आहे. स्त्रियांच्या संकीर्ण लेखनाचा विचार करता, " 'संकीर्ण' विभागातील लेखनात स्त्रीकडे 'स्वतंत्र व्यक्ती' म्हणून पाहण्याची आवश्यतकता काही प्रमाणात का होईना प्रतिबिंबित झालेली दिसते. वारसा हक्क, संततिनियमन या संदर्भातील त्यांचे विचार जाणून घेता स्वतंत्रपणे विचार करण्याची लेखिकांची कुवत, स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाची जाणीव आणि सद्यस्थितीत बदल घडवून आणण्याची त्यांना जाणवलेली,आवश्यकता या मुद्यांची प्रचीती येते."[१]

अशाप्रकारे वरील सर्व बाबींचा विचार करणे आजच्या काळात गरजेचे ठरते.

**संदर्भ ग्रंथसूची**

१. स्त्री साहित्याचा मागोवा खंड-१ पृ. २८८

# प्रकरण नववे - उपसंहार

प्रस्तुत संशोधन प्रबंधात १९६० नंतरच्या स्त्रीलिखित साहित्य,समीक्षा आणि संशोधनाचा अभ्यास केला आहे. १९६० नंतरच्या कालखंडात स्त्रियांनी एकूणच या सर्व लेखनात कशाप्रकारे भर घातली याचा याठिकाणी अभ्यास केला आहे.

कथा, कविता,कादंबरी,चरित्र,आत्मचरित्र,प्रवासवर्णन,नाटक,वैचारिक गद्यलेखन यात लेखिकांचे योगदान अभ्यासण्याचा येथे प्रयत्न केला आहे. १९६० नंतरच्या साहित्याचा विचार करत असताना १९६० पूर्वी च्या स्त्रीलिखित साहित्याचा आढावा सुध्दा येथे घेतला आहे. प्रत्येक साहित्यप्रकारात स्त्रियांनी केलेले लेखन अभ्यासताना त्या त्या साहित्य प्रकारानुसार प्रकरणांची रचना केली आहे.

पहिल्या प्रकरणात स्त्रियांनी आत्मचरित्र या वाङ्मय प्रकारात दिलेल्या योगदानाचा अभ्यास केला आहे. यामध्ये स्त्रियांनी आत्मचरित्र या वाङ्मय प्रकारात घातलेली भर कशा स्वरुपाची आहे? याचा अभ्यास केला आहे. प्रारंभीचे १९१० ते १९५० या कालखंडातील आत्मचरित्रांचा आराखडा हा प्रारंभी पतीचरित्र, विधवा जीवन, शिक्षणाची ओढ, हातून घडलेले समाजकार्य असा हळूहळू होणारा प्रवास आत्मचरित्रातून समोर येतो. १९५० नंतरच्या आत्मचरित्रांनी मात्र वैचारिक, बौद्धिक अंगाने अधिक वेध घेतल्याचे निदर्शनास येते. एकूणच २००१ ते २०१० च्या टप्प्यातील आत्मचरित्र लिहिणाऱ्या लेखिकांना स्वतःच्या वाटेला आलेल्या क्षणांना इतरांसमोर मांडायचे आहे. त्यातून त्यांना नवे काही शिकवायचेही आहे. ‘जो देतो तो देव आणि जो जगतो तो माणूस’ या माफक विचारात त्यांनी कितीतरी अनंत यातना भोगल्या, मान – अपमान, जाच, मारझोड, शिवीगाळ, मनावरचे शरीरावरचे न मिटणारे आघातही झेलले. जातीयवाद, राजकारण, समाजकारण, या विळख्यातून स्वतःला सावरले आणि भावी आयुष्यात इतर कोणाला असे अनुभव आले तर बावरून न जाण्याचा एक सल्लाही नकळत लिखाणांमध्ये डोकावताना दिसतो. अनेक लेखिकांनी तर रस्त्यावर संसार थाटले आणि समाजासाठी स्वतःला झोकून दिले. सिनेसृष्टीत काय आणि कसे वातावरण आहे हे सिनेसृष्टीतील आत्मचरित्रकार स्त्रियांच्या लेखनीतून समजते. त्यांची व्यथा, वेशीवर टांगल्यासारखी गिधाडे लचके तोडतात हीच अवस्था बारबाला, वेश्या यांची झालेली दिसून येते. एकूणच स्त्री कशी असुरक्षित आहे हे दाखवणारी बोलकी उदाहरणेही या आत्मचरित्रातून समजतात.

चरित्रग्रंथांच्या मालिकेच्या अभ्यासातून अनेक लहान मोठे गुण जसे अधोरेखित होताना दिसतात त्याचप्रमाणे जेथे गुण आहेत तेथे अल्प प्रमाणात दोषही असतातच. लेखिकांच्या काही अंशी तटस्थवृत्तीचीही जाणीव होते. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, ऐतिहासिक मर्यादाही काही अंशी लेखनातून अधोरेखित होताना दिसते. मात्र तरीही या लेखिकांनी चरित्र वाङ्मय प्रकाराला त्यांच्या प्रगल्भ लेखनीद्वारे अत्यंत सरस अशी प्रतिष्ठा संपादन करून दिली आहे. २००१ ते २०१० च्या या दशकात चरित्रलेखनाची गती अत्यंत जोमदार आहे. वैचारिक दृष्टी, प्रगल्भता, आणि सुस्पष्टता चरित्रलेखनात अत्यंत प्रभावीपणे लेखिकांनी मांडल्याने चरित्रलेखनात त्यांची एक वेगळीच छाप पडली आहे.

स्त्रीलिखित कथालेखन मात्र काहिशा उशीराने सुरु झाले. जीवनदर्शन, वास्तवादी, कलात्मकता अशा विविधांगी विषयातून स्त्रियांनी कथा लेखनाला सुरुवात केल्याचे दिसून येते. काही लेखिकांच्या कथा मात्र अगदीच सरसकट निवेदन धाटणीच्या आहेत. काही कथा केवळ बोधीवादी आहेत. प्रारंभीच्या काळात स्त्रियांवर अनेक बंधने असत. त्यामुळे त्यांच्या कल्पनाशक्तीला अधिक पैलू पडलेले दिसत नाहीत. मात्र जसजसे त्यांच्यासाठी अवकाश खुले झाले, तसतसे त्यांच्या लेखनीत विविधता आल्याचे लक्षात येते.

१८५० ते १८८० च्या काळात स्त्रियांनी लिहिलेले कथा साहित्य आज फारसे उपलब्ध नसले तरी कथा लेखनाला केलेला प्रारंभ हा एकूण स्त्री वर्गाच्या विचारशक्तीला चालना देणारा होता. कानिटकर बहुचर्चित लेखिका होत्या.

१९२० नंतर अनेक स्थित्यंतरे घडत गेली. परिणामी मराठी साहित्यावरही त्याचे बदलते परिणाम दिसून येऊ लागले. पहिल्या महायुद्धाचे परिणाम जगभर जाणवत होते. गांधींच्या विचारांनी संपूर्ण देश ढवळून निघाला होता. अनेकांच्या प्रभावी विचारांनी स्वतंत्रपणे जीवन व्यतीत करणाऱ्या अनेक कुमारिकांची संख्या वाढलेली . डॉ. आनंदीबाई जोशी यांचे चरित्र लेखन काशीबाईंनी केले,ते प्रसिद्ध केले. *रंगराव* या कादंबरीचे लेखनही त्यांनी केले. काशीबाईंची पहिली कथा १८७७ च्या विविधज्ञानविस्तार मध्ये प्रसिद्ध झाली होती. जुलै १८६७ साली विविधज्ञानविस्ताराची सुरुवात झाली. या अंकांचा विशेष म्हणजे हा अंक 'कुलस्त्रिया व गृहस्थ' यांकरिता प्रसिद्ध होत असे. मात्र या नियतकालिकांत स्त्रियांनी लिहिलेले लेखन प्रसिद्धीस येईपर्यंत बत्तीस वर्षे म्हणजे १८९९ पर्यंतची वाट पहावी लागली. यावरूनच स्त्रियांच्या शिक्षणास किती विरोध होता हे स्पष्ट होतो. १९२० ते १९५० या कालखंडातील कथा लेखिकांचा विचार करता १९२० च्या कथांमध्ये केवळ स्त्रियांना होणारा जाच, कौटुंबिक वातावरणात तिची होणारी कुचंबणा अधिक प्रमाणात जाणवते.

अनेक लेखिकांनी टोपणनावे स्वीकारून समाजमनाच्या तळावर आघात करण्याचे प्रयत्न केले आहेत. परिणामी स्त्री उंबरठ्या बाहेर पडून शिकू लागली. त्यातही अनेक नवे प्रश्न उद्भवत गेले, लेखिकांच्या लेखनीचे ते विषय बनत गेले. मात्र कालपरत्वे स्त्रिया शिकून नोकरी करू लागल्या. पुन्हा एकदा शिक्षित स्त्रीमनाचे नवे प्रश्न आकाराला येत गेले. सुशिक्षित मुलींच्या अपेक्षा वाढत गेल्या. नोकरी आणि कुटुंबाच्या जबाबदारीने त्या नव्याने समाजाच्या कात्रीत सापडत गेल्या. या सर्व लहान मोठ्या बदलांचे प्रतिबिंब कथा लेखिकांच्या कथांमधून सहज उमटू लागले.

१९३५ नंतर मात्र कथेचे स्वरूप स्त्रीमनाचे प्रश्न न उरता त्यावर केले जाणारे भाष्य ठरू लागले. अनेक बंडखोर लेखिकांनी क्रांतिकारी विचार मांडून समाजात परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न त्यांच्या कथांमधून केला. १९५० सालानंतर मात्र स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कथेत कमालीचे बदल होत गेले. १९४५ नंतर मार्क्सवाद, फ्रॉईडचे मनोविश्लेषण, गांधीवाद, विभक्त कुटुंबपद्धत यामुळे कथांचे विश्व अधिक रुंदावत गेले. १९५० नंतर वाढती लोकसंख्या, बेकारी, शहरीकरण, यंत्रयुग या समस्यांनी रौद्ररूप धारण केले. या काळात मनोरंजनासाठी आकाशवाणी उदयाला आली होती. विविधांगी परिस्थितीमुळे वाचकांचा आणि लेखकांचा एक नवा वर्ग उदयाला आला. कुटुंबव्यवस्था, माजघर आणि पारंपरिक बेड्यात अडकलेली स्त्री नवनव्या मार्गाने लेखन करू लागली. मात्र तिच्या अनुभवकेन्द्री कथांमध्ये रडका सूर सातत्याने आल्याने टिकाही झाली. त्यानंतर नवकथेत पदार्पण करून स्त्री लेखिकांनी महत्त्वाची भूमिका बजावलेली दिसते. अनेक चिंतनाचे विषय, अनुभव कथेचा विषय ठरू लागले. स्वातंत्र्यापूर्वीच्या कथा लेखिका आणि स्वातंत्र्यानंतरच्या कथा लेखिका यांच्या मन:स्थितीचा विचार करता लक्षात येते की, मूळतः स्त्रिया जेव्हा शिकल्या, जेव्हा त्यांच्यात आत्मविश्वास जागा झाला, घरचा उंबरठा ओलांडून नोकरी करू लागल्या तेव्हा त्यांच्या पंखांना प्रगतीचे यश गवसले. आणि निश्चितच कथालेखन प्रवासाला वेग आल्याचे लेखिकांच्या अनुभव विश्वातून समोर येते.

एकूणच टप्प्या टप्प्याने पुढे सरकत जाणारा हा प्रवास लेखिकांसाठी सोपा नव्हता हेही लक्षात येते. काळानुसार कथांचा बाज बदलत गेला, भाषाशैली बदलत गेली, बदलत्या राहणीमानाचा आणि जागतिकीकरणाचा परिणाम कथांमधून शब्दबद्ध झालेला आहे. कुटुंब या वर्तुळात फिरणारी कथा परिघा बाहेर जाऊन अनेक वाङ्मय प्रकारात विस्तारली गेली. सगळ्या लेखिकांनी सगळेच वर्गीकृत प्रकार हाताळले नसले तरी प्रत्येकीची कामगिरी ही अतुलनीय आहे. स्त्रीकेंद्रित कथा आता वेगवेगळ्या प्रकारात विभागून नवी झेप घेताना

दिसत आहे. २००० पर्यंतच्या काळात कथेचा अवकाश अधिक रुंदावलेला स्पष्ट होत आहे. प्रारंभ ते १९२० या कालखंडातील कादंबऱ्यातून साहसकथा, प्रेमकथा, विरहकथा, ऐतिहासिक कथा, कौटुंबिक कथा, सामाजिक कथा असा टप्प्यातून होत गेला प्रवास समजतो. स्वानुभवातून मांडलेल्या कादंबऱ्याही समोर येतात. स्त्रीलिखित कादंबरीतून तिच्या मनातील गगनाला भिडण्याची अपेक्षा किंवा ते स्वप्न या लेखिकांनी कळत – नकळत आपापल्या कादंबरीच्या नायिकांमध्ये पाहिलेले दिसत आहे. परिस्थितीवर मात करण्याची उर्मी असणाऱ्या या लेखिकांच्या नायिका मग बंडखोर, स्वतंत्र विचारांच्या असतील यात नवल ते काय? कादंबऱ्यांमधून त्यांनी सामाजिक एकात्मतेचा विचार मांडलेला आहे. शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्याचा क्रांतिकारी विचार मांडला आहे. यावरूनच त्या काळातील कौटुंबिक हिंसाचारात पिचलेल्या स्त्रियांची दाहकता विचार करायला भाग पाडत आहे.

एकूणच १९२१ ते १९५० या कालखंडातील स्त्री कादंबरीकारांनी वास्तवाचे भान ठेवत आणि कल्पकतेची जोड घेत असंख्य प्रश्नांना अधिक अधोरेखित केले आहे. कादंबरीतील नायक नायिकांची सांगड वास्तविक जीवनाशी घालून अनेक व्यथा त्यांनी मांडलेल्या आहेत. त्याचबरोबर अज्ञात, कल्पित टोपणनावे असणाऱ्या अनेक कादंबऱ्यातून स्त्रीमनात धुसपुसणारी आणि दडपणाच्या ओझ्याने वाकणारी अनेक व्यक्तीरेखा प्रखर विचार समोर घेऊन येताना दिसते.

प्रारंभीच्या कादंबऱ्यातील मनोरंजनाची जागा कधी ज्वलंत प्रश्नांनी मिळवली याचा हा प्रवास अतिशय सुसज्ज वाटत आहे. स्त्री मनातील होणारे बदल, समाजातील बदल, पोटाची खळगी भरण्यासाठी स्वीकारले जाणारे चुकीचे मार्ग, शेतकऱ्यांचे प्रश्न, सामाजिक भान, चळवळ, देशसेवा, विवाह, हुंडा, स्त्री – पुरुष नाते संबंध ते स्त्री – पुरुष समानता, कौटुंबिक कलह, धर्म, रूढी, परंपरा.... अशा असंख्य प्रश्नांची चर्चा या कादंबऱ्यातून वाचावयास मिळते. यावरूनच त्याकाळातील प्रश्न कसे आणि कोणत्या स्वरूपाचे होते हे लक्षात येते.

स्त्री कादंबरीकारांचा हा उत्तरेला झेपावणारा आलेख त्यांच्या सर्वांगीण विकासाची आणि प्रगत विचारांची साक्ष देत आहे.

१९५० नंतरच्या काळात होणारे स्त्री कादंबरीकारांचे बहुआयामी प्रश्न आणि बदलत जाणारी जीवनशैली त्या काळातील स्त्रियांनी आपापल्या कादंबरीतून चित्रित केलीच आहे. पौराणिक कादंबऱ्यांप्रमाणेच ऐतिहासिक कादंबऱ्यांमधून एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या कार्याचा आढावा घेताना वेगवेगळ्या अंगांनी वेगवेगळ्या लेखिकांनी कादंबरीची रचना केलेली दिसते. ऐतिहासिक कर्तुत्ववान व्यक्तींप्रमाणेच संतसाहित्याला योगदान दिलेल्या

अनेक संतांवर कादंबरी लेखन झाले. २००१ ते २०१० या दशकातील कादंबऱ्यांचे विषय, आशय, मांडणी, स्वरूप, भाषाशैली, वैचारिक लेखन, निष्कर्ष अधिक प्रमाणात बदलताना दिसत आहे. काळाबरोबर हे लेखन अधिक वेगवान होत आहे. नव्हे तर ती काळाची गरजच बनली आहे. या दशकातील स्त्री कादंबरीकारांनी अनेक विषय नव्याने हाताळले आहेत तर जुनेच विषय वेगवेगळया प्रकाराने लिखाणात मांडले आहेत.

स्त्री लिखित कादंबऱ्यामध्ये ऐतिहासिक, पौराणिक, चरित्रात्मक, वैचारिक, सामाजिक, स्त्रीवादी, राजकीय, रंजकता, वैज्ञानिकता, रहस्यमयता, अद्‌भुतता, हे घटक प्रामुख्याने येत असताना स्त्रीकेन्द्री कादंबऱ्यांतील स्त्रीप्रतिमा, अधिक प्रगल्भतेने मांडलेली आहे. स्त्री मनातील अतिसूक्ष्म बदलही आणि या आधुनिक जगाच्या भव्य सुधारणांमध्येही स्त्री सुधारली तरी तिच्यावरचे संकट मात्र टळलेले नाही ही बाब अधोरेखित झाली आहे.

मराठी नियतकालिकांचा प्रवास पाहता १८३२ ला सुरु झालेल्या *दर्पण* पासून १९२० पर्यंतचा प्रवास अतिशय संथ गतीने वाहत असणाऱ्या झऱ्याचे अधिक प्रवाही नदीत रुपांतर झाल्याचे स्पष्ट होत आहे. त्यानंतरच्या काळात मात्र प्रवाह अधिकाधिक जोर धरत असल्याचे लक्षात येते. स्त्रियांनी स्त्रियांसाठी स्त्री कल्याणासाठी, स्त्री कर्तुत्वाला सलाम करण्यासाठीची ही केवळ सुरुवात होती. कारण स्व जाणीव या शब्दाचे आत्मभान आणि स्व परीक्षणाचे धागेदोरे स्त्रियांना सुशिक्षित होऊन लेखनीद्वारेच मिळाले. प्रारंभी लिहिण्याची भाषा, बोलण्याची भाषा यामधील फरकही स्त्रियांना फारसा कळत नसावा. मात्र लेखनाने आणि वाचनाने आपोआप स्त्रिया तार्किक मांडणी करू लागल्या. पूर्वी मनात येईल ते विचार स्व भाषेत त्या लिहित होत्या. बाह्य जीवनाशी संबंध आल्यानंतर वस्तुस्थिती, वास्तवता, सापेक्षी मुद्दे त्या आत्मसात करू लागल्या. अभिव्यक्ती, आविष्कार शैलीचा लेखनात गंधही नसलेल्या स्त्रिया संख्यात्मक विकासबरोबर गुणात्मक विकासातही निपुण झाल्या. त्यांच्या लेखणीला सातत्य आल्याने आपसुकच यातून मोठ्या प्रमाणातून सामाजिक प्रबोधन झाले. आपापल्या वाङ्मयीन कार्याने प्रत्येक स्त्रीने आपापली वेगळी जागा निर्माण केली आहे. १९५० नंतर मात्र सातत्याने लेखनाशी निगडीत राहून सर्वच क्षेत्रातील स्त्रियांनी सर्वांगीण विकासाचा पल्ला गाठला असल्याचे त्यांच्या लेखनशैली तसेच विचारशैलीवरून स्पष्ट होते. १९७५ ते २००० या कालखंडात नियतकालिकांच्या क्षेत्रात प्रवाहित झालेल्या स्त्रिया अधिक, विकसित प्रवाहाच्या जोरात लेखन करू लागल्याचे स्पष्ट होते. लेखनातील व्यापकता, चौकस दृष्टीक्षेप यातून प्रगल्भ झालेले लेखन अतिशय लोकप्रिय होत गेले.

नियतकालिकांच्या मदतीने स्त्रियांनी प्रश्न मांडले आणि प्रत्येक स्तरातील स्त्रियांचे

वेगवेगळे प्रश्न असल्याचे, स्पष्ट होत गेले. ग्रामीण, शहरी, दलित, परित्यक्ता अशा विविध स्तरातील प्रश्न समोर आल्यानंतर अनेक नियतकालिकांमधून त्याचे समर्थन झाले. ही स्त्री जागृतीची लाट मराठी पुरतीच मर्यादित न राहता अनेक भारतीय भाषांमध्ये उसळली गेली. परिणामी अनेक भारतीय भाषांच्या नियतकालिकांमधून स्त्री जागृतता अधिक प्रखर स्वरुपात समोर आली. दिशा, महिला आंदोलन पत्रिका, प्रेरक ललकारी, बायजा, स्त्रीउवाच, मिळून साऱ्याजणी इत्यादी मराठी नियतकालिके प्रसिद्ध झाली. नियतकालिकांतील स्त्रियांच्या लेखन दृष्टीने १९५० ते २००० या वर्षात स्त्रियांची सर्वांगीण दृष्टीने विकास क्षमता स्पष्ट होते. सुरवातीपासून संथ लेखन चालू झाले. हळूहळू प्रवाह वाढत गेला आणि कालांतराने स्त्रियांनी आपले सामर्थ्य त्यांच्या लेखनीतून समाजापुढे मांडलेले आहे. त्यांच्या वैचारिक प्रगल्भतेतून एकूणच समाज परिवर्तन होण्यास मदत झाली.

नियतकालिकांच्यामुळे स्त्रियांना निरनिराळया गोष्टींची माहिती मिळाली, प्रेरणा मिळाली आणि आपसुकच त्यांच्या प्रश्नांना हक्काचे आणि महत्त्वाचे व्यासपीठ नियतकालिकांच्या मार्फत स्त्रियांना उपलब्ध झाले.

१९२१ ते १९५० या टप्प्यातील स्त्रीलिखित प्रवासवर्णने हेतुपूर्वक प्रवासवर्णने आहेत तर काही तीर्थयात्रा आणि मनःशांतीसाठीची आहेत. मात्र या सर्व प्रवासवर्णनातून तत्कालीन परिस्थितीची जाणीव होते. अनेक निरीक्षणे आणि तपशील या प्रवासवर्णनाची वैशिष्ट्येपूर्ण देणगीच आहे. १९५१ नंतरची प्रवासवर्णनाची प्रवासक्षमता काही अंशी वाढलेली आहे. स्त्रीसमीक्षेच्या आणि संशोधनाचे आपणास दोन भागात विभाजन करता येते, यांपैकी एक मोठा भाग हा विविध विद्यापीठीय उच्च पदव्यांसाठी लिहिण्यात आलेला आणि नंतर ग्रंथरूप देण्यात आलेला संशोधनाचा आहे,तर दुसरा भाग हा विद्यापीठीय संशोधनापलीकडे जाऊन स्वतंत्रपणे केलेल्या समीक्षालेखनाचा आहे.यात आस्वादकतेपासून ते सैद्धांतिक अशा सर्व समीक्षेची व्याप्ती दिसते. आज विविध क्षेत्रांमध्ये उच्चशिक्षण घेणाऱ्या स्त्रियांची संख्या उच्चशिक्षणानंतर बहुसंख्य स्त्रिया पीएच.डी.साठी संशोधन करू लागल्या. कुसुमावती देशपांडे, इरावती कर्वे, दुर्गा भागवत, सरोजिनी बाबर, इंदुमती शेवडे या मागील पिढीतील समीक्षक आणि नंतर सरोजिनी वैदय, विजया राजाध्यक्ष, उषा देशमुख, उषा हस्तक, तारा भवाळकर, अरूणा ढेरे या आत्ताच्या पिढीतील समीक्षक, संशोधक स्त्रियांनी केलेले संशोधन व समीक्षालेखन अर्थतच स्त्रियांच्या या क्षेत्रातील कामगिरीसाठी आशादायक

व आदर्शवत चित्र उभे करणारे आहे.आजच्या स्त्री संशोधक- समीक्षकांनी काही विषय आपल्या लेखनात समाविष्ट केलेले नाहीत असे प्रकर्षाने जाणवते.

उदाहरणार्थ  शाहिरी वाङ्मय, बखर वाङ्मय, एकांकिका, व्यक्तिचित्रण, वाङ्मयीन चळवळी, विद्रोही साहित्यविचार, मार्क्सवादी लेखन असे अनेकविध विषय आजही स्त्रियांच्या लेखणीतून फारसे प्रगट झालेले दिसत नाहीत. स्त्रीलिखित ललित गद्याचा अभ्यास पहाता लक्षात येते की अत्यंत प्रांजळपणे अनेक लेखिकांनी लेखन केले आहे तर काही लेखिकांनी केवळ भूतकाळाला प्राधान्य दिले आहे. मात्र काही ललितगद्य हे चिंतनात्मक, विनोदी असेही आहे. लेखन विस्तार विस्तृत असल्याने सर्वच लेखिकांचा उल्लेख झालाच असेल असेही नाही, मात्र काही लेखिकांचे लेखन अनासये दुर्लक्षित होऊन जाते. काही लेखिकांच्या विषयात एकसुरीपणा असल्यानेही ही बाब घडू शकते. मात्र त्यातूनही नाविण्यपूर्ण लेखन करतानाही लेखिका दिसतात. मुलांच्या किंवा बालकांच्या मनोरंजनासाठी लिहिलेले साहित्य म्हणजे 'बालसाहित्य' होय. 'बालसाहित्य' या प्रकारात कथा, कादंबरी, कविता, चरित्र, नाटक यांचाही समावेश केला जातो. पण, हे वाड्मयप्रकार बालसाहित्यात विशिष्ट वयोगटानुसार लिहिले गेले. बालसाहित्यात वयोगटानुसार शिशुगीत, बाळगीत, किशोरगीत असे प्रकार पडतात; आणि त्यानुसार बालसाहित्याची निर्मिती होते. पण, बालसाहित्याच्या प्रारंभ काळाचा विचार केला असता, प्रारंभ काळात केवळ वीरांच्या कथा, पुराणकथा, संतकथा या विषयांनी बालसाहित्याची निर्मिती होत होती. सर्वप्रथम १८१५ ला वैजनाथ शास्त्री यांनी पंचतंत्रातील गोष्टी बंगालीमधून मराठीत अनुवाद केल्या आणि तेव्हापासून बालसाहित्य पुस्तक रूपाने प्रसिद्ध झाले. तद्पुर्वी ते मौखिक स्वरुपात आढळते. वैजनाथ शास्त्री यांनी बालसाहित्याचा पाया घातला, तरी बालसाहित्याची खरी सुरुवात बापू छत्रें पासून झाली असे मानले जाते. बापू छत्रेंच्या नंतर बालसाहित्य लिहिणारे अनेक लेखक व लेखिका तयार झाल्या ज्यांनी बालसाहित्य समृद्ध केले.

'बालसाहित्यात' स्त्रीलिखित बालसाहित्याचा विचार केल्यास मिस मेरी भोर यांचे नाव पुढे येते. मुलांच्या भावना जाणून उत्तम बालकविता लिहिणाऱ्या मिस मेरी भोर या बालसाहित्याच्या उगमस्थानी दिसतात. मिस मेरी भोर यांची *चेंडू* ही पहिली कविता तसेच नंतर पुढे लक्ष्मीबाई टिळक यांनीही *आकड्यांची ओळख, कावळा* यासारख्या कविता लिहिल्या. त्यांचा १९५१ मध्ये *भरली घागर* नावाचा संग्रह प्रकाशित झाला. लक्ष्मीबाईंच्या

कविता या मुलांच्या बालमनावर संस्कार करणाऱ्या व विनोदी होत्या. त्याचप्रमाणे शिशु शिक्षणाची सुरुवात करणाऱ्या ताराबाई मोडक (१८९२-१९७३) यांनीही *"थेंबा थेंबा, थांब थांब दोरी तुझी लांब लांब आकाशात पोचली,तिथे कशी पोचली?"* १

अशी व अशासारख्या अत्यंत मधुर लोकप्रिय कविता लिहिल्या. शिशुगटातील मुलांसाठी *फुलांचा कुरकुला* नावाचा काशीताई नाटेकर यांचा बालकविता संग्रह प्रसिद्ध आहे. मांडलेले हे मत तंतोतंत खरे आहे.

बालसाहित्यात महत्वपूर्ण भाग म्हणजे परीकथा, साहसकथा व पौराणिक कथांचा होय. १९५० पर्यंत परीकथांचे लेखन करणाऱ्या स्त्रीलेखिकांमध्ये मालतीबाई दांडेकर या होत. त्यांची *मोहनमाळ, परीचा बाग* (१९४४) ही पुस्तके प्रसिद्ध आहेत. प्रभा जोशी यांची *राणीचा रत्नहार, रत्नमाला आणि इतर गोष्टी, निवडुंगाची स्वप्ने* इत्यादी पुस्तके होत. पण, १९५० पर्यंत साहसकथा लेखनामध्ये फक्त मालतीबाई दांडेकर व पिरोज आनंदकर या दोघांचाच उल्लेख केला जातो. तसेच, सामाजिक कथालेखनही १८५० ते१९५० या कालखंडातील काही लेखिकांनी केले. वास्तवदर्शन घडवण्याच्या उद्देशाने गीता साने यांनी *चिमण्या गोष्टी* हा कथासंग्रह लिहिला. तसेच, लीला दीक्षित यांनी सांगितल्याप्रमाणे "प्रभावती जोशी व म.गो. जोशी यांच्या *'रत्नमाला आणि इतर गोष्टी ,'* आनंदीबाई जयवंत यांचे '*बाबूच्या लीला'* या पुस्तकांनी वास्तवकथा सांगून विशेषतः शिशुगटाला आनंदित केले. १९५० ते २००० या कालखंडात बालसाहित्य जरी अल्प प्रमाणात लिहिले असले, तरीही १९५० नंतर बालसाहित्य भरभराटीला आले. कथा, कादंबरी, कविता, नाटक, एकांकिका असे विविध वाङ्मयप्रकार बालसाहित्यात विपुल प्रमाणात लिहिले गेले ते १९५० नंतरच. रामायण महाभारताच्या कथांतील बालसाहित्य १९५० नंतर आधुनिक काळाशीही एकरूप झाले. मुलांच्या मनावर संस्कार करणाऱ्या साहसकथा, विज्ञानकथा अशा कथा लिहिल्या गेल्या व त्याचप्रमाणे नादमय अशी बडबडगीते, कविताही मोठया प्रमाणात लिहिल्या गेल्या. तसेच, इतर वाङ्मयप्रकारही हाताळले गेले.

१९५० ते २००० या कालखंडातील स्त्रीलिखित बालसाहित्यात 'कविता' या प्रकाराचा विचार करता असे जाणवते की, या कालखंडातील कवयित्रींनी बालकविता प्रकारात विविध विषय हाताळले. पशु-प्राणी, बाहुली-पऱ्या, आई-मुल, निसर्ग, देशाभिमान अशा वेगवेगळया विषयांवर यमक जुळवून तालबद्ध अशा रचना तयार केल्या. बालगीतात कवयित्रींनी पर्यावरण विषय हाताळला यात निर्मला सरडा, सुखद ऋषी, संगीता बर्वे, इंदिरा संत या कावयित्रींचाही उल्लेख करता येतो. झाडे, वने यांचे पर्यावरणाशी असलेले नाते कसे

महत्वपूर्ण आहे, हे त्यांनी सांगितले आहे.

१९५० ते २००० हा कालखंड म्हणजे अनेक देशभक्ताच्या कार्यांनी भारावून गेलेला काळ. या कालखंडात अनेक देशभक्तीपर गीते लिहिली गेली. मुलांना देशाबद्दल अभिमान वाटावा यासाठी, देशासाठी कार्य केलेले हुतात्मे नेते यांच्यावर आधारित स्फूर्ती गीतेही लिहिली गेली. संजीवनी मराठे यांनी *भाग्य तिलक, हाक मारते आई* ही गीते लिहिली, तर *स्वातंत्र्यगीते* हे पुस्तक श्रीमती शिदोरे यांनी लिहिले. तर *चाफ्याची फुले* या कवितासंग्रहात सुमती पायगावकर यांनी *शूर शिपाई* हि कविता लिहिली. त्याचप्रमाणे स्वातंत्र्यकाळातील महनीय व्यक्ती पंडित नेहरू, गांधीजी यांच्यावरील कविताही हेमलता लाटकर यांनी लिहिल्या. त्याचप्रमाणे इंदिरा अत्रे, शशिकला साळगावकर यांनी शिवाजीराजांच्या पराक्रमाचे वर्णन करणारी काव्ये लिहिली.

बालकवितेतील महत्त्वपूर्ण गीते म्हणजे बडबडगीते होय. १९६० ते १९७० या कालखंडात विंदा करंदीकरांनी बडबडगीतांच्या लेखनास सुरूवात केली. बडबडगीते लेखनात मराठी कवयित्रींचा विचार करता सरीता पदकी, वृंदा लिमये यासारख्या कवयित्रींचा उल्लेख करता येतो. बडबडगीतांचे खास वैशिष्ट्य म्हणजे विषय वैविध्यता. बडबडगीते ही ताल, लय यांनी बद्ध होती म्हणून ती सहज मुलांच्या तोंडी येत. १९५० ते २००० या कालखंडातील कथालेखकांचा अभ्यास केला असता. बहुतांश लेखिकांनी बालकथा लेखनात आपला सहभाग दर्शवला. लोककथा, प्राणिकथा, परीकथा, कल्पनारम्य कथा, पौराणिक कथा, ऐतिहासिक व चरित्रकथा, चातुर्यकथा, राजा-राणीच्या कथा, विज्ञान कथा, साहसकथा, पर्यावरण कथा, वास्तवकथा अशा वेगवेगळ्या विषयांना अनुसरून विविध लेखिकांनी बालकथा लिहिल्या व बालकथालेखन समृद्ध केले. १९५० ते २००० या कालखंडात मुलांच्या मनोरंजनासाठी चातुर्यकथाही लिहिण्यात आल्या. चातुर्यकथा या मुलांच्या अधिक जवळच्या होत्या. त्यामुळे त्यांचे मनोरंजन तर होतच होते. त्याचबरोबर त्याच्यामधील चौकसपणा, हजरजबाबीपणा हे गुणविकसित होत गेले. बालसाहित्य लेखनात चातुर्यकथांचे लेखन तारा चौधरी यांनी अत्यंत सोप्या व खुसखुशीत विनोदी शैलीत केले. बालसाहित्याच्या संदर्भात ऐतिहासिक व्यक्तिचित्रणावर कादंबरी लिहिल्या गेल्या. इतिहासातील महनीय व्यक्तीच्या कार्यकर्तुत्वाचा आढावा घेण्याचा प्रयत्न १९५० ते २००० या कालखंडातील बालसाहित्य लेखन करणाऱ्या लेखिकांनी केला आहे. बालसाहित्यात 'कथा' या वाङ्मयप्रकारात पर्यावरण-विज्ञान विषयक कथालेखनात वैज्ञानिक व पर्यावरणाशी नाते जोडणाऱ्या कथा मोठया प्रमाणात लिहिल्याचे दिसते. आधुनिक काळाशी नाते

जोडणारे असे त्यांचे स्वरूप होते. त्याचप्रमाणे बालकादंबरी लेखनातही विज्ञान व पर्यावरण विषयक कादंबरी लेखन झालेले आहे. . बालसाहित्याच्या प्रारंभ काळात हातावर मोजली जातील एवढीच बालनाटके लिहिली. पण १९५० नंतर बालनाटकात भर पडत गेली. त्यामुळे १९५० नंतर व्यावसायिक बालरंगभूमीसाठी नाटके व शालेय रंगभूमीसाठी नाटके अशा दोन भागात नाट्यलेखन सुरु झाले. ब्रिटिश राजवटीतच मराठी साहित्यात कथा, कविता, कादंबरी, नाटक असे विविध साहित्यप्रवाह निर्माण झाले. लेखक, लेखिकांनी विविध साहित्यप्रकार उत्तम प्रकारे हाताळले. त्याचप्रमाणे १९०० नंतरच्या कालखंडात कथा, कविता, कादंबरी, नाटक या स्वातंत्र्य साहित्यप्रकारांचे अनुवादित लेखन करण्याचा प्रयत्नही सुरु झाला आणि लेखिकांचा हा प्रयत्न यशस्वीरीत्या पार पाडला.

अनुवादित लेखनात लेखिकांच्या लेखनाचा विचार करता, स्त्रियांचे इंग्रजी शिक्षण सुरु झाल्यानंतरच स्त्रियांना इतर भाषांचे आकलन होण्यास सुरु झाले व त्यानंतर त्यांनी इतर भाषा आत्मसात करून, शिकून स्त्रियांनी अनुवादित लेखन करण्यास प्रारंभ केला. १९०९ मध्ये स्त्री अनुवादित *सरोजिनी* ही कादंबरी मराठीत प्रकाशित झाली. सरस्वतीबाई भिडे यांनी श्रीयुत दामोदर मुखोपाध्याय प्रणीत यांची बंगाली कादंबरी *मा ओ मेये* याचा अनुवाद केला. त्याचप्रमाणे नंतरच्या काळात किशोरीलाल गोस्वामी यांनी *राजकुमारी* या हिंदी कादंबरीचा १९१२ मध्ये अनुवाद केला. पण या कादंबऱ्यांचा अनुवाद करताना लेखिकांनी मराठी वाचकांचा पसंतीचा विचार केला आहे. मराठी वाचकांच्या पसंतीस उतरेल असे लेखन लेखिकांनी जाणीवपूर्वक केल्याचे अभ्यासांती दिसून येते.या कादंबऱ्या संदर्भात व एकूणच बंगाली अनुवादित कादंबऱ्या संदर्भात भारती पांडे म्हणतात कि, " 'स्त्रियांना शिक्षण कोणते द्यावे इंग्रजीत कि मातृभाषेत?' यावरची चर्चा त्या काळात रंगात आलेली होती. म्हणूनच या अनुवादिकांना या भाषांचे औपचारिक शिक्षण मिळाले असेल असे वाटत नाही. त्यातही बंगाली लिपीही वेगळी असल्याने अनुवादिकेला अधिक अभ्यास करावा लागला असावा आणि तो तिने केला हे महत्त्वाचे वाटते."[१]

तसेच १९२० ते १९३० या कालखंडात लेखिकांनी गुजराती, इंग्रजी अशा भाषातील कादंबऱ्यांचाही मराठीत अनुवाद केला. गिरिजाबाई केळकर यांनी *स्त्रियोनु स्वर्ग* या वैद्य अमृतलालजी पढियार यांच्या कादंबरीचे १९२१ मध्ये *स्त्रियांचा स्वर्ग* या शीर्षकाने मराठीत अनुवाद केला. इंदिराबाई सहस्त्रबुद्धे व इंदुमती जगताप यांनी १९२४ साली अनुवादित लेखनात आपले योगदान दिले. *द वूमन हू डिड* या ॲलन चार्ल्स यांच्या इंग्रजी कादंबरीचा अनुवाद *केवळ ध्येयासाठी* या नावाने इंदिरा सहस्त्रबुद्धेंनी केला. व विल्यम शेक्सपीयरच्या

*ऑथेल्लो* या नाटकाच्या कथानकाचा संक्षिप्त अनुवाद केला. १९२९ साली जगन्नाथ पंडितांच्या *गंगा लहरी* काव्याचे भाषांतर आनंदीबाई लेले यांनी *सुबोध गंगालहरी* या शीर्षकाने केले. या ग्रंथाद्वारे आनंदीबाईचे संस्कृत भाषेवरील प्रभुत्वही दिसून येते.

१९३० ते १९४० या कालखंडात लेखिकांनी आठ अनुवादक पुस्तक प्रकाशित केली. नंतरच्या काळात शकुंतला परांजपे सारख्या लेखिकांनी फ्रेंच भाषेतूनही मराठी अनुवाद केलेला दिसून येतो. १९३६ मध्ये लाबिश, युजेन व मार्टेन एड यांच्या *ला पूद्र ओ-सि-य* या पुस्तकांचे *सोयरीक* या नावाने शकुंतलाबाईंनी अनुवाद केला. तसेच *लव्हाय्याच द मासिच पेटिशॉ* या पुस्तकाचे *चढा आहे* या शीर्षकाने शकुंतला परांजपेंनी अनुवाद केला. शकुंतला परांजपेंची *सोयरिक* हा अनुवाद मराठीतील स्त्रीलिखित पहिला विनोदी अनुवाद असावा असे मानले जाते. शकुंतलाबाईंच्या अनुवादा संदर्भातून भारती पांडे लिहितात, "शकुंतलाबाईंनी या दोन्ही फ्रेंच कथानकांना उत्कृष्टपणे मराठी वेच चढवला आहे. या दोन्ही अनुवादांची भाषा सोपी, रोजच्या व्यवहारातील आणि ढळकबाजु आहे. मानवी स्वभावांनी आधारलेले सुंदर विनोदही या अनुवादांमध्ये आढळतात."[२]

नाटकाचे अनुवाद लेखनही १८५० ते १९५० या कालखंडात लेखिकांनी केले. कन्हैयातील मुन्शी यांच्या *काकाची शशी* या गुजराती नाटकाचा अनुवाद वटेरकरांनी *काकाची शशी* याच नावाने प्रभात संगीत मंडळातर्फे नाटक सादर केले. १९३६ मध्ये गुजराती *दिव्यचक्षू* या कादंबरीचा अनुवाद रत्नाप्रभा रणदिवे यांनी केला. एक उत्कृष्ट अनुवाद लेखन कमला दीक्षित यांनी १९३९ मध्ये केला. वुई *आर नॉट अलोन* या जेम्स हिल्टनच्या कादंबरीचा अनुवाद *निज्वलंक* या शीर्षकाने केला. १९४० नंतर अनुवाद लेखन क्षेत्रात मालतीबाई दांडेकर सारख्या लेखिकेचे नावही समोर येते. मालतीबाईंनी अनेक इंग्रजी बालकथांचे अनुवाद केले. *चिनीगुलाब* या पुस्तकातील काही कथांचा अनुवाद मालतीबाईंनी केला. १९४१ मध्ये *छानगोष्टी, माणिकमोती, चिमण्या कळ्या, विक्रमाचा विक्रम* ही मालतीबाईंची काही निवडक पुस्तके. तसेच १९५० मध्ये मेरी कॉटेली यांनी *शिष्का* या इंग्रजी कादंबरीचा *पुनर्जन्म* हा अनुवाद केला.

कमला फडकेंनी स्टफिन लीकॉक यांच्या इंग्रजी लेखांचे मराठीत रुपांतर उत्तम रित्या केले आहे. १९४४ साली *छायानट* व *पूर्णिमा'* या दोन अनुवादित केलेल्या कादंबऱ्या रत्नप्रभा रणदिवेच्या नावावर आहे. तसेच मालतीबाई चोळकट *(चित्रलेखा),* शांता शेळके *(विधवेचा पुनर्विवाह)* अशी मराठी अनुवादक पुस्तके १९०० ते १९५० या कालखंडात उल्लेखनीय आहेत.

१८५० ते १९५० या काळात साधारणतः तीस ते पस्तीस मराठी अनुवाद झाले. इंग्रजी, फ्रेंच, चीन, बंगाली, गुजराती अशा अनेक भाषांतील पुस्तकांचे मराठीत अनुवाद लेखकांनी केले. साधारणत: १९०० नंतरच स्त्रियांनी अनुवाद करण्याच्या क्षेत्रात आपले कार्य सुरु केले. लेखकांनी उत्तम दर्जाचे अनुवाद लेखन शब्दशः भाषांतरे किंवा रुपांतरांच्या स्वरुपात केले. प्रारंभीच्या अनुवाद लेखनाच्या काळातच लेखकांनी मराठी वाचकांच्या पसंतीस पडेल याचा विचार करूनच इतर भाषांतील पुस्तके मराठीत अनुवादित केले. मुलांच्या आवडीनिवडींचा विचार करूनही मालतीबाई दांडेकर व इतर काही लेखिकांनी इतर भाषांतील अनेक बालकथा मराठीत आणल्या. प्रारंभीच्या काळातही लेखिकांनी उत्तम प्रकारे अनुवाद लेखन केले व अनुवादाच्या क्षेत्रात त्यांचे कार्य ही विस्तारले व काळानुसार अनुवादकांचे तंत्र विकसित होत गेले.

१९५० नंतर अनुवाद करण्याच्या क्षेत्रात अनेक मराठी लेखिकांनी पर्दापण केले. विविध वाङ्मय प्रकारांना हाताळून त्यांनी अनुवाद क्षेत्र विकसित करण्याचा प्रयत्न केला. इतर भाषांतील, कलाकृती त्याच ताकदीनिशी मराठीत आणण्याचा लेखिकांचा प्रयत्न १९५० च्या नंतर खऱ्या अर्थाने सफल झाला. त्यामुळे या कालखंडात स्वैर अनुवाद, भावानुवाद, मुक्त अनुवाद हे प्रकार निर्माण झाले. १९५० पूर्वी जरी स्त्रियांनी अनुवादाच्या क्षेत्रात कार्य सुरु केले असले, तरी स्त्रियांचे अनुवाद क्षेत्रातील कार्य १९५० नंतर भरभराटीस आले. १९५० ते २००० या कालखंडात तब्बल दोन हजार ललित पुस्तके व इतर धार्मिक तात्विक पुस्तके यांचा अनुवाद विविध भाषांतून मराठीत केला गेला. मराठी वाङ्मयपरंपरेत लेखिकांनी वेगवेगळे साहित्यप्रकार उत्तमरित्य हाताळले. कथा, कविता, कादंबरी, प्रवासवर्णने, ललितगद्य याप्रमाणेच ‘वैचारिक लेखन’ करण्यासही लेखिकांनी आपला सहभाग दर्शवला. स्त्रियांचे वैचारिक लेखन हे संख्येने कमी असले तरी ते महत्त्वपूर्ण असे आहे. स्त्री शिक्षणाचा प्रसार झाल्यापासून स्त्रियांचे लेखन क्षेत्रात्तील कार्य सुरु झाले. सावित्रीबाई फुले व ज्योतिबा फुले यांच्या प्रयत्नानेच स्त्रीशिक्षणास चालना मिळाली.

इ. स. १८१२ मध्ये हॅरिफ्ट ज्युबेल व ज्युडसन यांच्या विचारातून खेड्यामधून सामुदायिक शिक्षणाचा यशस्वी प्रयत्न घडवून आणला गेला. त्याच्या या प्रयत्नाने ‘स्त्रीलाही पुरुषांप्रमाणे जगण्याचा अधिकार आहे’. हा विचार स्त्रीमनापर्यंत पोहचवण्यासाठी विविध सुबोध पुस्तिकांतून वेगवेगळे स्त्रीविषयक लेख प्रसिद्ध होऊ लागले. स्त्रीच्या समस्या, स्त्रीची मानसिकता, स्त्री जीवन, स्त्रीचे समाजात होणारे शोषण अशा असंख्य विषयावर लेखनाबरोबर चळवळी सुरु झाल्या. समाजसुधारकांनी स्त्री सुधारणासाठी प्रयत्न सुरु केले

आणि या चळवळीचे पडसाद १८३२ पासून नियतकालिकामध्ये दिसू लागले. स्त्री वैचारिक लेखनाचा प्रारंभ हा १८३२ मध्येच झाला.

सुरुवातीच्या काळात स्त्रियांनी केलेले वैचारिक लेखन हे वृत्तपत्रासाठी होते. १८३२ मध्ये *माता* या वृत्तपत्रातून 'स्त्री' मनाचा वेध घेणारे लेखन झाले. स्त्री वैचारिक लेखनास प्रारंभ झाला; तो *माता* या वृत्तपत्रामुळेच. 'स्त्री'ला स्वभानाची जाणीव झाल्यानंतर स्त्रियांनी आपले प्रश्न, विचार मुक्तपणे मांडण्यास सुरुवात केली. पण ती अजूनही तत्कालीन सामाजिक बंधनातून बाहेर पडली नव्हती, त्यामुळे सुरुवातीच्या काळात स्त्रियांनी जे वैचारिक लेखन केले, त्याला स्वतःचे नाव न देता *एक भगिनी, एक गरीब भगिनी* अशा नावाने स्त्रियांनी लेखन केले. आपल्या लेखनाद्वारे त्यांनी विधवा पुनर्विवाह, बालविवाह, सती प्रथा, केशवपन अशा कलंकित प्रथांवर हल्ला चढवला.

१८३० ते १९०० या कालखंडात अनेक विचारवंत विधवा विवाहाविषयी मतमतांतरे नोंदवत होते. त्यांची मतमतांतरे *इंदुप्रकाश* या अंकातून प्रकाशित होत होती. या प्रेरणेनेच १३ सप्टेंबर १८८६ च्या *इंदूप्रकाश* च्या अंकात एका विचारवंत स्त्रीने बालविवाह, विधवा विवाह या विषयावर बोलणारे पुरुष, स्त्रीची मनःस्थिती जाणून न घेता स्त्रियांविषयी त्या विचारवंतांची असलेली मतमतांतरे, एकूण या सर्वात पुरुषांचाच फायदा कसा होतो. इत्यादी विषयांवर प्रखरपणे *आपली भगिनी* या नावाने लेखन केले. तिचे हे लेखन तटस्थ स्वरूपाचे होते. १८३० नंतरच स्त्रियांनी विविध विषय हाताळले. पण तरीही स्त्रियांचे हे लेखन 'स्त्रीकेंद्रित' विषयांवरच असल्याचे जाणवते. १८८०-८१ या कालखंडात वैचारिक लेखन करणाऱ्या लेखिकांमध्ये सर्वात महत्त्वाचे नाव म्हणजे ताराबाई शिंदे. ताराबाईंचे वैचारिक लेखन म्हणजे वैचारिक लेखनाचा एक उत्कृष्ट नमुनाच होता. त्याचप्रमाणे ताराबाईंनी सती प्रथेच्या विरोधातही टोकदार असे लेखन केले. *स्त्री-पुरुष तुलना* या पुस्तकात त्या केशवपन पद्धतीवर हल्ला चढवताना असेही म्हणतात की, "तुमच्या बायका मेल्या म्हणजे तुम्हीही आपले तोंड काळे करून, दाढ्या-मिश्या भादरून यावत आजन्मपर्यंत कोठेही अरण्यवासात का राहू नये बरे?" ताराबाईंच्या बरोबरीनेच १८४० ते १९१० याच कालखंडात पंडिता रमाबाई सरस्वती यांनीही *स्त्री-धर्मनीती* या पुस्तकातून आपले विचार मांडले. इ.स. १९०० नंतरच स्त्रियांचे शिक्षण क्षेत्रातील कार्य सुरु झाले. १९०० – १९५० या कालखंडात बहुतांश स्त्रियांनी शिक्षणाच्या जोरावर प्रबोधनपर असे लेखन २० व्या शतकाच्या प्रारंभी केले. १९०० ते १९५० या कालखंडाच्या सुरुवातीलाही लेखिकांनी बालविवाह, बालविधवा, विधवा विवाह, केशवपन, हुंडाबळी, स्त्रियांच्या समस्या या

विषयांवर लेखन झाले. पण १९३० नंतर मात्र स्त्रियांच्या वैचारिक लेखन विषयात नवीन विषयांची भर पडली. १९३० पर्यंत स्त्रियांची वैचारिक पुस्तकेही संख्येने कमीच होती. पण १९३० नंतर नवीन विषयांच्या जोडीने स्त्रियांनी वैचारिक लेखन जोमदारपणे सुरु केले व नंतर अनेक स्त्री लिखित वैचारिक पुस्तके प्रकाशित झाली. १९४० नंतर मात्र स्त्रियांचे वैचारिक विषय हे प्रारंभीच्या विषयांपेक्षा खूपच वेगळे होते. विभावरी शिरुरकर यांनी बंडखोरीच्या अंगाने जाणारे वैचारिक लेखन केले. तसेच दुर्गाबाई भागवत यांनी १९४७ साली *राजारामशास्त्री भागवत व्यक्तिचित्र व वाङ्मय विवेचन* हे पुस्तक प्रकाशित केले. स्वातंत्र्यानंतर भारतीय स्त्रियांचे जीवन व स्त्री जीवनातील स्थित्यंतरे मांडणारे लेखन वसुंधरा पटवर्धन यांनी *आमचे स्त्री जीवन* या आपल्या पुस्तकातून केले. स्त्रीचे स्वतंत्र्य व तिचा आत्मसन्मान, स्त्री शिक्षणाचे महत्त्व, स्त्री स्वतंत्र यांचा नव्या दृष्टिकोनातून केलेला विचार वसुंधरा पटवर्धनाच्या लेखणीतून जाणवतो. प्रारंभीच्या स्त्रियांनी स्त्रीशिक्षणाबरोबर 'स्त्री'ची आपल्या संसारा कुटुंबाप्रती असणारी कर्तव्ये, जबाबदारी यावर अधिक भर दिली. पण 'स्त्रीनेही स्वावलंबी जीवन जगावे' असा मोलाचा विचार मांडण्याचे कार्य त्यांनी आपल्या लेखनाद्वारे केले. 'स्त्री-पुरुष समानता' या विषयाला थोडेफार जवळ जाणारे लेखन वसुंधरा पटवर्धनांनी केले असल्याचे जाणवते. समाजशास्त्र व मानववंशशास्त्र या विषयाच्या अंगाने कलात्मक व वैचारिक लेखन करणाऱ्या लेखिका म्हणजे इरावती कर्वे. इरावती कर्वे यांचे लेखन हे बहुविध अंगानी परिपूर्ण आहे. *मराठी लोकांची संस्कृती* यातून मराठी लोकांची संस्कृती, आचारविचार, एकूणच मराठ्यांची वाटचाल याचे प्रभावी लेखन केले आहे. १९०० ते २००० या कालखंडातील स्त्रियांनी मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार करणारे वैचारिक लेखनही केले आहे. शिक्षणविषयक क्षेत्रातील मानसशास्त्रीय दृष्टीने लेखन केले गेले यात डॉ. मेधा कुमठेकर यांच्या *कोंडलेली मने* (१९८६) या पुस्तकाचा उल्लेख करावा लागतो. यात त्यांनी मुलांना वाढत्या वयात जाणवणाऱ्या समस्या व त्याचा त्यांच्या मनावर होणारा परिणाम व उपाय त्यांनी उपरोक्त पुस्तकातून सांगितले आहे. डॉ. मेधा कुमठेकर प्रमाणेच संपादिका स्वर्णलता भिशीकर तांनी *मनाचा शोध* हे पुस्तक १९८८ साली प्रकाशित केले. यातून त्यांनी मानवी मनाविषयी असलेली प्रत्येक देशातील लोकांची वेगवेगळी मते अनेक लेखांच्या माध्यमातून सांगितली आहे. बागेश्री पारीख व प्रतिमा घीवाला या दोघांनी मिळून १९८८ मध्ये *समस्या साहचर्याच्या* हे सतरा लेखांचे पुस्तक लिहिले. लग्नसंस्था, लग्नसंस्थेतील समस्या, तिचे अस्तित्व टिकवण्यासाठी कोणते प्रयत्न करावे? इत्यादी माहिती उपरोक्त पुस्तकातून मिळते. १९८६ ला आशा मुंडले यांनी *घर* हे

मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून लिहिलेले पुस्तक. तसेच त्यांनी *घराचे घरपण* व *मारण्याचे मन, प्रत्येक मुलाला घर हवं, शरीराचे मानसशास्त्र* असे अनेकविध विषयांवर ३३ लेख आशा मुंडले यांनी लिहिले आहे. वैचारिक लेखनाच्या संदर्भात स्त्रियांनी अनुवादित वैचारिक लेखनही केल्याचे जाणवते. स्त्री वैचारिक अनुवादित लेखनाच्या क्षेत्रात पहिले नाव पुढे येते ते कृष्णाबाई मोटे यांचे. कृष्णाबाई मोटे यांनी १९६७ मध्ये *सामाजिक मानव जातीचा यथायोग्य अभ्यास* हे पुस्तक लिहिले. अमेरिकन लेखक स्टुअर्ट चेस यांच्या *The proper study of Mankind* या पुस्तकाचा अनुवाद कृष्णाबाई मोटे यांनी केला आहे. स्त्री राजकीय वैचारिक लेखनाचा विचार करता असेही लक्षात येते, की राजकीय विषय अधिक व्यापक बनवण्याच्या उद्दिष्ट्याने स्त्रियांनी राजकीय विषयांवरील पुस्तकांचेही अनुवादित लेखन केले आहे. अनुसूया लिमये यांनी आंतरराष्ट्रीय साम्यवाद यावर आधारलेला सिडने हुक या लेखिकांचा ग्रंथाचा अनुवाद १९६२ साली 'जागतिक साम्यवाद' या नावाने केला. तसेच रुथ बेने फिकटे यांच्या 'Race and Racism' या पुस्तकाचा अनुवाद मीनाक्षी दीक्षित यांनी केला. अनुवादित पुस्तकाचे नाव 'वंश आणि वंशवाद', डॉ. सुमन वैद्य व डॉ. शांता कोठेकर यांनी मिळून 'साम्राज्यवादी षडयंत्र' या नावाचे अनुवादित पुस्तक निर्मिले.

थोडक्यात १९५० ते २००० या कालखंडात स्त्री वैचारिक लेखिकांनी महत्त्वपूर्ण असे विषय लेखकांच्या समोर उभे केले. शिक्षण क्षेत्रापासून राजकीय क्षेत्रापर्यंतचे विषय मोठया कसबीने त्यांनी हाताळले. वैचारिक लेखनात स्त्रियांचे लेखन कमी असले तरी ते दर्जेदार आहे. बदलत्या काळानुसार स्त्रियांनी वैचारिक लेखनात विषय हाताळले व वैचारिक साहित्याच्या क्षेत्रात आपले एक वेगळे स्थान निर्माण केले. १९५० ते २००० या कालखंडात स्त्रियांनी संशोधन प्रकल्पाच्या माध्यमातून वैचारिक लेखन केले. 'स्त्री मुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा' हा संशोधन प्रकल्प डॉ. सुमा चिटणीस यांनी टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेसच्या 'स्त्री अभ्यास केंद्रा' तर्फे संपादित केला. तसेच 'स्त्री प्रश्नांची चर्चा : एकोणिसावे शतक' हा प्रतिभा रानडे स्वतंत्र प्रकल्प आहे, तर 'स्त्री अस्मितेचा आविष्कार : एकोणिसावे शतक' मृणालिनी जोगळेकर यांनी लिहिला. तर स्त्री अभ्यास केंद्राने घातलेल्या विसाव्या शतकातील स्त्रियांच्या कर्तृत्वाचा शोध या प्रकल्पासाठी विनया खडपेकर यांनी 'स्त्री स्वातंत्र्यवादिनी : विसाव्या शतकातील परिवर्तने' या नावाने बदलत स्त्री जीवनाचा आढावा घेतला. डॉ. लीला दीक्षितांनी 'प्राचीन मराठी साहित्यातील स्त्रीरूप' या नावाचा संशोधन ग्रंथ प्रसिद्ध केला. १९८५ मध्ये पद्मजा मोरजे यांनी 'स्त्री मुक्ती चळवळ व लोकसाहित्य' हे पुस्तक प्रकाशित केले. २००० ते २०१० या कालखंडात स्त्रियांनी केलेले

वैचारिक लेखन हे खूपच वेगळे आहे. या कालखंडातील लेखिका तत्कालीन समाजजीवनाशी, विविध घटकांशी एकरूप होऊन लिहिताना, दिसतात. चित्रपट, संगीतशास्त्र सारख्या नव्या विषयांवर वैचारिक दृष्टिकोनातून २०००-२०१० या कालखंडात लेखन झाल्याचे दिसते. ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक, शास्त्र, कला अशा विविध विषयांना उपरोक्त कालखंडात स्त्रियांनी स्पर्श केलेला दिसतो. संशोधनात्मक लेखन करण्यावरही २०००-२०१० या कालखंडातील बहुतेक लेखिकांनी भर दिली. तसेच, चित्रपटासारख्या विषयाची तांत्रिक व कलात्मक माहिती वाचकांना करून दिधली. असे असले तरी प्रारंभी पासून ते २०१० पर्यंत स्त्रियांचे वैचारिक लेखन हे 'स्त्री केंद्रित' असल्याचे प्रकर्षाने जाणवते.

❑❑❑

# पोस्ट डॉक्टरल च्या दरम्यान प्रकाशित झालेले शोधनिबंध

१. अरुण कोलटकरांच्या कवितेची शैली - ज्ञानमय -मार्च २०१६ ते मे २०१६

२. अरुण कोलटकरांच्या *द्रोण* या कवितासंग्रहात कवितेचा रूपबंध - पॉवर ऑफ नॉलेज - एप्रिल -जून २०१७

३. अरुण कोलटकरांच्या *चिरीमिरी* या काव्यसंग्रहातील आशयसूत्र -विद्याभारती इंटरनॅशनल इंटरडिसिप्लिनरी जर्नल ,ऑगस्ट २०१७

४. *अरुण कोलटकरांच्या कविता* या कवितासंग्रहात आशयसूत्रे -विद्यावार्ता -जुलै ते सप्टें. २०१७

५. अरुण कोलटकर यांची *द्रोण* कविता -अक्षर वाङ्मय -जुलै ते सप्टें २०१७

६. स्त्रीलिखित आत्मचरित्रातील मूल्यांचे स्वरूप - स्नेहवर्धन प्रकाशन,ऑक्टोबर २०१७

७. १८८० ते १९५० या कालखंडातील स्त्रियांचे कथालेखन , संशोधनविश्व -डिसेम्बर २०१७.